प्रकाशवाटा

शिक्षणातील

(Leadership Practices of School Heads)



यशोगाथा

SLA

2022-23

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था , औरंगाबाद.

प्रेरणा

मा.रनजीतसिंह देओल , भा.प्र.से.

प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ,महाराष्ट्र राज्य.

मा. सूरज मांढरे ,भा.प्र.से.

आयुक्त (शिक्षण) ,महाराष्ट्र राज्य , पुणे

मा.कैलास पगारे ,भा.प्र.से.

राज्य प्रकल्प संचालक ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद , मुंबई

मा. कौस्तुभ दिवेगावकर ,भा.प्र.से.

संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद , महाराष्ट्र , पुणे

मुख्य संपादक

रमाकांत काठमोरे

संचालक

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मीपा) , औरंगाबाद

संपादक

विजय जोशी

प्रशासकीय अधिकारी

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मीपा) , औरंगाबाद

सहसंपादक

डॉ. ज्योती कुलकर्णी

समन्वयक

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मीपा) , औरंगाबाद

सहसंपादक

अरुण धामणे

क.सल्लागार

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मीपा) , औरंगाबाद

सहा.संपादक

कल्पना जोशी

समन्वयक

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मीपा) , औरंगाबाद



महाराष्ट्र शासन

शुभेच्छा संदेश

महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद ही स्वायत्त नोंदणीकृत संस्था आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार राज्य शासनाने शासन निर्णय दि. ७ मे १९९४ नुसार ही संस्था स्थापन केलेली आहे. सदर संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यातील मुख्याध्यापकांपासून ते तालुका ,जिल्हा,विभाग व राज्य पातळीवरील शैक्षणिक प्रशासकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

शासन पत्र दि.५ जानेवारी २०१७ नुसार या संस्थेस राज्याची शालेय नेतृत्व अकादमी (School Leadership Academy - SLA) म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे संस्थेमार्फत शिक्षण विभागातील नेतृत्व सक्षम करण्यासाठी विविध कार्यक्रम राबविले जात आहेत.

SLA अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील सक्षम शालेय नेतृत्व असणाऱ्या व प्रत्यक्ष कामकाजातून तसे दर्शविणाऱ्या महाराष्ट्रातील निवडक शाळांच्या यशोगाथा या पुस्तिकेच्या रूपाने मिपा संस्थेमार्फत प्रदर्शित केलेल्या आहेत.या शाळांमधील मुख्याध्यापक,त्यांचे सहकारी शिक्षक व इतर सर्व समाविष्ट व्यक्ती यांनी वेगळ्या वाटेवर जाऊन विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रिया गतीने होण्यासाठी केलेले प्रयत्न निश्चितच प्रेरणादायी आहेत. शिक्षणातील प्रकाशवाटा यातील शाळांच्या यशोगाथांमधून प्रेरणा घेऊन शालेय शिक्षणाशी संबंधित प्रत्येकाने विद्यार्थी यशासाठी कार्यरत रहावे यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा !!!

रनजीतसिंह देओल, भा.प्र.से.
प्रधान सचिव
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई



महाराष्ट्र शासन

शुभेच्छा संदेश

महाराष्ट्र राज्याची ' शालेय नेतृत्व अकादमी ' म्हणून घोषित करण्यात आलेली मिपा संस्था शालेय शिक्षणातील व शैक्षणिक नेतृत्वा संदर्भातील नवीन विचार प्रवाह,नवनवे प्रयोग,कृती शालेय पातळी पासून राज्य पातळी पर्यंत आपल्या अनेक कार्यक्रमामार्फत पोहोचविण्याचे कार्य सतत करत आहे.

शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीसाठी वैयक्तिक व सामाजिक प्रगतीचा मूलमंत्र आहे. महाराष्ट्रात सकारात्मक बदल झालेल्या काना कोपऱ्यातील वाड्या ,वस्त्यांमधील शाळांना राज्य व राष्ट्रीय पातळीवर स्थान मिळवून देण्याचे कार्य मिपा संस्थेमार्फत होताना दिसते.विविध आव्हानांचा सामना करत विद्यार्थी हिताचे विविध उपक्रम, कृती याद्वारे विद्यार्थी अध्ययन प्रक्रिया सक्षम करण्यासाठी शालेय नेतृत्वाचे प्रयत्न "शिक्षणातील प्रकाशवाटा "या यशोगाथेमध्ये आढळून येतात.अशा उपक्रमशील शिक्षक , मुख्याध्यापक यांचे प्रयत्न वाचून समाधान होत आहे.विद्यार्थी हित महत्वाचे मानून शाळेमध्ये यथोचित प्रयत्न करणारे मुख्याध्यापक,शिक्षक यांच्या यशोगाथेतील कृतीतून निश्चितच शालेय शिक्षणातील प्रत्येक घटकाला शैक्षणिक कार्याची दिशा मिळेल असे वाटते.

शालेय विद्यार्थ्यांना समृद्ध अनुभवाच्या विविध नाविन्यपूर्ण संधी देणाऱ्या या शाळा प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक,मुख्याध्यापक यांचेसाठी प्रगतीच्या वाटा दाखवणाऱ्या आणि प्रेरणा देणाऱ्या ठरतील. गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या अंमलबजावणीतून नवभारताची उभारणी करण्यासाठी आपणा सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा !!!

सूरज मांढरे, भा.प्र.से.
आयुक्त शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे



महाराष्ट्र शासन

शुभेच्छा संदेश

मिपा संस्थेमार्फत शिक्षणातील नवीन विचार प्रवाहांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील मुख्याध्यापक ते राज्यस्तर अधिकारी यांच्याकरिता नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन केले जाते ,त्यातीलच एक उपक्रम म्हणजे यशोगाथा - जी "शिक्षणातील प्रकाशवाटा" या नावाने आपल्या समोर येत आहे,ज्यात महाराष्ट्रात चांगले काम करणाऱ्या निवडक शाळांची यशोगाथा आपल्याला वाचावयास मिळेल .

अनेक नवोपक्रम राबवत शाळांनी आर्थिक,भौगोलिक , सामाजिक अडथळे दूर करत प्रगती केलेली या यशोगाथांद्वारे दिसून येते. "सकारात्मक विचार आणि सकारात्मक कामाचा परिणाम म्हणजे यश" या वाक्याचा प्रत्यय यशोगाथांमधून दिसून येतो.या यशोगाथा केवळ प्रेरणा म्हणून न वाचता आपणही या मार्गावर एक पाउल पुढे याल,अशी अपेक्षा !!

या यशोगाथा म्हणजे खरोखरच शिक्षणातील प्रकाशवाटा आहेत, शिक्षक, मुख्याध्यापक यांचे प्रयत्न यातून दिसून लक्ष्यात येतात. महाराष्ट्रातील इतर शिक्षक, मुख्याध्यापक यांनी यातून प्रेरणा घेऊन आपल्या नवनवीन कल्पना, योजना प्रत्यक्ष अमलात आणून विद्यार्थ्यांचा विकास साधून २१ व्या शतकातील भारताचे नागरिक तयार करण्यासाठी एक पाऊल पुढे उचलावे .कारण "सुरुवात करणे हे पुढे जाण्याचे रहस्य आहे". या यशोगाथांच्या प्रेरणेतून शिक्षणातील आणखी नवनवीन यशोगाथा महाराष्ट्रातील काना कोपऱ्यात तयार होतील हा विश्वास वाटतो. यशोगाथेतील सर्व शिक्षक, मुख्याध्यापक यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !!!

कौस्तुभ दिवेगावकर, भा.प्र.से

संचालक

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,

महाराष्ट्र , पुणे



संपादकीय

कोरोनानंतरच्या काळात सारे जग राखेतून पुन्हा निर्माण होणाऱ्या फिनिक्स पक्षाप्रमाणे स्वतःचे अस्तित्व निर्माण करत आहे. नव्या युगातील नवी आव्हाने लक्षात घेवून त्याप्रमाणे स्वतः ला घडवण्याचा प्रयत्न माणूस करत आहे. उद्याचा नागरिक सगळी आव्हाने पेलण्यास सक्षम हवा म्हणून आजचा विद्यार्थीही तसा घडवणे ही शाळांची जबाबदारी आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विविध शैक्षणिक गरजा, संरचनात्मक असमानता आणि विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्यामध्ये येणाऱ्या समस्यांचे निराकरण हेच नवीन शैक्षणिक धोरण 2020 चे उद्दिष्ट आहे.

एकविसाव्या शतकाच्या गरजेनुसार अनुकूल आणि प्रत्येक विदयार्थ्याच्या अद्वितीय क्षमता बाहेर आणण्याचे उद्दिष्ट ठेवून भारतास दोलायमान ज्ञान, समाज, आणि जागतिक ज्ञान महासत्तेत रुपांतरीत करण्याचे उद्दिष्ट आहे. 21 व्या शतकात हवी असलेली कौशल्ये असलेले नागरिक बनवणे ही जबाबदारी अर्थात शाळांची आहे.

‘ मेघसा जाशील तेथे आपणा शिंपीत जा ,

वांझोट्या झाडाझुडपांना नीट गोंजारीत जा,

पोळलेला माळ येता, थांब स्नेहाने जरा ,

स्वप्न पाचूचे तयाचे, येऊ दे रे मोहरा ‘.

अशी प्रेरणा घेवून मुलांच्या डोळयातली स्वप्ने प्रत्यक्षात उतरवण्याचा ध्यास घेतलेला शिक्षक आज कोरोनानंतर पुन्हा नव्याने उभा आहे. कौशल्याधिष्ठीत शिक्षण देण्यासाठी नवनवीन मार्ग अवलंबत आहे. समोर येणाऱ्या शारीरिक, आर्थिक, सामाजिक , भौगोलिक समस्यांवर मात करुन पुढे जाण्यासाठी धडपडत आहे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी नवनवीन कल्पना राबवत आहे . विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी त्याची धडपड अव्याहतपणे चालू आहे.

‘ तुम्ही विचार पेरता आणि कृती जन्माला येते,
कृती पेरता आणि सवय जन्माला येते ,
सवय पेरताआणि चरित्र निर्माण होते ,
चरित्र पेरता आणि व्यक्तिमत्व निर्माण होते ‘.

म्हणूनच हा विचार शुभंकर असायला हवा. अशाच शुभंकर विचाराच्या प्रेरणेतून शिक्षक विदयार्थ्यांना घडवत आहे. त्याची ही धडपड , प्रयत्न यातूनच निर्माण होते ही यशोगाथा .

संपूर्ण महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळा, अनुदानित शाळा, विना अनुदानित शाळा ,कायम विना अनुदानित शाळा , शासकीय आश्रमशाळा, विदयानिकेतन या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांकडून वेगळामार्ग यशस्वीपणे स्वीकारणाऱ्या व सकारात्मक शाश्वत बदल घडवून आणलेल्या यशोगाथा महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मीपा) , औरंगाबाद मार्फत मागवण्यात आल्या. 126 शाळांनी आपली यशोगाथा पाठवून

सकारात्मक प्रतिसाद दिला . त्यातून जिल्हानिहाय ,व्यवस्थापन , भौगोलिक परिस्थिती तसेच यशोगाथेचे क्षेत्र इ. बाबींचा विचार करून निवडक याशोगाथांचे एक ' फ्लिप बुक ' तयार करण्यात आले आहे. या फ्लिप बुकमध्ये 'शाळानिहाय यशोगाथा' या विभागात 62 शाळांच्या आणि 'क्षेत्रनिहाय यशोगाथा' या विभागात 31 शाळांच्या यशोगाथांचा समावेश करण्यात आला आहे. या यशोगाथा (case study) वाचताना आपणास लक्षात येईल की, केवळ पुस्तकी ज्ञान न देता शिक्षक मुलांना जगण्याचे धडे देत आहेत .

' जीवनशाळा ' सारख्या उपक्रमातून दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणीचा मात करुन कमीत कमी साधनात जीवन जगण्याची कला विदयार्थ्यांना अवगत करुन देणारा शिक्षक आपल्याला इथे भेटतो. कोरोनासारख्या महामारीत ही कला ज्यांना अवगत होती त्यांना जगणे सुलभ झाले. हा आपण अनुभव घेतला. भातुकलीच्या खेळामधून मुलांच्या भावविश्वाशी जोडला जावून त्यांच्याशी संवाद साधणारा शिक्षक येथे आहे . भाकरी, पोळीच्या आकारातून अर्धा, पाव, पाऊण या संकल्पना समजवणारा शिक्षक, आईचे काढलेल्या रांगोळीतून बिंदू, रेषा, रेषाखंड त्रिकोण, आयत या संकल्पना स्पष्ट करणारा शिक्षक येथे भेटतो. चार भिंतीच्या आत राहून विश्वरूप दर्शन घडवणारा शिक्षक म्हणजेच ज्यांनी शाळा global बनवली आहे .

'मिशन आपुलकी ' च्या माध्यमातून लोकसहभाग वाढवून मुलींना शिक्षण प्रवाहात आणणारा शिक्षक येथे आहे. आदिवासी भागात कुठलीही भौतिक सुविधा नसताना मुलांना शिक्षणप्रवाहात आणण्यासाठी धडपडणारा शिक्षक येथे आहे.

' ग्रेट भेट ' सारख्या उपक्रमातून मुलांसमोर विविध आदर्श व्यक्तिमत्व ठेवून त्यांना प्रेरणा देणारे, कलादालन सारख्या निर्मितीतून विविध वाद्य उपलब्ध करून मुलांमधील कला जोपासणारे शिक्षक येथे आहेत.

' साऱ्या कोवळया जीवांना अक्षराचा स्पर्श व्हावा ,
ऊजेडाचे दान देण्या झोपडीत सूर्य यावा '.

असे म्हणून स्थलांतरित बालकांना शिक्षण प्रवाहात आणणारा शिक्षक येथे आहे. प्रत्येकाचा मार्ग वेगळा, कल्पना वेगळया, आव्हाने वेगळी , ध्येय मात्र विकासाचे या यशोगाथांच्या वाचनातून आपल्यालाही नवीन कल्पना सुचतील, प्रेरणा मिळेल आणि देशाचे भविष्य घडवणाऱ्या या कार्यात आपले मोलाचे योगदान असेल यात शंका नाही .

पुढील वर्षीच्या ' फ्लीप बुक ' मध्ये आपल्या शाळेचा समावेश असेल , काहीतरी नाविन्यपूर्ण, विदयार्थी विकासात महत्तवपूर्ण कामगिरी आपल्याकडून होईल हा आत्मविश्वास आपल्यात निर्माण होईल हे नक्की.

' देखणी ती पाऊले जी ध्यासपंथे चालती
वाळवंटातून सुद्धा स्वस्तीपद्मे रेखिती '.

राष्ट्राचे भविष्य घडविण्यास आपले योगदान देणाऱ्या , त्यासाठी वेगळया वाटा निवडणाऱ्या, विदयार्थी विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या ध्येय वेड्या शिक्षक, मुख्याध्यापक यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

रमाकांत काठमोरे
संचालक ,
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था , औरंगाबाद.

विभाग 1

शाळानिहाय यशोगाथा

अनुक्रमणिका

अ.क्र.	जिल्हा	शाळेचे नाव	यशोगाथा क्षेत्र	पृष्ठ क्र.
1	अकोला	जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक कें. शाळा, आडसूळ,अकोला	स्वच्छ व सुंदर शाळा ,लोकसहभागातून वि.विकास व इतर 2 उपक्रम	01
2	अमरावती	जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, खंडाळा खुर्द,अमरावती	आनंददायी शिक्षणासाठी नवोपक्रम - प्रश्ननिर्मिती कौशल्याद्वारे भाषा विकास	06
3	कोल्हापूर	विद्या मंदिर (जि.प.) यादववाडी करवीर ,जि. कोल्हापूर	अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर ..' स्मार्ट टू ग्लोबल स्कूल '	10
4	कोल्हापूर	विद्या मंदिर ,करनूर (मराठी) , जि.कोल्हापूर	लोकसहभागातून शाळा व विद्यार्थी विकास	16
5	गडचिरोली	जवाहरलाल नेहरू नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा रामनगर, गडचिरोली.	लोकसहभाग व विविध उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास	20
6	गडचिरोली	जि.प. उच्च प्रा. शा. जोगीसाखरा,ता.आरमोरी ,जि.गडचिरोली	पटनोंदणी व उपस्थिती ,गळती रोखणे, क्रीडा क्षेत्रातील यश व इतर 3 उपक्रम	23
7	चंद्रपूर	जिल्हा परीषद उच्च प्राथमिक शाळा, पालडोह, जि. चंद्रपूर	365 दिवस चालणारी डिजिटल शाळा	25
8	जळगाव	काशीबाई उखाजी कोल्हे विद्यालय, विठ्ठलपेठ,जुना नशिराबाद रोड, जळगाव	शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेतील यश सह शालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास	29
9	जळगाव	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिरसाड ,जळगाव	लोकसहभागातून स्वच्छ, सुंदर व तंत्रज्ञानाचा वापर करणारी शाळा	34

अ.क्र.	जिल्हा	शाळेचे नाव	यशोगाथा क्षेत्र	पृष्ठ क्र.
10	जालना	जिल्हा परिषद प्रा.शा.दोदडगाव ,जालना	अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर	39
11	जालना	जि.प.प्रा.शा.विल्हाडी ,ता.बदनापूर ,जि.जालना	जलसाक्षरता..' वॉटरबँक '	45
12	नंदुरबार	जिल्हा परिषद शाळा जुवाणी ता . तळोदा जिल्हा नंदुरबार	आदिवासी भागातील विद्यार्थी विकासात शाळेचे योगदान	49
13	नागपूर	जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तोंडाखैरी,जि.नागपूर	क्रीडा क्षेत्रातील यश	51
14	नागपूर	जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा थुगाव निपाणी,जि.नागपूर	सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास	55
15	नाशिक	महानगर पालिका शाळा क्र.४९ मॉडेल स्कूल , नाशिकरोड. नाशिक	शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेतील यश	58
16	पुणे	जि.प.प्रा.शा.लिमटेक ,बारामती,जि.पुणे व्हिडीओ	लोकसहभागातून विद्यार्थी विकास , माझी शाळा मी शाळेचा	61
17	पुणे	जि.प.प्रा.शा.शिंदे वस्ती ,ता.इंदापूर,जि.पुणे	क्रीडा क्षेत्रातील यश	63
18	बीड	जिल्हा परीषद केंद्रीय प्राथमिक शाळा पारगाव जोगेश्वरी, बीड	अशी बदलली शाळा - अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर	65
19	बुलढाणा	जिल्हा परिषद मराठी उच्च प्रा.शा. हिंगणा कारेगाव ,जि.बुलढाणा	लोकसहभागातून वि.विकास	69
20	बुलढाणा	जि.प.म.प्रा.कें.शाळा, पाडळी,जि.बुलढाणा	स्वच्छ व सुंदर शाळा	74
21	भंडारा	जि.प.उच्च प्रा.शाळा ,हत्तीडोई,ता .जि.भंडारा	सहशालेय उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास	80
22	भंडारा	जि.प.हायस्कूल , पिंपळगाव सडक ,ता.लाखणी,जि.भंडारा.	स्थानिक /भौगोलिक ,सामाजिक परिस्थितीनुसार घेतलेले विशिष्ट उपक्रम	83

अ.क्र.	जिल्हा	शाळेचे नाव	यशोगाथा क्षेत्र	पृष्ठ क्र.
23	भंडारा	नूतन कन्या शाळा तथा कनिष्ठ महाविद्यालय भंडारा	नाविन्यपूर्ण उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास	86
24	Mumbai	Anjuman Khairul Islam Urdu Girls High School ,Mumbai	sub jude sub padhe,sport and health	90
25	Mumbai	C.E.S's MICHAEL HIGH SCHOOL, KURLA(W),Mumbai	OUR MISSION TO CURB ENVIRONMENT DEGRADATION	97
26	मुंबई	कॉसमॉस हायस्कूल ,बोरीवली ,मुंबई	लोकसहभागातून विद्यार्थी विकास,नेचर क्लब ,सहशालेय उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास	99
27	मुंबई	शैलेंद्र एज्यूकेशन सोसायटीचे मराठी माध्यमिक विद्यालय दहिसर पूर्व मुंबई	आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS)	104
28	यवतमाळ	जि.प. प्राथमिक शाळा सुकळी ,यवतमाळ	घरगुती शैक्षणिक साहित्यातून पायाभूत भाषिक साक्षरता व संख्याज्ञान	108
29	यवतमाळ	जि.प.प्रा.शा.वड्सद, जि.यवतमाळ	आनंददायी शिक्षणासाठी नवोपक्रम	112
30	यवतमाळ	जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा,भाटंबा गांव, ता.पुसद ,जि.यवतमाळ	विद्याथी विकासात पालक सहभाग	117
31	रत्नागिरी	यशोगाथा शाळा मांडकी बौद्धवाडी,जि.रत्नागिरी	भाषिक खेळातून इंग्रजी वाचन विकास	120
32	रत्नागिरी	देव्हारे हाय स्कूल ,देव्हारे जि.रत्नागिरी	लोकसहभागातून विद्यार्थी विकास	124
33	लातूर	जि. प. प्रा. शा.रुई दक्षिण लातूर	स्वच्छ व सुंदर शाळा व इतर अनेक उपक्रम	128
34	लातूर	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निवळी,ता.जि.लातूर	शालेय स्तरारवरील विविध स्पर्धा परीक्षेतील यश	130

अ.क्र.	जिल्हा	शाळेचे नाव	यशोगाथा क्षेत्र	पृष्ठ क्र.
35	वर्धा	जि . प. उच्च प्राथमिक शाळा शिरपूर होरे ,जि.वर्धा	अप्रगत विद्यार्थीविहीन गुणवत्तापूर्ण प्रगत शाळा स्पर्धा	133
36	सातारा	जि.प.प्रा.शा.विजयनगर ता. माण,जि.सातारा	गोष्टींची शाळा	137
37	सातारा	जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा बोपर्डी मु.पो बोपर्डी,ता. वाई ,जि.सातारा	शारीरिक विकास – मल्लखांब	140
38	सातारा	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोसरे, जि.सातारा	सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास	141
39	सातारा	जि.प.प्राथमिक केंद्रशाळा,पाटण मुले नं.१ ,जि.सातारा	स्वच्छ व सुंदर शाळा	143
40	सोलापूर	जि.प.प्रा. शा.माळीवस्ती,सोलापूर	स्वच्छ व सुंदर शाळा	147
41	सोलापूर	जि.प.प्रा. शा. माळेवाडी ,सोलापूर	सहशालेय उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास	149
42	अहमदनगर	जि.प.प्रा.शा.बेलापूर (उर्दू) , ता. श्रीरामपूर ,जि.अहमदनगर	अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर	151
43	अहमदनगर	जि.प.प्रा.शा. कुरुडगाव,ता .शेवगाव ,जि.अहमदनगर	शिष्यवृत्ती परीक्षा	153
44	अहमदनगर	जि.प.प्राथ.शाळा .शेंडगेवाडी, .ता.श्रीगोंदा.जि.अहमदनगर	सहशालेय उपक्रम	154
45	धुळे	जि..प.शाळा खलाणे ता.शिंदखेडा जि..धुळे	सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास	159
46	धुळे	जि.प.प्रा.शा. अचांडे तांडा ,जि.धुळे	स्थलांतरित बालकांचे शिक्षण	164
47	सांगली	जि.प.शा.खेराडीवांगी ,जि.सांगली	अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर	168
48	सांगली	जि.प.शा.सिद्धेवाडी ,जि.सांगली	लोकसहभागातून विद्यार्थी विकास	170

अ.क्र.	जिल्हा	शाळेचे नाव	यशोगाथा क्षेत्र	पृष्ठ क्र.
49	औरंगाबाद	Z. P. Urdu Primary School Borgaon Sarwani,dist.aurangabad	Baseline Literacy and Numerical Ability	172
50	औरंगाबाद	Zilla Parishad Primary School, Ghatnandra,dist.aurangabad	Building as Learning Aid	174
51	औरंगाबाद	जि.प.उ.प्रा.शा.पळसगाव ,ता. खुलताबाद ,जि.औरंगाबाद	सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास	176
52	हिंगोली	कै. दिनानाथ मंगेशकर माध्यमिक विद्या.सातेफळ,जि.हिंगोली	स्थलांतरित बालकांचे शिक्षण	180
53	हिंगोली	जि.प.प्रा.शा. आडगाव(रंजे) कें. हट्टा ता. वसमत ,जि.हिंगोली	स्पर्धा परीक्षेतील यश	182
54	ठाणे	जि.प.प्रा.शा.नारायणगाव,जि.ठाणे	पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेतील यशातून गुणवत्ता विकास	188
55	ठाणे	शहर समूह साधन केंद्र 2, गट क्रं 8, वर्तकनगर,मनपा,ठाणे	अस्थिर सौंदर्य इथे स्थिरावले	191
56	गोंदिया	जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा, हिरडामाली,जि.गोंदिया	लोकसहभाग व सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी विकास दान	196
57	गोंदिया	जि.प. प्रा. शाळा सुंदरी,ता.देवरी जि.गोंदिया	बहुभाषिक विघार्थी विकासात शाळेचे य़ोग	199
58	परभणी	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आव्हई ता.पूर्णा जि.परभणी	शा.व्य.स.,लोकसहभाग व विविध उपक्रमातून गुणवत्ता विकास	203
59	परभणी	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इरळद,ता.मानवत ,जि.परभणी	लोकसहभाग व विविध उपक्रमातून गुणवत्ता विकास	208
60	नांदेड	कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ,बिलोली ,जि.नांदेड	लोकसहभागातून मुलींचे गुणवत्तापूर्व शिक्षण	214

अ.क्र.	जिल्हा	शाळेचे नाव	यशोगाथा क्षेत्र	पृष्ठ क्र.
61	सिंधुदुर्ग	केंद्र वाडोस क्र.1 ,ता.कुडाळ ,जि.सिंधुदुर्ग	वाडोस नं.1 केंद्रातील समाविष्ट जि. प. शाळांमधील इ.2 री ते 5 वी वर्गातील मुलांना समजपूर्वक वाचन करता येणे	220
62	वाशीम	जे. सी. हायस्कूल, चवरे लाईन, कारंजा (लाड), जि. वाशिम.	सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास	225

विभाग 2

क्षेत्रनिहाय यशोगाथा

अनुक्रमणिका

अ.क्र.	क्षेत्र	पृष्ठ क्रमांक
1	स्वच्छ शाळा , सुंदर शाळा	229
2	लोकसहभाग व सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास	239
3	सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास	255
4	शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेतील यश	262
5	क्रीडा क्षेत्रातील यश	268
6	पटनोंदणी व नियमित उपस्थिती	273
7	आनदंदायी शिक्षणासाठी नवोपक्रम	278
8	पायाभूत साक्षरता आणि अंकगणितीय क्षमता	286
9	मूल्याधिष्ठित शिक्षण आणि विद्यार्थी विकास.	290
10	इंग्रजी विषयातील नाविन्यपूर्ण उपक्रम	292

विभाग – 1

शाळानिहाय यशोगाथा

1. आनंददायी शिक्षण

शाळेचे नाव : जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्रशाळा,आडसूळ, ता. तेल्हारा जि. अकोला
मुख्याध्यापकाचे नाव : कु. सुनिता लक्ष्मण बकाल
शाळेचे व्यवस्थापन : जिल्हा परिषद
ईमेल :zpupperprimaryschoolaadsul@gmail.com



प्रस्तावना:

‘ आकाशातील तारे तुम्ही,

अंधारावर रुसा,

हसा मुलांनो हसा...’

जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक कें. शाळा, आडसूळ येथील मुले, उमलती फुले, “शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे.” हे ध्येय साध्य करण्यासठी विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले विविध गुण ओळखून त्याचा शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी उपयोग करून घेऊन शिक्षण आनंददायी पद्धतीने अधिक प्रभावी ठरते, चिरकाल स्मरणात राहते. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले गुण ओळखून त्यांना प्रोत्साहित

केल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढतो. आत्मविश्वासाने, प्रयत्नाने प्रत्येक गोष्ट साध्य होते. प्रत्येक व्यक्तीमध्ये विशेष गुण असतात ते ओळखून त्याला प्रकाशझोतात आणणे ही भूमिका शिक्षकाने पार पाडली की विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास नक्कीच वाढतो.

शैक्षणिक साहित्य,कथाकथन, गीत गायन, खेळ यामधून समाजातील,घरातील,शाळेतील अनुभवातून सहज कळत नकळत विद्यार्थी विकास होतो. “शाळा,विद्यार्थी,समाज” हा सांकव मजबूत होतो.

विद्यार्थ्याच्या बालमनाचा विचार करून त्यांच्यासारखं बनून आपुलकीने वागलं की आपली विद्यार्थ्यांची “वानरसेना” सदैव तत्पर असते आणि ही तत्परता ध्येयापर्यंत पोहोचवते. मार्ग सापडला की ध्येय 100% साध्य होते. ग्रामीण भागातही गुणांची खाण आहे. शिक्षकांना फक्त शोध घ्यावा लागतो, एक हात द्यावा लागतो. मग आकाशातील तारे धरतीवर यायला वेळ लागत नाही. त्यासाठी आकर्षक आणि आनंददायी असणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यातीलच काही उपक्रमांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

प्रवेश दिंडी: वय वर्ष ५ ते ६ या वयोगटातील मुले कुटुंब, कुटुंबातील व्यक्ती, शेजारी असे विश्व सोडून शाळेतील नवीन वातावरणात आलेले असतात. त्यावेळी ती गोंधळतात, घाबरतात, संकोचतात अशावेळी त्यांची भीती नाहीशी करून शाळेच्या आनंददायी वातावरणात सहभागी होण्यासाठी इयत्ता १ ली प्रवेश पात्र विद्यार्थ्याचे स्वागत करण्यासाठी प्रवेश दिंडी काढण्यात आली.





वृक्षारोपण:

वृक्षारोपण या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना वृक्षांचे महत्त्व समजावून सांगणे. मानवाला आरोग्यपूर्ण आणि समतोल जीवन जगण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षांची गरज आहे हे सांगितले जाते. वृक्ष नसतील तर ऑक्सिजन, पाणी अन्नधान्य अशा जीवनावश्यक गोष्टी मिळणे दुरापास्त होऊन मानवी जीवन संकटात येऊ शकते याकरिता वृक्षारोपणाची आवश्यकता विद्यार्थ्यांना पटवून देऊन विद्यार्थ्याकडून वृक्षारोपण करुन घेण्यात आले.

लोक सहभागातून विद्यार्थी विकास:

जि. प. प्राथमिक केंद्र शाळा, आडसूळ येथे लोकसहभागातून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य, विविध वाद्ये आणण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना चालना मिळाली. लोकसहभागातून खालील प्रमाणे मदत प्राप्त झाली. कु. सुनीता लक्ष्मण बकाल - 55 स्पोर्ट ड्रेस ,कु . अनीता भास्करराव ठाकरे – 20×45 च्या 4 पट्टी ,कु, संगीता मधुकर पांडव –पाण्याच्या टाकीला रंगरंगोटी,लोकसहभागातून शाळेसाठी साऊंड सिस्टिम

https://youtu.be/1duS3aVVS18

कला क्षेत्रातील यश:

शिवाजी एज्यूवर्ल्ड तर्फे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या राज्यस्तरीय देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेत जि प व प्राथमिक केंद्र शाळा, आडसूळ येथील मुख्याध्यापिका कु सुनीता लक्ष्मण बकाल यांचा गट क्रमांक ५ मधून प्रथम क्रमांक आणि कु अनीता भास्करराव ठाकरे यांचा तृतीय क्रमांक तसेच गट क्र. 3 मधून



द्वितीय क्रमांक सोहम पुरुषोत्तम अमझरे तर कु. चंचल शरद अरबट व कु. पूनम संजय पाचपोर हिचा गट क्र. ३ मधून तृतीय क्रमांक आला.

तसेच गट क्र. 2 मधून वर्ग 3 री ची विद्यार्थिनी कु. नेहा राजेंद्र वानखडे हिचा द्वितीय क्रमांक मिळाला. या स्पर्धेमध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा सहभाग असल्याबद्दल शाळेला गुणगौरव पुरस्कार देण्यात आला.

स्थानिक, भौगोलिक परिस्थितीनुसार उपक्रम:

विद्यार्थ्यांच्या कला गुणांना चालना मिळावी तसेच त्यांच्या कलागुणांचा विकास व्हावा यासठी गावातील गुरुदेव सेवा मंडळाच्या मदतीने शाळेतील विद्यार्थ्यांना तबला, पेटी इ.वाद्य वाजविणे आणि भजन, भक्तिगीत गायन याबदल विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.





https://youtu.be/N2SQBRnZegE

शालेय स्तरावरील विविध स्पर्धेतील यश

शाळेमध्ये विविध स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केले जाते. क्रीडा स्पर्धा, सुंदर अक्षर स्पर्धा, वाचन स्पर्धा, नृत्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा इत्यादी स्पर्धा घेण्यात येतात आणि विद्यार्थी गुणवत्ता विकास घडवून आणला जातो. एकलव्य ज्ञान वर्धिनी बहूउद्देशीय संस्था नागपूर यांच्या वतीने प्रश्नमंजुषा.

विविध अभियानांची अमलबजावणी:

शाळेमध्ये विविध अभियान जसे की , स्वच्छता अभियान, जलसाक्षरता अभियान, मतदार जनजागृती अभियान, पोषण सप्ताह, मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा, ग्रंथ दिंडी, संविधान दिनानिमित्त ' माझे संविधान माझा अभिमान ' प्रभात फेरी काढण्यात आली.





नवोपक्रम :

1.कुंड्या बनवणे आणि टाकावू वस्तु पासून टिकावू वस्तू बनवणे.

2 . वर्ग 1 ला : अक्षर चक्रावरून शब्द बनवणे.

3 . वर्ग 2 रा : एकक, दशक, शतक टोपी संख्या वाचन.

4 . वर्ग 3 रा: नेबर कट्टा

5. वर्ग 4 था: वाक्य वाचन पट्ट्या

6. वर्ग 5 वा: गणित कोडे, प्रश्नमंजूषा

7 . वर्ग 6 वा: नवीन गोष्टीचे श्रुतलेखन

8 . वर्ग 7 वा:माझी वाचनमाला





विद्यार्थी नवोपक्रम:

इ. 5 वी 6 वी 7 वी चे विद्यार्थी इ. 1 ली ते 4 थी च्या विद्यार्थीसाठी शैक्षणिक साहित्य बनवतात.

शैक्षणिक आणि प्रशासकीय कामात तंत्रज्ञानाचा वापर:

शाळेमध्ये प्रशासकीय कामासाठी शाळेचा ईमेल id बनव्यात आला आहे.त्यावर शाळेची आणि कार्यालयाची सर्व कामे ऑनलाइन पद्धतीने पार पाडली जातात.

कला दालन

विद्यार्थ्यांच्या कला गुणांचा विकास होण्यासाठी कला दालन मध्ये टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू बनवणे तसेच सिमेंटच्या कुंड्या बनवणे,विणकाम, पेंटिंग, पिशवी बनवणे,लोकरीच्या वस्तू तसेच गीत गायन इ. गोष्टी शिकवल्या जातात.



समारोप:

अशाप्रकारे शाळेतील सर्व शिक्षक विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न करीत आहेत. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष आणि सर्व सदस्य यांचे शाळा विकासासाठी मोलाचे सहकार्य मिळत आहे. शाळेत विविध उपक्रम राबविल्याने मुलांची आकलनक्षमता वाढून शाळेचा शैक्षणिक स्तर उंचावण्यास मदत होत आहे.

===== @ =====

2. आनंददायी शिक्षणासाठी नवोपक्रम - प्रश्ननिर्मिती कौशल्याद्वारे भाषा विकास

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, खंडाळा खुर्द ,ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती
इ मेल - ppawar9421743735@gmail.com
मुख्याध्यापकाचे नाव - प्रविण यशवंतराव पवार
शाळेचे व्यवस्थापन - जिल्हा परिषद



प्रस्तावना -

अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यापासून 6 किमी वर वसलेले, विविध सामाजिक पार्श्वभूमी असलेले ६०० लोकसंख्येचे गाव खंडाळा खुर्द. मानव विकास निर्देशांकानुसार अद्यापही विकासापासून लांब . अमरावती जिल्ह्यातील मेळघाट नंतर सामाजिक आर्थिकदृष्ट्या मागासलेला व सिंचनाचा अभाव असलेला हा तालुका. आर्थिक मागासलेपणाचा सामाजिक विकासाला प्रभावित करतो. मात्र " शिक्षण हे सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे ", जे आपण जग बदलण्यासाठी वापरू शकतो असे नेल्सन मंडेला म्हणतात.

आव्हाने :

खंडाळा खुर्द येथील शाळेत १ ते ५ पर्यंत वर्ग असून एकूण ३३ विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत. २०१८ या वर्षी मुख्याध्यापक ही जबाबदारी घेवून मी शाळेत पाऊल टाकले तेव्हा अनेक आव्हानांनी माझे स्वागत केले. शालेय शिक्षणातील विविध पातळीवर सकारात्मक बदल या शाळेमध्ये घडविण्याबाबत संकल्प घेऊन त्या दृष्टीने मी प्रवास सुरु केला. या शाळेमध्ये आदिवासी गोवारी समाजाच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त असल्यामुळे बोली भाषा ते प्रमाण भाषा या मधील विकसनाबाबतची समस्या प्रकर्षाने मला जाणवली. त्यामुळे लक्षपूर्वक ऐकून व वाचून त्याचे आकलन होणे व त्याच्या विकासाबाबत जाणीव व कौशल्याचा विकास करुन अपेक्षित अध्ययननिष्पत्ती विद्यार्थ्यानी संपादित करणे हे फार मोठे आव्हान माझ्या डोळयासमोर उभे होते. ज्या विद्यार्थ्यांच्या मातृभाषेचा पाया मजबूत असतो, ते इतर कोणतीही भाषा सहजतेने शिकू शकतात या बाबतचे ज्ञान मला अवगत होते. मी काय करावे जेणे करुन माझ्या संकल्पनेतील गुणवत्तापूर्ण शाळा साकारता येईल. जी हसऱ्या फुलांची आनंददायी शिक्षण देणारी बाग असेल. या दृष्टीने माझ्या या उद्धिष्टपूर्तीकरिता माझ्या अंगी असलेल्या शालेय नेतृत्व गुणाची कास धरून, प्रश्ननिर्मिती कौशल्याद्वारे भाषा विकास हा उपक्रम प्रायोगिक तत्वावर राबविण्याचे निश्चित केले व त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे नियोजन करण्याचा प्रयत्न केला.

समस्या निराकरणासाठी केलेले नियोजन-

भाषा विषयातील पायाभूत साक्षरतेमध्ये सर्व विद्यार्थी निपुण होऊन ते भावी जीवनातील सुसंस्कारित सुजाण नागरिक घडावेत याला प्राधान्य देत त्या दृष्टीने नियोजन करण्यास सुरूवात केली. प्रत्येक विद्यार्थी हा ज्ञानाचा रचिता आहे. सभोवतालच्या घटकातून घेतलेल्या ज्ञानाचा उपयोग या उपक्रमाच्या प्रभावी अंबालाबजावणीकरिता केला. त्या दृष्टीने २२ विद्यार्थ्याकरिता ६ महिनाच्या कालावधीत प्रायोगिक तत्वावर अध्ययन निष्पत्तीला अनुसरून भाषा विकसनासंदर्भात लक्षपूर्वक श्रवण,

समजपूर्वक वाचन व प्रश्ननिर्मिती या कौशल्यावर आधारित उपक्रमाची अंमलबजावणी करण्याचे निश्चित केले. ऑगस्ट २०१८ मध्ये पायाभूत चाचणी व जानेवारी २०१९ मध्ये उत्तरचाचणी घेऊन त्या आधारे निश्चित केलेल्या अध्ययनिषपत्ती व कौशल्य यांचे मूल्यमापन करण्यासाठी नियोजन केले.

उद्दिष्ट्ये :

1. लक्षपूर्वक श्रवण करण्याची सवय निर्माण करणे.
2. बोली भाषा व प्रमाण भाषा यांचा सहसंबंध जोडता येणे.
3. प्रश्ननिर्मिती कौशल्य विकसित करणे.
4. समजपूर्वक वाचनाची आवड निर्माण करणे.
5. अपेक्षित अध्ययननिष्पत्ती संपादीत करता येणे.
6. प्रश्नदर्शक शब्दाचा योग्य वापर करुन ज्ञान आकलनावर प्रश्न निर्मिती करता येणे.
7. गटचर्चा व विद्यार्थी आंतरक्रिया घडवून आणणे.
8. विचारशक्तीला वाव देवून जिज्ञासूवृत्ती , निरिक्षण क्षमता व कल्पनाशक्ती वाढीस लावणे.
9. कविता, पाठातील शब्दाचे अर्थ व पाठाचा आशय प्रत्यक्ष कृतीद्वारे सादरीकरणातून समजून घेता येणे.

वरील हेतू साध्य करण्याकरिता ध्वनिफीत, टी.व्ही., संवाद, कविता, गोष्टी तसेच वाक्यपट्ट्या, उतारा, परिच्छेद, गोष्टी, वृतपत्र या सारख्या भाषा वाचन साहित्याचा उपयोग करण्यात आला.

प्रत्यक्ष अंमलबजावणी-

विद्यार्थ्यांनी कृतीद्वारे स्वयंअध्ययनातून ज्ञान संपादित करुन अपेक्षित प्रश्न निर्मिती करावी, या उद्देशाने हाती घेतलेल्या उपक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. सर्वप्रथम लक्षपूर्वक श्रवण हे भाषिक कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावे या हेतूने छोटी छोटी बडबड गीत, चित्ररूप गोष्टी, कविता, गाणी, संवाद या सारख्या श्रवण-कौशल्यावर आधारित ध्वनिफीत, द्रूकश्राव्य साधनाच्या माध्यमातून संधी उपलब्ध करुन देण्यात आली.

आनंददायी शिक्षणाद्वारे समजपूर्वक वाचन हे भाषिक कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागावे या अनुषंगाने छोटी-छोटी वाक्यकार्ड, वाचनपाठ, वाक्य साचे , कविता, गाणी, बडबड गीत, उतारा, परिच्छेद, बातमी, फलक लेखन, जाहिरात, गोष्टी, दिनदर्शिका, संवाद व मुलाखत यासारख्या स्वयंनिर्मित भाषा वाचन साहित्याच्या माध्यमातुन वाचलेल्या साहित्यावर आधारित स्वयं-अध्ययनातून योग्य स्वराघातासह समजपूर्वक वाचन कसे करावे या बाबत मार्गदर्शन करुन प्रत्यक्ष कृतीद्वारे सराव करुन घेण्यात आला.

प्रत्येक विद्यार्थी हा ज्ञानाचा रचिता आहे. सभोवतालच्या घटकातून घेतलेल्या ज्ञानाचा उपयोग करुन तो पुढील ज्ञानाची निर्मिती करतो. प्रत्येक विद्यार्थ्याला गाणी, गप्पा, गोष्टी, कृती, साहित्य इत्यादीची आवड असते. बाल मनात जिज्ञासूवृत्ति जागृत होऊन वाढीस लागते, ही भावना लक्षात घेऊन प्रश्नदर्शक शब्दाद्वारे पाठ्यपुस्तकातील घटकावर आधारित का**?** कसे**?** केंव्हा**?**.... या सारखे नानाविध प्रश्न निर्माण करता यावे या दृष्टीने मार्गदर्शन करुन सरावाची संधी उपलब्ध करुन देण्यात आली.

<u>विषय कोपरा -</u>


साहित्यनिर्मिती द्वारे विद्यार्थी ज्ञानाची रचना करतो आणि साहित्याद्वारे घेतेलेल ज्ञान चिरकाल स्मरणात राहतेया . .त आलाप्रत्येक वर्गामध्ये विषयानुसार साहित्य कोपरा तयार करण्या .अनुषंगाने शैक्षणिक साहित्य निर्मिती करण्यात आली हसत खेळत कृतीशीलतेच्या माध्यमातून शाळेची गुणवत्ता वृद्धींगत होत आहे .




भाषा विकसनासंदर्भात शैक्षणिक साहित्य

भाषा विषयासंदर्भात या उपक्रमाच्या संबंधित वर्गनिहाय अध्ययनिष्पत्ती निश्चित करण्यात आल्या. त्या विद्यार्थ्यांना संपादित करता याव्यात या अनुषंगाने लक्ष केंद्रित करण्यात आले. पाठ्यपुस्तकातील कविता व घटकावर आधारित प्रत्यक्ष कृतीद्वारे सादरीकरणाच्या माध्यमातून शब्द व पाठ्यांश कसा समजून घ्यावा व त्यावर आधारित प्रश्ननिर्मिती कशी करावी याबाबत अध्ययन अध्यापन प्रक्रियेत समावेश करण्यात आला व प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून सराव घेण्यात आला.

फलनिष्पत्ती- ऑगस्ट२०१८ ते डिसेंबर २०१८



पूर्वस्थिती व सद्यस्थिती यातील संपादणूक :



वरील विश्लेषणावरून भाषा विषयासंदर्भात गुणवत्ता वाढीसाठी हा उपक्रम हाती घेतल्यामुळे अबोल कळ्या खुलायला लागल्या. उतराच्या शोधात निरागस प्रश्न पुढे येऊ लागले. सर्व मुलांना सहभागी होण्याची संधी निर्माण झाली. शाळेकडे पाठ फिरवलेल्या पालक समुदायामध्ये शाळेविषयी सकारात्मक बदल होतांना दिसू लागला.

अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील बोली भाषा ते प्रमाण भाषा यांच्यातील सहसंबंध जोडताना येत असलेली अडचण दूर होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांमध्ये विचारशैली व संवादकौशल्य विकसित होऊन नेतृत्व गुण वाढीस लागला. मुलांमध्ये

सकारात्मक भावना निर्माण होऊन मला हे शक्य आहे, मी हे करू शकतो असा आशावादी दृष्टिकोन रुजला. अपेक्षित अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांना लक्षपूर्वक श्रवण करण्याची तसेच समजपूर्वक वाचून त्याचे आकलन करुन प्रश्ननिर्मिती करण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागले. तसेच विद्यार्थी-विद्यार्थी आंतरक्रिया व गट-चर्चा घडवून आणण्यास हा उपक्रम यशस्वी व फलदायी ठरला. विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना देउन त्यांच्यामध्ये जिज्ञासूवृत्ती व कल्पनाशक्ती वाढीस लागली. प्रत्यक्ष कविता व पाठाचे कृतिद्वारे स्वयंअध्ययन होऊन आनंददायी पद्धतीने शब्द व आशय विद्यार्थी समजून घेतात.

समारोप-

फक्त पुस्तक ,वही-पेन म्हणजे शिक्षण नव्हे, तर बुद्धीला सत्याकडे, भावनेला माणुसकीकडे, शरीराला श्रमाकडे नेण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण. या विचारांनी प्रेरित होऊन मुलांमध्ये उद्याचे भविष्य निर्मितीची संकल्पना घेऊन, मी आणि माझे सहकारी, माझी शाळा, माझा समुदाय यांच्या समन्वयाने आदर्श शाळा निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहोत . भविष्यातही गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या विविध संधी निर्माण होऊन राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणात यशस्वी ठरतील या दृष्टीने आम्ही प्रयत्नशील व कटिबद्ध आहोत.

सातत्याने आम्ही हा उपक्रम राबवित असल्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अन्वये निपुण भारत यामधील भाषा विषयासंदर्भात पायाभूत साक्षरतेसंबंधी अध्ययननिष्पत्ती संपादित करण्यास निश्चितच उपयुक्त व प्रभावशाली ठरेल.



लिंक्स

https://drive.google.com/file/d/1r5X5GpSRYZ2CwFepOxW_J8AL4v_xCetT/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1r6nCYzltJzcrslPa_KSkGSuSH6EZrPBa/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1r5vq-kkcq0JmM-ZWFCVYRkZUH5OVNAC2/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1r80a6qu3t4u65wWfN-6kU-9baP40jxQe/view?usp=drivesdk

===== @ =====

3.अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर

'स्मार्ट टू ग्लोबल स्कूल

शाळेचे नाव : विद्या मंदिर यादववाडी (उंचगाव) ता.करवीर जि.कोल्हापूर

मुख्याध्यापकाचे नाव:- श्री आनंद केतापा पाटील

इमेल:- rvkedar@gmail.com

शाळेचे व्यवस्थापन:- जिल्हा परिषद

प्रास्ताविक :

या शाळेत बहुतांश झोपडपट्टी भागातील तसेच कामगार वसाहत असल्यामुळे कामगार वर्गाची जवळपास ३३४ मुले शिक्षण घेत होती. शाळेची प्रत्येक वर्षी घटत असलेली पटसंख्या, विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती, अध्यापनात तंत्रज्ञानाचा अभाव जाणवत होता. इंग्रजी विषयाची भीती विद्यार्थ्यांच्या मनात जाणवत होती. शाळेत आवश्यक भौतिक सुविधांचा व अद्ययावत तंत्रज्ञानाचा अभाव होता.

समस्या /आव्हाने :

विद्यार्थ्यामध्ये अभ्यास वर्ग सुरु असताना विद्यार्थ्यामध्ये सवांदकौशल्य, प्रश्नानिर्मिती कौशल्य, सभाधीटपणा या कौशल्याच्या अभावामुळे प्रश्न विचारताना मिळणारा अल्प प्रतिसाद व दररोजच्या ऑनलाईन अभ्यास वर्गास गैरहजर विद्यार्थी संख्या, शाळा बंद च्या या प्रतिकूल काळात विविध उपक्रम घेताना वर्गात डिजीटल साहित्याचा व आवश्यक भौतिक सुविधांचा अभाव, इंग्रजी बोलताना आत्मविश्वासाचा अभाव, झोपडपट्टी व वसाहत वर्ग जास्त असल्यामुळे शिक्षणाविषयी उदासीनता असलेल्या पालकांची संख्या जास्त त्यामुळे पाल्याच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष, दरवर्षी कमी होणारी पटसंख्या, इत्यादी बाबी मुळे प्रभावी अध्ययन अध्यापन प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी प्रामुख्याने शिक्षकांना जाणवत होत्या.

नियोजन व अंमलबजावणी :


मुख्याध्यापक म्हणून मी सर्व शिक्षकांच्या मदतीने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याबाबत नियोजन केले. शाळेतील अध्यापक श्री रविंद्र केदार हे सुद्धा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी व शाळेच्या विकासासाठी तत्पर होते. कोरोना काळात त्यांनी तंत्रज्ञानाच्या मदतीने विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरु ठेवण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले. त्यांनी त्यांच्या वर्गात 'स्मार्ट टू ग्लोबल क्लासरूम' या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कोविड काळात वर्गात काही पूरक उपक्रम राबवले. जसे ऑनलाईन अभ्यास वर्ग, ऑनलाईन पालक सभा, कौन बनेगा वोकॅब मास्टर, ऑनलाईन ग्रेट भेट, ऑनलाईन विकली टेस्ट, लेट्स नो, लेट्स स्पीक, संडे इज फंडे, सुंदर हस्ताक्षर, या प्रकारचे विविध पूरक उपक्रम राबवले. याचदरम्यान त्यांनी त्यांच्या वर्गात २१ व्या शतकातील वर्गखोली तयार केली. तिचे नाव होते 'स्मार्ट टू ग्लोबल क्लासरूम'. या उपक्रमामुळे अध्ययन अध्यापन प्रक्रियेसाठी वर्गात आनंददायी वातावरण निर्माण झाले. या नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या मदतीने राबवलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यामध्ये अमुलाग्र बदल दिसून आले. याचा लाभ संपूर्ण शाळेला होण्यासाठी अध्यापक श्री रविंद केदार सरांच्या संकल्पनेवर 'स्मार्ट टू ग्लोबल स्कूल' या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आला. यासाठी शाळेतील शिक्षकांनी राबवलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे या प्रकल्पाच्या परीपूर्तीच्या दिशेने अतिशय पोषक वातावरण निर्मिती झाली. आता आमची संपूर्ण शाळा देशातील पहिले ग्लोबल स्कूल होत आहे याचा आनंद होत आहे.

'स्मार्ट टू ग्लोबल क्लासरूम' या उपक्रमाच्या प्रतीपूर्तीसाठी व निधीच्या उपलब्धीसाठी अगोदर काही पूरक उपक्रम राबवले. जसे ऑनलाईन अभ्यास वर्ग, ऑनलाईन पालक सभा, कौन बनेगा वोकॅब मास्टर, ऑनलाईन ग्रेट भेट, ऑनलाईन विकली टेस्ट, लेट्स नो, लेट्स स्पीक, सुंदर हस्ताक्षर. या पूरक उपक्रमांच्या अंमलबजावणी साठी ऑनलाईन

१) विद्यार्थ्यांचे संभाषण, सहयोग, तार्किकता व नवनिर्मिती हे कौशल्य विकसित करून त्यांचे सक्षमीकरण करण्यास या उपक्रमाची मोलाची मदत झाली.

२) विद्यार्थ्यामध्ये संवाद कौशल्य, प्रश्नानिर्मिती कौशल्य व मुलाखत कौशल्य ही कौशल्ये विकसित झाली आहेत. अभ्यास वर्गासाठी उपलब्ध केलेल्या स्मार्ट मोबाइल फोनचा वापर केला. यामधील 'ऑनलाईन ग्रेट भेट' हा पूरक उपक्रम अतिशय उपयोगी ठरला. यामुळे मला वर्गातील पूरक उपक्रम वर्गाच्या बाहेर घेऊन जाता आले. यामुळे विविध पूरक उपक्रमाविषयी पालक, ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी यांच्यात सकारात्मक वातावरण निर्माण झाले. यासाठी २१ व्या शतकातील अद्ययावत साधनांनी व भौतिक सुविधांनी सुसज्ज अशी वर्गखोली तयार करण्यासाठी काही साधनांची आवश्यकता होती त्याचा त्यांनी आरखडा तयार केला. पालकांची ऑनलाईन पालक सभा घेऊन त्यांना हा उपक्रम काय आहे हे समजावून सांगितले. यातून या नाविन्यपूर्ण उपक्रमाचा तुमच्या पाल्याच्या गुणवत्तावाढीसाठी कसा फायदा होऊ शकेल हे पटवून दिले. त्यानंतर पालकांची टीम बनवून गावातील दानशूर व्यक्तीच्या गृहभेटी सुरु केल्या. लोकप्रतिनिधी यांना भेटून हा उपक्रम समजावून सांगितला. सर्वांनी आपापल्या परीने सहकार्य करण्यास सुरवात केली.१ जानेवारी २०२१ ला हा उपक्रम सुरु झाला. ग्रामपंचायत, पालक, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, स्वनिधी यांच्या माध्यमातून वस्तुरूपाने आत्तापर्यंत सुमारे २.२५ लक्ष रुपयांचा निधी केवळ ३ महिन्यात जमा करून मे २०२१ अखेर हा नवोपक्रम पूर्ण केला. हा नवोपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षणानंतर असे आढळून आले की, या वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये १ जुलै २०२० पासून ते नोव्हेंबर २०२१ अखेर घेतलेल्या विविध पूरक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीत व व्यक्तिमत्व विकासासाठी व अध्ययन क्षमता प्राप्त होण्यासाठी अतिशय फायदा झाला आहे. मुलांची इंग्रजी शब्दसंपत्ती वाढली आहे. 'ऑनलाईन ग्रेट भेट' च्या माध्यामतून लोकप्रतिनिधी म्हणजे ग्रामपंचायत सदस्य त्यानंतर पंचायत समिती सदस्य, पत्रकार, लेखक, तालुक्याचे शिक्षण विस्तार अधिकारी, गटशिक्षणअधिकारी, तालुक्याचे सभापती, गटविकासअधिकारी, जिल्हा शिक्षण विस्तार अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यासोबतच विदेशातील डॉक्टर,शिक्षक,विद्यार्थी अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या भेटी घडवून आणल्या. यामुळे विद्यार्थ्यामध्ये संवाद साधण्यासाठी कमालीचा सभाधीटपणा वाढल्याचे दिसून आले.विद्यार्थ्यांचे ज्ञान संवादकौशल्य, प्रश्नानिर्मिती कौशल्य, मुलाखत कौशल्य व आत्मविश्वास वाढला आहे. आठवड्याला विकली टेस्ट असल्यामुळे शिकवलेल्या घटकांचा सराव झाला व मूल्यमापनही झाले. सुंदर हस्ताक्षर मुळे विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरामध्ये लक्षणीय बदल झाला. लेट्स स्पीक मुळे मुले इंग्रजी बोलायला लागली. त्यामुळे ती आता विदेशातील विद्यार्थ्यांशी इंग्रजी मध्ये आत्मविश्वासाने संवाद साधत आहेत. आता 'स्मार्ट टू ग्लोबल क्लासरूम' या नवोपक्रमामुळे वर्गखोलीत अद्ययावत तंत्रज्ञान व आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध झाल्यामुळे विद्याथी गुणवत्तावाढीसाठी व विद्यार्थांचा शाश्वत शैक्षणिक विकास करण्यासाठी आवश्यक वाटणारे विविध पूरक उपक्रम आपण वर्गखोलीतून घेऊ शकतो. याच धरतीवर शाळेत स्मार्ट टू ग्लोबल स्कूल या उपक्रमाची आखणी करण्यात आली. त्यासाठी जवळपास २ लक्ष रुपयांचा निधी लोकसहभागातून जमा झाला. तसेच सक्षम फाउंडेशन यांच्या कडून शाळेला १.२० लक्ष रुपयांचे smart tablet शाळेला भेट देण्यात आले. नावोपक्रमासाठी एकूण लोकसहभाग रु.३९९००० प्राप्त झाला.

फलनिष्पत्ती :



३) विद्यार्थ्यांमध्ये पाठ्यपुस्तकातील इंग्रजी, भाषा, परिसर अभ्यास, गणित या विषयामधील विविध घटक आभासी स्वरुपात दाखवून त्यातील आशय समृद्ध करून घटकांचे दृढीकरण करणे व अपेक्षित अध्ययन क्षमता विकसित करण्यासाठी या नवोपक्रमाचा फायदा होत आहे.

४ चार भिंतीच्या आत बसून चार भिंतीबाहेरील विश्व दाखवणे, विद्यार्थ्यांना देश विदेशातील विद्यार्थी व शिक्षक यांच्यासोबत भेटी घडवून इंग्रजी भाषेची भीती दूर करून संवाद साधण्यास प्रोत्साहित करणे व इंग्रजी भाषेच्या क्षमता विकसित करण्यासाठी फायदा झाला आहे व होत आहे.

५) विद्यार्थांना तंत्रज्ञानाबद्दल माहिती देऊन व डिजीटल साधने हाताळायला देऊन त्यांना तंत्रस्नेही बनवण्यासाठी या नवोपक्रमाचा फायदा झाला आहे व होत आहे.

६) वर्गामध्ये आवश्यक भौतिक सुविधा व अद्ययावत तंत्रज्ञान उपलब्ध करून दिल्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलला आहे यामुळे शाळेत इंग्रजी माध्यमातील तब्बल १० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे तसेच शाळेचा पट ३३४ वरून ५३४ झाला आहे.

७) -ऑनलाईन ग्रेट भेट॰ या उपक्रमातून सामाजिक प्रश्नांची जाणीव होत आहेत व त्यावरील उपाय म्हणून राबवलेल्या उपक्रमास विद्यार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

८) शासनाने या नाविन्यपूर्ण नवोपक्रमाची दखल घेऊन याच उपक्रमावर आधारित संपूर्ण शाळेसाठी -स्मार्ट टू ग्लोबल स्कूल॰ हा महात्वाकांशी प्रकल्प मंजूर केला आहे व यासाठी ३३ लक्ष एवढी रक्कम जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी मंजूर केली आहे.

९) या उपक्रमाच्या धरतीवर राज्यातील विविध शाळांनी आपल्या शाळेमध्ये ह्या उपक्रमाची अंमलबजावणी सुरु केली आहे.

समारोप : या नवोपक्रमाच्या माध्यमातून वर्गाची रचना केली आहे. देशातीलच नव्हे तर विदेशातील शिक्षक, विद्यार्थी व विविध मान्यवर विद्यार्थ्यांना थेट भेटत आहेत. चार भिंतीच्या आत बसून चार भिंतीच्या बाहेरील विविध ठिकाणी आभासी भेटीसुद्धा देत आहेत आहेत. तेथून ज्ञान मिळवत आहेत. पाठ्यपुस्तकातील विविध घटकातील आशय बाहेरील ठिकाणांना भेटी देऊन समृद्ध करत आहेत. उपलब्ध झालेल्या विविध व आधुनिक सुविधांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा शाश्वत शैक्षणिक विकास होण्यास मदत होणार आहे. आता हा प्रकल्प आता संपूर्ण शाळेने देखील स्वीकारला आहे त्यानुसार संपूर्ण शाळेचा आराखडा देखील तयार केला असून आगामी काळात इतर वर्गखोल्यामध्ये व शाळेत आवश्यक अद्ययावत भौतिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. यासाठी आम्ही एक काल्पनिक व्हिडीओ तयार केलेला आहे.तो मी सर्वात शेवटी व्हिडीओज च्या लिंक मध्ये दिला आहे. यासह गुणवत्तावाढीतून व व्यक्तिमत्व विकासातून विद्यार्थ्यांचा शाश्वत शैक्षणिक विकास करून एक आदर्श नागरिक बनण्यासाठी आणखीही खूप फायदे या नवोपक्रमामुळे वर्गातील विद्यार्थ्यांना होत आहेत.


मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कोल्हापूर यांची पाठीवर कौतुकाची थाप

DATE / /

આજ દિ. ૧ ફેબ્રુવારી ૨૦૨૨ રોજી
સ્માર્ટ ટૂ ગ્લોબલ સ્કૂલ, આદવ વાડી ला
ભેટ દિલી. સર્વ મુલે રૂપ उत्साही
वाटले. राहुल केंदार सर ह्या सर्व
मुलांच्या बौद्धिक व सर्वांगीण विकासाकरी
करत असलेल्या प्रयत्नांचे प्रतिबिंब
मुलांच्या हावभावन आणि उत्साहावन
दिसून आले. शाळेचे मुख्याध्यापक
पाटील सर यांनी ही शाळेच्या
दैनंदिन विकासासाठी चांगले प्रयत्न
केलेले दिसून आले.

आदव वाडी शाळेच्या सर्व शिक्षक
व विद्यार्थी मैत्रीसाठी हार्दिक शुभेच्छा!

संजयसिंह चव्हाण
मुख्य कार्यकारी अधिकारी
जि. प. कोल्हापूर



पूर्वीची वर्गखोली



स्मार्ट टू ग्लोबल क्लासरूम

तैवान मधील शासकीय शाळेतील विद्यार्थ्यांशी इंग्रजी मधून संवाद साधताना विद्यार्थी.



टीप:- फोटो वर क्लिक करून आपण या संवादाचा व्हिडीओ पाहू शकता.


डॉ.संगीता तोडमल(पर्यावरण तज्ज्ञ)यांच्याशी अमेरिकेतून पर्यावरण स्नेही दिवाळी यासबंधी मार्गदर्शन.



टीप:- फोटो वर क्लिक करून आपण या संवादाचा व्हिडीओ पाहू शकता.

रोमानिया येथील कोरीना सुजदिया या प्राथमिक शिक्षिकेशी संवाद साधताना विद्यार्थी.







टीप:- फोटो वर क्लिक करून आपण या संवादाचाव्हिडीओ पाहू शकता. तैवान मधील वान-फु-पब्लिक-शाळेतील प्राथमिक शिक्षिका विन्नी यांच्याशी संवाद साधताना विद्यार्थी.

फोटो वर क्लिक करून आपण या संवादाचा व्हिडीओ पाहू शकता

लिंक्स

-स्मार्ट टू ग्लोबल क्लासरूम :- https://youtu.be/iLYQnK४wT२c

पब्लिक व्हू बातमी :- https://youtu.be/W८Svcu२o८PM

ABP माझा बातमी:- https://youtu.be/StZp७kMsi३Q

S NEWS बातमी :- https://youtu.be/ArKHb७८N९pg

ऑनलाईन ग्रेट भेट:- https://youtu.be/qXZH९_५b८v४

कौन बनेगा वोकॅब मास्टर:- https://youtu.be/iHP८JuxHYD४

ऑनलाईन पालक सभा भाग १ :- https://youtu.be/H२५८q७४sX७g

लेट्स स्पीक :- https://youtube.com/shorts/zebqEOUV7ds?feature=share

लेट्स स्पीक विथ गुगल मिनी:- https://youtu.be/bFtnuZphric

लेट्स नो:- https://youtu.be/C6IOgO0AsWM

पर्यावरण स्नेही दिवाळी :- https://youtu.be/W8t9O_BTJKQ

सुंदर हस्ताक्षर:- https://youtu.be/4Ku7PMUYZ2s

शाळेच्या नियोजित -व्हिडीओ काल्पनिक 'स्कूल ग्लोबल टू स्मार्ट'https://youtu.be/doKVq4C98aQ

===== @ =====

4.लोकसहभागातून शाळा व विद्यार्थी विकास

शाळेचे नाव : विद्यामंदिर करनूर (मराठी) ता. कागल , जि. कोल्हापूर

मुख्याध्यापक नाव : श्री. कृष्णात ज्ञानू पाटील

E-mail Id : kdpatil5580@gmail.com

शाळेचे व्यवस्थापन : जिल्हापरिषद

प्रस्तावना :

यशोगाथा विद्या मंदिर करनूर [मराठी] ता.कागल ही कोल्हापूर जिल्ह्यातील पहिली Delhi Pattern शाळा म्हणून उदयास येत आहे. या शाळेची स्थापना 20 जुलै 1917 साली झाली.कागल शहरापासून जवळच असलेले करनूर हे छोटेसे गाव पण या गावची ओळख सन 1983,1989,2019 व 2021 साली आलेल्या महापुरामुळे सर्वांसमोर आली.

1983 साली आलेल्या महापुरामुळे दुधगंगा नदीशेजारी असलेल्या ओढ्याकाठ्ची वस्ती माळभागावर रामकृष्णनगर या नावाने वसली आणि काही काळाने तेथेही नवीन शाळा निर्माण झाली,पण अजूनही करनूर गावात असलेने लोक पूरग्रस्त भाग सोडण्यास तयार नाहीत.सन 2019 व 2021च्या महापुराने तर रौद्र रूप धारण केले.त्यातच आमची कागल तालुक्यात महापुरात बुडालेली एकमेव शाळा म्हणजे विद्या मंदिर करनूर [मराठी] ता-कागल . महापुरामुळे शाळेचे स्वच्छतागृह ,छप्पर ,शालेय इमारतीचे अतोनात नुकसान झाले.तेथूनच या शाळेच्या लोकसहभागातून विकासाची सुरुवात झाली.

नियोजन , कार्यवाही व फलश्रुती :

महापुरामुळे शाळेची झालेली अपरिमित हानी समाजातील दानशूर व मदतीसाठी तत्पर असणा-या व्यक्तींच्या लक्षात आली.त्यातूनच पालक,शिक्षणप्रेमी व लोकप्रतिनिधी यांनी शाळेचा कायापालट करण्यासाठी नियोजन केले . यामध्ये सर्वांनी खारीचा वाटा उचलला.या विचारातूनच शाळेच्या शैक्षणिक व भौतिक उठावाला चालना मिळाली.

सुरुवातीला कोल्हापूरचे उद्योगपती आदरणीय मदनलालजी मुथ्था साहेब यांनी मुलांच्या साठी 2 लाख खर्चून अद्ययावत असे स्वच्छतागृह बांधून दिले.त्यावेळी त्यांनी शिक्षक,शाळा व्यवस्थापन समिती यांची तळमळ पाहून आमची शाळा Delhi Pattern करण्यासाठी अद्ययावत अशी वर्ग रचना करण्यास जवळजवळ 10 लाख रु.निधी खर्च करून 4 वर्गखोल्यांच्या दगडी भिंतीना Wallsheet उभारून पुट्टी केली.POP सेलिंग केले.वर्गात टाईल्स बसविल्या.संपूर्ण वर्गांचे लाईट फिटिंग करून विजेच्या ट्यूब ,विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत ग्रीन बोर्ड ,विज्ञान प्रयोगशाळेची आकर्षक रंगकामासह निर्मिती करून त्यासाठी शैक्षणिक व विज्ञान साहित्य उपलब्ध करून दिले.तत्पूर्वी जिल्हा परिषद शिक्षण सभापती मा.अभिजित तायशेटे यांनी मोडकळीस आलेल्या एका वर्गखोलीच्या विशेष दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून दिला.हे काम पूर्णत्वास जाते तोपर्यंतच कागल तालुक्याचे मा.नाम.हसनसो मुश्रीफ , ग्रामविकास व कामगार मंत्री , महाराष्ट्र राज्य यांनी जिल्हा परिषद कोल्हापूर नियोजन समिती फंडातून 8.33 लाखाचा निधी उपलब्ध करून दिला. त्यामधून 2 खोल्यांची उंची वाढविणे व रुफकाम तसेच पत्र्यासह 2 खोल्यांच्या व्हरांड्यातील फरशी,दरवाजे तसेच तीन खोल्या समोरील छप्पर ,शालेय कार्यालयाचे छप्पर दुरुस्ती

,गेट दुरुस्ती अशी कामे पूर्णत्वास गेली.हळूहळू शाळेचे रुपडे पालटत गेले. करनूर गावचे माजी उपसरपंच इम्रान नायकवडी यांचे प्रयत्नातून मा.नाम.हसन मुश्रीफ , ग्रामविकास व कामगार मंत्री यांना संपर्क करून 5 लाख रु.निधीतून पेव्हिंग block बसविण्यात आले. याबरोबरच ग्राम पंचायत सरपंच व सदस्य यांनी शाळेसाठी 14 व्या वित्त आयोगातून लाईट फिटिंग करून दिले व उर्जा बचत उपक्रमांतर्गत सोलर सिस्टीम बसवून तालुक्यातील पहिली सोलर सिस्टीम असणारी शाळा म्हणून शाळेचे स्वप्न साकार केले.त्याच बरोबर शालेय विद्यार्थ्यांसाठी स्व-संरक्षण प्रशिक्षणासाठी 80000 रु. मानधन उपलब्ध करून दिले. तसेच सुमंत मुळगावकर डेव्हलपमेंट टाटा मोटर्स यांनी 1.5 लाख खर्च करून सर्व शालेय इमारतीची रंगरंगोटी करून दिली.व्ही.टी.पाटील फौंडेशन,कोल्हापूर यांनी विद्यार्ध्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी वाचनीय पुस्तके ग्रंथालयासाठी उपलब्ध करून दिली.तसेच रत्नाकर बँक कोल्हापूर [RBL] यांनी प्रयोगशाळा इमारतीचा स्लब गळत होता त्यासाठी 60000 रु.खर्च करून कोबा करून दिला.तसेच वर्गामध्ये विविध बोलकी चित्रे रेखाटून दिली.वर्ग आंतरक्रिया अधिक प्रभावी व्हावी यासाठी श्री.उमेशराव गणपतराव देसाई यांनी 15000 रु. किंमतीचा स्मार्ट टी.व्ही.शाळेस भेट दिला . तसेच महापुरामुळे खराब झालेला एक स्मार्ट टी.व्ही.या शाळेचा माजी विद्यार्थी श्री. संदीप पाटील व निखील परीट यांनी दिला. सागर नलवडे शिलेदार अडव्हेन्चर इंडिया यांचेकडून शालेय शैक्षणिक साहित्य तसेच इंडोकौंट फौंडेशन कडून ई- लर्निंग प्रोजेक्टर ,त्याच बरोबर इंडियन कॅडेट कोअर यांचे कडून विद्यार्थ्यांसाठी जीवनावश्यक वस्तू महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ अहमदनगर येथील शिक्षकांच्याकडून दफ्तर व शैक्षणिक साहित्य कागल तालुका सर्व शिक्षक संघटनाकडून पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या पालकांना रोख स्वरुपात प्रत्येकी 3200 रु.प्रमाणे आर्थिक मदत देणेत आली. प्रशासनाकडून सर्व पूरग्रस्त विद्यार्थ्यांना पुनश्च मोफत पाठ्यपुस्तक संच पुरविणेत आले.शालेय स्वागत कमान बांधणेसाठी व शालेय पिण्याचे पाणी, पुरवठा होण्यासाठी ग्रामस्थानी भरीव निधी उपलब्ध करून दिला. शाळेसाठी ऑडीओ सिस्टीम शाळेतील माजी शिक्षकांनी भेट दिला.शाळेचे मुख्याध्यापक श्री.के डी.पाटील यांचे आवाहनामुळे शालेय माजी विद्यार्थी व शिक्षकांनी सुमारे 1.5 लाख रु.चा उठाव करून शालेय बेंच दुरुस्ती, ramp दुरुस्ती , व्हरांड्यासाठी ग्रील,पिण्याच्या पाण्याची व्यवस्था Hand Wash Station ,सर्व फर्निचर दुरुस्ती व रंगकाम ,सांडपाणी व्यवस्था,क्रीडांगण सपाटीकरण,संरक्षक भिंत,त्यावरील चित्रे व रंगकाम ,विद्यार्थ्यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक डिजिटल बोर्ड या सर्व सुविधा लोकसहभागातून उपलब्ध करून दिल्या.

श्री.अनिल देवाप्पा सुतार रा.करनूर या पालकांनी 25000रु.खर्च करून व्यासपीठावर फरशी बसवून दिली.तसेच शालेय कामकाजासाठी स्कॅनर कम प्रिंटर ची आवश्यकता होती.त्याची उपलब्धता सध्या ऑस्ट्रेलिया येथे असणारी या शाळेची माजी विद्यार्थिनी नूतन दादासो चौगले हिने 16000 रु.किमतीचा प्रिंटर शाळेस भेट दिला.शालेय माहितीची प्रसिद्धी व्हावीव विद्यार्थ्याची कला सर्वांसमोर यावी यासाठी या शाळेचा माजी विद्यार्थी विजय घोरपडे यांनी 10000 रु.किमतीची शोकेस उपलब्ध करून दिली.

समारोप :

अशा शाळेच्या अनेक गरजा पूर्ण करणेसाठी समाजातील विविध स्तरातील अनेकांच्या मदतीचे हात सरसावले. शाळ हे गावचे मंदिर आहे तसेच यामध्ये उद्याची पिढी घडत आहे हा शुद्ध व उदात्त हेतू ठेवून राजकारणापलीकडे जाऊन मदत केली. शाळेत मुले उत्तम पद्धतीने शिकताहेत हा समाजाचा शिक्षकांवरील सार्थ विश्वास व कार्यक्षम शिक्षक यामुळे शाळेने विविध उपक्रमांच्या माध्यमातून गुणवत्ता साध्य केली आहे.यासाठी शाळेने प्रयोगातून शिक्षण,दुर्ग भेटी ,नात्याक्नातून अभ्यास,गणितीय खेळ,मातृहस्त भोजन,क्षेत्र भेटी ,पारंपरिक सण,स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन , अत्याधुनिक वर्ग रचना ,विविध

स्पर्धांचे आयोजन इ.उपक्रम शाळेत प्रभावीपणे राबविले जात आहेत.यासाठी करनूर गावातील सर्व ग्राम पंचायत सदस्य ,ग्रामस्थ,शाळा व्यवस्थापन समिती,पालक ,मुख्याध्यापक व सर्व शिक्षक स्टाफ नेहमीच प्रयत्नशील आहेत

महापुरातील झालेली शाळेची अवस्था :



शाळा नवीन रूपात घडताना



मा. आमदार मुश्रीफ साहेब यांच्याकडून सत्कार





करनूर शाळा झाली, दिल्ली पॅटर्न शाळा..



करनूर शाळेत दिल्ली, लडाख पॅटर्न!

जिल्ह्यात एकमेव शाळा : विज्ञान प्रयोगशाळेसह अत्याधुनिक सुविधा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २४ : आमीर खानचा 'थ्री इडीएट्स' चित्रपट माध्यमांच भावला. त्यातील त्याची फुनसुख वांगडू ही भूमिकाही प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली. माज, चाकोरीबाहेरचे आणि जगावेगळं प्रयोग करणारं प्रत्यक्षातले फुनसुख वांगडू म्हणजे लडाखचे सोनम वांगचुक. त्यांच्याच या लडाख पॅटर्नसुार आता कागल तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या करनूर विद्यामंदिर शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षण मिळणार आहे. लडाख आणि दिल्ली पॅटर्नसारखा शिक्षण देणारी

करनूर : येथील शाळेतील डॉ. सी. व्ही. रामण अंतराळ विज्ञान प्रयोगशाळा.

ही जिल्ह्यातील पहिली शाळा ठरणार आहे. अंतराळ विज्ञान प्रयोगशाळेसह विविध अत्याधुनिक सुविधा शाळेत उपलब्ध झाल्या आहेत. दरम्यान, लॉकडाउनमुळे अद्यापही शाळा सुरू नाहीत. मात्र, तत्पूर्वी सर्व सुविधा शाळेत उपलब्ध करण्यावर भर दिला जाणार आहे.

शाळेची स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळातील १९१७ ची गल्या वर्षाच्या

मदरजी मुथ्था, विद्याताई गुंदेचा यांच्यासह जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल आणि स्थानिक मर्यच घटकांच्या सहकार्यातून शाळेत अत्याधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. भविष्यात या शाळेतील विद्यार्थी देशाच्या एकूणच जडणघडणीत मोठे योगदान देतील.

- धनेश बोरा, इस्रो चे तरुण संशोधक

महापुरात पंधराहून अधिक

पान २ वर



समारोप :

मुख्याध्यापक श्री.कृष्णात पाटील यांच्या नेतृत्वाखाली एका सकारात्मक बदलाचे उत्तम उदाहरण म्हणजे विद्यामंदिर करनूर (मराठी) करनूर येथील लोकसहभागातून शाळा व विद्यार्थी विकास हे होय. पालक, आजी , माजी विद्यार्थी,

ग्रामस्थ या सर्वांच्या मदतीने जवळपास पन्नास लाख रुपयांचा निधी वस्तू रूपात मिळाला आहे. अजूनही वेगवेगळ्या वस्तू मिळत आहेत. निश्चितच आशा वाटते की, एक खूप सुंदर अशी दिल्ली पॅटर्न शाळा करनूर ता. कागल, जि . कोल्हापूर सारख्या पूरग्रस्त भागामध्ये निर्माण झाली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी निश्चितच उपयोग झाला आहे . तसेच शाळेच्या पटसंख्येमध्ये वाढ झाली आहे. लोकसहभागातून पन्नास लाख रुपयांचा निधी उभा करून शाळेचा कायापालट करून सर्व मुलांचा व संबंधित सर्व मानवी व्यक्तीचा शाळेसबंधीचा आनंद अवर्णनीय आहे.

शाळेचे बदललेले रूप पाहण्यासाठी खालील लिंक ला नक्की भेट द्या :

https://youtu.be/OqJZHiSv7fI

शाळेची यशोगाथा संबधित विडियो :

https://youtu.be/OqJZHiSv7fI

===== @ =====

5. लोकसहभाग व विविध उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास

शाळेचे नाव : जवाहरलाल नेहरू नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा रामनगर, गडचिरोली.
मुख्याध्यापक : सुधीर गोहणे
ईमेल : sudhir9gohane@gmail.com
शाळेचे व्यवस्थापन : नगर परिषद

प्रस्तावना :

नगर परिषद गडचिरोली द्वारा 1992 मध्ये **जवाहरलाल नेहरू नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा रामनगर** ही शाळा शहराच्या रामनगर या झोपडपट्टी भागात सुरु करण्यात आली. गडचिरोली शहरातील नामांकित शाळा व झोपडपट्टीतील ही शाळा हे एक न पटणारे समीकरण. शहरीकरणाच्या जाळयात अडकलेल्या जनतेची व त्यांच्या पाल्याची पाऊले या सामान्य शाळेकडे वळतील तर... तसं पाहिले तर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांकडे लोकांचा पाहण्याच्या दृष्टिकोण वेगळाच. या शाळा म्हणजे भकास इमारती, शून्य शिक्षण. अशा परिस्थितीत या शाळेमध्ये प्रवेश घेणारे विद्यार्थी फारच कमी. अशीच काहीशी परिस्थिती जवाहरलाल नेहरू नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा रामनगर, गडचिरोलीची होती.

आव्हाने :

2001 मध्ये शाळेत 141 पट त्यातही बरेच पालक आपल्या पाल्याचा शाळा सोडण्याचा दाखला घेऊन जाण्यासाठी शाळेत येत. पालक आपल्या पाल्याचा शाळा सोडण्याचा दाखला का घेऊन जात आहेत याची उकल करण्यासाठी एक सर्वेक्षण हाती घेण्यात आले आणि त्यातून एक धक्कादायक माहिती बाहेर आली ती म्हणजे शाळेचा परिसर आकर्षक नाही, आवडीचा नाही ,रटाळ शिक्षण, नावीन्यपूर्ण उपक्रमाची कमतरता.

नियोजन व अंमलबजावणी :

सर्वेक्षनानंतर सर्वप्रथम शाळा परिसर आकर्षक करण्याकरिता योजना आखण्यात आली. याअंतर्गत शालेय इमारतीला रंगरंगोटी करण्यात आली. परिसरात विद्यार्थी, शिक्षक यांनी श्रमदान करून 400 चौ. फुट जागेत सिमेंट, विटांचा वापर करून प्रतापगड किल्ल्याची प्रतिकृति निर्माण करण्यात आली. पुढे या किल्ला परिसरात विद्यार्थ्यांना किल्ल्याचे ज्ञान मिळू लागले. ही बाब वृत्तपत्रांनी प्रकाशित केली आणि हळू-हळू चित्र बदलू लागले. किल्ला पाहण्यासाठी शहरातील लोक आपल्या मुलासोबत येऊ लागले आणि या शाळेबद्दल जनतेच्या मनात प्रेम निर्माण झाले. शाळेत कृतियुक्त शिक्षणावर भर दिला गेला . शाळेत ज्ञानरचनावादावर आधारित चार्टचा वापर सुरू झाला. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पाडणारा विविधांगी परिपाठ ज्यात सर्व इयत्तातील विद्यार्थ्यांना संधी, शाळेची शिस्त, विद्यार्थ्यांची स्वयं शिस्त, शाळेची स्वच्छता, पर्यावरणाचा अभ्यास करण्यासाठी वन औषधी उद्यान, वनऔषधी विक्री करणे, बालसभा घेण्यासाठी सावित्रीबाई फुले खुले रंगमंच, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम तंत्रज्ञान पार्क ज्ञान वाढविण्यास मदत करतात. कृतीयुक्त शिक्षण देतांना शेवटच्या स्तरातील विद्यार्थ्यांना मदत पोहचविणे हा उद्देश असतो. विद्यार्थ्यांचे विविध स्तरातील गट तयार करून शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थी विद्यार्थ्यांना मदत करतात.

विषय मित्र' :

मराठी, गणित, इंग्रजी, विज्ञान या विषयातील जटिल समस्या विद्यार्थ्यांना समजावून देण्याकरिता 'विषय मित्र' हा उपक्रम राबविले जातो. गटनिहाय अध्ययन, परिसर अभ्यासाकरिता परिसर सर्वेक्षण राबविले जाते.


रात्रकालीन अभ्यासिका':

शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीकरीता **'रात्रकालीन अभ्यासिका'** चालवली जाते. विविध स्पर्धा परीक्षेमध्ये विद्यार्थी यश मिळवू लागले.

शाळा आपल्या मुलांकरिता काहीतरी चांगले करीत आहे हे दिसत असल्यामुळे पालकांचा शाळेवरील विश्वास वाढू लागला. एक पालक दुसऱ्या पालकाला शाळेच्या विविध उपक्रमबाबत सांगू लागले. शाळेने, शिक्षकाने प्रवेशाकरीता विद्यार्थी शोध घेणे थांबले. शहरातील विविध भागातून पालक प्रवेशाकरिता शाळेत येऊ लागले. या सर्व उपक्रमाने दरवर्षाच्या पटसंख्येमध्ये वाढ होऊ लागली.

जीवन शाळा" :

दैनंदिन जीवन जगताना येणाऱ्या अडचणींना सामोरे जाण्यासाठी आत्मविश्वास वाढावा, आवश्यक कौशल्य बालवयात मिळावे म्हणून **"जीवन शाळा"** हे एक दिवसीय शिबिर दरवर्षी डिसेंबर मध्ये घेण्यात





येते . या शिबिरामध्ये तंबू लावून त्यामध्ये राहणे, कमीत कमी साधनांचा वापर करून मातीच्या भांड्यात स्वयंपाक करणे, पानाचे पात्र तयार करून त्यात जेवण करणे, रांगोळी, किल्ला बनविणे, सामान्य ज्ञान स्पर्धा, नकाशा वाचन, सामाजिक समस्यावर आधारित प्रबोधनात्मक 'पथनाट्य' सादर करणे, मुलाखत, पाढे पाठांतर, खरी कमाई या सारख्या स्पर्धा आयोजित करून जीवनात येणाऱ्या समस्या दूर करण्यास विद्यार्थ्यांना तयार करण्यात येते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी कष्ट करणाऱ्या बद्दल अंदर वाढला. कोणतेही काम करण्याची आवड निर्माण झाली.

शाळेत कोणतेही उपक्रम घेत असतांना शाळा व्यवस्थापन समिती मध्यवर्ती ठिकाणी आहे. जे काही निर्णय घेण्यात येतात ते सर्व समितीच्या सभेत चर्चेला घेतले जाते. यानंतर पालक सभेमध्ये पालकांना माहिती दिली जाते. यात पालकांचा सहभाग घेतल्या जाते, यामुळे पाल्याच्या सर्वांगीण विकासाकरिता आपले मत विचारात घेतले जाते हे पालकांना कळले. या सभेमध्ये एखाद्या उपक्रम पूर्व स्थिती व बदलेली स्थिती सांगितली जाते. यामुळे शाळा-पालक, शिक्षक-पालक, शाळा-शिक्षक-विद्यार्थी यातील विश्वास वाढीस लागले. नवीन उपक्रम राबविण्यासाठी आवश्यक आर्थिक मदत लोकवर्गणीच्या रूपात शाळेला मिळू लागली.

लोकसहभाग :

आजपर्यंत पालकांनी लोकवर्गणीच्या माध्यमातून रुपये पस्तीस लक्ष (रु. 35,00,000/-) एवढा निधी गोळा करून दिला आहे. या निधीतून दोन वर्गखोल्या बांधकाम करण्यात आले. सर्व वर्गखोल्यात तंत्रज्ञान वापरुन शिक्षण देण्यासाठी संगणक, एल. ई. डी. टी.व्ही., प्रोजेक्टर ची सुविधा करण्यात आली. जगात घडणाऱ्या बाबींची माहिती विद्यार्थ्यांना वर्गात मिळावा या करिता पालकांनी स्वयंस्फूर्तीने लोकवर्गणी गोळा करून शाळेत इंटरनेट, शाळा परिसरात वाय-फाय ची व्यवस्था करून दिली आहे. इंटेरनेटचा वार्षिक शुल्क पालक भरतात. पालकांच्या मदतीने शाळेत क्रीडा प्रशिक्षकांची सुविधा केली आहे. हे प्रशिक्षक शाळेतील विद्यार्थ्यांना बॅडमिंटन, करम, बॉक्सिंग, नेमबाजी, बुद्धिबळ सारख्या खेळाचे प्रशिक्षण देतात. आतापर्यंत जवळपास 45 विद्यार्थी विविध खेळ प्रकारात जिल्हा, विभाग, राज्य स्तरावर सहभागी झाले आहेत.

जवाहर आकाशवाणी केंद्र" :

शाळेत विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक क्षेत्रातील आवड वाढावी, आत्मविश्वास वाढावा या करीता शाळेत स्वतचे **"जवाहर आकाशवाणी केंद्र"** स्थापन करण्यात आले आहे. एका वर्गखोलीत ध्वनिक्षेपक, माईकची रचना करून नियंत्रण कक्ष तयार करण्यात आले. सर्व वर्ग या नियंत्रण कक्षांशी जोडण्यात आले. या नियंत्रण कक्षातून शाळेचे विद्यार्थी दैनिक बातमी प्रसारण, गीत गायन, कथा-कथन, मुलाखत, अनुभव कथन, सूचना देणे या सारखे कार्यक्रम करू लागले. यातून त्यांना आपली कला सादर करण्यासाठी मंच प्राप्त झाले. यातून विद्यार्थ्यांचे सुप्त गुण पुढे आले. आत्मविश्वास वाढला. 2015-16 मध्ये "जवाहर आकाशवाणी केंद्र" या नवोपक्रमाला विद्या परिषद, पुणे द्वारा सर्वोत्कृष्ट नवोपक्रमाचा राज्यातील पहिला पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

शाळेत विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लागावी या करिता 4500 विविध विषयाच्या पुस्तकाचे ग्रंथालय आहे, विज्ञानाची आवड निर्माण व्हावी याकरिता विज्ञान प्रयोग शाळा आहे. यात विद्यार्थी दैनिक प्रयोग करतात. गस सर्व साहित्य लोकवर्गनीतून गोळा केले आहेत.

फलनिष्पत्ती :

पुढे 2015 मध्ये शाळेला ISO 9000:2008 हे प्रमाणपत्र प्राप्त झाले. हे प्रमाणपत्र प्राप्त करणारी महानगरपालिका - नगर पालिका क्षेत्रातील राज्यातील पहिली शाळा ठरली. या उपलब्धीची नोंद शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाने 22 जून 2015 च्या 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या शासन निर्णयात घेतली. तसेच सर्व प्रसिद्धी माध्यमांनी सुद्धा घेतली. यामुळे शाळेला राज्यस्तरावर ओळख मिळाली. यामुळे शैक्षणिक अभ्यासाकरिता शाळेला भेट देणाऱ्यांची संख्या वाढली. आजपर्यंत 15000 शिक्षणप्रेमींनी शाळेला भेट दिली. समाज सहभागातून शाळेला आर्थिक मदत मिळू लागली. शाळेची प्रवेश संख्या वाढू लागली. आज शाळेत पूर्व प्राथमिक वर्ग ते इयत्ता 8 पर्यन्त प्रत्येकी 2 तुकड्या असून यात एकूण 1030 विद्यार्थी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेत आहेत.







बालसभा प्रतापगड किल्ल्याची निर्मिती





कृतीयुक्तशिक्षण विविध स्पर्धा व शिष्यवृत्ती परीक्षेतील यश

===== @ =====

6.विविध उपक्रमातून गुणवत्ता विकास

शाळेचे नाव – जि.प.उच्च प्राथमिक केंद्र शाळा, जोगीसाखरा, ता. आरमोरी, जि. गडचिरोली

मुख्याध्यापकाचे नाव – श्री. अशोक घनशाम सोरते

ईमेल – r.bulle11@gmail.com

शाळेचे व्यवस्थापन – जिल्हा परिषद

प्रस्तावना :

वर्ष 1950 मध्ये आदिवासी बहुल गडचिरोली जिल्हयातील जोगीसाखरा या लहानशा गावात एका छोटया इमारतीत शाळेची सुरुवात झाली. या शाळेत आजूबाजूच्या गावातील मुले शिकायला येऊ लागली. सुरुवातील शाळेत 1 ते 4 चे वर्ग होते. पक्क्या रस्त्यांच्या अभावामुळे परिसरातील मुलांना तालुक्याच्या गावात पुढील शिक्षणसाठी जाणे अवघड ठरत होते. पटसंख्या वाढत होती, गरजा वाढत होत्या. याच गरजातून पुढे या शाळेला वर्ष 1972 मध्ये 5 वा वर्ग सुरु झाला. शाळा प्राथमिक पासून उच्च प्राथमिक स्तरावर गेली. जिल्हा परिषदेची शाळा असल्याने अडचणी भरपूर होत्या. परंतु शिक्षकांनी समाज, शासन, प्रशासन यांच्या मदतीने शाळा नावारुपास आणली.

शिक्षकांनी राबविलेल्या विविध उपक्रमांमुळे महाराष्ट्र शासनाने राज्यातील ज्या मोजक्या शाळा आदर्श शाळा म्हणून विकसीत करायच्या ठरविल्या त्यात जि. प. उच्च प्राथमिक शाळा जोगीसाखरा या शाळेची निवड झाली. शाळेची यशोगाथा सादर करतांना आम्हाला आनंदच नाही तर अभिमान वाटतो आहे.

कला क्षेत्रातील यश

कला क्षेत्रातील यश म्हणजे आमच्या जि. प. शाळेचे एक आभूषण आहे. कारण आमच्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थी हा कला क्षेत्रातील कोणती न कोणती कला अवगत करत असतो.चित्रकला असो, सांस्कृतिक कार्यक्रम असो नेतृत्व विकास करण्याची संधी मिळाली तर त्यात विशेष प्राविण्यासह तो साकार करत असतो . केंद्र स्तरापासून ते जिल्हा स्तरापर्यंत यश मिळविण्यामध्ये जोगीसाखरा शाळेचे खरेच मोलाचे योगदान आहे. जिल्हास्तरावर चित्रकला स्पर्धा, एकपात्री प्रयोग, नाटयछटा, स्मरणशक्ती स्पर्धा या विविध स्पर्धामध्ये जि. प. शाळेचे विद्यार्थी अव्वल ठरलेले आहेत .या सर्व कलेतून मुलातील नेतृत्व करण्याची क्षमता प्राप्त झाली आहे. सर्व विद्यार्थी आपल्या कलेची विशेष अशी जपवणूक करुन गावातील पथनाटयाद्वारे स्वच्छ सुंदर गाव, हागणदारी मुक्त गाव संदेश पोहचवायला आमचे विद्यार्थी अग्रेसर आहेत याचा आम्हा सर्वांना अभिमान वाटतो.

शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेतील यश

1) नवरत्न स्पर्धा
2) सांस्कृतिक स्पर्धा
3) शिष्यवृत्ती स्पर्धा
4) क्रीडा स्पर्धा
5) उत्तम बालभवन

1) **नवरत्न स्पर्धा –**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था गडचिरोली यांच्या वतीने गडचिरोली जिल्हयात नवरत्न स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. प्राथमिक गटातील 4 स्पर्धा व माध्यमिक गटातील 5 स्पर्धां केंदस्तरापासून ते जिल्हास्तरापर्यंत प्राविण्य चषकाचे मानकरी ठरणारी व रोख 12000/- रक्कम जिंकणारी शाळा म्हणजे जोगीसाखरा.

2) सांस्कृतिक स्पर्धा –

सांस्कृतिक कार्यक्रमांत होणाऱ्या स्पर्धेत 2007 ते 2018 पर्यंत जिल्हावर प्रतिनिधीत्व करुन अव्वल स्थानी राहणारी शाळा जोगीसाखरा आजही त्याच स्थानी विराजमान आहे.

3) क्रीडा स्पर्धा –

क्रीडा क्षेत्रात खो-खो, कबड्डी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांत अव्वल असणारी शाळा म्हणजे जोगीसाखरा.

4) **उत्तम बालभवन –**

उत्तम बालभवन असणारी पहिली शाळा म्हणजे जोगीसाखरा व त्यात जिल्हास्तरावरुन C.R.S. कंपनी कडून Tablet मिळणारी शाळा जोगीसाखरा ही आहे.

समारोप :

एकंदरीत जि. प. उच्च प्राथमिक शाळा जोगीसाखरा या शाळेची वाटचाल प्रगतीच्या दिशेने सुरु असून यासाठी शाळा, शिक्षक, समाज व प्रशासन आम्हाला सर्वतोपरी मदत करीत आहेत. शाळेच्या उत्कर्षासाठी विद्यार्थ्यांना काहीतरी वेगळे व जादा अध्ययन अनुभव दिल्याचे समाधान शिक्षकाच्या चेहऱ्यावर दिसत आहे.

संदर्भ लिंक:-

फोटो- https://drive.google.com/drive/folders/1L-iF0CkJn0TFxZ0hH4lXcLgFLBjpVGOp

व्हिडिओ- https://youtu.be/d_vOBsRCG6w

https://youtu.be/wZ9eLJ9ocq8 https://youtu.be/rr6bWfwNU3k

https://youtu.be/hgQZOumUWk8 https://youtu.be/_tJNLsVFrL9

https://youtu.be/y5HKio6l18k

https://youtu.be/bnAal21O11Q

https://youtu.be/2jrd1-cztCo

https://youtu.be/Ti7p0l5Og8w

https://youtu.be/ez9lpUzOK-8

https://youtu.be/9s5h5GgHZ5A

https://youtu.be/26G0jQEhyKg

===== @ =====

7. 365 दिवस चालणारी डिजिटल शाळा

शाळेचे नाव : जि.प.प्रा.शाळा पालडोह,ता.जिवती ,जि.चंद्रपूर

इ मेल : zpschoolpaldoh1991@gmail.com

मुख्याध्यापकाचे नांव : श्री. राजेंद्र उदेभान परतेकी

शाळेचे व्यवस्थापन : जिल्हा परिषद



प्रस्तावना :

जिवती म्हणजे, तेलंगणा-महाराष्ट्र सिमेला लागून असलेला भाग, जो आदिवासी अतिदुर्गम नक्षलग्रस्त भाग जो डोंगराळ रस्ते जे नीट नाहीत वाहनांचा दूर दूरपर्यंत संबंधच नाही असा हा भाग. त्यातीलच माझी शाळा म्हणजे. डोंगर उतारावर वसलेली शाळा, डोंगराच्या अगदी कडयाला लागून त्या शाळेच्या मैदानावरून घसरून कधी पडेल हे सांगता येत नव्हते .

विदयार्थ्यांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी केलेले प्रयत्न, यासाठी अध्ययन निष्पत्तीचा घेतलेला आधार तसेच विदश्यांना इतर अवांतर उपक्रमांविषयी अध्ययन अनुभव देवून त्यांच्या विकासासाठी वापरलेल्या पद्धती आणि तंत्रे यांचा मेळ घालून आज शाळेत अध्ययन निष्पत्ती तथा गुणवत्तेत 100 प्रगती साधली आहे . 365 दिवस चालणा-या शाळेता झालेल्या रूपांतराचा प्रवास, याविषयी सांगताना निश्चितच आनंद होत आहे.

समस्या/ आव्हान :

गावाची लोकसंख्या जेमतेम 385 व शाळेचा पट 22 अशी माझी प्राथमिक पालडोह शाळा . इयत्ता 5 वी च्या शिक्षणाकरीता मुले 3 किलोमीटर अंतरावर असलेल्या टेकामांडवा येथे शिक्षण घेण्यासाठी डोंगर चढत पायदळ डोंगराळ पाऊलवाटेने रोज ये-जा करत होती. मुलींचे शिक्षण अर्ध्यातच सुटत असायचे आणि सुटण्याचा महत्वाचे मोठे एक कारण म्हणजे मुलींचे लवकर कमी वयातच लग्न करून देण्याची प्रथा. त्यामुळे मुली हुशार असूनसुध्दा त्यांच लग्न लवकर व्हायचे.

शालेय नेतृत्व करत असतांना विदयार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण ग्रमीण भागातून कसे मिळेल , याकरीता 365 दिवसाचा मुद्दा विचारार्थ आला.

नियोजन व अंमलबजावणी : आम्ही गेल्या 8 वर्षापासून सातत्याने गावातील व शालेय व्यवस्थापन समिती तथा माता-पालक व शिक्षक पालक यांच्या माध्यमातून वार्षिक नियोजन आराखडा तयार करून तो कसा पूर्ण करता येईल यासाठी आम्ही

लोकसहभाग लोकवर्गणी यामाध्यमातून ठोस अंमलबजावणी करण्यास सुरूवात केली. 100% विदयार्थी हे शाळेच्या प्रवाहात आहेत. विदयार्थ्यांना बाल अधिकाराची जाणीव करून देवून त्याच अधिकाराची जाणीव पालकांना करून दिली आहे. त्यामुळे आम्ही गावाच्या व शालेय व्यवस्थापन समितीची बैठक घेवून शाळाबाहय विदयार्थी ही संकल्पना विषयी जागृती करून शाळेतील गावातील शाळाबाहय विदयार्थी दाखवा नी 100000 मिळवा असा फलक शाळेत गेल्या 3 वर्षापासून लावला आहे. ज्याची दखल मिडीयाने घेतली आहे. वर्ग 4 थी ला वर्ग 5 वा जोडण्याचा शासन निर्णय आला व 5 वा वर्ग जोडला. मुलांना खेळण्यासाठी मैदान नव्हते. 2010 पासून दररोज सायंकाळी 4 ते 5 या वेळेस आम्ही तो पहाड खोदायला सुरूवात केली. आम्ही 6 वर्षे पहाड खोदून मैदान तयार केले. त्यात मुलांचा खूप मोठा वाटा होता कारण फारसे यात पालकांचे योगदान मिळत नव्हते. इयत्ता 1 ते 5 वर्ग पट 58 वर पोहोचला शिक्षक मात्र दोघेच . विदयार्थाचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हनून स्वतः उन्हाळयात सुध्दा शाळा घेणे सुरू केले. त्याला मुलांचा व पालकांचा चांगला प्रतिसाद यायला लागला आणि तेथूनच 365 दिवस चालणा-या शाळेच्या प्रवासाला सुरूवात झाली .

क्रीडा सराव :

6 किलोमीटर धावणे, 100 मीटर, 200 मीटर सराव, योगा, थाळी फेक, गोळा फेक, खो-खो अशा वैयक्तिक आणि सांघिक खेळाचा सराव घेतला जात असे.

पूरक मार्गदर्शन : सकाळी मग 9.00 ते 10.00 एक तास 365 दिवस पुरक मार्गदर्षन हे उपक्रम राबवित आहे. यात विदयार्थीच विदयार्थाना शिकवितात. हा उपक्रम मागील 9 वर्षापासून शाळा राबवित आहे. यात गट तयार करून दिले आहेत. त्या गटामध्ये मराठी, इंग्रजी, गणित या विषयांचा समावेश होतो. हयात विषयानुसार विशेष विदयार्थाना विशेष मार्गदर्शन केले जात आहे. विदयार्थी आपल्या गटात बसून शिकतात. त्यानंतर जे विदयार्थी मित्र आहेत ते आठवडयातून दोनदा शिकविलेल्या भागावर चाचणी घेतात. त्यात जे विदयार्थी विशेष प्रगती करतात ते पुढील गटात जावून बसतात. पेपर काढण्यापूर्वी ते आमच्याकडून घटकाची शहानिशा करून घेतात. शाळेतील दैनंदिन अभ्यास आणि शालेय विषय आटोपल्यानंतर सायंकाळी 4.30 ते 5.30 पर्यंत विदयार्थाना पूरक मार्गदर्शन असते आणि हे पूरक मार्गदर्शन विदयार्थी मित्र घेत असतात.त्यानंतर सायंकाळी 6.30 ते 8.00 पर्यंत विदयार्थी गावातील सार्वजनिक नेमलेल्या ठिकाणी विदयार्थी मित्रांच्या सहाय्याने मार्गदर्शन घेतले जाते. शाळेतील प्रत्येक वर्गात स्मार्ट टि.व्ही. आहे. सोबतच आम्हाला जिल्हा परिषदेकडून प्रोजेक्टर आणि संगणक मिळाले आहे. याचा फायदा विदयार्थाना सर्व विषय सखोलपणे अभ्यासायला मिळतात.

शाळेत शैक्षणिक वर्षातील 365 दिवसांत पार पडत असलेली काही ठळक नित्य उपक्रमे.

- आम्ही होऊ स्वावलंबी अंतर्गत आमची बँक आमचा व्यवहार.
- कला कार्यानुभव अंतर्गत वर्षाअखेर विदयार्थ्यांकडून मातींच्या तथा शैक्षणिक साहित्यांची प्रदर्शनी
- दरवर्षी पोळयाला विदयार्थ्यांच्या कल्पनेतून तयार केलेल्या मातीच्या बैलांचा पोळा.
- मिनारा-जू मंच मध्ये विदयार्थ्यांचा कलागुणांना वाव देणारे मुलींचे सक्षमीकरण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन.
- दरवर्षी नवोगतांचे आगळेवेगळे स्वागत.
- वृक्ष माझा मित्र मधून झाडांचे संगोपन व वृद्धी
- बालमेळावा अंतर्गत विदयार्थ्यांचे विविध साहित्यांचे प्रदर्शन व खरी कमाई करीता Stalls
- महिलांचा हळदीकुंकूवाचा का-र्यक्रम

- स्काऊट गाईड
- बालसभा
- क्षेत्रभेट
- Convent च्या धर्तीवर शाळेत पूर्वप्राथमिक शिक्षणाची सुरूवात.
- मुल्यवर्धन मधून विदयार्थ्यांच्या विविध मुल्यांचा विकास व उपयोजन.
- ज्ञानरचनावाद मधून गणित झाले सोपे.
- राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी सकाळी 4.30 पासून विविध खेळ प्रकारांची तयारी व मार्गदर्शन.
- मिस पालडोह

शाळेची वैशिष्टये थोडक्यात सांगावयाची झाल्यास –

- 365 दिवस चालणारी शाळा.
- डिजिटल पध्दतीने ऑनलाईन ऑफलाईन शिक्षण.
- दररोज पूरक मार्गदर्शन
- विषय मित्रांचा विषय समजून घेण्यास उपयोग.
- NAS,अध्ययन निश्पत्ती वर आधारीत शिक्षण पद्धती.
- 365 दिवसातील सर्व सण जयंती उत्सव सामुहिकरीत्या साजरे.
- शिष्यवृत्ती परीक्षेतील यश – मागील वर्षी इयत्ता 4 थी तील 8 विद्यार्थी मेरीट मध्ये आले.
- तिन्ही भाषेतील दैनंदिन परिपाठ.
- मैदानी खेळ सराव.
- भिंतीबाहेरची शाळा.
- केंद्र, बीट, तालुका स्तरावरील स्पर्धेत यश. जिल्हा, राज्य स्तरावर प्रतिनिधित्व.
- लोकसहभाग




प्रयोगशाळा




विविध उपक्रम

फलनिष्पत्ती :

1.अध्ययन निष्पत्तीमधील शाळेची कामगरी





2 . विविध स्पर्धांतील यश :





फोटो/व्हिडीओ लिंक : https://youtu.be/९MTBul_qOFg

चंद्रपुर पालडोह. २४taas.com : https://youtu.be/०vMzMdMOEPo

१० October २०२० Search Tv News Chandrapur - चंद्रपूर जिल्ह्यातील गडचांदूरच्या पहाडावर असलेली https://youtu.be/६iGNh४९MHZA

CTV News १० OCT २०२० - ३६५ दिनो तक शुरू रहनेवाली एकमात्र स्कुल किस परिसर मे है देखिए खबर मे https://youtu.be/YP०Nk८D०Z६g

https://www.youtube.com/watch?v=hXrxNm२XBuA

https://www.youtube.com/watch?v=iZhbkXFb१RE

https://www.youtube.com/watch?v=hoemjg०ro७१

https://youtu.be/X८UWeh८ZqZs

===== @ =====

8. शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेतील यश सह शालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास

शाळेचे नाव :- काशीबाई उखाजी कोल्हे विद्यालय, विठ्ठलपेठ,जुना नशिराबाद रोड, जळगाव
इ मेल :- kukvjalgaon@gmail.com

मुख्याध्यापिकेचे नाव:- सौ. ज्योती राजेंद्र गोसावी

शाळेचे व्यवस्थापन :- खाजगी अनुदानित

प्रस्तावना :

सन १९६१ मध्ये विठ्ठल पेठ, जुने जळगाव परिसरातील जाणकार लोकांनी लोक सहभागातून " लोक शिक्षण मंडळाची " स्थापना करून " साधना विद्यालय " सुरु केले. कालांतराने १९७५ मध्ये साधना विद्यालयाचे नाव बदलून " काशीबाई उखाजी कोल्हे विद्यालय " असे नामकरण करण्यात आले.

विद्यालयाने यशाची एक एक शिखरे पार करत आज कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत वाटचाल केलेली आहे.
" सुरक्षित वातावरणात सर्वांगीण, शैक्षणिक प्रगती साधून विद्यार्थ्यांना, सुशिक्षित व सुसंस्कृत करणे " या विद्यालयाच्या ध्येय वाक्यानुसार विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधलेली आहे, त्यात शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांना यशवंत केले आहे. त्याच प्रमाणे सह-शालेय उपक्रमातून विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास साधला, तसेच शासनामार्फत येणाऱ्या विविध परिपत्रकानुसार राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये विद्यालयाचा यशस्वी सहभाग असतो.

समस्या / आव्हान :

विद्यार्थी शालेय अभ्यासक्रमांच्या परीक्षाव्यतिरिक्त इतर परीक्षांमध्ये तसेच इतर उपक्रमांमध्ये अरुची दाखवत होते, तसेच पालकांच्या अनिच्छेमुळे सहशालेय उपक्रमांमध्ये पाल्यांना सहभागी होण्यास प्रवृत्त करत नसत.

नियोजन व अंमलबजावणी :

विद्यार्थी व पालकांच्या सभा घेऊन स्पर्धा परीक्षा व सहशालेय उपक्रमांच्या आवश्यकतेबाबत प्रबोधन करण्यात आले . त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला. शाळेत अनेक सहशालेय उपक्रम घेण्यात आले व त्यात विद्यार्थ्यांनी आवडीने सहभाग घेतला.

१ . स्पर्धा परीक्षा :

पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा , चित्रकला परीक्षा, NMMS व NTS परीक्षेस विद्यार्थ्यांना बसवून त्यांचे मार्गदर्शन वर्ग घेण्यात आले .

२. सहशालेय उपक्रमातील सहभाग :

महाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण मंडळा तर्फे घेण्यात येणाऱ्या महिलांसाठीच्या नाट्यस्पर्धेत सहभाग घेतला.

https://drive.google.com/drive/folders/1sw_Z7mOTAHgW7LrELt7S2ouhLoocx2rE?usp=share_link

https://www.youtube.com/watch?v=v-kjnHzMhbw



नाट्य स्पर्धेतील सहभाग





जळगाव रोटरी क्लब तर्फे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा व त्यांची बौध्दिक पातळी वाढावी यासाठी विद्यालयात विविध व्याख्याने आयोजित केले जातात, त्याचबरोबर विद्यार्थिनीमध्ये न्यूनगंड निर्माण होऊ नये म्हणून विद्यार्थिनीसाठी " मुलगी वयात येतांना " या व इतर विषयांवर विद्यार्थ्यांसाठी डॉक्टरांचे व्याख्याने आयोजित करण्यात येतात. विद्यार्थिनीच्या सोई साठी (Sanitary Napkin) " वेंडिंग " मशिनची व्यवस्था केलेली आहे. तसेच त्यांच्या सुरक्षतेतेसाठी " विशाखा " समिती विद्यालयात कार्यरत आहे.

https://drive.google.com/drive/folders/1peIWoaGeeXcc89rguhVDjHJR3SIRlkd-?usp=share_link

शालेय विविध उपक्रम

निबंध स्पर्धा – **बाबासाहेब के. नारखेडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ घेण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत सहभागी होऊन ७ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले. तसेच वकृत्व स्पर्धेत सहभाग घेतला जातो, टाटा इंडीकॉम तर्फे आयोजित निबंध स्पर्धेत कु. अंकिता मंगाळे हिच्या निबंधाची राष्ट्रीय स्तरावर निवड.**

विज्ञान प्रदर्शन (शासकीय) – **दर वर्षी तालुका विज्ञान प्रदर्शनामध्ये व विज्ञान मेळावा तालुका व जिल्हा स्तरावर विद्यार्थी सहभागी होतात. विज्ञान मंच यात विद्यार्थांचा सहभाग असतो.**

स्काऊट / गाईड - **विद्यालयाचा तालुका व जिल्हा मेळाव्यात सहभाग असतो. दरवर्षी विद्यालयात शिबीर आयोजित केले जाते.** विद्यालयाच्या मुख्याध्यापिका या जळगाव जिल्हा स्काऊट / गाईड संघटना येथे जिल्हा मुख्यालय आयुक्त म्हणून कार्यरत आहेत.

सहल विभाग - विद्यार्थ्यना भौगोलिक, ऐतिहासिक, नैसर्गिक स्थळांची माहिती व्हावी या साठी विविध ठिकाणी सहलींचे आयोजन केले जाते

साधना नियतकालिक -

•विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त लेखनाला चालना मिळावी म्हणून दरवर्षी विद्यालयात साधना नियतकालिक व हस्तलिखीते काढले जाते.

आरोग्य तपासणी

•विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ व निरोगी राहण्यासाठी विविध डॉक्टरांना आमंत्रित केले जाते.

संस्कृत गीता पठन स्पर्धा -

•दर वर्षी शहरातील अण्णासाहेब बेंडाळे प्रतिष्ठान मार्फत आयोजित गीता पठन स्पर्धेत विद्यार्थी सहभागी होऊन प्राविण्य मिळवितात.







https://www.youtube.com/watch?v=TetIziLqU3o



https://www.youtube.com/watch?v=MP8eiKYbOwg

https://www.youtube.com/watch?v=cWUJlZmRqo8https://www.youtube.com/watch?v=sxgchw7Ti40&t=17s

https://drive.google.com/drive/folders/1xc7G9nrehsbSa6_lnUTQOBn4XPOiFkJf?usp=share_link

https://www.youtube.com/watch?v=tBblq_kAkh0

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उपक्रम



सायबर सुरक्षा – (Cyber Safety) – या अनुषंगाने विद्यार्थ्यांना माहिती व्हावी म्हणून विद्यालयात परिसरातील पोलीस दलामार्फत वेळोवेळी मार्गदर्शन आयोजित केले जाते.




अमली पदार्थ व बालगुन्हेगारी - विद्यालयात सध्याच्या काळात बालगुन्हेगारी व मुलांना लागलेले अमली पदार्थांचे व्यसन यापासून परावृत्त व्हावे यासाठी वेळोवेळी तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन केले जाते.

फलनिष्पत्ती :

1. **शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेतील यश..**

उपक्रम	वर्ष	सहभागी विद्यार्थी	उत्तीर्ण	विशेष प्राविण्य
स्कॉलरशिप इ.५ वी	२०१६ ते २०२२	२२२	१५	८
स्कॉलरशिप इ.८ वी	२०१६ ते २०२२	१२२	१८	६
चित्रकला Elementary	२०१६ ते २०२२	२६८	२११	२०
चित्रकला Intermediate	२०१६ ते २०२२	२४२	२२८	१५
NMMS	२०१६ ते २०२२	५२	२८	१७
NTS	२०१६ ते २०२२	२५	-	-



६. **समारोप –**

शालेयस्तरावरील विविध स्पर्धा परीक्षा व सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी सातत्याने प्रयत्न सुरु असून त्यात यश मिळत आहे .या कामी संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, पालक - शिक्षक संघ, माता - पालक संघ, शासन व विद्यालयाचे सर्व घटक या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत असते.

===== @ =====

9 .लोकसहभागातून स्वच्छ, सुंदर व तंत्रज्ञानाचा वापर करणारी शाळा

शाळेचे नाव :- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिरसाड ,ता.यावल जि. जळगाव

Email Id :- zppsshirsad@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव :- सौ संगिता धनंजय पाटील

शाळेचे व्यवस्थापन :- जिल्हा परिषद



प्रस्तावना –

आमचे शिरसाड गाव हे जळगाव या जिल्हाच्या ठिकाणापासून ४५ किमी तर यावल या तालुक्याच्या ठिकाणापासून ९ किमी अंतरावर सपाट भूभागावर वसलेले गाव आहे. बहुतांशी लोक शेती व शेती पूरक व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह चालवितात. त्याचबरोबर बहुतांशी लोक हे उदरनिर्वाहासाठी जळगाव, पुणे, नाशिक तथा सुरत इत्यादी ठिकाणी स्थलांतरित होतात. आणि त्याच प्रमाणात शेतीपूरक मजुरी करण्यासाठी सातपुडा पर्वतीय क्षेत्रातून तथा शेजारील राज्य मध्यप्रदेश येथून आदिवासी लोक गावात अथवा गावानजीक वस्त्यांमध्ये स्थलांतरित होऊन येतात.

आव्हाने/समस्या :

दिवसांगणिक शाळेची कमी होणारी पटसंख्या, मोडकळीस आलेली इमारत तथा आवश्यक पायाभूत भौतिक सुविधांची कमतरता यामुळे शिक्षक तथा पालकांमध्ये पसरलेला निरुत्साह, शाळेविषयी समाजात उघड जाणवत असलेली नकारात्मक भावना, शाळेमध्ये तंत्रज्ञानाचा नगण्य वापर, डिजीटल साधनांची कमतरता, मोठी शाळा असतानाही पारंपारिक पद्धतीने होणारे कार्यालयीन कामकाज, शाळा व्यवस्थापन समितीचा अल्प प्रतिसाद अशा परिस्थितीमध्ये मे २०१८ मध्ये नाविन्याची ओढ असणाऱ्या आणि नेतृत्व गुण असलेल्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संगिता धनंजय पाटील यांनी शाळेचा कार्यभार स्विकारला. अनेक समस्यांनी ग्रासलेल्या शाळेमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करणे त्यांना क्रमप्राप्त होतेच. त्यातूनच त्यांनी शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्या सहभागातून शाळेमध्ये अपेक्षित बदल घडवून आणण्याचा निश्चय केला.







शाळेची पूर्वस्थिती

नियोजन:-

शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ च्या सुरुवातीलाच शाळेत कार्यरत झालेली शिक्षकांची नवीन टीमला विश्वासात घेऊन शाळेचा नुकताच कार्यभार स्वीकारलेल्या मुख्याध्यापिका यांनी शिक्षणप्रेमी तथा जागृत पालकांच्या सक्रीय सहभागासाठी प्रयत्न केले. शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यात आले. आणि त्यामाध्यमातून माजी विद्यार्थी, दानशूर व्यक्ती यांच्या माध्यमातून शाळेस लोकसहभाग मिळविण्याचे व त्यातून शाळेसाठी करावयाच्या सुधारणांचे एक दृश्य नियोजन सर्वांसमोर ठेवले. आश्वासक नेतृत्वाच्या जोरावर हे होईल असा आत्मविश्वास आम्हा शिक्षकांनाही येऊ लागला. अध्यक्ष आणि सर्व सदस्य यांच्या पुढाकाराने आणि आधारामुळे शाळेचा सर्वांगीण विकास करण्याचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेऊन प्रयत्न करण्याचे त्यांनी ठरवले. त्याचे फलित म्हणून शाळेला लोकसहभाग मिळणे सुरू झाले. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शालेय व्यवस्थापन समितीच्या झालेल्या बैठकीमध्ये सदस्यांनी अजून लोकसहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याचा ठराव सर्वांनुमते मंजूर केला आणि सर्वांनी कशा पद्धतीने लोकसहभाग मिळवता येईल या दिशेने प्रयत्न केले.

प्रत्यक्ष कार्यवाही:-

लोकसहभागातून शाळा विकास:-

सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शाळांनी त्याचा वापर करणे महत्त्वाचे होऊन बसले आहे. त्यामध्ये समाज माध्यमांचा वापर न करणारे खूपच कमी सापडतात. अशावेळी शाळेने समाज माध्यमांचा वापर करण्याचे ठरवले. यावेळी शाळेस लोकसहभाग मिळविण्यासाठी व शाळेच्या उपक्रमांची माहिती प्रसिद्ध करण्यासाठी फेसबुक आणि व्हाट्सअप यासारख्या समाज माध्यमांचा वापर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामध्ये "माझे गाव माझी शाळा" या व्हाट्सअप समूहाच्या माध्यमातून लोकसहभाग मिळवण्याचे काम चालू झाले व त्याचा सकारात्मक परिणाम झाला. त्याचबरोबर शाळेच्या विविध कार्यक्रमांना शाळेच्या अधिकृत "फेसबूक" अकाउंट वरून आणि आमच्या www.zpschoolshirsad.in या वेबसाईट च्या माध्यमातून प्रसिद्धी देण्यात आली. त्यामुळे शाळेच्या फेसबूक अकाउंट ला जोडलेल्या शाळेचे माजी विद्यार्थी, गावातील नागरिक, शाळा व्यवस्थापन समिती, पर्यवेक्षीय यंत्रणा यांना शाळेत चालू असणाऱ्या उपक्रमांची माहिती मिळू लागली. यातून शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. त्याच बरोबर इयत्ता निहाय व तुकडी निहाय व्हाट्सअप समूह तयार करण्यात आले. त्यांच्या माध्यमातून पालकांना, विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना पुरविण्यात येऊ लागल्या. फेसबुक आणि व्हाट्सअप यासारख्या समाज माध्यमांचा वापर करून तथा प्रत्यक्ष आणि फोन च्या माध्यमातून गावातील शाळेच्या कर्तृत्ववान माजी विद्यार्थ्यांना तथा शिक्षणप्रेमी व्यक्तींना संपर्क करण्याचे सत्र सुरू झाले. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळून तेव्हापासून ते शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पर्यंत अंदाजित रुपये आठ लाखापेक्षा जास्त लोकसहभाग मिळाला. यातून शाळेचा कायापालट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शाळा व्यवस्थापन समितीने आवश्यक तेथे शाळेच्या मुख्याध्यापिका तथा शिक्षकांना मोलाची साथ दिली. त्यांच्या पुढाकारातून मिळालेल्या लोकसहभागाचा विनियोग आवश्यक तेथे व क्रमबद्ध पद्धतीने करण्यात आला. त्यामुळे आमच्या www.zpschoolshirsad.in या वेबसाईट School infrastructure या tab मध्ये दाखवल्याप्रमाणे शाळेमध्ये सर्व भौतिक सुविधा अद्ययावत झाल्या आणि त्याचा दृश्य परिणाम शाळेच्या इतर सर्व बाबींवर होणे अपेक्षित होते. शाळेस मिळालेला लोकसहभाग आणि त्याचा विनियोग याचा तपशील शाळेच्या वेबसाईट वर Public Contribution या TAB मध्ये वर्षनिहाय देण्याचा प्रयत्न केला आहे. शाळेचे माजी विद्यार्थी श्री महेश सुभाष पाटील यांनी शिरसाड शाळेला ८२ हजार रू. ची CCTV सिस्टीम कार्यान्वित करून दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षा व शाळेचीही सुरक्षा झाली आहे. ही एक विशेष बाब नोंदवावी वाटते.







भुसावळ परिसर ७

वृत्तमान | गुरुवार, दि. ६ फेब्रुवारी २०२०

शिरसाड येथील जि.प.शाळेचा लोकसहभागातून कायापालट !

स्वच्छ व सुंदर शाळा



आकर्षक अंतरंग



शिरसाड जि.प. शाळेस जिल्हास्तरीय 'स्वच्छ विद्यालय पुरस्कार' पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत प्रदान

वाघल । प्रतिनिधी –

वाघल तालुक्यातील शिरसाड येथील जिल्हा परिषद शाळेस भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या स्वच्छ विद्यालय पुरस्कार अंतर्गत जिल्हा स्तरीय पुरस्कार दि १७ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या कार्यक्रमात पालकमंत्री गुलाबराव पाटील, आमदार सितीष चौधरी, आमदार संजय सावकारे, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत , जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पंकज आशिया , आदिवासी प्रकल्प अधिकारी सौ. सोनवणे, प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील , माध्यमिक शिक्षणाधिकारी श्री. चव्हा यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. संगिता धनंजय पाटील व केंद्रप्रमुख किशोर चौधरी यांनी हा पुरस्कार स्विकारला. हा पुरस्कार मिळाल्याने शिरसाड शाळेचे परिसरात अभिनंदन होत आहे. यासाठी जिल्हातील अनेक शाळांनी सर्वेक्षण द्वारा स्वयंमूल्यमापन पूर्ण करून या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता. त्यानंतर पर्यवेक्षीय यंत्रणेद्वारे बाह्य मूल्यमापन पूर्ण होऊन पुरस्कारासाठी शाळांची निवड करण्यात आली आहे. ५९ निकषांवर आधारित मूल्यमापन यामध्ये समाविष्ट होते. शिरसाड शाळेने अपेक्षित बाबींची पूर्तता करत ९९% गुण आणि ५ स्टार रेटिंग मिळवत हा पुरस्कार मिळविला आहे. यासाठी वाघल तालुक्याचे संपर्क अधिकारी तथा डायट चे वरिष्ठ अधिव्याख्याता अशोक भोगे , गटशिक्षणाधिकारी एस के रोंग, विस्तार अधिकारी श्री विश्वनाथ धनके, प्रभारी केंद्रप्रमुख श्री. किशोर चौधरी यांचे मार्गदर्शन मिळाल्याचे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ संगिता धनंजय पाटील यांनी सांगितले.

मुख्याध्यापिका सौ. संगिता पाटील यांनी हा पुरस्कार स्विकारल्यानंतर त्यांनी ग्रामीण भागातील आमच्या शाळेला हा पुरस्कार मिळणे ही अभिमानाची बाब असल्याचे नमूद करत शाळा व्यवस्थापन समिती, शाळेतील शिक्षक वृंद आणि विद्यार्थी यांना या पुरस्काराचे श्रेय दिले. शालेय पदव्यवहार, बोनाफाईड, शाळा प्रवेश अर्ज, शाळा सोडल्याचा दाखला मागणी अर्ज, अर्जित रजेचा अर्ज, शाळा व्यवस्थापन समिती अजेंडा निर्मिती इत्यादी अनेक बाबी www.zpschoolshirsad.in या शाळेच्या स्वतंत्र वेबसाईट वरून किंवा QR कोड च्या माध्यमातून होत असून त्यासाठी एक अनोखी यंत्रणा शाळेत कार्यान्वित करण्यात आली आहे. प्रत्येक सेवेसाठी एक विशिष्ट QR कोड उपलब्ध असून त्याद्वारे शालेय प्रशासन सोयीस्कर झाले आहे. प्रत्येक वर्गामध्ये डिजीटल साधने उपलब्ध असल्याने १००% डिजीटल झालेल्या या शाळेमध्ये शिक्षण प्रक्रिया रंजक होण्यास मदत झाली आहे. शाळेच्या सर्वांगीण विकासामध्ये शाळा व्यवस्थापन समितीचे कार्य अधोरेखित करत सौ संगिता धनंजय पाटील यांनी समितीचे आभार मानले.

पुरस्कार वितरण

शाळा ही सुंदर आकर्षक असेल तर ती नक्कीच विद्यार्थ्यांना आवडते आणि विद्यार्थी शाळेत रमू लागतात. त्याचा प्रत्यक्ष शालेय उपस्थिती व परिणामी गुणवत्तेवर सकारात्मक परिणाम दिसून येतो. म्हणूनच शाळा सुशोभनासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. शालेय परिसरात गोल्डन टोरंटा, डिडोनिया, फायकस व इतर फुलझाडांची लागवड करण्यात आली. त्यामुळे शालेय परिसर आल्हादायक झाला आहे. स्वच्छता विषयक सर्व निकषांची पूर्तता केल्याने शाळेस त्यांचेच फलस्वरूप भारत सरकारच्या शिक्षण व मनुष्यबळ विकास मंत्रालयाचा जिल्हास्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार जुलै २०२२ मध्ये प्राप्त झालेला आहे .

प्रशासन आणि अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर करणारी डिजीटल शाळा:-

<u>प्रशासनामध्ये संगणकाचा प्रभावी वापर:</u>


संगणक ही गतिशील काळाची गरज. ही गरज ओळखून शाळेच्या कामकाजास संगणकाची जोड दिल्यास नक्कीच ते प्रभावी आणि सोयीस्कर होईल. त्यामुळेच आमच्या शाळेतील तंत्रस्नेही शिक्षकांच्या मदतीने सर्व ONLINE कामांसोबतच शालेय मासिक टपाल, विद्यार्थी बोनाफाईड, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन दस्तऐवज, शालेय पोषण आहार रेकॉर्ड्स, नियमित कार्यालयीन पत्रव्यवहार इत्यादी विविध माहिती संगणकाद्वारे तयार करण्यात येते. त्यामुळे कामामध्ये अचूकपणा तर येतोच पण प्रत्येक काम वेळेत होऊन शिक्षकांचा वेळही वाचतो. परिणामी शिक्षकांना विद्यार्थ्यांना जास्तीचा वेळ देणे शक्य झाले आहे. त्यासाठी शाळेमध्ये लोकसहभागातून 1 LAPTOP आणि 2 संगणक तथा शाळेसाठी जलद गतीची WIFI सुविधा गावातील केबल चालकांकडून मोफत मिळविली आहे.


नमुना नं.१ अर्थात शाळा प्रवेश नोंदी ची ई अनुक्रमणिका:-

शाळेची स्थापना झाल्यापासून (दि-01/10/1884) नमुना नं:-1 ची 17 रजिस्टर आज शाळेत उपलब्ध आहेत. त्यामध्ये जुने रजिस्टर जीर्ण झाली आहेत. त्यामुळे एखाद्या व्यक्तीचा दाखला मागणी अर्ज आल्यानंतर त्याबाबत नोंदी शोधून काढणे हे खूपच वेळखाऊ काम होते. यामुळे जाणारा वेळ, होणारा मानसिक त्रास त्याचबरोबर शालेय दस्तऐवजाची हाताळणी वेळी होणारी झीज याचा विचार करून शाळेचा आत्मा म्हणजे शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड अद्ययावत राहावे, आलेल्या माजी विद्यार्थ्यांना पाहिजे तेव्हा पटकन त्यासंदर्भातील माहिती देता यावी यासाठी आज पर्यंतच्या सर्व प्रवेश नोंदींची ई-अनुक्रमणिका तयार करण्याचे काम पूर्ण कोविड-19 दरम्यान च्या लॉकडाऊन काळात शाळा बंद असताना पूर्ण करण्यात आले. यामुळे येथून पुढे नोंदी शोधण्यासाठी लागणार वेळ वाचून तो वेळ विदयार्थ्यांसाठी देता येणार आहे. याचा शाळेला खूपच फायदा होतांना दिसत आहे.

कार्यालयीन कामकाजासाठी अनोखी प्रणाली:

शालेय पत्रव्यवहार, बोनाफाईड, शाळा प्रवेश अर्ज, शाळा सोडल्याचा दाखला मागणी अर्ज, अर्जित रजेचा अर्ज, शाळा व्यवस्थापन समिती अजेंडा निर्मिती इत्यादी अनेक बाबी online पद्धतीने www.zpschoolshirsad.in या शाळेच्या स्वतंत्र वेबसाईट वरून किंवा QR कोड च्या माध्यमातून होत असून त्यासाठी एक अनोखी यंत्रणा शाळेत कार्यान्वित करण्यात आली आहे. प्रत्येक सेवेसाठी एक विशिष्ट QR कोड उपलब्ध असून त्याद्वारे शालेय प्रशासन सोयीस्कर झाले आहे. त्याचबरोबर





शाळेकडून प्रति महिन्याला द्यावयाची सांख्यिकीय माहिती, शालेय पोषण आहार बाबत देयके अर्थात मासिक टपाल तयार करण्यासाठी सुद्धा शाळेचे स्वनिर्मित App शाळेत कार्यान्वित आहे. त्यामुळे शालेय कामकाजात शिक्षकांचा जाणार वेळ यामुळे वाचत असून त्याचा उपयोग विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी नक्कीच होणार आहे. ही GOOGLE TOOLS BASED SMART SCHOOL MANEGMENT SYSTEM संपूर्ण यंत्रणा आमच्या शाळेसाठी विकसित करण्यासाठी प्रेरणा मला आमच्या मुख्याध्यापिका पाटील यांनी दिली. त्यानंतर अशी प्रणाली महाराष्ट्रातील सर्व शाळांना वापरता यावी यासाठी https://www.ekarkun.in या वेबसाईटच्या माध्यमातून सर्व शाळांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न नंतर झाला. आजरोजी महाराष्ट्र राज्यातील अनेक शिक्षक तथा शाळा या वेबसाईट वरून उपलब्ध सेवांचा लाभ घेत आहेत. सौ पाटील यांच्या प्रेरणेतून एका नव्या प्रणालीचा जन्म झाला म्हणणे चुकीचे ठरणार नाही. राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२२-२३ साठी हा प्रकल्प सादरही करण्यात आला होता. त्याची लिंक पुढे दिली आहे.

https://drive.google.com/file/d/1mnm66 OY4C1JyROAkbvg5CBqyxFmovaw/view?usp=share_link

<u>100% डिजीटल शाळा:- ई-लर्निंग सुविधा:</u>

आमची शाळा 100% डिजीटल आहे. त्यामध्ये प्रत्येक वर्गामाध्ये SMART LED TV किंवा PROJECTOR (OHP) ची सुविधा शिक्षक सहभाग अथवा लोकसहभागातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. आज रोजी शाळेमध्ये 7 SMART LED TV व 2 प्रोजेक्टर असून त्या माध्यमातून विद्यार्थी ई-लर्निंग चे धडे आनंदाने आहेत.

गावाचे कर्तृत्ववान नागरिक तथा शाळेचे माजी विद्यार्थी यांचे परदेशातून आमचे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याशी ONLINE संभाषण करतात.


सकाळ

शिरसाड जि. प. शाळेचे डिजिटलायजेशन

लोकसहभागातून केला कायापालट; विद्यार्थी संख्या वाढली



लोकसहभागातून DTH सुविधा कार्यान्वित..





सर्व वर्ग डिजीटल

फलनिष्पत्ती-

1. जिल्हास्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार प्राप्त.
2. 100% डिजीटल शाळा.
3. कार्यालयीन कामकाजासाठी अनोखी प्रणाली निर्माण झाली. आणि त्यातूनच www.ekarkun.in या वेबसाईट ची निर्मिती.
4. शालेय भौतिक सुविधांमध्ये दृश्य सुधारणा.
5. शाळा व समाज ऋणानुबंध विकसन
6. विविध माध्यमातून लोकसहभाग.
7. विविध उपक्रमातून विद्यार्थी उपस्थिती वाढली.
8. पालकांच्या प्रतिक्रिया ऐकल्यानंतर शाळेविषयी विश्वासार्हता वाढल्याचे जाणवते.
9. शालेय व सहशालेय कार्यक्रम तथा उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे विद्यार्थी भावनिक, सामाजिक तथा शैक्षणिक विकासासाठी विशेष फायदा.

समारोप:

शैक्षणिक वर्ष सन 2018-19 पासून ते आजपर्यंत शाळेमध्ये झालेले सकारात्मक बदल या स्परूपात संकलित करण्याची जबाबदारी अमच्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संगिता धनंजय पाटील मॅडम यांनी माझ्यावर टाकली. सन 2018-19 पासूनच या शाळेत हजर झाल्याने तेंव्हापासून ते आजपर्यंत शाळेमध्ये झालेल्या दृश्य बदलांचा मी एक भाग असल्याने मला हे काम पूर्ण करणे शक्य झाले.

शाळेच्या स्थापनेपासून म्हणजे सन 1884 पासूनच्या नमुना नंबर-1 च्या ई-अनुक्रमणिकेची निर्मिती, संगणकाचा शालेय कामकाजामध्ये वापर, शाळेची स्वतंत्र वेबसाईट, शालेय कामकाजासाठी GOOGLE TOOLS BASED अनोखी प्रणाली, उपस्थिती ध्वज, लोकसहभाग इत्यादी माध्यमातून आमच्या मुख्याध्यापिका सौ. संगिता पाटील मॅडम यांच्या नेतृत्वाखाली आम्ही अनेक पातळीवर पूर्ण क्षमतेने योगदान देण्याचा प्रयत्न केला. यातूनच www.ekarkun.in या वेबसाईट ची निर्मिती झाली.

संदर्भीय files आणि Youtube लिंक्स खालील प्रमाणे आहेत.

शाळेची वेबसाईट:-

https://www.zpschoolshirsad.in

फोटो आणि ध्वनिचित्रफिती लिंक्स

1)निसर्गसहल व वनभोजन

https://youtu.be/0EHK03yrJ5Q

2)उपस्थिती ध्वज उपक्रम

https://youtu.be/pe4jVLPgO8s

3)शाळा पूर्व तयारी मेळावा 2022-23

https://youtu.be/vKJJ_qpqFBs

4)Website चे अनावरण

https://youtu.be/l4ApWnu_tGg

5)बाल आनंद बाजार २०२२-२३

https://youtube.com/watch?v=4OScJnvm_ec&feature=share

6)स्वच्छ विद्यालय सादरीकरण ppt

https://drive.google.com/file/d/1sM1C5xTOdcaVZALT3LLvl_OIDzMHZ2wa/view?usp=share_link

_===== @ =====

10 .अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर (ई लर्निंग)

शाळेचे पूर्ण नाव – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दोदडगाव,ता.अंबड, जि.जालना,

इ मेल आय डी – dodadgaonschool@gmail.com

शिक्षकाचे पूर्ण नाव – श्रीम. निता भास्कर आरसुळे

शाळेचे व्यवस्थापन – जिल्हा परिषद

प्रस्तावना :

"उत्तम शिक्षण म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षण होय". गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षक म्हणून आपली जबाबदारी ओळखून सन 2017 पर्यंत शाळेत आम्ही चार शिक्षकांची शैक्षणिक कार्यातून आणि विद्यार्थी विकास या एका विचारसारणीने संघबांधणी झाली. प्रत्येक उपक्रमाला चारही शिक्षकांचा एकमेकांना पाठिंबा आणि सहकार्य मिळू लागले. परंतु इंग्रजी शाळांचे पेव फुटले होते.. इंग्रजी शाळेची फी भरण्याची ऐपत नसताना माझे मूल शिकावे या विचाराने पहिलीत प्रवेशित होणारी मुले इंग्रजी शाळेत जावू लागली. हा धोका पटसंख्या कमी करणार हे ओळखून इयत्ता पहिलीत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना आम्ही सर्व शिक्षक प्रत्यक्ष भेटी घेवून समजावू लागलो की दर्जेदार शिक्षण आपल्या जि. प. शाळेत गावातच मिळेल व तेही एक रुपया न खर्च करता.. पण पालकांचे मत बदलता आले नाही. विद्यार्थी व शिक्षक नाते आई मुलांचे झाले, तरी पालक आणि ग्रामस्थ, ग्रामपंचायत यांचे हवे तितके सहकार्य शाळेला मिळत नव्हते . जसे भरगच्च कार्यक्रम असलेला संस्कृतिक कार्यक्रम शाळेने आयोजित करून आजूबाजूच्या शाळेतील शिक्षक कार्यक्रमाला उपस्थित राहूनही निधी फक्त 5000 रुपये जमा झाले .

महाराष्ट्रात डिजीटल शाळांचे वारे वाहू लागले आणि आनंददायी शिक्षणासाठी ई साहित्य निर्मिती तसेच कृतीकरिता हालचाली सुरू झाल्या. माझे राज्यस्तरीय महिला तंत्रस्नेही प्रशिक्षण झाले व जिल्हा मार्गदर्शक म्हणून महिलांना प्रशिक्षण देण्याची संधी मिळाली.

समस्या / आव्हाने :

विद्यार्थी दर्जेदार शिक्षण घेण्यासाठी इंग्रजी शाळेत जातात.जर आपण शाळेत इ-लर्निंग शिक्षण सुरू केले तर गुणवत्तापूर्वक शिक्षण देवू शकू, यासाठी इ- साहित्य आवश्यक आहे. आम्हा शिक्षकांची इ- लर्निंग विषयावर चर्चा झाली आणि स्मार्ट टी. व्ही. आणू हे ठरले. समस्या अशी होती की गावात एकही android फोन, एलईडी टीव्ही. किंवा संगणक नसताना म्हणजे वातावरण नसताना शाळेत ई लर्निंग करणे व शाळा डिजीटल शाळा करणे.

नियोजन व उपाययोजना :

मुख्याध्यापक यांनी स्वातंत्र्यदिनी डिजीटल शाळेसाठी मदतनिधीची अपेक्षा व्यक्त केली .पण मदतीऐवजी ग्रामस्थांमध्ये वाद झाले. परंतु नेतृत्व स्वीकारत आम्ही गावात मदतनिधी साठी दारोदारी हिंडलो.. संगणक, लॅपटॉप, हे काय असते, कसे शिकवणार हे महिला वर्गाला समजावत डबाभर पैसे म्हणजे १५०० रुपये गोळा करून शाळेत जमा केले. अशा रीतीने ग्रामस्थ व पालकांचे मत बदलून लोकसहभागातून शाळेत पहिले दोन स्मार्ट टी. व्ही. आले.

. तंत्रज्ञानाचा वापर करून उपक्रमातून दर्जेदार शिक्षण देण्यास सुरुवात केली.

•युट्युब चॅनल –

निता आरसुळे / Neeta Arsule या युट्यूब चॅनलवर सन २०१६पासून वर्गातील कृती उपक्रमाचे व पपेट लेसनचे रेकॉर्डिंग करून विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांच्यासाठी उपलब्ध करून दिले आहेत. पालक व्हाट्स अप ग्रुपवर याबाबत लिंक व पोस्ट शेअर केल्या. त्यामुळे पालकांना शाळेतील उपक्रम माहित झाले. शैक्षणिक वातावरण निर्मिती झाली. यातून शाळेला गावाचा आधार मिळत गेला आणि त्याचा सकारात्मक परिणाम म्हणजे पालकांकडून आर्थिक व वस्तू रूपात मदत झाली . ग्रामपंचायतकडून कुंपण भिंत, संगणक, प्रिंटर सेट अप, शालेय आवारात ब्लॉक मिळाले व शाळेचे रूप

पालटून स्वच्छ व सुंदर शाळा म्हणून अधिकारी व पदाधिकारी आवर्जून भेटी देतात. गावातील तरुण मित्र मंडळ यांनी चाळीस हजार रुपयांची देणगी देऊ केली आहे.

चॅनल लिंक - https://www.youtube.com/c/NeetaArsul

• स्काइप – मिस्टरी नेशन –

२०१७ पासून सूरू असलेला २०१९-२० शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांच्या आपुलकीचा उपक्रम मिस्टरी नेशन होय. संघ म्हणून सर्वांनी खूप मेहनत घेतली. यात चौथी,पाचवी व सहावीच्या पाठयक्रमाखेरीज जास्तीचा भूगोल आणि इंग्लिश विषय हाताळून इतर देशातील विद्यार्थी व शिक्षकासोबत संवाद साधला. मिस्टरी नेशन यात देश ओळखण्याचा खेळ खेळत स्वतः चा देश ओळखण्यास शिकली. मुलांनी इंग्लिश प्रश्न आणि उत्तरे, नकाशावाचन व देशविषयक माहिती संकलन केले. आनंदाची बाब म्हणजे टीमच्या देशाच्या माहितीचे संकलन पुस्तिका world Safari आपल्या हाती लवकरच येऊन आपल्याला ही मिस्टरी नेशन खेळ खेळण्यास व जगाचा भूगोल अभ्यास होण्यास उपयुक्त होईल. माझी टीम मिस्टरी नेशन कोणत्याही देशातील विद्यार्थी व शिक्षकासोबत सराईतपणे खेळतात. पालकांनी शालेय वेळेव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना शाळेत थांबण्याची परवानगी दिली .तसेच त्यांना आपल्या पाल्याला देशाची माहिती विचारा असे सांगून त्यांचा सहभाग घेतला. विद्यार्थी सहजपणे परिपाठात प्रश्न विचारून उजळणी करतात. विद्यार्थ्यांमध्ये सादरीकरण आणि आत्मविश्वास वाढला आहे.



https://youtube.com/playlist?list=PLwiG9AC4NAG3P4HqgUXp2EkAL3G0eUbRE

उपक्रम स्काइप इन एज्युकेशनच्या माध्यमातून जिल्ह्यात आतापर्यंत दोन प्रयोग झाले यशस्वी, विद्यार्थ्यांना नवीन उपक्रमामुळे होणार फायदा

विद्यार्थ्यांचा स्काइपद्वारे श्रीलंकन विद्यार्थ्यांशी संवाद

प्रताप गाढे | जालना

मायक्रोसॉफ्ट एज्युकेशनने देशभरातील शाळांनी एकमेकांबरोबर संवाद साधावा इतर एकमेकांना पुस्तकातील बाबींची प्रत्यक्षात दृकश्राव्य माध्यमातून उपलब्ध व्हावेत यासाठी स्काइप इन एज्युकेशन हा पर्याय ऑनलाइनच्या माध्यमातून देण्यात आला आहे. यासाठी शाळांनी नोंदणी करून विद्यार्थ्यांची तयारी करावी लागते. जिल्ह्यात याचा उपयोग दोन शाळांनी केला असून नुकताच अंबड तालुक्यातील दोदडगावच्या जिल्हा परिषद प्रशालेतील विद्यार्थ्यांनी श्रीलंकेतील विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला.

शुक्रवारी दुपारी स्काइपद्वारे दोदडगाव शाळेतील इयत्ता ४ थी ते ६ वीच्या विद्यार्थ्यांनी कोलंबो येथील गौतमी बालिका विद्यालयातील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसोबत जवळपास १ तास संवाद साधला. यामध्ये विद्यार्थ्यांनी एकमेकांच्या देशाविषयी ओळख होईल असे प्रश्न विचारले. त्याशिवाय शिक्षण पद्धतीबाबत विद्यार्थ्यांनी माहिती जाणून घेतली. इंग्रजी भाषेतून हे संभाषण झाले. दोदडगाव येथील विद्यार्थ्यांनी श्रीलंकन विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. शेवटी दोन्ही देशांचे राष्ट्रगीत गायन झाले. या उपक्रमासाठी सहशिक्षिका निता आरसुळे यांनी विद्यार्थ्यांकडून पूर्वतयारी करून घेतली. या वेळी शाळेतील मुख्याध्यापक, सर्व शिक्षकांनी यामध्ये सहभागी होऊन स्काइपद्वारे श्रीलंका येथील शाळेची व देशाची ओळख करून घेतली. यासाठी प्रभारी गटशिक्षणाधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी मंगल धुपे यांचे मार्गदर्शन लाभले.

महिनाभरापासून तयारी

महिनाभरापासून शिक्षकांनी तयारी करून घेतली होती. यासाठी इयत्ता चौथी ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना सहभागी करण्यात आले होते. या उपक्रमासाठी लॅपटॉप, व्हीडीओ कॅमेरा या साधनांसह इंटरनेटचा वापर केला. अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे संभाषण कौशल्य व आत्मविश्वास वाढतो.




कोलंबो येथील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दोदडगावातील विद्यार्थीनी

विद्यार्थ्यांसाठी कौतुकाचे

लाइव्ह क्लास हा विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा आहे. त्यांना विदेशाबाबत ऐकलेल्या बाबींची माहिती प्रत्यक्ष दृक श्राव्य माध्यमातून उपलब्ध होते. अध्ययनासाठीही फायदा होतो. नोंदणी झाल्यानंतर देशांतील शाळांबरोबर संवाद साधणार आहोत.

नीता आरसुळे, शिक्षिका,दोदडगाव,जि.प.शाळा

अशी होते संभाषणासाठी निवड : मायक्रोसॉफ्ट एज्युकेशन सॉफ्टवेअर वेबसाइट आहे. नोंदणी केल्यानंतर शाळेची माहिती भरून प्रोफाइल तयार करावी लागते. त्यानंतर ही माहिती जगभरातील नोंदणी केलेल्या शाळेतील शिक्षकांना उपलब्ध होते.



•नॅशनल जिओग्राफी अंतर्गत लेसन-

नोव्हेंबर २०१८ मध्ये जलसंवर्धन हा विषय मी गावातील एक नैसर्गिक परिस्थिती पाहून निसर्गाप्रति बांधिलकी म्हणून राबविण्याचे ठरविले. यात मी पाणी हेच जीवन यात प्रश्नावली, व्हिडीओ आणि पीपीटी मदतीने पाण्याची आवश्यकता, पाण्याशिवाय जीवन तसेच जलचक्र स्पष्ट केले . गावातील पाण्याचे स्रोत नकाशा, वापराचा तक्ता आणि साठवण यावर चर्चा केली. नदी स्वच्छता प्रकल्प याची ओळख मग प्रत्यक्ष गावातील ओढा स्वच्छता, पोस्टर तयार करन जलफेरीद्वारे जल संवर्धन विद्यार्थ्यांनी स्पष्ट केले. या लेसनची **नॅशनल जिओग्राफी** कडून दखल घेत प्रमाणपत्र व पत्र मिळाले. या उपक्रमात विद्यार्थी हिरीरीने भाग घेतात. पालकांनी ओढा स्वच्छता करताना असो की जलफेरी असो त्यास सहमती आणि विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून समजून घेतात . या उपक्रमाचा लेख जीवन शिक्षण जून २०१९ मध्ये लेख प्रकाशित झाला आहे. https://youtu.be/YLloyJOHi4E

•मायक्रोसॉफ्ट किट फ्लिपग्रीड-

मायक्रोसॉफ्ट एज्युकेशन कडून फ्लिपग्रीड यावर विद्यार्थ्यांना शालेय विषयाचे टॉपिक देऊन व्हिडीओच्या माध्यमातून प्रतिसाद घेण्यास प्रोत्साहन दिले. ऑगस्ट २०१९ महिन्यात विन व्हॉईसपॉड या स्पर्धेत सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी घटक आधारित प्रतिसाद व्हिडीओ रुपात आणि इंग्लिश भाषेत दिले. काय कमाल ! विद्यार्थ्यांचे अभ्यासपूरक कृतीचे कौतुक म्हणून १० व्हॉईस्पॉड मायक्रोसॉफ्ट अमेरिका येथून जिल्हा परिषद दोदडगाव येथे आले. महाराष्ट्र राज्यातील अशी पहिली शाळा याची दखल जिल्हा परिषद शिक्षण विभाग व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी निमा अरोरा मॅडम यांनी घेतली . विद्यार्थ्यांची प्रगती पाहून पालक रोज शाळेत येऊ लागले आणि रोज गावात संध्याकाळी गावकरी चर्चा करू लागले की , " आपली मुले हुशार होत आहेत ". इतर पालक येऊन म्हणू लागले , " माझे मूल अमेरिकेत आणि मंगळावर पाठवा . लय अभ्यास द्या ह्याला ,पण पुढं गेला पाहिजे ". हा पालकांचा आत्मविश्वास खरेच आपले काम योग्य असल्याचे बळ देऊन जातो.

https://admin.flip.com/manage/discovery/collections/details/14273?ns=

https://flip.com/pq27jm3 , https://flip.com/arsule3253 , https://flip.com/arsule4961





•**लेखमाला** – मिस्टरी नेशन उपक्रम राबविताना आलेले अनुभव विद्यार्थ्यांचा सहभाग याचे विस्तृत लेख 'सफर जगाची' या पुस्तकात मांडले आहे. मिस्टरी नेशन – देशाची ओळख करून घेताना उपयोगी होईल असे 'WorldSafari' पुस्तकाचे लेखन केले आहे. विद्यार्थ्यांना भौगोलिक संकल्पना स्पष्ट व्हाव्यात म्हणून दिव्य मराठी किड्स कॉर्नर मध्ये अभ्यास जगाचा, वैविध्य देशाचे, पृथ्वीगोल, नकाशासोबत मैत्री, खेळातून भूगोल, देशोदेशी प्रमाणवेळ, राष्ट्रीय चिन्ह, भेटूया स्काईपवर, पासपोर्ट बनवूया विषयावर लेखन केले आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये भूगोल विषयाची रुची वाढविण्यास मदत झाली. Link - https://anyflip.com/rpfk/xdyl/




माहिती व ज्ञान

पृथ्वीगोल

पृथ्वीची लहान प्रतिकृती म्हणजे पृथ्वीगोल (Globe) होय. पृथ्वी स्वतःच्या आसातून २३.५% कलली असून त्याप्रमाणे पृथ्वीगोल स्टँडवर बसवलेला असतो. आपण घरच्या घरी अँड्रॉइड मोबाइलवर गुगल अर्थ ॲपवर पृथ्वीगोल पाहूया. तुम्हाला निळा रंग जास्त दिसून येईल. ते आहे पाणी...म्हणून पृथ्वीला निळा ग्रह म्हणतात. पृथ्वीवर पाण्याचा भाग ७९% आहे. पृथ्वीवर महासागराच्या रूपात ९६.५% पाणी आहे. पृथ्वीगोल आणखी लक्षपूर्वक पाहिला तर समुद्र दिसून येतील. भारत देशाच्या किनारपट्टीला पश्चिमेला अरबी समुद्र व पूर्वेला बंगालच्या उपसागर आहे. प्रत्येक देशाच्या शेजारी असलेला महासागर व समुद्र यांची नावे जाणून घ्यायला हवीत! पृथ्वीवर जमीन २१% आहे. या जमीन भागाचे सात खंडात विभाजन होते. आशिया, आफ्रिका, उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया, अंटार्क्टिका, आर्क्टिक आहेत. खंड ओळख करताना सीमारेषा लक्षात घ्यावी लागते. दोन शेजारील खंड आशिया व युरोप तसेच उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका यातील सीमारेषेवर असलेले देश कोणत्या खंडात आहे याची नोंद करून ठेवा. जसे रशिया हा देशाचा आशिया व युरोप खंडात विस्तार करतो. प्रत्येक खंडातील राष्ट्रांची नावे लिहिताना बऱ्याच रोचक गोष्टी समजतात. पृथ्वीवरील देशाच्या शेजारी असलेले महासागर आणि समुद्र यातून होणारा व्यवसाय याच्या आणखी मजेशीर बाबी जाणून घेऊया World Safari या पुस्तकातून..वाचा व नोंद ठेवा.

- नीता आरसुळे, मो.नं. ८६५२४५००३२

• **टॅब क्लास-** श्री. सुनिल रायठ्ठा, विनोदराय इंजिनियरिंग कंपनी यांना वर्गातील आयसीटी कृतीचे टॅब उपलब्ध करून देण्याची विनंती केली. सरांनी उपयुक्त होईल असे मायक्रोमॅक्स कंपनीचे 21 टॅब शाळेला दिले. याचा परिणाम असा की ग्रामीण भागात शाळा असूनही विद्यार्थ्यांना टॅबचा वापर एप्लिकेशन द्वारा उजळणी सराव करता येऊ लागला. गणित, मराठी,चित्रकला,इतिहास विषयांचे विविध अप्स घेतले व ब्राऊजर मधून शोध घेतात प्रकल्प माहिती लिहितात. .





ऑनलाइन क्लास-

शाळेला मिळालेले टॅब विद्यार्थ्यांना घरी वापरण्यासाठी वाटप केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना ऑनलाइन तासिका कशी जॉइन करायची याचे विडिओ पालकांच्या मदतीने सुरू केले. विद्यार्थ्यांना पीपीटीद्वारे पाठ अध्यापन आणि अध्ययन करण्यास वाव दिला. विद्यार्थी व्हाट्स अपवर गृहपाठ व लेखनाचे फोटो पाठवून चेक करून पाठवत होते. टॅब क्लास व कोरोना काळात ऑनलाइन तसिका घेतल्याने विद्यार्थ्यांच्या पट संख्येत १७% वाढ झाली. विद्यार्थी टॅब हाताळणी कौशल्य तसेच गुगल मीटवर ऑनलाइन तासिका जॉइन करणे उत्तमपणे करत आहेत. या कार्याबद्दल मा.शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड तसेच मा. आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सत्कार केला.



पुरस्कार स्वीकारताना



अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर

यशस्वीता-

- निता आरसुले यू ट्युब चॅनल-, शाळेचा ब्लॉग तसेच शालेय अभ्यासक्रमातील घटक पारंपरिक पद्धतीने म्हणजे खडू फळापर्यंत न थांबता मिस्टरी नेशन ऑनलाइन खेळातून आणि शासनाचे मित्रा व नंतर दिक्षा एपवर स्वनिर्मित विडिओ पाहून सरपंच व ग्रामस्थ यांनी शाळेला दोन संगणक संच, कुंपण, गेट, आणि पेवर ब्लॉक

  दिलेतसेच टॅब ., शासन निधीतून दिलेल्या प्रोजेक्टरच्या माध्यमातून अमूर्त संकल्पना स्पष्टीकरण देण्यास सुरुवात केली.
- शाळेचे विद्यार्थी श्रीकांत मुंढे शिष्यवृत्तीधारक झाला . तसेच विकास शिंदे ,विद्यानिकेतन ,औरंगाबाद येथे प्रवेशित झाला . मनोज मुंढे बीसिविल होवून बुलढाणा .ई . येथे तसेच संभाजी आघाव बी .करून औरंगाबाद इथे बँकेत काम करत आहे .कॉम . सुहानी खाडे, किरण पांढरे, प्राजक्ता मुंढे बीएस .. सीतर शुभांगी मुंढे ., निशा पोतकुले ह्या तंत्र निकेतन मध्ये शिकत आहेत .
- सन 19-2018या शैक्षणिक वर्षात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत अध्ययन स्तर निश्चिती यात अंबड तालुक्यातून शाळेचा तृतीय क्रमांक आला.
- शाळेकडे माता व आजी पालक यांच्या भेटी व्ही कार्यक्रमात उपस्थिती वाढू लागलीशालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष . पद पुरुष वर्गाकडून महिला वर्गाकडे आलेमहिला अध्यक्ष शालेय निर्णयात सहभागी होवून . पाल्याच्या अभ्यासतील प्रगती स्वत: येवून शिक्षकांसोबत चर्चा करतात.
- आदित्य मुंढे या विद्यार्थ्याची राज्यस्तरीय वैज्ञानिक खेळणी स्पर्धेत निवड झाली उत्कर्षा मुंढे व तुषार हिवाळे .यांनी राज्यस्तरीय हस्ताक्षर स्पर्धेत प्राविण्य मिळविले.
- अमोल शिंदे या कर्णबधीर विद्यार्थ्याचे चित्र दिव्य मराठी किड्स कॉर्नरला प्रसिद्ध झालेत्याचे समावेशित शिक्ष .णाच्या माध्यमातून पुढील शिक्षण सुरू आहे .





प्रवेश संख्या

- 2017- 96 ,2018-103 ,2019-97 ,2020-101,2021-116 वाढली असून एकूण वाढ%17.24 - झाली आहे .

ई लर्निंग च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे इंग्लिश स्पीकिंग हा उपक्रम जालना जिल्ह्यातून RAA, औरंगाबाद आयोजित राज्यस्तरीय इंग्लिश सिंपोसीयम, सोलापूर साठी निवड व सादरीकरण झाले .

DIKSHAAPP चा वापर विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी कुशलतेने करता येतो आहेसमग्र शिक्षा या शासनाच्या प्रसार . माध्यमावर विद्यार्थ्यांच्या इंग्लिश, गणित, कार्यानुभव विडिओ कृती प्रसिद्ध झाले आहेत .

समारोप :

अशी नॅशनल हाय वे २१७ पासून १.५ किमी आत असणारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा स्वच्छ व सुंदर असून आय सी टी उपक्रमात विद्यार्थ्यांची यशस्वी वाटचाल सुरू असून सध्या संगणकीय विचार कौशल्यAR व VR उपक्रमात विद्यार्थी उत्सुकतेने सहभागी होत असून अध्ययनात वेग धरत आहे. जि. प. प्रा. शा दोदडगाव शाळा सकारात्मक दृष्टीकोण तसेच नेतृत्व व संघ बांधणी झाल्याने **आपली शाळा** या भावनेतून शाळेचा व विद्यार्थ्यांचा विकास ई लर्निंग च्या माध्यमातून होत आहेत.

===== @ =====

11.जलसाक्षरता "वॉटरबँक'

शाळेचे नाव : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विल्हाडी,ता.-बदनापूर जि .जालना

ईमेल आयडी : vvpande77@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव :- श्री विष्णू देवराव सोनटक्के

शाळेचे व्यवस्थापन - जिल्हा परिषद

प्रस्तावना :-

असे म्हणतात की, "जल ही जीवन है ," "जल है ,तो कल है "
वरील उक्तीप्रमाणे पृथ्वीवरील प्रत्येक जीवाला पाण्याची पिण्यासाठी व वापरण्यासाठी नितांत आवश्यकता असते. भारतामध्ये जागतिक स्तरावर विचार केला तर भारतामध्ये 18 ते 20 टक्के लोकसंख्येला फक्त 4 टक्के पाण्याची उपलब्धता आहे. त्यापैकी 80 टक्के पाणी हे शेतीसाठी वापरले जाते व उरलेले 20 टक्के पाणी उद्योगधंदे व लोकांच्या वापरासाठी उपलब्ध आहे .एवढी दुर्मिळ परिस्थिती भारतामध्ये असताना पाणी बचतीचे संस्कार बालवया लागणे ही काळाची गरज आहे. महाराष्ट्रात विशेषत: मराठवाड्यामध्ये प्रत्येक वर्षी पाण्याचे दुर्भिक्ष हे ग्रामीण भागात पाचवीला पुजलेले असते. परंतु पाण्याचे काटेकोर नियोजन व व्यवस्थापन केले तर आपण या संकटावर निश्चितच मात करू शकतो. यासाठी पाणी फाउंडेशन नाम फाउंडेशन सारख्या स्वयंसेवी संस्था संपूर्ण महाराष्ट्रभर उल्लेखनीय कार्य करीत आहे तसेच शासन पातळीवर पाणी आडवा पाणी जिरवा, जलयुक्त शिवार अशा विविध मोहीम हाती घेण्यात आलेल्या आहेत. म्हणून बालवयातच बालकांना प्राथमिक स्तरापासून जल संस्कार लागावा व पाण्याची बचत व योग्य नियोजन व्हावे यासाठी आंघोळीसाठी ,कपडे व भांडी धुण्यासाठी वापरलेल्या, टाकाऊ पाण्यापासून शाळेतील व परिसरातील वृक्ष संवर्धनासाठी "वाटर बँक" हा अभिनव नवोपक्रम जि.प. प्रा. शा. विल्हाडी ,तालुका बदनापुर ,जिल्हा जालना या शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष 2018-19 या कालावधीमध्ये राबविण्यात आला.

यशोगाथा विषय निवडीचे कारण -

1) बालकांमध्ये बालवयातच पाणी बचत व पाणी व्यवस्थापनाचे संस्कार व्हावे.

2) पाण्याचे काटकसरीने व काटेकोरपणे वापर करावा.

3) निसर्गाविषयी प्रेम व आस्था निर्माण व्हावी.

4) नैसर्गिक साधनसंपत्तीचे महत्त्व समजावे.

5) टाकाऊ पासून टिकाऊ दृष्टिकोनातून नैसर्गिक संसाधनांचा वापर व्हावा.

उपक्रमाची उद्दिष्टे -

1) " वॉटर बँक" या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पाणी बचतीचे महत्व समजणे.

2) शालेय परिसरातील वृक्षांचे दुष्काळी स्थिती पासून बचाव करणे.

3) पाण्याचा पुनर्वापर यावर बालकांचे कृतीद्वारे लक्ष केंद्रित करणे.

4) पाण्याचे मानवी जीवनावरील अनमोल महत्त्व बालकांच्या मन:पटलावर बिंबविणे.

5) संवेदनशीलता, वृक्ष प्रेम ,टाकाऊपासून टिकाऊ दृष्टिकोन, नैसर्गिक संसाधनांचा पुनर्वापर ही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बनविणे.

उपक्रम पूर्व स्थितीचे निरीक्षण -

शाळेमध्ये साधारणत: शंभरच्यावर वृक्ष व 27 बाय 25 स्क्वेअर फूट ची हिरवळ असल्याने डिसेंबर-जानेवारी 2018 च्या महिन्यांमध्येच पाण्याचे प्रमाण विल्हाडी पंचक्रोशीत अत्यंत कमी कमी होत गेले. अशा वेळेस भेडसावणाऱ्या आपत्तीला इष्टापत्ती मानून सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वृक्ष संवर्धन करणे यासाठी स्थायी पर्याय व पाण्याचा पुनर्वापर करणे हे सयुक्तिक वाटू लागले.

नियोजन -

शाळेतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांमार्फत अंघोळीचे पाणी , कपडे धुण्याचे व भांडी धुण्याचे पाणी तसेच टाकाऊ पाणी संकलित करून शाळेमध्ये प्लास्टिक बाटलीच्या , कॅन किंवा बकेटच्या साह्याने आणणे. ठरवून दिलेल्या वृक्षांना पाणीदेऊन जोपासना करणे.

तज्ञांचे मार्गदर्शन-

शालेय व्यवस्थापन समितीशी मुख्याध्यापक व शिक्षक वृंद , वरिष्ठ अधिकाऱ्यांशी याविषयी चर्चा केली.परिसरातील अनुभवी व्यक्तींशी वृक्ष संवर्धनाविषयी मार्गदर्शन घेतले .तसेच पाणी बचतीविषयी विविध संदर्भ साहित्य यांचा मागोवा घेतला.

आवश्यक साधनांचा विचार-

यासाठी मूलभूत साधने म्हणजे पाणी साठवणुकीसाठी 500 लिटर पाण्याची टाकी आणली. तसेच 150 एक लिटरच्या प्लास्टिक बॉटल,50 त्यान पाच लिटर क्षमतेच्या परिसरातून गोळा केल्या.

सर्व वस्तू लोकवर्गणीतून आणल्याने कोणताही खर्च आला नाही.

करावयाच्या कृतींचा क्रम-

1) घरी कपडे धुणे, भांडी घासणे ,आंघोळीचे पाणी एका भांड्यामध्ये जतन करून ठेवणे.

2)दररोज नित्यनेमाने सकाळी पाणी आणणे.

3)दैनंदिन परिपाठ प्रार्थना संपल्यानंतर कोणत्या विद्यार्थ्याने किती लिटर पाणी आणले याची वर्गनिहाय नोंद घेणे.

4) आणलेल्या पाण्याचे विद्यार्थ्या मार्फत नियोजन करून संबंधित वृक्षाला पाणी देणे.

5) प्रत्येक आठवड्याला कोणी किती पाणी जमा केले. त्याची नोंद घेणे व जास्तीत जास्त पाणी आणून वृक्ष संवर्धन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करणे, स्वागत करणे.

कार्यवाहीची टप्पे व वेळापत्रक-

1) सकाळी प्रार्थनेच्या वेळी घरून एक लिटर बॉटल किंवा पाच लिटर कॅन किंवा 10 ली. बकेट च्या साह्याने केलेले पाणी आणणे.

2)प्रार्थना झाल्यानंतर वृक्षांना पाणी देणे.

3) शाळेतून घरी गेल्यानंतर कपडे , भांडी धुण्याचे व अंघोळीचे पाणी परत एकदा जमा करणे व दुसऱ्या दिवशी पुन्हा पाणी शाळेत आणणे.

यासाठी लागणारा वेळ-

1) पाण्याचे संकलन-10 मिनिटे

2) पाण्याची नोंद व वृक्षांना पाणी देणे-10 मिनिटे

उपक्रमासाठी इतरांची मदत-

माहितीचे विश्लेषण-

152 विद्यार्थ्यांपैकी दररोज विविध साधनांच्या साह्याने पाणी आणणारे विद्यार्थी खालील प्रमाणे आहेत

1) बॉटल- 99 विद्यार्थी=99लि.पाणी

2) कॅन- 48 विद्यार्थ्यांनी पाच लिटरची कॅन मध्ये पाणी आणले =240 लि. पाणी

3) बकेट- 4 विद्यार्थ्यांनी दहा लिटर च्या बकेट मध्ये पाणी आणले=40 लि.पाणी

उद्दिष्टानुसार फलश्रुती-

1) "वॉटर बँक" या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पाणी बचतीचे महत्त्व समजले.

2) शालेय परिसरातील वृक्षांचे दुष्काळी स्थिती पासून बचाव करणे शक्य झाले.

3) पाण्याचा पुनर्वापर यावर बालकांची कृतीद्वारे लक्ष केंद्रित केले.

4) पाण्याचे मानवी जीवनावरील अनमोल महत्त्व बालकांच्या मनःपटलावर बिंबविले.

5)संवेदनशीलता वृक्ष प्रेम टाकाऊ पासून टिकाऊ दृष्टिकोन, वैज्ञानिक दृष्टिकोन, नैसर्गिक संसाधनाचा पुनर्वापर ही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे रुजविण्यात मदत झाली.

समारोप-

अस्वस्थता कशी दूर झाली ?

मनामध्ये एक प्रश्न निश्चितच राहायचा की विद्यार्थ्यांना नुसते पुस्तकी ज्ञान देण्यापेक्षा कृतियुक्त अध्यापन ही काळाची गरज आहे. यासाठी शून्य रुपये खर्च असलेला व व शाश्वत विकासाच्या दृष्टीने वैश्विक रुजविणारा नवोपक्रम हाती घेण्याचे ठरले . इतर बँके प्रमाणेच "वॉटर बँक" हा अभिनव संकल्पना मनामध्ये प्रफुल्लित झाली.कारण पैशाला जितके महत्व आहे, त्यापेक्षा खचितच जास्त महत्व पाण्याला असावे असे मला वाटते. विद्यार्थी ,पालक ,शिक्षक यांच्या सहाय्याने हा उपक्रम यशस्वी झाला आणि मनाला समाधान प्राप्त झाले.

अडचणी व मात-

म्हणतात ना," where there is a will, there is a way." या उक्तीप्रमाणे विविध खालील 3 अडचणी आल्या व त्यावर मार्ग मिळाला.

1) आंघोळीसाठी, कपडे धुण्यासाठी व भांडी धुण्यासाठी वापरलेले पाणी शालेय परिसरातील पक्षांसाठी झाडांसाठी वापरणे ही संकल्पना रुजवण्यासाठी अडचण आली.

मार्ग-सहकारी शिक्षक वृंद व जलतज्ञांच्या मदतीने तसेच काही विद्यार्थ्यांची जलदूत म्हणून नेमणूक करून पालकांचे समुपदेशन केले व सकारात्मक पद्धतीने काही पालकांमध्ये "वाटर बँक" द्वारे पाण्याचा पुनर्वापर हा दृष्टिकोन बिंबवण्यात मदत झाली.

2) प्रत्येक विद्यार्थ्यांकडे पाण्यासाठी काही माध्यम व साधन नव्हते.

मार्ग-लोकवर्गणीतून व दानाच्या माध्यमातून प्लास्टिकचे बॉटल, प्लास्टिक कॅन मिळविणे शक्य झाले.

उपयुक्तता कुठे व कुणाला?-

"वॉटर बँक"उपक्रमाची उपयुक्तता हे खरोखरच स्तुत्य व कौतुकास्पद होती. या उपक्रमाचे निष्पत्ती म्हणजे समाजातील पालक वर्गांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये पाण्याचा पुनर्वापर करणे, काटकसरीने पाण्याचा वापर करणे शक्य झाले.

संदर्भ-

1) भारतीय जलक्रांतीचे पदचिन्हे-माधव चितळे-हिंदुस्तान प्रकाशन संस्था.

2) भारतीय जलसंस्कृती; स्वरूप आणि व्याप्ती-डॉ. रा.श्री. मोरवंचीकर-सुमेरू प्रकाशन.

3) पाणी- बिजली बचत जनजागृती-इंजि. ओ.पी. माहेश्वरी-सायंटिफिक प्रकाशक 2018.

4) ॲग्रोवन ,सकाळ, लोकसत्ता ,महाराष्ट्र टाईम्स, पाणी फाउंडेशन, नाम फाउंडेशन जलयुक्त शिवार इत्यादी संबंधित वर्तमानपत्रातील लेख.

5) सह्याद्री वाहिनीवरील जलतज्ञ सोमनाथ जाधव यांचे मार्गदर्शन.

6)विविध ऑनलाईन साहित्य.

परिशिष्टे-






Z.P.P.S. Vilhadi

Medium	Number	Capacity in lit	Total
Bottle	99	1	99
Can	48	5	240
Bucket	4	10	40 = 379 lit./day

"वॉटर बँक" उपक्रमाअंतर्गत माहितीचे विश्लेषण करताना वरील टेबलच्या व वर्तुळाकार आलेखाच्या साह्याने शाळेत आणले जाणारे पाण्याची सरासरी दैनिक आकडेवारी दर्शवली आहे.



===== @ =====

१२. आदिवासी भागातील विद्यार्थी विकासात शाळेचे योगदान

शाळेचे नाव - जि.प. प्राथ. शाळा जुवानी ता. तळोदा जि. नंदुरबार
ई मेल - girase९६@gmail.com
मुख्याध्यापकाचे नाव - श्री. विजय विठ्ठल गिरासे शाळेचे
व्यवस्थापन - जिल्हा परिषद

प्रस्तावना -

"शाळा हे समाजाने समाजाच्या विकासाकरिता निर्माण केलेले एक सुसंस्कार केंद्र आहे

"फळा फुलांचा मळा पाहिजे..
आनंदाचा सोहळा पाहिजे..
गावात एक वेळेस देऊळ नसले तरी चालेल..
पण एक आदर्श शाळा मात्र असलीच पाहिजे.."

आदिवासी जिल्हा म्हणून ओळख असलेला , सातपुड्याच्या कुशीत, निसर्ग रम्य , आदिवासी बहुल लोकसंख्या असलेला असा आमचा नंदुरबार जिल्हा. सपाटी भागातील छोटी छोटी गावे ते वस्ती पाड्याच्या स्वरुपात सातपुड्याच्या दऱ्या खोऱ्यात विखुरलेल्या अवस्थेत जीवन व्यतीत करणारा ,शिक्षणासह इतर मुलभूत गरजा पूर्तीसाठी झटणारा हा कष्टकरी समाज..२१ व्या शतकातही मुलभूत सुविधांसाठी संघर्ष करताना दिसतो आहे. जिल्ह्यातील लोकांना, शिक्षण, आरोग्य, दळण वळण या आणि यांसारख्या विविध मुलभूत सुविधा प्राप्त करून देण्यासाठी, जिल्हा प्रशासन आणि संबंधित यंत्रणा, कंबर कसून याकामी लागल्यामुळे एक आशादायी चित्र जिल्ह्यात निर्माण झाले आहे.. सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल एक छोटस गाव जुवानी आणि याच गावातील जि. प. प्राथ. शाळेवर ४ वर्षापूर्वी बदलीने नियुक्ती झाली तेव्हापासून तर आजपर्यंत शाळास्तरावर, गावस्तरावर केलेल्या सकारात्मक बदलाची यशोगाथा या निमित्ताने मी आपल्यासमोर मांडण्याचा हा छोटासा प्रयत्न..

विद्यार्थी विकासातील प्रथमदर्शी लक्षात आलेल्या अडचणी :

१.शाळेसाठी लागणाऱ्या भौतिक सुविधांचा अभाव
२. शिक्षक पालक उदासीनता
३. पालकांचे दारिद्र्य
४. बोलीभाषेतील अडचण
५. विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्तिथी खूप कमी असणे ६. अत्यल्प लोक सहभाग ७. विद्यार्थी विकासात पालकांचा सहभाग खूप कमी ८. पालकांचे स्थलांतर
९. वीज पुरवठा नसणे १०. ऑनलाईन शिक्षण नसणे
११. उदासीन शाळा व्यवस्थापन समिती १२.शाळा आणि शिक्षण याबाबत पालकांची कमालीची अनास्था १३. शाळेत कुठलेही डिजिटल साहित्य नसणे १४. विद्यार्थ्यांना शाळेविषयी गोडी नसणे. १५. जीवनाभिमुख शिक्षणाचा अभाव १६. विद्यार्थ्यांचे शाळेत विद्यार्थी म्हणून

नाही पोटार्थी बनून येणे
यांच्यातील सुसंवादाची कमतरता इ.

१७. विद्यार्थी पालक व शिक्षक

नियोजन व अंमलबजावणी §

समाजातील विविध स्तरातील मुले शिक्षणापासून वंचित राहिली, शाळेपासून दूर राहिली , शाळाबाह्य झाली तर हा समाज प्रगतीतील मोठा अडथळा ठरतो.अशा वेळी या मुलांच्या पाठीवर मायेचा हात फिरवत त्यांना पुन्हा शिक्षण प्रवाहात आणणे महत्वाचे ठरते.आणि हे काम शाळा आणि शाळेतील शिक्षकच करू शकतात.म्हणून आधी जुवानी येथे वर्गखोली दुरुस्त करणे, तुटलेला Ramp दुरुस्त करणे, पटांगण स्वच्छता, वर्गखोल्या रंगरंगोटीकरून आकर्षक करणे यासारखी कामे त्वरित करणे साठी SMC सभा घेतली.विविध ठराव केले. ग्रामविकासात शाळेचे अनन्यसाधारण महत्व असते ही बाब ग्रामस्थांच्या लक्षात आणून दिली. वरिष्ठ स्तरावरून अनुदान मागणी केली. दरम्यान शिल्लक अनुदानातून RAMP दुरुस्ती आणि रंग रंगोटी करून घेतली . वर्ग खोली मोठी दुरुस्ती ही मंजूर झाली.दुरुस्ती झाली. विद्यार्थी आणि पालकांचे शाळेत येण्याचे प्रमाण वाढू लागले. हीच संधी साधून पालक प्रबोधन आणि विद्यार्थ्यांना आनंददायी पद्धतीने शिक्षण सुरु केले. विद्यार्थी सांगतील ते शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाऊ लागले. याकामी सहकारी शिक्षकांची साथ ही चांगली मिळाली.

फलनिष्पत्ती §

शाळेचे बदललेलं रूप पाहून शाळेत येणारी मुले रोज यायला लागली. आणि जी मुले येत नव्हती त्या मुलांना पालक ओढून शाळेत आणायला लागली..दरमहा होणाऱ्या बैठकामधून पालक आणि माता भगिनींना मुलांचे शिक्षण आणि शाळा याचं महत्व पटवून दिल्यामुळे शाळेला पालकांचे चांगले सहकार्य मिळू लागले. वर्षभरात शाळेची गुणवत्ता वाढली. केंद्रात शेवटच्या क्रमांकाला असलेल्या शाळेची गणना चांगली शाळा म्हणून केली जाऊ लागली.

समारोप :

आदिवासी भागातील विद्यार्थी विकासात शाळेचे योगदान महत्वपूर्ण आहेच पण..शालेय व उच्च शिक्षणाच्या सोयींचा अभाव ही देखील आदिवासी क्षेत्रातील मोठी उणीव आहे .आदिवासी मुलांना शिकवून पुढे आणायचे असेल तर त्याची प्राथमिक शाळेपासूनच तयारी करावी लागेल. प्राथमिक शाळेत चांगली तयारी झाल्यावर त्यांचे मनोधैर्य वाढेल ,मानसिक दुर्बलता कमी होईल आणि यातूनचं खऱ्या अर्थाने या मुलांचा आणि या समाजाचा यशाचा मार्ग मोकळा होईल .

फोटो लिंक - https://drive.google.com/drive/folders/१qKyCOKNOaE६SEJL७Z२९OzMkccSYi४ZxH

===== @ =====

13. क्रीडा क्षेत्रातील यश

शाळा - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तोंडाखैरी ,ता. कळमेश्वर ,जि. नागपूर

ई मेल आयडी - zpupstondakhairi123@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - सौ सुनंदा भगवान आसोले

शालेय व्यवस्थापन – जिल्हा परिषद

प्रस्तावना :

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तोंडाखैरी पंचायत समिती कळमेश्वर ,केंद्र ब्राह्मणी, जिल्हा नागपूर या शाळेमध्ये एकूण एक ते आठ वर्ग आहेत. शाळेमध्ये विविध उपक्रम अतिशय उत्कृष्टपणे होत असतात . विद्यार्थी संख्या यावर्षी 93 आहे. या शाळेत येताच क्रीडेविषयी विद्यार्थ्यांच्या मनात प्रेम निर्माण करून क्रीडा क्षेत्रात अभिनव कामगिरी करावी असे आम्ही ठरवले. कारण शाळेची भौतिक रचना बघता प्रशस्त असे क्रीडांगण लाभलेले आहे . या गावांमध्ये लाल भुसभुशीत माती आहे त्यामुळे येथे धुळीचा त्रास फार कमी होतो. शाळा प्रशस्त असून मोठ्या वृक्षांनी वेढलेली आहे. त्यामुळे इतके सुंदर मैदान असल्याने आपण आपल्या विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रामध्ये प्रशिक्षित करून शाळा स्तर , तालुका स्तर, जिल्हा स्तर अशा विविध पातळीवरील स्पर्धांमध्ये सहभागी करून घ्यावे असे सर्वांनी ठरवले . मागील चार वर्षाचा कार्यकाळ बघता आम्ही खरोखर क्रीडा क्षेत्रात आमच्या मुलांना संधी देऊन यशाचा विविध स्तरावर झेंडा रोवलेला आहे आणि म्हणूनच ही यशोगाथा आपणांसमोर सादर करीत आहोत.

समस्या व मुख्याध्यापकांनी समस्या निराकरणासाठी केलेले नियोजन :

- दैनंदिन तासिकांमध्ये शारीरिक शिक्षणाच्या ज्या तासिका आहेत त्या तासिकांचा उपयोग करून आम्ही क्रीडा शिक्षणाचे नियोजन केले. माझ्या शाळेत एकूण चार शिक्षक आहेत त्यामुळे चारही शिक्षकांमध्ये विविध खेळाच्या पूर्वतयारीचे वाटप केले.
- यानुसार कबड्डी खेळाची धुरा श्री चौधरी सर, लंगडी खेळाची धुरा लंगडी खेळाची धुरा सौ लांबट मॅडम वैयक्तिक खेळाची धुरा सौ राऊत मॅडम आट्यापाट्या खेळाची धुरा चौधरीसर व मनोरंजक खेळाची धुरा सौ राऊत मॅडम यांच्याकडे सोपवली त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रम पूर्वतयारी सौ राऊत मॅडम व श्री चौधरी सर यांच्याकडे सोपवली तसेच आठवड्यातून दोन तासिका सामूहिक कवायत परेड लेझीम व डंबेल्स , मनोरे इत्यादी क्रीडा प्रकारासाठी राखून ठेवल्या. शाळेची कनिष्ठ चम्मू व वरिष्ठ चमू यांनी यांची दैनंदिन खेळाच्या सरावातून निवड केली. निवडलेले खेळाडू व इतर खेळाडू यांचा रोज सराव होऊ लागला.
- उच्च प्राथमिक वर्गाला क्रीडा तासिका कमी असल्यामुळे त्यांच्या सरावाची थोडी अडचण निर्माण झाली . त्यामुळे शाळेच्या व्यतिरिक्त वेळेमध्ये उदाहरणार्थ सुट्टीनंतरची व शाळेपूर्वीची वेळ ठरवून दिली. या वेळेमध्ये हे विद्यार्थी घरून येऊन शाळेच्या प्रांगणात उत्स्फूर्तपणे सराव स्वयंप्रेरणेने करतात. वरच्या वर्गातील मुले खालच्या वर्गातील मुलांचा सराव घेण्यास मदत करतात. शारीरिक शिक्षण विषयासाठी काही विषय मित्रांची नेमणूक करून ते मुलांची सामूहिक कवायत छोट्या शर्यती व सांघिक खेळाचा सराव करतात सराव घेतात . त्यामुळे निवडलेल्या चमूचा सराव घेण्यासाठी शिक्षकांना वेळ मिळतो.

- गाव हे क्रीडाप्रेमी आहे. त्यामुळे आमच्या नियोजनामध्ये आम्ही गावकऱ्यांचा देखील सहभाग घेतलेला आहे . शाळेतील माजी विद्यार्थी तसेच काही स्वयंसेवक कुमारी पूजा डोमके , काही क्रीडा प्रेमी पालक यांच्यावर सुट्टीच्या दिवसात सराव घेण्याची जबाबदारी सोपवलेली आहे .त्यामुळे सुट्टीच्या दिवशी हे स्वयंसेवक शाळेच्या प्रांगणात येऊन विद्यार्थ्यांचा सराव घेतात .त्यामुळे गावाचे सहकार्य तर लाभतेच पण पालकांच्या मनात शाळेबद्दल आत्मीयता

निर्माण होते. शाळेतील चमूदेखील अतिशय चुरशीने व जिद्दीने सराव करतात. स्वयंसवक नेमल्यामुळे आमच्या वेळेची अडचण दूर होऊन प्रत्येक खेळाचा यथायोग्य सराव होत आहे.

- दुसरी महत्वाची अडचण म्हणजे शाळेचे ग्राउंड बांधकामामुळे व पावसामुळे खराब झालेले होते खेळण्यास योग्य नव्हते. ही अडचण आम्ही शाळा व्यवस्थापन समिती व शाळा परिसरातील स्वयंसेवी संस्था यांच्या मदतीने दूर केले . शाळेच्या परिसरात मोठे रिसॉर्ट आहे. त्यांच्या मालकांना भेटून शालेय साहित्य क्रीडा साहित्य आम्ही मागवले. यामध्ये लेझीम डंबेल्स बॅडमिंटन रॅकेट हॉलीबॉल इत्यादी साहित्य आम्हाला मिळाले गावातील शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने शाळेमध्ये मुरूम टाकून मैदान समतल केले.स्वयंसेवकांची मदत घेऊन संपूर्ण ग्राउंड स्वच्छ केले व आता ते मुलांना खेळण्यास योग्य झालेले आहे शाळेत कबड्डी लंगडी आट्यापाट्या या मैदानांची आखणी केली विद्यार्थ्यांचा नियमबद्ध सराव करता यावा म्हणून स्वयंसेवकांना शाळेतील शिक्षकांनी प्रशिक्षित केले. निवडलेल्या चमुनागावातील मोठ्या मुलांच्या टीम सोबत खेळण्याची संधी दिली.
- व्हिडीओ क्लिप लिंक :
  - https://youtu.be/l6rpuUVHi4M
  - https://youtu.be/2wX0-vzqdfM
  - https://youtube.com/watch?v=SsD2Bsi33d4&feature=sharee

उपक्रमाचे स्वरूप :

शालेय क्रीडांगणाची उत्तम व्यवस्था झाल्यानंतर व कनिष्ठ वरिष्ठ चमू तयार झाल्यानंतर मग प्रत्यक्ष उपक्रम घेणे सुरू केले यामध्ये शारीरिक शिक्षणाच्या तासिकेमध्ये विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष स्पर्धाघेणे वेळ ठरवून कबड्डी लंगडी आट्यापाट्या ,धावणे याच्या प्रत्यक्ष स्पर्धा लावणे ,विजय चमूचे अभिनंदन करणे, कुस्तीच्या ग्राउंड वर शाळेतील इतर मुलांसोबत कुस्ती लावणे, धा वण्याची स्पर्धा घेणे ,रिले, 100 मीटर दौड, 200 मीटर दौड लांब उडी उंच उडी यासारखे खेळ क्रीडांगणावर घेणे सुरू केले . विद्यार्थ्यांना रोज सकाळी उठून गावामध्ये दौड मारण्यास सांगून दैनंदिन परिपाठामध्ये आज कोण कोण धावण्यास गेले याचा आढावा घेतला गेला.उन्हाळी शिबिरामध्ये सांघिकखेळासोबतच मनोरंजक खेळ साहसी खेळ डंबेल्स लेझीम मनोरे इत्या दी क्रीडा प्रकार घेतल्या गेले त्यामुळे या खेळाचे उत्तम पथक शाळेत तयार झाले. बँडवर परेड साठी उत्तम असे ड्रिल पथक त यार झाले आता विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यास चमू तयार झाला .

प्रत्यक्ष अंमलबजावणी :

खेळाच्या सरावाचा योग्य परिणाम मिळावा म्हणून वेळेचे नियोजन केले प्रत्येक शिक्षकाला आपल्या खेळाचे प्रशिक्षण मुलांना देता यावे म्हणून आठवडी दिवस वाटून दिले. म्हणजे त्या त्या दिवसा त ते शिक्षक आपल्या खेळाचा योग्यपणे सराव घेतील व इतर शिक्षक विद्यार्थ्यांच्या दैनंदिन बौद्धिक विकासाकडे लक्ष देतील.

- दहा ते पाच या वेळेव्यतिरिक्त दैनंदिन रोज सराव व्हावा म्हणून सकाळी नऊ ते दहा व सायंकाळी साडेपाच ते साडेसहा या वेळेत स्वयंसेवक व उत्साही पालक यांच्यावर खेळाची धुरा सोपविली. शाळेत वेगवेगळ्या कवयती सुद्धा बसविल्या जातात जसे लेझीम कवायत डंबेल्स कवायत बांबू कवायत चेंडू कवायत रिंग कवायत इत्यादी.
- अशा विविध कवायतींना विविध साहित्याचा पुरवठा होणे गरजेचे असते, पण आम्हाला ही अडचण आल्यास आम्ही लोकसहभागातून ही अडचण दूर करतो. यामध्ये बांबू कवायती करिता बांबू आमच्या शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष माननीय बाबारावजी ठाकरे यांनी उपलब्ध करून दिले. रिंग कवायतीसाठी तुळसाबाई कोहळे यांनी त्यांच्या मुलाला लोखंडी रिंग वेल्डिंग करून मागितल्या. लेझीम व डंबेल्स कमी होते तेव्हा आय. एम. टी. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शाळा भेटीमध्ये आम्हालाही साहित्य पुरवले संपूर्ण गाव हे क्रीडाप्रेमी असल्यामुळे आम्ही मागू ती मदत करण्यास आमचे गावकरी नेहमीच तत्पर असतात, त्यामुळे वैविध्यपूर्ण क्रीडा प्रकार आम्ही शाळेत घेण्याचा प्रयत्न करत असतो.

फलनिष्पत्ती :

- आम्ही केलेल्या क्रीडा विषयातील नियोजनानंतर आमचे शाळेला क्रीडा क्षेत्रात भरघोस यश प्राप्त झाले. शाळेला कनिष्ठ आणि वरिष्ठ अशा दोन्ही चम्मू तयार असल्यामुळे केंद्रस्तरीय तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत आमचे चमू यशस्वी झाले .
- सत्र 2017 -18 मध्ये बाल मेळाव्यामध्ये तालुकास्तरावर उत्कृष्ट अशा डंबेल्स कवायतीचे सादरीकरण करून बक्षीस मिळवले. सत्र 2018 -19 व व 19 - 20 या दोन्ही वर्षी सलग आमच्याच जिल्हा क्रीडा स्पर्धेमध्ये कबड्डी या खेळात उपविजेता ठरल्या. तसेच कुस्ती या क्रीडा प्रकारात शाळेतील विद्यार्थी पवन हेलोंडे,प्रितम हेलोंडे जिल्हास्तरापर्यंत यश प्राप्त करत पोहोचले. वैयक्तिक स्पर्धेत धावण्याच्या स्पर्धेत शाळेची विद्यार्थिनी सलग दोन्ही वर्षे जिल्हास्तरावर विजयी व उपविजेयी ठरल्या. 2023 मध्ये सुद्धा ज्ञानेश्वर भडंग वर्ग आठवा हा विद्यार्थी 28 किलो या गटात उपविजेयी ठरला. 2018 - 19 मध्ये खंड स्तरीय क्रीडा स्पर्धेत शाळेच्या लेझीम पथकाने दिमाखदार संगीतमय सादरीकरण केले. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या प्रमाणबद्ध लेझीमचे कौतुक केले.
- शाळेचे उत्कृष्ट ड्रिल पथक असून दैनंदिन कवायत करताना कदम ताल मानवंदना इत्यादी प्रकार देखील विद्यार्थी अतिशय यशस्वीपणे सादर करतात. यावर्षी जिल्हा क्रीडा स्पर्धा 2023 मध्ये आमच्या शाळेने मानवंदना पथक व परेडचे सादरीकरण करून उद्घाटनीय मानवंदना दिली. त्याचप्रमाणे जिल्हा क्रीडा सांस्कृतिक स्पर्धेमध्ये कनिष्ठ नृत्य मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला. याच वर्षीतालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत कनिष्ठ व वरिष्ठ नृत्याला प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त झाला तसेच नक्कल या प्रकारामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.याचप्रमाणे पुढे देखील असेच प्रयत्न सुरू ठेवून शाळेचा नावलौकिक वाढेल या दृष्टीने विद्यार्थ्यांना क्रीडा व सांस्कृतिक प्रकारामध्ये यशस्वी करू असा आम्हाला आत्मविश्वास आहे.
- क्रीडाक्षेत्र व इतरही क्षेत्रातील यशस्विता पाहून आमच्या शाळेचा पट सलग तीन वर्षे वाढलेला आहे
    - सत्र 2019- 20 मध्ये शाळेचा पट 67 होता.
    - सत्र 2022-23मध्ये शाळेचा पट 93 आहे
- शाळेच्या यशस्वी कामगिरीची गाथा आम्ही व्हिडिओच्या माध्यमातून पालकांच्या व्हाट्सअप ग्रुप वर व यूट्यूब चैनल वर वेळोवेळी सादर करीत असतो त्यामुळे पालकांच्या मनात शाळेबद्दल विश्वास आदर व सहकार्याची भावना निर्माण झालेली आहे शाळेला मदत करण्यास ते सदैव तत्पर असतात यावर्षी तर अतिशय अभिमानाने शाळेच्या विजयी चमूची स्वयंप्रेरणेने गावकऱ्यांनी मिरवणूक काढून शाळेबद्दलचे आपले प्रेम व्यक्त केले ले आहे . शाळेच्या विविध बक्षिसांची दर्शनी भागात आकर्षक पद्धतीने व अभिमानाने रचना केलेली आहे जेणेकरून शाळेत येणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांच्या मनात प्रेरणा निर्माण होईल.





डाखरीच्या शाळेचे एक पाऊल पुढे : पंचायत समिती अधिकाऱ्यांची भेट, उपक्रमांची प्रशं

व्यक्तिमत्त्व घडविणारी जि.प.शाळ



कला सादर करताना विद्यार्थी



लेझीम कवायत सादर करताना

समारोप :

आमची जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ही क्रीडा क्षेत्रात अनेक आघाड्यांवर यश प्राप्त करीत असल्यामुळे शाळेची पटसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. खाजगी शाळेतील विद्यार्थी देखील आमच्या शाळेत परत आलेले आहेत. आम्ही या कालावधीत चार पालक सभा घेतल्या व पालकांचे अभिप्राय मागवले, तेव्हा बालकांनी अतिशय समाधानकारक अभिप्राय दिले खाजगी शाळेपेक्षाही या शाळेत विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत आम्हाला समाधान आहे असे पालक बोलतात तेव्हा खरोखरच आमच्या मेहनतीचे फळ आम्हाला मिळते.

व्हिडीओ क्लिप लिंक :

https://youtube.com/watch?v=cfDB1JTdOA4&feature=share

https://youtu.be/y1_8Z2xRJKE

https://youtube.com/watch?v=LoOV1bCi-kk&feature=share

https://youtube.com/watch?v=GwVakNbVGd8&feature=share

https://youtube.com/watch?v=cfDB1JTdOA4&feature=share

===== @ =====

14. सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्तेचा विकास

शाळेचे नाव :- जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ,थुगाव निपाणी,ता. नरखेड, जिल्हा नागपूर
इ मेल :- dhananjaypakade2280@gmail.com
मुख्याध्यापकाचे नाव :- श्री धनंजय नारायणराव पकडे
शाळेचे व्यवस्थापन : जिल्हा परिषद



प्रस्तावना :-

नागपूर जिल्ह्याच्या वायव्येस ८६ किलोमीटर अंतरावर मध्यप्रदेश सीमेलगत असलेल्या नरखेड तालुक्यातील सरासरी ९०० लोकसंख्या असलेल्या थुगाव निपाणी येथील इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतची शाळा. शैक्षणिक सत्र २०१८-१९ मध्ये ४६ असलेली विद्यार्थी संख्या मुख्याध्यापक म्हणून मनाला खटकत होती, गावातील शाळेत शिक्षणाचे पोषक वातावरण नाही अशी झालेली पालकांची भावना पुसून काढल्याशिवाय यश मिळणार नाही हा विचार पुढे आला. **'To give challenge is a bigger challenge' & 'Silent sea cannot create a skillful mariner.'** या वचनाला अनुसरून विद्यार्थ्यांमध्ये Creative Thinking, Critical Thinking, Collaboration, Communication, Compassion and Community या अध्ययन कौशल्यावर आधारित शिक्षण व्यवस्था शाळेतर्फे राबविण्याचा हेतू पुढे ठेऊन खाली नमूद केलेले निरनिराळे उपक्रम शाळेत राबविण्यास सुरुवात केली.

१) बालसंस्कार शिबिराचे आयोजन :-

सहशालेय उपक्रमाच्या अनुषंगाने शाळेच्या वतीने २०१८-१९ पासून प्रत्येक शैक्षणिक सत्राच्या शेवटी नि:शुल्क उन्हाळी बालसंस्कार शिबीराचे आयोजन केले जाते. ज्यात दिवसभरात शारीरिक तथा बौद्धिक सत्राच्या माध्यमातून मार्शल आर्ट आणि योग प्राणायाम पासून ते कॅलीग्राफी , क्राफ्ट, नृत्य, नाट्य, रांगोळी, मातकाम, व चित्रकला यासारखे अनुभव त्या त्या क्षेत्रातील निपुण असलेल्या अध्यापकांच्या मार्गदर्शनात दिले जातात. ज्यातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देउन शाळेच्या पट संख्येतील प्रत्येक व्यक्तिमत्व हेरणे शक्य होते. शाळेच्या या उपक्रमाचा फायदा असा झाला की, इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून मराठी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थी प्रवेशित झाली.




बालसंस्कार शिबिरात विविध कृती



बालसंस्कार शिबिर

२) अतिरिक्त स्पर्धा परीक्षा वर्गाचे नियोजन :- शाळेत अपुरी शिक्षक संख्या असल्यामुळे शालेय कामकाजाच्या कालावधीत अध्यापन तासिकांचे नियोजन करतानाच स्पर्धा परीक्षेकडे नियमित लक्ष केंद्रित करणे अशक्य होते. तेव्हा विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यात चुरस निर्माण व्हावी या अनुषंगाने शाळा सुटल्यानंतर एक ते दीड तासाचे नियमित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग शालेत नियमित सुरु केले. त्याचा परिपाक म्हणून २०२०-२१ मध्ये कोरोना काळात शाळा बंद असताना देखील दोन विद्यार्थिनी नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेत निवड होऊन नवोदय विद्यालयात प्रवेशित झाल्या.सोबतच NMMS परीक्षेत जिल्ह्यातून पहिला येण्याचा मान विद्यार्थ्याने पटकावला.

३) ग्रेट भेट- एक मुलाखत :- समाजातील यशस्वी व्यक्तींचा जीवनपट त्यांच्याच शब्दात उकल करून त्यांच्या आयुष्यातील आलेल्या अनुभवावरून विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचा एक प्रयत्न म्हणून 'ग्रेट भेट -एक मुलाखत' हा उपक्रम शाळेत राबविला जात आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, तथा प्रशासकीय अश्या बहुआयामी व्यक्तिमत्वांची उकल विद्यार्थी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून करतात. ग्रामीण भागातील सरपंचापासून ते जि. प. नागपूर चे मुख्य कार्यकारी अधिकारी मान. श्री योगेश कुंभोजकर सर यांची घेतलेली मुलाखत ही विद्यार्थ्यांना एक वेगळीच अनुभूती देत असते.अपर आदिवासी आयुक्त नागपूर, मा. रवींद्र ठाकरे (भा.प्र. से.), पोलीस उपअधीक्षक मा. नागेश जाधव यांच्यासह केवळ आपल्याच परिसरातील नाही तर अगदी अमेरिकेतील मूळ भारतीय पर्यावरण तज्ञ डॉ. संगीता तोडमल यांची सुद्धा मुलाखत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने घेतली.या माध्यमातून व्यासपीठावर मत मांडण्याची शालेय जीवनापासूनची तयारी सहजपणे साधली जात आहे.



https://youtu.be/v_mVxY9nQxo


लोकमत

जि.प.च्या विद्यार्थ्यांनी सीईओंची घेतली इंग्रजीत मुलाखत!

सीईओ म्हणाले, यूपीएससीची मुलाखत कठीण होतीच, पण विद्यार्थ्यांचेही प्रश्न काही सोपे नव्हते

४) विद्यार्थी बचत बँक निर्मिती :- विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबत व्यवहार ज्ञान प्रात्यक्षिक स्वरुपात देण्याच्या हेतूने ' पणती विक्री उपक्रम ' राबविला गेला. दिवाळी सणाच्या सुट्यांमध्ये विद्यार्थ्यांना नवीन ज्ञान देण्याच्या अनुषंगाने कच्चा माल खरेदी करून त्यावर सजावट करून शालेय परिसरात पणती विक्री करण्यात आली आणि पहिल्याच उपक्रमात विद्यार्थ्यांनी ६४०० रुपयांचा नफा अवघ्या दोन दिवसात मिळविला. तो नफा विद्यार्थ्यांना वितरीत कसा करावा या प्रश्नाच्या उत्तरातून ' उन्नती विद्यार्थी बचत बँकेचा जन्म ११ ऑगस्ट २०१९ रोजी झाला ज्यात तिसरी ते आठवीचे बारा संचालकांचे संचालक मंडळ असून विद्यमान अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव यांच्या माध्यमातून दैनंदिन व्यवहार पार पाडले जातात.कॅशबुक, लेजर नोंदीची कामे शालेय अभ्यासाच्या वेळा सांभाळून सचिव सहजपणे करतात. आजमितीला एकूण १०५ खातेदार असून सर्वांचे मिळून बँकेत ६९७६० रुपये जमा असून हा सर्व व्यवहार

विद्यार्थीच सांभाळतात. बँकेतील सर्व प्रकारच्या व्यवहारांचा अनुभव विद्यार्थ्यांना या उपक्रमाच्या माध्यमातून दिला जात आहे. अगदी जमा रकमेवर त्रैमासिक व्याज आकारणी सुद्धा बँकेचा सचिव स्वतः करतो.







बचत बँक उपक्रमात सहभागी विद्यार्थी

५) आंतरराष्ट्रीय भाषा अवगत करणे :- कोरोना काळात जेथे सर्व जग थांबलेले असतांना शिक्षणाची दारे प्रत्यक्ष बंद असताना विद्यार्थ्यांना मान. नंदकुमार साहेब भा. प्र. से. यांच्या कल्पनेतील भविष्यवेधी शिक्षण पद्धतीची माहिती दिली गेली. आणि यू ट्यूब च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय भाषा शिकता येते हा विश्वास त्यांच्या मनात निर्माण झाला. आणि आंतरराष्ट्रीय भाषा अवगत करण्याची वाटचाल जपानी भाषेपासून सुरु झाली. आज पहिल्या वर्गातील विद्यार्थीसुद्धा जपानी भाषेतील संख्यावाचन, आणि शिष्टाचार सहजपणे बोलतो. पाचवी पासून पुढचे विद्यार्थी अस्खलितपणे एकमेकांशी जपानी भाषेतून संभाषण करतात. आठवड्यातील एक दिवस परीपाठातील संपूर्ण आदेश हे जपानी भाषेतून दिले जातात. यासोबतच सध्यस्थितीत भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील काही शाळा डॉ. सुयश चव्हाण (भा. प्र. से.) जे जर्मनीतील म्युनिच शहरात भारतीय दुतावासात कार्यरत आहेत. त्यांच्या पुढाकाराने जर्मन संस्कृतीची देवाण घेवाण करत आहेत. त्यात जि. प. उच्च प्राथ. शाळा थुगाव नि. सहभागी आहे. या माध्यमातून विद्यार्थी जर्मन भाषा अवगत करत आहे.

फलनिष्पत्ती

सन	पटसंख्या	झालेली वाढ
२०१८-१९	४६	-
२०१९-२०	५३	०७
२०२०-२१	८९	२३
२०२१-२२	१००	५४
२०२२-२३	१०२	५६

समारोप

या सर्व उपक्रमाला लोकसहभागाची जोड सहज लाभलेली आहे. लोकसहभागाच्या माध्यमातून शाळेला २०१९-२० मध्ये २,३०,०००रु. व २०२१-२२ मध्ये १,७०,०००रु. निधी संकलित करून शाळा विकासाचे स्वप्न साध्य केल्या जात आहे. 'गावाला शाळेचा अभिमान- शाळेला गावाचा आधार' या उक्तीनुसार स्वप्नातील एक शाळा घडविण्याकडे शाळेची वाटचाल सुरु आहे.





15. शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेतील यश

शाळेचे नाव व पत्ता – महानगर पालिका शाळा क्र.४९ मॉडेल स्कूल,जेलरोड, नाशिकरोड, नाशिक

इ मेल – nmcschool49@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव – श्री.किरण सदाशिव मोरे

शाळेचे व्यवस्थापन – महानगरपालिका

प्रस्तावना :

' ज्ञानाचा सागर म्हणजे शाळा,

संस्काराचा गोड झरा म्हणजे शाळा,

व्यक्तिमत्व विकासाचे वेगळे वळण म्हणजे शाळा,

मौजमस्तीचा वेगळाच थाट म्हणजे शाळा.'

शाळेतूनच सुरू होते विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आत्मविश्वासाला चालना. कारण शाळेतून मिळणारे शिक्षण ही आपल्या सभोवतालच्या गोष्टींबद्दल शिकण्याची प्रेरणा व प्रक्रिया आहे. शिक्षण हे एकमेव उन्नतीचे साधन आहे. प्रत्येकाच्या उत्कृष्टतेसाठी शिक्षण आवश्यक आहे. शिक्षण ही सर्वात महत्त्वाची यंत्रणा आहे, जी व्यक्तीच्या जीवनासह व्यक्तीच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावते आणि मग कोरोना सारख्या जागतिक संकटामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी अस्वस्थता निर्माण झालेली असतानाही कोरोनामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात बाधा येऊ न देता विद्यार्थी हा शिक्षणाच्या मूलभूत हक्कांपासून वंचित राहू नये म्हणून सर्वच पातळीवर प्रयत्न सुरू होते.

आव्हान :

महानगरपालिका क्षेत्रात आमच्या शाळेत येणारा विद्यार्थी हा कष्टकरी गरीब पालक वर्गाचा असल्यामुळे शाळा बंदच्या काळात या समाज घटकांतील मुलांचे शिक्षण अखंडपणे चालू राहण्यासाठी विद्यार्थ्यांच्या आजच्या काळातील आव्हान व गरजा लक्षात घेऊन सर्व पर्यायी मार्ग शोधत सर्व शिक्षकांनी आपल्या पद्धती विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञान पोहोचवण्याचे आव्हान होते .

विविध स्पर्धा परीक्षांची तयारी :

शिष्यवृत्ती परीक्षा :

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद मार्फत घेण्यात येत असलेल्या इयत्ता पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षा दरवर्षी कमाल विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट केले जातात आणि शाळेतील यशाचा झेंडा उंचावण्यासाठी शिक्षकांना विद्यार्थी योग्य ती साथ देतात आणि यश संपादन करतात. प्रत्येक वर्षी इयत्ता पाचवी व आठवीचे विद्यार्थी स्कॉलरशिप परीक्षेत यश संपादन करताना दिसून येत आहे.





पारितोषिक स्वीकारताना विद्यार्थी




एन.एम.एम.एस. परीक्षा :

एन.एम.एम.एस. परीक्षा म्हणजे राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणारी शिष्यवृत्ती योजना आहे .या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना वार्षिक 12000 एवढी शिष्यवृत्ती सलग चार वर्ष म्हणजे आठवी ते बारावी पर्यंत एकूण 48 हजार रुपये मिळते. म्हणूनच आमच्या शाळेतील येणाऱ्या विद्यार्थी हा आर्थिक दुर्बल घटकातील असल्यामुळे सहाजिकच शिक्षक या संधीचा फायदा घेतात .प्रत्येक वर्षी विद्यार्थी या परीक्षेत प्रविष्ट होतात आणि या संपादन करतात. सतत मागील काही वर्षांपासून शिक्षकांच्या मेहनतीला विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांना साथ मिळाली आणि विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आहे.


पंचक शाळेतील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

नाशिक : प्रतिनिधी

जेलरोड येथील महापालिकेच्या पंचक शाळेतील सात विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविले. या शिष्यवृत्तीअंतर्गत विद्यार्थ्यांना इयत्ता १२ वीपर्यंत मासिक १ हजार रुपये मिळत असतात. याचा आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना चांगला उपयोग होत असतो.

यासर्व विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे किरण वाघमारे, मुख्याध्यापक विद्युत नगरे, केंद्रप्रमुख गोपाल बेरगी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. पंचक शाळेतील विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये आपला ठसा उमटत असल्याचे दिसत आहे. यामाही त्यांना शाळेतील शिक्षकांचे योग्य मार्गदर्शनाचा फायदा होत असल्याचे वारंवार दिसून येत आहे.

विविध सांस्कृतिक कार्यक्रम असो किंवा स्पर्धा पंचक शाळेचा सहेब सहभाग पहावयास मिळतो. राजरत्न बंजारे, सार्थक भगवान नेटारे,

काजल वाल्मिक पंडित, आरती जानेश्वर मोहिते, निकिता सुनील पवार, सुमेध दत्तात्रय भवरे, शुभांगी रमेश आव्हाड या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवले असून, त्यांचे मुख्याध्यापक, शिक्षकांकडून अभिनंदन करण्यात आले आहे.


दिव्य मराठी विशेष

मजुराचा मुलगा सार्थक चमकला शिष्यवृत्ती परिक्षेच्या गुणवत्ता यादीत


नाशिक : सार्थक नेटारे याचा सत्कार करताना पदाधिकारी.

सार्थक नेटारेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

नाशिक : सायट्रिक, पंचक येथील महापालिका शाळा क्रमांक ४९ चा विद्यार्थी सार्थक नेटारे याने शिष्यवृत्ती परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. मुख्याध्यापक लभडे यांनी त्याला ११ हजारांचे वैयक्तिक बक्षीस जाहीर करून प्रोत्साहन दिले. सार्थकच्या यशाबद्दल शिक्षण समिती सभापती प्रा. सरिता सोनवणे, शिक्षण अधिकारी देवीदास महाजन, उपसभापती प्रतिभा पवार यांनी अभिनंदन केले. महापालिका आयुक्त राधाकृष्ण गमे यांनी सार्थक, शिक्षिका किरण वाघमारे, मुख्याध्यापक कैलास लभडे आदींचा सत्कार केला.

डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा:

विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लावणे , त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे , विज्ञानात विशेष प्रतिभा असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे आणि त्यांना प्रोत्साहित करणे यासाठी बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळ सन 1981 पासून डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा आयोजित करीत आहे. या स्पर्धेचा विद्यार्थ्यांना लाभ मिळावा व त्यांच्यातील जिज्ञासेला चालना मिळावी म्हणून विद्यार्थी या परीक्षेत प्रविष्ठ केले जातात. मागील वर्षी विद्यार्थ्यांनी यश संपादन करण्याचा प्रयत्न केला आहे.


होमी भाभा वैज्ञानिक स्पर्धेत मनपाच्या विद्यार्थ्यांचे यश

प्रतिनिधी । नाशिकरोड


मनपा शाळेचे यश

नाशिकरोड : डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत महापालिकेच्या जेलरोड येथील शाळा क्रमांक ४९ चा शंभर टक्के निकाल लागला. या परीक्षेला शाळेचे आठ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यात सार्थक नेटार आणि राजरत्न बंजारी हे दोन विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले. काजल पंडित, निकिता पवार, श्रद्धा नागरे, प्राजक्ता काळे, आकाश विश्वकर्मा आणि रागिनी यादव हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा :

जवाहर नवोदय विद्यालय मध्ये इयत्ता सहावी साठी प्रवेश घेण्यासाठी दरवर्षी प्रवेश परीक्षेचे आयोजन केले जाते. ही परीक्षा जवाहर नवोदय विद्यालय स्कूल टेस्ट जी. एन. व्ही. एस. टी. या नावाने ओळखले जाते . या शाळेत प्रवेश मिळाला म्हणून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षक गुणवत्तापूर्ण विद्यार्थी निवडून त्यांचा स्वतंत्र अभ्यास करून पूर्ण करून त्यांची तयारी घेतात.








समारोप:

'उडत्या पाखरांना परतीची तमा नसावी,

नजरेत नेहमी नवी दिशा असावी,

घरट्याचं काय केव्हाही बांधता येईल,

क्षितिजापलीकडे झेप घेण्याची मनात जिद्द असावी.'

ह्या प्रमाणे प्रत्येक शिक्षक जे सर्वोच्च आणि उत्तमोत्तम आहे ते आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील असतात आणि अशा शिक्षकांच्या हातून तयार झालेला विद्यार्थी हा जीवनातील कोणत्याही स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी डगमगत नाही.

===== @ =====

16. लोकसहभागातून विध्यार्थी विकास , माझी शाळा मी शाळेचा

शाळेचे नाव : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लिमटेक , लिमटेक , ता. बारामती, जि. पुणे

ई-मेल आयडी : zpslimtek@gmail.com

मुख्याध्यापकांचे नाव : श्री बजरंग रामचंद्र जाधव

शाळेचे व्यवस्थापन : जिल्हा परिषद



प्रस्तावना :

ग्रामीण भागातील शाळेत शहरी भागातील शाळेसारख्या सर्व सुविधा मिळण्यासाठी, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी तसेच आनंददायी वातावरणासाठी शाळेमध्ये सर्व भौतिक सुविधा असणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील भौतिक सुविधांचा अभाव तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लिमटेक ही शाळा मुख्य गावात नसून वस्तीवर आहे .या शाळेसाठी पायाभूत सुविधा या शासनाकडून कमी प्रमाणात मिळत असल्यामुळे इयत्ता पहिली ते सातवीच्या मुला मुलींसाठी बहुतेक सुविधांचा अभाव जाणवत होता.

आव्हाने :

1.विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी शाळेत मुला मुलींसाठी स्वच्छ स्वतंत्र शौचालय असावे .

2.विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण घेण्यासाठी संगणक कक्ष असावा .

3.शालेय वातावरण आनंददायी होण्यासाठी शालेय इमारत बोलक्या चित्रांनी युक्त असावी.

4.शालेय परिसरात बाग असावी .

5.शालेय इमारत सुरक्षित असावी.

6.शालेय विद्यार्थ्यांना विविध स्पर्धेत भाग घेण्यासाठी आवश्यक साहित्य असावे .

7.विद्यार्थ्यांना स्वच्छ पाणी पिण्यासाठी उपलब्ध व्हावे.

उपक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी

शालेय वातावरण आनंददायी व सर्व सुविधांनी युक्त असे होण्यासाठी प्रथमत: शाळेतील ज्या महत्त्वाच्या गरजा आहेत त्या गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शाळेतील शिक्षकांचे व गावातील प्रतिष्ठित व्यक्ती ,पालक यांच्याशी असलेले नाते हे अतिशय महत्त्वाचे असते. शाळेने क्रीडा, सांस्कृतिक तसेच गुणवत्ता याबाबतीत केलेल्या कामाची दखल घेऊन शाळेतील शिक्षक मुख्याध्यापक हे गावातील ठराविक व्यक्तींकडे पोहोचले आणि आपल्या गुणवत्तेच्या आधारे गावातील लोकांशी संपर्क करून शाळेला आवश्यक असणाऱ्या गोष्टींची गरज व त्याचे महत्त्व समजावून सांगितले आणि त्यातूनच काही लोकांनी शाळेला मदत करण्याचे ठरविले. शाळेसाठी सर्वात महत्त्वाची जी गरज होती ती म्हणजे मुला मुलींसाठी स्वतंत्र शौचालय याचाच आधार घेऊन शाळेचे मुख्याध्यापक ,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तसेच शिक्षणप्रेमी यांनी परिसरातील पियाजियो व्हेईकल्स कंपनीच्या व्यवस्थापकांशी संपर्क करून सतत पाठपुरावा करत राहिल्याने शाळेस सहा लाख रुपयांचे सर्व सुविधांनीयुक्त असे शौचालय मिळाले. तसेच याच कंपनीने शाळेची गुणवत्ता पालक व शिक्षकांचे नाते नियोजन याची पाहणी करता शाळेस दोन लाख रुपये किमतीचा फिल्टर व ई लर्निंग संच शाळेत भेट दिला . शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातील मुलांनाही संगणकाचे शिक्षण मिळावे या हेतूने शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक

यांनी गावातील लोकांना याची कल्पना दिली. याची दखल घेऊन गावातीलच सामाजिक कार्यकर्ते श्री अशोक ढवाण पाटील यांनी संपूर्ण दहा संच असणारा संगणक कक्ष शाळेत बनवून दिला आज त्यामध्ये सर्व विद्यार्थी शिक्षण घेत आहेत .





लोकसहभागातून संगणक कक्ष बोलक्या भिंती

शालेय वातावरण आनंददायी होण्यासाठी शालेय भिंतीचे रंगकाम व बोलक्या भिंती असणे आवश्यक होते यासाठी गावातीलच उद्योजक श्री बाळासाहेब मदने यांनी शाळेसाठी दोन लाख दहा हजार रुपये किमतीचे रंगरंगोटीचे कामकाज करून दिले आणि संपूर्ण शाळा बोलक्या भिंती युक्त झाली .

अशाच पद्धतीने शाळेतील मुलांना जेवणासाठी किंवा शाळेत शाळेतील गोरगरीब मुलांसाठी वह्या लेखन साहित्य तसेच सांस्कृतिक कार्यक्रमासाठी आवश्यक असणारे गणवेश व वाद्य साहित्य लोकांनी शाळेस भेट दिले वरील सर्व वस्तूंची किंमत अंदाजे 15 लाखापर्यंत झाली आहे आणि हा सर्व लोकसहभाग हा एक वर्षातील आहे .या लोकसभागामुळे विद्यार्थ्यांचा मानसिक, शारीरिक ,भावनिक विकास होण्यासाठी फायदा होणार आहे.

फलनिष्पत्ती :

लोकसभागातून शौचालय निर्मिती संगणक कक्ष निर्मिती वाचन कक्ष निर्मिती पिण्याच्या पाण्यासाठी फिल्टर बोलक्या भिंती मुलांच्या जेवणासाठी डिश तसेच लेखन व वाद्य साहित्य यांची पूर्तता झाल्याने इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी आरोग्याच्या सुविधा उपलब्ध झाल्या. तसेच संगणक शिक्षण मिळाल्याने आनंददायी वातावरण निर्माण झाले आहे .परिणामी परिसरातील मुलांचा या शाळेकडे येण्याचा कल वाढला आहे मिळालेल्या मदतीच्या आधारे शाळेतले विद्यार्थी कला क्रीडा क्षेत्रात तालुका व जिल्हा स्तरापर्यंत पोहोचले आहेत.

===== @ =====

17. क्रीडा क्षेत्रातील यश (खो-खो)

शाळेचे नाव : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेवस्ती (पळसदेव),ता. इंदापूर,जिल्हा :- पुणे.

ई मेल आय डी : eschoolshindewasti@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव : थी. उन्मेश रंगनाथ कुचेकर

शाळेचे व्यवस्थापन : जिल्हा परिषद.

प्रस्तावना :-

यशवंतराव चव्हाण कला क्रीडा महोत्सव २०२२ अंतर्गत विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन शाळा, केंद्र, बीट, तालुका स्तरावर करण्यात आले. कोरोना परिस्थिती नंतर प्रथमच खूप मोठ्या व्यत्ययानंतर स्पर्धेची तयारी करणे कठीण काम होते.तथापि अनेक शाळांनी अविरत मेहनत, परिश्रम घेऊन विविध स्पर्धांसाठी संघ व खेळाडू तयार केले. यावर्षी प्रथमच खो-खो या खेळाचा समावेश इयत्ता पहिली ते पाचवी या लहान गटासाठी करण्यात आला होता. मुळात लंगडी सारखे खेळ खेळणारी मुले खो-खो सारखा किचकट नियम आधारित खेळ खेळू शकतील आणि खेळली तरी प्राविण्य दाखवू शकतील आणि हा खेळ आत्मसात करू शकतील याबाबतीत साशंकता होती. परंतु अनेक संभ्रम, साशंकता असूनही जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेवस्ती या शाळेने हा खेळ आत्मसात केला आणि केंद्र, बीट, तालुका स्तर स्पर्धांमध्ये घवघवीत यश मिळवले. या यशामध्ये शाळा व्यवस्थापन समिती शिंदेवस्ती, ग्राम पंचायत पळसदेव, केंद्रप्रमुख तथा बीट विस्तार अधिकारी श्री हनुमंतजी देवकाते साहेब, BRC इंदापूर विषयतज्ञ श्री. दिपक नरुटेसर, मुख्याध्यापक श्री. उन्मेश कुचेकरसर सहशिक्षक श्री. राहुल कानगुडेसर यांनी योगदान दिले.

मुख्याध्यापक शिक्षक यांना आलेल्या अडचणी व केलेले नियोजन व उपाययोजना :

माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आयुष प्रसाद साहेब यांनी निर्गमित केलेल्या आदेशानुसार स्पर्धेचे वेळापत्रक निर्धारित करण्यात आले. लहान गटासाठी खो-खोचा समावेश अनपेक्षित तेवढाच आनंददायी वाटला. केवळ ३ महिन्यात मुलांना खेळ शिकवणे ,त्यात प्राविण्य मिळवणे यासाठी उपलब्ध वेळेत अनेक बाजूने तयारी करण्यासठी व्यापक आणि सर्वसमावेशक धोरण ठरवण्यात आले. अनेक डील्स कार्यशाळा मधून घेतले गेले त्यासाठी सुयोग्य नियोजन ठरवण्यात आले.

स्पर्धेसाठी असणारा वयोगट व इयत्ता :

विद्यार्थ्यांचा इयत्ता निहाय गट पहिली ते पाचवी असल्याने इयत्ता पहिली ते चौथीच्या शाळा स्पर्धेअगोदरच काहीशा मागे पडताना दिसून आल्या. कारण कोणताही खेळ सर्वात अगोदर शारीरिक क्षमतेनुसार खेळला जातो. आणि नंतर कौशल्य आधारित कृती अर्थात ज्यांची क्षमता जास्त त्यांची विजयी होण्याची शक्यता जास्त असे असताना देखील खचून न जाता अधिकचा सराव हा मूलमंत्र जपला .

शाळेची कमी पटसंख्या :

खो-खो मुले आणि मुली स्वतंत्र संघ तयार करण्यासाठी १२ मुले आणि १२ मुली आवश्यक असतात. अधिक पट संख्येच्या शाळांना चपळ, वेगवान उंचपुरी मुलांची निवड करण्याची संधी असते. तथापि कमी पटाच्या शाळांना निवडीची संधी राहत नाही. आमच्या शाळेचा एकूण पटच ३५ आहे .त्यातून २४ मुले मुली निवडणे कठीण बनले. परंतु प्राप्त परिस्थितीत खचून न जाता आव्हानाला सामोरे जाण्याचे ठरवले.

शाळेच्या मैदानावर सराव करताना विद्यार्थी व्हिडीओ लिंक : https://youtu.be/daKBIKdD9Sw

सरावासाठी मैदानाचा अभाव :

शाळेच्या इमारती समोर परिपाठासाठी आवश्यक असे मैदान व मोकळी जागा आहे परंतु खो-खो सारख्या खेळासाठी आवश्यक निकष व मोजमाप असलेले मैदान उपलब्ध नव्हते. इमारतीमागे मैदानासाठी आवश्यक जागा होती परंतु ते समतल नव्हते. स्पर्धेसाठी राहिलेला अपुरा कालावधी लक्षात घेता त्या मैदानाची दुरुस्ती होणे आणि सतत पडणाच्या पावसामुळे त्या ठिकाणी खो-खो साठी आवश्यक मोजमापाचे मैदान बनवणे जिकीरीचे बनले, परंतु शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, ग्रामपंचायत सदस्य यांच्या सूचनेनुसार उपलब्ध असलेल्या छोट्या मैदानातच सराव करण्याचे ठरवले. मुलांचे खेळा प्रती असलेले समर्पण पाहून ग्रामस्थानी स्वतःहून लाल माती रातोरात भरून दिली. त्यासाठी श्रमदान करण्यासाठी स्वतःहून अनेक तरुण पुढे सरसावले .त्यामुळे खेळाडूंचा आणि शिक्षकांचा उत्साह वाढला. **पालकांचे प्रबोधन व प्रशिक्षक व्यवस्था:**

प्रत्येक गावामध्ये एका विशिष्ट खेळाकडे कल दिसून येतो त्या खेळाविषयी प्रेम किंवा आवड असते . आमच्या परिसरात कबड्डी या खेळाविषयी आवड असल्याने सर्वांचा कल तिकडेच जास्त दिसून येतो. खो-खो खेळाची आवड किंबहुना विशेष माहितीच कोणाला नव्हती. त्यामुळे साहाजिकच परिसरात खो-खो चे खेळाडू घडताना दिसून आले नाहीत. सर्वप्रथम पालकाना खेळाची माहिती देण्यात आली सुरुवातीला पालकांची खेळात विशेष रुची नव्हती. परंतु काही दिवसांनतर पालक शाळेजवळ रेंगाळू लागले. आवर्जून सराव शिबीरास भेट देऊ लागले. पालकांनी स्वतःहून खो-खो कीट मुलांना उपलब्ध करून दिले. प्रशिक्षका बाबत विशेष अडचण जाणवली नाही. शाळेतील उपशिक्षक श्री .राहुल कानगुडे स्वतः खो-खो खेळाडू असल्याने बाहेरून प्रशिक्षक बोलावण्याची गरज पडली नाही. शालेय स्तरावर विद्यापीठ खेळाडू म्हणून जिल्हा निवड चाचणी अशा प्रत्येक टप्प्यावरचा खेळाडू म्हणून अनुभव असल्याने मुलांमध्ये असलेल्या उपजत खेळाडूला आकार देण्याचे कार्य सरांनी समर्थपणे पार पाडले.

तालुका स्तर खो खो स्पर्धेमध्ये खेळताना चा व्हिडीओ : https://youtu.be/oF7OTYn9wg

अपुरे छोटे मैदानच ठरले यशाचे रहस्य :

ज्या पद्धतीने क्रिकेटसाठी नेटमध्ये सराव घेतला जातो अगदी त्याच धरतीवर खो-खो साठी अनोखी सरावाची शक्कल लढवली गेली. अपुरे मैदान असल्याने आपोआप चारही सीमा आकसल्या गेल्या ज्यावेळी संरक्षण करताना खेळाडू सीमांचे उल्लंघन करतील त्यांना बाद देण्याची पद्धत राबवली गेली आणि केवळ त्याचमुळे तालुका स्पर्धेत मुलींनी ३ मिनिट ४५ सेकंद संरक्षण करून दाखवले .केवळ रूट आणि रिंग पद्धतीने खेळण्याची पद्धत अंगीकृत केली गेली .याचा फायदा सर्व सामन्यांमध्ये होताना दिसून आला.

फलनिष्पत्ती :

यशवंतराव चव्हाण कला क्रीडा स्पर्धेचा इतिहास पाहिला तर अधिकतम स्पर्धांत मोठ्या पटाच्या शाळा विजय मिळवताना दिसून येतात. त्यामध्ये खेळाडू निवडीला अधिक वाव असतो. अनेक मार्गदर्शक असतात. परंतु शिंदेवस्तीसारख्या एका छोट्याशा वाडी वस्तीच्या शाळेने नामांकित शाळांना दिलेले आव्हान कौतुकाचा विषय ठरला. लहान मुले / मुली यांनी सर्व खेळाचे नियम जाणून घेऊन बीट व तालुका स्तर स्पर्धेमध्ये उच्च गुणवत्तेचा खेळ दाखवला खेळाची सर्व अंगे सर्व आयाम अस्खलीतपणे आपल्या खेळातून प्रदर्शित केली. उपस्थित सर्वांची मने जिंकली. अनेक दर्दी जाणकार, प्रेक्षक, शालेय प्रशासनातील अधिकारी यांनी शिंदेवस्ती या लहान शाळेतील खेळाडूं सोबत फोटो घेतले. यशवंतराव चव्हाण कला क्रीडा स्पर्धे अंतर्गत तालुका स्तर स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी पहिल्याच प्रयत्नात द्वितीय क्रमांक मिळवला.

===== @ =====

18 .अशी बदलली शाळा - अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर

शाळेचे नाव : जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, पारगाव जोगेश्वरी ,जि.बीड

मुख्याध्यापकाचे नाव : मधुकर मोरे

सादरीकरण : सोमनाथ वाळके

शाळेचे व्यवस्थापन : जिल्हा परिषद



प्रस्तावना :

२२ जून २०१५ हा राज्याच्या शैक्षणिक इतिहासातील क्रांतिकारी दिवस. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाचा शासन निर्णय या दिवशी निघाला. हा निर्णय केवळ शासन निर्णय नव्हता तर तर राज्यभरातील शिक्षकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणारा, शिक्षकांना सन्मान देणारा व प्रत्येक मूल शिकू शकते हा विश्वास प्रत्येक शिक्षकाला देणारा तो एक गुरुमंत्र होता. शिक्षकांच्या मनातील याची पूर्तता करण्यासाठी शाळा डिजिटल झाल्या आणि या शाळांनी विद्यार्थ्यांना नव्या युगाची दालने खुली करून दिली. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पारगाव जोगेश्वरी ही शाळा सुद्धा शिक्षक, ग्रामस्थ आणि शासनाच्या एकत्रित प्रयत्नातून घडत गेली आणि आज राज्यातील एक आदर्श मॉडल स्कूल बनली आहे..

२१ व्या शतकातील जगातील बदलांचा वेग प्रचंड मोठा आहे. जग बदलत असताना शाळासुद्धा बदलत आहेत. परंतु हा बदल केवळ भौतिक असून चालणार नाही तर तो गुणात्मक असणे अत्याधिक महत्वाचे आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाने हा विचार आणखी ठळक केला. राज्याचे तात्कालीन शिक्षण सचिव मा. नंदकुमार यांनी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची आखणी केली. हा कार्यक्रम तयार करताना शिक्षकांना विचारात घेतले. १०० टक्के मुले शिकावीत यासाठी शिक्षकांना पूर्णपणे स्वातंत्र्य देणारा हा शासन निर्णय होता. हा निर्णय सर्वार्थाने शिक्षक व विद्यार्थी यांना शिकण्या-शिकवण्यासाठी मोकळे अवकाश देणारा होता. प्रत्येक मूल शिकावे यासाठी शिक्षकांनी नवनवीन तंत्रे आपल्या वर्गात वापरावीत यासाठी यामध्ये प्रोत्साहन दिले गेले.

आव्हान :

साधारणतः २०१० सालानंतर राज्यभरात शिक्षकांनी संगणकाचा वापर अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सुरु केला होता. परंतु सुरुवातीला तो केवळ वर्ड, एक्सेल, पॉवर पॉइंट इतक्यापुरताच मर्यादित होता. या शाळादेखील अगदी बोटावर मोजण्याइतपतच होत्या. त्यातही अनेक शाळा या माध्यमिक होत्या व या शाळांमध्ये शासकीय योजनेतून संगणक मिळालेले होते. परंतु दुर्दैवाने अनेक ठिकाणी हे संगणक बंद अवस्थेत होते.

नियोजन व कार्यवाही :

त्यानंतर ही परिस्थिती बदलत होती. राज्यभरात शिक्षक नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करत होते. या शिक्षकांना खऱ्या अर्थानि राज्याचे शिक्षण सचिव नंदकुमार यांनी एकत्र आणले. फेब्रुवारी २०१४ मध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे येथे राज्यातील तंत्रस्नेही शिक्षकांची एक बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत राज्यभरात तंत्रज्ञानात नाविन्यपूर्ण प्रयोग करणाऱ्या शिक्षकांचे सादरीकरण करण्यात आले व त्यानंतर शिक्षकांना तंत्रस्नेही शिक्षक प्रशिक्षणाचे मोड्यूल तयार करण्यात आले व राज्यात लाखो तंत्रस्नेही शिक्षक तयार झाले.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पारगाव जोगेश्वरी ही ग्रामीण भागातील शाळा. पालकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत सामान्य, अनेक पालक ऊसतोड करण्यासाठी तसेच वीट भट्टीवर किंवा

इतर कामासाठी स्थलांतर करणारे अशा स्थितीत मुलांची उपस्थिती वाढविणे व त्यांना शाळेत टिकवून ठेवणे यासाठी भरीव प्रयत्न करणे गरजेचे होते. त्यासाठी शाळेतील शिक्षक सोमनाथ वाळके यांनी तंत्रज्ञानाची मदत घेण्याचे ठरवले. शाळा उच्च प्राथमिक असल्यामुळे सुविधांची वानवा होती. शाळा डिजिटल करण्यासाठी सर्वप्रथम त्यांनी पालकांच्या बैठकीचे आयोजन केले. या बैठकीत पालकांना तंत्रज्ञानाचे महत्व पटवून दिले. अगदी अल्पावधीत पालकांनी मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग जमा केला. सर्वप्रथम शाळेत संगणक व प्रोजेक्टर बसविण्यात आले. पाठ्यपुस्तकातील कविता मोठ्या पडद्यावर दिसू लागल्या. पाठातील चित्रे मोठ्या पडदयावर बोलू लागली, अंतराळातील ग्रहतारे वर्गात अवतरली. नवनवीन घटक मुलांना त्यांना आवडणाऱ्या कार्टूनच्या मदतीने शिकायला मिळू लागली. याचा फायदा असा झाला की विद्यार्थी शाळेत नियमित येऊ लागले. पडद्यावर काय पाहिले याबाबत चर्चा करू लागले, आज काय नवीन शिकायला मिळणार याची उत्सुकता घेऊनच शाळेत येऊ लागले.

मुलांच्या उपस्थितीचा प्रश्न बऱ्यापैकी सुटला होता अडचण होती ती शाळेतील आदिवासी समाजातील मुलांची. या मुलांची बोलीभाषा वेगळी व शाळेतील भाषा वेगळी त्यामुळे त्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होत होता. यावर उपाय म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेला उत्तेजन द्यायचे ठरविले. यासाठी त्यांच्या बोलीभाषेतील कथा, कविता रेकॉर्ड केल्या त्यासाठी शाळेत रेकॉर्डिंग स्टुडिओ उभा केला. या मुलांच्या बोलीभाषेतील कथा, कविता त्यांना रेकॉर्डेड स्वरूपात ऐकायला मिळाल्या त्यामुळे त्यांच्या मनातील न्यूनगंड कमी झाला व ही मुले नियमित शाळेत येऊ लागली. शाळेतील रेकॉर्डिंग स्टुडीओ ही एक अभिनव संकल्पना होती. केवळ ऑडीओच नव्हे तर विद्यार्थ्याचे व्हिडिओ तयार करण्यासाठी शाळेत व्हिडिओ रेकॉर्डींग स्टुडीओ सुद्धा शाळेत तयार केला. त्यासाठी शाळेत एका खोलीत व्हिडिओ कॅमेरा बसवून व एक भिंत क्रोमा करून मुलांचे वाचन, अभिनय, नाटयीकरण यांचे रेकॉर्डींग केले जाऊ लागले व नंतर ते त्यांना प्रोजेक्टरच्या मोठ्या पडद्यावर दाखविले जाऊ लागले स्वतःला मोठ्या पडदयावर पाहून मुलांना होणारा आनंद अवर्णनीय होता. जी मुले अभ्यास नियमित करतील त्यांचा व्हिडीओ बनविला जाईल असे प्रलोभन कामी आले. मुले अभ्यास नियमित करू लागली.

तंत्रज्ञानात दिवसेंदिवस नवनवीन बदल होत होते. त्याचा अभ्यासात काय उपयोग करता येईल याबाबत वाळके सर सतत नवनवीन गोष्टींचा अभ्यास करत होते. मोबाईलवर आलेले विविध apps त्यांनी वापरायला सुरुवात केली. परंतु अनेक पालकांकडे स्मार्टफोन नव्हते. सर्व विद्यार्थ्यांना याचा फायदा कसा करून द्यावा. यासाठी त्यांनी शालेय व्यवस्थापन समिती व पालकांची मदत घेतली. ही समस्या पालकांपुढे मांडल्यानंतर ज्या पालकांची आर्थिक परिस्थिती उत्तम होती अशा पालकांनी आर्थिक सहयोग दिला व सुमारे १ लक्ष रुपये जमा करून त्यातून शाळेसाठी टॅब विकत आणले. या टॅबमध्ये विविध

शैक्षणिक apps install करून विद्यार्थी त्याच्या सहाय्याने शिकायला लागले. Animal 4D, Anatomy 4D अशा स्वरूपाच्या विविध ऑगमेंटेड रीएलीटी तंत्रज्ञानाचा वापर करून मुले विविध घटक मनोरंजक पद्धतीने शिकू लागली. खरे सांगायचे तर संपूर्ण जगच या तंत्रज्ञानामुळे मुलांच्या बोटावर आले होते. या उपक्रमांना खऱ्या अर्थाने शासनाने एक व्यासपीठ मिळवून दिले होते.



अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर

शाळा समृद्ध व्हावी यासाठी शाळेतील शिक्षकांच्या साहाय्याने त्यांनी पालकांसोबतच विविध सामाजिक संस्थांशी समाजसहभागासाठी संपर्क केला. यातून शाळेचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला. शाळेला सर्वांत मोठी अडचण होती विजेची. ग्रामीण भागातील शाळा असल्यामुळे सतत बीज जात होती त्यामुळे शाळेसाठी सोलर अत्यावश्यक होते. अशावेळी सर फौंडेशन धावून आले. त्यांच्या सहकार्यामुळे सोलापूर येथील प्रिसिजन या कंपनीने सीएसआर मधून शाळेला अडीच लाख रुपयांचे ई-लर्निंग कीट दिले. यामध्ये इंटरॅक्टिव्ह स्मार्टबोर्ड, प्रोजेक्टर, लॅपटाप तसेच सोलर सिस्टीम व इन्व्हर्टर मिळाले व शाळा विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाली. वर्गातील पारंपारिक खडू फळ्याची जागा इंटरॅक्टिव्ह स्मार्टबोर्डने घेतली. या नव्या तंत्रज्ञानाने मुले हरखून गेली. खडूऐवजी बोटांनी लिहायला लागली, आवडती चित्रे रंगवायला लागली, विविध शैक्षणिक गेम्स फळ्यावर सोडवायला लागली त्यामुळे मुलांची शाळेतील उपस्थिती देखील १०० टक्के झाली. शाळेतील मुले वेगवेगळ्या देशांतील शिक्षक, विद्यार्थी यांच्यासोबत व्हर्चुअल ट्रीप च्या माध्यमातून संवाद साधायला लागली आणि शाळेच्या वर्गखोलीत संपूर्ण जग अवतरले.

या शाळेतील सर्वात नाविन्यपूर्ण प्रयोग म्हणजे म्युझिकल स्टुडीओ. पाठ्यपुस्तकातील कविता, प्रार्थना गीते यांना उत्तम प्रकारे गायन करणारी मुले शाळेत होती. गरज होती त्यांना संगीताची जोड देण्याची. त्यासाठी त्यांनी लोकसहभागातून शाळेत कॅसीओ, ऑक्टोपॅड, ट्रिपल, ढोल, ढोलकी, खंजीर, ड्रम, कोंगो अशी विविध प्रकारची वादये आणली. हळूहळू ही वाद्ये मुले वाजवायला शिकली. पाठ्यपुस्तकातील कविता आता सुरमयी झाल्या आणि मुलांना कविता आवडायला लागल्या. मुले संगीताच्या तालावर गायला लागली आणि त्यांना रेकॉर्ड करून



म्युझिकल स्टुडिओ

पालकांना ऐकवायला लागली यातून शाळेत अनेक संगीतातील हिरे सापडले. या नवोपक्रमाचे राज्यभर कौतुक झाले. लोक शाळेला भेट द्यायला येऊ लागले, परंतु दुर्दैवाची बाब म्हणजे या प्रयोगाला नजर लागली आणि शाळेतील हे साहित्य कुणीतरी चोरून नेले. यावेळी विशेष बाब म्हणजे तात्कालीन शिक्षणमंत्री मा. विनोद तावडे साहेबांनी स्वतः आष्टी पोलीस स्टेशनला फोन

करून या चोरीचा तपास कसून करण्याबाबत निर्देश दिले. एका शाळेत पडलेल्या चोरीची दखल स्वतः शिक्षणमंत्री घेतात ही बाब खूप मोठी होती. त्यातून आम्हाला हुरूप आला. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मदतीला धावून आले. माजी शिक्षण संचालक,मा. वसंत काळपांडे साहेबांच्या नेतृत्वाखाली त्यांनी संपूर्ण आर्थिक सहयोग देऊन हा स्टुडिओ पुन्हा पूर्वपक्षा उत्कृष्ट उभा केला. यात आवर्जून सांगायची बाब म्हणजे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक मा. दिनकर टेमकर साहेबांनी स्वतः आष्टी येथे येऊन स्वतःच्या खिशातून आम्हाला भरीव आर्थिक मदत केली.



कृतीतून शिक्षण

फलनिष्पत्ती :

गतवर्षी राज्य शासनाने राज्यातील ५०० शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याचा शासन निर्णय निर्गमित केला आणि या ५०० शाळांमध्ये या शाळेची निवड झाली यातून आज शाळेत रोबोटिक्स सारखे नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु झाले आहेत. विद्यार्थी रोबोट तयार करण्याचे प्रशिक्षण शाळेत घेत आहेत, तसेच ३डी प्रिंटर, ड्रोन यासारख्या बाबी लीलया हाताळत आहेत. या सर्व प्रयत्नांना पालकांची सुद्धा तोलामोलाची साथ आहे.

समारोप :

आज ही शाळा एक रोल मॉडेल डिजिटल शाळा आहे. मुलांच्या कल्पनांना वाव देण्यासाठी तंत्रज्ञानातील नानाविध प्रयोग सोमनाथ वाळके आणि शाळेतील इतर शिक्षक करत आहेत. राज्यातील अनेक शिक्षक, अधिकारी व शिक्षणप्रेमी नागरिकांनी शाळेला भेटी दिल्या आहेत. या सर्व यशामध्ये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाने दिलेली दिशा अत्यंत महत्वाची आहे. आज राज्यातील बहुतांश शाळा डिजिटल झाल्या आहेत. शिक्षक तंत्रस्नेही झाले आहेत आणि हीच २१ व्या शतकातील समर्थ भारत घडविण्याची नांदी आहे..

===== @ =====

19. लोकसहभागातून विद्यार्थी विकास

शाळेचे नाव - जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, हिंगणा कारेगाव, ता. खामगाव, जि. बुलढाणा

मुख्याध्यापकाचे नाव - राजेश वासुदेव कोगदे

ई-मेल - yashkogade@gmail.com

शाळेचे व्यवस्थापन - जिल्हा परिषद



प्रस्तावना :

' विजेते वेगळ्या गोष्टी करत नाहीत ,ते प्रत्येक गोष्ट वेगळेपणाने करतात.'

जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा हिंगणा कारेगाव या शाळेला 2023 मध्ये 150 वर्षे पूर्ण होत आहेत. आपण ज्या संस्थेत नोकरी करतो त्या संस्थेची भरभराट करणे हे आपले कर्तव्यच असते ही भावना जोपासून जून 2022 मध्ये जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा हिंगणा कारेगाव या शाळेचे अंतरंग व बाह्यरंग पाहिले असता भिंती काळपट पडलेल्या, एखाद्या ओसाड वाड्यासारख्या दिसत होत्या. गेल्या सहा ते सात वर्षापासून शाळेची गुणवत्ता वाढत आहे .परंतु ,शाळेची इमारत ,परिसर ओसाड वाटत होता .जून 2022 मध्ये शाळेचा प्रभार स्वीकारला तो राजेश वासुदेव कोगदे या शिक्षकाने आणि जून 2022 ते ऑक्टोबर 2022 चार ते पाच महिन्यात ग्रामस्थांच्या मदतीने शाळेचे नंदनवन केले .आज ही शाळा तालुक्यातील इतर आदर्श शाळांच्या यादीत समाविष्ट झालेली आपणास पहावयास मिळेल.



जुलै 2022 मधील शाळा



ऑक्टोबर 2022मधील शाळा

जुलै 2022 मधील शाळा व ऑक्टोबर 2022 मधील शाळा या चार महीन्यात अमुलाग्र बदल कसा झाला हे दाखवणाऱ्या व्हिडिओ ची लिंक https://youtu.be/mMzvX-bJs1I

आव्हान :

जून 2022 मध्ये मुख्याध्यापक पदाचा प्रभार स्वीकारलेल्या श्री राजेश कोगदे सरांनी शाळेचा कायापालट करण्याची सुरुवात केली ती स्वतःपासून . शाळेच्या भिंती काळपट पडलेल्या, सर्वत्र भकास वातावरण, बालस्नेही वातावरणाचा अभाव, या शाळेत किंवा इमारतीत सद्यस्थितीत विद्यार्थी शिक्षण घेत आहेत असेही बाहेरील नवीन व्यकतीने म्हणू नये इतकी उदासिनता आणि ही परिस्थिती एकदम ग्रामस्थांच्या माध्यमातून बदलणे शक्य नव्हते.

नियोजन व कार्यवाही:

सर्वप्रथम त्यांनी एक पगार आपल्या शाळेसाठी दिला. 15 ऑगस्ट पर्यंत शाळेचा दर्शनी भाग व अंतरंग बदलण्याचा स्वखर्चातून प्रयत्न केला. लोकांना जेव्हा तो बदल दिसू लागला तेव्हा लोकांनी सरांच्या कार्याला हातभार लावण्यास सुरुवात केली .

शाळेमध्ये सर्व मुले एकत्र बसू शकतील अशी व्यवस्था नव्हती. कारण उन्हामध्ये मुले जास्तीत जास्त दहा मिनिटे थांबू शकतात. यावर उपाय म्हणून 2500 चौरस फूट आकाराचे ग्रीनशेडची आवश्यकता वाटली आणि त्यासाठी एकट्या माणिकराव जाधव सरांनी तब्बल 30 हजाराचे ग्रीनशेड शाळेला भेट दिले. राजहंस जाधव यांनी स्व.दिनबंधू राजहंस जाधव ह्या आपल्या मुलाच्या स्मृतिप्रीत्यर्थ तब्बल 51 हजार रुपयाचे प्रवेशद्वार शाळेला सप्रेम भेट दिले. शालेय पोषण आहार



खामगाव फास्ट शुक्रवार दि. २६ ऑगस्ट २०२२ शेवटचे पान

शाळा मॉडेल करण्यासाठी मुख्याध्यापकांनी दिला एक महिन्याचा पगार

तर ग्रामस्थांनी दिल्या 60 हजाराच्या वस्तू

खामगाव फास्ट - इतर शाळांप्रमाणे आपलीही शाळा मॉडेल व्हावी असे न वाटणारा शिक्षक क्वचितच सापडेल. कारण प्रत्येकाला आपली शाळा खूप चांगली व्हावी असे वाटते पण त्यासाठी स्वतः पासून सुरुवात केली तर प्रत्येक गोष्ट शक्य आहे. कारण समाज तुमचे काम पाहून मदतीला धावून येतोच. असाच प्रत्यय आला तो जि.प.म.उ. प्रा. शाळा हिंगणा कारेगाव शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजेश कोगदे यांचा त्यांनी आधी केले. मग सांगितले, हिंगणा कारेगाव येथील शाळेचा कायापालट केला असून विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी या शाळेला लागणारे साधनसामग्री सह शाळा स्वच्छ सुंदर व शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे भविष्य घडावे याकरिता मुख्याध्यापक यांनी स्वतःचा एका महिन्याचा पगार शाळेच्या खर्चासाठी लावला. ग्रामस्थांनाही मुख्याध्यापकांनी केलेला खर्च पाहून आपण काहीतरी मदत केली पाहिजेत या हेतूने त्यांनी सुद्धा 60 हजाराच्या वस्तू शाळेला दिले आहेत. बदल प्रत्येकाला हवासा वाटतो परंतु सुरुवात दुसऱ्याने करावी अशी समज असल्याने मनाला पाहिजे तसा बदल दिसून येत नाही हेच सत्य समजून घेऊन शाळेचा कायापालट स्वतःपासून सुरू करण्याचा निर्धार केला तो जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा हिंगणा कारेगाव शाळेचे मुख्याध्यापक श्री राजेश वासुदेव कोगदे यांनी. शाळा मॉडेल करण्यासाठी सर्वप्रथम शाळेची रंगरंगोटी करण्याची ठरवले यासाठी त्यांनी आपला एक महिन्याचा पगार शाळेसाठी खर्च केला. आणि सरांच्या आवाहनाला गावकऱ्यांनी सुद्धा भरभरून प्रतिसाद दिला. यामध्ये ग्रीनशेड, विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आसन ,जेवणासाठी प्लेट्स ,साऊंड सिस्टिम ,पोडियम ,कार्यालय सजावट अशा वस्तूंचा समावेश आहे. यासाठी माणिकराव जाधव उमरावसिंग चव्हाण , शेषराव चव्हाण, शिवाजीराव चव्हाण, मनोहरभाऊ जाधव , संपपालभाऊ जाधव,प्रमोद जाधव,गौतम जाधव , संदीप जाधव,विद्याताई जाधव,प्रा.प्रमोद चव्हाण, गोपाल पानझाडे , न्यू समता कबड्डी संघ,संजय दहिभात , सुभाषसिंग चव्हाण , जानराव जाधव, देशमुख मॅडम व चंद्रशेखर चिंगळे सर यांनी मोलाची मदत केली. विशेष म्हणजे न्यु समता कबड्डी संघाच्या संपूर्ण टिमने दोन दिवस श्रमदान दिले.

घेण्यासाठी बसायची व्यवस्था झाली.त्यानंतर प्रत्येक मुलासाठी बसायला आसन, जेवणासाठी भोजनप्लेट, जेवण वाढण्यासाठी आवश्यक भांडी ग्रामस्थांनी दिली .

ग्रामपंचायतीने पेव्हर ब्लॉक बसवून दिले आणि राज्यातील उत्कृष्ट भोजन व्यवस्था या शाळेत तयार झाली.

उत्कृष्ट भोजन व्यवस्था लिंक. https://youtu.be/Sagg-MOU98I

इंग्लिश एक्सप्रेस :

इंग्रजीची भीती नष्ट व्हावी, मुलांना इंग्रजीची गोडी वाटावी आणि चालता बोलता इंग्रजी वाचता यावे या उद्देशाने इंग्लिश एक्सप्रेस ही संकल्पना सरांनी ग्रामस्थांच्या मदतीने राबवण्याचे ठरवले .जेव्हा कोगदे सरांनी गावकऱ्यांसमोर संकल्पना मांडली तेव्हा अतिशय अल्प कालावधीत अगदी पंधरा दिवसात गावकऱ्यांच्या सहकार्याने इंग्लिश एक्सप्रेस हा उपक्रम तयार झाला. या उपक्रमाचे माध्यमातून इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने इंग्रजी शब्दांचे



दिव्य मराठी बुलडाणा 30-10-2022

आनंददायी शिक्षण • मुख्याध्यापक राजेश कोगदे यांचा अभिनव उपक्रम

इंग्रजीची गोडी वाढवण्यासाठी जि. प. शाळेत साकारली रेल्वे

हिंगणा कारेगाव येथील शाळेत इंग्लिश एक्सप्रेस

भाग्या हिवराळे | खामगाव

आनंददायी पद्धतीने शिकवण्यावर भर

उच्चार कसे करतात, इंग्रजी शब्दांचे वाचन किती सोपे असते आणि कृतीच्या माध्यमातून इंग्रजी शिकणे किती सोपे असते हा आत्मविश्वास विद्यार्थ्यांना मिळाला व अतिशय आनंदाने विद्यार्थी इंग्रजी शिकायला लागले.

प्रसारमाध्यमांनी घेतलेली दखल : https://youtu.be/1cZTsT3SzHo

गणित गार्डन :

विद्यार्थ्यांना गणित विषयाची गोडी वाटावी, गणितातील भीती नष्ट व्हावी या उद्देशाने गणित गार्डन ही संकल्पना



दिवाळीच्या सुट्टीत गावकऱ्यांच्या सहकार्याने सत्यात उतरली . शाळेचा परिसर एखाद्या गार्डनलाही लाजवेल असा-

याकरिता राजेश कोगदे सरांचे मित्र जे अमेरिकेत राहतात त्यांनी या गार्डन साठी व सरांचे कार्य पाहून अकरा हजार रुपये पाठविले ही शाळा बाह्यांगाने व अंतरंगाने उजळून निघाली.

या गणित गार्डन चा विद्यार्थ्यांना होत असलेला फायदा.-

या गार्डनमध्ये गणित विषयातील सर्व मुलभूत संकल्पना भिंतीवर चित्रित करण्यात आलेल्या आहेत . यामध्ये अंकगणित ,भूमितीतील मुलभूत संकल्पना , इयत्ता पहिलीपासून ते इयत्ता आठवीपर्यंतच्या पाठ्यपुस्तकात असणाऱ्या सर्व मुलभूत बाबी उदा. अक्षरातील उजळणी ,रोमन संख्या चिन्हे संख्यारेषा,घड्याळ , भौमितिक आकृत्या इत्यादी. या माध्यमातून विद्यार्थी गणित, भूमिती मधील मुलभूत संकल्पना गुणवत्ता पूर्ण शिकत आहेत.

शाळेची सुरुवात प्रसन्न वातावरणाने झाली तर संपूर्ण दिवस छान जातो याउद्देशाने शाळेमध्ये संगीतमय परिपाठ झाला पाहिजे असे वाटणे स्वाभाविक आहे परंतु साऊंड सिस्टीम आणायची कुठून यासाठी मुख्याध्यापक यांनी प्रमोद कृष्णा जी जाधव संविधान जागर अभियान अध्यक्ष यांची भेट घेतली आणि प्रमोदजी जाधव व गौतमजी जाधव या दोघांनी शाळेला चांगल्या दर्जाची साऊंड सिस्टीम भेट दिली त्यामुळे अतिशय योजनाबद्ध पद्धतीने या ठिकाणी दररोज परिपाठ होतो .

परिपाठ सादरीकरण –

https://youtu.be/uhHIt8JsgNc

ही शाळा गुणवत्तेच्या बाबतीतही कुठे कमी नाही. अगदी कोरोनाच्या काळातही ब्लूटूथ द्वारे ही शाळा चालवली.



लोकमत

ब्लूटूथ शाळा

४२ विद्यार्थी आणि ८ मोबाइल एवढेच पुरे!

बु लढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्याच्या ठिकाणापासून जवळपास २०-२२ किलोमीटर अंतरावर असलेले हिंगणा कारेगाव. ग्रामीण भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांजवळ फोन नाहीत, ज्यांजवळ आहेत ते स्मार्ट नाहीत आणि ५-१० टक्के विद्यार्थ्यांजवळ स्मार्टफोन असले तरी त्या मोबाइलमध्ये चॅलेन्स नाही. अशा असंख्य समस्या शिक्षकांसमोर आहेत; पण 'इच्छा तेथे मार्ग' या उक्तीप्रमाणे मी यातील सर्व प्रकारच्या समस्यांवर मात करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी इयत्ता पाचवीला शिकवत असून, माझ्या वर्गात ४२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांचे शिकणे खंडित पडू नये यासाठी एप्रिल महिन्यापासून ते आतापर्यंत मी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले.

आपण काय केले म्हणजे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचता येईल? या विचारात असताना मला 'ब्लूटूथ शाळा' हा उपक्रम सुचला. वर्गात ४२ विद्यार्थी आणि केवळ ८-१० विद्यार्थ्यांचे मोबाइल चालू स्थितीत असल्याचे आढळले. मग मी सुरू केली ब्लूटूथ शाळा!

शाळा आणि शिक्षक 'वर्चुअल वर्ग' चालवण्यासाठी काही प्रयोग

अशी चालते ब्लूटूथ शाळा

विद्यार्थ्यांना गटनायक नेमले.

१०० रु पये किंमत असलेले आठ ब्लूटूथ स्पीकर विद्यार्थ्यांना दिले.

हे स्पीकर कसे हाताळावे याचे विद्यार्थ्यांना घरी जाऊन प्रशिक्षण दिले.

एका गटात पाच असे आठ गट तयार केले. या ब्लूटूथ शाळेत दररोज सकाळी एक तास व सायंकाळी एक तास विद्यार्थी नेमून दिलेल्या गटनायकाच्या घरी जातात आणि पाचच्या गटात शिकतात.

ब्लूटूथ स्पीकर गटनायकाच्या मोबाइलला जोडलेला असल्याने त्यातून येणारा शिक्षकांचा आवाज विद्यार्थी ऐकू शकतात. एका मोबाइलवरून जास्तीत जास्त दहा जणांनाच व्हॉइस कॉल कॉन्फरन्समध्ये सहभागी होता येत असल्याने माझे ४२ विद्यार्थी आठ मोबाइलच्या साहाय्याने जोडले गेलेले आहेत.

– राजेश कोगदे
जि.प. मराठी उच्च प्राथमिक शाळा, हिंगणा कारेगाव, जि - बुलडाणा

unicef for every child लोकमत

पालक-शिक्षक-शाळा आणि मुले यापैकी तुम्ही कुणी आहात का? - असाल तर 'ऑनलाइन शिक्षणा'च्या तात्कालिक अपरिहार्यतेतून तरुन जाण्यासाठी शाळांनी शोधलेले मार्ग, शिक्षकांनी केलेले प्रयोग, आई-बाबांनी शोधलेले पर्याय 'ऊर्जा'कडे जरूर पाठवा. निवडक मजकुराला या पानावर प्रसिद्धी दिली जाईल.

उपक्रमशील शिक्षक आणि पालकांच्या 'यूनिसेफ' या आंतरराष्ट्रीय संघटनेकडून विशेष प्रमाणपत्राने गौरविण्यात येणार आहे. 'ऊर्जा'कडे प्रसिद्धीसाठी आलेल्या मजकुरातून शिक्षक आणि पालकांच्या यशोगाथांचे स्वतंत्र एक तज्ज्ञ समिती करेल.

युनिकोडमध्ये टाइप केलेल्या लेखांची ऑफ फाइल urja@lokmat.com या पत्त्यावर ईमेल करा. संपर्कासाठी फोन नंबर जरूर द्या.

Mumbai Main
Page No. 6 Aug 31, 2020
Powered by: erelego.com

येथील विद्यार्थी एक ते दोन महिन्यात कोरोना काळातही वाचायला शिकले आणि ही अनोखी पद्धत या शाळेचे मुख्याध्यापक श्री राजेश कोगदे यांनी विकसित केलेली आहे.

https://youtu.be/iCpojzcT-Eg

येथील इयत्ता दुसरीतील विद्यार्थी सुद्धा भागाकार सोडवतात आणि तेही विना पाढे पाठांतराचे आणि एक ते शंभर पर्यंतचा कुठलाही पाढा चक्क दहा सेकंदात तयार करतात .

https://youtu.be/PKLhFuY8lwg

या शाळेने आजवर ड्रीप एज्युकेशन वर भर दिलेला आहे. ज्याप्रमाणे ड्रिप इरिगेशन द्वारे प्रत्येक रोपाला पाणी दिले जाते त्याप्रमाणे ड्रिप एज्युकेशन मध्ये प्रत्येक विद्यार्थ्याच्या वैयक्तिक विकासाकडे लक्ष दिले जाते. गणित विषयात आवड निर्माण करण्यासाठी कोगदे सरांनी गणित गुरुजी नावाचे उपकरण तयार केले या माध्यमातून विद्यार्थी बेरीज ,वजाबाकी, गुणाकार या क्रिया अतिशय आनंदाने शिकतात .



देशोन्नती

जिल्हा घाट

गणित विषयात विद्यार्थ्यांना आवड निर्माण करण्यासाठी

कोगदे गुरुजींनी तयार केला 'गणित गुरुजी'

https://youtu.be/veqGSW66V-I

समाजभान राखत कोरोना काळात लसीकरण जनजागृतीचे कार्य येथील शिक्षकांनी केलं त्याविषयीची बातमी व लिंक

https://youtu.be/dE-ZjOZTg-k

ही शाळा आता शैक्षणिक दृष्टीनेच अग्रेसर नाही तर खेळातही या विद्यार्थ्यांचे विशेष प्राविण्य आहे. येथील क्रीडा शिक्षक श्री समाधान डाखोरे सर यांचा विविध खेळांमध्ये हातखंडा आहे. मैदान निर्मितीपासून ते विद्यार्थी तयार करेपर्यंत. येथील विद्यार्थी केंद्र, तालुका तसेच जिल्हा पातळीवर विविध खेळांमध्ये प्राविण्य दाखवतात . यावर्षी शाळेला केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत चॅम्पियन शिप मिळाली तर तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत मुले आणि मुली दोन्ही संघांनी खो खो प्रकारात प्रथम पारितोषिक मिळविले. येथील शिक्षक श्री चंद्रशेखर थिगळे हे अतिशय उत्कृष्ट असे कलाशिक्षक असून विद्यार्थ्यांना हुबेहूब चित्रे, आकृत्या कशा काढाव्या हे अचूकपणे , कौशल्याने शिकवतात.सन 2022 मध्ये झालेल्या इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत 15 पैकी 12 विद्यार्थी उत्तीर्ण झाले.याचे श्रेय जाते ते अनंत होगे सर यांना त्यासाठी त्यांनी वर्षभर ज्यादा वर्गाचे आयोजन केले .इथला प्रत्येक शिक्षक हा विविध क्षेत्रात निपून आहे.शाळेच्या शिक्षिका सौ.उषा मुकुंदराव देशमुख,शिक्षक अमोल सोळंकी,शालिकराम मते मुलांच्या गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न करत आहेत.

वरील सर्व बाबींचा सकारात्मक परिणाम म्हणजे जि.प.म.उ.प्रा.शाळा हिंगणा कारेगाव शाळेची निवड केंद्र सरकारच्या PMSHRI योजनेमध्ये झाली. गावातील ज्येष्ठ व्यक्तीमत्व श्री.शेषराव देवराव चव्हाण यांनी श्री.राजेश कोगदे सरांविषयी काढलेले गौरवोद्गार फारंच प्रेरणादायी ठरले.ते म्हणतात. एकटा माणूस मनात आणलं तर काय करु शकतो हे कोगदे सरांनी आम्हाला दाखवून दिले.गावकऱ्यांचे सहकार्य कसे मिळवावे हे शिकावे ते या सरांकडूनच.

समारोप :

शेवटी एकच म्हणावेसे वाटते....

" ये मत कहो खुदा से,

मेरी मुश्किले बडी है |

मुश्किलोंसे कह दो ,

मेरा खुदा बडा है |"

ज्यांनी आपल्या संकटांना कधीच मोठं समजलं नाही.संकटांपुढे नतमस्तक न होणाऱ्यांना आयुष्यात यशच मिळालेले आहे.

===== @ =====

20 . स्वच्छ व सुंदर शाळा

लोकसहभागातून विद्यार्थी विकास

शाळेचे नाव - जिल्हा परिषद मराठी प्राथमिक केंद्रशाळा, पाडळी ,ता.जि.बुलडाणा

ई-मेल आय.डी. - rasumayu1312@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - श्री.रामदास दत्तू मोहिते

शाळेचे व्यवस्थापन - जिल्हा परिषद



प्रस्तावना: -

आमची शाळा जि.प.म.प्रा.कें.शाळा, पाडळी ही बुलढाणा शहरापासून १५ कि.मी. दूर आहे.शाळेची स्थापना सन १९२७ रोजी झालेली असून अतिशय जुनी इमारत आहे . शहरानजीक शाळा असूनही शालेय इमारत, प्रवेशद्वार अतिशय जुनाट वाटायचे. मातीचे क्रीडांगण जे पावसाळ्यात चिखलमय व्हायचे. कार्यालयापासून इतर विविध वर्गखोल्यांमध्ये जणू अडगळीचे सामान भरले आहे असे वाटायचे. सुरुवातीला आम्ही शिक्षकांनी स्वत: पैसे जमवून चार वर्गखोल्या व व्हरांडा चित्रमय व बोलका करण्याचे ठरवले. लोकसहभाग मिळविण्याचा प्रयत्न केला. पण विशेष प्रतिसाद मिळाला नाही. पण आम्ही कामास सुरुवात केली. खूप अडचणी आल्या. ते अडथळे पार करत आज आमची शाळा एक स्वच्छ, सुंदर व आदर्श शाळा म्हणून तयार झाली.

आलेल्या समस्या व त्यावर केलेल्या उपाययोजना -

गावातील काही मुलांचा त्रास या रंगरंगोटीला होऊ लागला. चित्रे खराब करणे, जागोजागी व्हरांड्यात थुंकणे हा प्रकार होऊ लागला. सुट्टी असली की पहिला दिवस तर व्हरांडा खराट्याने स्वच्छ धुण्यात आम्हा शिक्षकांचा वेळ जायचा. शेवटी आम्ही ग्रामपंचायत पाडळी यांना शाळेची सुरक्षा भिंतीची उंची वाढवून देण्याची मागणी केली. त्यांच्या सहकार्याने ते काम पूर्ण झाले.एक दिवस ISO संबंधित कार्यशाळेत आम्हा शिक्षकवृंदांचा सत्कार केला. हे काम असेच सुरू ठेवून शाळा ISO मानांकित करण्यासाठी प्रयत्न करावे अशी आशा व्यक्त केली. पुन्हा एकदा आम्ही पाचही शिक्षकांनी प्रत्येकी सहा हजार रुपये


एकूण तीस हजार रुपये जमा केले .या पैशातून कार्यालयाची रंगरंगोटी, कार्यालयीन तक्ते, कार्यालयीन फाईल्स, महान नेत्यांचे फोटो, इलेक्ट्रिक फिटींग, कार्पेट बसविणे ही कामे आम्ही पूर्ण केली. . ग्रामस्थांच्या सहभागातून शाळेसाठी बालवाचनालय, संगणक कक्ष, परसबाग, आकर्षक प्रवेशद्वार, उर्वरित रंगरंगोटी ही ध्येये सर्वांसमोर ठेऊन पहिल्या टप्प्यात रु.७७,०००/- वर्गणी जमा झाली. आज रोजी ही मदत चार लाख रुपये पर्यंत झाली. खराब ,पडलेली एक वर्गखोली बालवाचनालय व संगणक कक्षासाठी सज्ज झाली. यासाठी संगणक संच व टेबल ग्रामपंचायत पाडळी यांनी दिले.



शाळेची पूर्वीची व सद्यस्थिती

बालवाचनालय :-

शाळेजवळ उपलब्ध असलेले वाचनालयाचे जुने कपाट छान रंगवून, चित्रमय करून उपयोगात आणले. याचवेळी शाळेचे सर्व महत्त्वाचे कोपरे भिंती बोलक्या चित्रांनी, उपयुक्त संदेशांनी गजबजून गेल्या. याच लोकसहभागाच्या निधीतून शाळेचे प्रवेशद्वार नुतनीकरणाचे काम सुरू झाले. शाळेचे नाक असलेली शालेय कमान नव्याने तयार करण्यात आली. पेंटरच्या मदतीने यावर शाळेचे नाव ठळक स्वरुपात लिहण्यात आले.



बालवाचनालय

बालवाचनालय पाहण्यासाठी इथे क्लिक करा.

https://youtu.be/Mv6a6Voxr5E

शाळेचे प्रवेशद्वार

प्रवेश भिंतीवरील बोलके चित्र, चॅनेलगेट, प्रशस्त रंगीत शालेय कमान आज मोठ्या दिमाखात उभी झाली ती लोकांच्या सहकार्याने. तेंव्हाच समस्त मंडळीने परसबाग सुध्दा प्रशस्त व सुंदर करण्याचा निर्णय घेतला. विटांचे बांधकाम, लोखंडी जाळी, परसबागेसाठी भरपूर पाण्याची सोय, पाईपलाईन यांनी परसबाग सुसज्ज झाली. मोठ्या प्रमाणात काळी माती आणून परसबागेत टाकण्यात आली.

शालेय परसबाग



विशेष म्हणजे लोकसहभागातून शाळेच्या बोअरवेलवर शाळेमध्ये पाण्याच्या टाकीचे फिटींग व अंडरग्राऊंड पाईपलाईन करण्यात आली. याच्या सहाय्याने आर.ओ.प्लँटची टाकी भरण्याची सुविधा झाली. स्वच्छता गृहावरील पाण्याची टाकी व नळांची सोय करण्यात आली. शिवाय परसबागेसाठी स्प्रिंकलरची सोय करण्यात आली. थोड्याच जागेत पण टुमदार अशी परसबाग तयार करण्यात आली. यामुळे शालेय स्वच्छता, मुलांचे आरोग्य व शाळेचे सौंदर्यीकरण आम्हाला साधता आले.

शालेय आवारातील सिमेंट बाक



शाळेच्या सौंदर्यीकरणात आणखी भर घातली ती सिमेंटच्या बाकांनी. लोकसहभागाच्या निधीतून एकसारखे पंधरा सिमेंटचे बाक आणण्यात आले. ते शालेय आवारात क्रिडांगणाच्या बाजूने बसविले. त्यांना रंग देऊन आणखी आकर्षक करण्यात आले. मुले दुपारच्या सुटीत बेंचवर बसून गप्पागोष्टी तथा अभ्यासही करू लागले.

शालेय परिसरातील खेळणे -




शालेय मैदानात बऱ्याच दिवसांपासून जुनी घसरगुंडी होती. तिचा पत्रा पूर्णत: खराब झालेला असल्याने मुलांना त्यावर खेळण्यास सक्तीने मनाई होती. पण लोकसहभागातून घसरगुंडीचा जुना पत्रा काढून नवीन बसविण्यात आला. घसरगुंडी खेळण्यासाठी तयार झाल्याबरोबर सर्व मुले खुश झाले व खेळू लागले. तेंव्हा त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता.

चप्पल स्टँड,कचरापेट्या व संगणक कक्ष





ग्रामपंचायत पाडळी तर्फे संगणक संचाबरोबर प्रत्येक वर्गासाठी चप्पल स्टँड, ओला व सुका कचऱ्यासाठी मोठ्या दोन कचरापेट्या देण्यात आल्या. यामुळे शालेय स्वच्छता व नीटनेटकेपणा ठेवणे आम्हा शिक्षकांना सहज शक्य झाले. कचऱ्याचे व्यवस्थापन, विल्हेवाट मुलांमध्ये सहज रुजवता येऊ लागले.

शालेय आवारात CCTV कॅमेरा

लोकसहभागातून शालेय इमारतीच्या सुरक्षेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसविण्यात आला. शालेय इमारतीला होणारा त्रास यामुळे कमी झाला. वारंवार इमारतीचे चित्रे खराब करणे, जागोजागी थुंकणे यासारख्या गोष्टींना पूर्णपणे आळा बसला. अशाप्रकारे आम्ही सर्व अडचणींवर मात करत गेलो.

क्रीडासाहित्य

लोकसहभागाच्या निधीतून मुलांसाठी क्रीडासाहित्य सुध्दा आम्ही घेतले. आमची प्राथमिक शाळा असल्याने वयोगटानुसार व पुरेसे क्रीडासाहित्य घेण्यात आले. तासिकेचे योग्य नियोजन करून याचा उपयोग मुले खेळण्यासाठी करू लागली. शालेय क्रीडांगण हे मुलांच्या शारीरिक, मानसिक विकास घडविण्यात महत्वाची भूमिका साकारत असते.





फलनिष्पत्ती –

सर्वांच्या सहकार्याने अखेरीस शाळेला ISO मानांकन प्राप्त झाले.शिवाय परसबाग स्पर्धेमध्ये आमच्या शाळेला तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त झाला .ग्रामस्थ मंडळीच्या सहकार्याने शाळेचा कायापालट होऊ शकतो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे आमची शाळा. सकारात्मक विचार ठेवून शिक्षकांनी सुरुवात केली तर निश्चितच गाव पाठीशी उभे राहते.

समारोप :-

चार वर्गखोल्यांच्या रंगरंगोटीपासून सुरुवात केली पण आज मात्र शाळेचा चेहरा मोहरा बदलून गेला आहे. अडचणी आल्या पण त्यावर मात केली. तीन टप्प्यानंतर हळूहळू शाळेचे काम पूर्णत्वाकडे नेले. आमचे काम पाहून ग्रामस्थ मंडळीनी पुढाकार घेतला. तन-मन-धन अर्पण करून आमच्या स्वच्छ सुंदर शाळेचे आधारस्तंभ ठरले. चित्रमय शाळा व त्यावर लिहिलेले घटक बालवाचनालय, संगणक कक्ष, क्रीडासाहित्य, क्रीडांगण यांचा पुरेपूर विकास आम्ही लोकसहभागातून करू शकलो. थोडक्यात आज विद्यार्थ्यांचा मानसिक, बौध्दिक, शारीरिक विकास घडविण्यात या सर्व गोष्टी महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. लोकसहभागातून साकारलेली आमची पाडळी येथील प्राथमिक शाळा **"स्वच्छ, सुंदर होऊन विद्यार्थी विकास घडविण्यासाठी मोठ्या दिमाखात उभी आहे."** या कामात योगदान देणाऱ्या समस्त मंडळींचे आम्ही मन:पूर्वक आभार मानतो.

संपूर्ण शाळा पाहण्यासाठी इथे क्लिक करा.

https://youtu.be/9nNqxaJVCQM

===== @ =====

21. सहशालेय उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

शाळेचे नाव - जि.प.उच्च प्राथमिक शाळा हत्तीडोई ,ता.जि. भंडारा

ईमेल - zpprimaryschoolh@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - सौ.लता रामधन धकाते

शाळेचे व्यवस्थापन – जिल्हा परिषद



प्रस्तावना :

निसर्ग कोणास संमोहित करीत नाही ? ..... निसर्गाचं वेड सर्वांनाच असते . अशा नैसर्गिक सौंदर्य लाभलेल्या हिरव्यागार टेकड्याच्या कुशीत वसलेले इवलेसे गाव,भंडारा शहरापासून अवघ्या १२ कि.मी.अंतरावर असलेले गाव - **'हत्तीडोई '** . या गावास प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे.हत्तीच्या डोक्याप्रमाणे आकार असलेल्या अनेक टेकड्या या ठिकाणी आहेत.आणि टेकड्यांच्या खाली एक **'डोह'** असून त्यात सम्राटकालीन हत्ती डोहात बसायचे म्हणून **'हत्तीडोह'** हे मुळचे नाव. या नावाचा अपभ्रंश होवून '**हत्तीडोई**' या नावाने गावाची नवी ओळख झाली. "दसबल पहाडी" या नावाने पर्यटन स्थळ म्हणून विकसित होत आहे. बौद्ध धर्माशी निगडीत प्राचीन पुरावे या ठिकाणी असून ती पहाडी बाल्याची पहाडी म्हणून प्रसिद्ध आहे. शिवाय हिंदू,मुस्लीम ,बौद्ध अशा तिन्ही धर्माचा तिहेरी संगम साधला आहे.भंडारा व नागपूर जिल्ह्यांच्या सीमेवर हे गाव असून पर्यटन क्षेत्राचे महत्व वाढीस लागले आहे.

गावाच्या सीमेवर पोहोचताच थंडगार वा-याची झुळूक शरीराला स्पर्शून जाते.आणि आपण जस-जसे समोर जातो तेथील सौंधर्य आपल्याला मोहवून टाकते. अशा या मनमोहक वातावरणातून जाता जाता आपण शाळेजवळ थांबतो माझी शाळा म्हणजे विविध प्रकारच्या रोपट्यापासून तर मोठ्या वृक्षापर्यत सजलेली बाग आहे तेथील विविध उपक्रम वाखाणण्या जोगे आहेत.

१)शाळा प्रवेशोत्सव कर्यक्रम:- (२६ जून) शाळेच्या पहिल्या दिवशी वाजत-गाजत शिक्षणाची पालखी व दिंडीसह नवागतांची थाटामाटात फेरी काढण्यात येते. शाळेच्या पटांगणात फेरीचा समारोप करण्यात येवून शालापूर्व तयारीने प्रवेशद्वारावर आकर्षक रांगोळी काढण्यात येते व नवागत बालकांचे प्रवेशद्वारावर हळदी कुंकम तथा स्वागत करण्यात येते



.

२) **क्षण एक**

स्वच्छतेचा :- शालेय वेळ व्यतिरिक्त शालेय परिसराची स्वच्छता करून घेतात .त्यामुळे परिसर नीटनेटके व प्रसन्न वाटते.

३) **दैनिक परिपाठ** :- दैनिक परिपाठात आठ वर्गाचे नियोजन असून प्रत्येक वर्ग दिवस निहाय आपापले परिपाठ सादर करतात.दैनिक परिपाठात राष्ट्रगीत,प्रतिज्ञा,स्वच्छतेची प्रतिज्ञा,संविधान,प्रार्थना,देशभक्ती गीत,कथा,सुविचार,प्रश्न आमचे उत्तर तुमचे, दिनांक तो पाढा,पसायदान,मौन,इत्यादी.घेतले जाते. परिपाठात मराठी,हिंदी,इंग्रजी तिन्ही भाषेत घेतले जाते.परिपाठ हे संगीताचे तालावर घेतले जाते.

४) **करूया मित्रांचा वाढदिवस**:- प्रत्येक वर्गातील विद्यार्थी आपल्या वर्गातील मुलाचे वाढ दिवस असल्यास शिक्षकांचे निदर्शनास आणून देतात.परिपाठात संगीताचे तालावर भेट वस्तू व फुल देवून वाढदिवस साजरा केला जातो.

५) **कला कुशल कौशल्य विकास**:- विविध कौशल्य विकासाचे तास घेतले जातात. ग्रीटिंग बनविणे, पणत्या, कागदी कुंड्या, कागदी ताटे, विविध फ्लावर पॉट, मेणबत्ती तयार करणे,वालपीस तयार करणे,मुखवटे तयार करणे,कागदी पणत्या, राख्या तयार करणे, इत्यादी.

६) **बालसभा उपक्रम (संसद):-** दर शुक्रवारी बालसभेचे आयोजन वर्ग नियोजनानुसार केले जाते.ग्रुप तयार करून स्पर्धा घेतली जाते. गाणी,वादविवाद,सामान्य ज्ञान,इत्यादी स्पर्धा होतात.

७)**विविध सण पुण्यतिथी व जयंत्या:-** सर्व सण , पुण्यतिथी व जयंत्या उत्साहात व साजऱ्या केल्या जातात . विद्यार्थ्यांना ऐतिहासिक माहिती मिळावी व संस्कृतीचे जतन व्हावे हा मुख्य उद्देश आहे.



८)वृक्षारोपण व संवर्धन :- लहान मुले मोठ्यांचे अनुकरण करीत असतात.शाळेतील मोठ्या मुलांचे वृक्षप्रेम व त्याचे संगोपन ते कसे करतात. याच ते बारकाईने काही दिवस निरीक्षण करतात आणि नकळतपणे या उपक्रमात ते स्वत: ला सामील करून घेतात. माझ्या शाळेतील प्रत्येक बालक तेथील प्रत्येक वृक्षाचा पालक आहे. शाळेत येताच नियमितपणे





बागेला पाणी देणे, बागेतील कचरा काढणे,तुटलेल्या फांद्यांना आधार देणे, ही त्यांच्या नित्त्याचीच बाब.

९)**राखी मेकिंग :-**'माझा बंधू , माझी राखी' या उपक्रमात प्रत्येक विद्यार्थी आपली स्वत:ची राखी तयार करतो व शाळेतील प्रत्येक बालकास राखी बांधली जाते.एवढेच नव्हे तर देशप्रेम जागृत व्हावे म्हणून विद्यार्थी सैनिकांना शिक्षकाच्या मदतीने राख्या पाठवितात.




१०)**गांडूळ खात निर्मिती**:- परिसरातील पाला-पाचोळा गोळा करून गांडूळ शेतकऱ्यांचा मित्र आहे ही भावना वाढीस लावून विद्यार्थी स्वतः गांडूळ वेचून खत तयार करतात.परिसरातील घनकचरा याचे नियोजन गांडूळ खतासाठी केले जाते.

११)**बालआनंद मेळावा** :- या उपक्रमात सर्व पालकांना आमंत्रित केले जाते व 'माझी कमाई' या उपक्रमातून विद्यार्थी स्वतः खाऊ तयार करतात आणि खरेदी विक्री करून नफा/तोटा महत्व समजून घेतात.

१३) **विज्ञान प्रदर्शन** :- प्रत्येक विद्यार्थ्यात वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लागावा म्हणून विद्यार्थी स्वतः प्रयोग करतात व प्रदर्शनात ठेवतात विद्यार्थांचा सर्वांगीण विकास व्हावा हे शिक्षणाचे ध्येय आहे.केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर त्याला उपक्रमाची जोड दिली तर विद्यार्थ्यांमधील कल्पकता,जिज्ञासावृत्ती,शोधक वृत्ती,सुप्त गुण व आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. आम्ही फक्त थोडेसे मार्गदर्शन व जास्त निरीक्षण करतो.निरीक्षण करतांना विद्यार्थ्यांच्या कामात , एकाग्रतेत बाधा येणार नाही याची काळजी घेतली जाते जेणेकरून ती लाजून विचलित होवू नयेत .प्रत्येक काम ती स्वयं प्रेरणेनं ,स्वतः ची कल्पकता वापरून करतात.हल्लीच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच व्यावसाईक कौशल्य सुद्धा प्राप्त होणे गरजेचे आहे.यासाठी कुशल मार्गदर्शक तथा शाळेस समर्पित व्यक्तीमहत्व सर्व शिक्षकांच्या रूपाने या शाळेस लाभले आहे.म्हणतात ना , गुरुविना विद्या नाही आणि योग्य मार्गदर्शकाशिवाय सफलता नाही.अशाप्रकारे बहुरंगी उपक्रमांनी सजलेली,नटलेली आमची शाळा "उपक्रमांची खाण" आहे, येथील १२२ विद्यार्थी काही ना काही उपक्रमात गुंतलेले असतात .

=====@=====

22. स्थानिक / भौगोलिक व सामाजिक परिस्थितीनुसार घेतलेले विशिष्ट उपक्रम

शाळेचे नाव : जि.प.हायस्कूल व क. महा. पिंपळगाव / सडक, ता. लाखनी , जि. भंडारा
ई-मेल : zphspimpalgaonsadak@gmail.com
मुख्याध्यापकाचे नाव : श्री . प्रदिप मारोती गायधनी
शाळेचे व्यवस्थापन : जिल्हा परिषद



प्रस्तावना :

देशाला जशी स्थानिक भौगोलिक परिस्थिती असते तशी गावाला सुद्धा असते . ग्राम पिंपळगाव सुद्धा स्थानिक भौगोलिक व सामाजिक परिस्थितीनुसार विशेष आहे. हे गाव लाखनी तहसील पासून सहा किलोमीटर पूर्वेकडे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावर आहे .भौगोलिक परिस्थितीचा विचार करता मालगुजार तलाव , निसर्गाची नवलाई यांनी नटलेला दिसून येतो. विशेष म्हणजे मोठी राईस मिल व धान मोजणी केंद्र सुद्धा उपलब्ध आहे. ह्या गावचा शंकर पट हा प्रसिद्ध आहे. याची नोंद अभ्यासक्रमात दिसून येते. अशा एक ना अनेक सामाजिक, भौगोलिक परिस्थितीत समाविष्ट असलेला पिंपळगाव.

समस्या / आव्हान :

पण एकेकाळी प्रसिद्ध असलेली विस्तीर्ण जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय पिंपळगाव ज्यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी उच्च पद प्राप्त केलेले होते तीच शाळा विद्यार्थी संख्याअभावी तुटण्याच्या मार्गावर दिसून आली. या समस्येचा शोध घेऊन स्थानिक, भौगोलिक सामाजिक, परिस्थितीनुसार वेगवेगळे उपक्रम राबवून पुन्हा नावलौकिक मिळवून देण्याच्या प्रयत्न व संकल्प केला. त्याचे अनेक सकारात्मक परिणाम आज रोजी दिसून येत आहेत . प्रयत्नांती परमेश्वर ह्या उक्तीप्रमाणे आम्ही रुजू झाल्यानंतर सर्वांग विचार करून अनेक उपक्रम हाती घेतले व त्याच्या स्थानिक स्तरातून अभिनंदनामधून शाळेप्रति असलेली उदासीनता मात्र दूर होताना दिसून येत आहे .

नियोजन :

गृह/पालक भेट: लोकांची जिल्हा परिषद शाळेप्रति विश्वास निर्माण करण्यासाठी पालक संपर्क वाढवणे आवश्यक होते. शिक्षकांप्रति विश्वास निर्माण होण्यासाठी वर्ग 5 ते 12 च्या सर्व शिक्षकांनी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन पालक भेट घेतली . ह्या भेटीतून शिक्षकांचे अभ्यासाबाबत प्रत्यक्ष पालकांशी चर्चा झाल्याने अनेक गैरसमज दूर झाले. त्यामुळे पालकांनी शाळे बाबत समाधान व्यक्त करून उपक्रमाची प्रशंसा केली.

हाती घेतलेले विविध उपक्रम :

<u>स्वानुभवातून शिक्षण</u>

या अंतर्गत ग्रामीण भागातील विद्यार्थी प्रत्यक्ष देशाच्या कारभार राज्यसभेत, लोकसभेत ,संसदेमध्ये जाऊन बघू शकत नाही. मग याचा अनुभव घेता यावा म्हणून ग्रामपंचायत मासिक सभेत् सरपंचांच्या परवानगीने वर्ग 6 वी व 7 वी च्या विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली. गावाचा कारभारावर् चर्चा त्यांना प्रत्यक्ष बघता आले .वर्ग बारावी अकरावी ज्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाशी निगडित असलेल्या बँकिंग कार्यप्रणाली प्रत्यक्ष बघता यावा म्हणून बँक भेट आयोजित केली. बँकेच्या व्यवस्थापकांनी संपूर्ण कार्यप्रणाली समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमामुळे अभ्यासात गोडी होईल असे मत व्यक्त् केले.

<u>स्टुडंट पोलीस कॅडेट</u>

अंतर्गत सायबर गुन्हे, महिला अत्याचार कायदे अशा बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. आदर्श समाज व्यवस्थेसाठी ह्या बाबी अतिशय महत्त्वाचा ठरतात. अशा उपक्रमामुळे आपले हक्क,कायद्यांची माहिती होऊन समाजिक शांतता निर्माण होण्यास मदत होते. या मुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मबल् वाढीस लागले.



<u>उडान प्रकल्प अंतर्गत अदानी पावर प्लांट क्षेत्रभेट</u>

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उद्योग हे बघता येत नाही मोठ्या प्रकल्पापासून त्याला काही शिकता यावा म्हणून अदानीत पावर प्लांट ला क्षेत्रभेटी अंतर्गत वर्ग अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली त्यानंतर उदयोगाबाबत संपूर्ण माहिती जाणून घेतली ह्या उपक्रमाने तर विद्यार्थी खूपच आनंदी झाले.

स्पर्धेच्या आयोजनातून आत्मविश्वास निर्मिती : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गुरुकुंज आश्रम मोझरी अंतर्गत ग्रामगीता जीवन विकास परीक्षा आयोजित करून, एकलव्य स्पर्धा परीक्षा अशा स्पर्धांचे आयोजन केले गेले. यामध्ये विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झालेले आहेत. त्यामुळे त्यांच्या सामान्य ज्ञानात वाढ होईल. भविष्यात स्पर्धेला तोंड देण्यासाठी त्यांच्या उपयोग नक्की होईल .आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय NMMS, वर्ग पाचवी व आठवीची स्कॉलरशिप परीक्षा याचे विद्यार्थ्यांना महत्त्व पटवून देऊन परीक्षेस बसविले .त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासू वृतीत वाढ झाली.

समान संधी कार्यक्रम केंद्र

या अंतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अनेक योजनांबद्दल माहिती सांगितली जाते .प्रोजेक्टरद्वारे नामवंत व्यक्तिचे मार्गदर्शन दर शुक्रवारी विद्यार्थ्यांना शासनाच्या उपक्रमांतर्गत समाविष्ट करण्यात येतो .त्यामुळे विद्यार्थी प्रेरित होतात .



सर्वांगीण विकास

क्रीडा स्पर्धेत सहभाग अष्टपैलू विद्यार्थी असावा म्हणून विद्यार्थ्यांमधील कला गुण ओळखून आयोजित क्रीडा स्पर्धेत शाळेतील विद्यार्थ्यांची कबड्डीची टीम तयार केली गेली .त्यामुळे याच्या व्यतिरिक्त शाळेतील इतरही विद्यार्थी खेळांसाठी आकृष्ट झाले. एकंदरीत मोबाईलच्या या दुनियेत मैदानी खेळाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले . शिक्षणाबरोबरच विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून आरोग्य शिक्षण सुद्धा तितकाच महत्वाचा असतो. त्या दृष्टीने शाळेत शारीरिक शिक्षण व योगा अभ्यास घेतला जातो. त्यामुळे विद्यार्थ्याची अभ्यासात एकाग्रता वाढीस लागली.

फलनिष्पत्ती :

शाळेची भौतिक सुविधा शाळेची इमारत अतिशय जुनी असल्याने ती जीर्ण अवस्थेत आहे व मूळ शाळेपासून थोड्या अंतरावर नवीन इमारत तयार होत आहे. त्यामुळे सध्या दोन वेग वेगल्या जागी शाळा भरत असतानाही शाळेतील सर्व घटकांनी अनेक उपक्रमात सहभाग दर्शवल्यामुळे पालकांमध्ये शाळेबद्दलचा विश्वास, आपलेपणा निर्माण होऊ लागलेला आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिस्तबद्धता निर्माण झालेली असून विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय असते.प्रत्येक विद्यार्थी गणवेशात येत आहे .विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासू वृत्ती निर्माण झालेली आहे. लोकसहभाग वाढवल्यामुळे गावाच्या शाळेप्रती बघण्याच्या दृष्टिकोन बदलला असून शाळेची प्रशंशा , कौतुक करतात. एकंदरीत शालेय पोषक वातावरण निर्माण झालेले दिसून येत येत आहे.

===== @ =====

23. नाविन्यपूर्ण उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

शाळेचे नाव : - नूतन कन्या शाळा तथा कनिष्ठ महाविद्यालय भंडारा.

ई मेल आयडी :- principalnk@rediffmail.com

मुख्याध्यापकाचे नाव :- सौ. निलु राजेश तिडके

शाळेचे व्यवस्थापन :- खाजगी अनुदानीत

प्रस्तावना :

1982 साली गुढीपाडव्याच्या पावन पर्वावर स्थापन झालेली नवीन मुलींची शाळा, भंडारा द्वारा संचालित नूतन कन्या शाळा ही मुलींच्या शिक्षणासाठी भंडारा शहरात असलेली एकमेव शाळा.

शिक्षणाचा वसा हाती घेऊन संस्काराची व संस्कृतीची जीवनमूल्ये विद्यार्थिनीमध्ये रुजवून शैक्षणिक व सामाजिक समानता जपणारी हि शाळा म्हणजे भंडारा जिल्ह्याकरिता गौरवाची व अभिमानाची बाब.

इवलेसे रोप लावियले द्वारी
तियेचा वेलु गेला गगनावरी

या उक्तीप्रमाणे शाळेची किर्ती केवळ भंडारा शहरातच नव्हे तर महाराष्ट्रात सर्वदूर पसरलेली आहे .

सर्व प्रकारच्या भौतिक सुविधांनी सुसज्य तसेच प्रभावी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून परिवर्तनाच्या दिशेने पाउल टाकत उत्कृष्ट निकालाची उज्वल परंपरा टिकवून ठेवणारी व दैदिप्यमान गौरवशाली परंपरेचा वारसा पुढे नेणारी ही शाळा म्हणजे भंडारा शहराची शान आहे.

आव्हाने :

- शाळेत अपेक्षित बदल घडवून शिक्षक व पालकांची मानसिकता सकारात्मक व्हावी या साठी प्रयत्न करणे.
-
- शाळा व्यवस्थापन मंडळ यांनी संस्थेचे ध्येय विधान व व्रत विधान पूर्ण करण्याकरीता शिक्षकांची तयारी करणे.
- शहराच्या मध्यभागी शाळा भरत असल्यामुळे परिसर व सामाजिक सहसंबंध, परिवहन व मुलींची सुरक्षा यावर लक्ष केंद्रित करणे.
- BPL व वंचित घटकातील विद्यार्थिनींची संख्या अधिक असल्याने सर्व समावेशक शैक्षणिक विकासासाठी वातावरण निर्मिती करणे व सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे.

उपाययोजना :

- शाळेत अपेक्षित बदल घडवून आणण्याकरिता पालकांची मानसिकता सकारत्मक व्हावी यासाठी पालकांशी हितगुज व शाळेच्या विकासात भागधारक म्हणून पालकांची भूमिका पटवून दिली व विविध उपक्रमात सहकार्य घेतले.
- शाळा व्यवस्थापन मंडळ आणि संस्थेचे ध्येय विधान व व्रत विधान पूर्ण करण्याकरीता मासिक शाळा सहविचार सभा तसेच साप्ताहिक विषय निहाय सहविचार सभा आयोजित करून विद्यार्थिनींची संपादणूक पातळी वाढविण्याकडे विशेष लक्ष दिले जाते. शाळेचे विभाग वाटप मुख्याध्यापक व सहशिक्षक यांना एकत्रितपणे चर्चेद्वारे करवून घेतेले जाते. तसेच शिक्षकांना त्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक विकासासाठी मुख्याध्यापाकांतर्फे प्रोत्साहन देण्यात येते.
- विविध समस्यांचे निराकरण करण्याकरीता विविध समित्या स्थापन करून उपाययोजना करण्यात आल्या. यासाठी परिसरात राहणारे मान्यवर व्यक्ती, पोलिस, नगरसेवक,परिवहन विभाग यांच्याशी वेळोवेळी चर्चा करून मार्गदर्शन घेतेले व गरजानुरूप उपाययोजना केल्या.
- सर्व वर्गशिक्षकांकडून व विद्यार्थिनीकडून सामाजिक – आर्थिक Profile तयार करून घेतले. विभाग प्रमुखांना सूचना देवून सर्वसमावेशक स्पर्धा आयोजित करून सर्वाना समान संधी देण्यात येते.

शाळेत राबविण्यात येत असलेले नाविन्यपूर्ण उपक्रम :

1) **Cyber Safety :**

भंडारा जिल्हा पोलीस सायबर सेल यांच्या विद्यमाने शाळेत 13 ते 18 वयोगटातील मुलींना सायबर सुरक्षेबद्दल मार्गदर्शन करून नियमितपणे प्रात्याक्षिके घेण्यात येतात. या व्यतिरिक्त वर्गावर्गात मोबाईल व इंटरनेटचा योग्य वापर व गैरवापर टाळणे या संदर्भात प्रत्येक महिन्याला मार्गदर्शन केले जाते.

2) **विद्यार्थी सुरक्षा.**

शाळेतील सर्वच वर्गखोल्या, पटांगण , पार्किंग, व शालेय परिसरात CCTV कॅमेरे लागले असून विशेष निरीक्षण कक्षातून विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टीने नजर ठेवली जाते. CCTV च्या माध्यमातून विद्यार्थिनींची वर्गातील व परिसरातील वागणूक तसेच मोबाईलचा गैरवापर टाळण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. दामिनी पथक व टोल फ्री क्रमांक 112, विद्यार्थिनी तक्रार निवारण समिती, मातापालक संघ, शिक्षक - पालक संघ, यांच्या मार्फत विद्यार्थिनींचे व पालकांचे समुपदेशन व सदुपदेशन केले जाते.

3) **मूल्यमापनाची नवीन तंत्रे .**

कोरोना परिस्थितीवर मात करतांना विद्यार्थिनींचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी उचलेल्या पावलांतर्गत मूल्यमापन Online पद्धतीने व तंत्रज्ञानाच्या मदतीने करायला सुरवात केली असून Google Form, Survey Links, MCQ, Aid Puzzle, Cahoots व OMR Sheet यांचा वापर करून मूल्यमापन केले जाते.

4) **व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन.**

शाळेत समानसंधी केंद्र व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत विद्यार्थिनीनकरीता शाखा निहाय व्याख्यानमाला आयोजित करून विविध व्यवसायाच्या संधी व 10 वी व 12 वी नंतर विविध स्पर्धा परीक्षा प्रवेशा बद्दल तज्ञ शिक्षकांची चमू व व्यवसायातील तज्ञ मंडळी यांचे कडून प्रत्येक शनिवारला अभ्यास सत्र व उद्बोधन वर्ग घेतले जातात.क्षेत्रभेटी अंतर्गत Adani Power Plant, Banks, उत्पादन केंद्रे, Hospital सोबतच सामाजिक क्षेत्रभेटी अंतर्गत वृद्धाश्रम, अनाथाश्रम, तसेच ध्यानकेंद्राला भेट दिली जाते.

5) **स्वच्छ व सुंदर शाळा**

केंद्रसरकारच्या शालेय शिक्षण मंत्रालयामार्फत राष्ट्रीय स्तरावर 'स्वच्छ विद्यालय पुरस्कार' स्पर्धा घेण्यात आली. यात जिल्ह्यातील सर्व शाळांनी सहभाग घेतला. त्यापैकी 14 शाळांना स्वच्छ विद्यालय पुरस्कार घोषित करण्यात आला. त्यात नूतन कन्या शाळेचा क्रमांक असून राज्य स्तरावर Online Zoom Meeting द्वारे माननीय प्राचार्य सौ. सीमा चित्रिव व समन्वयक श्री. नदिम खान यांनी सादरीकरण केले " Behaviour Change And Capacity Building मध्ये शाळा 105 गुण घेऊन उत्कृष्ठ ठरली व राज्य स्तरावर जिल्ह्याचे नेतृत्व केले. Rain Water Harvesting असलेली जिल्ह्यातील एकमेव शाळा आहे.

6) **किशोरवयीन मुलींचे आरोग्य.**

जिल्हा सामान्य रुग्णालय व National Health Mission अंतर्गत विद्यार्थिनींचे Health Card तयार केले असून प्रत्येक महिन्याला सेवाभावी संस्था व आरोग्य विभागाकडून विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी केली जाते. यात Blood Test, HB, Anemia व विद्यार्थिनींच्या वैयक्तिक स्वास्थ व स्वच्छतेबाबत समुपदेशन व मार्गदर्शन केले जाते. शाळेत Sanitary Napkin Vending Machine सोबतच Incinerator चा वापर केला जातो. किशोरवयीन मुलींची ध्यान केंद्राला भेट देऊन मानसिक आरोग्य सुदृढ राहावे यासाठी काळजी घेतली जाते.

7) **मुल्याधिष्टीत शिक्षण आणि विद्यार्थी विकास**

दैनिक परिपाठा अंतर्गत शालेय प्रार्थना, दिनविशेष, सामान्य ज्ञान, विविध विषयांवर विचारपुष्प सादर करून विद्यार्थिनींमध्ये नैतिक मुल्यांची रुजवणूक केली जाते.

8) **शाळा सिद्धी स्वयंमूल्यमापनातून गुणवत्ता विकास.**

नूतन कन्या शाळा तथा कनिष्ठ महाविद्यालय शाळा सिद्धी मुल्यामापनात जिल्ह्यात सर्वाधिक गुण मिळालेली उच्च माध्यमिक शाळा असून SS – 2016 अंतर्गत A ग्रेड मानांकन प्राप्त शाळा आहे. इतकेच नव्हे तर

जिल्ह्यात इतर शाळांना मार्गदर्शन आमच्या शाळेतून केले जाते. राज्यस्तरीय A परीक्षक व प्रशिक्षक म्हणून शाळेतील शिक्षक सहभाग घेतात व जिल्ह्यात उद्बोधनपर प्रशिक्षण व कार्यशाळा घेतात.

9) भाषा/ इंग्रजी/ गणित- विज्ञान / सामाजिक शास्त्र या विषयांबाबत नाविन्यपूर्ण उपक्रम

इंग्रजी भाषेसाठी Digital Language Lab असणारी राज्यातील पहिली शाळा असून मराठी, इतिहास, भूगोल, गणित यांच्या प्रयोगशाळा तसेच जीवशास्त्र, रसायनशास्त्र, व भौतिकशास्त्र या विषयांच्या स्वतंत्र व सुसज्ज प्रयोगशाळा असून रोज तासिका निहाय प्रात्याक्षिके घेतली जातात. अभिनव उपक्रमांतर्गत प्रथमच अशी वाणिज्य व Banking प्रयोगशाळा, गृहव्यस्थापन, वस्त्रशास्त्र, अन्नशास्त्र, या विषयांसाठी प्रशस्त अशी सुसज्ज प्रयोगशाळा शाळेत उपलब्ध आहे. कृतीतून शिक्षणावर भर देत विद्यार्थी घडविले जातात. Spoken English Club च्या माध्यमातून सर्व स्तरावरील विद्यार्थिनींना विविध उपक्रम राबवून Spoken English चा सराव व भाषा सुधार मार्गदर्शन केले जाते.

10) माध्यान्ह भोजन योजनेचा सकारात्मक परिणाम

या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना उत्कृष्ट दर्जाचे पोषण आहार दिले जातो . पोषण आहारासोबातच पूरक पौष्टिक आहार देवून विद्यार्थिनींच्या सुदृढ आरोग्याची काळजी घेतली जाते.

11) विषय कोपरा

सृजन फलक, नवकल्पना, लेख, कविता, वाचन कोपरा, व साधन कोपरा विकसित केले असून त्याचा योग्य वापर विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी विषय शिक्षक करतात.

12) नेचर क्लब, हेरीटेज क्लब

शाळेत राष्ट्रीय हरित सेना व इको क्लबची स्थापना झाली असून त्याअंतर्गत वृक्षदिंडी,वृक्षारोपण, परसबाग व्यवस्थापन, वन्यजीव सप्ताह इ. उपक्रमात वनविभाग तसेच सेवाभावी संस्था मार्फत विविध उपक्रमात शाळेचा सहभाग असतो. शाळेच्या एका शिक्षकाची महाराष्ट्र सरकार कडून मानद वन्यजीव रक्षक या पदावर नियुक्ती झालेली आहे.

13) अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर (E- Learning)

Smart Classes तयार करून Smart TV, Cloud, Internet, Projector व Online विषय अध्यापन इ.चा वापर केला जातो. सोबतच Read To Me, Diksha App चा अध्ययन अध्यापनात वापर केला जातो. प्रादेशिक विद्या प्राधिकरण , CHEES, MOOC, ENGLISH ONLINE, NISHTHA प्रशिक्षण व SCERT, MIEPA, NIEPA व SWAYAM द्वारे शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे.

फलनिष्पती

कला क्षेत्रातील यश:

अभ्यास पूरक कार्यक्रमाअंतर्गत विविध शासकीय कार्यालय, अशासकीय संस्था यांनी आयोजित केलेल्या विविध कला स्पर्धांमध्ये शाळेच्या विद्यार्थिनींचा सक्रीय सहभाग असतो. रांगोळी ,भित्तीचित्र, पोस्टर, बौद्धिक, गायन, पथनाट्य व विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये शाळेने नेहमीच प्रथम क्रमांक पटकविला आहे.

क्रीडा क्षेत्रातील यश :

क्रीडा क्षेत्रात दैदीप्यमान यश शाळेने संपादन केले असून जिल्हा क्रीडा कार्यालय पासून ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून विजय प्राप्त केला आहे. चालू सत्रात विविध स्तरावर शाळेच्या 58 चमू सहभागी झाल्यात त्यात नेटबॉल, सेस्टोबॉल, हॅन्डबॉल, फुटबॉल,हॉकी, बॉलबॅडमिंटन, आट्यापाट्या, सेपकटकरा,स्क्वॉश अशा विविध खेळांमध्ये जिल्हा ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत विद्यार्थिनींनी दैदिप्यमान यश प्राप्त केले असून विविध खेळांमध्ये 25 पेक्षा जास्त विद्यार्थिनींनी शाळेचे तसेच जिल्ह्याचे नेतृत्व करून यश संपादन केलेले आहे.

राष्ट्रीय छात्र सेना मधील विशेष यश

3 Maha Girls Batallion असलेली जिल्ह्यातील एकमेव शाळा थलसेना Camp, राष्ट्रीय एकात्मता Camp, CATC व RD Camp मध्ये उत्कृष्ट सहभाग व अनेक बक्षिसे जिंकणारी चमू. Drill ,अनुशासन, शस्त्र प्रशिक्षण, नेतृत्व क्षमता विकास व एकता या मूल्यांचे शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते. जिल्ह्यातील RD Parade मध्ये उत्कृष्ट Marching साठी प्रथम पुरस्कार प्राप्त करणारी शाळा असून शाळेत राष्ट्रीय छात्रसेने करिता वेगळा कक्ष व मैदान उपलब्ध आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेतील यश

NMMS परीक्षेत 07 , सारथी शिष्यवृत्ती परीक्षेत 02 पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत 07 आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत 02, अशा विविध शिष्वृत्ती परीक्षेत विद्यार्थिनी पात्र ठरल्या आहेत.

इतर सन्मान /पुरस्कार

- शालेय शिक्षण विभाग जिल्हा परिषद भंडारा तर्फे उत्कृष्ट शाळा म्हणून पुरस्कृत.
- जिल्ह्यातील जिल्हा क्रीडा संघटक पुरस्कार प्राप्त शाळा.
- MKCL तर्फे उत्कृष्ट सहकार्यासाठी शाळेला प्रमाणपत्र प्राप्त.
- उच्चमाध्यमिक शालान्त परीक्षेत कला,वाणिज्य व विज्ञान शाखेतून जिल्ह्यात प्रथम व द्वितीय क्रमांक पटकविण्यात तसेच विभागातून प्रथम येण्याचा मान शाळेने प्राप्त केलेला आहे . माध्यमिक शालान्त परीक्षेतही 30 पेक्षा अधिक विद्यार्थिनींनी 90% पेक्षा अधिक गुण पटकविले आहेत.

===== @ =====


.

24. Educational development of child through different ways.

Name of the School - Anjuman Khairul Islam Urdu Girls High School , Kurla (W) Mumbai
Email Id - akigkurla@gmail.com
Name of Head Mistress - Ansari Rubina Parveen Mohammed Sualeh
Management - Private Aided

INTRODUCTION:-

Successful schools support all students needs inside and outside the classroom to help them and became effective empowered learner .It also design and carry out programs that offer all students a rich educational experience , supporting their academic and Social and emotional learning. . So they develop the skills needed to succeed in an ever changing environment. It also provides opportunities for students to explore carriers and nurture their talents and interest including through with partnership with their Communities. Schools play vital role in each student-s life.



Student-s success should be a teachers first priority. For getting grade out teachers took many efforts, which will help our teachers gaining students full potential and success.

- Planning and implementation

For achieving purpose our school conducted different ways of educational development of our children. We have expert Teachers they took test for week students. Our teachers made a copies of interesting articles and prepared some activities (questions, true false statement, games, puzzles , flash card etc.) to use with the each one, teachers use the copy with the different classes even use the same articles with many level . We gave really simple activities to low level and with advanced learner with think more difficult task.

Instead of this our teachers adopted sum of weak students and work on them they gave they personal attention to improve them. Making more easier are teachers made so many projects and teaching aid for activity based learning which help you which help us students to learn more easily with the play way method.

Frequently we managed guest lecture and called expertise is for achieving goals.
God's gracious we have expert teachers who work hard and use a different techniques and strategies for inculcating the knowledge.

SPORT AND HEALTH HYGIENE

Parents invariably expect their children to be in a learning environment which is safe secure and hygienic. To provide healthy and hygienic learning spaces to the student are to our school to precautions on major issues like water, medical facilities, and health consciousness. So in order to avoid these issues we installed the well-equipped water purifier. It will help our school pupils away from various diseases especially during the monsoon.
In order to balance the health graph of school students and to avoid any health crisis, we frequently planned for a medical care center in the school campus.

SPORTS

We can't deny that sports help in the overall development and growth of a student. As we know that there are many famous sports person who wear indeed Grace Scholars in studies but made their careers in sports. Keeping this aspect our school organized many activities in sports like parade, Band, yoga Karate, annual sports with the help of instructor and coaches and took ours students to state and national level.

MAKING OF FUTURE LEADER ¤..(Investiture Ceremony)

Every beginning of the new academic year brought in a fresh round of election. Which was conducted in our school in most democratic way. The students selected the leaders as fair as it could be. It will help us to frame a responsible citizen to our students.

ALL ROUND DEVELOPMENT

CO- CURRICULAR ACTIVITIES AND CELEBRATIONS

“The quality of school life is determined by its activities”

Our school truly believes that physical as well as mental activities play a vital role in building bright future of the children. There are plethora of co- curricular activities are held in our school like essay competition, Elocution, mono acting ,debate quizzes, drawing, ghazal goyee, PCRA competitions, Olympiad, dramatization, spell bee, mimicry, celebration. Every year for motivating young artist and developing their creative talents we participated our students in elementary and intermediate exam and gracious of God each year we own the prizes with high grade.







.

VISITS

Every year our school organized different places for visit to our students .Along with the ८० student visited the police station and hospital nearby to understand the functioning of the police force and hospital it help student to gain a real world experience that cannot be taught in a classroom. Opening their minds and strengthening their knowledge of the world it is beneficial for our students.







SCIENCE EXHIBITION

Every year in the month of December our school participated in science exhibition. The students came forward with a new creative ideas and models on different concept and on the prizes.



SKILL DEVELOPMENT

Skill development helps to build strong foundation for students at the school level. It is helps our students to build self-esteem confidence and leadership skills. It helps student became independent thinkers and encourages them to plan their future for achieving these goals. our school organized different courses like beautician , stitching, cooking , craft work, coding , robotics , calligraphy , summer camp, plantation, Karate , chocolate making, cake making.







WE WORK BEST WHEN WE WORK TOGETHER ¤¤¤¤¤.

We belief that success begins with the co- ordination of parents, so for this purpose we co-ordinate with the parents, literate them, counsel them. Our core element of our continuous successful result is our parents. Since last २० years our school has allotted २० parents to each teacher. Our teachers teaches parents with their availability .Our teachers took the classes before and after the school .On Friday after school literacy classes arranged for the parents .For those who are not able to come to school our teachers made allotment their times with them in their residential home and enable the parents to read and write with simple and easy method and enable them to understand the importance of education in day today life.





OUT COMES;

After applying these strategies our parents were ¤

- Able to read and write.
- able to sign
- able to fill the forms
- Able to make Aadhar card and upgrade it.
- able to talk confidently
- Able to know the assignment and studies of their children◦s.
- To promote their children◦s towards studies.

This is the factor of our grand continuous successful result and this series will continue without stopping.

NEW INNOVATIVE IDEAS

I. After Covid ٩٩ period our school took shabby look for improving this or infrastructure of school we implement (C.I.F) idea to change the layout of classroom. our students collected the funds by fun fair food Mela activities. instead of these our students make so many best things from waste material and decorated our school.

By recycling the broken benches we made pots, podium, and many more things.

II. For preserving energy and tiger we implemented rallies, posters, lecture, and organized a Cancer prevention program.

III. FOR A TOMORROW THAT◦S FANTASTIC¤¤ For making ecofriendly nature avoid plastic our student made many paper and cloth bags having school names and distributed to so many peoples around the school and to the shopkeepers.

IV. For celebrating azadi ka Amrit mahotsav various activities held including seminar, painting competitions, slogan writing, role play, poetry competitions, motivational patriotic songs and dances which help our student to boost patriotic sentiments.

V. In our school we organize convocation ceremony for SSC students. This is special moment is cherished by one and all.

VI. A CLEANER INDIA FOR A GREENER INDIA ¤.(SWACHH BHARAT ABHIYAN)like all responsible citizens of our country enthusiastically our children did the swatch Bharat mission with the help of drawing competition with the theme of cleaner and greener India was conducted. To further the mission two bio composters were put in the school. Every week students would be chosen to bring the wet garbage from home and put it in the bio composter whom would in turn churn up manure from that garbage for the school plants and trees. The girls put their hearts and hands to the tasks given to them

VII. Mera aangan activity implemented in our school to uplift poor parents.

VIII. Involvement of students of for betterment of society by different activities and program.





ACHIVEMNETS OF TEACHERS AND STUDENTS

I. Sir Sayyed Trophy Extempore Elocution Competition Sr. Group १st Prize and २nd Runner up Trophy for Jr Group. (Each and every year)
II. Our teachers Mrs. Asia and Mrs. Yasmeen awarded by cash prize and certificate Best Seminar presentation.
III. For Ward level Elocution competition Lokmanya Tilak Jayanti Jr. Group १st Prize and Sr. Group १st Prize.
IV. For Zonal level Elocution competition Lokmanya Tilak Jayanti Jr. Group १st Prize and Sr. Group १st Prize.
V. For regional level Elocution competition Lokmanya Tilak Jayanti Jr. Group १st Prize and Sr. Group २nd Prize.
VI. १ST prize in debate competition, Essay writing competition and Drawing competition organized by PCRA (State Level).
VII. Inter school Social Science quiz competition got ३rd prizes २०२२.
VIII. Inter school Elocution competition got ३rd prize organized by Y & M Trust Mumbai.
IX. Our Teacher Mrs. Yasmeen got Best Teacher Award in the year २०२०-२१.
X. Each and every year
XI. In science exhibition we got first prize in Sr. Teaching Aid Maths.
XII. In speech competition we got a first prize, essay writing we got २nd prize.







SUM-UP

All the good work of this to school has been possible with the co-operation of our highly qualified and dedicated faculty. Our thanks to the management committee of our school for their able guidance

and encouragement. We encourage a child to observe, to explore, to experiment, to analyze, to confront problems and find the solutions and to develop the skills essential to face the future.


These journeys never stop. For continuing this successful journey we are assure that we will take a more efforts and hard work towards our goal and chase after it.

Link: Photos and YouTube Link

https://photos.app.goo.gl/tgNpgSRarDYSJyh۹۹

https://youtube.com/@akigirlshighschool-kurla३०३४

(PRIDE OF OUR SCHOOL FOR SSC)



===== @ =====

25. OUR MISSION TO CURB ENVIRONMENT DEGRADATION

School Name :C.E.S's MICHAEL HIGH SCHOOL, KURLA(W) , Mumbai

E MAIL ID :cesmhs1979@gmail.com

MANAGEMENT : Permanently Unaided

We need a solution to Pollution

We need to conserve nature, for our better future.

In whose hands this task to lie?

Who will lead the way?

The above questions emphasize on the threat our environment is facing. We are under going global degradation at an alarming rate and we need "Global Warriors" to change our fate. Can we find our warriors in the youth of today? Can we start the chain of awareness from our schools? Can we use education to curb degradation? The answer is positive. Knowing that we are on the right track; we at Michael high school began our journey in the year 1980 – 81 and decided to transform our students into "Global warriors".

The journey began by motivation and appreciation in the form of "Green coloured caps" awarded to our warriors by our foresighted Principal Mrs. Jean Moses Gomes. The seed was instilled, now nurturing is continuously done by the science and nature club team who select the global warriors from grades 5^{th} to 10^{th}. Through various workshops, field visits and awareness programs we inculcate in our global warriors a flame to serve Mother Nature. We at Michael High School keep fueling this flame and brightening it from time to time.

We take pride in listing the task undertaken by us and their objectives during the course of the year….

- Tree plantation drive to enable our global warrior to connect with nature.
- Cleanliness drives to inculcate in our warriors the value of dignity of labour. And promote a positive attitude towards healthy sanitation practices.
- Science cum Environmental week was conducted with an innovative theme "Science for humanity" to emphasize the importance of science and its role in human development.
- We upgrade our students cognitive skills by conducting quiz competitions, Essay writing competitions, Poster making (leaf painting),debate competitions at various levels.

- We observe important days viz: Biodiversity Day, World Water Day, Energy Conservation Day, World Forestry Day, World Population Day and many more add-ons to make students aware of their surrounding and their habitat.
- We conduct workshops (viz: Health and Hygiene), field visits (viz Educational field trip to Karjat), Rallies to help our students connect with society and understand the role society plays to curb environmental issues.
- We participated in and undertook the Swachhata project, Vigyan Melava, inspire award project, Science exhibition to help our students develop healthy competition and rise above their limitations.

- We educated our students on the scope of Biology, Chemistry. Conducted career guidance programs, Aptitude test and an Emotional development and wellbeing program to keep our warriors prepared for their future endeavors.
- The POCSO Act talk, Girl Child Rally, Mother – daughter talk, Women's Safety (traffic Police), Safety measures during disasters are a way to make our students street smart to deal with dangers in an urban environment.
- The above mentioned list is just the outer core of the herculean task we the Michaelites have undertaken. We are a youthful team of dedicated teachers and sirs headed by a very progressive management that guides and motivates us to give our best. We are surrounded by greens and supplemented with all the facilities and modern technologies to assist and bring out the best from our global warriors and aspirants.

OUR STAR ACHIEVEMENTS WORTH MENTIONING

Going back to memory lane, we were awarded 3rd prize of ₹ 75000/- for Swachha School. The amount was used for the laboratory work and installation of solar panels.

This year our school was awarded a five star rating for Swachha Vidyalaya Puraskar.

We really are grateful to the department for appreciating and acknowledging our work.

Blessings make us rise, we teach "LEARN TO BE WISE".

"We as Educationist recognize the immense power of this budding generation.
Let's use their potential for making better our nation.
Teaching them to be kind to nature, will enable them to have a brighter future.
'Healing Nature' should be our vision.
Let's join hands and begin our mission…"

===== @ =====

26. नेचर क्लब (निसर्ग मंडळ)

शाळेचे नाव - कॉसमॉस हायस्कूल , गणेश चौक, काजूपाडा, बोरीवली पूर्व, मुंबई

ईमेल आयडी - cosmos.highschool.marathi@gmail.com

मुख्याध्यापिका - स्वप्नाली रमेश ठाकरे

शाळेचे व्यवस्थापन - खाजगी अनुदानित



प्रस्तावना :

शाळा ही सर्वांगीण विकासाचा पाया भक्कम करणारे एक माध्यम आहे. नवनवीन गोष्टी शिकण्याची संधी शाळा विद्यार्थ्यांना देत असते. त्यातूनच विद्यार्थ्याला स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळते. शाळेमुळे सर्वांगीण विकास म्हणजेच बौद्धिक, सामाजिक, मानसिक, शारीरिक व नैतिक विकास होत असतो. शिक्षणशास्त्र हे काळानुसार बदलत, विकसित होत गेले. विद्यार्थी विकासाच्या अनुषंगाने पोषक बाबींचा, तंत्रांचा विचार आणि विस्तार होत गेला. शिक्षण देतानाच विद्यार्थी विकासासाठी नवनवीन प्रयोग, संशोधन आणि काळाची गरज समजून नवीन उपक्रम अमलात आणले जात आहेत.

समस्या

विद्यार्थ्यांना शाळेत शालेय विषयांच्या शिक्षणाबरोबरच समाज जाणण्याची आवश्यकता असते. याच सामाजिक विकासाची जबाबदारी लक्षात घेऊन आमच्या शाळेचा परिसर पाहता असे लक्षात आले की परिसरातील लोकांमध्ये पर्यावरणीय समस्या, पर्यावरणाप्रती जाणीव, निसर्गाचे जीवनातील महत्त्व, आपल्या छोट्या छोट्या कृतीतून निसर्गाला पोहोचणारी हानी, पर्यावरणातील घटकांचे रक्षण करण्याची जबाबदारी, प्रदूषणास कारणीभूत घटक या कोणत्याच बाबतीत जागृती नाही. निसर्गातील एक घटक म्हणून प्रत्येक व्यक्तीस जोपर्यंत ही जाणीव होत नाही तोपर्यंत पर्यावरण संवर्धन, संरक्षण या गोष्टी अस्तित्वात येणे अशक्य आहे. **पर्यावरणाबाबत जागृतीचा अभाव** ही समस्या होती.

नियोजन

परिसरातील पर्यावरणाबाबतीत असलेली अनभिज्ञता जाणवल्यानंतर यामध्ये बदल घडवून आणणे आवश्यक आहे म्हणून शाळेच्या विद्यार्थ्यांमार्फत हे कार्य करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. स्वप्नाली ठाकरे यांनी नियोजन केले.

- पर्यावरणीय ज्ञान समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी अनेक पर्यायातून **निसर्ग मंडळ** ची निवड केली .
- प्रत्येक वर्षी दोन शिक्षकांची निसर्ग मंडळ प्रमुख म्हणून नियुक्ती केली .
- वर्षभर निसर्ग मंडळ अंतर्गत राबविण्यात येऊ शकणाऱ्या उपक्रमांची आखणी केली .
- हे सर्व उपक्रम चार विभागात विभागण्यात आले.
- या उपक्रमात सर्व विद्यार्थी सहभागी होऊ शकतील असे नियोजन केले .
- प्रथम सभा घेऊन निसर्ग मंडळ स्वरूप ,उद्दिष्टे ,कार्य ,महत्त्व, गरज व परिणाम या सर्व गोष्टी स्पष्ट करण्या बाबत नियोजन केले .

उपक्रमाचे स्वरूप

निसर्ग मंडळ हे शाळेत **"कॉसमॉस निसर्ग मंडळ"** या नावाने कार्यरत आहे. सन 2013 साली या मंडळाची स्थापना करण्यात आली. यातील उपक्रमांचे नियोजन पुढील प्रमाणे-

- सामाजिक वनीकरण विभाग ठाणे, हरित सेना यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यक्रमांची उपक्रमांची यादी बनविण्यात येते.
- निसर्ग मंडळ अंतर्गत घेण्यात येणारे उपक्रम हे प्रमुख चार विभागात विभागले जातात .

1. विविध उपक्रम
2. सण-उत्सव माध्यमातून जनजागृती
3. दिनविशेष
4. क्षेत्रभेटी

- विविध उपक्रमांतर्गतस्वच्छता -, आजार, जल साक्षरता, पर्यावरण साक्षरता, अन्नभेसळ, बाग निर्मिती, ई कचरा-व्यवस्थापन, कागद व्यवस्थापन, प्रत्येक वस्तुंचा पुनर्वापर अशा विविध विषयांचा समावेश असतो .
- प्रत्येक धर्मातील विविध सणांच्या माध्यमातून समाजात पर्यावरण विषयक जागृती करण्याचा मंडळाचा हेतू असतो .
- वर्षभरात पर्यावरणाशी निगडीत असणारे जागतिक स्थानिक दिनविशेष साजरे करून पर्यावरण संरक्षण/ संवर्धनाचे - उद्दिष्ट गाठले जाते.

प्रत्यक्ष अंमलबजावणी

वर्षाच्या सुरुवातीलाच मुख्याध्यापक सभेचे नियोजन करतात. त्यात निसर्ग मंडळाची जबाबदारी इच्छुक शिक्षकांवर सोपविली जाते. शाळेतील विद्यार्थ्यांची निसर्ग मंडळ सभासद म्हणून निवड होते. प्रथम सभेत निसर्ग मंडळाची उद्दिष्टे स्पष्ट केली जातात.

उद्दिष्टे

विद्यार्थ्यांना निसर्ग संरक्षणाबाबत जागृत करणे.

- नैसर्गिक स्त्रोतांचे रक्षण करणे. समजपूर्वक वापर करणे .
- निसर्ग घटकांच्या जतनाची जाणीव करून देणे .
- निसर्ग संवर्धनात 'माझी' भूमिका जाणणे .
- प्रत्येक धर्मातील सण निसर्ग संरक्षणाच्या दृष्टीने विचार करून साजरा करणे.

त्यानंतर वर्षभरात घेण्यात येणाऱ्या उपक्रमांची आखणी होते. त्याचे स्वरूप थोडक्यात असे असते .

उपक्रम

- **कुतूहल कोपरा** विद्यार्थ्यांच्या मनातील निसर्ग बाबत जिज्ञासा प्रश्न रुपात विचारून -ज्ञानप्राप्ती .
- **निसर्ग वाचन कट्टा**लेखन -परीक्षण- निसर्गाबाबत ज्ञान देणाऱ्या पुस्तकांचे वाचन -
- **सीडबॉल्स** .सीडबॉल्स निर्मिती -सहज शक्य -वृक्ष संवर्धनाची गरज -
- **जागो ग्राहक जागो** .ग्राहक म्हणून होणाऱ्या फसवणुकीपासून सावधानता -
- **माझी बाग**प्लास्टिक बॉटल्स -, कॅन, टायर्स यांच्या साह्याने बाग निर्मिती .
- **स्वच्छ परिसर अभियान**विविध उपक्रम-
- **शून्य कचरा मोहीम** .मार्गदर्शन आणि कृती-
- **प्लास्टिक हटाव मोहीम**. रिसर जनजागृतीप-
- **पावसाळ्यातील आजार**मार्गदर्शन–

असे अनेक उपक्रम वर्षभरात राबवले जातात .

सण उत्सवातून जनजागृती

- **पतंगोत्सव** - पतंगावर घोषवाक्य लेखन, मांजा ऐवजी साध्या दोऱ्याचा वापर .
- **होळी** - पाण्याशिवाय नैसर्गिक रंगांचा वापर .
- **गुढीपाडवा** . णून ज्ञानकडुलिंब पाला औषधी म्ह -
- **वटपौर्णिमा** - वटवृक्षांचे महत्त्व महिला जनजागृती .
- **नागपंचमी** - जाणूया सर्पांविषयी .
- **दहीहंडी** - पाण्याचा अत्यल्प वापर, प्रबोधनात्मक हंडी .
- **रक्षाबंधन** - वृक्षांना राख्या बांधून निसर्ग रक्षणाची जबाबदारी.
- **गणेशोत्सव** - पर्यावरण पूरक मूर्ती, आरास निर्मिती, विसर्जन
- **प्रदूषण मुक्त दिवाळी** फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याची प्रतिज्ञा -इ.
- **श्रावणी सोमवार** धान्य -, दूध वाया जाते याबाबत जाणीव .

अशा सण उत्सवातून परिसरात जनजागृतीचा प्रयत्न .

दिनविशेष

- चिमणी दिन, गिधाड दिन, व्याघ्र दिन
- खारफुटी दिन, मीठी नदी दिन
- जलदिन, अक्षय्य उर्जा दिन, पर्यावरण दिन, ओझोन दिन, वसुंधरा दिन – पर्यावरण घटक जाणीव
- अंमली पदार्थ विरोधी दिन, जनसंख्या दिन, वाचन प्रेरणा दिन – जनजागृती

अशा विविध दिनांच्या माध्यमातून विद्यार्थी व परिसर यामध्ये जाणीव जागृती केली जाते.

भेटी

- संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
- अटल उद्यान

या परिसरातील व इतरही क्षेत्रांना भेटी.

फलनिष्पत्ती

कॉसमॉस निसर्ग मंडळ स्थापना 2013

निसर्ग मंडळ व विज्ञान मंडळ हे एकमेकांशी संलग्न आहेत.

काही ठळक पारितोषिकांचा उल्लेख

अ.क्र.	वर्ष	क्षेत्र	स्पर्धा	गुणानुक्रमांक
1	2014-2015	सामाजिक वनीकरण विभाग ठाणे	निबंध स्पर्धा	प्रथम आणि तृतीय
2		वर्ल्ड वाईड फाऊंडेशन फॉर नेचर	सादरीकरण	द्वितीय
3		मुंबई ग्राहक पंचायत	पथनाट्य	द्वितीय
4		इको फोक्स पर्यावरण नाट्य स्पर्धा	नाट्यलेखन नाटिका	प्रथम द्वितीय
5		निसर्ग मंडळ आर पूर्व विभाग जिल्हा स्तरीय		प्रथम द्वितीय
6	2015-2016	निसर्ग मंडळ आर पूर्व विभाग		तृतीय
7		इको फोक्स पर्यावरण नाट्य स्पर्धा	नाट्यलेखन नाटिका	द्वितीय तृतीय
8	2016-2017	विज्ञान मंडळ आर पूर्व विभाग		द्वितीय
9		विज्ञान नाटिका आर पूर्व विभाग		द्वितीय
10		सामाजिक वनीकरण विभाग ठाणे	निबंध स्पर्धा	द्वितीय आणि तृतीय
			वक्तृत्व स्पर्धा	तृतीय
11	2018-2019	विज्ञान मंडळ आर पूर्व विभाग		प्रथम
12	2019-2020	विज्ञान मंडळ आर पूर्व विभाग		प्रथम
13		निसर्ग मंडळ आर पूर्व विभाग		द्वितीय

14	2022-2023	निसर्ग मंडळ आर पूर्व विभाग		प्रथम
15		विज्ञान मंडळ आर पूर्व विभाग		तृतीय





पर्यावरणपूरक गणेश निर्मिती रिव्हर मार्च सहभाग





पारितोषिक स्वीकारताना कचरा व्यवस्थापन







. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान भेट अनुदानित शाळा द्वितीय क्रमांक


निसर्ग मंडळात कार्य करणा-या विद्यार्थ्यांनाही या मंडळाच्या कार्याचा फायदा झाला आहे. पर्यावरण संरक्षणाच्या संदर्भात नियमित काम केल्याने विद्यार्थ्यांचे विचार, लेखन हे विषयास धरुन प्रभावी होताना दिसतात. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना भाषेच्या उपयोजित लेखनात होताना दिसतो.

उदा. निबंध लेखन ,संवाद लेखन ,स्व-मत लेखन ,संभाषण ,भाषण

निसर्ग मंडळाचा कार्यालेख







(परिसरातील 1 किमीच्या परीघातील अंदाजे लोकसंख्या सुमारे 15000)

समारोप :

निसर्ग मंडळ हा आमच्या शाळेत राबविला जाणारा एक अत्यंत प्रभावी उपक्रम असून त्यामुळे संपूर्ण शाळा, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक निसर्गमय झाले असून पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन आणि जतन करण्याचे व्रत सर्वांनीच स्विकारले आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील ही पर्यावरण जाणीव जागृती त्यांच्या भावी आयुष्यासाठी आवश्यक आहेच. पण ती समाजापर्यंत पोहचविण्याचे शिवधनुष्य विद्यार्थ्यांनी पेलले आहे.

व्हिडिओ लिंक

१. शाळा बोलक्या भिंती - https://youtube.com/watch?v=YtLcE९LHNDo&feature=share

२. प्रदूषण मुक्त दिवाळी § https://youtube.com/watch?v=-L५yQEOtpSA&feature=share

3. निसर्ग मंडळ – https://youtube.com/watch?v=HaU7HhBcepU&feature=share

===== @ =====

27. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS)

शाळेचे नाव - शैलेंद्र एज्युकेशन सोसायटीचे मराठी माध्यमिक विद्यालय , शैलेंद्र नगर, दहिसर पूर्व, मुंबई 68.

मुख्याध्यापकांचे नाव- श्रीमती अनुराधा मुरलीधर शेनॉय

इमेल - radha123shenoy@yahoo.in

शाळेचे व्यवस्थापन- खाजगी अनुदानित

प्रस्तावना -

'विद्यार्थ्यांना उत्तम व दर्जेदार शिक्षण मिळावे आणि शालेय शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ व्हावी' या उद्देशाने केंद्र सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT) या संस्थेची स्थापना केली. या संस्थेकडून 1963 मध्ये **'प्रज्ञावान विद्यार्थी शोधणे व त्या प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे'** ही योजना संपूर्ण देशभर सुरू करण्यात आली. या योजनेचे योजनेत शिष्यवृत्तीची संख्या 350 होती, ती आता 750 पर्यंत वाढवण्यात आलेली आहे 2008-09 पासून या शैक्षणिक वर्षापासून राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेच्या धरतीवर आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा घेतली जात आहे. त्याचप्रमाणे पुणे येथील नवरोजी वाडिया कॉलेजच्या स्पर्धा परीक्षा केंद्रांकडून **महाराष्ट्र प्रज्ञाशोध** (MTS)परीक्षा घेतली जाते. NMMS ही शिष्यवृत्ती भारतात दरवर्षी एक लाख विद्यार्थ्यांना दिली जाते. यात राज्यांना कोटा ठरवून दिलेला असतो. महाराष्ट्रात सुमारे ११६८२ इतक्या विद्यार्थ्यांचा कोटा ठरवून दिलेला आहे. महाराष्ट्रात सुमारे ११६८२ इतक्या विद्यार्थ्यांचा कोटा ठरवून दिलेला आहे.

परीक्षेसाठी **मानसिक क्षमता चाचणी (MAT)** व **शालेय प्रवणता चाचणी (SAT)** असे दोन पेपर असतात. पेपर मधील सर्व प्रश्न **'बहुपर्यायी प्रश्न'** या स्वरूपाचे असतात. या प्रत्येक पेपरमध्ये 90 बहुपर्यायी प्रश्न असतात. प्रत्येक प्रश्नाला एक गुण असून परीक्षेसाठी 90 मिनिटांचा वेळ असतो.

आमच्या शाळेत येणारे बहुतांश विद्यार्थी हातावर पोट असलेल्या गरीब कुटुंबातून येत असल्यामुळे आमच्या शाळेने आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी असलेल्या **आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS)** या स्पर्धा परीक्षेची निवड केली. या परीक्षेची निवड करताना पुढील उद्दिष्टे ठरविण्यात आली...

उद्दिष्टे :

1. आर्थिक मागास विद्यार्थ्यांमधून प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा शोध घेणे.
2. त्यांच्या प्रज्ञाची जोपासना करणे, त्यात वृद्धी होण्यास मार्गदर्शन करणे.
3. त्यांचे बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण होण्यासाठी आर्थिक मदत मिळवण्यास साहाय्यभूत होणे.

NMMS स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेताना आलेल्या अडचणी व त्यावरील उपाययोजना

समस्या / अडचणी :

1. सदर परीक्षेसाठी पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा रुपये एक लाख पन्नास हजार इतकी असते. परंतु पालकांना उत्पन्नाचा दाखला कोठून व कसा मिळवावा याची माहिती नव्हती.
2. NMMS परीक्षेसाठी अभ्यासक्रम कोणता असेल त्यासाठी पुस्तके कोणती घ्यावी? लागतील परीक्षा शुल्क किती असेल? विद्यार्थ्यांसाठी जादा तास घेतले जातील का? त्यासाठी किती शुल्क आकारले जाईल? सराव कसा होणार? असे अनेक प्रश्न पालकांना पडले होते.

उपाययोजना:

यासाठी माननीय मुख्याध्यापकांनी पालक सभेचे आयोजन केले.

१. पालकसभेमध्ये पालकांच्या शंकांचे निरसन केले तसेच विद्यार्थ्यांना व पालकांना या स्पर्धापरीक्षेस बसण्यासाठी प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यास शाळा व सर्व मार्गदर्शन करणारे शिक्षक विद्यार्थ्यांना पुरेपूर मदत करतील याची हमी शालेय व्यवस्थापनाने पालक व विद्यार्थ्यांना दिली.

२. या परीक्षेसाठी शाळेतच मोफत मार्गदर्शन वर्ग शाळा सुरू होण्यापूर्वी घेतले जातात. यात मुलांना मार्गदर्शनाबरोबरच अधिकचा सराव करून घेतला जातो. ३ .दिवाळीसारख्या दीर्घकालीन सुट्टी व रविवारी देखीलही विद्यार्थ्यांसाठी जादा तासांचे आयोजन केले जाते. या सुट्टीतील ज्यादा वर्गांमुळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन होतेच. शिवाय विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करता आले.

४. याशिवाय इतर शाळातील मान्यवर शिक्षकांचे मार्गदर्शनपर व्याख्यानही आयोजित केले जाते. या मार्गदर्शनातून त्यांना स्पर्धा परीक्षेत सामोरे कसे जावे पेपर सोडवताना कोणती दक्षता घ्यावी कोणत्या युक्त्या-प्रयुक्त्या वापराव्यात याची माहिती देण्यात येते.

५. परीक्षा पूर्वी पंधरा दिवस अगोदर NMMSच्या सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करून त्यांच्याकडून किमान दहा प्रश्नपत्रिका मानसिक क्षमता चाचणी (MAT) व शालेय प्रमाणात चाचणी (SAT) सोडवून घेतल्या जातात तसेच प्रश्नपत्रिका ताबडतोब तपासून घेतल्या जातात व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक कौतुक केले जाते.

फलनिष्पत्ती:

आम्ही NMMS या स्पर्धेत २०१५-२०१६ पासून विद्यार्थ्यांना बसवीत आहोत. आतापर्यंत एकूण ९६ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळाली आहे.



पालक सभेचे आयोजन

शैक्षणिक वर्ष	एकूण प्रविष्ट विद्यार्थी	शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी	शिष्यवृत्तीची टक्केवारी
2015-16	18	07	38.89
2016-17	19	06	31.58
2017-18	19	06	31.58
2018-19	39	22	56.41
2019-20	71	25	35.21
2020-21	31	8	25.81
2021-22	55	22	40
2022-23	72	परीक्षा १८ डिसेंबर २०२२ रोजी झाली.	

वरीलप्रमाणे आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी या परीक्षेमध्ये भव्य यश संपादन केलेले आहे. या स्पर्धेसाठी आम्हा शिक्षकांना आमच्या माननीय मुख्याध्यापिका श्रीमती अनुराधा शेणॉय मॅडम यांचे नेहमीच मार्गदर्शन मिळते व सातत्याने प्रोत्साहनही लाभते. आमची शाळा व शाळा व्यवस्थापनही विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी, त्यांच्या गरजा तसेच शिक्षकांना हव्या असलेल्या सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी सदैव प्रयत्नशील असते. व्यवस्थापनातील सर्वच मान्यवर सदस्य वारंवार विद्यार्थी व शिक्षकांशी संपर्क साधून त्यांना सतत मार्गदर्शन तर करतातच व प्रोत्साहनही देतात

या परीक्षेसाठी श्री. प्रमोद लिंगायत, श्री. मदन दांगट व श्री प्रवीण मिरगळ मेहनत घेत असतात. आमचे विद्यार्थी व पालकही यात सहभागी होत असल्यामुळे ही आमची यशोगाथा अशीच पुढे वाटचाल करीत राहील, याबद्दल आम्हाला तीळमात्र ही शंका नाही.


NMMS चे शिष्यवृत्ती प्राप्त झालेले
विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक व प्राचार्य

शैक्षणिक वर्ष २०१५-१६


NMMS चे शिष्यवृत्ती प्राप्त झालेले
विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक

शैक्षणिक वर्ष २०१६-१७


NMMS चे शिष्यवृत्ती प्राप्त झालेले
विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक व प्राचार्य

शैक्षणिक वर्ष २०१८-१९


NMMS चे शिष्यवृत्ती प्राप्त झालेले
विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक व प्राचार्य

शैक्षणिक वर्ष २०१९-२०



शैक्षणिक वर्ष २०२१-२२

===== @ =====

28. घरगुती शैक्षणिक साहित्यातून पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विकसन

शाळेचे नाव - जि प प्राथमिक शाळा सुकळी, ता . कळंब , जि .यवतमाळ

मुख्याध्यापकाचे नाव - अमोल सुभाषराव पालेकर

ई-मेल - PALEKARS@GMAIL. COM

शाळा व्यवस्थापन - जिल्हा परिषद

प्रस्तावना -

विद्यार्थ्यांच्या पायाभूत भाषिक साक्षरता व संख्याज्ञान या साठी माता-पालक , वडील यांचा सक्रिय सहभाग फार महत्त्वाचा आहे. कोरोना महामारीच्या काळात तर सर्वत्र शाळा बंद असताना ' घरच्या घरी शिक्षण ' अंतर्गत विद्यार्थ्यांना आई - बाबा समवेतच शिक्षकांच्या मार्गदर्शनात शैक्षणिक धडे घ्यावे लागले. शाळेत मिळणारे शैक्षणिक वातावरण घरी निर्माण करता येईल का , घरी तसेच आजूबाजूचा परिसर यात उपलब्ध असंख्य शैक्षणिक साहित्यांचा उपयोग आई - बाबा, शिक्षकमित्र, विषयमित्र यांच्या सहकार्यातून करता येईल का , शाळा बंद असल्यातरी मुलांचे शिक्षण थांबता कामा नये, पुढे शाळा सुरु झाल्यानंतरही शाळेत व घरी मुलासाठी शैक्षणिक वातावरण निर्माण होवून आनंददायी , रचनात्मक , अनुभवातीत शिक्षण कसे होईल अशा विचार मंथनातून असे लक्षात आले की, पालकांचे सक्षमीकरण. पालकांचे समुपदेशन, कार्यशाळा घेवून, रचनात्मक शिक्षणाच्या प्रत्यक्ष कृती पालकांकडून करून घेतल्यास मुलांमध्ये पायाभूत भाषिक व संख्याज्ञान साक्षरता निर्माण करता येऊ शकते .

समस्या / आव्हान :

घरगुती शैक्षणिक साहित्यातून मुलांची पायाभूत भाषिक व संख्याज्ञान साक्षरता उद्देश साध्य करण्यासाठी पालकांकडे वेळेची कमतरता , त्यांचा लाजाळूपणा, तर काही पालकांचा अशिक्षितपणा या महत्त्वाच्या समस्या होत्या. सुकळी गावातील सर्व पालक कष्टकरी, शेजमजुरी करणारे लोक . सकाळी 7 वाजता कामावर जाणार व दुपारी 1 वाजता येणार. परत दुपारी 3: 00 वाजता जाणार ते सायंकाळी 7.00 वा येणार. मधल्या दुपारच्या दोन तासात त्यांची घरगुती कामे असायची. काही पालक तर मला तर वाचता, लिहिताच येत नाही त्यामुळे लाजायची, मी काय करू शाळेत जावून ही भावना असायची. तसेच घरातील वस्तू मुलांना पालक हाताळायला देतील की नाही ही सुद्धा एक अडचण होती.

प्रभावी कामासाठी केलेले नियोजन व अंमलबजावणी –

वरील अडचणीवर मात करून पालकांच्या सोयीनुसार दुपारी 2 ते 3 दरम्यान पालक सभा घेण्याचे ठरले. यात आणखी महत्त्वाची अडचण म्हणजे कोरोना काळ असल्याने ऑनलाईन सभेकरिता सर्व पालकांकडे अँड्रॉईड मोबाईल नव्हता, करिता गावातील शिक्षणमित्र, विषयमित्र यांना विनंती करून त्याच्या मोबाईलवर 2 - 2 च्या गटात पालक सभा घेवून शाळा बंद असतानाही व पुढे शाळा सुरु झाल्यावर मुलांचा, घरगुती





शाळा बंद ,शिक्षण सुरु

शैक्षणिक साहित्यातून पायाभूत भाषिक साक्षरता व संख्याज्ञान कसे विकसित करता येईल या विषयाची मांडणी करण्यात आली. काही पालक अशिक्षित असले तरी त्यांना व्यवहारज्ञान आहे , त्यांचाही उपयोग शैक्षणिक विकासात कसा करता येईल या विषयी सांगण्यात आले. घरगुती शैक्षणिक साहित्य मुलांना उपलब्ध करून देण्यास विनंती करण्यात आली. साहित्य हाताळताना मुलांनी- पालकांनी घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले . तसेच शिक्षक-पालक यांच्या अध्यापन पद्धतीत साम्यता असावी, करिता रचनात्मक शिक्षण पद्धतीची चर्चा करण्यात आली. अशी ही पहिली ऑनलाईन पालक सभा जुलै - 2020 च्या पहिल्या आठवड्यात घेण्यात आली. दुसऱ्या आठवड्यात पुन्हा पालकांच्या सोईने आगळीवेगळी पालकांची शाळा आयोजित केली. यात मुलांच्या भाषिक व अंकगणितीय साक्षरते करिता स्वयंपाक घरातील साहित्याचा कसा उपयोग करणार आहोत, परिसरातील वस्तूंचा कसा उपयोग करणार आहोत, साहित्यातून मुलांना अवकाशीय संकल्पना, जसे- लहान - मोठा, उंच ठेंगणा, आत-बाहेर, अंक ओळख, बेरीज, वजाबाकी क्रिया, ध्वनी, अक्षर ओळख, संवाद, गोष्टी, चित्रवर्णन, कवितागायन, स्वअभिव्यक्ती इ. विद्यार्थी कसे करणार याची कृती कार्यशाळा घेण्यात आली. त्यासाठी लागणारे साहित्य पालकांनी पुर्वसूचनेनुसार घरीच उपलब्ध करून घेतले. जसे अंकज्ञान, संख्याक्रिया साठी शंख, गोटे, काड्या, अक्षर ओळख साठी घरातील कागद, दिनदर्शिका, लिहिण्यासाठी फरशी, कोळसा, खडू इ. विशेषतः या कार्यशाळेला मा. शिक्षणाधिकारी, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण अधिव्याख्याता यानीही मार्गदर्शन केले.

आई-बाबांच्या शाळेनंतर खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या भाषिक व संख्याज्ञान साक्षरतेला सुरुवात श्रवण कौशल्याने झाली. पालकांनी कामावरून घरी आल्यावर छोटी छोटी बडबडगीते, कविता, अंगाई गीते, गोष्टी ऐकविल्या. यात आई-आजी यांनी महत्त्वाची जबाबदारी स्विकारली. मुले छोटे - छोटे खेळ खेळत होतीच त्यातील भातकुलीच्य खेळात संवाद साधण्याचे कौशल्य विकसित होवू लागले. त्याची निरीक्षणाची जबाबदारी विषयमित्र शिक्षणामित्र यांनी निभवली. आज दिवसभर तू काय बघितले, काय काय केले असे प्रश्न विचारून मुलांची आई-बाबा मुलांना स्व-अभिव्यक्त व्हायला औपचारिकरित्या प्रेरित करू लागली.

घरातील लहान चेंडू, मोठा चेंडू, घरात सर्वात उंच, सर्वात ठेंगणा कोण, लांब काडी, आखुड काठी, वर - खाली, कमी कंचे, जास्त कंचे घराच्या पुढे झाड, झाडाच्यामागे घर, अशा कितीतरी अवकाशीय संकल्पना मुले घरच्या घरी पालकांसमवेत शिकू , अनुभवू लागली. घरातील १ एक बकरी, १ पंखा, १ खुर्ची,२ दरवाजे. अशा संख्याच्या संकल्पना मुलांना विविध अनुभवातून कसे दयायचे हे पालकांच्या कार्यशाळेत घेतल्याने विविध भाषातून अंकज्ञान माता-पालक देवू लागले. वस्तू- वस्तू, वस्तू-चित्र, चित्र-चित्र मुलाला वाचनाकडे



शैक्षणिक साहित्याचा वापर करून अध्ययन करताना

वळविण्यासाठी घरातील वस्तूंना चिठ्ठ्या चिकटविण्यात आल्या. जसे वाटी, खिडकी, माठ, बाज, दरवाजा, चमचा इ. यामुळे मुले घरातील वस्तू बघताच त्याखालील लिहिलेले शब्द चित्रस्वरुपात वाचू लागली. घरातील दिनदर्शिकेतील अंक, वार, महिने न्याहाळू लागली. पालकांनी मुलांना घड्याळ हातात देवून त्यातील तीन भाऊ समजावले, अंक ओळख होवू लागली. घरी आई रांगोळी काढताना मुले निरीक्षण व मदत करू लागली. त्यातून विविध रंग, आकार, बिंदू, रेषा, रेघाखेड, वर्तुळ , त्रिकोण, आयत इ. समजण्यास मदत झाली. आई स्वयंपाक करित असताना त्यातून अर्धा, पान, पाऊणची संकल्पना मुलांना कशी दयायची याबाबत कार्यशाळेत चर्चेनंतर आई मुलांना पोळी, भाकरी बनविल्यानंतर त्यातील अर्धा, पाव, पाऊण सांगू लागली.

सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात पुन्हा पालकांची शाळा घेवून मुलांनी प्राप्त केलेल्या क्षमतांचा आढावा घेण्यात आला. यात ऑनलाईन सोबतच घरोघरी पालकांची भेट घेवून मुलांची प्रगती जाणून घेतली . तसेच त्यापुढील क्षमता जसे दशक, एकक संकल्पना, बेरीज, वजाबाकी, स्वर व्यंजने ओळख, शब्दचक्र, अक्षरगट शब्द, वाक्य, यांचा सराव, मार्गदर्शन घेण्यात आले .घरी असलेले दुकानातील कागद, जुनी पुस्तके, लग्नपत्रिका, औषधी वस्तू यावरील नावे, दिनदर्शिका यांचा घरी एक वाचन कोपरा तयार करून मुलांचे वाचन कौशल्य विकसित करण्याबाबत प्रात्यक्षिक घेण्यात आले. वाचन क्षमता विकसित करताना , अक्षरांना स्वरचिन्ह जोडताना वाचताना शिक्षक-पालक यांच्यात साम्यता असल्यास मुलांच्या वाचनास गती कशी येईल याबाबत मार्गदर्शन केले. जसे 'क' ला काना 'का' असे न म्हणता 'क' + T = का असे घ्यावे , दशक- एकक संकल्पना देतांना १० वर १ अकरा, असे न म्हणता दहा एक अकरा, दहा दोन बारा किंवा १ दशक १ दशक २ बारा असे घ्यावे. मुलांनी जी अक्षरे, शब्दगट, अंक, शिकले



त्यांचे चार्ट करून घरी पालकांनी लावले तसे मोठे फ्लेक्स तयार करून गावातील चौकातही लावण्यात आले.

फलनिष्पत्ती:-

घरगुती शैक्षणिक साहित्यातून पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान या उपक्रमातून शाळा बंद असतानाही वर्ग १ ते २ च्या मुलांना शैक्षणिक सातत्य राखणे तसेच त्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्यास मदत झाली. या उपक्रमातून पालकांचा सक्रिय सहभाग लाभला. शाळा व शिक्षकांप्रति आत्मियता निर्माण झाली.

मुलांना जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत छोटी छोटी गोष्टीची पुस्तके वाचन , १ ते १०० पर्यंत संख्याज्ञान त्यावरील बेरीज, वजाबाकी क्रिया निपुण होण्यास महत्त्वाचा हातभार लाभला . घरी, परिसरात व गावात उत्तम शैक्षणिक वातावरण निर्माण झाले. इतर शाळांच्या तुलनेत कोरोना काळात व नंतरही मुलांची गुणवत्ता सरस ठरली आहे. ज्यामुळे मुलांनी BRICS MATH राष्ट्रीय अंकगणित, अबॅकस, राज्यस्तरीय विविध स्पर्धात यश संपादन केले आहे . अशा नाविण्यपूर्ण प्रयोगामुळे जि. प. शाळा सुकळी जिल्ह्यातील शाळांना मार्गदर्शक ठरत आहे.

समारोप-

या उपक्रमाची गरज शाळा बंद असल्याने कोरोना महामारीत निर्माण झाली असली, तरी नियमित शाळा सुरू झाल्यानंतरही या नाविण्यपूर्ण प्रयोगातून पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विकसित होण्यास महत्त्वाचे योगदान मिळत आहे. मुले घरी उपलब्ध असणाऱ्या साहित्यातून हसतखेळत, आनंददायी , कृतीतून अनुभव संपन्न होत आहे. ज्यामुळे शाळेत आल्यावर त्यांच्या या अनुभवाचा पायाभूत भाषिक व अंकगणितीय साक्षरता दृढीकरणास महत्त्वाचे योगदान लाभत आहे.

===== @ =====

29. आनंददायी शिक्षणासाठी नवोपक्रम.

सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास.

शाळेचे नाव : जि.प. प्राथमिक शाळा वडसद ,ता.पुसद ,जि.यवतमाळ

इ मेल : jyotibojewar@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव : कु. ज्योती दिलीपराव गडम.

शाळेचे व्यवस्थापन : जिल्हा परिषद

प्रस्तावना -:

शिक्षकांनी मुलांना शिकवायचे नसते तर शिकणे सोपे करावयाचे असते. शिकण्यापेक्षा शिकणे महत्वाचेहे नवं तत्व जगभर . स्विकारलं गेलंयजे काम अनेक शब .्दांनी साध्य होत नाही ते एका नवोपक्रम किंवा सहशालेय उपक्रमातून सहजरीत्या साध्य होते.

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना मुळातच खेळणे,बागडणे,गमतीजमती या कृती आवडतात. याच गोष्टीकडे लक्ष देवून आम्ही आमच्या शाळेत मुलांना आनंददायी शिक्षण देण्यासाठी विविध नवोपक्रमाची निर्मिती केली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थांना शाळेचा लळा लागला व दैनिक उपस्थिती १०० टक्के टिकविण्यात आम्हाला यश प्राप्त झाले आहे. याचा फायदा म्हणजे या सर्व सहशालेय उपक्रमामधून विद्यार्थाचा गुणवत्ता विकास आलेख दिवसेंदिवस उर्ध्वगतीने जातांना दिसत आहे.

मुख्याध्यापक/शिक्षक यांना या संदर्भात आलेल्या अडचणी.

पालक अशिक्षित व व्यसनाधीन असल्यामुळे शाळेत पाठविण्यासाठी पुरेशे लक्ष देत नव्हते. विद्यार्थांचा गृहपाठ करून घेणे ही तर दूरची गोष्ट.

- पालकांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे विद्यार्थांना हंगामी काळामध्ये स्वत .सोबत कामावर घेऊन जात होते :
- विद्यार्थांना मजुरीचे पैसे मिळायचे.मुळे त्यांना कामामध्ये रुची वाढत होती व शिक्षणापासून हळूहळू ते दूर जात होतेत्या,
- पालकांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे पुरेशे लेखन साहित्य ते देवू शकत नव्हते.
- गावात पुरेशे काम न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यासह ऊसतोड विटभट ,्टी कामानिमित्त स्थलांतरित होत होते.

उपाय योजना.

- आम्ही पालकांना वेळोवेळी प्रत्यक्षपणे त्यांच्या घरी भेटूनत्यामुळे .शाळेत पालक सभा घेऊन त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले पालक विद्यार्थांना दररोज शाळेत पाठविण्यासाठी तयार झाले व शाळेतील माजी विद्यार्थांच्या सहकार्यातून विद्यार्थांचा गृहपाठ तपासणे व घेणे या बाबी सहज शक्य झाल्या.
- पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटल्यामुळे विद्यार्थांना हंगामी काळात कामावर नेण्याऐवजी शाळेत पाठविण्यात तयार झाले.
- आज मिळणारे थोडेसे पैसे तुमचे उद्याचे भविष्य धोक्यात घालू शकते अशी समज विद्यार्थांना वेळोवेळी करून दिल्यामुळे विद्यार्थी पालकानसोबत कामावर न जाता शाळेत येवू लागले.हळूहळू शाळेची उपस्थिती वाढू लागली .
- पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटल्यामुळे पालक विद्यार्थांना पुरेसे लेखन साहित्य देवू लागले.
- गावातील पालकांनागावाजवळ असलेल्या म ,साला कारखाना व वीटभट्टी येथे काम उपलब्ध करून दिले व काही पालकांना हे शक्य नसल्यामुळे त्यांनी आपल्या पाल्यांना आजीआजोबा कडे ठेवून स्वत त्यामुळे त्यांचे शिक्षण अखंडितपणे.स्थलांतरित झाले : सुरु राहिले.
- शिक्षणाच्या अध्यापनात बदल करून शाळेच्या स्वयंनिर्मीत उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली.

अंमलबजावणी :

1. विद्यार्थांना शाळेची गोडी लागावी व शिकण्यात आनंद निर्माण व्हावा यासाठी आणि अनेक नवोपक्रमाची निर्मिती केली आहे. या सर्व सहशालेय उपक्रमामधून विद्यार्थांचा गुणवत्ता विकास होत आहे उपक्रम :प्रथमत .घेण्यापूर्वी यासाठी लागणारे साहित्य स्वतः निर्माण करून घेतलेप्रत्येक मुलांना .यासाठी शिक्षकांनी स्वतः रंगकामापासून ते आर्थिक बाबीपर्यंत सहभाग घेतला आहे. उत्कृष्ट दर्जाचे हे साहित्य निर्माण केल्य .दर्जेदार शिक्षण देण्याकरिता आम्ही सतत प्रयत्न करीत आहोतानंतर मुख्याध्यापकयांनी प्रत्येक वर्गात नवोपक्रमाचा चार्ट लावला आहे नवोपक्रम (२०) या प्रत्येक चार्टवर वीस .लिहिलेले आहेत यामधील प्रत्येक . उपक्रम एकेका विद्यार्थ्याने सहजपणे निवडून घेतला आहेप्रत्येक कॅप्टन आपला न.व तो या उपक्रमाचा कॅप्टन बनला आहे.वोपक्रम शाळेतील प्रत्येक विद्यार्थाला देण्याकरिता सतत प्रयत्न करतोविद्यार्थी आंतरक्रियेमधू .न अनेक संकल्पना विद्यार्थांना सहज समजतात.
    - **शाळेत विद्यार्थांच्या गुणवत्ते करिता विविध नवोपक्रम रुजविले जातात.**

    अबब -: केवढी ही संख्या !या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी आनंदाने संख्यावाचन व लेखन करु लागलेली व १इयत्ता . री चे विद्यार्थी कोटीपर्यंतच्या२तर ३ री व ४ थी चे विद्यार्थी शंकूपर्यंत वाचन व लेखन करू लागले.

    https://youtube.com/watch?v=WXCIi7aqZrI&feature=share

    https://youtube.com/watch?v=WXCIi7aqZrI&feature=share

2) गणिताशी मैत्री:- उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी बेरीज,वजाबाकी,गुणाकार,भागाकर

चढता-उतरता क्रम ,संख्याची स्थानिक किंमत,विस्तारित रूप,अंकापासून संख्या

बनविणे, संख्यांचा लहान-मोठेपणा,पुढची संख्या, शाब्दिक उदाहरण,आकृतिबंध,अपूर्णांक

इत्यादी क्रिया सहज करू लागली.

https://youtube.com/watch?v=n2UC-mS-zlg&feature=share

3) हसत खेळत पाढे:- विविध कृतीच्या माध्यमातून सहज हसत खेळत वर्ग १ ते ४ चे विद्यार्थी पाठांतर व लेखन करतात.

4) गणितीय सांकेतिक भाषा :- या उपक्रमामध्ये विद्यार्थी सांकेतिक खुणामधून संख्या वाचन व लेखन करू लागले. विद्यार्थी सहजपणे सांकेतीक भाषेचा कृतीतून आनंद घेत शिकतात.

https://youtube.com/watch?v=oz52ALkzPMA&feature=share

5)आम्ही वेळ सांगतो :- या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थी दिवस,महिने,वर्ष,कालमापन,वेळ इत्यादी वरील कठीण संकल्पना सहज सांगतात.

6) चला जावूया दुकानात :- शिक्षक शाळेत उपलब्ध असणाऱ्यावस्तू, दुकानाच्या स्वरुपात मांडून त्यावर विद्यार्थांना विविध व्यवहारिक उदा.विचारतातव विद्यार्थी आनंदाने कृतीतून शिक्षण घेत उत्तरे देतात.

7) हजेरी ऐवजी इंग्रजी शब्द :- शिक्षक विद्यार्थांची हजेरी घेतांना यस सर ऐवजी नवीन इंग्रजी शब्द सांगतात.प्रत्येकाचा शब्द वर्गातील सर्वजण ऐकत असल्यामुळे सर्वांचा शब्द संग्रह वाढला आहे.

https://youtube.com/watch?v=WO3juYBjqtI&feature=share

8) इंग्रजी माझा छंद:- यामध्ये विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयी भीती दूर करून आवड निर्माण करण्यासाठी Picture rhyming, word rhyming, opposite word, adjective word,Card making sentences, puzzle अशा खेळातून विद्यार्थांना शिक्षण दिले जात आहे.

https://youtube.com/watch?v=mu9Z3WBO7D4&feature=share

https://youtube.com/watch?v=8RoHhhLtZZY&feature=share

https://youtube.com/watch?v=p76IwqnG1ac&feature=share

9) Magic of Alphabets :- या उपक्रमाअंतर्गत नंबरच्या सहाय्याने विद्यार्थी मुळाक्षरे क्रमाने लावतात व वाचन करतात.त्यानंतर मुळाक्षराचा क्रमांक पाठ झाल्यामुळे त्यावरून शब्द ओळखतात.उदा.२-१-२० BAT

https://youtube.com/watch?v=0cXeUcvO5fQ&feature=share

10) कविता गायन: - कविता गायन कृतीयुक्त व तालासुरात कविता गायन केल्यामुळे शाळेतील मुलांना सहजरीत्या कविता पाठ झाल्या आहेत.

11) सांकेतिक मराठी भाषा/इंग्रजी भाषा :- सांकेतिक खुणाच्या माध्यमातून विद्यार्थांना मुळाक्षरे लवकर पाठांतर झालेत त्यामुळे विद्यार्थी शब्द,वाक्य,परिच्छेद आकलनासहित वाचन करून आकलनासह उत्तरे देतात. त्यामुळे अध्ययन स्तर निश्चितीमध्ये विद्यार्थी समजपूर्वक वाचनात आलेले आहेत.

https://youtube.com/watch?v=Vlva7Wk2GOA&feature=share

https://youtube.com/watch?v=5D6NJ_Atkwo&feature=share

12) प्रश्न निर्मिती कौशल्य :- विद्यार्थांना पाठाचे दृढीकरण होण्याकरीता व प्रश्न निर्मिती कौशल्य आत्मसात करण्यासाठी या उपक्रमाचा आम्हाला उपयोग होत आहे. पाठ अध्यापन केल्यानंतर विद्यार्थी त्यापाठावर आधारित स्वतः प्रश्न निर्मिती करतात व उत्तरे देतात.

https://youtube.com/watch?v=BUzPJ2W0L5c&feature=share

13) माझी दिनचर्या :- माझी दिनचर्या या उपक्रमामुळे विद्यार्थी स्वतःची रोजनिशी लिहायला शिकली आहेत.यातून विद्यार्थाचा मुक्तपणे लेखनाचा सराव होवून लेखन कौशल्य वाढले.

14) मी लेखक होणार :- शाळेतील विद्यार्थांना आम्ही दररोज एक लेखनाकरिता विषय देतो. उदा. शाळा,शेती,झाडे इत्यादी यामध्ये विद्यार्थी दररोज त्यावर आधरित उतारा लिहितात व त्या उताऱ्यावर आधारित प्रश्न व उत्तरे तयार करतात.त्यामुळे हे बालपणातील लेखक बनण्याची तयारी करीत आहेत.

15) चला खेळूया अंताक्षरी :- अंताक्षरी खेळातून विद्यार्थांच्या इंग्रजी व मराठी भाषेचा शब्दसंग्रह वाढला आहे.

https://youtube.com/watch?v=8TiqyLA8uss&feature=share

https://youtube.com/watch?v=6QWTn4Dnjs0&feature=share

16) वाचन माझा छंद :- पाठ्यपुस्तकासोबत अवांतर वाचनाची गोडी लागावी यासाठी विद्यार्थांना शाळेतील ग्रंथालयातील पुस्तके वाचनाची आवड निर्माण झाली.त्यातून वाचनाचा छंद लागला.

17) सुदृढ मी होणार :- शिक्षक विद्यार्थांना विविध खेळ, शारीरिक काव्यात,योगासने, नियमित शिकवितात.त्यामुळे विद्यार्थाचे आरोग्य चांगले राहते.

https://youtu.be/z2x8qwEFD50

https://youtube.com/watch?v=fBiOfad4kMM&feature=share

18) करूया सफर जगाची :- या उपक्रमाच्या माध्यमातून तालुका,जिल्हा,राज्य व देश यासंबंधीची माहिती तसेच कोऱ्या नकाशाच्या माध्यमातून जिल्हा,राज्य,व गावाची माहिती सांगतात.

https://youtube.com/watch?v=txwtgTt3moU&feature=share

19) करूया मैत्री तंत्रज्ञानाशी :- अध्यापनात तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामुळे विद्यार्थी एक पाउल पुढे जात आहे. शिक्षक विद्यार्थांना पाठ शिकविल्यानंतर माहिती सांगतात.

20) चालता बोलता सामान्यज्ञान :- दर शनिवारी घेण्यात येणाऱ्या या उपक्रमामध्ये सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न विचारले जातात. यामध्ये ज्या विद्यार्थाने सलग तीन प्रश्नांची उत्तरे दिली त्यांना चाकलेट किंवा खाऊ मिळते. या उपक्रामामध्ये विद्यार्थांना स्पर्धा परीक्षेतील प्रश्ना प्रमाणे सरपंचापासून पंतप्रधान यांच्यापर्यंत नावे पाठ झाली आहेत.

दृष्य परिणाम/ फलनिष्पत्ती :

या सर्व उपक्रमामुळे विद्यार्थामध्ये शिकण्याची गोडी निर्माण झाली.त्यामुळे शाळेची उपस्थिती

१०० टक्के आहे.विद्यार्थी स्वयंअध्ययन करतात.मुलभूत संख्याज्ञान व साक्षरता यातून वाढीस लागले आहे.एकंदरीत विद्यार्थाची गुणवत्ता वाढली आहे.विद्यार्थांना शिक्षणाचा खरा आनंद मिळत आहे.

समारोप :- यशोगाथा जि.प.शाळा,वडसद गांव यांनी आपली शाळा गुणवत्तेच्या उंच शिखरावर विविध उपक्रमाच्या माध्यमातून नेली. विद्यार्थांच्या गुणवत्ता वाढीकरिता मुख्याध्यापक- कु.ज्योती दिलीपराव गडम शाळेतील स.शिक्षक -श्री. अनिल उमाजी दुम्हारे ,शाळा व्यवस्थापन समिती,माता-पालक गट, गावातील शिक्षक प्रेमी,पालक इत्यादींनी शिक्षकांना मदत केली.तालुक्यातील गुणवत्तापूर्वक शाळेचा नाव लौकिक मिळविला.

उपक्रमाचे काही निवडक छायाचित्रे


1) वाचन माझा छंद




3) चालता बोलता सामान्य ज्ञान



2) मी लेखक होणार



4) माझी दिनचर्या



6) वर्तमानपत्रात आलेली बातमी



रयतेचा कैवारी

संपादक - शाहू संभाजी भारती (डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' - वर्ष पाचवे - अंक २८७) मंगळवार दि.२३/०८/२०२२ पान ०९

वडसद गावच्या जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांची दहीहंडी उत्साहात संपन्न

शैक्षणिक उपक्रमांतर्गत क्रिडा प्रकाराचे आयोजन

पुसद/यवतमाळ,दि.२२(रयतेचा कैवारी ना.प्र.) : पुसद तालुक्यातील माणिकडोह केंद्रातील वडसद गावच्या जिल्हा परिषद शाळेत गोकुळाष्टमी निमित्त दहीहंडीचे आयोजन करुन शिक्षकांच्या मार्गदर्शनात दहीहंडी उत्साहात संपन्न झाली. वडसद गाव येथील उपक्रमशील असलेल्या शाळेने मुख्याध्यापिका कु. ज्योती गडम व सहाय्यक शिक्षक अनिल दुम्हारे यांच्या मार्गदर्शनात विविध विविध शैक्षणिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साधून त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव दिला जाण्यासोबतच शारीरिक विकास होण्यासाठी खेळ व विविध क्रिडा प्रकाराचे आयोजन केल्या जाते.

दहीहंडी मध्ये सहभागी झालेल्या बाल गोविंदांमध्ये कमालीचा उत्साह निर्माण होऊन मानवी मनोऱ्याद्वारे उंचावर बांधलेल्या मटकीला गोपालकृष्णाने फोडून गोपालकांच्याच्या प्रसादाचा लाभ घेऊन उपस्थितांना वितरीत केला.यावेळी सर्व उपस्थितांनी "गोपाल काला गोड झाला,गोविंदाने गोड केला" अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांच्या पालकांसह गावकरी मंडळी उपस्थित होती.

तसेच येथिल विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये नेहमीच अव्वल असतात. त्यांना कबड्डी, लंगडी, योगासने, मानवीमनोरे, धावणे, उंचउडी, लांबउडी, बॅडमिंटन इत्यादी खेळ शिकविले जातात.

===== @ =====

30. विद्यार्थी विकासात पालक सहभाग

शाळेचे नाव – जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा,भाटंबा गाव ,ता. पुसद, जि.यवतमाळ

ईमेल – zpschoolbhatambagaon@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव – महेश मोतीलाल चव्हाण

शाळेचे व्यवस्थापन - जिल्हा परिषद

प्रस्तावना :

रेनली या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात हे निरीक्षण आढळून आले आहे. मुलांना आपली आई ही 'सुपरमॉम' च वाटते. एखाद्या सुपरहिरोसारखीच वाटत असते. कारण तिच्याकडे प्रत्येक प्रश्नाचे चक्क उत्तर तर असतेच, शिवाय ती प्रत्येक बाबतीत योग्य काळजी घेत असते. अभ्यासात मुलांना सर्वांत जास्त मदत त्यांची आई करत असते, अशी निरीक्षणे यात नोंदवण्यात आली आहेत. या सर्वेक्षणात देशातील विविध शहरांतील अडीच हजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग होता.



"गुरु माता उपक्रम" या नवोपक्रमाचा जन्म झाला. हा नवोपक्रम त्या सर्व कष्टकरी पालकांच्या बालकांसाठी उत्कुष्ट ठरला आहे जे विद्यार्थी T.V.,मोबाईल.व इतर गोष्टीत अडकलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांना हा या "गुरु माता उपक्रम" नवोपक्रम वरदान ठरेल याची खात्री आहे . फक्त आपल्याला हवे ते सकारात्मक दृष्टीकोन व थोड्या मेहनतीची .

अभ्यासातला एखादा कठीण भाग उमजत नाहीये?... आईला विचारतो, तिने समजावलं की मला खूप सोप्पं होतं लगेच... आज खूप टेन्शन आलंय?... आई आहे ना, तिच्याशी बोलले की माझं टेन्शन पळून जातं... माझी आई माझी बेस्ट फ्रेंड आहे... अशी असंख्य वाक्य 'आई' ह्या व्यक्तीची ओळख करून द्यायला समर्थ आहेत. याच वाक्यांना दुजोरा देणारे एक सर्वेक्षण नुकतेच पुढे आले आहे. 'मुलांच्या शैक्षणिक प्रगतीत आईची भूमिका सर्वाधिक महत्वाची आहे'. मुलांना अनेक संकल्पना आपल्या पालकांकडून समजून घ्यायच्या असतात. सुमारे ५५ टक्के पालक त्यांच्या मुलांच्या अभ्यासासाठी दररोज दोन तासांपेक्षा जास्त वेळ देतात, असे हे सर्वेक्षण सांगते. तर, सुमारे 59 टक्के मुलांच्या मते त्यांचे पालक त्यांना कोणत्याही शंका कसलाही संकोच न बाळगता विचारण्यास प्रोत्साहन देतात आणि त्याचे उत्तर शोधण्यास एकत्र मिळून प्रयत्नही करतात. मुलांना गणित, मराठी आणि विज्ञान या विषयांच्या अभ्यासासाठी प्रामुख्याने पालकांची मदत गरजेची भासते, असेही यात म्हटले आहे. अशाच 100% शेतकरी व मजूर वर्ग असलेल्या माझ्या भाटंबा गांवातील शाळेतील विद्यार्थ्यांसाठी या उपक्रमाची निवड केली.

पालकांचा सहभाग मिळवताना आलेली आव्हाने व समस्या :

1] पालकाना बालकाच्या अभ्यासातील अडचणीची जाणीव देणे.

2] बालकांचा स्क्रीन टाईम कमी करणे

3] पालकांची अध्ययन- अध्यापानाची मानसिकता तयार करणे

4] उपलब्ध साधनांची उपलब्धता व पर्याप्तता

5] विद्यार्थ्यांना निरंतर शालेय प्रवाहात टिकवून ठेवणे

6] विद्यार्थी सकाळी व सायंकाळी ,रिकाम्या वेळी केवळ मोबाईल ,T.V पाहण्यात वेळ घालवतात त्यामुळे त्यांचे वाचन – लेखन ,उपयोजन या कौशल्याचा ऱ्हास होताना आढळली .

वरील सर्व आव्हाने व समस्या सोडवण्यासाठी शिक्षकांनी केलेले नियोजन व उपाययोजना

1] वार्ड निहाय मातांना त्यांच्या घराजवळील विद्यार्थी गट करून अभ्यास द्यायला सुरवात केली.

2] गुरु मातांना गणित पेटी व भाषा पेटीतील शैक्षणिक साहित्य वापर प्रशिक्षण दिले.

3] गुरु माता व विद्यार्थ्याला आलेल्या अडचणी समजून घेऊन उपचारात्मक अध्यापन केले.

4] मातांना विद्यार्थी नियमितपणे दिलेला अभ्यास करतात का याची खात्री करण्यास सुचविले.

5] मातांना विद्यार्थी गरजेनुसार शैक्षणिक साहित्य पुरवले .

6] समितीला सदर उपक्रमाची यशस्विता दाखवणे .

7] विद्यार्थ्याना नियमित लीडर माताकडे अभ्यासासाठी पाठवण्याचे नियोजन केले .

शाळा व्यवस्थापन समितीची सभा घेऊन विद्यार्थी गुणवत्ता सांगणे तथा सदर नवोपक्रमाचे महत्व पटवून दिले समितीची लेखी परवानगी घेऊन सुशिक्षित मातांची यादी करून मातांची सभा घेऊन त्याना सदर उपक्रमाची कार्यवाही व नियोजन सांगितले सदर मातांना विद्यार्थी वाटून दिले.

8] अप्रगत विद्यार्थी यादी –

अभ्यासात मंदावलेली व अप्रगत विद्यार्थी वार्डनिहाय यादी करून विद्यार्थी गरजेनुसार विद्यार्थी गट तयार करण्यात आले.

9] दैनिक अभ्यासाचे नियोजन –

माताना विद्यार्थी अभ्यास गरजा लक्षात आल्यानंतर दररोज कोणता व विषयनिहाय अभ्यास तयार एका वहीवर मासिक नियोजन तयार करून दिवसातील तासिकानुसार नियोजन केले .

10] आठवड्याच्या दिवसांचे नियोजन –

नियोजना आठवड्याचे वारनिहाय अभ्यास तयार करून गुरु मातांच्या सहाय्य्याने नियोजन केले.

11] अभ्यास निर्मिती

मातांना विद्यार्थ्यांला त्याच्या घराशेजारील विद्यार्थ्याला मार्गदर्शन करून दररोज दिवसातून मातांच्या सोई नुसार म्हणजे सायंकाळी अभ्यास देण्याचे नियोजन केले तसेच शाळेतील प्रगत विद्यार्थी त्याच्या गटातील विद्यार्थ्याना त्यांच्या गरजेनुसार शिक्षकाच्या मार्गदर्शनात अभ्यास देत गेले .

उपक्रमादरम्यानची आव्हाने व फलनिष्पत्ती:

1] 25% विद्यार्थी केवळ अभ्यास समजपूर्वक उतरवत होते .

2] 20% विद्यार्थी विद्याथी अभ्यास करण्यास टाळाटाळ करत होते .

3] 10% विद्यार्थी सतत गुरु माता वर्गास अनियमित होते.

4] 14 विद्यार्थी पालकांसोबत दररोज शेतात जात होते व सायंकाळी परत आल्यावर अभ्यास करत होते .

5] 8 विद्याथी इयत्ता पहिली व 4 विद्यार्थी दुसरीच्या विद्यार्थ्याना फळ्यावरील मजकूर वाचता येत नव्हता.

6] इयता 3 री व चौथीतील 14 विद्यार्थ्यांना जोडशब्द वाचन ,मजकूर वाचन , गणित विषयातील गुणाकार क्रिया सोडवताना अडचण होती.

7] सकारात्मक बाब म्हणजे या नवोपक्रमामुळे इयत्ता पहिली व दुसरीच्या नव्यानेच दाखल सर्व विद्यार्थ्यांमध्ये अमुलाग्र प्रगती दिसून आली. हे विद्यार्थी पाठ्यपुस्तकातील मजकूर,साधी वाक्ये ,जोडशब्द वाचन करत आहे.

8] इयत्ता तिसरी व चौथीचे विद्यार्थी मराठी ,गणित ,इंग्रजी विषयाचा अभ्यास उत्तमरीत्या करत आहेत .

समारोप :

T.V. मोबाईल च्या जाळयात अडकून पडलेल्या लहानग्यांना या स्क्रीनपासून कसं दूर करायचं यासाठी "गुरु माता उपक्रम" हा उपक्रम अतिशय प्रभावी ठरला आहे उलटपक्षी असाही विचार करणारे आहेत की, आपण आपल्या दैनंदिन अध्ययन - अध्यापन थोडा बदल करण्यात थोडे जरी यशस्वी ठरलो आणि लहान मुलांच्या कलेनुसार घेण्याचा प्रयत्न केला तर त्यांचा स्क्रीन टाइम कमी करता येईल. त्यामुळे पालक व विद्यार्थ्याना शालेय प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी अशा नवनवीन अध्यापन नावोपक्रमाचा विचार करणे गरजेचे आहे.

"गुरु माता उपक्रम" माझा हा नवोपक्रम शाळेच्या चार भिंतीच्या आत नसून खुल्या वातावरणात संपूर्णपणे समाजाच्या पुढे सादर राबवल्यामुळे पालक त्यांच्या पाल्याची प्रगती स्वतःच्या डोळ्यांनी बघत आहेत ,विद्यार्थी सुद्धा स्वतःला समाजापुढे सिद्ध करत आहे व त्यांच्या डोळ्यात आपल्याला वाचता ,लिहिता येतेय याचं जी आत्मिक चमक दिसतेय त्यामुळे माझ्यासारख्या शिक्षकाला निश्चितच आपल्या कामाची पावती मिळाली हेच या नवोपक्रमाचे सर्वात मोठे यश आहे.

माणसाचे जीवन हे आशा आकांक्षांवर अवलंबून आहे जीवनात आशा असणे खूप महत्वाचे आहे. कधीही हार न मानता समोर चालत राहणे म्हणजेच आयुष्य होय. **ज्याला संधी मिळते तो नशीबवान,जो संधी निर्माण करतो तो बुद्धिवान आणि जो संधीचे सोने करतो तो विजेता.**

शेवटी एकच.... " अध्ययन – अध्यापन प्रक्रियेत पालकांचा सहभाग घेत राहणे खूपच महत्वाचे असते ".







रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती (९९७५७३८३२१) वर्ष दुसरे - अंक २८८ गुरुवार दिनांक २२/०७/२०२१ पान ०८

कोरोना काळात आई बनली 'गुरु माता'

यवतमाळ : दि. २१ (रयतेचा कैवारी, ऑनलाइन वृत्तसेवा) 'गुरु' म्हणजेच काय, " अंधकार दूर करणारा" सत्याचा मार्ग दाखवणारा, चांगल- वाईट शिकवणारा, समाजा- मध्ये वागायला शिकविणारा म्हणजेच आपल्या आयुष्याला योग्य ते वळण व मार्ग दाखविणारी व्यक्ती.प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये पहिलं ' गुरु' हे आई- वडील असतात, जे आपल्याला या सुंदर अशा जगामध्ये घेऊन येतात.

लहानपणापासून आपले संगोपन करतात, चांगले विचार शिकवतात, समाजामध्ये तात्र मानेने आपण राहावे म्हणून धडपड करत असतात. स्वतः कुठल्या गोष्टीचा विचार न करता आपल्या मुलांचे आयुष्य चांगले व्हावे हि इच्छा मनात धरून जगतात. म्हणूनच आई- वडील आपल्या पहिले ' गुरु' आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुरु वीर माता जिजाऊ होत्या त्यांनी शिवाजी महाराजांवर लहानपणापासून वीर- शूरवीर शिकवण दिली म्हणून शिवाजी महाराज घडले. परंतु सध्याच्या धावपळीच्या काळात पालक आपल्या पाल्याकडे इच्छा असून देखील वेळ देऊ शकत

नाही त्यात मागील दीड वर्षापासून सर्व शाळा बंद आहे त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे हे नुकसान भरून काढण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे कोरोना आजाराच्या प्रादुर्भावामुळे मागील शैक्षणिक सत्रापासून शाळा बंद आहे परंतु शिक्षण ONLINE व OFFLINE अध्ययन अध्यापन तंत्राचा वापर करून विद्यार्थ्यांचा अभ्यास करून घेत आहेत. परंतु ग्रामीण भागात ONLINE अभ्यास करण्यासाठी हवी तेवढी साधने नाही, ज्यां पालकाजवळ फोन आहे ते कामाला जातात. त्यामुळे शिक्षकांना सकरयेला सांगोडे जावे लागत आहे. त्यासाठी शिक्षक नवनवीन शक्कल लढवून विद्यार्थ्यांचा अभ्यास सरा पूर्ण करता येईल यासाठी प्रयत्न करताना दिसतात अशाच एक उपक्रम यवतमाळ जिल्ह्यात पुसद तालुक्यातील काटखेडा केंद्रातील भाटवा गावातील जि.प.शाळेतील शिक्षक राबवत आहे.

शिक्षकांनी गावातील चुकिंबित मातांना प्रेरित करून आपल्या व गावातील इतर बालकांचा अभ्यास घेण्यासाठी तयार केले आहे.

विशेष म्हणजे या माता कामाला सुद्धा जातात परंतु सायंकाळी थोडा वेळ नेमून दिलेल्या बालकाचा अभ्यास घेतात परिणामी बालक शाळा बंद पण शिक्षण चालू या उपक्रमाला जोडले गेले आहे. शाळेचे मुख्याध्यापक महेश चव्हाण व सहायक शिक्षक शिवाजी अवताडे नियमितपणे मातांना अभ्यासक्रमाच्या प्रिंटआउट देऊन सहकार्य करत आहे.

===== @ =====

31. भाषिक खेळातून इंग्रजी वाचन विकास

शाळेचे नाव – जि.प.प्राथमिक शाळा मांडकी बौद्धवाडी ,ता.चिपळूण, जि.रत्नागिरी

इमेल – zppsmandakibouddhwadi13@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव – सौ.शितल शहाजी विचारे

उपक्रम राबविलेल्या शिक्षकाचे नाव – सौ.मधुरा रामदास तेटांबे

शाळेचे व्यवस्थापन - जिल्हा परिषद

प्रस्तावना :

२१ व्या शतकातील भविष्यवेधी शिक्षणाचा विचार करत असताना इंग्रजी भाषेच महत्त्व आपण जाणतोच.कोरोनामुळे गेली दोन वर्ष शाळा बंद होत्या.त्यानंतर देशपातळीवर पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान FLN निपुण भारत अंतर्गत विद्यार्थ्यांच्या पायाभूत कौशल्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न सुरु आहेत .हे सरू असताना विद्यार्थी इंग्रजीतही पुढे जावेत यासाठी प्रयत्न करणे गरजेचं आहे.

यावर्षीची पाठ्यपुस्तके ही द्विभाषिक आली आहेत .त्यामध्ये मराठीला इंग्रजी शब्द दिले आहेत.विद्यार्थ्यांना ते शब्द वाचन करता आले नाहीत तर पुस्तकांचा शासनाचा उद्देश सफल होणार नाही. त्यासाठी सोप्या पद्धतीने इंग्रजी वाचनाची तंत्रे मुलांना सांगितली तर निश्चितपणे मुले इंग्रजी वाचू शकतील व त्याचा फायदा त्यांना होईल . भविष्यवेधी शिक्षण द्यायचे असेल तर विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेविषयी असलेली भीती दूर करून त्यांच्यात इंग्रजीची आवड निर्माण करायला हवी ,तसेच त्यांच्यात आत्मविश्वास वाढवणे देखील गरजेचे आहे.या सर्वांचा विचार करून काही भाषिक खेळाद्वारे इंग्रजी वाचन विकास करण्यासाठी प्रयत्न केले.

मुख्याध्यापक ,पालक ,विद्यार्थी संवाद

प्रथम विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचनात येणारे अडथळे जाणून घेतले. आपण मराठीत जसे बोलतो तसे लिहितो.इंग्रजीत मात्र अक्षर आणि त्याचा आवाज यात फरक आहे.तसेच त्या शब्दांचा अर्थ लक्षात येत नाही त्यामुळे इंग्रजी वाचनाबाबत विद्यार्थी उदासीन आहेत .हे लक्षात आले.या समस्येवर उपाय शोधला तो म्हणजे भाषिक खेळातून वाचन विकास.

या संदर्भात शाळेच्या मुख्याध्यापक ,पालक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला.उपक्रमाची वेळ,खेळ ,उदिष्ट ,साहित्य या सर्वांचे नियोजन केले.

ध्येय – विद्यार्थ्यांना सहजपणे समाजपूर्वक वाचन करता येणे .

विद्यार्थ्यांना द्विभाषिक पुस्तकातील इंग्रजी शब्दांचे वचन करता येणे व अर्थ शोधण्याची सवय लावणे .

विद्यार्थ्यांनमध्ये इंग्रजी विषयक भीती कमी करणे व त्यांच्यात आत्मविश्वास वाढवणे.

कार्यवाही

खेळ क्रमांक **१) जोडीत गोडी – चित्र शब्द जोडी लावणे**

आपण रोज बोलताना अनेक इंग्रजी शब्द वापरतो उदा टेबल ,फॅन,Mobile इत्यादी .अशा शब्दाची चित्रे व नावे यांची काड्र्स तयार केली.त्यांतर दोन दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या केल्या.त्यामध्ये स्पर्धा लावली जो सर्व जोड्या सर्वात आधी बरोबर लावेल तो जिंकेल.त्यामुळे विद्यार्थी शब्द वाचू लागले.विद्यार्थ्यांच्या भाव विश्वातील शब्द घेतले.

विद्यार्थ्यांना शाळेत ,परिसरात ,घरी दिसणाऱ्या वस्तूंची इंग्रजीत नावे जाणून घेण्यास सांगितली.त्यासाठी मोठ्यांची मदत घेण्यास सांगितली.शाळेत आल्यावर गटामध्ये बसवून त्या शब्दांची उजळणी घेतली त्यामुळे त्यांच्यातील शब्द संपत्तीत वाढ झाली.

कृती २) **इंग्रजी वाचनाची तंत्रे** – विविद्यार्थ्यांना इंग्रजी अक्षरांचे पहिले आवाज सांगितले .त्या सरावासाठी गटामध्ये कार्ड वापरून कोण हा खेळ घेतला.त्यातून त्यांना अक्षरांचे आवाज माहित झाले. त्यामुळे सर्व मुले तीन अक्षरी शब्द सहज वाचू लागली . cat , bat,man,pan,pen,mob असे सोपे शब्द वाचू लागली.त्यांतर इंग्रजी जोडाक्षरे वाचन कसे करायचे हे

सांगितले उद fr- फ्र स्ल tr ,cr इत्यादी .त्याचा सराव करून घेतला .त्यांतर टेल वर्डस म्हणजे caption, culture ,असे tion ,ture असे जोड असणारे शब्द कसे वाचावेत याचा सराव दिला .त्यामध्ये जोड्या लावा,ओळख पाहू ,आम्ही असेही असतो इत्यादी खेळ घेऊन वाचनतंत्रे सांगितली. त्यामुळे विद्यार्थ्यांना इंग्रजी शब्द वचन सोपे झाले व ते मोठे शब्द ही वाचू लागली.

खेळ क्रमांक ३) slap the board –

या खेळामध्ये मी फळ्यावर काही शब्द लिहिले.चार चार मुलांचे गट केले.पहिल्या चार मुलांना एका रेषेत फळ्यापासून थोड्या अंतरावर उभे केले.फळ्यावर लिहिलेल्या शब्दापेकी एक शब्द सांगितला.जो विद्यार्थी सर्वात आधी शब्दावर हात ठेवेल तो जिंकला.अशा पद्धतीने खेळातून शब्द वाचन सराव घेतला.

खेळ क्रमांक ४) anchor word activity

या खेळामध्ये एक शब्द मध्यभागी लिहायचा .त्याच्याशी संदर्भ येणारे इतर शब्द त्याच्या भोवती लिहायचे .जो जास्त शब्द लिहील तो जिंकेल .अशा प्रकारे ही कृती घेतल्याने विद्यार्थ्यांची शब्द संपत्ती वाढण्यासाठी या खेळांचा फायदा झाला.

खेळ क्रमांक ५) word chain activity

Apple → egg → girl → lemon

अशा प्रकारचे शब्द साखळी करण्याचा खेळ घेतला.यामुळे विद्यार्थ्यांना विविध शब्द त्यांची स्पेलिंग व त्याचे अर्थ समजणे सोपे गेले.

खेळ क्रमांक ६)Word mountain

मराठीमध्ये जसा शब्द डोंगर बनवतो तसाच इंग्रजीमध्ये word mountain .मुलांमध्ये स्पर्धा लावली की मुले जास्त आनंदाने व उत्साहाने खेळत सहभागी होतात.या खेळामुळे विद्यार्थ्यांना शब्द व त्याचे वाक्य कसे बनवावे हे समजले.

खेळ क्रमांक ७) find me

या खेळामध्ये विद्यार्थ्यांना इंग्रजीतील एक उतारा दिला. एक मिनिटात त्यातील सांगितलेले शब्द शोधून दाखवायचा .खूप मजेने मुले खेळ खेळतात,त्या शब्दाखेरीज इतरही शब्द वचन करतात.

खेळ क्रमांक ८)Read to me app

शासन पुरस्कृत हा app मुलांच्या पालकांच्या mobile वर download करून दिला.घरी पालकांच्या मदतीने विद्यार्थी वाचन करू लागले.

खेळ क्रमांक ९)word puzzle app

मुलांना mobile चे आकर्षण असते.mobile वर game खेळायला आवडतात.हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांसाठी word puzzle app तयार केला .त्याची लिंक तयार करून शाळेच्या कॉम्पुटर वर तसेच tab वर व पालकांच्या mobile वर पाठवली.app download करून त्यावर मुले आनंदाने खेळू लागली.या app मध्ये फुले,फळे,भाज्या,रंग,वर,महिने इत्यादी ची नावे लपली आहेत.यामुळे विद्यार्थ्यांना स्पेलिंग तयार करता येऊ लागली,वाचता येऊ लागली.शब्द तयार करणे व वाचन गती वाढण्यासाठी या app चा उपयोग झाला.

app link

https://appsgeyser.com/api/track/redirect?url=https%3A%2F%2Ffiles.appsgeyser.com%2FWord%2520puzzle_16133086.apk%3Fsrc%3Dpagee

खेळ क्रमांक १०)my dictionary :

विद्यार्थ्यांना a to z चे जेवढे शब्द येत असतील ते व पुस्तकातील शब्द यांचा शब्दकोश तयार करण्याचे आव्हान दिले .ज्याने अल्फाबेट नुसार व्यवस्थित शब्दकोश तयार केला त्याला वही पेन बक्षीस दिले .त्यामुळे मुलांना आनंद झाला.

खेळ क्रमांक ११) spell it

या खेळामध्ये काही शब्दांचे उच्चार फळ्यावर लिहिले. त्यापुढे त्याचे स्पेलिंग लिहिले. मात्र ते लिहिताना त्यातील काही अक्षरांची जागा रिकामी ठेवली.त्यांतर एकेका विद्यार्थ्याला ते शब्द पूर्ण करण्यास सांगितले .खेळातून मुले शब्द वाचून ते लक्षात ठेवू लागली.




खेळ क्रमांक १२)Five minutes activity

या खेळामध्ये मुलांना एक शब्द संच वाचायला सांगितला.तो पाच मिनिटे सतत वाचायचा.त्यानंतर पुढच्या पाच मिनिटात ते वाचलेले शब्द न बघता लिहायला सांगितले.ज्या विद्यार्थ्याने जास्तीत जास्त लिहिले.तो जिंकला .त्याला चॉकलेट दिले. अशा प्रकारे जास्तीत जास्त शब्द वाचन केल्याने मुलांच्यात आत्मविश्वास वाढला.

खेळ क्रमांक १३) role play activity या मध्ये इंग्रजी पाठ्यपुस्तकातील काही पाठांचे नाट्यीकरण करून घेतले.यात असणाऱ्या प्राण्यांचे मुखवटे मुलांना लावायला दिले त्यांना खूप आनंद झाला व सर्व मुले उत्स्फूर्त पणे यात सहभागी झाली.आपली वाक्ये पाठ करण्यासाठी पुस्तक वाचन करू लागली .



कृती व खेळ फोटो



Youtube links –१)https://youtube.com/shorts/nBVnL3XLEGQ?feature=sharee

२)https://youtu.be/-JteADgxfIQ

३) https://www.youtube.com/watch?v=IVAnHR2CfCs&t=8s

फलनिष्पत्ती :

या सर्व खेळामुळे विद्यार्थ्यांना आनंददायी पद्धतीने इंग्रजी वाचन करण्याची संधी मिळाली.त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढला.इंग्रजी विषयी गोडी निर्माण झाली. त्यांच्या शब्द संपत्तीत वाढ झाली.ती सहजपणे इंग्रजी वाचन करू लागली.द्विभाषिक पुस्तकातील इंग्रजी शब्द व त्याला येणारे मराठीतील प्रतिशब्द समजून घेऊ लागली त्यामुळे शासनाचा द्विभाषिक पुस्तकांचा उद्देश सफल झाला.

या कृती व खेळ गटात व जोडीने घेतल्याने peer learning , group learning झाले. विद्यार्थ्यांमध्ये भविष्य वेधी शिक्षणाची रुजुवात झाली.तंत्रज्ञानाचा वापर केल्याने ती स्वतः शिकण्यास तयार झाली.तसेच गटात कृती व खेळ घेतल्याने त्यांच्यात 6C (confidence,compassion,collaboration,communication,critical thinking,creative thinking) चा विकास झाला .

नवनवीन कृती व खेळ यामुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील आनंद वाढला.विद्यार्थ्यांचातील आत्मविश्वास वाढल्यामुळे ती स्वताहून इंग्रजी गोष्टींची पुस्तके वाचू लागली.वाचताना एकमेकांना मदत करू लागली.दुपारी जेवणाच्या सुट्टीत ती इंग्रजी गोष्टीची पुस्तके वाचता .म्हणजेच त्यांना इंग्रजी वाचन आवडू लागले व त्याची सवय लागली.नवीन शब्दांचे अर्थ शोधण्याची सवय लागली.

समारोप :

भविष्यवेधी शिक्षण याचा विचार करत असताना आपण इंग्रजीचे महत्त्व जाणतोच.विद्यार्थ्यासाठी ज्ञानाची कवडे खुली करायची असतील तर त्यांना इंग्रजी वाचन येणे आवश्यक आहे.सध्याच्या युगात सर्व विषयाचे ज्ञान हे एका क्लिक वर मिळते. मात्र हे ज्ञान इंग्रजी भाषेत आहे .हे ज्ञान समजून घ्यायचे असेल तर इंग्रजीचे समजपूर्वक वाचन यायलाच हवे ,याचाच विचार करून शासनाने द्विभाषिक पाठ्य पुस्तके तयार केली .त्याचा उद्देश सफल होणे गरजेचे होते आणि तेच पूर्ण करण्याचा या कृतीतून प्रयत्न केला.विविध भाषिक खेळ हे भाषा संवर्धनात महत्त्वाचे काम करतात.या खेळामधून विद्यार्थी स्वतः शिकत जातो व त्यामुळे हे ज्ञान त्याच्या कायम लक्षात रहाते .या खेळामधून निश्चितपणे विद्यार्थ्यांची शब्द संपत्ती वाढून त्याचा फायदा इंग्रजी वाचनात झाला.विद्यार्थ्यांची इंग्रजीची भीती दूर पळून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला.

===== @ =====

32. लोकसहभागातून शाळेचा विकास

शाळेचे नाव - देव्हारे पंचक्रोशी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय देव्हारे ता. मंडणगड जि. रत्नागिरी

इमेल – kapaseramachandra@gmail.com

मुख्याध्यापकांचे नाव – श्री . रामचंद्र पांडूरंग कापसे

शाळेचे व्यवस्थापन – खाजगी अनुदानित

प्रास्ताविक –

ही शाळा रत्नागिरी जिल्हातील दुर्गम समजला जाणा-या मंडणगड तालुक्यातील ग्रामीण भागात तालुक्यापासून 16 किमी अंतरावर आहे. संस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे म्हणून शाळेची सुरुवात सन 1984 ला केली. गावातील तांबे कुटूंबीयांनी शाळेला एक एकर जागा बक्षिसपत्र करुन दिली. सुरुवातीला 10 ते 15 विद्यार्थ्यांवर शाळेची सुरुवात विनाअनुदान तत्वावर झाली. संस्थेला शफी शेठ नाडाकर यांनी साधी कौलारु इमारत बांधून दिली व विद्यार्थी संख्या वाढीस लागली. पुढे संस्थेने विद्यार्थ्यांना 16 किमी अंतरावर कनिष्ठ महाविद्यालयात जावे लागते म्हणून 11 वी कला व वाणिज्य विनाअनुदानीत तत्वावर कनिष्ठ महाविद्यालय सुरु केले.



शाळेची जुनी इमारत

समस्या –

आमची शाळा ग्रामीण भागात असल्यामुळे तसेच विनानुदानित तत्वावर असल्यामुळे शिक्षक नियमित मिळायचे नाहीत . त्यामुळे शाळेचा निकाल कमी लागायचा . शाळेची इमारत 30 वर्ष जुनी आहे त्या अवस्थेत 2008 मध्ये कनिष्ठ महाविद्यालय सुरु झाले. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विद्यार्थी संख्या जास्त असल्याने विद्यार्थ्यांना दोन सत्रामध्ये शाळेत बसावे लागत असे . शाळेमध्ये 325 विद्यार्थी संख्या असताना विद्यार्थ्यांना पुरेश्या प्रमाणात बेंचेस इतर आवश्यक सुविधा प्राप्त होऊ शकल्या नाहीत .

नियोजन –

शालेय विकास करण्यासाठी समाजातील सर्व दानशूर व्यक्तींचा शोध घेण्याचे ठरविले . शाळेबद्दल लोकांच्या मनामध्ये आपुलकी निर्माण करण्यासाठी लोकांना एकत्र करायचे तसेच त्यांना सभोवतालच्या गावागावांमध्ये जावून भेटायचे ठरविले व त्या व्यक्तींच्या मनात शाळेविषयी आपुलकी निर्माण केली पाहिजे याबद्दल नियोजन केले.




देणगीतून विद्यालयाचे कार्यालय व प्रशस्त सभागृह **विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृह**

उपक्रमाचे स्वरुप –

लोकसहभागातून शाळेचा विकास करायचे निश्चित झाल्यामुळे देव्हारे पंचक्रोशीतील तसेच कनिष्ठ महाविद्यालयासाठी सर्व ग्रामस्थ व संस्था पदाधिकारी यांची एकत्रित सभा घेतली . पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थांनी शाळेविषयी असणारी त्यांची बरी वाईट सर्व मते मांडली. त्यानंतर सर्व पालक वर्गाला समजावून दिले की, आपला शाळेचा विकास करणेसाठी आपल्याला शाळा विकास समिती स्थापना करावयाची आहे. आमच्या शाळेमध्ये शाळेय समिती , शिक्षक पालक संघ व इतर समित्या आहेत. पण ही समिती स्थापन करून प्रत्येक गावातील एक व्यक्तीची निवड या समिती मध्ये करण्याचे ठरविले. ग्रामस्थांना पहिल्यांदाच शालेय विकासात सामाऊन घेतले त्यांची जाणीव घेऊन प्रत्येक गावातून एक प्रतिनिधींची शाळा विकास समितीवर निवड केली.

प्रत्यक्ष अंमलबजावणी

शाळा विकास समिती स्थापन केल्यानंतर शाळेच्या जवळच्या गावातील प्रतिनिधींना घेऊन देव्हारे गावातील पाच वाड्यांमध्ये सभा घेतल्या .ग्रामस्थांना शाळेची आवश्यक गरज लक्षात आल्यानंतर पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी 5000/- रु. 10000/- रु. एका वाडीने,गावाने देण्याचे कबूल केले. इतर ग्रामस्थांच्याही मदतीने 2016 मध्ये तीन खोल्यांची कनिष्ठ महाविद्यालयासाठी 8 लाख रुपये किंमतीची इमारत बांधून घेतली. यामध्ये काही लोकांनी काही लोकांनी दरवाजे लाकूड चिरा या माध्यमातून व वस्तूरुप देणगीही दिली. त्यानंतर अभय देशपांडे या व्यक्तीमार्फत देव्हारे गावातील ऑस्ट्रेलियामध्ये राहणा-या त्यांच्या पुतणीची भेट गावी आल्यावर घेतली. त्यांना विद्यार्थ्यांचा एकत्रित कार्यक्रम घेण्यासाठी सभागृहाची अडचण असल्याचे सांगितले त्यानंतर त्यांनी 2017 मध्ये 7 लाख रुपये किंमतीचे चित्रा सुनिल देशपांडे नावाने 30x60 फुट आकाराचे सभागृह बांधून दिले. त्या नंतर गावातील पोलीस पाटलांच्या ओळखीने श्री. अनंत पवार साहेब यांनी दिड लाख किंमतीच्या निलकमल कंपनीच्या 400 खुर्च्या भेट दिल्या. विद्यार्थ्यांसाठी पालक निधीतून 90 हजार किंमतीचे मुला मुलींसाठी मुतारी बांधकाम करुन घेतले. त्यांतर श्री अनंत पवार साहेब यांनी न्यु इंडिया इनशुरन्स कंपनी कडून 11 लाख 16 हजार कंपनीचा CSR फंड 2018 मध्ये मंजूर करुन दिला व विज्ञान प्रयोग शाळा बांधकाम झाले. त्यानंतर श्री. प्रथमेश देशपांडे यांनी 1 लाख 20 हजार किंमतीचे विज्ञान साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिले. तसेच अनंत पवार साहेब यांनी 5 लाख रुपये किंमतीचा CSR फंड ग्लोबल ब्रोकर्स इनशुरन्स कंपनीकडून 2019 मध्ये मिळवून दिला व मुख्याध्यापक कार्यालय बांधकाम झाले.



(लोकसहभागातून बांधण्यात आलेली तीन खोली इमारत व समोर माजी विद्यार्थी संघटणे कडून बांधलेला रंगमंच)

गरजू व गरिब विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी दत्तक पालक योजना सुरु केली आहे. इयत्ता 11 वी 12 वी तील गरीब विद्यार्थ्यांसाठी दिशांतर संस्थेमार्फत मोफत पुस्तके दिली जातात. गरीब विद्यार्थ्यांची फी दिशांतर संस्था टाटा ट्रस्ट कडून मिळाली आहे. तसेच खेर साहेब पुणे यांनी प्रोजेक्टर मिळवून दिला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पी. पी. टी. दाखवता येतात.

फलनिष्पती –

लोकसहभागातून शालेय विकास झाल्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी जाणा-या विद्यार्थ्यांचा ओघ थांबला व पटसंख्या टिकून राहिली . विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधा निर्माण झाल्यामुळे विद्यार्थ्यांचा इयत्ता 10 वी चा निकाल 100 टक्के लागत आहे. इयत्ता 12 वी वाणिज्यचा निकाल 100 टक्के लागतो. 12 वी कला शाखेचा निकाल 95 टक्केच्या पुढे असतो. विद्यार्थ्यांची प्रगती होत असल्याने माजी विद्यार्थ्यांना एकत्र केले व त्यांचा मेळावा 2019 मध्ये घेतला. माजी विद्यार्थी शाळेच्या संपर्कात आले. त्यांनी 2021 मध्ये शाळेसाठी रंगमंच 40 हजार रुपयाचा बांधून दिला. क्रीडा स्पर्धेमध्ये अनेक विद्यार्थी जिल्हास्तरावर खो- खो, व्हालीबाल स्पर्धेत यश मिळवित आहेत. 1 विद्यार्थी लांबउडी मध्ये विभागीय पातळी पर्यंत खेळला आहे. राहूल कोबनाक या विद्यार्थ्यांला एन. एम. एस. स्पर्धेत मेरीट मध्ये आल्यामुळे 12 हजार रुपये शिष्यवृत्ती मिळत आहे.

कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल तक्ता

Year	Registered Students	Passed Students	Percentage
March 2013	57	57	100%
March 2014	68	68	100%
March 2015	56	56	100%
March 2016	52	52	100%
March 2017	56	55	98.21%
March 2018	40	39	97.50%
March 2019	52	46	86.44%
March 2020	55	54	98.18%
March 2021	53	53	100%
March 2022	38	38	100%

समारोप-

लोकसहभागातून शालेय विकास व विद्यार्थी विकास अशा प्रकारे पहायला मिळतो. 2015 साली शाळेची इमारत जुनी व गळणारी होती. तिची दुरुस्ती व विद्यार्थ्यांसाठी नवीन इमारत बांधकाम , विद्यार्थ्यांसाठी संगणक जादा अभ्यास ,तीन लाख रुपये किंमतीचे क्रीडा साहित्य यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. सहल, सांस्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन स्पर्धा आयोजित केल्या जातात.तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धा शाळेच्या मैदानामध्ये घेतेल्या जातात. शाळा व पालक यांचे जवळकिचे नाते निर्माण झाले आहे. या पुढे कौशल्याद्धिष्ठीत अभ्यासक्रम सुरु करणाचे प्रयोजन आहे.

===== @ =====

33. स्वच्छ व सुंदर शाळा

शाळेचे नाव : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ,रुई दक्षिण, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

मुख्याध्यापकांचे नाव : श्री. बोईनवाड सूर्यकांत गोविंदराव

ईमेल आयडी : sgboinwad17@gmail.com

शाळेचे व्यवस्थापन : जिल्हा परिषद

प्रस्तावना :

मन्याड नदीच्या किनाऱ्यावर लातूर जिल्ह्याच्या सीमेवर वसलेले व नांदेड जिल्ह्याला लागून असलेले बालाघाटच्या डोंगररांगा मध्ये अतिशय खडकाळ माळरानावर पुनर्वसित वसलेले हे छोटेसे रुई दक्षिण हे गाव. खरे पाहिले तर रुई हे गाव एकच पण पावसाच्या अतिवृष्टीमुळे सुमारे वीस वर्षापूर्वी गावाचे पुनर्वसन झाले एक रुई उत्तर-दक्षिण रुई.

या गावाचे दोन भाग झाल्यामुळे दोन्हीकडे लोकसंख्या विभागली गेली रुई दक्षिण या गावची लहान-थोर लोकसंख्या पंधराशे च्या आसपास आहे.येथील सर्व लोक अतिशय मेहनती असून शेती व शेतमजुरी तसेच रुई तांडा या गावचे लोक ऊसतोड कामगार आहेत. गावातील 50 टक्के शेतकरी आहेत. 30 टक्के शेतमजूर आहेत तर 20 टक्के लोक ऊसतोड कामगार आहेत. येथील साक्षरतेचे प्रमाण 80 टक्के च्या वर असून पुनर्वसनामुळे जीवनाची सुरुवात नव्याने करावी लागल्यामुळे सदन असूनही आर्थिक बाबतीत कंबरडे मोडलेले हे गाव. पण शिक्षणाविषयी अतिशय जिद्द, चिकाटी गोरगरिबांची जाणीव असलेले गाव आहे. सर्व जाती धर्माचे लोक मोठ्या गुण्यागोविंदाने राहणारे आहेत. गावात तंटा भांडण नाही. सर्वजण माणुसकी जपणारे अध्यात्मिक असे आहेत. शाळेची स्थापना 1958 असून शाळेत एकूण 129 विद्यार्थी शिक्षण घेतात. शाळेत विद्यार्थ्यांना 5 शिक्षक तळमळीने अध्यापन करतात.

समस्या / आव्हान :

1 .सन 2018 मध्ये शाळा पाहिली तेव्हा एका माळरानावर विरान अशी इमारत वाटली. शाळेच्या परिसरात अस्वच्छता दिसून आली. इमारत पश्चिम मुखी असल्याने दिवसभर प्रखर सूर्यप्रकाश वर्गात येणार त्यामुळे प्रचंड उन्हाचा व उष्णतेचा त्रास विद्यार्थ्यांना होत होता. शाळेच्या परिसरात एकही झाड नव्हते.त्यामुळे सावली सुद्धा नव्हती आणि पाण्यासाठी शाळेत एक नळ होता पण तो बंद. त्यामुळे विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती तर झाडांना पाणी कुठून मिळणार?

2.मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह होती पण मुलींचे स्वच्छतागृह कमी उंचीची असल्याकारणाने मोठ्या मुली स्वच्छतागृहाचा वापर करत नव्हत्या.

3.शाळा सुटल्यानंतर गावातील काही लोक शाळेत येऊन बसायची आणि तंबाखू, गुटखा खाऊन शाळेतच थुंकायचे, परिसर घाण करायची. त्यामुळे सकाळी आम्ही शाळेत गेल्यानंतर शिक्षकांना अगोदर शाळा स्वच्छ करून घ्यावी लागायची.

4.शाळेच्या मैदानावर खडकाळ भाग असल्यामुळे मुलांना मैदानावर खेळताना, पळताना दगडामुळे बोटांना जखमा व्हायच्या. चांगले सपाट मैदान नसल्याने मुलांच्या खेल्ण्यामध्ये अडचणी येत होत्या .

नियोजन व अंमलबजावणी :

1.आम्ही पहिल्यांदा गावातील सर्व पालक,सरपंच, ग्रामसेवक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य यांना विश्वासात घेऊन विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय होण्याकरिता लोकसहभाग जमा करण्याचे आवाहन केले. त्यातून अंदाजे दहा हजार रुपये जमले . त्यातून एक हजार लिटर पाण्याची टाकी शाळेच्या इमारतीवर बसविण्यात आली. व गावातील तरुण मंडळीच्या सहकार्यातून विद्यार्थ्यांना पाण्याची सोय केली. त्यानंतर इमारतीभोवती खड्डे करून त्यात काळी माती भरून अशोक व करंजी ही झाडे लावली. किचन शेडच्या पुढे एक माती टाकण्यात आली त्यात परसबाग तयार करण्यात आली . नंतर ग्रामपंचायतीने ओटा बांधून पिण्याची पाण्याची सोय करून दिली. त्यामुळे पाण्याची असलेली

समस्या कायमची दूर झाली. विद्यार्थ्यांना भरपूर पाणी मिळू लागले आणि गावकऱ्यांच्या ,ग्रामपंचायतीच्या सहकार्याने पाण्याचा प्रश्न मिटला.

2. शाळा दुरुस्ती मध्ये मुलींच्या स्वच्छता गृहाची उंची वाढवून घेतली.. स्वच्छता गृहांना रंग लावून घेतला, पाण्याची सोय करण्यात आली . हौद बांधून कायमस्वरूपी पाणी साठवण्यात आले. आता नियमितपणे स्वच्छतागृहाची मुले-मुली वापर करताना दिसत आहेत.

3. 15 ऑगस्ट निमित्त गावकरी जमल्यानंतर सरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य गावातील राजकीय पदाधिकारी,प्रतिष्ठित नागरिक, शिक्षणप्रेमी, नागरिक पालक यांच्या परिसर स्वच्छतेबाबतची बाब निदर्शनास आणून दिली.तेव्हा सर्व गावकऱ्यांनी तंबाखूमुक्त शाळांचा निर्धार केला .

4 . मुलांना खेळण्यासाठी सपाट मैदान नसल्याचे सर्व गावकऱ्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी 14 तास जेसीबीच्या साह्याने मैदान सपाट करून घेतले .त्यामुळे मैदानामध्ये विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी सपाट जागा मिळाली आणि कायमस्वरूपी मैदानाचा प्रश्न मिटला.

5. वृक्ष लागवड करून परिसर सुंदर करण्यात आला.

6. जिल्हा नियोजन समिती कडून शाळा दुरुस्ती साडेतीन लाख रुपये मिळविले. त्यातून स्लाइडिंग खिडक्या बसवण्यात आल्या. ऑफिस, वर्गखोली पॉलिश फरशी करण्यात आली. वर्ग खोल्यात रंगरंगोटी करण्यात आली. पंचायत समितीच्या पंधराव्या वित्त आयोगातून दोन लाख रुपये तार कंपाउंड साठी निधी मिळाला. तसेच एल. ई. डी.टीव्ही खरेदीसाठी एक लाख 83 हजार रुपये मिळाले आणि RO शाळेला मिळाला. गावातून जवळपास विविध वस्तूंच्या व पैशांच्या स्वरूपात लोकसहभाग म्हणून एक लाख रुपये शाळेला प्राप्त झाले.

7.माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अभिनव गोयल साहेब यांच्या संकल्पनेतून बाला -BALA "BUILDING AS LEARNING AID "- शालेय इमारत शैक्षणिक साधन या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे लोकसहभा गातून त्यातूनच 74 हजार रुपये जमा झाले. शाळेतील मुख्याध्यापकांनी जवळपास स्वतःचे 80 हजार रुपये खर्च केले तर शिक्षकांनी सुद्धा पाच हजार रुपये आर्थिक सहकार्य शाळेच्या रंगरंगोटी साठी केले आणि आमच्या वर्गातील रंगरंगोटी अध्ययन निष्पत्ती नुसार करून अहमदपूर तालुक्यातच नव्हे तर पूर्ण लातूर जिल्ह्यामध्येसंबंध महाराष्ट्र राज्य मध्ये पहिली शाळा असेल असा बहुमान मिळविला. बाला या उपक्रमांमध्ये 100 पैकी 100 गुण घेऊन सर्व प्रथम क्रमांक मिळविला.

फलनिष्पत्ती :

1. आता ही शाळा माळरानावरील नंदनवन म्हणून नावारुपाला आली आहे.
2. तालुक्यातील व जिल्ह्याबाहेरील 600 ते 800 शिक्षकांनी शाळेला भेटी दिल्या आहेत.
3. तालुक्यात बाला उपक्रमात शंभर पैकी शंभर गुण घेऊन प्रथम स्थानी आहे.
4. राष्ट्रीय तंबाखू मुक्त कार्यक्रमांतर्गत शाळेला दोन सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.
5. शाळेत पिण्याच्या पाण्याची सोय असल्यामुळे शंभर टक्के विद्यार्थी उपस्थित राहतात.
6. स्वच्छ व सुंदर शाळा अशी रुई दक्षिणची शाळा अशी ओळख निर्माण झाली आहे.
7. अमृत महोत्सव या वर्षांमध्ये उत्कृष्ट शाळा म्हणून माननीय शिक्षणाधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्राप्त.
8. स्वच्छ विद्यालय प्रथम पुरस्कार प्राप्त शाळा.

समारोप :

शाळेला गावाचा आधार असावा.. गावाला शाळेचा अभिमान असावा या प्रमाणेच आमची शाळा आहे.

===== @ =====

34. शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेतील यश

शाळेचे नाव : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निवळी , ता. जि.लातूर

इ मेल : vyankatgangane40@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव : श्री गंगणे व्यंकट लक्ष्मणराव

शाळेचे व्यवस्थापन : जिल्हा परिषद

प्रस्तावना :-

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची ओळख व परिचय व्हावा व पुढे U.P.S.C. / MPSC परीक्षेत विद्यार्थी उत्तीर्ण व्हावेत यासाठी इ.5 वी वर्गातील 100% मुले स्कॉलरशीप (पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (PUP) आणि जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा (इ.6वी) साठी बसविली. नवोदय व स्कॉलरशीप या स्पर्धा परीक्षेमुळे विद्यार्थ्यांची बौद्धिक पातळी उंचावण्यास मदत होते. विद्यार्थ्यांच्या विचार प्रवृत्तीस चालना मिळते. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत मिळते, पटसंख्या वाढते. स्कॉलरशिप नवोदय वर्ग घेतले जातात म्हणून इंग्रजी माध्यमातील 10 विद्यार्थ्यांनी इयत्ता 5 वी वर्गात प्रवेश घेतला. 5 वी वर्गाच्या दोन तुकड्या झाल्या. स्पर्धा परीक्षेमुळे शाळेची, वर्गाची पटसंख्या वाढली.

मुख्याध्यापक व शिक्षक यांना आलेल्या अडचणी

1. जून 2021 ते सप्टेंबर 2021 पर्यत असलेले कोरोनाचे लॉकडाऊन इ.4 थी पूर्ण वर्ष कोरोना कालावधी कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त ऑनलाईन अध्यापन करून स्कॉलरशीप व नवोदय परीक्षा उत्तीर्ण करणे या दृष्टीने शिक्षकांनी कसे प्रयत्न करावे याचे मार्गदर्शन नसणे.

2.पूरेशा लेखन साहित्याचा अभाव.

3.स्पर्धा परीक्षेची पूस्तके पालक विकत न घेणे.

4.विद्यार्थ्यांना सराव परीक्षेच्या पेपरचा खर्च न परवडणे.

5 .विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेतील उत्तराचे वर्तुळ व्यवस्थित रंगवता न येणे.

नियोजन व अंमलबजावणी :

जून 2021 ते सप्टेंबर 2021 पर्यंत कोरोनाचे लॉकडाऊन सूरू होते. मुलांच्या घरी मुख्याध्यापक व शिक्षक यांनी गृह भेटी देऊन पालकाचे मनपरिवर्तन करून स्पर्धा परिक्षेचे महत्व सांगितले. पालकांना स्पर्धा परिक्षा संदर्भात सविस्तर माहिती सांगितली. मुलांचा Whatapp ग्रुप बनविला. Zoomapp व Google meet वर ऑनलाईन क्लास घेतले. ज्या मुलांजवळ मोबाईल नाहीत त्यांना शाळेत बोलावून कोरोनाचे नियम पाळून अभ्यास घेतला.

इयत्ता 4 थी पूर्ण वर्ष कोरोना कालावधीत गेल्यामुळे ऑनलाईन अध्यापन झाले. 50% पालकाजवळ ॲन्डरॉईड मोबाईल होते. 50% मुले शिक्षणापासून वंचित राहिली. मुलांच्या मुलभूत वाचन, लेखन, गणिती क्रिया विकसित होऊ शकल्या नाहीत. यानंतर आम्ही दिवाळी सूट्टीत ऑफलाईन पध्दतीने मुलांच्या मुलभूत क्षमता विकसित केल्या. मुलांचा पाया पक्का केला.

कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त मुले शिष्यवृत्ती धारक व्हावीत आणि नवोदय विद्यालयात प्रवेश मिळावा यासाठी काही प्रयत्न करावे याचे मार्गदर्शन नव्हते. यासाठी मुख्याध्यापक , शाळा व्यवस्थापन समिती, वर्गशिक्षक यांनी जिल्हा परिषद जि.प. आदर्श कन्या शाळा कसबे तडवळे ता.जि.उस्मानाबाद या शाळेस भेट दिली. त्या शाळेचा निकाल 100% असतो. तेथील मार्गदर्शक धायगुडे जे.एल. यांनी भाषा व गणित यांचे मार्गदर्शन वर्ग शिक्षक श्री.शेख एल.सी. यांना केले. दुसरे मार्गदर्शक पूरी.एस.एन.यांनी वर्ग शिक्षक श्री.शेख के.एस.यांना मार्गदर्शन केले. तेथील मुख्याध्यापक श्री.सय्यद आर.एम.यांनी मुख्याध्यापक श्री.गंगणे व्ही.एल.यांना मार्गदर्शन केले. तसेच शाळा व्यवस्थापन समिती यांची जबाबदारी व कार्य काय असावे यांचे मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाने आम्हाला प्रेरणा मिळाली व आम्ही जोमाने तयारीला लागलो.

निवळी गावातील विद्यार्थ्यांचे पालक हे मजूर व शेतकरी असल्याने पुरेशा प्रमाणात लेखन साहित्य घेऊ शकत नव्हते. म्हणून गावातील दानशूर व्यक्तींचे वाढदिवस शाळेत साजरे केले. दानशूर व्यक्तींनी वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वही, पेन, कंपास इ. लेख साहित्य दिले. त्यामुळे विद्यार्थ्यांना 100% लेखन साहित्य उपलब्ध झाले.




दानशूर व्यक्तींकडून विद्यार्थ्यांना लेखन साहित्य वाटप

निवळी गावातील पालक गरीब असल्यामुळे नवोदय व स्कॉलरशिपचे पुस्तके विकत घेऊ शकत नव्हते. त्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व दानशुर व्यक्तींनी 10,000/- रुपयांची पुस्तके दिली. एकाही विद्यार्थ्याला पुस्तके विकत घ्यावी लागली नाहीत. विविध प्रकाशनाचे पूस्तके मुलांना दानशूर व्यक्तींनी घेऊन दिली. त्याचा वापर अध्ययन अध्यापनात केला. समग्र प्रकाशन, नवनीत प्रकाशन, शब्द तरंग प्रकाशन, जिनीयस मॅथ ,प्रविण बनकर यांचे मार्गदर्शन व सराव प्रश्न प्रत्रिका इ. अध्ययन अध्यापनात उपयोगात आणली. ऑक्टोंबर ते जानेवारी या चार महिन्यात स्कॉलरशिप व नवोदयाचा अभ्यासक्रम संपविला. सराव पेपर घेण्यासाठी सराव पेपरचा खर्च विद्यार्थी व पालक देऊ शकत नव्हते. त्यासाठी मुख्याध्यापक गंगणे सर यांनी सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांना झेरॉक्स मशिनची मागणी केली. तात्काळ ग्रामपंचायतीने शाळेला 1,00,000/- रुपयांची झेरॉक्स मशिन दिली. झेरॉक्स मशिनसाठी लागणारा कागद शाळा व्यवस्थापन समिती आणि गावातील दानशूर व्यक्तींनी दिला. झेरॉक्स मशिनसाठी लागणारी शाई ग्रामपंचायतीने दिली. यामुळे आम्हाला स्कॉलरशिपच्या 16 सराव परीक्षा आणि नवोदयच्या 16 सराव परीक्षा घेता आल्या.सराव परीक्षा ग्राम विकास अधिकारी, सरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांच्या उपस्थितीत घेण्यात आल्या. ग्राम विकास अधिकारी सुतार साहेब नवोदयचे विद्यार्थी असल्यामुळे त्यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. 16 सराव पेपरचे विश्लेषण वर्ग शिक्षक श्री.शेख के.एस. व श्री.शेख एल.सी. यांनी केले.

विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेतील उत्तरे नोंदविताना वर्तुळ रंगविण्यास अडचणी येत होत्या. काही मुले वर्तुळ व्यवस्थित रंगवित नव्हती. या विषयी शिक्षण विस्तार अधिकारी म्हेत्रे सी.एस. आणि केंद्र प्रमुख मेनगुले जी.ए. यांनी उत्तर वर्तुळ रंगविण्योच मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षेतील येणाऱ्या आडचणी व उपाय या विषयी मार्गदर्शन केले.

तसेच शाळेतील शिक्षक श्री. होसुरकर जी.टी., श्री.मांदळे रमेश, श्री.वसंत चव्हाण, श्री.नवनाथ चव्हाण, श्रीम.आदटराव मॅडम, श्रीम.स्वामी मॅडम, श्रीम. शिकलकर मॅडम, श्रीम.पांचाळ मॅडम, श्रीम.राठोड मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच पालक, सरपंच, ग्रामविकास अधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती यांचे सहकार्य लाभले.

फलनिष्पत्ती :-वरील सर्व अडचणींवर मात करून आम्ही वरीलप्रमाणे प्रभावीपणे कार्य केले. स्कॉलरशिपला 19 विद्यार्थी पात्र झाले. आणि नवोदयला प्रवेशास 01 मुलगी पात्र झाली .





यशस्वी विद्यार्थी शिक्षक व विद्यार्थ्यांचा सन्मान

समारोप : नवोदय व स्कॉलरशिप पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभाचा कार्यक्रम घेण्यात आला. गरुड झेप सामाजिक सेवाभावी संस्था, निवळी यांच्या तर्फे विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, हार, गुलाब पुष्प व 251/- रुपयाचे पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. मुख्याध्यापक गंगणे व्ही.एल., मार्गदर्शक शिक्षक श्री.शेख के.एस. व श्री.शेख एल.सी. यांना सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. निवळी गावात आनंद झाला. शिक्षक, पालक, गावकरी, विद्यार्थी यांनी आनंदोत्सव साजरा केला. नातेवाईक मित्रांनी, वरीष्ठांनी अभिनंदन केले. केलेल्या कष्टाची पावती मिळाली. ' केल्याने होत आहे रे, आधी केलेच पाहिजे ' या उक्तीची जाणीव झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षण घेऊन उंच भरारी घेऊ शकतात, गरज आहे त्यांच्या पंखाना बळ देण्याची. याची जाणीव यातून मिळाली.





===== @ =====

35. अप्रगत विद्यार्थीविहिन गुणवत्तापूर्ण प्रगत शाळा

शाळेचे नाव - जि.प.उच्च प्राथमिक केंद्र शाळा, शिरपूर होरे. ता.देवळी.जि.वर्धा

ई-मेल आयडी - hmshirpur2015@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - श्री . राजकुमारजाधव.

शालेय व्यवस्थापन - जिल्हा परिषद .



प्रस्तावना :

विद्यार्थांची गुणवत्ता हा शाळेचा आरसा आहे . शिक्षणाचे उद्दिष्टे विद्यार्थांचा सर्वांगीण विकास करणे असून शासन , शिक्षण विभाग, शाळा, विविध संस्था यांचेमार्फत गुणवत्ता सुधारण्याकरीता विविध योजना ,उपक्रम , प्रकल्प ,विविध स्पर्धा इत्यादी माध्यमातून शाळांचा विकास केला जातो. पर्यायाने विद्यार्थांची गुणवत्ता साधण्याचा सातत्याने प्रयत्न केला जातो . यात शाळा स्तरावर योग्य कार्यवाही करून शिक्षक ,मुख्याध्यापक ,विद्यार्थी यांचा प्रत्यक्ष सहभाग महत्वाचा आहे .

सन व 2020-21 व 2021-22 या वर्षात कोरोना काळात शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता काही अंशी कमी झाली .शासन व जिल्हा परिषद यांचे मार्फत online क्लासेस व online उपक्रम यामाध्यमातून गुणवत्ता टिकवून ठेवण्याचे प्रयत्न शिक्षकांमार्फत मोठ्या प्रमाणात करण्यात आले .

जिल्हा परिषद वर्धा व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचे मार्फत जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळांकरीता 100% गुणवत्ता हे उद्दिष्ट ठेवून अप्रगत विद्यार्थीविहीन प्रगत शाळा स्पर्धा आयोजित केली . सदर स्पर्धेत 5 क्षेत्र व निकषांवर 200 गुणांचे स्वयंमूल्यमापन करून गुणांकन करून जिल्हा स्तरीय पथक मार्फत फेरमूल्यमापन करण्याबाबत आदेशित करण्यात आले व पारितोषिक रूपाने तालुका स्तरावर प्रथम येणाऱ्या शाळेस रु. 3 लक्ष, दुसरा क्रमांकास रु. 2 लक्ष व तिसऱ्या क्रमांकास 1 रु. लक्ष पारितोषिक स्वरूपात देण्याचे ठरविण्यात आले .

अंमलबजावणी

अप्रगत विद्यार्थी विहीन गुणवत्ता पूर्ण प्रगत शाळा स्पर्धा ही जिल्हातील सर्व शाळांकरिता गुणवत्तेची नवसंजीवनी ठरली .शाळा सुरु होवून जेमतेम दोन महिने झाले नसतील व कोरोनानंतर विद्यार्थी शाळेपासून प्रत्यक्षरित्या दूर असल्यामुळे शाळा सुरु होताच काहीप्रमाणात विद्यार्थांमध्ये अभ्यासाची गोडी कमी झाली होती .पण आम्ही विविध उपक्रमाचे माध्यमातून विध्यार्थ्यांची गुणवत्ता स्थिर राखण्याचे काम केले. यात शासनाने सुरु केलेले उपक्रम जसे की अभ्यास माला 2.0 ,सेतू अभासक्रम ,साप्ताहिक स्वाध्याय ,शिकू आनंदे ,आकाशवाणी कार्यक्रम इत्यादी उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करून विद्यार्थ्याना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवले.तसेच प्रत्यक्ष गृह भेटी व प्रत्यक्ष मार्गदर्शन, online जादा वर्ग याचा वापर मोठ्या प्रमाणात केला .पाठावरील स्वाध्याय उपक्रम कृती या तंत्राचा वापर करून प्रत्येक विद्यार्थी कृतिशील राहील याविषयी लक्ष देण्यात आले .

शाळेतील सर्व वर्गातील सर्वच विद्यार्थ्यांची स्तर निश्चिती करून कोणता विद्यार्थी कोणत्या स्तरावर आहे या बाबत माहिती संकलित करून विद्यार्थी ज्या स्तरावर आहे तो स्तर लक्षात घेवून मार्गदर्शन केले व प्रत्येक विद्यार्थी प्रगत कसा होईल याबाबात कृती आराखडे तयार करण्यात आले व त्यानुसार अध्यापन करण्यात आले .

सदर स्पर्धेतील निकषानुसार खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली .

1.इमारत,वर्ग खोल्या 2. फर्निचर ,3 शाळा मैदान व क्रीडा 4. ग्रंथालय व वाचनालय 5. प्रयोग शाळा ,संगणक सुविधा ,स्वच्छ भारत योजना ,शिक्षकांचा सातत्य पूर्ण व्यावसायिक विकास व शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया, शिक्षक सक्षमीकरण ,वर्गव्यवस्थापन , शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया ,प्रशासकीय बाबी इत्यादी सर्वच बाबतीत नियोजनपूर्वक कार्य करून या स्पर्धेत सहभाग नोंदाविला.

स्पर्धेची तयारी करताना भौतीक सुविधा याआधीच पूर्ण होत्या ज्यात वर्ग खोल्या ,स्वच्छता गृह , क्रीडांगण , पिण्याचे पाणी ,बगीचा ,संगणक प्रयोग शाळा ,विज्ञान प्रयोग शाळा इत्यादी सुविधा अगोदरच उपलब्ध असल्याने सजावट ,बाला पेंटीग व काही प्रमाणात शैक्षणिक साहित्याची मांडणी इत्यादी बाबत सर्व शिक्षकांनी खूप मेहनत घेतली.

या अडचणीवार मात करण्यासाठी मुख्याध्यापक / शिक्षक यांनी केलेल्या उपाय योजना

अप्रगत विद्यार्थीविहीन गुणवत्ता पूर्ण प्रगत शाळा या स्पर्धेत भाग घेण्याअगोदरच मुख्याध्यापक श्री.राजकुमार जाधव यांनी शाळेची बाहेरील रंग रंगोटी व वर्गात डिजिटल शैक्षणिक चार्ट लावून सजावट करून घेतली . तसेच परसबाग, कार्यालयाची सजावट या बाबी करून घेतल्या .त्यानंतर दिवाळी नंतर सदर स्पर्धेचे सर्व उच्च प्राथमिक शाळा तील मुख्याध्यापकांचे प्रशिक्षण दिल्या गेले. आमच्या शाळेतून मुख्याध्यापक राजकुमार जाधव ,श्री नितीन डाबरे विषय शिक्षक व सौ. स्नेहल संभे ,सहायक शिक्षिका यांनी प्रशिक्षणात सहभाग घेतला. त्यात सर्वच बाबींवर माहिती देण्यात आली त्या अनुषंगाने प्रत्येक मुद्देनिहाय सर्व शिक्षकांनी कामाची विभागणी करून जबाबदारी सोपविण्यात आली. कार्यालयीन अभिलेखे मुख्याध्यापक राजकुमार जाधव यांनी मुद्देनिहाय व्यवस्थित व अद्यावत केले .यात बराच भाग नवीन वाटत होता . मूल्यमापन नोंदी , अभिलेखे ,इत्यादी बाबत निकषानुसार तयारी करण्यात आली.

शाळेचा परिसर सुसज्य ,सुदर व स्वच्छ करण्तात येवून शालेय बागेत शाळेतील शिक्षक श्री नितीन डाबरे यांच्या मार्गदर्शनातून छत्रपती शिवाजी महाराज कालीन किल्ले प्रतापगडाची प्रतिकृती विद्यार्थ्यांनी बनविली. त्या किल्ल्याला मा.शिक्षणाधिकारी सोनावणे साहेब यांनी मा. मोहिनीराज तुंबारे, गट शिक्षणाधिकारी व डायट, वर्धाचे अधिव्याख्याते तसेच अनेक मान्यवरांनी भेट देवून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.अशा अनेक विषयांची तयारी करून घेतली . दरम्यानच्या काळात विविध उपक्रम राबविण्यात आले ,ज्यात बाल आनंद मेळावा , वृक्षा रोपण कार्यक्रम ,शाळे बाहेरची शाळा या मा. विभागीय आयुक्त कार्यालय गुणवत्ता विकास उपक्रमात शाळेतील दोन विद्यार्थिनींचा सहभाग इत्यादी महत्व पूर्ण उपक्रम राबविण्यात आले . विद्यार्थ्यांनी शाळेच्या संरक्षण भिंतीवर वारली चित्रकला पेंटिंग काढून विविध प्रसंग रेखाटले त्यात वारली एक्स्प्रेस हे विशेष आकर्षण असून या वारली चित्रकलेची नोंद दूरदर्शनने घेवून त्याबद्दलचे वृत प्रसिद्ध केले आहे .

फलनिष्पत्ती :

आमच्या शाळेने स्वयंमुल्यांकन करून सदर स्पर्धेत भाग घेतला. त्यानुसार आम्ही 175 गुण घेवून पहिल्या पाच शाळात पंचायत समितीत येवून तिसरा क्रमांक मिळविला व त्यानंतर पथकामार्फत झालेल्या तपासणीत मूल्यांकन करून १४९ गुण घेवून प्रथम क्रमांक मिळविला .

सदर स्पर्धेत भाग घेतल्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे अवलोकन करुन जे विद्यार्थी अप्रगत होते त्यांना अध्ययन स्तरानुसार मार्गदर्शन करण्यात आले. तसेच शाळेच्या भौतिक उणीवा, खेळ साहित्य, व कार्यालयीन अभिलेखे,

वाचनालय इत्यादी बाबी पूर्ण होवून तालुकास्तरावर एक आदर्श व गुणवत्तापूर्ण व उपक्रमशील शाळा म्हणून नावारुपास आलेली आहे याचा आम्हाला अभिमान आहे .

समारोप :

अप्रगत विद्यार्थी विहीन गुणवत्तापुर्ण प्रगत शाळा स्पर्धेत तालुका स्तरावरील प्रथम पुरस्कार मिळाल्यामुळे शाळेच्या शैक्षणीक वातावरणात सकारात्मक बदल होवून पटसंख्येत वाढ जालेली आहे .गावातील पालक व प्रतिष्ठित नागरिकयांच्या सहकार्यातून कार्यात सातत्यता राखण्यासाठी सर्व शिक्षक सतत कार्य करतात.त्यामुळे विद्यार्थी व पालक खूप समाधानी आहेत.

निवडक फोटो



तपासणी पथकाकडून विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या किल्याच्या प्रतिकृतीची पाहणी



तालुका स्तरीय प्रथम पारीतोषिक मान्यवरांचे हस्ते स्वीकारताना शाळेतील सर्व शिक्षक वृंद



वारली चित्र रेखाटताना विद्यार्थी












लिंक :

https://m.facebook.com/story.php?story_fbid=pfbid02d3sqnZMbSWD6oFvpEtR2F86MFWqezHTJFbqLFffRtiiEzV3EzSf4Aar9oEBmwjCel&id=1000024433756

https://m.facebook.com/story.php?story_fbid=pfbid02VXukCGpBYpZywWaHewzgfDtKvTMRRZNZffAt7QWAQiZYWRSdxChCpTQHuVD9BcF6l&id=100014310015636&sfnsn=wiwspwa

https://m.facebook.com/story.php?story_fbid=pfbid0USTeFkDHbiHYjbLjF5Szp3VYtp2ArQxb3oUJZ9DdZfg2w1X5ZYTjWqpnaYcbtjnml&id=100014310015636&sfnsn=wiwspwa

https://youtu.be/1ByRWc3UKoQ

https://m.facebook.com/story.php?story_fbid=pfbid02d3sqnZMbSWD6oFvpEtR2F86MFWqezHTJFbqLFffRtiiEzV3EzSf4Aar9oEBmwjCel&id=10000244337560https://m.facebook.com/story.php?story_fbid=pfbid0USTeFkDHbiHYjbLjF5Szp3VYtp2ArQxb3oUJZ9DdZfg2w1X5ZYTjWqpnaYcbtjnml&id=100014310015636&sfnsn=wiwspwa9&sfnsn=wiwspwa

===== @ =====

36. गोष्टींची शाळा

शाळेचे नाव व पत्ता- जि. प. प्राथ. शाळा विजयनगर (पर्यंती) ,जि.सातारा

ईमेल आय डी- crcmhaswadno3@gmail.com

मुख्याध्यापक नाव- श्री. बालाजी बाबुराव जाधव



प्रस्तावना –

गोष्ट म्हटले की लहानापासून ते वृद्धापर्यंत आवडीची वाटणारी बाब आणि विचार करा सर्व शिक्षण, पुस्तक जर गोष्टीच्या माध्यमातून शिकायला मिळालं तर !!! काय कसं शक्य आहे ? हो १ली ते ४ थी च्या शाळेत एकटे शिक्षक असणारे बालाजी जाधव या शिक्षकाने करून दाखवलं आहे.आणि या अभिनव उपक्रमाचे नाव आहे "गोष्टींची शाळा".

मी मागील जवळपास ३ वर्षे झाली १ ली ते ४थी च्या ४ वर्गांना एकटाच शिक्षक व जवळपास ४० विद्यार्थी . मग काय दिवसभर तारेवरची कसरत आणि प्रशासकीय काम तर वेगळेच. मग काय अनेक प्रयोग सुरु मात्र सगळ्यामध्ये अपयशच .आणि मग मी अधूनमधून मुलांना कंटाळा येऊ नये म्हणून त्यांना प्रोजेक्टरवर कधी तर कधी प्रत्यक्ष गोष्ट सांगायचो व काही दिवसांनी जरी त्यातील एखादा संदर्भ आला तरी मुलांना सहज आठवायचे मग मला समजले की 'गोष्ट' हे यावर प्रभावी औषध आहे.म्हणजे १ शिक्षकी शाळा म्हणून त्यावर शोधलेले हे एक प्रभावी औषध किंवा उपाय झाला व शिकवण्याचा व शिकण्याचा एक सहज सुलभ उपाय सापडला आणि मग सुरु झाली आमची "गोष्टींची शाळा".

समस्या /आव्हाने

१) १ शिक्षक असल्याने ४ वर्गांना अध्यापन करणे ही सर्वात मोठी समस्या होती.

२) सर्व विद्यार्थ्यांना ऐकून , वाचून पाठ समजत नव्हते, घटक विसरून जायचे.

३) मग पाठाच्या गोष्टी वाचून ,ऐकून वर्गात सर्वांना सांगताना मध्येच थांबणे, विसरून जाणे,पुढे काय आहे हे न आठवणे .

४) laptop, कॅमेरा यासमोर वाचलेल्या पाठ, ऐकलेल्या गोष्टी रेकॉर्ड करताना काहीजण विसरून जायचे.

५) काहीजण गोष्टी सांगायचे खूप छान मात्र लेखन करताना खूप कमी ,छोटी गोष्ट लिहायचे.

६) स्वत: पाठ किंवा गोष्ट वाचून जशास तशी सांगताना विसरणे, लिहिताना विसरणे हे घडायचे.

७) पाठापेक्षा चित्र किंवा शब्दावरून गोष्ट तयार करताना अगदी छोटी ,कमी वेळेची गोष्ट व्हायची.

८) गणित, इतिहास, परिसर अभ्यास यातील गोष्टी भाषा विषयापेक्षा तयार करणे कठीण व्हायचे.

समस्या निराकरणासाठी केलेले नियोजन :-

सर्वप्रथम वरील सर्व समस्या समजून घेवून ४ वर्गांना समान असणारे सर्व विषयातील घटक निवडून त्या घटकाच्या गोष्टी तयार केल्या व कमी वेळेत सहज काम व्हावे म्हणून ४ वर्गांना एकत्रित घेवून त्या गोष्टी टप्या टप्याने सांगू लागलो.त्यांना एखादी गोष्ट कशी तयार करावी यासाठी लेखकांना व्हर्च्युली वर्गात जोडू लागलो ,त्यांना सहजपणे स्वत गोष्टी तयार करण्यास साह्य करू लागलो व laptop वर रेकॉर्ड करण्यास ही मदत करून वरील समस्या सोडवू लागलो.

प्रत्यक्ष अंमलबजावणी :-

प्रभावी अंमलबजावणीसाठी काही टप्पे निश्चित केले व त्यानुसार सुरुवात केली .

१) सुरुवातीला मी भाषा विषयातील पाठाची गोष्ट तयार करायचो व मुलांना सांगायचो अगदी ५ ते ७ मिनिटांची गोष्ट असायची.

२) गोष्ट सांगून झाली की मी विद्यार्थ्यांना डोळे मिटून ती गोष्ट आठवण्यास सांगायचो व त्याप्रमाणे ते कृती करायचे.

३) त्यांनतर समुहात आठवेल तशी गोष्ट सांगायची असे सांगितले व त्याप्रमाणे काही विद्यार्थी छान प्रकारे गोष्ट आठवून सांगू लागले.

४) ज्या विद्यार्थ्यांना एकदा माझी ऐकून गोष्ट सांगणे जमत नव्हते ते गटातील मुलांनी सांगितलेली गोष्ट एकूण मग दुस-या तिस-या प्रयत्नात ते सुद्धा छान प्रकारे गोष्ट सांगू लागले.

५) साधारण २ आठवडे आम्ही हा प्रयोग सुरु ठेवला मग मला ४ वर्गांना वेळ कमी पडू लागला मग मी ३ री व ४ थी च्या वर्गाला तुम्हा स्वता पाठ वाचून गोष्ट तयार करू शकता का व तसा प्रयत्न करण्यास सांगितले.

६) आणि काय ७० ते ८० टक्के विद्यार्थी पाठ वाचून त्यापासून गोष्ट तयार करून सांगू लागले व गटात छान पणे सादर करू लागले. हाच प्रयोग २ री साठी सुद्धा यशस्वी झाला.

७)काही दिवसानंतर वाचलेली, ऐकलेली, पाहिलेली गोष्ट मुले सहजपणे सांगू लागले हे लक्षात आल्यावर आम्ही त्या गोष्टी मुलांना tab देवून ऑडीओ रेकॉर्ड करण्यास सांगितले,मग डिव्हाईs समोर बोलताना पुन्हा अडचणी होऊ लागल्या.

८) मग तीच गोष्ट कॅमेरा, laptop याच्या समोर बसून रेकॉर्ड करण्यास सुरुवात केली.आठवड्यात १ किंवा २ वेळा सर्व मुले एका वर्गात घेवून laptop समोर बसून प्रोजेक्टर वर दिसेल अशा गोष्टी सांगण्याची व रेकॉर्ड करण्यास सुरुवात केली त्यामुळे मोठ्या स्क्रीन वर दिसण्याच्या आनंदात मुले छान करू लागले.

९)मग काही दिवसानंतर आम्ही प्रत्येक विद्यार्थ्याला एक वही दिली व तिला गोष्टींची शाळा असे नाव देवून वाचलेल्या, ऐकलेल्या, पाहिलेल्या गोष्टी सांगून व रेकॉर्ड करून झाल्यावर वहीत लिहण्यास सांगितल्या.सांगणे आणि लिहिणे यामध्ये फरक तर येऊ लागला पण खूप कमी लिहिण्यात यश येऊ लागले.

१०) मग सततच्या म्हणजे हे दैनंदिन झाल्याने यामध्येही प्रगती झाली व आज सर्व विद्यार्थी सर्व पाठच्या वाचून गोष्टी तयार करून रेकॉर्ड करून वहीत लेखन सुद्धा केले आहे.करत आहेत.

११) यापुढे जावून मग चित्रावरून, २ शब्दावरून सुद्धा आमचे विद्यार्थी छान गोष्टी तयार करून सांगतात,लिहितात.

१२) मग त्यानंतर आम्ही, इतिहास, परिसर अभ्यास व गणितातील काही निवडक घटक सुद्धा गोष्टी द्वारे शिकवण्याचा प्रयत्न करू लागलो व तो यशस्वी सुद्धा होऊ लागला.

कालावधी :

सर्व साधारण जुलै ते डिसेंबर असा ६ महिन्याचा कालावधी आमचा सर्व टप्पे पूर्ण करण्यात गेला आणि आता आम्ही चांगल्या प्रकारे यशस्वी झालो आहोत.

फलनिष्पत्ती :-

१) एक शिक्षक व चार वर्ग. अध्यापन करताना होणारा त्रास, धावपळ,कमी झाली.

२) मुलांचे शिकणे सहज, आनंददायी होऊ लागले.

३) मुले स्वंय अध्ययन करण्याची सवय झाली.

४) स्वंय अध्ययन मुळे विचारशक्ती व कल्पना शक्ती वृद्धिंगत होऊ लागली.


५) गोष्टी तयार करण्याचे कौशल्य विद्यार्थ्यामध्ये वृद्धिंगत झाले.

६) मुलांचे भाषण, संभाषण , वक्तृत्व वाढीस लागू लागले.

७) ते कॅमेरा, tab,,व laptop समोर आपली गोष्ट सहजपणे रेकॉर्ड करण्याचे कौशल्य व धाडस त्याच्यात निर्माण झाले.

८) गोष्टी लिहिण्यामुळे त्यांचे लेखन कौशल्य विकसित झाले.

९) भविष्यात ते चांगले निवेदक, वार्ताहर,लेखक होण्याचा मार्ग तयार होऊ लागला.




समारोप -

अशा प्रकारे १ शिक्षकी शाळेसमोर असणारी समस्या गोष्टी सारख्या आवडत्या माध्यमातून सोडवण्यासाठी 'गोष्टींची शाळा" हा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांम्धील अनेक कौशल्य विकासती होण्यास साह्य होणारा हा उपक्रम शेकडो शाळांना उपयुक्त ठरू शकेल असा आहे.सध्या १०० टक्के विद्यार्थी सहजपणे सर्व पाठच्या गोष्टी तयार करायला शिकले,पुस्तकातीलच नव्हे तर दोन शब्दावरून सहज मनोरंजक गोष्टी तयार करून laptop वर रेकॉर्ड करायला उत्तमपणे करत आहेत.भविष्यात प्रत्येक विद्यार्थ्याला उत्तम निवेदक,वार्ताहर,लेखक होण्याची संधी तयार केली आहे.

Video- https://youtu.be/m486-lyd5oo





In single teacher Satara ZP school, students learn through storytelling

►Continued from Page 1

Jadhav said, "For the last three years, I have been teaching the entire primary section of the school. There is only one teacher, me, and about 40 students. So, I started experimenting but it was difficult to keep all of them hooked to the school so that they do not lose interest. I started using the projector for screening short educational stories and found that it was the common factor.

After a few days, he came up with stories where he wove concepts such as reading the clock, basic maths calculation, nature and the environment and how to take care of the planet.

Jadhav realised that the children would easily remember the stories and it turned out to be an effective way to keep them involved.

"After a couple of more weeks, the experiment started giving good results.

The children could easily narrate the story they had recorded and understood, he added.

Jadhav said they started recording the students' narratives but it was a bit and miss thing as they started feeling conscious about being recorded.

"Sitting in front of the laptop, we started to record their stories once or twice a week. We did the recordings in the school itself and edited these in the classroom. This helped a lot because the children felt proud to see themselves telling stories so confidently on screen which also improved their oratory skills," he added.

NARRATIVES THAT SHAPE EDUCATION

THE PROBLEM

► HAVING ONE TEACHER FOR FOUR CLASSES

► All students were not able to listen and read and fundamentals remained unclear

► The teacher would read the chapters in class, and wait for the students to listen but there was little retention

► While recording the reading sessions in front of the laptop, I felt that some students would doze off

Teacher Bharat Jadhav with students

SOLUTIONS THAT TEACHER BALAJI JADHAV HIT UPON

► Initially, I used to prepare stories from language subjects for children for 5 to 7 minutes

► After telling the story, I would ask children to close their eyes to remember the story

► Each student was called to narrate the story to the class as they remembered it

► Some started recollecting the story more effectively

► Others who heard me but could not recollect from my narrative were helped by their classmates

► A student would tell the same story and in the second or third attempt, those who were unable to would pick it up immediately

► We continued this experiment for about two weeks then I fell short of time for the four classes

► So, I told students from Standards III and IV to read the chapter from the textbook and make their own stories

► About 70 to 80% read the text and prepared their stories

► They started narrating them in front of the class and did a good job

► So we took the same experiment for Standard II and it was a success

After a few days, every student was handed a book called the 'School of Tales' in which they wrote stories that they had heard, read and narrated and it made a big difference in their understanding. This became a routine at the Vijaynagar school.

Std IV student Sanskar Narale said, "There was a nice story about reading the clock narrated by one of my classmates in which the characters were some of us in class and while we were reading the clock, we would read the huge public clock put up near the railway station. We learned how to read the minute, hour and seconds hand. This story got fixed in our minds forever and I can never go wrong reading the time."

A Std III student Arohi Karande said that the excitement of telling a story in front of the laptop and then with headphones on, and then seeing herself on the big screen was a big attraction.

"My parents also felt proud to see me on the screen," she added.



In single teacher Satara ZP school, students learn through the power of storytelling

SwatiShindeGole
@timesgroup.com

Pune: Some months ago, primary school teacher Balaji Jadhav walked into a class of standard IV students and invited suggestions on making rakhis for soldiers guarding the border.

The educator spun a story of soldiers' bravery and spoke of how they sacrifice their lives to protect the country. He then made groups and gave them the task of making rakhis. Each group was given a certain number and eventually they added them up and all the rakhis were sent off.

TIMES Special

Balaji Jadhav with his students at Vijaynagar ZP school in Satara district

Here came the lesson. The children learnt about the Indian army and concepts of addition and division as they listened to the story.

At Vijaynagar zilla parishad (ZP) school in Maan taluka of Satara, chalk and blackboard are rare tools for teaching. Jadhav, its lone teacher, has been imparting lessons to students through short narratives. Over time, students have picked up the knack and have started making their own stories after reading subject textbooks.

It all started when Jadhav had a tough time managing about 40-50 students in the primary school and just to ensure that they do not get bored, he started playing educational stories in the classroom on audio-visual devices and sometimes narrating his own version which gave birth to the 'School of Tales'.

After eight months of starting this innovative teaching method, students have found renewed interest in school and have got more involved in education. Now, nearly 70-80% of students in the school read textbooks and prepare their own stories to narrate in class.

►Continued on P 15

इंग्रजी वर्तमान पत्रांनी घेतलेली दखल

===== @ =====

37. आमची शाळा- स्वच्छ व सुंदर शाळा

शारीरिक विकास – मल्लखांब क्रीडाप्रकार

शाळेचे नाव –जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा बोपर्डी मु.पो बोपर्डी, ता.वाई जि.सातारा

इ मेल –st2.bopardi.mieb@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव – श्री.अनिल सदाशिव पिसाळ

शाळेचे व्यवस्थापन - जिल्हा परिषद

प्रस्तावना –

शारीरिक विकास हा मुलांच्या व्यक्तीमत्त्व विकासामध्ये सर्वात महत्वाचा घटक आहे. सुदृढ शरीरात सुदृढ मन वास करत असते.मन सुदृढ असेल तर विद्यार्थ्यांचा बौद्धिक व मानसिक विकास चांगल्याप्रकारे होतो.तसेच प्रयत्न, बांधिलकी आणि सांघिक भावना निर्मितीच्या दृष्टीने शारीरिक शिक्षण व आरोग्य याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. शरीरविकासात अस्थिबंधन-सांधे,मजबूत स्नायूप्रणाली ,श्वसनक्रिया,शरीरअवयव,रक्तवाहिन्या आणि हृदय कार्यक्षमतेत सुधारणा,मणक्याची योग्य वक्रता या गोष्टी महत्वाच्या आहेत.या दृष्टीने विद्यार्थ्यांसाठी 'मल्लखांब', या क्रीडाप्रकाराची निवड केली. हा क्रीडाप्रकार कमीत कमी वेळात शरीराच्या प्रत्येक भागाला जास्तीत जास्त व्यायाम देणारा जगातील एकमेव क्रीडा प्रकार आहे. मल्लखांब हा अस्सल मराठमोळा व्यायाम व क्रीडाप्रकार आहे.

मुख्याध्यापक /शिक्षक यांना आलेल्या अडचणी/आव्हान :

शाळेतील शिक्षक हा क्रीडाप्रकार शिकले नसल्याने ,विद्यार्थ्यांना हा क्रीडाप्रकार शिकवणार कोण यासंबंधी समस्या निर्माण झाली.तसेच या क्रीडाप्रकारासाठी लागणारे साहित्याची उपलब्धता (लाकडी मल्लखांब,गाद्या,दोरीचा मल्लखांब) कशी करावी याचे आव्हान उभे राहिले.तसेच मल्लखांब प्रशिक्षक शोधणे हे सुद्धा एक मोठे आव्हान समोर होतेच.यासाठी आमच्या शाळेतील मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक आणि शालेय व्यवस्थापन समिती या सर्वांनी खूप मोठे योगदान दिले.

उपाययोजना / अंमलबजावणी–

शालेय व्यवस्थापन समिती,ग्रामस्थ ,मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक यांनी या सर्व समस्यांची सोडवणूक केली. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य यांच्या सहकार्यातून मल्लखांबातील कुशल प्रशिक्षकाची नेमणूक करणेत आली. तसेच रोप मल्लखांब व लाकडी मल्लखांब, गाद्या इ.साहित्य लोकसहभागातून मिळवण्यात आम्ही यशस्वी झालो.

रोज सायंकाळी शाळा सुटल्यानंतर ५:०० ते ६:०० या वेळेत कुशल प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली व शाळेतील शिक्षक - मुख्याध्यापकांच्या देखरेखीखाली विद्यार्थ्यांचे नियमितपणे प्रशिक्षण व सराव सुरु झाला . हा उपक्रम गेली दोन वर्षे नियमितपणे सुरु आहे.त्याचे चांगले दृश्य परिणाम दिसून आले.

फलनिष्पत्ती :

अशा प्रकारे मल्लखांब या क्रीडाप्रकारातून विद्यार्थ्यांच्या शरीरविकासात अस्थिबंधन-सांधे,मजबूत स्नायूप्रणाली ,श्वसनक्रिया,शरीरअवयव,रक्तवाहिन्या आणि हृदय कार्यक्षमतेत सुधारणा,मणक्याची योग्य वक्रता,लवचिकता,रोगप्रतिकारक क्षमता वाढणे इत्यादी गोष्टी साध्य झाल्या.निरोगी शरीरामध्ये निरोगी मन वास करत असते.

तालुकापातळीवर तसेच राज्यपातळीवर मल्लखांब स्पर्धेमध्ये प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली.त्यामध्ये ३विद्यार्थी (विघ्नेश शंकर गाढवे,अमेय मंगेश गाढवे,ओम महादेव गाढवे) सुवर्ण व रौप्य पदकाचे मानकरी ठरले.

समारोप :

गेल्या दोन वर्षातील प्रशिक्षण व सरावामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक विकास होण्यास मदत झाली.२६ जानेवारी,तसेच विविध अधिकारी(मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सातारा,मा.गटविकासअधिकारी वाई,मा.गटशिक्षणाधिकारी वाई,मा.व्यवस्थापक गरवारे फ़ुल्फ़्लेक्स) यांनी भेटी दिल्या त्या वेळी प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. त्यावेळी उपस्थित ग्रामस्थ व अधिकारी वर्ग यांनी विद्यार्थ्यांची प्रशंसा केली.

===== @ =====

38. सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास

शाळेचे नाव – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोसरे, ता. खटाव, जि.सातारा,

ई-मेल आयडी –yadavnilam100@gmail.com

मुख्यध्यापकाचे नाव – श्रीमती निलम गोरखनाथ यादव,

शाळेचे व्यवस्थापन – जिल्हा परिषद

प्रस्तावना –

ऋग्वेदानुसार ,' मानवाला स्वावलंबी व निस्वार्थी बनवते ते शिक्षण होय.'

शिक्षण म्हणजे केवळ चार भिंतींच्या आत राहून ठरलेल्या वेळेत दिलेले पुस्तक शिकवणे नव्हे तर बदलत्या जगात स्वावलंबी बनवत आत्मसाक्षात्कार निर्माण करून समाजात माणूस तयार करणे होय. तर महात्मा गांधींच्या विचाराप्रमाणे ,' शिक्षण म्हणजे बालकाच्या शरीर, मन व आत्मा यांचा सर्वांगीण विकास साधने म्हणजे शिक्षण होय '.

आव्हाने:

सर्वांगीणविकास केवळ पाठ्यपुस्तकातून साध्य करताना काही मर्यादा प्राप्त होतात. या मर्यादा सहशालेय उपक्रमातून पूर्ण करणे शक्य होऊ शकते.

नियोजन–

सहशालेय उपक्रमातून सर्वांगीण विकास साधण्यासाठी व विद्यार्थी गुणवत्ता वाढविण्यासाठी खालील उपक्रम राबविण्याबाबत नियोजन केले.

1 .गोष्टींची पुस्तके तयार करणे.
2.गांडूळखत निर्मीती .
3.माता सक्षमीकरण करणे.
4.पट नोंदणीसाठी बैलगाडीतून मिरवणूक .
5 गणित दिन आयोजन.
6 .राष्ट्रीय विज्ञानदिनानिमित्त वैज्ञानिक प्रयोग .
7 .आकाश कंदील निर्मीती व विक्री करणे.
8.व्यवहार कौशल्य वाढीस लागण्यासाठी बाल बाजाराचे आयोजन.

मुख्याध्यापक शिक्षक यांनी प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी–

1.गोष्टींची पुस्तके तयार करणे –

विद्यार्थ्यांच्या कल्पना शक्तीला वाव देण्यासाठी इयत्ता 1 ली ते 4 च्या विद्यार्थ्यांनी स्वभाषेत स्वशब्दात स्वत:ची पुस्तके तयार केली. यातून विद्यार्थ्यांची सर्जनशीलता वाढली.

https://youtu.be/h5ehHjjDs58

2.गांडूळ निर्मिती करणे–

शाळेतील पालापाचोळा टाकून न देता मुलांनी **गांडूळ** खताची निर्मिती केली व पर्यावरण पूरक उपक्रमामध्ये विद्यार्थी सहभागी झाले.

https://youtu.be/izyQogPsw58

3.माता सक्षमीकरण –

महिलांचा शिक्षणामध्ये सहभाग वाढावा व विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये आईचा सहभाग मिळावा. म्हणून जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या विविध स्पर्धांचे आयोजन केले व महिलांचा शिक्षणामध्ये सहभाग मिळविण्यात यश मिळाले.

https://youtube.com/shorts/isIbAYIMzfo?feature=share

4.आकाश कंदील निर्मिती व विक्री करणे–


विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञानाचे कौशल्य अवगत व्हावा म्हणून कागद खरेदी करणे ते कंदील तयार करुन विक्री करणे. यामध्ये विद्यार्थ्यांनी सक्रीय भाग घेतला.

https://youtu.be/zzU9rghX1pQ

5.पट नोंदणीसाठी बैलगाडी मिरवणूक

शाळेचा पट वाढावा व विद्यार्थ्यांना शाळेची आवड निर्माण व्हावी म्हणून सन 2022–23 चा विद्यार्थी प्रवेश उत्सव बैलगाडीतून मिरवणूक काढून साजरा केला.

https://youtube.com/shorts/971QgLHuejk?feature=share



गांडूळ खत निर्मिती , कंदील प्रदर्शन व विक्री ,राष्ट्रीय पोषण आहार कार्यक्रम व कृती स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग

===== @ =====

39. आमची शाळा- स्वच्छ व सुंदर शाळा

शाळेचे नाव - *जि.प.प्राथमिक केंद्रशाळा, पाटण मुले नं.१ ,ता. पाटण, जि. सातारा.*

ई मेल आय डी - *rpaivale4@gmail.com*

मुख्याध्यापकाचे नाव - *श्रीमती गेजगे अनिता सुखदेव*

शाळेचे व्यवस्थापन - *जिल्हा परिषद*



शाळेचा पूर्वीचा फोटो



शाळेचा सद्यस्थितीतील फोटो

प्रस्तावना –

आजच्या काळात शाळा हे केवळ पुस्तकी अभ्यासाचे केंद्र न राहता सर्वार्थाने परिपूर्ण असणारे, विद्यार्थी घडवणारे एक समाजकेंद्र झालेले आहे. शाळेमध्ये विद्यार्थी फक्त पुस्तकी धडे गिरवताना दिसत नाहीत, तर त्यांच्या आवडीनुसार, गरजेनुसार विविध उपक्रम व कृती मधून शाळा या विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडवत आहे. अशाच उपक्रमशील व आनंददायी शाळांपैकी एक आमची शाळा - जि.प.प्राथमिक शाळा पाटण मुले नं– १. शाळेची स्थापना १ नोव्हेंबर १८५६ रोजी झाली.१६५ वर्षांची प्रदीर्घ परंपरा असणारी पाटण तालुक्यातील पहिलीच शाळा आहे. शाळा फक्त मुलांसाठी आहे. पाटण तालुका हा डोंगराळ असून तालुक्याच्या ठिकाणी असणारी ही शाळा अनेक आव्हानांना तोंड देत आजही गुणवत्तेच्या बाबतीत इतर शाळांसाठी आदर्शवत अशीच आहे. पाटण मुले नं-१ ही शाळा पाटण तालुक्यातील पहिली ISO शाळा .या शाळेत स्वच्छतेच्या क्षेत्रात काम करून शाळेने मिळवलेले यश या यशोगाथेतून मांडण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

मुख्याध्यापक व शिक्षक यांना आलेल्या अडचणी-

१)RO च्या पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र सोय नव्हती.

२) स्वच्छतागृहात रनिंग वॉटर सुविधेचा अभाव.

३) रेनवॉटर हार्वेस्टिंग सोयीचा अभाव.

४)CWSN Toiletची कमतरता.

५) परसबाग नव्हती.

६) सेंद्रिय खत तयार करणेसाठी कोणतीही उपाययोजना नव्हती.

७) विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता व आरोग्य विषयक सकारात्मक दृष्टीकोनाचा अभाव.

८) कोविड-१९ च्या संदर्भात आयसोलेशन सुविधेचा अभाव.

अडचणींवर मात करण्यासाठी मुख्याध्यापक व शिक्षक यांनी केलेले नियोजन –

१)शाळा व्यवस्थापन समिती सभा *- मुख्याध्यापक यांनी शाळा व्यवस्थापन समितीची सभा घेऊन शाळेसमोर असणाऱ्या अडचणी मांडल्या. शाळा व्यवस्थापन समितीने या अडचणी सोडवण्यासाठी मुख्याध्यापकांना मदत करण्याचे मान्य केले.*

२)सहकारी शिक्षकांची सभा *- मुख्याध्यापक यांनी सहकारी शिक्षकांची सभा घेऊन अडचणी सोडवण्यासाठी काय करावे लागेल,यासंदर्भात चर्चा केली.सर्व शिक्षक या उपक्रमामध्ये सहभागी झाले.*

३)दानशूर व्यक्तींशी संपर्क –*मुख्याध्यापक व शिक्षक यांनी शाळेविषयी आवड असणाऱ्यापरिसरातील दानशूर व्यक्तींशी संपर्क साधून त्यांच्याकडून मदत मिळवण्याचे नियोजन केले.*

प्रत्यक्ष अंमलबजावणी -

१) RO च्या पाण्याची सोय– *शाळेमध्ये RO च्या पाण्याची स्वतंत्र सोय करण्यासाठी ३०० लिटर ची टाकी बसवण्यात आली व विद्यार्थ्यांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली.या कामासाठी लागणारा निधी लोकसहभागातून उभा करण्यात आला.*



पिण्याच्या पाण्याची सुविधा

२) शौचालयात running water ची सोय– *शौचालयात running water ची सोय तसेच विद्यार्थ्यांना हात*



सर्व सुविधांनी युक्त शौचालये



handwash station

धुण्यासाठी handwash station ची उभारणी करण्यात आली.या कामासाठी लागणारा २५००० रुपयांचा निधी लोकसहभागातून उभारण्यात आला.

३) CWSN Toilet – *शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र व सर्व सोयींनी युक्त अशा toilet ची कमतरता होती.परंतु लोकसहभागातून शाळेने १०००० रुपयांचा निधी मिळवून या CWSN शौचालयाची उभारणी केली.*

४) कचरा व्यवस्थापन– *कच-याचे योग्य रीतीने व्यावाथापन कारायचे असेल तर सर्वप्रथम कच-याचे वर्गीकरण करावे लागते.त्यासाठी प्रत्येक वर्ग,शौचालय,किचन शेड तसेच मैदान या ठिकाणी ओला व सुक्या कच-यासाठी स्वतंत्र कचराकुंड्या ठेवण्यात आल्या. विद्यार्थ्यांनादेखील ही संकल्पना समजली व शाळेतच त्यांना ओला व सुका कचरा वेगवेगळ्या कुंडीत टाकण्याची सवय लागली.या कामासाठी लागणारा ५००० रुपयांचा निधी लोकसहभागातून उभा करण्यात आला.*

५) Rainwater harwesting व जलपुनर्भरण खड्डा – *पाटण तालुका हा जास्त पावसाचा प्रदेश आहे.पावसाचे पाणी जर आपण साठवले,तर त्याचा आपण पुनर्वापर करू शकतो.त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीमध्ये एक खड्डा करून त्यात साठवले गेले,त्यासाठी सरासरी ३५००० रुपये खर्च आला.शिक्षकांनी स्वखर्चाने या कामाची उभारणी केली.*

६) परसबाग – *शाळेमध्ये विद्यार्थ्यांना पोषण आहार दिला जातो.या आहारामध्ये परिसरातून उपलब्ध असणार्या भाजीपाल्याचा समावेश केला जातो.आम्ही असा विचार केला की ,हा भाजीपाला जर आपण शाळेच्या बागेतच उपलब्ध केला,तर त्यामुळे आहाराचे पोषणमूल्यही वाढेल आणि विद्यार्थ्यांना बागकामाचा आनंदही घेता येईल.याच हेतूने प्रेरित होऊन शाळेत परसबाग तयार करण्यात केली व त्यामध्ये वांगी,मिरची,मेथी,शेवगा अशा विविध भाज्यांची लागवड करण्यात आली.या कामासाठी लागणारा १००० रुपयांचा निधी लोकसहभागातून उपलब्ध करण्यात आला.*

७) सेंद्रिय खत निर्मिती - *शाळेमध्ये सेंद्रिय खत निर्मितीसाठी गांडूळ खत प्रकल्प तयार करण्यात आला.या प्रकल्पामधून तयार होणारे सेंद्रिय खत हे शाळेतील परसबागेला तसेच विविध फुलझाडांसाठी वापरण्यात येते.या कामाच्या उभारणीसाठी लागणारा १५०० रुपयांचा निधी लोकसहभागातून उभारण्यात आला.*



८) विद्यार्थी आरोग्य व स्वच्छता – *शाळेमध्ये शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांचे आरोग्य तसेच त्यांची स्वच्छता,स्वच्छतेच्या चांगल्या सवयी याकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे लागते,कारण विद्यार्थी जर स्वच्छ नसेल किंवा आजारी असेल तर त्याचे शाळेतील कुठल्याही कृतीत मन रमणार नाही.यासाठी विद्यार्थ्यांना स्वच्छतेच्या सवयी लावणे व त्यांच्यात वर्तनबदल घडवणे क्रमप्राप्त होते.या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वच्छतेच्या सवयी लावण्यात शाळा यशस्वी झाली आहे . विद्यार्थी केवळ शाळेतच नव्हे तर आपल्या घरीदेखील या सवयींचे पालन करतात व इतरानाही तसे सुचवतात.हा बदल निश्चितच सकारात्मक आणि प्रेरणा देणारा आहे.*

https://youtu.be/TEE7GF1TGKM


९) विलगीकरण कक्ष निर्मिती– *COVID 19 च्या काळात ज्यावेळी शाळा सुरु झाल्या,तेव्हा विद्यार्थ्यांचे आरोग्य ही सर्वात महत्वाची गरज निर्माण झाली होती.या काळात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळेत विद्यार्थ्यांचे तापमान मोजण्यासाठी थर्मल गन,ऑक्सिजन तपासण्यासाठी ऑक्सिमिटर , त्याचबरोबर एखाद्या विद्यार्थ्याला लक्षणे दिसत असतील तर त्याला विलगीकरण कक्षात ठेवण्यासाठी विलगीकरण कक्ष या सर्व सुविधांची निर्मिती करण्यात आली.यासाठी शाळेने ५००० रुपये निधी खर्च केला.*

अ.नं.	***गरज असणारे क्षेत्र***	***मिळालेली रक्कम***	***रकमेचा स्त्रोत***
१	*पिण्यासाठी RO पाण्याची सुविधा*	*२५०००*	*लोकसहभाग*
२	*शौचालायामध्ये running water ची सुविधा*	*२५०००*	*लोकसहभाग*
३	*ओला व सुका कचरा व्यवस्थापन*	*५०००*	*लोकसहभाग*
४	*Rainwater Harwesting*	*३५०००*	*शिक्षक*
५	*CWSN शौचालय*	*१००००*	*लोकसहभाग*
६	*परसबाग निर्मिती*	*१०००*	*लोकसहभाग*
७	*सेंद्रिय खत निर्मिती*	*१५००*	*लोकसहभाग*
८	*विलगीकरण कक्ष निर्मिती*	*५०००*	*लोकसहभाग*
९	*सुशोभीकरणासाठी कुंड्या*	*६०००*	*लोकसहभाग*
१०	*शालेय रंगरंगोटी व बोलक्या भिंती*	*९५०००*	*लोकसहभाग*
एकूण खर्च		*२,३१,०००*	

फलनिष्पत्ती –

'कर्मालागी जो तत्पर / तोची पावे पैलवार //'

शाळेच्या मुख्याध्यापिका, सहकारी शिक्षक, पालक तसेच व्यवस्थापन समिती या सर्वांनी परस्परांच्या सहकार्याने शाळेचा चेहरामोहरा बदलून टाकला, किंबहुना शाळेला एक नवीन ओळख प्राप्त करून दिली. या सर्वांच्या सहकार्यातूनच शाळेच्या वेगवेगळ्या कामांसाठी लागणारा निधी उपलब्ध होऊ शकला. संपूर्ण शाळेला रंगरंगोटी केल्यामुळे शाळेचे रुपडे आकर्षक व लक्षवेधी दिसू लागले. शाळेच्या भिंतीवर विविध रंगीत चित्रे, सामान्य ज्ञानाची माहिती, मजेशीर खेळ हे बालचमूला खुणावू लागले. यावर मुले खेळ खेळतात, बेरीज वजाबाकी सारख्या संकल्पना समजावून घेतात. RO च्या प्लांटमुळे विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी पिण्यासाठी उपलब्ध झाले. शौचालयात पाणी वाहते असल्यामुळे शौचालये स्वच्छ राहू लागली. handwash station मुळे विद्यार्थ्यांना जेवणापूर्वी, जेवणानंतर तसेच शौचावरून आल्यानंतर हात स्वच्छ धुण्याची सवय लागली. विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या या बदलाचा सकारात्मक परिणाम पालकांवर देखील झाला आहे. विद्यार्थ्यांना लागलेल्या या सवयींमुळे विद्यार्थी कमी आजारी पडतात, परिणामी विद्यार्थी उपस्थिती वाढलेली दिसून येते. सर्व विद्यार्थी कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करतात, तसेच कचरा इतरत्र न फेकता कचराकुंडीतच टाकतात. या सर्व बदलांमुळे शाळेने आपली विशेष ओळख तालुक्यात निर्माण केली आहे.



शाळेच्या पटातील वाढ दर्शवणारा आलेख

स्वच्छतेच्या क्षेत्रात शाळेने मिळवलेले यश –

१) स्वच्छ विद्यालय पुरस्कार २०२२-२३ तालुकास्तरीय प्रथम क्रमांक

२) स्वच्छ व सुंदर, उपक्रमशील व गुणवत्तापूर्ण शाळा स्पर्धा २०२२-२३ तालुकास्तरीय प्रथम क्रमांक

व्हिडीओ लिंक : https://youtu.be/MZUXh-RVmr4

===== @ =====

40. स्वच्छ व सुंदर शाळा

शाळेचे नाव - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळीवस्ती, (अरण),ता.माढा,जि.सोलापूर

इ मेल - zppschoolmaliwasti1@gmail.com

मुख्याध्यापक - श्री सोपान नवनाथ मोहिते

शाळेचे व्यवस्थापन - जिल्हा परिषद



प्रस्तावना :

जि. प. प्रा. शाळा माळीवस्ती अरण ही द्विशिक्षकी शाळा, पुणे सोलापूर हायवे लगत असणारी. या शाळेत मी श्री. सोपान नवनाथ मोहिते व श्रीमती वंदना दामोदर खुने पती पत्नी दोघे शिक्षक कार्यरत आहेत. वंदना खुने बदलीने या शाळेत आल्या त्यावेळी शाळेचा पट अवघा 23 होता. वस्तीवरील बरीच मुले इतरत्र शाळेत जात होती. ही मुले आपल्याच शाळेत दाखल होण्यासाठी काहीतरी करणे गरजेचे आहे. हे लक्षात आल्यानंतर शाळेचे अंतरंग व बाह्यरंग बदलून टाकायचे ठरवले. तेही पूर्णपणे स्वतःला वाहून घेऊनच.

आलेल्या अडचणी व अंमलबजावणी :

म्हणतात ना, अडचणींवर मात करतो, तोच खरा शिक्षक. शाळेच्या खात्यावर पैसे शिल्लक नव्हते. अशा वेळी आम्ही स्वतः पैसे घालायचे ठरवले व शाळेचे रंगकाम सुरू केले. पेंटरच्या अडचणी, वेळेचा अपव्यय यामुळे स्वतः हातात ब्रश घेऊन शाळेचे शौचालय रंगवले. शाळेच्या पेंटिंगच्या कामाबरोबरच स्टेज बांधकामही सुरू केले. जवळपास एक लाख रुपये खर्चून शाळेची रंगरंगोटी, तसेच दोन वर्गांच्या मध्ये असणाऱ्या रिकाम्या जागेत मुख्याध्यापक खोली पूर्ण केली. आम्ही सुरू केलेले काम पाहून पालकांनीही वर्गणी देण्यास सुरुवात केली.त्या वर्गणीमधूनच पेवर ब्लॉक टाकण्यात आले. कोणतेही कार्यक्रम घेण्यासाठी शाळेला स्टेज आवश्यक होते ते आम्ही दोघांनी स्वतःचे ५०,०००रू. घालून तयार करून घेतले.तसेच ग्रामपंचायतीने शाळेची १३० फूट लांबीची संरक्षक भिंत, लोखंडी गेट याचे काम अवघ्या पाच दिवसात पूर्ण करून दिले.

शाळेसाठी मोठा प्रश्न होता तो म्हणजे पाण्याच्या उपलब्धतेचा, तोही प्रश्न अविष्यत् ट्रस्ट ठाणे या संस्थेमार्फत त्यामध्ये कार्यरत असणारे श्री. भागवत पाटील यांनी सोडवला. त्यांनी शाळेला पाण्याची टाकी, बेसिन, नळ फिटिंग उपलब्ध करून दिले. त्यामुळे शाळेचा परिसर हा फुलझाडे परसबाग यांनी फुलून गेला.तसेच परसबागेसाठी सर फाऊंडेशनमार्फत ज्ञान फाऊंडेशन यांच्याकडूनही विविध फळभाज्यांच्या बिया उपलब्ध झाल्या होत्या.

शाळेसाठी परसबाग करताना जिथून उपलब्ध होतील तिथून रोपे आणली. जणू काही वेगवेगळी रोपे जमवण्याचा छंदच लागला. आमचा हा छंद पाहून विद्यार्थीही वेगवेगळी रोपे शाळेत लावण्यासाठी घेऊन येऊ लागले. हे करत असताना रविवारी साप्ताहिक सुट्टी असते हेही कधी लक्षात आले नाही. ध्यानी, मनी, स्वप्नी सारखा शाळेचाच विचार असायचा. आमच्या या कामामध्ये शा. पो. आ. शिजवणाऱ्या अर्चना राऊत यांनीही शाळा माझीच आहे असे समजून वेळोवेळी आमच्या बरोबरीने शाळेतील सर्व कामांमध्ये मदत केली.त्यावेळी असणारे आमचे मार्गदर्शक, केंद्रप्रमुख डॉ. विलास काळे यांनी स्वतः शाळेच्या कंपाउंड साठी जाळी उपलब्ध करून दिली. अशाप्रकारे शाळा नवीन रूप धारण करत होती.

फलनिष्पत्ती:

या उपक्रमांची दखल घेऊन माननीय श्री. दिलीप स्वामी साहेब सीईओ जिल्हा परिषद सोलापूर यांचे हस्ते पती-पत्नींचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांबरोबरच पालकांच्याही संपर्कात राहिल्यामुळे विद्यार्थी शिक्षण प्रवाहात टिकून होते.

शाळेचे नवीन रूप पाहून आत्तापर्यंत रात्रंदिवस केलेल्या कष्टाचे चीज झाले असे वाटते.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीपजी स्वामी साहेब यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'स्वच्छ शाळा सुंदर शाळा' या उपक्रमांतर्गत शाळेने तालुक्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केला . हे यश मिळवण्यासाठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व सदस्य तसेच शाळेतील विद्यार्थ्यांचे सर्व पालक, शिक्षणप्रेमी यांचाही यामध्ये खूप मोलाचा वाटा आहे. प्रत्येकाने आपापल्या परीने आर्थिक मदत करून तसेच श्रमदान करून शाळेला मदत केलेली आहे आणि शाळेला गावाचा आधार, गावाला शाळेचा अभिमान हे ब्रीद खरे करून दाखवले .

समारोप:

अशा प्रकारे स्वच्छ व सुंदर शाळेच्या माध्यमातून आमच्या शाळेचा विकास तर झालाच याबरोबरच विद्यार्थ्यांनाही शाळेमध्ये आनंददायी वातावरण तयार होऊन त्यांचाही सर्वांगीण विकास होऊ लागला. अध्ययन स्तर मध्ये शाळा प्रगत झाली. अध्ययन निष्पत्ती मध्ये विद्यार्थी प्रगत होत आहेत. शाळेचे हे रुपडे पालटल्यामुळे आमच्या पटावरही त्याचा बराचसा परिणाम झाला. गावामधूनही मुले आमच्या या छोट्याशा वस्ती शाळेत दाखल होऊ लागली. ही आम्ही केलेल्या प्रयत्नांची फलनिष्पत्तीच म्हणावी लागेल.



शैक्षणिक साहित्य मांडणी



स्वच्छ व सुंदर शालेय परिसर



कार्यानुभव कोपरा

यु ट्यूब लिंक:

https://youtu.be/Hp3LevPBkck

===== @ =====

41. सहशालेय उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

शाळेचे नाव : जिल्हा परिषद प्रा.शाळा ,माळेवाडी,ता.माळशिरस ,जि.सोलापूर
शाळा ईमेल : zpmalewadi01@gmsil.com
मुख्याध्यापक : दत्तात्रय चतुर्भुज कोरे
शाळेचे व्यवस्थापन : जिल्हा परिषद

प्रस्तावना -

' विश्व उद्याचे इथेच किलबिलते' हे ब्रीद घेऊन जन्माला आलेली जिल्हा परिषद शाळा . शालेय शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांची जोपासना करणारा नागरिक तयार करणे. शालेय अभ्यासक्रमाशी निगडीत इयत्ता पहिली पासून वयोगटानुसार व आकलनशक्ती नुसार कृतीवर आधारित उपक्रमांची आखणी करून विद्यार्थीकेंद्रित, बालस्नेही व आनंददायी पद्धतीने विविध अभिवृत्ती व कौशल्ये निर्माण करणे हाच आमच्या जिल्हा परिषद शाळेचा उद्देश होय.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकरीता परिणामकारक , मनोरंजन व आकर्षक स्वरुपात अध्ययन अध्यापन केले जाते तसेच पालक व समाज सहभागातून शाळा अधिकाधिक अनुभव संपन्न करण्यात येत आहे.

सहशालेय उपक्रम -

एखाद्या मोठ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेला ही लाजवेल अशी सेमीइंग्रजी, इंग्रजी विषयाची तयारी, सुसज्ज नाविन्यपूर्ण प्रयोगशाळा , संगणक कक्ष ,इ लर्निंगसाठी प्रोजेक्टर ,प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी टॅब सुविधा असणारी डिजिटल शाळा . शाळेच्या स्थापनेपासून ते आजतागायत शाळा प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहे. नवोदय तयारी , शिष्यवृत्ती, विविध विद्यार्थी व्यक्तीमत्व स्पर्धेत राज्य स्तरावरुन विजयश्री खेचून आणण्यासाठी शाळेतील शिक्षक सतत झटत असतात. युट्युब च्या माध्यमातून विविध प्रकारचे समाजप्रबोधन,श्यामची आई कथामाला असे संस्कारक्षम उपक्रम तसेच इ लर्निंगचा नियमितपणे अध्यापनात वापर करणारे सर्व तंत्रस्नेही शिक्षक दरवर्षी दर्जेदार वार्षिक स्नेहसंमेलन घेतले जाते . शाळेचा शैक्षणिक उठावही शालाव्यवस्थापन समिती .लाखांच्या घरात आहे,शिक्षक पालक संघ ,पालक सहभाग अतिशय उत्कृष्ट आहेया सर्वांच्या . समन्वयाने शाळेत झाडांसाठी ड्रीप योजना, विद्यार्थ्यांना कवायत साहित्य ,बँन्ड साहित्य ,वॉटर फिल्टर ,हँन्डवॉश स्टेशन , प्रत्येक वर्गात काचफलक व टी . व्ही बसविण्यात आले आहेत .

जिल्हा परिषद सोलापूर आयोजित टॅलेंट हंट स्पर्धेत मोठ्या गटात या शाळेतील विद्यार्थ्यीनीने प्रथम क्रमांक मिळविला. गायन व वादन स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला .

निबंध लेखन -

- तंत्रस्नेही शिक्षक समुह महाराष्ट्र यांच्या मार्फत २८ मे रोजी घेण्यात आलेल्या जागतिक मासिक पाळी दिनानिमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत कुसिमरन. रफिक काझी या विद्यार्थ्यांनीने प्रथम क्रमांक पटकावला तर स्नेहल अंकुश गोडसे या विद्यार्थ्यांनीने निबंध लेखन स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला.

भाषण स्पर्धा -

- सिमरन काझी या विद्यार्थिनीने यु ट्यूब च्या माध्यमातून "मासिक पाळीला सामोरे जाताना "या विषयावर भाषण करून आपल्या मैत्रिणींना आरोग्य विषयक सल्ला देत "जागतिक मासिक पाळी दिन "साजर केला.
- गीतांजली जाधव या मुलीने यु ट्यूब च्या माध्यमातून कोरोना जनजागृती केली .

चारोळी लेखन -

- "कवीश्री "या कवी समुहाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय चारोळी लेखन स्पर्धेत इयत्ता सातवीतील विद्यार्थी सावणकुमार उल्हास वाघमोडे या विद्यार्थ्यांने प्रथम क्रमांक पटकावला.

पत्र लेखन -

- अत्यावश्यक सेवा देणारे डॉक्टर, पोलीस कर्मचारी, सफाई कामगार यांचे आभार मानण्यासाठी सातवीतील सिमरन काझी या मुलीने त्यांना आभार पत्र लिहिले.

चित्र व हस्तकलाद्वारे व्यक्तिमत्व विकास

- सातवीतील बऱ्याच विद्यार्थ्यांनी विविध चित्रे काढणे, रंगभरण करणे, टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनविणे असे अनेक उपक्रमात ऑनलाईन सहभाग घेतला.
- इयत्ता सातवीतील क्रांती एकतपूरे, स्नेहल गोडसे या विद्यार्थ्यांची चित्रे राज्यस्तरीय तंत्रस्नेही शिक्षक समुहात विशेष आकर्षक ठरली.
- पायपुसणी बनविणे, फुलांची वेणी बनविणे, बाज विणणे, लोकरीच्या उपयुक्त वस्तू तयार करणे यातही उत्कृष्ट सहभाग नोंदवला.

पर्यावरण पूरक उपक्रम –

- पक्षी.,मुके प्राणी यांना पिण्यासाठी पाणी ठेवणे.
- परसबागेतील झाडे जोपासणे, गायन ,नाटय असे छंद जोपासणे, नियमितपणे प्रकटवाचन करणे.
- सातवीतील विद्यार्थी गीतांजली जाधव, ,सिमरन काझी, सावणकुमार वाघमोडे, प्रेम चांडोले ,स्नेहल गोडसे, अशा बऱ्याच विद्यार्थ्यांनी *"घरच्या प्रयोगशाळेतून"*या उपक्रमात घरातून अनेक विज्ञान विषयावर आधारित प्रयोग व्हिडीओ च्या माध्यमातून सादर केले.
- वसुंधरा दिन साजरा करत अनेक औषधी वनस्पती आपल्या परिसरात लावल्या.
- वटपौर्णिमा या सणाचे औचित्य साधून *"स्त्री व पर्यावरण"या विषयावर एससीइआरटी च्या उपसंचालिका सौ. कमलादेवी आवटे यांचे मार्गदर्शन झूम मिटींगच्या माध्यमातून ठेवले.
- पालक व विद्यार्थी यांच्यात पर्यावरण संरक्षण व पर्यावरण जागृती निर्माण करण्यासाठी युट्यूबच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण ही तासिका सुरू केली.
- वृक्षारोपण, सीडबॉल निर्मिती, सीडबँक, प्लॅस्टिक वापर टाळणे याबाबत जाणीव जागृती फेरीचे आयोजन करणे .
- मागील वर्षी विद्यार्थ्यांनी लावलेल्या झाडांना राख्या बांधून रक्षाबंधन साजरे करण्यात आले.
- इकोफ्रेंडली गणेश मुर्ती तयार करणे, गणेश मुर्त्यांमध्ये बिया खोचणे.इकोफ्रेंडली मखर बनविणे.
- गौरींसाठी कापसापासून अलंकार बनविणेत्यांचे विसर्जन न करता ते झाडावर ठेवून त्याचा वापर पक्ष्यांना घरटी . .बांधण्यासाठी होईल या पद्धतीने प्रयत्न करणे.

समारोप:

असे विविध सहशालेय उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा सातत्याने प्रयत्न सुरु आहे.

फोटो –



जलशक्ती अभियान

===== @ =====

42. अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर (ई-लर्निंग)

शाळेचे नाव : जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा बेलापूर , तालुका: श्रीरामपूर , जिल्हा: अहमदनगर
ई मेल आय डी : zppsurdubelapur@gmail.com
मुख्याध्यापकाचे नाव : शेख जलील रमजान
ई मेल आय डी : shaikhjalil55942@gmail.com
शाळेचे व्यवस्थापन : जिल्हा परिषद

प्रस्तावना :

तंत्रज्ञानाच्या उत्क्रांतीने आपल्या जीवनातील प्रत्येक पैलूवर परिणाम केला आहे. बँकिंगपासून ते एकमेकांशी संवाद साधण्याच्या पद्धतीपर्यंत आपल्या जीवनातील प्रत्येक पैलूवर तंत्रज्ञानाचा परिणाम झाला आहे. तंत्रज्ञान हा समाज टिकवण्याचा अविभाज्य भाग बनला आहे आणि त्यामुळे शिक्षणात त्याचा अंतर्भाव अपरिहार्य आहे. तंत्रज्ञान केवळ विद्यार्थ्यांना असंख्य ऑनलाइन संसाधनांमध्ये प्रवेश प्रदान करत नाही तर त्यांना शिकण्याच्या प्रक्रियेत मदत देखील करते. तंत्रज्ञानाचा वापर सुलभता प्रभावी अध्ययन अध्यापनासाठी विद्यार्थी आणि शिक्षक दोघांनाही प्रभावित करते आणि फायदे देते.

तंत्रज्ञानामुळे शिक्षकांचा वेळ आणि खर्च दोन्ही कमी होतात आणि विद्यार्थ्यांना माहितीमध्ये भर पडून त्यांना स्वयंअध्ययनाची संधी मिळते. तंत्रज्ञानाचा वापर वेगळ्या पद्धतीने शिकवण्यासाठी केला जात आहे, मग ते ऑनलाइन शिक्षणाद्वारे असेल किंवा वर्गात शैक्षणिक व्हिडिओ दाखवून.

तंत्रज्ञानाचे वरील सर्व फायदे लक्षात घेऊन आमच्या शाळेत सर्व शिक्षकांनी मागील दोन-तीन वर्षापासून तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर सुरू केला आहे. यासाठी आम्ही शिक्षकांनी स्वखर्चाने प्रत्येक वर्गासाठी एक स्मार्ट टीव्ही वर्गात लावलेला आहे आणि त्याचा दैनंदिन अध्यापनात आम्ही सर्वजण उपयोग करत असतो.

आव्हान :

मार्च 2020 मध्ये कोविडच्या प्रादुर्भावामुळे अचानक लॉकडाऊन लागले .त्यामुळे राज्यातील सर्व शाळा बंद होत्या. नंतर टप्प्याटप्प्याने शाळा सुरू झाल्या . अशा परिस्थितीत मुलांचे शिक्षण कसे चालू ठेवावे हे एक मोठे आव्हान शिक्षकासमोर होते .

नियोजन व अंमलबजावणी :

तेव्हा सर्व शिक्षकांनी पर्यायी मार्गाचा वापर करत व्हाट्सअप ग्रुप तयार केले आणि त्यावर विविध पीडीएफ वगैरे टाकण्यास सुरुवात केली. विविध युट्युब चे व्हिडिओ पण व्हाट्सअप ग्रुपवर टाकण्यात येत होते.

हे सर्व करीत असताना उर्दू माधमासाठी ई-लर्निंग साहित्य कमी पडत होते. त्यासाठी आमच्या शाळेतील दोन शिक्षिकांनी ई-लर्निंग साहित्य निर्मिती करण्यास सुरुवात केली. महेजबीन बागवान मॅडम यांनी पहिली ते चौथी या वर्गांसाठी व्हिडिओ निर्मिती करून APANI SCHOOL या YouTube Channel वर तर तरन्नुम खान मॅडम यांनी पाचवी ते सातवी वर्गाच्या सर्व विषयांसाठी शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती करून SMART ONLINE SCHOOL या YouTube Channel वर शैक्षणिक व्हिडिओ Upload करण्यास सुरुवात केली. या शैक्षणिक व्हिडिओचा लाभ फक्त शाळेला नव्हे तर महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांना झाला.

जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना सातत्याने अशैक्षणिक कामांचा भडीमार असतो. दररोज एक एक्सेल शीट किंवा दररोज एक पीडीएफ तयार करून द्यावी लागते. त्यावर उपाय म्हणून आमच्या शाळेतील सर्व शिक्षकांनी स्वखर्चाने स्मार्ट टीव्ही प्रत्येक वर्गात लावले आणि दैनंदिन अध्यापनात त्याचा वापर सुरू केला. त्यामुळे विद्यार्थ्यांना ई- लर्निंग साहित्याची व ई-लर्निंग साधनांची ओळख झाली.

लॉकडाऊन काळात शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांचे खूप शैक्षणिक नुकसान झालेले दिसून आले. शाळा सुरू झाली पण विद्यार्थी शिक्षणात मागे राहिले होते. यावर मात करण्यासाठी आमच्या शाळेतील शिक्षकांनी तंत्रज्ञानाच्या विविध साधनांचा

शिक्षणात उपयोग करण्यास सुरुवात केली, उदाहरणार्थ मोबाईल, स्मार्ट टीव्ही, संगणक, एल.एफ.डी., मिनी प्रोजेक्टर इत्यादी साधनांचा शाळेत दैनंदिन अध्यापनात सातत्याने उपयोग करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान भरून काढण्याचे प्रयत्न केले.

एखादा शिक्षक रजेवर गेला तरी त्याच्या वर्गाचा शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून त्या वर्गात शैक्षणिक व्हिडिओ लावून दिले जातात आणि विद्यार्थी आवडीने ते व्हिडिओ पाहतात आणि आपल्या ज्ञानात भर करत राहतात. शिक्षकांच्या मोबाईल फोन मधील ई-लर्निंग साहित्याचे सुद्धा अध्यापनात वापर केला जातो. मोबाईल फोन ला स्मार्ट टीव्ही ने कनेक्ट करून मोबाईल मधले व्हिडिओ किंवा पीडीएफ विद्यार्थ्यांना स्मार्ट टीव्हीवर दाखवता येतात.

फलनिष्पत्ती :

विद्यार्थी नाविन्यपूर्ण आणि मनोरंजक पद्धतीने अध्ययन करु लागले. विविध विषयातील संबोध ,संकल्पना जास्त चांगल्या रीतीने स्पष्ट होण्यास मदत झाली. शिकणे आनंददायी झाले.

समारोप :

लॉकडाऊन काळात विद्यार्थ्यांचे जे शैक्षणिक नुकसान झाले होते ते भरून काढण्यासाठी बेलापूर उर्दू शाळेतील सर्व शिक्षकांनी तंत्रज्ञानाचे विविध साधनांचा उपयोग करून जसे मोबाईल, स्मार्ट टी. व्ही., संगणक, मिनी प्रोजेक्टर एलएफडी, इत्यादी साहित्यांचा अध्यापनात उपयोग करून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक नुकसान भरून काढण्याचे अतोनात प्रयत्न केले आणि या पद्धतीने अध्यापन केल्यावर हे लक्षात आले की विद्यार्थी यामध्ये जास्त रस घेतात आणि शाळेमध्ये उपस्थित राहण्याचे प्रयत्न करतात. सर्व विद्यार्थ्यांना व्हिडिओ पाहणे खूप आवडते त्यामुळे विद्यार्थी शाळेत जास्त गैरहजर राहत नाही या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या हजेरीवर सुधारणा झाली असून त्यांचा शैक्षणिक नुकसान सुद्धा भरून काढण्यात आलेला आहे आणि या उपक्रमाचा बेलापूर उर्दू शाळेला खूप फायदा झाला आहे.

शैक्षणिक व्हिडिओ लिंक :

https://www.youtube.com/watch?v=2xZtdzFTVVY&t=173s

https://www.youtube.com/watch?v=tD86yrFl2Ag&list=PLJZSP7zZytZtvhBC4NdqFQf8Bp2CWZ-Di&index=11

https://www.youtube.com/watch?v=pTz4DgVuqjQ&list=PLJZSP7zZytZstEiX3nrqKgzD8fUy-CMiK&index=5

Photo Link :

https://drive.google.com/file/d/1AuIGNb83uHlt3BBtkriSMFIIeqp8VMGZ/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1BH3lYH_ARdAppIP1JyrPLcUyNzUup6l8/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/10oQ443AHsGrNEM5tQbkR3EuDNcbvvIYy/view?usp=drivesdk

===== @ =====

43. शिष्यवृत्ती परीक्षेतील यश

शाळा : जि.प.प्रा.शाळा कुरुडगांव ता.शेवगाव ,जि. अहमदनगर
इ मेल आय.डी. : zppsschoolkurudgaon@gmail.com
मुख्याध्यापकाचे नांव : श्री ढोले संजय भुजंगराव
इ मेल आय.डी . : sanjudada१९७४@gmail.com
शाळेचे व्यवस्थापन : जिल्हा परिषद

प्रस्तावना :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात की "शाळा ही समाजाने समाजाच्या विकासासाठी निर्माण केलेले एक सुसंस्कार केंद्र आहे. या उक्तीप्रमाणे आपल्या जि.प.शाळेची देखील संस्कारक्षम मुले घडवण्याची परंपरा आहे. आमच्या शाळेचे ब्रीदवाक्य ' माझी शाळा माझा अभिमान' हे असून गाव व गावातील कार्यक्रम, शालेय कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, हळदीकुंकू समारंभ अशा अनेक उपक्रमांतून शाळा ही एक आदर्श शाळा वनविण्याचा ध्यास घेतला व तो तडीस नेण्याचा प्रयत्न चालू आहे. आमच्या शाळेतील शिष्यवृत्ती परीक्षेत २५ पैकी २५ विदयार्थी उत्तीर्ण झाले. हा एक आमच्या शाळेचा शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला. याविषयी आज आम्ही आमच्या शाळेची यशोगाथा सादर करण्याचा छोटासा प्रयत्न करत आहोत.

' शाळा असावी शाळेसारखी नकोत नुसत्या भिंती ||
तिथे असावा प्रेम जिव्हाळा । नकोत नुसती नाती ।।'

नियोजन व कार्यवाही :

सर्वात अगोदर मुलांचे आम्ही वस्तीनिहाय ग्रुप केले. चार शिक्षकांनी विषय वाटून घेऊन मुलांना मार्गदर्शन सुरु केले. गृहभेटीदरम्यान या सर्व मुलांना गटनिहाय एका ठिकाणी जमा करुन दिलेला अभ्यास तपासून मार्गदर्शन केले.

• शिष्यवृत्ती परीक्षेची पूर्वतयारी :

शिष्यवृत्ती परीक्षेचे नियोजन करतांना आम्हांला अनेक अडचणी आल्या. त्यामध्ये सर्वात महत्वाची अडचण ही होती की मुलांची शैक्षणिक पातळी ढासळलेली होती. कोरोनामुळे मुले थोडेसे शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर गेली होती. त्यामुळे मुलांना शिक्षणाची गोडी लावणे हा सर्वात महत्वाचा मुद्दा आमच्या समोर होता. त्यासाठी सर्वात अगोदर मुलांचे आम्ही वस्तीनिहाय ग्रुप केले. चार शिक्षकांनी विषय वाटून घेतले व मुलांना मार्गदर्शन सुरु केले. गृहभेटी दरम्यान सर्व मुलांना गटनिहाय एका ठिकाणी जमा करुन, दिलेला अभ्यास तपासला . वेळोवेळी मार्गदर्शन केले.

नोव्हेंबर २०२१ मध्ये १०.३० ते २.०० या वेळेत शाळा सुरु झाल्या. त्यावेळी आम्ही शाळा सुटल्यानंतर इ. ५ वी च्या मुलांसाठी २ ते ३ या वेळेत शिष्यवृत्ती मार्गदर्शन सुरु केले. मुलांचे तीन गटात विभाजन केले. हुशार गट (अ), मध्यम गट (ब), सर्वसाधारण गट (क) अशा प्रकारे गट करुन मार्गदर्शन सुरु केले. गटचर्चा करुन मुलांना प्रश्न सोडवण्यास प्रोत्साहन दिले. तसेच सराव प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या. सोपा घटक अगोदर सोडवण्यावर भर देण्यास सांगितले.
यशोदिप बोलकी मार्गदर्शिका , नवनीत प्रश्नसंच, मंथन परिक्षा प्रश्नसंच इ. प्रकारचे प्रश्नसंच मुलांकडून सोडवून घेतले.
आमच्या शाळेतील मुख्याध्यापक श्री. ढोले सर, श्री. शेळके सर, श्री. तेलुरे सर, श्रीमती. नरवडे मॅडम, यांनी शिष्यवृत्तीच्या तासिका घेऊन मुलांना उत्तीर्ण होण्यासाठी सतत प्रयत्नशील राहून चांगल्या प्रकारे मेहनत घेतली.

फलनिष्पत्ती :

सन २०१६-१७ मध्ये ५ विदयार्थी जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत आले. सन २०१७-१८ मध्ये १७ विदयार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत बनविले त्यापैकी ६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सन २०१९-२० मध्ये १६ विद्यार्थ्यांपैकी ९ विदयार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले. सन २०२१-२२ मध्ये आमच्या शाळेच्या २ विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत निवड झाली. सांगायचे तात्पर्य म्हणजे आमच्या शाळेचा यशाचा आलेख वाढतच राहिला व यावर्षी आमच्या शाळेचे २५ विदयार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झाले.

===== @ =====

44. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातून पटसंख्या वाढ

शाळेचे नाव - जि.प.प्रा.शा.शेंडगेवाडी,ता.श्रीगोंदा जि.अहमदनगर .

ईमेलआयडी -pawartai5121@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव- श्रीम.पवार ताई तुकाराम.

शालेय व्यवस्थापन- जिल्हा परिषद

प्रस्तावना-

एकदा एका प्रशिक्षणात "माझ्या स्वप्नातील शाळा" या विषयावर निबंध लिहायला दिला आणि माझ्या कल्पनाशक्तीला धुमारे फुटले. माझ्या स्वप्नातील शाळेत पुरेशा भौतिक सुविधा तर असतीलच परंतु शिस्तबद्ध वातावरणात बालगोपाळांनी गजबजलेल्या शाळेचे स्वप्न मी पाहिलं.माझ्या शाळेतील विद्यार्थी परीक्षार्थी नसतील तर ज्ञानार्थी असतील. ते फक्त नोकरी मिळवण्यासाठी शिक्षण घेणार नाही, तर यशस्वी जीवन जगण्यासाठी शिक्षण घेतील त्यासाठी त्यांच्या अंगी असलेल्या सर्व कौशल्यांचा विकास करण्याची व्यवस्था मी करेल.माझी शाळा समाजासाठी सुजाण नागरिक बनवण्याचे केंद्र असेल असं स्वप्न मी पाहिलं.त्याला कारणही तसंच होतं एकदा शाळेच्या शाळेच्या पडवीत बसून "तुम्ही मोठे झाल्यावर काय बनणार", " कोणत्या क्षेत्रात कार्य करणार" या विषयावर विद्यार्थ्यांशी गप्पा चालल्या होत्या जवळून चाललेले आजोबा आमच्या गप्पा ऐकत होते.त्यांनी मला सांगितले बाई मुलांना चांगला माणूस बनवायचा प्रयत्न करा.त्या क्षेत्रात स्पर्धा फार कमी आहे.आज समाजातील काही सुशिक्षित लोकांचे वर्तन पाहिले तर आजोबांच्या म्हणण्यातील उद्विग्नता आपल्या लक्षात येते .तेव्हाच विद्यार्थ्यांना एक चांगला माणूस बनवण्याचा मनोमन निश्चय केला.

समस्या-

श्रीगोंदा शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर पुणे बीड हायवेवर श्रीगोंदा नगरपालिका हद्दीतील ही शाळा.शाळेत पाच वर्ग खोल्या ,वॉल कंपाउंड ,प्रशस्त मैदान, हिरवीगार झाडे, निसर्गरम्य वातावरण....परंतु शाळेत पहिली ते चौथीपर्यंतच्या वर्गात जेमतेम 28 विद्यार्थी होते.काही वर्षांपूर्वी 100 च्या पुढे पट आणि पाचवी पर्यंत वर्ग असणारी शाळा आज विद्यार्थ्यां अभावी सुनी सुनी वाटत होती.कारण येथील सधन पालकांची मुले श्रीगोंदा शहरातील इंग्रजी माध्यमाच्या अथवा खाजगी माध्यमाच्या शाळेत भरमसाठ फी देऊन प्रवेश घेत होती.आणि गोरगरीब शेतमजूर किंवा कामगारांची मुले आमच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत येत होती. श्रीगोंदा शहर जवळ असल्यामुळे पालकांना पर्यायी शाळा सहज उपलब्ध झाली होती.सुरुवातीला आम्ही सर्व पालकांच्या भेटी घेऊन मुलांना आमच्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी विनंती केली.परंतु पालक जिल्हा परिषदेच्या शाळेकडे तुच्छतेच्या भावनेने पहात असल्याचे आमच्या लक्षात आले.शेवटी याच गोरगरिबांच्या मुलांना मनापासून घडवण्याचा निश्चय केला कारण मलाही माझे स्वप्न साकार करायचेच होते.

समस्या निराकरणासाठी नियोजन -

दैनंदिन अध्यापनाबरोबरच वर्षातील सहशालेय उपक्रमांचे नियोजन केले व मनापासून कामाला सुरुवात केली .

सहशालेय उपक्रमांची उद्दिष्टे ठरवून घेतली.पालक मेळावा घेऊन सहशालेय उपक्रमांचे महत्त्व पालकांना पटवून दिले.

उद्दिष्टे :

1] विद्यार्थ्यांना यशस्वी जीवनाचे शिक्षण मिळावे ,शाळेतील ज्ञानाचा प्रत्यक्ष ज्ञानाशी संबंध असावा.

2] विद्यार्थ्यांना परीक्षार्थी न बनवता ज्ञानार्थी बनवणे. अभ्यासक्रम पाठ्यपुस्तक पुरता मर्यादित न ठेवता सर्वांगीण विकासावर भर देणे ,कौशल्यावर भर देणे.

3] वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवून चिकित्सक विचार प्रक्रिया विकसनावर भर देणे.

4] स्वनिर्मितीचा आनंद देऊन शिक्षण प्रक्रिया आनंददायी करणे.

5] प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञानरचनावादी कृतीयुक्त शिक्षण देऊन प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र घडवणे.

6] सहकार्याची भावना वाढीस लावून मुलांचा सामाजिक विकास करणे.

7] टी.व्ही, मोबाईल वरील आभासी गेम पासून मुलांना दूर ठेवून स्वतः बनवलेल्या खेळण्यातील खराखुरा निखळ आनंद मुलांना देणे.

8] पर्यावरणाचे प्रश्न समजणे, चंगळवादाचा पासून दूर राहून समाजाशी बांधिलकीचे संस्कार रुजवणे.

9] मानवाच्या मेंदूचे दोन भाग असतात एक उजवा भाग व दुसरा डावा भाग. ज्या विद्यार्थ्यांच्या मेंदूचा उजवा भाग विकसित असतो असे विद्यार्थी पुढे अफलातून कार्य करतात. बाल मानसशास्त्रानुसार विद्यार्थ्यांचा उजवा मेंदू प्रयत्नपूर्वक विकसित करता येतो. ते प्रयत्न म्हणजे सहेतूक कृती शिक्षण देणे .

10] विद्यार्थ्यांच्या आंतरमनावर उपक्रमातून ,कृतीतून सुसंस्कार करणे.

राबवलेले सहशालेय नाविन्यपूर्ण उपक्रम पुढीलप्रमाणे.

वैज्ञानिक खेळणी –

विद्यार्थ्यांना व्यवहारातील विज्ञान समजण्यासाठी, परिसरातील टाकाऊ वस्तू वापरून डॉक्टर अरविंद गुप्ता यांच्या संकल्पनेतील एक प्रयोगशाळा बनवली. यात अनेक वैज्ञानिक खेळणी आहेत .मुले ही खेळणी स्वतः बनवतात. प्राप्त परिस्थितीत एखादी वस्तू नाही मिळाली तर त्यावर उपाय शोधतात .आवडीने खेळत स्व निर्मितीचा आनंद घेतात.खेळणी मधील वैज्ञानिक कार्यकारणभाव समजतात. एकमेकांशी सहकार्याने वागतात. अनेक प्रश्न विचारतात. कल्पक विचार सुचतात .यामध्ये straw ची भिंगरी, बाटल्यांचे टरबाइन, पवनचक्की, कपाचे भिरभिरे ,बाटल्यांचे कारंजे, मॅग्नेट ट्रेन, बलून कार यांसारखी विविध वैज्ञानिक खेळणी मुले बनवतात .त्यासाठी साहित्य त्यांना प्रयोगशाळेत उपलब्ध करून दिले जाते. मुले स्वतः टाकाऊ वस्तू गोळा करतात. कोणत्या वस्तू पासून काय बनवता येईल याचा विचार करतात.

https://youtu.be/7aYY3S-cu5Y

https://drive.google.com/file/d/1bn5GkrdkDcglNJX0FWtm27KiG9-vmHJe/view?usp=drivesdk

https://drive.google.com/file/d/1bUBM-QdNSD_OSk7dDAURhSPLzr4uzGvr/view?usp=drivesdk

स्काईपचा क्लास ज्ञानाचा लोकसहभाग

भारत देशातील अहमदनगर जिल्ह्यातील काही नागरिक नोकरीनिमित्त विविध देशात स्थायिक झाले आहेत. त्यांची ग्लोबलनगरी नावाची एक संस्था आहे या संस्थेतील सदस्य मायदेशाच्या प्रगतीसाठी प्राथमिक शाळा दत्तक घेऊन शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षण पद्धती,संस्कृती व चालू घडामोडी याबाबत मार्गदर्शन करतात. ग्लोबल नगरी परिवारातील अमलाताई शिंदे मुळगाव श्रीरामपूर जिल्हा अहमदनगर सध्या अमेरिकेत वकिली व्यवसाय करत आहेत. यांची माझ्या शाळेवर mentor म्हणून नियुक्ती झाली.अमलाताई शिंदे दर शनिवारी सकाळी स्काईप ॲपद्वारे विद्यार्थी, शिक्षकांना व पालकांना मार्गदर्शन करू लागल्या.क्लासमुळे शाळेत चैतन्यमय वातावरण निर्माण झाले .कारण या क्लास च्या माध्यमातून त्यांनी विविध उपक्रम शाळेत राबवले.

https://drive.google.com/file/d/1bg-h8Ct8m1DhurGY5-dCPbkavbMHh1pd/view?usp=drivesdk

https://youtu.be/BFysiai98Sg

गटकार्य

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी, आनंददायी शिक्षण देण्यासाठी, प्रत्येकाच्या क्षमतेनुसार स्वयंअध्ययन कार्ड तयार करून ठेवली आहेत. मुलांचे गट अथवा जोड्या करून एकमेकांच्या सहकार्याने अभ्यास करण्याचे नियोजन केले जाते. त्यामुळे वर्गातील एकही मूल अप्रगत राहिले नाही. बऱ्याच वेळा शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगून समजत नाही, विद्यार्थ्यांनीच विद्यार्थ्यांना सांगितले तर पटकन समजते .कच्चे विद्यार्थी व पक्के विद्यार्थी जोडी लावून अभ्यास केला जातो. अभ्यास देण्याचे नियोजन व मार्गदर्शन शिक्षक करतात. विद्यार्थी आनंदाने अभ्यास करतात. शेवटी शिक्षक अभ्यास तपासून शाबासकी देतात. गटकार्य या उपक्रमाचे व्यवस्थित नियोजन केल्यास वर्गात एकही विद्यार्थी अप्रगत राहत नाही.म्हणूनच माझा वर्ग अप्रगत मुक्त वर्ग आहे.

https://drive.google.com/file/d/1dSBGbiyLEun8B_WzwlDaRjKOw3GtnHDo/view?usp=drivesdk

पेट्रोल पंप भेट

वैज्ञानिक खेळणी मध्ये मुलांनी विविध गाड्या बनवलेल्या आहेत . खेळता-खेळता गाडीतील पेट्रोल संपले. आता पेट्रोल पंपावर जावे लागेल. पेट्रोल पंपात पेट्रोल येते कुठून असा त्यांचा संवाद चालू होता . शाळेपासून एक किलोमीटर अंतरावर एक पेट्रोल पंप आहे. पेट्रोल पंप भेटीचे नियोजन केले .पेट्रोल पंपांत पेट्रोल कुठून येते? सुरक्षेसाठी काय काळजी

घेतात?त्यांचे दर काय असतात? कोणते आकडे काय दाखवतात, हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवले. मुलांनी अनेक प्रश्न विचारले .पेट्रोल-डिझेल साठवण्याच्या टाक्यांचे निरीक्षण केले .पेट्रोल ,डिझेलचे दर समजावून घेतले .

पर्यावरणपूरक सण उत्सव

कोणतेही सण उत्सव आपण मोठ्या उत्साहाने साजरे करतो.त्यामुळे बऱ्याच वेळा पर्यावरणाची फार मोठी हानी होते. कोणतेही सण साजरे करताना पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर करायचा असे सर्वानुमते ठरले आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कौशल्यांचा विकासाला वाव देण्यासाठी विद्यार्थी या वस्तू स्वतः बनवतात. उदाहरणार्थ दिवाळी अगोदर आकाशकंदील आणि पणत्या बनवण्याची कार्यशाळा घेतली. गणपती उत्सवाअगोदर स्वतः बनवलेला गणपती बसवण्याचे नियोजन केले. सजावटीसाठी साहित्य ही विद्यार्थी स्वतः बनवितात . त्यामध्ये पाना फुलांचे तोरण बनवणे हे निर्माल्य खत म्हणून वापरणे यांसारख्या गोष्टींची अंमलबजावणी पर्यावरण मित्र व शिक्षकांच्या मदतीने मुले करतात.विद्यार्थी व पालक आनंदाने या उपक्रमात सहभागी होतात व पर्यावरण संतुलनाचे संस्कार त्यांच्यावर कृतीतून रुजवली जातात.

https://drive.google.com/file/d/1dTo_gC13E49BCfOvpGFWQ--OGCrowkK0/view?usp=drivesdk

एक मूठ धान्य, ओंजळभर पाणी पशू पक्ष्यांसाठी

निसर्गातील पशू पक्ष्यांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चाललय. पर्यावरणाचा समतोल ढासळतोय. त्यामुळे एकूणच जैवविविधतेवर आणि संकटे येत आहेत.कधी दुष्काळ, कधी महापूर, कधी स्वाइन फ्लू तर कधी कोरोना. पर्यावरणाचा ऱ्हास झालाय सुरू .यासाठी आपणच काहीतरी करू. प्रत्येकाने खारीचा वाटा उचलू. पशू पक्षांना नियमित चारापाणी ठेवू. सत्कार्याचा आनंद घेऊ. भूतदयेचे धडे गिरवू .पर्यावरणाचे संरक्षण करू. भारत मातेस उज्ज्वल बनवू. असा संकल्प करत शेंडगेवाडी प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांनी राबवलेला हा उपक्रम "एक मूठ धान्य, ओंजळभर पाणी पशुपक्ष्यांसाठी." यामध्ये जानेवारी महिन्यात विद्यार्थ्यांना मातीच्या कुंड्याचे वाटप केले . विद्यार्थ्यांनी घरी पालकांच्या मदतीने घराजवळील झाडाला कुंड्या बांधल्या किंवा घरावर ठेवल्या . त्यामध्ये नियमित चारापाणी ठेवले .

https://youtu.be/7AdMKEFvN-o

https://drive.google.com/file/d/1brdhbB3qH-EOekNZARWSiGol7JvWxtyt/view?usp=drivesdk

शिवार फेरी

मुलांचे आपल्या मातीशी नाते जोडलेले राहावे. त्या बद्दल आपुलकी आदर व प्रतिष्ठा वाढविण्यासाठी शिवार फेरीचे आयोजन केले. यावर्षीची शिवारफेरी शाळेजवळील संभाजी सातव यांच्या रानात आयोजित केली.त्यांनी रानातील द्राक्षांची बाग दाखवली .शेततळ्यात साठवलेले पाणी पाहून मुले आनंदून गेली. तसेच ठिबक सिंचन तुषार सिंचन या विषयांवर कुतुहलाने अनेक प्रश्न विचारले. जेवण करून रानमेव्याचा आस्वाद घेऊन, गटागटाने सांस्कृतिक कार्यक्रम व गाण्यांच्या, गावांच्या नावाच्या, इंग्रजी शब्दांच्या, भेंड्या खेळून मुले आनंदाने घरी परतली.



स्नेहसंमेलन आयोजन : विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी स्नेहसंमेलनाचे आयोजन केले. माझ्या शाळेतील स्नेहसंमेलन म्हणजे एक उत्सव असतो. या उत्सवाचे शिक्षक, विद्यार्थी व पालक आतुरतेने वाट पाहतात. पालक स्टेज साऊंड सिस्टिमची

सुविधा उपलब्ध करून देतात .विद्यार्थ्यांना लागणारी ड्रेपरी व मेकअपचे साहित्य ही आणतात .भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणारे विविध कार्यक्रम बसवले जातात.

https://drive.google.com/file/d/1c2paM5Df-LWWdPmiTXdmGFVZfFyDosKI/view?usp=drivesdk

https://youtu.be/ta8-OqNYyM4

रोपवाटिका भेट : शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपवाटीकेतून रोपे विकत आणली जातात. ही रोपे रोपवाटिकेत नेमकी कशी तयार करतात याची विद्यार्थ्यांना जिज्ञासा होती. आपणही शाळेत अशी रोपवाटिका तयार करावी का अशी विद्यार्थ्यांची चर्चा चालू होती .छोटी रोपवाटिका शाळेत तयार करण्यासाठी रोपवाटिकेला प्रत्यक्ष भेट देऊन , कार्यपद्धती समजावून घेतली. यामध्ये रोपे तयार करण्यासाठीचे ट्रे, पिशव्या कुठे मिळतात याची माहिती घेतली . त्यासाठी लागणारी माती, कंपोस्ट खत याविषयी विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न विचारले. कोणते बी रुजायला किती दिवस लागतात , किती दिवसानंतर ते रोप लावण्यास योग्य होते, रोग पडू नये म्हणून काय काळजी घ्यावी, पाणी किती दिवसानंतर द्यावे असे अनेक प्रश्न मुलांनी रोपवाटिकेतील आजीबाईंना विचारले. आजींनाही मुलांचे खूप कौतुक वाटले. खूप प्रेमाने सर्व माहिती दिली.मुले नवीन माहिती मिळाल्याचा आनंदात घरी पोहोचली .



शैक्षणिक सहल : विद्यार्थ्यांचा आवडता उपक्रम म्हणजे सहल.विद्यार्थ्यांना धार्मिक, ऐतिहासिक ,नाविन्यपूर्ण स्थळांची माहिती होण्यासाठी तसेच एक दिवस घरापासून ,आई-वडिलांपासून दूर राहून स्वतःला सांभाळत. पैसे सांभाळणे ,खरेदी करणे, इतरांमध्ये मिसळणे, सर्वांना सहकार्य करणे या गोष्टी शिकण्यासाठी सहलीचे आयोजन केले .पालकांनी मोठ्या विश्वासाने मुली आमच्या स्वाधीन केली. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आनंदाने मुले घरी परतली.





विद्यार्थी बाजार

मुलांना प्रत्यक्ष व्यवहाराचे ज्ञान होण्यासाठी बाल आनंद मेळावा, शिक्षण उत्सव, यांसारख्या कार्यक्रमांतून भाजीपाला बाजार भरवला .पालक ,अधिकारी, पदाधिकारी आवर्जून या बाजारात खरेदी करतात. त्यातून विद्यार्थ्यांना वजनाचे ,हिशोबाचे,व्यवहाराचे ज्ञान मिळते .स्वतः पैसे कमावल्याचा आनंद मिळतो. व कष्टाचे महत्त्व समजतं. विद्यार्थी बाजाराविषयी दोन दिवस अगोदर सूचना दिली जाते.विद्यार्थी व पालक आपापल्या रानातील भाजीपाला ,रानमेवा आणून ठेवतात. त्या वस्तूंचे दर विद्यार्थ्यांना समजावून सांगितले व वजनांविषयी माहिती दिली जाते. प्रत्येकास योग्य जागा उपलब्ध करून दिली. काही मुलांचे गट केले. पालक अधिकारी पदाधिकारी कौतुकाने या बाजारात खरेदी करण्यासाठी येतात .

दुर्ग-संवर्धन :

इतिहासातून माणसाला अनुभवांचे ज्ञान मिळते. अनुभवांची साक्ष देणारे गड-किल्ले लयास जात आहेत. जे काही आज आपलं अस्तित्व टिकवून आहेत. त्यांचे संवर्धन करणे ही आपली जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांना गड-किल्ले दाखवून त्यांचे महत्त्व सांगणे यामध्ये पालकांनाही सहभागी करून घेतलं जातं. कारण देशाचे भावी नागरिक घडविण्यासाठी आणि पर्यावरण संतुलनासाठी प्रत्येकाने आपला खारीचा वाटा उचललाच पाहिजे हा विचार माझ्या शाळेतील शिक्षक विद्यार्थी व पालकांना पटलेला आहे. वर्षातून एकदा दुर्गसंवर्धन अभियानाअंतर्गत एका किल्ल्याच्या भेटीचे नियोजन पालकांच्या सहकार्याने केली जाते.

https://youtu.be/olyoIGMvfUY

https://drive.google.com/file/d/1bh88ILvcs43njj0CvQHY7sY7m-dxOIqH/view?usp=drivesdk

बाल वाटिका :

आमची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेंडगेवाडी श्रीगोंदा नगरपालिकेच्या हद्दीत असल्यामुळे येथे सरकारी अंगणवाडी अथवा बालवाडी नाही.म्हणून तीन ते सहा वयोगटातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गैरसोय होत होती आणि हे विद्यार्थी अंगणवाडी पासूनच एलकेजी युकेजी ला किंवा बालवाडीला श्रीगोंदा शहरात जात होती.त्यामुळे पुन्हा ती जिल्हा परिषदेचे शाळेत येत नव्हती म्हणून पालकांच्या व शाळा व्यवस्थापन समितीच्या समन्वयातून त्यांना मार्गदर्शन करून शाळेत एका शिक्षिकेची बालवाटीकीच्या अध्यापनासाठी नेमणूक केली.

https://youtu.be/R9o5HZsYxOs_____https://youtu.be/C02Xw6qWXpY

फलनिष्पत्ती :

आजोबांनी मुलांना माणूस बनवण्यासाठी केलेला उपदेश आणि त्या दृष्टीने मी केलेले प्रयत्न यशस्वी झालेले दिसत होते. कारण मुलांची आपल्या आजी आजोबांबरोबरचे नाते प्रेमाचे झालेले दिसत आहे .आज कितीतरी कुटुंबात आजी-आजोबा आणि नातवंडे यांना एकत्र येऊ देत नाहीत .आजी-आजोबांच्या लाडामुळे मुले बिघडतात अशी कारणे सांगितली जातात. माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांना मात्र लॉकडाऊन मधील स्वातंत्र्य दिनही आजी-आजोबांसोबत व घरात साजरा केला.शेवटी एवढेच सांगेन," माणसाला तळमळ असेल तर माणूस वळवळ करतो, आणि वळवळ केली की चळवळ उभी राहते."
विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या तळमळीमुळे जीवन कौशल्य विकास उपक्रम राबवण्यासाठी निरंतर मेहनत घेतली आणि या उपक्रमाचे अनुकरण इतर शाळा व शिक्षकही करताहेत ,फोन करून माहिती घेत आहेत. म्हणजेच चळवळ उभी राहिली आहे . या गोष्टीचा मनस्वी आनंद होत आहे. आज माझ्या शाळेच्या परिसरातील एकही विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या अथवा खाजगी माध्यमाच्या शाळेत जात नाही. आज आमच्या शेंडगेवाडी प्राथमिक शाळेत जिल्हा परिषद शाळेचे 41 विद्यार्थी आणि बालवाटिकेचे 30 विद्यार्थी असे एकूण 71 विद्यार्थी ज्ञानार्जन करत आहेत.

समारोप-

या उपक्रमामुळे पट वाढला .त्यातील दोन विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून आले. दोन विद्यार्थी खाजगी माध्यमाच्या शाळेतून आमच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत आले.आणि सात विद्यार्थ्यांनी युकेजी इंग्रजी माध्यमातून पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतला आहे.लोकसहभागातून शाळेचे रंगकाम केले शाळेच्या नावाचा सुंदर बोर्ड बनवला शाळेचा परिसर आनंददायी व रमनीय झाला पालकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला.अशाप्रकारे आता आमच्या शाळेच्या प्रगतीचा आलेख उंचावत आहे.आम्ही पाहिलेले स्वप्न साकार होत आहे.

यूट्यूब चैनल लिंक- https://youtube.com/channel/UC9dlJYtvKCHHjYg9cG09tmg

===== @ =====

45. सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास

शाळेचे नाव - जि.प.शाळा खलाणे ता.शिंदखेडा जि.धुळे
ई-मेल आयडी - @zpschoolkhalane1911
मुख्याध्यापकाचे नाव - श्री चंद्रकांत पुंडलिक डिगराळे
शालेय व्यवस्थापन - जिल्हा परिषद



प्रस्तावना :

आजच्या विद्यार्थी केंद्रित शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास हे शिक्षण क्षेत्राचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट झाले आहे . ' एकच ध्यास, गुणवत्ता विकास ' या उक्तीप्रमाणे शालेय स्तरावर गुणवत्ता विकासासाठी विविध उपक्रम, नवोपक्रम, नाविन्यपूर्ण संकल्पना राबविले जातात. शालेय अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, अध्ययन अध्यापनात विद्यार्थ्यांना दिलेले अध्ययन अनुभव, अध्ययन निष्पत्ती व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन या पंचसूत्रीवर विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास आधारित आहे हे सर्व मान्य आहे. तरीदेखील विद्यार्थ्यांचे अध्ययन हे निरस कंटाळवाणे व शालेय वर्ग खोलीतील चार भिंती आड न होता ते आनंददायी, प्रभावी व जलद गतीने होणे हे देखील काळाची गरज आहे. मुख्याध्यापक,शिक्षक यांच्या नाविन्यपूर्ण कल्पकतेने व कौशल्याने विविध सहशालेय उपक्रमातून देखील आपण विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास घडवून आणू शकतो. मानसशास्त्रीय दृष्ट्या सुद्धा बरेचसे विद्यार्थी जे वर्ग अध्यापनात कमकुवत किंवा मध्यम स्वरूपाचे असतात असे विद्यार्थी सहशालेय उपक्रमात सक्रिय सहभागी होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढतो व पुढे त्यांच्यात आश्चर्यकारक सुधारणा घडवून आलेल्या दिसून येतात .म्हणूनच आमच्या शाळेत मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद वेळोवेळी वर्षभर प्रसंगानुरूप, कल्पकतेने विविध सहशालेय उपक्रम राबवितो व त्या सहशालेय उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासात अभूतपूर्व यश आम्हाला मिळालेले आहे.

नियोजन :

अधिकाधिक सहशालेय उपक्रम सुचावेत यासाठी आदर्शशाळा वाबळेवाडीचा अभ्यास दौरा मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समिती यांनी संयुक्तपणे दोन दिवसांसाठी आयोजित केला व तेथील शाळेत असलेल्या भौतिक सुविधा व गुणवत्ता वाढीसाठी उपयुक्त असणारे सहशालेय उपक्रम आपल्या शाळेत राबविता येतील यावर विचार मंथन होऊन प्राधान्य क्रमाने तेथील सकारात्मक बाबी राबविण्याबाबत एकमत झाले. त्यात आरोग्य विषयक मी कसा दिसतो , मुलांसाठीचे खुले वाचनालय, शाळेच्या दर्शनी भागात शाळेची वैशिष्ट्ये, शाळेचे पुरस्कार लावणे. गावात दर्शनी भागावर वाचनीय तक्ते लावणे व काही गुणवत्ता सुधारण्यासाठीचे उपक्रम व्यक्तिशः प्रत्येक शिक्षकाने आपापल्या वर्गात अध्ययन निष्पत्तीवर आधारित असे सहशालेय उपक्रम राबविले . उदा. मोठ्यात मोठ्या संख्यांचा गुणाकार, मोठ्यात मोठा इंग्रजी शब्द वाचणे, इंग्रजी शब्दांचा संचय वाढविणे, संगणक साक्षरता, संगीत कला कार्यानुभव याविषयी स्वतंत्र दालन निर्माण करणे इ. उपक्रम राबविण्याबाबत नियोजन करण्यात आले.

अंमलबजावणी :

पालकांना दिली गुणवत्तेची हमी-

सन 2018 मध्ये फेब्रुवारी महिन्यापासूनच दाखल पात्र विद्यार्थ्यांचा शोध घेत आम्ही गावांमध्ये फिरलो. पालकांशी संवाद साधला . इंग्रजी माध्यमाच्या शाळांसारखी जाहिरात केली. पत्रिका छापून घरोघरी वाटल्या . आमच्या शाळेची वैशिष्ट्ये व आमच्या शाळेची गुणवत्ता याविषयीचे हमी देणारे मोठे बॅनर गावाच्या दर्शनी भागात प्रदर्शित करण्यात आले, जेणेकरून बाहेरगावी शिकायला जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा ओढा मराठी शाळेकडे वाढेल व गावातील प्रत्येक मुल आपल्या गावातील शाळेतच शिकेल हा उद्देश होता. 2018 पासून 15 मार्च रोजी इयत्ता पहिलीचा वर्ग आता दरवर्षी नियमितपणे मुलांना दाखल करून सुरू होतो. पालकांना आम्ही हमी दिली की, जर 15 मार्च ते 01 मे दरम्यान आपले मूल आमच्या शाळेमध्ये रमले त्याची गुणवत्ता किंवा त्याच्या इष्ट वर्तनात बदल झालेले आढळून आले तरच आमच्या शाळेत पाठवा. अन्यथा तुम्ही तुमच्या मुलाला इतरत्र पाठवू शकता. अशा प्रकारे पालकांशी संवाद साधत 15 मार्च रोजी पहिलीचा वर्ग सुरू झाला. वृत्तपत्रातून व सोशल मीडियातून प्रसिद्धी दिली त्यातून जिल्हाभरात 15 मार्च रोजी इयत्ता पहिलीचा वर्ग नियमितपणे सुरू करणारी शाळा म्हणून आमच्याकडे पाहिले जाऊ लागले. पालकांच्या मागणीनुसार वरिष्ठांकडे पाठपुरावा करून अशाप्रकारे जून 2018 पासून सेमी इंग्रजीचे वर्ग सुरू केले .आज आमच्या शाळेतील प्रत्येक तुकडी सेमी इंग्रजी वर्गाची आहे.

श्यामची आई संस्कार कथामाला :

आम्ही 24 डिसेंबर 2018 पासून साने गुरुजी जयंती निमित्त श्यामची आई कथामाला सुरू केली . यात परिपाठात प्रत्येक शिक्षकाने श्यामची आई या पुस्तकातील एक कथा रोज सांगायची असते. कथा सांगताना अनेक संवेदनशील प्रसंग निर्माण झाले कधी विद्यार्थ्यांना रडू कोसळले , तर कधी शिक्षकांना गहिवरून आले . श्यामची आई कथामालिकेतून आम्हा शिक्षकांना व विद्यार्थ्यांना संस्काराची जणू शिदोरीच मिळाली.

ग्रेट भेट :



या सदराखाली आमच्या शाळेत प्रत्येक महिन्याचा एक शनिवार याप्रमाणे वर्षभर समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती त्यात व्यावसायिक, समाजसेवक, उद्योगपती व नावाजलेले अधिकारी डॉक्टर, इंजिनियर, वकील, पीएसआय इत्यादी आदर्श व्यक्ती यांना आमंत्रित केले जाते . विद्यार्थी त्यांना प्रश्न विचारतात व ग्रेट भेट अंतर्गत आलेल्या व्यक्ती विद्यार्थ्यांच्या मुक्त प्रश्नांना दिलखुलासपणे उत्तरे देतात. यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात विविध अंगांनी भर पडत असते. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागतो व त्यांच्या गुणवत्ता विकासात देखील भर पडते.

बालतरंग गॅदरिंग -

आमच्या शाळेत दरवर्षी उत्साहात सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. यात प्रत्येक वर्गशिक्षक आपल्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग होईल असा प्रयत्न करतात . महाराष्ट्राची लोकधारा संस्कृती इत्यादी विषयांवर आधारित गीते नाट्य अभिनय या कला सादर केल्या जातात. या बालतरंग महोत्सवात विद्यार्थ्यांना मिळालेल्या बक्षीस रकमेतून मानचिन्ह प्रशस्तीपत्रक व शालेय उपयोगी साहित्य खरेदी करून मान्यवरांच्या हस्ते पालकांच्या उपस्थितीत देण्यात येते. यामुळे विद्यार्थ्यांच्या विविध कार्यक्रमात सहभागी होण्याचा उत्साह वाढतो.

सहली, क्षेत्रभेटी वनभोजन :

आमच्या शाळेत दरवर्षी डिसेंबर महिन्यात क्षेत्रभेटीचे आयोजन केले जाते भौगोलिक ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांना भेटी दिल्या जातात. किल्ले ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन त्यांचे महत्त्व समजून दिले जाते .तसेच सूतगिरणी, विमानतळ व

जलशुद्धीकरण केंद्र एमआयडीसी ,क्रांती स्मारक इत्यादी ठिकाणी क्षेत्रभेटीचे आयोजन करून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाशी निगडित घटकांचे अप्रत्यक्षपणे ज्ञान देण्यात येऊन त्यांच्या गुणवत्ता विकासात भर देण्यात येतो .



ब्लॉक फेसबुक पेज यूट्यूब चैनल :

माझी सुंदर शाळा खलाणे या नावाने आम्ही ब्लॉग निर्मिती केली आहे .तसेच याच नावाने फेसबुक पेज व यूट्यूब चैनल सुद्धा सुरू केले आहे .या सर्व मीडियाच्या माध्यमातून आमची शाळा आज आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचली आहे. आजवर या चॅनेलला अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या असून त्यावर सकारात्मक प्रतिक्रिया मिळाल्या आहेत . शाळेतील उपशिक्षिका श्रीमती जयश्री गीते यांनी देखील आपले स्वतंत्र यूट्यूब चॅनल सुरू केले आहे. अभ्यास उपयोगी पाठ्यक्रमाचे व विविध उपक्रमांचे व्हिडिओ तयार केलेल्या असून त्याचा लाभ धुळे जिल्ह्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांना होत आहे.

आकाशवाणी सादरीकरण:

शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन आकाशवाणी केंद्र धुळे या ठिकाणी सण समारंभाचे औचित्य साधून सादरीकरण होत असते .त्यासाठी आमचे शिक्षक नेहमी तत्पर असतात . शाळेतील उपशिक्षक श्री कैलास वाघ यांची आकाशवाणी धुळे वर विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाबाबत महत्त्वपूर्ण अशी मुलाखत घेण्यात आली. नोव्हेंबर 2022 या महिन्याच्या धुळे जिल्ह्यातील शिक्षण परिषदांमध्ये डायटने स्वतंत्र पत्र काढून या मुलाखतीचा भाग सर्व शिक्षकांना ऐकविण्यात आला ही आमच्यासाठी गौरवाची बाब आहे .

संगीतमय परिपाठ व कवायत :

आदरणीय मुख्य कार्यकारी अधिकारी सोधुळे जिल्हा परिषद यांच्या संकल्पनेतून आदर्श परिपाठ .बुवनेश्वरी एस . .सर्व धुळे जिल्ह्यात राबविण्यात आला त्यात आमच्या शाळेतील उपशिक्षक श्री .राकेश पाटील यांची परिपाठ संरचनेत महत्त्वपूर्ण भूमिका होतीसंगीतमय परिपाठ व कवायत यामधून देखील . . विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास घडून येतो हे दिसून आलेनेमून दिलेले विद्यार्थी दररोज वर्गवार संगीतमय परिपाठ स्वयंस्फूर्तीने सादर करतातयात नवनवीन प्रार्थना ., कृती गीते समूहगीते असतातसेच सामान्य ज्ञानाची माहिती म्हणजे . .विद्यार्थ्यांसाठी खजिनाच असतो विद्यार्थी परिपाठाचे व कवायतीचे सूत्रसंचालन करतात त्यामुळे शाळेचा संगीतमय परिपाठ व शनिवारची कवायत हा उल्लेखनीय उपक्रम ठरतो.

कलादालन:

या कलादालनात माइक, लाऊड स्पीकर, साऊंड सिस्टिम, हार्मोनियम, तबला, बासरी, तुतारी, नाल, ढोल, तडतडे, सांज ,खंजिरी व इतर संगीत वाद्य उपलब्ध करून दिले आहेत . विद्यार्थी आपल्या आवडीप्रमाणे या साहित्याचा नियमित वापर करतात. विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात पुरेशी संधी मिळावी हा कलादालनाचा उद्देश आहे .

सण उत्सव :

रक्षाबंधन ,होळी, दहीहंडी, तंबाखू मुक्ती, महिला मेळावा, योग दिन शाळेतील सर्व मुलींनी बहिणींनी आपल्या भावांना राखी बांधायची व मुलांनी त्यांना चॉकलेट काहीतरी भेट द्यायची ,त्यांच्या पाया पडणे हा संस्कार बालवायातच विद्यार्थ्यांमध्ये रुजवला जातो. होळीसारख्या सणांचे औचित्य साधून पालकांना उपस्थित राहण्यासाठी आम्ही आग्रही असतो . सर्व पालकांच्या उपस्थितीत गावातून प्रभात फेरी काढून तंबाखूजन्य पदार्थ जमा केले जातात व त्यांची होळी केली जाते व विद्यार्थी, पालकांसमोर तंबाखू मुक्तीची शपथ पालकांना त्या ठिकाणी दिली जाते . त्यातून व्यसनमुक्तीचा संदेश आपल्या पाल्यांना समोर पालक घेत असतात आणि फार मोठा

सामाजिक बदल यातून घडत असतो व विद्यार्थ्यांवर व्यसनमुक्तीचे संस्कार बालवयातच पडत असतात. विद्यार्थी व पालक यामध्ये एक नैतिक जडणघडण या माध्यमातून होत असते. दहीहंडी सारख्या कार्यक्रमातून फक्त मुलांचे मनोरे न करता आम्ही मुलींनाही मनोरे करून दहीहंडी फोडण्याची धाडस करून देतो. यातून मुलींना धाडस येते. मुले मुली असा भेद न वाढता समतेचा संदेश यातून जात असतो आणि दहीहंडीच्या आयोजन देखील गावातील मान्यवर पालकांच्या उपस्थितीत होतो. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून गावातील सर्व महिलांचा त्या ठिकाणी यथोचित सन्मान केला जातो. भेटवस्तू व हळदीकुंकवाचा कार्यक्रम पारंपारिक पद्धतीने आमच्या शाळेतील महिला भगिनी मोठ्या उत्साहाने करीत असतात . विद्यार्थ्यांचे आरोग्य ,मुलींचे शिक्षण यासारख्या विषयांवर व्याख्यानमालाचे आयोजन केले जाते. जिल्हा व राज्यस्तरावरील व्याख्याते यावेळी आमंत्रित केले जातात व आमच्या ग्रामीण भागातील भगिनींचे प्रबोधन त्यानिमित्ताने केले जाते . गुणवत्ता विकास हे शिक्षणाचे ध्येय साध्य होण्यासाठी तसेच शिक्षणात येणाऱ्या अडचणी व शिक्षणातून होणाऱ्या अपेक्षित बदल या अंतरक्रियेतून सहज शक्य



होतात.

https://youtu.be/mKs6rlvkPNU

शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक :

भारत देश हा लोकशाही प्रधान देश असून विद्यार्थ्यांना बालवायातच मतदार मतदान व निवडणूक प्रक्रियेची माहिती व्हावी यासाठी प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया कशी चालते याचे प्रात्यक्षिक शाळेमध्ये शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक घेऊन दाखविले जाते. यात उमेदवार निवडण्यापासून फॉर्म भरणे, माघार घेणे ,निवडणूक प्रचार ,प्रत्यक्ष निवडणूक मतदान, मतमोजणी, निवडून आलेल्या उमेदवाराची विजयी मिरवणूक या सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थी घेतात व विद्यार्थ्यांना त्यातून खूपच आनंद व माहिती मिळते. प्रत्येक विद्यार्थी हा भारताचा भावी नागरिक असल्यामुळे त्याला या प्रक्रियेची इत्यंभूत माहिती होणे काळाची गरज आहे.

https://youtu.be/XKZ0lBo59Ho

फलनिष्पत्ती :

सन 2018 पासून सुरू केलेल्या सेमी इंग्रजी वर्गच्या माध्यमातून पालकांना दिलेली गुणवत्तेची हमी शंभर टक्के यशस्वी झाली. सेमी इंग्रजी वर्गामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यास मदत झाली. इयत्ता चौथी उत्तीर्ण विद्यार्थी अनेक स्पर्धा परीक्षा, स्कॉलरशिप, नवोदय परीक्षेत पात्र ठरून यशस्वी झाले व पालकांचा आमच्यावरील विश्वास वाढला. इंग्रजी माध्यमात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होऊन जिल्हा परिषद शाळेकडे पालक व बालक दोघींचाही ओढा वाढला. 2018 मध्ये 28 विद्यार्थी एकाच वर्षी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून आमच्या शाळेत दाखल झाले . दरवर्षी हा ओढा वाढतो आहे. आज गावातील एकही दाखल पात्र विद्यार्थी बाहेरगावी शिकण्यास जात नाही.

श्यामची आई संस्कार कथा मालेतून विद्यार्थ्यांमध्ये प्राणिमात्रांवर दया करणे एकमेकांना मदत करणे, आई-वडिलांची आज्ञा पाळणे गुरुजनांचा आदर राखणे इत्यादी संस्कार मूल्यांची रुजवणूक होऊन त्याची फलनिष्पत्ती शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये दिसून आली.

ग्रेट भेट सारख्या उपक्रमातून समाजातील मान्यवर व्यावसायिक व विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या कार्याची विद्यार्थ्यांना ओळखून त्याप्रमाणे भावी काळात आपणही प्रगती करावी व त्या पदापर्यंत पोहोचावे असा आग्रह विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झाला आणि प्रत्येक विद्यार्थी मी डॉक्टर होईल, इंजिनियर होईल ,मी पोलीस होईल, मी व्यावसायिक होईल असे मत प्रगट करू लागले .

बाल तरंग गॅदरिंग च्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही सुप्त असलेल्या कलागुणांना वाव मिळाला .

सहल क्षेत्रभेटी वनभोजन परिसर भेटी या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध ऐतिहासिक स्थळांची व्यवसायांची माहिती मिळते पर्यटनातून विद्यार्थी अधिकाधिक आनंद शिक्षण घेतात गुणगौरव समारंभातून प्रत्येक शैक्षणिक वर्षात अधिकाधिक बक्षिसे मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये निकोप स्पर्धेची रुजवणूक होते .

शालेय मंत्रिमंडळ निवडणूक यासारख्या सहशालेय उपक्रमातून विद्यार्थ्यांना संपूर्ण निवडणूक प्रक्रियेची प्रत्यक्ष माहिती मिळते व भारताचा भावी नागरिक म्हणून पायाभरणी बाल वयातच होते यातूनच एखादा विद्यार्थी भावी नेता बनू शकतो.

यूट्यूब चैनल च्या माध्यमातून विद्यार्थी ऑनलाइन अभ्यास करताना दिसून येतात. नुकतेच व्ही स्कूल ॲपच्या माध्यमातून आमची जिल्हा परिषद खलाणे शाळेतील विद्यार्थी अग्रेसर आहेत व त्याच्या माध्यमातून गुणवत्ता विकास घडवून येत आहे.

विविध सण समारंभ उत्सव यामधून विद्यार्थ्यांमध्ये विविध मूल्यांची रुजवणूक होत असते व त्यांच्या ज्ञानात व माहिती खूपच भर पडते .

आदर्श परिपाठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त लागते . विविध गाणी , समूहगीते या माध्यमातून विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षणाचा लाभ होतो सामान्य ज्ञानातून त्यांच्या ज्ञानात भर पडून माहितीची दालने खुली होतात.

समारोप :

सहशालेय उपक्रम व गुणवत्ता विकास यांचा अनन्यसाधारण संबंध वरील सर्व उपक्रमातून दिसून येतो. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केवळ वर्गाच्या चार भिंती आड न होता विद्यार्थ्यांना विविध दालने, व्यासपीठे खुली होण्यासाठी सहशालेय उपक्रमांचे घसरण व शिक्षक यांचे कठोर परिश्रम, नाविन्यपूर्ण कल्पना आणि सतत विद्यार्थी डोळ्यासमोर असणे आवश्यक आहे व त्यासाठी आमचा शाळेचा प्रयत्न सतत चालू असतो . सर्व उपक्रम व कार्यक्रम यांच्या केंद्रस्थानी विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास हे एकच उद्दिष्ट आमच्या डोळ्यासमोर असते व त्या उद्दिष्टांनुरूपच आमच्या शाळेची वाटचाल सुरू आहे. https://youtu.be/DjXH4p46yyU

===== @ =====

46. स्थलांतरित बालकांचे शिक्षण

शाळेचे नाव - जिल्हा परिषद शाळा अंचाडे तांडा,ता. जि. धुळे

मुख्याध्यापक - अरुणा नामदेव पवार

इ मेल - Arunapawar1671@gmail.com

शाळेचे व्यवस्थापन - जिल्हा परिषद

प्रस्तावना :

धुळे तालुक्यातील अंचाडे तांडा हे गाव . या गावात पूर्ण बंजारा समाजाची वस्ती असून लोकसंख्या सुमारे १५०० आहे. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय उसतोडणी , मजूरी करणे हा असून सप्टेंबर महिन्यापासून ते मार्च महिन्यापर्यंत संपूर्ण गाव उस तोडणी करण्यासाठी परराज्यात हंगामी स्थलांतरीत होत असतात आणि उस तोडणीसाठी जाताना येथील पालक आपल्या पाल्यांना सोबत नेत असतात. यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत होते. पण श्रीमती अरुणा पवार यांची तांड्यात बदली झाली अन विविध शैक्षणिक उपक्रम राबवून मुलांचे स्थलांतर थांबवले व पालक उसतोडीसाठी जातांना आपल्या पाल्यांना आजी आजोबांकडे ठेऊ लागले.

स्थलांतरित बालकांचे शिक्षण या विषयासंदर्भात आलेल्या अडचणी :

अंचाडे तांडा हे गाव पूर्ण उस तोड कामगारांचे असून उस तोडणीसाठी सहा महिने पालक आपल्यासोबतच आपल्या मुलांना घेऊन जात असत व जेव्हा बाकी सहा महिने गावात असूनही विद्यार्थी मजुरीसाठी आई वडिलांसाठी शेतात जात असत. पालकांचे अज्ञान, अशिक्षितपणा व शिक्षणाविषयीची अनास्था दारिद्र्य यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होते.

शाळेत महिला शिक्षक नसल्याने पालक थोड्या मोठ्या असलेल्या मुलींना शाळेत पाठविण्यास तयार नव्हते. पालकांना जर विद्यार्थी शाळेत पाठवा, उसाला न नेण्याचा आग्रह धरला तर पालक अगोदर stamp करून द्या, मग नंतर विद्यार्थी गावात राहतील व शाळेत येतील असे सांगत. मजुरीला गेल्यावर आम्हाला पैसा मिळतो, शाळेत येऊन काय फायदा होणार आहे असा गैरसमज सर्वत्र पसरलेला होता.

उस तोडीच्या ठिकाणी लहान भावंडांचा सांभाळ करण्यासाठी , घरकामासाठी बरेच विद्यार्थी घरी राहत असत. आपण उसाला गेलो तर घरी मुलांना सांभाळण्यासाठी कोणी नव्हते. अशावेळी मुलांची जबाबदारी कोण घेणार याची काळजी होती व शिक्षणाचा आणि राहण्याचा खर्च करण्याची पालकांची परिस्थिती नव्हती.

उस तोड हाच आपला व्यवसाय असून त्यातच आपण खुश राहायचं असाच ठाम निश्चय सर्व गावक-यांचा होता. मुलांचेही शाळेत मन रमत नव्हते. वातावण उदास व कंटाळवाणे वाटत होते. पटसंख्या कमी होती व स्थलांतर होत असल्यामुळे अभ्यासात मागे पडत होते.

अडचणींवर मात करण्यासाठी केलेल्या उपाययोजना :

स्थलांतर होत असलेल्या पालकांच्या जवळ जात त्यांचा विश्वास संपादन केला. त्या कामी शाळेचे सहकारी व शाळा व्यवस्थापन समितीचे मोलाचे सहकार्य लाभले. शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना सोबत घेऊन गृहभेटी घेतल्या. शिक्षणाचे महत्व पालकांना पटवून दिले. निरक्षर असल्याने व अंगठा ठेवताना आपली कशी फसवणूक केली जाते याची उदाहरणे दिली . पालकसभा प्रेरणासभा व माता पालकांनाही मुलींच्या शिक्षणाचे फायदे समजावले .

अगोदर शाळेचे बाह्यांग बदलले. रंग रंगोटीने शाळा सजवली. लोक वर्गणी जमवली. शाळेचे रूप बदलले. शाळा अगदी नव वधूसारखी दिसू लागली. आणि मनापासून पूर्ण वेळ शाळेत अध्यापन सुरु केले, वृक्षारोपण केले , पिण्याच्या पाण्याची सोय गावातच नव्हती. म्हणून शाळेतही नव्हती. त्यासाठी शेजारच्या गावातून नळ कनेक्शन करून घेतले.

मिळेल त्या दात्यांकडून स्थलांतरित बालकांच्या शिक्षणासाठी पाट्या, वह्या , पेन्सिली यासारख्या शैक्षणिक साहित्याची तसेच school bag, sports dress आणि हिवाळ्यात मुलांना स्वेटर यांची व्यवस्था करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक



उसतोडणी कामगारांच्या मुलांसोबात

पालकत्व स्वीकारून त्यांचे पोषण, रक्षण व शिक्षणाची जबाबदारी घेतली.

विज्ञान युगात हे विद्यार्थी टिकून राहावेत यासाठी संगणक व tab दात्यांकडून मिळवले. घरी लहान बहीण भावंडांचा सांभाळ करण्यास कोणी नसेल अशा मुलांना भाऊ बहीण सोबत आणण्यास परवानगी दिली. उस तोडीसाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण हमी कार्ड देऊन त्यांच्या शिक्षणाची सोय केली. जे विद्यार्थी स्थलांतर होत असतील त्यांचे सर्वेक्षण करून ते कोठे जातात त्या मुकादामांचे फोन नंबर घेऊन नेहमी संपर्कात राहून उस तोडीसाठी जाणाऱ्या गाड्या अडवून विद्यार्थी गावातच थांबविले. जर काही विद्यार्थी पालकांसोबत गेले असतील अशावेळी पर राज्यात जाऊन तेथील कारखानदारांना भेटून मुलांच्या शिक्षणाची सोय केली. व माझ्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना लेखन साहित्य वाटप केले. व तेथीलच एका स्थानिक शिक्षकाची नेमणूक विद्यार्थांसाठी उसाच्या फडावर केली. काही विद्यार्थी शाळेत परत आणले.

गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण हेच शाळेचे उद्दिष्ट्य ठेवले. रात्रीही विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांना अभ्यासात मदत केली. जे पालक उस तोडी साठी गेले असतील त्या मुलांची दिवाळी माझ्याकडे साजरी होऊ लागली. व्हिडीओ कॉल द्वारे मुलांचा पालकांशी संवाद करून दिला जाऊ लागला. विद्यार्थी-पालक- शिक्षक यांच्यात यामुळे जवळीक निर्माण झाली.

पहिलीपासूनच शाळेत इंग्रजी वाचनावर भर देऊन विद्यार्थी इंग्रजी वाचन सहज करू लागले. शिक्षक त्यांच्या बोली भाषेतून संवाद साधतात त्यामुळे विद्यार्थी शिक्षकात आत्मीयता निर्माण होते. शाळेला बसगाडीचे रूप दिले. तसेच बालआनंद मेळावे घेतले. अवांतर वाचन करण्यासाठी वाचन कुटी तयार केली.





पालकांशी सुसंवाद *आनंददायी अध्ययन*

मोठ्या असलेल्या विद्यार्थ्यांना वयानुरूप दाखल करून घेतले. शाळेसाठी एक नवीन वर्गखोली मंजूर घेतली. तसेच इतर वर्ग खोल्यांचेही दुरुस्तीचे काम करण्यात आले. वर्ग सजावट केली. राज्यस्तरावर बालरक्षक म्हणून महत्वाची भूमिका बजावली. जेथे बालक दिसेल त्याला शैक्षणिक प्रवाहत आणणे हे महत्वाचे उद्दिष्ट ठेवले.

फलनिष्पत्ती : *स्थलांतरित होणाऱ्या विद्यार्थांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारल्यामुळे विद्यार्थी गावातच राहू लागले. त्यांना अभ्यासाची गोडी निर्माण झाली. वर्ग प्रगत झाले. उपस्थितीही वाढली. घरी राहणाऱ्या विद्यार्थ्यांना कधीच बोलवायला जायची गरज उरली नाही. इतर विद्यार्थीच प्रत्येक मुलाला शाळेत हजर ठेऊ लागले.*

मराठी विषयात वाचन व श्रुतलेखन, कविता गायन, वेगवेगळ्या विषयांवर विद्यार्थी लेखन करू लागले. जे विद्यार्थी अभ्यासात मागे असतील अश्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी शिक्षक झाले व स्थलांतरित मुलांच्या शिक्षणाला वेगळीच कलाटणी मिळाली .

गणित विषयात संख्यावाचन मुले पटकन करतात आणि या मुलांचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे हिशोब पटकन करणे, स्थानिक किंमत ओळखणे , वजाबाकी, बेरीज , गुणाकार व भागाकार या सर्व क्रिया मुले पटकन करू लागली.

या विज्ञान युगात आपण कुठेच मागे नाहीत यासाठी या स्थलांतरित न झालेल्या बालकांनी इंग्लिश विषय तर आवडीचा करून टाकला. पाठ्यपुस्तकातील व इतरही पुस्तकांचे इंग्लिश वाचन मुले करू लागली व इंग्रजी माध्यमाच्या मुलांपेक्षाही ही मुले पुढे निघून गेली. कारण शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे हे त्यांना कळले या मुलांना पाहून इंग्रजी मध्यम व शेजारच्या गावातील मुलेही माझ्या शाळेत दाखल झाली व शाळेचे रुपडेच बदलले.

गुणवत्तेची शाळा, स्थलांतर विरहीत शाळा उपस्थितीने नटलेली शाळा ही शाळा उपक्रमशील शाळा म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध झाली व तांडा शाळा, उस तोड स्थलांतर हे शब्दच ऐकू येत नव्हते .

Online कोणतीही स्पर्धा असो, यात विद्यार्थी आवडीने सहभाग घेऊ लागले व त्यात क्रमांक मिळवला. शब्दभांडार वाढविण्यासाठी बालकेच माझा शब्दसंग्रह हा उपक्रम घेऊन शब्दसंपत्ती वाढवली. शब्द भेंड्या , गणित खेळ, हस्ताक्षर स्पर्धा, कौन बनेगा संख्यापती, शब्दांची दहीहंडी, रेडीओ कार्यक्रम, मोबाईलवर विविध प्रश्न सोडविणे, झाडांवर चढणे, नदीत पोहोणे अशा विविध कलागुणांनी ही बालके अगदीच नटून दिसू लागली.

उस तोडीसाठी जे जात होते ते शाळाबाह्य विद्यार्थी वयानुरूप दाखल होऊन गुणवत्तेत भरारी घेऊ लागले. मुली शिक्षणाच्या प्रवाहात येऊ लागल्या. आणि हळू हळू साराच गाव शाळेत रेंगाळू लागला. पालकांचे अज्ञान दूर झाले व स्वतः पालकच आपल्या पाल्यांना शिक्षणासाठी गावातच ठेऊ लागले.

शाळेतून बाहेर पडणारा विद्यार्थी सर्वगुण संपन्न म्हणून बाहेर पडू लागला. झोपडीतील अज्ञानाचा अंध:कार दूर होऊ लागला. ज्ञानाच्या दिव्याचा उजेड घरी पडू लागला.

शाळेला बसचे रूप दिले, गुणवत्ता बस चहूकडे फिरली, गोर गरिबांची बस, उस तोड कामगारांची बस आणि या बसचे एकच ध्येय . माझा स्थलांतरित बालक शिक्षणाच्या गावात येऊन पोहोचवणे.

सन 2011 चा पट				सन 2022 चा पट			
इयत्ता	मुले	मुली	एकूण	इयत्ता	मुले	मुली	एकूण
1 ली	7	9	16	1 ली	20	14	34
2 री	7	8	15	2 री	12	9	21
3 री	9	4	13	3 री	12	20	32
4 थी	9	6	15	4 थी	25	20	45
एकूण	32	27	59	एकूण	69	63	132

समारोप :

उसतोड हेच आपले जीवन माणणाऱ्या बंजारा समाजातील लोकांना आता आपली मुले शिक्षण घेऊन उत्तम नागरिक होतील आणि स्वत:चे भविष्य उज्ज्वल करतील अशी आशा आहे.

शेवटी आमचे एकच ब्रीदवाक्य..

'साऱ्या कोवळ्या जीवांना अक्षराचा स्पर्श व्हावा !

उजेडाचे दान देण्या झोपडीत सूर्य यावा !!

नको असा एकही हात जो पाटीला पारखा !

पुस्तकांचा स्पर्श व्हावा त्यांचा आईसारखा !!'

===== @ =====

47. अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर (ई लर्निंग)

शाळेचे नाव– जिल्हा परिषद शाळा खेराडेवांगी ,ता. कडेगाव, जि. सांगली

मुख्याध्यापकाचे नाव–श्री. जनार्दन तातोबा ढाणे

ई मेल–jardandhane1967@gmail.com

शाळा व्यवस्थापन– जिल्हा परिषद

प्रस्तावना -

कोरोनाच्या भयान वास्तवातून गेल्यानंतर सर्वच क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल घडून आले आहेत. शैक्षणिक क्षेत्रावर याचा सर्वात जास्त परिणाम झालेला पाहावयास मिळतो. शाळा बंद यामुळे कित्येक मुलं शिक्षणापासून दुरावलेली पाहावयास मिळत आहे. पण यातूनही जर एखादा सकारात्मक बदल झाला असेल तर तो आहे ऑनलाइन एज्युकेशन. ऑनलाइन एज्युकेशन मुळे शिकण्याची आणि शिकवण्याची नवी दारं उघडली गेली आहेत. त्यामुळे आत्ताच्या घडीला देखील ई लर्निंग अध्ययन अध्यापनासाठी प्रभावी माध्यम ठरले आहे.

आज आमच्या शाळेमध्ये अतिशय प्रभावीपणे अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. यासाठी यूट्यूब चैनल, ब्लॉग, ऑनलाईन टेस्ट, स्मार्ट pdf, व्हाट्सअप ग्रुप, स्मार्ट टीव्ही प्रोजेक्टर, कम्प्यूटर लॅब अशा तंत्रज्ञानाच्या विविध साधनांचा वापर अध्ययन अध्यापनात केला जात आहे त्यामुळे मुलांचे शिकणे आणि शिक्षकांचे शिकवणे अतिशय सुलभ होत आहे.

आलेल्या अडचणी-

इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत वर्ग असणाऱ्या आमच्या शाळेत सध्या 180 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.online education ची पार्श्वभूमी असल्यामुळे विद्यार्थ्यांना व पालकांना तंत्रज्ञानाच्या विविध साधनांची ओळख बऱ्यापैकी आहे. whats app ग्रुपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दैनंदि अभ्यास दिला जातो.काही मुलांकडे मोबाइल नाहीत , तर काही मुलांचे पालक व अशिक्षित असल्यामुळे मुलांना तंत्रज्ञानाची साधने वापरताना अडचणी येतात.

केलेल्या उपाययोजना-

या अडचणींवर मात करण्यासाठी आम्ही सर्व शिक्षकांनी एकमेकांशी विचार विनिमय करून ज्या मुलांकडे मोबाइल नाही किंवा जे पालक अशिक्षित आहेत अशांसाठी शाळेत स्मार्ट TV च्या माध्यमातून अध्ययन-अध्यापन करण्याचे ठरवले. त्यासाठी गावातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने प्रत्येक वर्गासाठी एक याप्रमाणे चार स्मार्ट टीव्ही लोकसहभागातून घेतल्या आणि दररोज एक तास TV च्या माध्यमातून अध्ययन-अध्यापन करण्यात येऊ लागले.चार शिक्षकांचे स्वतःच्या यूट्यूब चैनल आहे. व्हिडिओ निर्मितीदेखील स्वतः शिक्षकांमार्फत केली जाते. तसेच शैक्षणिक ब्लॉगच्या माध्यमातून शैक्षणिक माहितीची देवाणघेवाण केली जाते. ई लर्निंगसाठी वापरण्यात येणारी तंत्रज्ञानावर आधारित विविध शैक्षणिक साहित्य स्वतः शिक्षकांनी तयार केले आहे. यामध्ये व्हिडिओज, स्मार्ट पीडीएफ, डिजिटल अंकलीपी, ऑनलाईन टेस्ट यांचा समावेश आहे.







फलनिष्पत्ती -

अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे खालील सकारात्मक बदल दिसून आले आहेत.

१) विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभ सोपे होण्यास मदत झाली.

२) विद्यार्थ्यांची शिकण्याची गोडी वाढली.

३) विद्यार्थी तंत्रज्ञानाची वेगवेगळी साधनं सहजपणे हाताळू लागले.

४) व्हिडिओ निर्मिती स्वतः शिक्षकांनी केल्यामुळे दर्जेदार ई-साहित्य तयार होण्यास मदत झाली.

५) व्हाट्सअप ग्रुप च्या माध्यमातून पालक-शिक्षक-विद्यार्थी एकमेकांशी जोडले गेले. त्यामुळे चांगल्या गोष्टींचे आदान-.प्रदान होण्यास मदत झाली

समारोप -

अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरामुळे आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासामध्ये खूपच सकारात्मक बदल झाला आहे. त्यांची शिकण्याची आणि शिक्षकांची शिकवण्याची प्रक्रिया एकंदरीत खूपच सुलभ होण्यास मदत झाली आहे. शिक्षकांनी यूट्यूब चैनल, ब्लॉग, व्हॉट्सऍप ग्रुप, ऑनलाईन टेस्टच्या माध्यमातून दर्जेदार ई-साहित्य निर्माण केल्यामुळे मुलांना हे साहित्य शिकण्यासाठी खूपच प्रभावी ठरले आहे.

फोटो :

YOUTUBE CHANNEL LINKS

1) vanita more

2) sudhir pore

3) suniljagatap

4)hanamantsomawanshi

Blog Link – vanitamore.blogspot.com

===== @ =====

48. लोकसहभागातून विद्यार्थी विकास

शाळेचे नाव : जिल्हा परिषद शाळा सिद्धेवाडी,ता. मिरज जि. सांगली.

मुख्याध्यापकाचे नाव : श्री.विष्णू हणमंत ओमासे

इ मेल : vishnuomase@gmail.com

शाळा व्यवस्थापन : जिल्हा परिषद सांगली




प्रस्तावना :

सन 2020 -21 या वर्षासाठी जिल्हा परिषद सांगली चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जितेंद्र डुडी साहेब यांनी आमच्या शाळेची मॉडेल स्कूल म्हणून निवड केली.विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास व शाळेचा भौतिक विकास व्हावा यासाठी मुख्याध्यापक सर्व सहकारी शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती सिद्धेवाडी यांच्यावर फार मोठी जबाबदारी आली होती. मॉडेल स्कूलची संकल्पना समजावून घेऊन शाळेचा विकास करण्यासाठी सर्व ग्रामस्थ, पालक,ग्रामपंचायत पदाधिकारी, व्यापारी वर्ग आणि नोकरदार वर्ग शाळेच्या विकासात फार मोठा सहभाग दाखवून विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास वाढ करण्यासाठी प्रयत्न केला.

शाळेमध्ये भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांचा मोठ्या प्रमाणावर अभाव होता, अशावेळी शाळेच्या विकास करण्यासाठी लोकसहभागातून शैक्षणिक उठाव होणे आवश्यक होते. मॉडेल स्कूलमध्ये निवड झाल्यानंतर ग्रामस्थांच्या सहभागातून फार मोठ्या प्रमाणावर लोकसहभागातून शैक्षणिक उठाव शाळेस प्राप्त झाला. संगणक, ई लर्निंग सुविधा, ग्रंथालय ,फर्निचर, पुस्तके, क्रीडा साहित्य,प्लेझोन, वृक्षारोपण ,शाळेचे रंगरंगोटी ,श्रमदान, प्रयोगशाळा साहित्य, वर्गखोल्या इत्यादी सुविधा लोकसहभागाद्वारे मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास होण्यास मदत झाली आहे.

अडचणी :

कोरोना कालावधीमध्ये विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासात अडथळा निर्माण झाला होता. इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत 389 पटसंख्या वाढली होती. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात संगणक संच ,विज्ञान साहित्य, क्रीडा साहित्य, ग्रंथालयातील पुस्तके, ई लर्निंग सुविधा अत्यल्प प्रमाणात होत्या तसेच शाळेमध्ये भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांचा मोठ्या प्रमाणावर अभाव होता, अशावेळी शाळेच्या विकास करण्यासाठी लोकसहभागातून शैक्षणिक उठाव होणे आवश्यक होते. शाळेतील **विद्यार्थ्यांच्या पालकांना व ग्रामस्थांना मॉडेल स्कूल ही** संकल्पना माहित नसल्यामुळे निधी संकलनास अडचण निर्माण झालेली होती.

केलेल्या उपाययोजना :

या अडचणीवर मात करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती ,माजी विद्यार्थी, विविध पदाधिकारी यांची सहविचार सभा घेऊन सर्व समस्या मांडल्या. सर्व ग्रामस्थांनी व माजी करण्याचे विद्यार्थ्यांनी फार चांगला प्रतिसाद दिला. शैक्षणिक उठावासाठी सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांनी गृहभेटी घेऊन शैक्षणिक उठाव करण्यास आवाहन केले. नोकरी निमित्ताने बाहेरगावी असलेल्या माजी विद्यार्थ्यांशी फोनद्वारे संपर्क साधून मदतीचे आवाहन केले. प्रत्येक व वर्ग स्तरावर पालकांची पालक सभा घेऊन पालकांना मॉडेल स्कूल संकल्पनेची माहिती दिली. ग्रामपंचायत पदाधिकारी यांनाही आपल्या ग्रामपंचायतीकडील 14 वा व 15 वा वित्त आयोगाच्या तरतुदीपैकी जेवढी शक्य आहे तेवढी तरतूद शाळेसाठी खर्च करण्याची विनंती केली . शाळेस वस्तूरूपाने व देणगी स्वरूपात भरघोस मदत करण्याचे आवाहन केले.

परिणाम :

शाळेच्या या प्रभावी कामासाठी केलेली अंमलबजावणी शाळेच्या भौतिक सुविधा व विद्यार्थी गुणवत्ता विकास करण्यासाठी शाळेस खालील प्रमाणे सुविधा मिळाल्या. माजी विद्यार्थी श्री.व्हटकर साहेब उपायुक्त मुंबई महानगरपालिका यांच्याकडून पाच संगणक संच त्यासाठीचे उत्तम फर्निचर आणि इन्व्हर्टर इत्यादी (250000 रुपये) साहित्य उपलब्ध झाले आणि सुसज्ज असा संगणक कक्ष तयार झाला. माजी विद्यार्थ्याकडून मैदान सपाटीकरण व वृक्षारोपण करण्यात आले .पिण्याच्या पाण्याच्या सुविधेसाठी कुपनलिका व हॅन्डवाश स्टेशन या सुविधा मिळाल्या. क्रीडा साहित्य व ग्रंथालयासाठी पुस्तक फर्निचर प्रयोगशाळा साहित्य लोकसहभागातून निर्माण केले.शाळेत ई लर्निंग साठी ग्रामपंचायत सिद्धेवाडी कडून एलईडी टीव्ही व पाच संगणक संच मिळाले प्रिंटर माजी विद्यार्थी श्री.आनंदराव आंबे यांच्याकडून मिळाला.सीसीटीव्ही कॅमेरे विविध विद्युत जोडणी इन्व्हर्टर इत्यादी साहित्य खरेदी साठी पालकाकडून भरघोस मदत मिळाली. शैक्षणिक साहित्याची निर्मिती डिजिटल वर्ग खोली , Building As Learnig Aid (BALA) प्रमाणे रंगकाम पालक सहभागातून करण्यात आले.

फलनिष्पत्ती :-

प्रत्येक वर्गात ई लर्निंग सुविधेमुळे अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी झाली. मुले ग्रंथालयातील पुस्तके आवडीने वाचू लागली. मुलांना अवांतर वाचनाची आवड निर्माण झाली. खेळ मुले आनंदाने खेळू लागली. खेळाबरोबरच खेळातील विविध कौशल्य आत्मसात करू लागली. प्रयोगशाळेत छोटे-मोठे प्रयोग स्वतः शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली करू लागली. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी स्वतः संगणक हाताळू लागली. प्लेझोन मध्ये सुट्टीच्या वेळी खेळाच्या तासाला आनंदाने खेळू लागले. शुद्ध पाणी विद्यार्थ्यांना पिण्यासाठी उपलब्ध झाले. बाला (BALA) पेंटिंग डिजिटल वर्ग रंगोटीमुळे शालेय वातावरण प्रसन्न झाले. विद्यार्थ्यांना शाळेची ओढ लागली. प्रिंटर फॅन इन्व्हर्टर ,सीसीटीव्ही कॅमेरे यांची सुविधा शाळेला उपयुक्त ठरली. शैक्षणिक साहित्यामुळे अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी झालेली आहे.

समारोप :

पालक सहभागातून शैक्षणिक उठाव मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळे विविध सुविधा मुलांना मिळाल्यामुळे अध्ययन अध्यापन प्रभावी झाले. मुलांच्या गुणवत्तेमध्ये भर पडली मुलाच्या शारीरिक मानसिक ,भावनिक व शैक्षणिक विकास होण्यासाठी मदत झाली. शालेय वातावरणात विद्यार्थी रमू लागले. उपस्थिती वाढली शाळेबद्दलची ओढ वाढली दृष्टिकोन बदलला. मुलांचा अध्ययन स्तर उंचावला आहे.या सर्वाचा परिपाक म्हणजे आमच्या शाळेतील इयत्ता 5 वी शिष्यवृत्ती परीक्षा आणि नवोदय विद्यालय निवड परीक्षा या स्पर्धा परीक्षेत भरघोस यश संपादन केले आहे.

https://youtu.be/_lVnxAu3C5Y https://youtu.be/vRbO9kg9pWk

https://photos.app.goo.gl/xSmhrDQG1zRdgMX36 https://youtu.be/zA21nuWS-ws

https://youtube.com/shorts/fSHnofCGbU8?feature=share https://youtu.be/zyjkE82pgAM

https://youtu.be/duZYEDgPfn0 https://youtu.be/6nNZoN30L1g

https://youtu.be/8WIUcA_DFdM https://youtu.be/IXHpa8SqP34

===== @ =====

49. Building as Learning Aid (BalA)

Baseline Literacy and Numerical Ability

Name of School : Z. P. Urdu Primary School, Borgaon Sarwani,Tq. Sillod Dist. Aurangabad
Email : hmzppsbsarvani@gmail.com
Head Master : MD. Junaid MD. Zahed
Email : junaidsillod@gmail.com

Children spend most of their time at school premises. So to increase their interest and knowledge day by day at school with the help of various innovative ideas are taken by school head and stakeholders. We too are sincerely concern about our children studies and learning aspects.

After lock down their ability to learn and grasping power has been decreased highly. Basic knowledge and concepts were totally collapsed as well as there was no interest sustained in their little minds. We have blessed with a large quantity of children in our school. Now it was a great challenge to get out from this situation. How children will bring back to their studies?

We took a decision to colour and paint our building with an innovative idea. With the help of painting we thought that all subjects basic concepts should be there on the walls as well as general knowledge awareness reflect through the paintings. Paintings are just not only for fun and colours but also it reflects something new regarding teaching learning process. Taking this purpose we painted all the walls with subject's corner as per English, History, Geography, Science, Hindi, Marathi, Maths, Social awareness and so on. We chose to paint our office walls for national symbols, pledge. Beautiful quotes wrote upon the walls in such a beautiful manner. When children entered the school their faces clearly showed full of curiosity and surprising happiness. They were rushing here and there to see all the changes which they have never seen before. It was the best result got us through the presence of little stars. Our garden became flourishing again. We used these paintings for play way method of teaching.

Whenever we took an art activity like draw something which you like most. They rushed to the walls and drew whatever they liked most. They learned our national symbols within a couple of days. Now they all came to know about solar system, maps, figures, history about Chhatrapati Shivaji Maharaj and our heritage,

Our duties towards our nation and many more. At last but not the least it wouldn't be wrong in saying that we used our Building as a Learning Aid successfully.





An open mind is free from unnecessary judgments and limiting thoughts. To free from any fear of Baseline Literacy and Numerical Identities our respective class teacher of Grade 7th Shaikh Sarfraz Ayyub introduced an ideal method of teaching mathematics by Abacus. When he shared his idea to our respective school head, he welcomed the idea and wished him for the process but main problem was that our school situated in rural area. Parents are highly poor financially so they are not able to support their wards financially as buying tools or kits. First our school head took a meeting with our school management committee to introduce Abacus for learning maths in an easy way also discussed about the implementation of it. They all welcomed the idea and assured to support to the school. Afterwards this idea shared with parents and also got their consent about Abacus. Respective teacher gave the knowledge about Abacus methods and its levels in front of the parents. There are 8 levels of Abacus and for each level parents have to spend near about 600 rupees for kit and guideline book. For their loving kids academic future how they could be back. After that they agreed to go through it. Teacher ordered Abacus kits and books and stared teaching during break time and exception of schooling hour. Within few days positive results are out in the form of progress which literally shown in students .They completed successfully their 2nd level of Abacus as addition, subtraction with it and now they are ready to climb up on 3rd one. By doing Abacus thinking ability, mathematically point of view, reasoning, analytical skills, innovative thoughts are increased as well as making tables, squares are gone be easy to deal.



To watch the video of children doing mathematics by Abacus please go through the given below link.

https://youtu.be/yVuYmsL70nI

===== @ =====

50. Building as Learning Aid : BALA

Name of the school : Zilla Parishad Primary School, Ghatnandra, Tal. Sillod, Dist. Aurangabad
Email ID : yunuskhan0931@gmail.com
Name of Headmaster : Yunus Yusuf Khan
Email ID : yunuskhan0931@gmail.com
School type : Zilla Parishad

Introduction :

Building as Learning Aid : BALA is an innovative concept towards qualitative improvement in education, through intervention in school building infrastructure. School buildings are meant for children. They are designed for them. We in our Zilla Parishad Primary School, Ghatnandra, tried our level best to make the building components active facilitator for students to help them in learning process. We have tried to make the school infrastructure child centered and child friendly to help them in activity-based learning.

Need of the Project:

To make the school infrastructure as learning aid was the need of time in our school. Learning aids are materials that the teacher uses to help student understand the concept he or he introduces during the lesson. But when you use the school infrastructure for example wall, roof and even floor as learning aid. It will have great effect on students because they can gain knowledge and learn from them by going around playing and walking in school premises. In teaching learning program, learning aids are the most significant materials to make the language learning process easier and more interesting. Learning aids are the sorts of materials which a teacher uses to make the concept understandable. The classroom becomes different than the normal class by using several learning aids or materials. Traditionally, teaching aids were: charts, graphs, maps, black boards, chalk, dusters, pictures, cards, posters etc. But if the school infrastructure itself becomes learning aid it will have a great effect on students' mind.

Aims & Objectives:

1) To make our student active participant in the lesson.
2) To help students to relate to what is being taught to real life situation.
3) To provide reinforcement for better learning.
4) To make learning permanent among students by using School infrastructure.
5) To develop the perception of students towards the content.

Role of Teachers:

First of all, we made a plan that our school premises should reflect as a school which provides continuous learning process. For that we have decided which aids we should include as learning aids. Our digital room is already made as a digital projection room with the facility of complete darkness when needed. With the help of teaching aid writer painter and some paintings by ourselves we have made all the walls of school premises as a learning aid. We painted walls which shows both local and global cause as well as can help in assisting teachers as learning aids. One painting on the wall shows global massage of 'Save Water' initiated by UNO.

Planning and Implementation:

Infrastructure of school can be a resource for the teaching-learning processes. The building elements of our school are modified innovatively to involve children creatively. The different elements are located in interior and exterior spaces like classrooms, corridors and backyard so that a variety of learning situation is generated across the school space. We have a special box gable roof style digital room for students. Here we have painted white color on 10×8 sq. area of wall for the screen projection. Apart from Science and Technology the information about environment and the things which affects environment is utmost important for students. Because we are facing the biggest challenge of global warming human race has ever faced. To make students aware about it we have painted one wall by the painting of 'Water cycle' to explain the whole concept of rain to students. It helps a lot during the teaching of environment education. Importance of learning aids lies in creating an interactive and visual environment for the students. When learning aids are used in the language learning classroom, students become motivated, engaged in the learning process and understand the concept more clearly. Assisting students in observing a concept, freeing from anxiety, removing boredom. Learning aids helps a teacher in presenting information in an exciting way.

Learning Outcomes:

Learning outcomes means how much knowledge or skills a student should acquire through various resources. Here we will discuss what learning outcomes students of our school acquired by learning aids of our school. By the 'Save Water' painting on the wall our students understand the value of water. They are spending less water and also spreading the same massage to villagers. Our school is in an area which is facing water shortage problem. So, this massage is making our students more responsibility towards the natural resources as well as helping villagers in handling the water shortage problem. In our digital classroom and through big screen we are utilizing technology as a means of education. Student is learning by using electronic devices and the internet. This classrooms support both real-time and recorded learning and help teachers create a flexible class schedule. Science models that we pasted on walls played important role in increasing students' interest towards science. Students get knowledge regarding internal parts of our body through these models. Students themselves made charts and models of different organs of human body. Water cycle did a great effect on students that they are trying to save the rain water by doing rain water harvesting at home. It is helping students as well as other villagers. Involvement of students got a great boost by the use of these learning aids. This is the biggest motivation for us.

Conclusion:

BALA is a way to holistically plan and use the school infrastructure. It incorporates the ideas of activity-based learning, child friendliness and inclusive education for all students. At the core, it assumes that the architecture of school can be a resource for the teaching-learning processes. We in our Zilla Parishad Primary School Ghatnandra, have tried our level best to use our school infrastructure as learning aid for our future generations. Each and every member of our school staff worked sincerely for making entire school a learning aid for students. We have also got the support of SMC members, Gram Panchayat and parents of students.

Links of Photos:

https://drive.google.com/file/d/1iNF0GxyNICyr9rgQfUExY6seN41KJQjs/vi ew?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1inPPwLij2H9TgTHIducNhIdJJWCURqL/vi ew?usp=drivesdk
https://drive.google.com/file/d/1ifbfzIL50kzEWK50fJ8zVi9dAbjjifK/view? usp=drivesdk

===== @ ====

51. दप्तर मुक्त शनिवार

शाळेचे नाव - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,पळसगाव , ता.खुलताबाद जि. औरंगाबाद

ईमेल - zpupspalasgaon60@gmail.comm

मुख्याध्यापक - श्री संजय लक्ष्मण बाहुले

शाळेचे व्यवस्थापन - जिल्हा परिषद



प्रास्ताविक :

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा पळसगाव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद ही शाळा खुलताबाद तालुका मुख्यालयापासून 18 किलोमीटर अंतरावर असून या शाळेत रुईखेडा या गावातून व शेत वस्तीवरून विद्यार्थी येजा करतात. सर्वसाधारणपणे अशिक्षित मागास व शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी शाळेत शिक्षण घेतात. पालकांमध्ये शिक्षणाचा अभाव आहे.त्यामुळे पालकांचे आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे म्हणावे तसे लक्ष नाही.अनेकवेळा सूचना देऊनही विद्यार्थी पाढे पाठांतर करीत नव्हते.त्यासोबतच आवांतर पुस्तकांचे वाचन देखील करीत नव्हते.असे वेळोवेळी केलेल्या निरीक्षणातून दिसून आले.ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकांचा वापर विद्यार्थी करीत नव्हते.

तसेच विद्यार्थ्यांमध्ये कसरतीचे व्यायाम प्रकार, योगासने याबद्दल अनुत्सुकता दिसून आली.या सर्वांचा परिणाम साहजिकच त्यांच्या गुणवत्तेवर होत होता.त्यासाठी हे कुठे तरी थांबवून त्यावर उपाययोजना करणे गरजेचे वाटले.म्हणून आम्ही जुलै 2022 पासून दप्तर मुक्त शनिवार हा उपक्रम सुरु करून त्याचा वापर वाचन विकासासाठी करण्याचे नियोजन केले.

समस्या

पुस्तके आपल्याला एक नवीन दृष्टिकोन देतात आणि गोष्टींची सखोल माहिती देतात.त्यांचा आपल्या व्यक्तिमत्त्वावरही परिणाम होतो. परंतु आजच्या मोबाईलच्या युगात विद्यार्थी पुस्तकांपासून दूर जात आहेत. अवांतर वाचनाची सवय कमी झाल्यामुळे त्याचे अनेक दुष्परिणाम दैनंदिन अध्यापनात देखील दिसू लागतात. प्रत्येक मूल गुणवत्तापूर्ण शिकले पाहिजे यासाठी निपुण भारत अभियान अंतर्गत विविध उपक्रम आयोजित केले जात आहेत. शालेय स्तरावरील प्रत्येक विद्यार्थ्याच्या ठिकाणी पायाभूत भाषा क्षमता विकसित व्हाव्यात व त्यानुसार प्रभावी अध्ययन करता यावे यासाठी शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांनी अधिकाधिक वाचन करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्य आकलन व अभिव्यक्ती ,आत्मविश्वास ,रसास्वाद, अभिरुची व मूल्य निर्णय, सर्जनशीलता,चिकित्सक विचार करण्याची क्षमता यासाठी वाचन सवयी विकसित होणे गरजेचे आहे. ही समस्या प्रकर्षाने शाळेत जाणवत होती.

वाचन पुढील गोष्टींसाठी आवश्यक आहे.

1) वाचनामुळे विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह, वाक्प्रचार व म्हणी यांचा संग्रह वाढतो.

2) निर्णायक विचार करण्याची क्षमता वाचनामुळे प्राप्त होते.

3) स्वतःचे मत मांडण्याची क्षमता वाचनामुळे अवगत होते.

4) वाचलेली एक कल्पना शंभर नवीन कल्पनांना जन्म देते.

5) वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या बोलण्यामध्ये सभाधीटपणा निर्माण होतो.

6) पुस्तकातून मिळालेल्या ज्ञानाचा आयुष्यभर उपयोग होतो.

उपक्रमाचे स्वरूप :

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, पळसगाव येथे इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत वर्ग असून 119 विद्यार्थी शिक्षण घेतात.विद्यार्थी घरी वाचन करित नाहीत, अशी पालकांची नेहमी तक्रार होती.त्याशिवाय सांगितलेला अभ्यास वेळेवर करण्यासंबंधी देखील तक्रारी होत्या. या समस्या दूर व्हाव्यात,त्यांना वाचनाची गोडी लागावी,वाचलेल्या गोष्टी विषयी व्यक्त होता यावे यासाठी या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.जुलै 2022 पासून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.यादिवशी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

उपक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी

उपक्रमाची अंमलबजावणी करीत असताना प्रामुख्याने उपलब्ध असलेल्या वेळेचा सदुपयोग करण्याचे नियोजन करण्यात आले.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून शाळेला प्राप्त झालेल्या क्रीडा साहित्याचा वापर विविध क्रीडा प्रकार व कसरती यासाठी करण्यात आला.यांनतरचा दीड तास हा विद्यार्थ्यांना अवांतर वाचनासाठी ठेवण्यात आला आहे.यावेळी त्यांना वाचनालयात उपलब्ध असलेली विविध विषयावरील पुस्तके वाचनासाठी देण्यात येतात.सुरुवातीला चित्रयुक्त पुस्तके,मोठया अक्षरातील पुस्तके,छोट्या गोष्टी व गाणी यांची पुस्तके,कथा,नाटके, ऐतिहासिक विषयावरील पुस्तके अशा चढत्या क्रमाने





वाचनासाठी पुस्तके देण्यात येतात.

वाचनासाठी शाळेच्या मैदानात गोलाकार पद्धतीने , झाडांच्या सानिध्यात, मित्रांच्या सहवासात बसण्याचे स्वातंत्र्य जाणीवपूर्वक देण्यात आले.विद्यार्थी वाचन करित असताना त्यांच्यावर देखरेख ठेवली.वाचनासाठी पुस्तकांची उपलब्धता व्हावी यासाठी गावातील पालकांना वाढदिवसानिमित्त शाळेला पुस्तके भेट देण्याचे आवाहन केले.काही पालकांनी शाळेला पुस्तके भेट दिली.या पुस्तकांचा वापर वाचनासाठी करण्यात येतो.विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांविषयी नोंदी ठेवण्यात आल्या. यासोबतच पुढील एक तास हा विद्यार्थ्यांना अभिव्यक्ती साठी संधी देण्यात येते.यामध्ये त्यांनी वाचलेल्या पुस्तका विषयी त्यांनी काही वाक्यात माहिती सांगणे अपेक्षित असते.याचा उपयोग विद्यार्थ्यांना सबाधिटपणे बोलण्यासाठी होत आहे. यासाठी शालेय स्तरावर अवंतर वाचनाची नितांत आवश्यकता आहे.

फलनिष्पत्ती :

"वाचाल तर वाचाल" असे म्हणतात.जुलै महिन्यापासून हा उपक्रम आम्ही शाळेत राबवीत आहोत.ज्याचे परिणाम एक दोन आठवड्यानंतरच दिसायला सुरुवात झाली.जे विद्यार्थी अवांतर पुस्तकाचे वाचन अजिबात करित नव्हते तेच आता शनिवारी आवडीने पुस्तक वाचनासाठी बसत आहेत.वाचलेल्या पुस्तकाविषयी वाचना नंतर आपल्या शब्दात आपले मत व्यक्त करत आहेत.साहजिकच वाचनामुळे मुलांमधील बोलण्याची भीती कमी होण्यास मदत झाली आहे.वाचलेल्या पुस्तकाचे नाव, लेखक, पुस्तकातील मध्यवर्ती कल्पना या विषयी आता विद्यार्थी सहजपणे व्यक्त व्हायला सुरुवात झाली आहे.

या वाचनामुळे पुढील गोष्टी साध्य होण्यास मदत झाली आहे.

1. शाळेतील विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी लागली असून अभ्यासासोबतच पूरकसाहित्य वाचनामध्ये देखील त्यांना गोडी निर्माण झाली आहे.

2. विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढण्यासाठी देखील मदत झाली आहे.

3. विद्यार्थी मजकुराचे समज पूर्वक वाचन करीत आहेत.

4. वाचलेल्या मजकुरावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत आहेत.

5. वाचनातील अचूकता व ओघवतेपणा यामध्ये सुधारणा झाली आहे.

6. या सर्वांचा उपयोग वाचन कौशल्य विकसित होण्यास होत आहे.

एकंदरीत वाचन विकासासाठी दप्तरमुक्त शनिवार उपयुक्त ठरत आहे.

समारोप :

हा उपक्रम सुरू करण्यापूर्वी विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची सवय नव्हती. विद्यार्थी घरी जास्त वेळ अभ्यास करीत नव्हते. त्यामुळे मुलगा घरी अभ्यासच करीत नाही अशा पालकांच्या तक्रारी होत्या. यामध्ये बराचसा बदल झालेला दिसून आला. विद्यार्थ्यांना इंटरनेटचा वापर करून गूगल, यूट्यूब, विकिपीडिया यांचा वापर करून पाठ्य पुस्तका व्यतिरिक्त अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याची सवय लागली.

शाळेतील विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी लागली असून अभ्यासासोबतच पूरकसाहित्य वाचनामध्ये देखील त्यांना गोडी निर्माण झाली आहे

Our Reading Activity Shooting by UNICEF



other activites on saturday



===== @ =====

52.यशोगाथा स्थलांतरित बालकांचे शिक्षण : पालावरची शाळा

शाळेचे नाव : कै. दीनानाथ मंगेशकर माध्यमिक शाळा सातेफळ ता. वसमत जिल्हा हिंगोली
मुख्याध्यापकाचे नाव : भालेराव एन. एस.
शाळेचे व्यवस्थापन : खाजगी अनुदानित.
प्रस्तावना :
बालकाचा शिक्षणाचा अधिकार हक्क कायदा 2009 नुसार प्रत्येक मूल शिकलं पाहिजे, शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आलं पाहिजे, त्याला शिक्षणाची समान संधी उपलब्ध झाली पाहिजे . पण वाडी, तांडा, पाडा, शहरातील स्थायी अस्थायी स्वरूपात असलेली झोपडपट्टीत निवास करणारी मुलं या ठिकाणी अधिक शाळाबाह्य शाळेत अनियमित मुलं आढळून आली आहेत, येतात. या सर्वच शाळाबाह्य शिक्षणापासून वंचित अत्यंत आर्थिक दुर्बल घटकातील शिक्षणाचा हक्क मिळायला हवा .
आव्हान :
कोरोनामुळे सर्व काही ठप्पच होते. यामध्ये शिक्षण हे कसे सुटणार ? ज्या विद्यार्थ्यांजवळ ऑनलाईन शिक्षणाची साधनं उपलब्ध होती त्यांचे शिक्षण कसेबसे सुरु होते पण ज्यांना शिक्षण नावाचा शब्दच माहित नाही, शाळाच माहित नाही, शाळेत प्रवेशच नाही, सुविधा नाही, वातावरण नाही अशा सर्व शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणाचं काय? .... पालात राहणाऱ्या नंदीवाले, वैदू, गोपाळ, गोसावी, वडार, घिसडी, मुस्लिम मदारी, मुस्लिम पैलवान, गारुडी, डोंबारी या विविध विमुक्त भटक्या समुदायातील व अत्यंत आर्थिक दुर्बल घटकातील कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी व मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पालावरच शाळा सुरु करणे आवश्यक होते .



भटक्या समाजातील लोकांचे पाल व पालावरची शालाबाह्य मुले

नियोजन व कार्यवाही :
शिक्षणापासून वंचित मुले कुठेही प्रवेशित नाहीत. पालात राहणाऱ्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्या वेळेमध्ये पालावरच शाळा 10 ऑक्टोबर 2021 रोजी सुरू करण्यात आली.



शाळाबाह्य मुलांना शिक्षण प्रवाहात आणून त्यांना अध्यापन करताना

पालात राहणाऱ्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेल्या उपाययोजना:-
शांतीनगर आसेगाव कॉर्नर, वसमत जिल्हा हिंगोली येथील संपूर्ण वस्ती ही पालात राहते. ना पाणी, ना राहायची सोय, ना खायची सोय अशी 70 ते 100 कुटुंब येथे राहतात. ही सर्व विमुक्त भटक्या समुदायातील व अत्यंत आर्थिक दुर्बल घटकातील सतत स्थलांतरित कुटुंब आहेत. याच वस्तीत शाळाबाह्य, व कुठेतरी शाळेत प्रवेश आहे पण शाळेत मात्र उपस्थित नाहीत अशा सर्व मुलांच्या शिक्षणासाठी पालावरच्या शाळेत शिकविण्याचे कार्य करतात. ते सन 2018 पासून

बालरक्षक श्यामराव रावले सर, माध्यमिक शिक्षक, कै. दीनानाथ मंगेशकर माध्यमिक शाळा सातेफळ तालुका वसमत जिल्हा हिंगोली हे आपल्या शाळेच्या वेळेशिवाय सायंकाळी पालावर जाऊन पाच ते साडे सहा या वेळेत मुलांना जमा करून प्रारंभिक शिक्षण देण्याचे काम करत आहेत. केवळ मुलांना पालावर जाऊन शिक्षणच देत नाही तर शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम करत आहेत, सोबतच शिक्षणाची गोडी निर्माण करणे, शाळेत बसण्याची सवय लावणे, आरोग्याची काळजी घेणे, शिस्त लागणे व त्याचबरोबर पालकांचे समुपदेशन करणे, मुलांना शाळेत जाण्यासाठी प्रवृत्त करणे, मुलांजवळ आधार कार्ड नसेल तर त्या मुलांचा आधार कार्ड शिवाय शाळेमध्ये प्रवेश होत नाही म्हणून शाळा व शाळेचे मुख्याध्यापक यांचा संपर्क साधने इत्यादी कार्य संपन्न होण्यासाठी पालावरच्या शाळेची मदत होत आहे .

पालावरच्या शाळेचा झालेला फायदा / दृश्य परिणाम.

पालावर नियमित गेल्यामुळे जी पालात राहणारे मुलं आहेत किती दिवस राहणार आहेत. त्यांचे ठिकाण नेमकं कोणते आहे ,त्यांची पारिवारिक स्थिती काय हे लक्षात येतं व पालावर जी मुलं शाळेत प्रवेश योग्य आहेत त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्या मुलांचे पालक व नजीकच्या शाळेचे मुख्याध्यापक यांच्याशी संपर्क साधून त्या मुलांचे प्रवेश शाळेत करण्यात आले. यामुळे ही पालावरची शाळा फारच उपयुक्त ठरत आहे. हे सर्व कार्य बालरक्षक-शिक्षक श्यामराव रावले अगदी तन-मन व धनाने या वस्तीशी संपर्कात राहून करत आहेत.


देशोन्नती

पालावरच्या शाळेला गटशिक्षण अधिकारी ससाणे यांनी दिली भेट





शिक्षक पालावर जाऊन अध्यापन करताना

फलनिष्पत्ती-

कोरोनाच्या सुट्टीच्या काळात मागच्या वर्षी अवघे 15 ते 18 विद्यार्थी शाळेत प्रवेशित होते ती मुलं कधी-कधी शाळेत जायची, काही तर कधीच शाळेत जात नव्हती ती सर्व विद्यार्थी या वर्षी शाळेत नियमित झाली आहेत व 2022-23 या शैक्षणिक वर्षात 48 विद्यार्थ्यांना नजीकच्या शाळेत प्रवेश दिला आहे. आता सर्व विद्यार्थी दररोज वसमत शहरातील तीन शाळांमध्ये जात आहेत. हे पालावरच्या शाळेचे यश आहे.

समारोप :-

कोरोनामुळे झालेले नुकसान व पालावर असलेले वातावरण स्थिती आणि सतत विस्थापित होणारे कुटुंब यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी या पालावरच्या शाळेचा खूप मोठा फायदा झाला आहे. नक्कीच या वस्तीतील पालकांमध्ये मुलांमध्ये सकारात्मक बदल झाले आहेत. आता पालात राहणारी मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आली आहेत. आता विद्यार्थी झाले आणि ती सर्व शाळेत जात आहेत.

===== @ =====

53. स्पर्धा परीक्षेतून जीवन विकासाकडे

शाळेचे नांव :- जि.प.प्रा.शा. आडगाव(रंजे) कें. हट्टा ता. वसमत ,जि. हिंगोली

मुख्याध्यापकाचे नांव :-श्री. साहेब सितारामजी चव्हाण

इ मेल आय डी :- sahebraochavan@gmail.com

शाळेचे व्यवस्थापन :-जिल्हा परिषद



प्रस्तावना :

सुमारे सहाशे विद्यार्थी संख्या असणारी जिल्हा परिषदेची एकमेव शाळा आडगाव (रं). हे गाव वसमत तालुक्यातील, जिल्हा हिंगोली ,महाराष्ट्र राज्यातील एक गाव असून परभणी हिंगोली राज्य मार्गावर वसलेले आहे. गावात रंजेबुवा सुफी संताचा दर्गा आहे. गावाची लोकसंख्या 8000 असून सर्व जाती धर्माची लोक आनंदाने राहतात. गावाच्या पश्चिमेस एक जिल्हा परिषद शाळा, माध्यमिक शाळा,एक महाविद्यालय आहे. या गावातील जिल्हा परिषद शाळेतून शेकडो विद्यार्थी शिकून डॉक्टर,इंजिनिअर,अधिकारी,न्यायाधीश, पोलीस,शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. जि.प.प्रा.शा. आडगाव शाळेने संपूर्ण राज्यभरात नावलौकिक मिळवला आहे. स्पर्धा परीक्षेचा आडगाव पॅटर्न संपूर्ण हिंगोली जिल्ह्यात प्रसिद्ध झालेला आहे.

प्रत्येक मूल स्पर्धा परीक्षेच्या दिशेने - एक आव्हान :

आजी-माजी शिक्षकाच्या सहकार्यातून येथे सन 2016-2017 पासून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करण्यात येत होते पण मोजकेच विद्यार्थी या स्पर्धा परीक्षेमध्ये सहभागी होत होते. पण एवढ्यावर समाधान होत नव्हते, कारण प्रत्येक मूल ही संकल्पना मनामध्ये धरून प्रत्येक मुलापर्यंत ही स्पर्धा त्याच्या पालकाच्या सहकार्याने कशी पुढे नेता येईल याचा विचार केला.त्यासाठी अनेक विद्यार्थी उपक्रम पालक संपर्क अभियान गावातील शिक्षण प्रेमी नागरिकांचे सहकार्य, माता पालक मासिक बैठका, आजी-माजी शिक्षक पदाधिकारी व गावातील इतर सर्व नागरिकांचे सहकार्य घेऊन कामाला लागलो. “कामातून आनंद, आनंदातून काम” या उक्ती प्रमाणे अल्पावधीतच जिल्ह्याच्या, राज्याच्या नकाशावर नावलौकिक मिळवण्यात यश आले.

- **मुख्याध्यापकाची भूमिका :-**

शिक्षक हा समाजाचा अभिकर्ता असतो. शिक्षक समाज घडवतो आपण समाजाचे देणे लागतो या विचार उक्तीप्रमाणे "शाळेचे मुख्याध्यापक, श्री साहेबराव सितारामजी चव्हाण सर यांनी सर्व शिक्षकांची सविचार सभा घेऊन स्पर्धा परीक्षा पॅटर्न पहिली ते आठवीपर्यंत राबवून तो यशस्वी करण्यासाठी एक रूपरेषा आखण्यात आली आणि शिक्षकांनी स्वतःची कौशल्य विकसित करण्यासाठी विविध प्रशिक्षणाचा वापर केला. मुख्याध्यापक स्वतः गणित विषयाचे अभ्यासू असल्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली इतर सर्व शिक्षकांनी स्वतःच्या कौशल्यात वाढ केली. शिक्षकांनी गणित,भाषा,सामाजिक शास्त्रे तसेच विज्ञान- तंत्रज्ञान या विषयात स्वतःची कौशल्य विकसित करून त्याचा फायदा विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासात केला आहे. शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक संगणकाचे विविध प्रशिक्षण घेतले आहे. प्रोजेक्टरचा माध्यमातून शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवतात.

प्रत्येक मूल स्पर्धा परीक्षेच्या दिशेने (उपक्रमाचे स्वरूप) :-

' शिक्षक + पालक = विद्यार्थी विकास' ही आपली शिक्षण पद्धती, ही विद्यार्थी केंद्रित आहे. स्पर्धा परीक्षेतून जीवन विकासाकडे यानुसार इयत्ता 1 ली ते 8 वी या इयत्तेपर्यंत बालकांचा विकास होत असतो त्यासाठी विविध उपक्रम शाळेत राबविले गेले.

1) माता पालक बैठक
2) वेळेचे नियोजन
3) प्रत्येक मूल स्पर्धा परीक्षेकडे
4) दैनंदिन अभ्यासक्रम व स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रम यांचा समन्वय
5) विषय निहाय नियोजन
6) विविध खाजगी स्पर्धा परीक्षांचे आयोजन
7) शासनमान्य जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश, NMMS, विद्यानिकेतन प्रवेश इत्यादी स्पर्धा परीक्षांचे आयोजन.
8) विद्यार्थी अभ्यास गट निर्मिती, सनियंत्रण पालक गट, रात्र अभ्यासगट नियोजन, we learn English, शिकू आनंदे, गोष्टीचा शनिवार, चला शिकूया प्रयोगातून विज्ञान. उपक्रम आयुक्तांचे (परमवीर चक्र विजेते जयंत्या,पुण्यतिथी, wild life club, खगोलशास्त्र मंच , astronomic club)
9) जो दिनांक तो पाढा, गणित तज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त गणित मेळावा, मुलाखत चर्चासत्रे आयोजित करणे.



राष्ट्रीय गणित दिनानिमित्त मुलाखत कार्यक्रम

Facebook live कार्यक्रमाची लिंक

https://m.facebook.com/story.php?story_fbid=1325490294282253&id=100004638850384

प्रत्यक्ष अंमलबजावणी :-

स्पर्धा परीक्षेचा आडगाव पॅटर्न निर्माण करण्यासाठी प्रत्यक्ष शाळेत हा पॅटर्न राबविताना खालीलप्रमाणे नियोजन केले.

माता पालक बैठक :-

शाळेला गावाचा आधार असतो आणि गावाला शाळेचा अभिमान असतो. या उक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व स्पर्धा परीक्षा विषयी आवड निर्माण व्हावी हा उदात्त हेतू मनी धरून प्रत्येक वर्गाच्या माता पालकाची बैठक दर महिन्याला आयोजित करून विद्यार्थ्यांच्या विषयनिहाय,वर्तणूक व गुणवत्तेबद्दल चर्चा करून नियोजन करण्यात आले.

वेळेचे नियोजन :-

वार्षिक अभ्यासक्रमासोबत स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रम याद्वारे अध्ययन निष्पत्ती अवगत होतील यासाठी समावेशित असणा-या विषयांचे नियोजन करण्यात आले.

1) गणित :- सर्व विषयाचा पाया हा गणित असतो त्यानुसार 59 प्रकारच्या गणिती क्रिया, एका संख्येवर आधारित 250 प्रश्न निर्मिती, भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन जयंती मुलाखत महापरीक्षा कार्यक्रम आयोजित करणे. https://www.facebook.com/100011394880350/posts/2108023819587427/?app=fbl
2) मराठी :- व्याकरणासह उतारे सोडवून घेणे ,जास्तीत जास्त उताऱ्यांचा सराव करणे.
3) बुद्धिमत्ता चाचणी :- विविध प्रकाशनाच्या पुस्तकांच्या माध्यमातून जास्तीत जास्त आकृत्यांचा सराव करून घेणे.
4) इंग्रजी :- व्याकरणासह इंग्रजीचे अध्यापन.
5) विज्ञान व इतिहास ,भूगोल .ना.शास्त्र :- विविध पुस्तके प्रयोग प्रात्यक्षिक द्वारे अध्ययन अनुभव देणे.

❖ उत्तर देण्याची अचूक पद्धत :- स्पर्धा परीक्षा पॅटर्न राबविताना विद्यार्थ्यांमध्ये उत्तर देण्याची पद्धत व विचारांची अचूकता येण्यासाठी दैनिक,साप्ताहिक,मासिक,परीक्षेची नियोजन करून एक तृतीयांश वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करून प्रश्नपत्रिका तयार करून सोडवून घेतल्या जातात. त्यातील झालेल्या चुका पेपर तपासल्यानंतर लगेच दुरुस्त केल्या जातात.

- **स्मरणशक्ती वाढविणे** :- विविध शॉर्टकट अध्यापन पद्धतीच्या माध्यमातून व अथक सरावातून गणिती क्रिया, भाषिक उतारे, बुद्धिमत्ता चाचणीतील आकृत्या इ.घटकाद्वारे स्मरणशक्ती वाढविण्यावर भर दिला जातो.
- **सराव प्रश्नपत्रिका व महापरीक्षा आयोजन** :- 20,30,50,100 मार्काच्या विषयनिहाय प्रश्नपत्रिका तयार करून त्या सोडवून घेणे. जास्तीत जास्त 250 ते 300 पेपर चे आयोजन करणे.

इयत्ता पहिली ते सातवी वर्गामध्ये खाजगी प्रकाशनाच्या उदाहरणात श्रेया,बीडीएस,एमटीएस,मंथन इ.परीक्षांचे प्रत्येक मूलनिहाय नियोजन केले आणि विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये स्पर्धापरीक्ष विषयी स्पर्धात्मक गोडी निर्माण केली.



.**फलनिष्पत्ती** :- Keep three words in the Pocket -

Try – True – Tru

Try for better future

True with your work

Trust in God, then success will be at your feet

वरील इंग्रजी प्रेरणादायी विचाराप्रमाणे शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक शाळा व्यवस्थापित व समस्त गावकरी यांच्या एकत्रित योगदानाने म्हणजेच सहकार्यातून जीवनदायी आनंददायी समृद्धीकडे या उक्तीप्रमाणे आज हिंगोली जिल्ह्यातील एक स्पर्धा परीक्षाचा आडगाव पॅटर्न निर्माण करणारी एक आदर्श शाळा म्हणून या शाळेने स्थान निर्माण केले आहे.

स्पर्धा परीक्षेचा आडगांव पॅटर्न : 8 वी शिष्यवृत्ती परीक्षा , NMMS परीक्षा, सारथी शिष्यवृत्ती परीक्षा धारक विद्यार्थी

अ.क्र.	वर्ष	शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी	NMMS शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी	सारथी शिष्यवृत्ती परीक्षा धारक विद्यार्थी
1.	2018-2019	04	05	-
2.	2019-2020	12	13	-
3.	2020-2021	05	19	8
4.	2021-2022	10	08	19
	एकूण	31	45	27

5 वी नवोदय व 5 वी शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षा धारक

अ.क्र.	वर्ष	प्रवेश झालेले विद्यार्थी	शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी
1.	2015-2016	01	01
2.	2016-2017	07	14
3.	2017-2018	05	07
4.	2018-2019	07	11
5.	2019-2020	03	11
6.	2020-2021	04	16
7.	2021-2022	08	20
	एकूण	35	80



वर्ष	श्रेया पात्र	BDS पात्र	मंथन पात्र
2018-19	96	46	10
2019-20	181	38	12
2020-21	90	95	8
2021-22	145	92	15
2022-23	159	102	55
एकूण	671	373	100

प्रत्येक मूल स्पर्धा परीक्षेच्या दिशेने या उदात्त विचाराचा परिणाम वरील संख्यात्मक व स्तंभालेखावरून अधिकाधिक प्रगतशील वाटचालीकडे झाल्याचा आलेख दिसून येतो. ' स्पर्धा ' हा शब्द सध्याच्या या काळात मानवी जीवनातील एक महत्त्वाचा घटक आहे. पण ही जीवनातील जीवनाशी चाललेली स्पर्धा आनंदायी असणं तितकच महत्त्वाचे

आहे . स्पर्धांचा हेतू नेहमी सकारात्मक असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात होणारी वाढ व जीवन विकासासाठी निर्माण होणारा आत्मविश्वास ही स्पर्धा परीक्षेतून जीवन विकासाकडे जाण्याची एक उत्तम फलनिष्पत्ती आहे.



समारोप :-

‘ शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी ‘ संत तुकाराम महाराजांच्या या अभंगाप्रमाणे जि.प. प्रा. शा. आडगाव शाळेत स्पर्धा परीक्षा आडगाव पॅटर्न तयार करून, शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला इयत्ता पहिलीपासून स्पर्धात्मक परीक्षेला बसवून भावी प्रशासकीय सेवेत अधिकारी बनवण्याचा हेतू मनात धरून शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी सर्वतोपरी प्रयत्न आम्ही करीत आहोत.स्पर्धा परीक्षा आडगाव पॅटर्न यशोगाथा निश्चितच इतरांना प्रेरणादायी ठरेल असा विश्वास वाटतो .

व्हिडीओ लिंक : https://youtu.be/QWf0iRVnsKc

===== @ =====

54. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेतील यशातून गुणवत्ता विकास

शाळेचे नाव :- **जिल्हा परिषद शाळा नारायणगाव , ता. शहापूर, जि. ठाणे**

ई-मेल आयडी :- dasharath.vishe68@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव :- श्री. दशरथ विठ्ठल विशे

शालेय व्यवस्थापन :- जिल्हा परिषद



प्रस्तावना :

नारायणगाव शहापूर तालुक्यातील शेणवे किन्हवली परिसरातील दुर्गम व डोंगराळ भागातील एक १३११ लोकसंख्या असलेले खेडे. या गावात कोरडवाहू शेती असून बहुसंख्य ग्रामस्थ हे शेती हाच व्यवसाय करतात. गावात १ ली ते ७ वी पर्यंतचे शिक्षण देणारी जिल्हा परिषदेची शाळा असून वर्गखोल्या धोकादायक आहेत. माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी ८ ते २० किमी अंतरावरील किन्हवली व शहापूर येथे जावे लागते.

आव्हान :

सन २०१९ पूर्वी जिल्हा परिषद शाळा नारायणगाव येथे १ ते ७ वर्ग ५ शिक्षक होते. त्यामुळे कोणत्याही २ शिक्षकांवर अतिरिक्त वर्ग घेण्याची वेळ येत असे. शाळेचा पट व ग्रामस्थ तसेच नव्याने निर्माण झालेली स्थिती यामुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. सन २०१८-१९ यावर्षात ५ वी शिष्यवृत्तीसाठी ८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी २ पात्र होऊन एकही शिष्यवृत्तीधारक ठरला नव्हता. अशा वेळी नवीन बदलून आलेल्या शिक्षकांनी एकत्र येऊन शैक्षणिक बदल करण्याचा विडा उचलला.

नियोजन :

राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक श्री दशरथ विशे सर यांनी एक शिक्षक सभा घेवून शाळेतील गुणवत्ता वाढविण्याचा एक संकल्प सोडला आणि आपली शाळा कशी जिल्ह्याच्या शैक्षणिक पटलावर येईल यासाठी कटिबद्ध राहुयात असे आवाहन सर्व शिक्षकांना केले. या दृष्टीने मुख्याध्यापकांनी पुढील नियोजन करण्यास सुरुवात केली.अनेक शैक्षणिक बाबींचे वाटप झाल्यावर प्राधान्याने वर्ग वाटप करण्यास सुरुवात केली. उपस्थित शिक्षक श्री. योगेश रोठे यांनी इच्छा व्यक्त केली की सर आपल्या शिष्यवृत्ती परीक्षेच्यादृष्टीने त्यांना या वर्षी इयत्ता पाचवीचा वर्ग दिला तर आपणा सर्वांच्या मनातील गुणवत्ता निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करून शिष्यवृत्ती,नवोदय परीक्षेत आपली शाळा तालुका जिल्ह्याच्या पटलावर आणण्यास मदत होईल . अखेर वर्ग नियोजन अंतिम करून पुढील अंमलबजावणीस सुरुवात झाली.

कार्यवाही:

शालेय अभ्यासक्रमाबरोबरच शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी सुरू करत असताना वर्ग शिक्षक श्री योगेश रोठे सर यांच्या लक्षात आले की विद्यार्थ्यांचा ज्या पद्धतीने स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने पाया हवा तसा दिसून येत नाही यावर उपाय म्हणून विद्यार्थ्यांची आठवडी सराव परीक्षा घटकानुसार सुरू केली. या सराव परीक्षेतून विद्यार्थ्यांचा एक एक घटक पक्का होत होता.

तसेच नंतर शालेय अभ्यासक्रमातील गणित आणि शिष्यवृत्ती विषयातील गणित यांची योग्य सांगड घालून विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी वाढविण्यात आली.

शैक्षणिक वर्ष 2019-2020 मधील फेब्रुवारी 2020 च्या परीक्षेची तयारी करत असताना डिसेंबर महिन्यात शालेय आणि शिष्यवृत्ती विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी वर्गशिक्षक श्री योगेश रोठे सर यांनी योग्य नियोजन करून अभ्यासक्रम पूर्ण केला.


आमच्या केंद्राचे ,शाळेचे भाग्य एवढे छान की केंद्राला केंद्रप्रमुख लाभले ते सन्मा.डॉ.श्री.विलास वेखंडे सर . याचं कारण असे आहे की केंद्रप्रमुख सरांनी शिष्यवृत्ती परीक्षेचा केंद्राचा निकाल चांगला लागला पाहिजे या उद्देशाने सुरू केलेली शहापूर तालुक्यातील पहिली केंद्रास्तरीय सराव परीक्षा.

केंद्रप्रमुखांनी सुरु केलेली केंद्रस्तरीय सराव परीक्षा दर पंधरा दिवसांनी सुरू झाल्याने आम्हाला विद्यार्थ्यांची प्रगती दिसून येत होती.विद्यार्थी कोणत्या टप्प्यावर आहेत त्यांना काय शिकवलं पाहिजे या गोष्टीचा अंदाज येत होता.या सराव परीक्षेमुळेच विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीस लागली आणि काही दिवसात अंतिम परीक्षा परिषदेची परीक्षा आली आणि आमचे एकूण **8 विद्यार्थी या परीक्षेत प्रविष्ट झाले आणि आठही विद्यार्थी पात्र ठरले.**

अशा प्रकारे नारायणगाव शाळेचा शैक्षणिक गुणवत्तेचा आलेख उंचावण्याची सुरुवात शिष्यवृत्ती परीक्षेच्या माध्यमातून झाली.काही दिवसांनी शैक्षणिक वर्ष 2020-21 सुरू झाले. परंतु या वर्षाची सुरुवात कोरोना या महाभयंकर विषाणू ने झाली. संपूर्ण जगावर संकट कोसळले.

यावेळी माणसांचे जीव जात होते अशा वेळी शाळा कशी चालू ठेवायची हा प्रश्न पडला.परंतु शाळेचे मुख्याध्यापक श्री दशरथ विशे सर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री योगेशजी शिर्के व सदस्य आणि पालक यांनी सामाजिक अंतर ठेवून शाळा सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला.तसा विषय गंभीरच होता पण सुयोग्य नियोजनाने कोरोना काळात शाळा चालू ठेवल्याने **नारायणगाव शाळेचे तब्बल 15 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक आणि 3 विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयात निवड होवून** नारायणगाव शाळेने ठाणे जिल्ह्यात आपला एक नवीन शैक्षणिक ठसा निर्माण करण्यात यश प्राप्त केले.

शैक्षणिक शिष्यवृत्ती गुणवत्तेचा आलेख :



विश्लेषण : शैक्षणिक वर्ष 2019-20

या शैक्षणिक वर्षात नारायणगाव शाळेतील एकूण आठ विद्यार्थी शिष्यवृत्तीपात्र ठरली आणि 6 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले.



विश्लेषण -2020 -21...

शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये कोरोना काळ असतानाही शाळेतील एकूण 15 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरत जिल्ह्याच्या राष्ट्रीय ग्रामीण यादीत 2 विद्यार्थ्यांची निवड होऊन 200 गुणांच्या पुढे 6 विद्यार्थ्यांनी झेप घेतली होती.

तसेच याच वर्षात शाळेतील 2 विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयात निवड झाली होती.



विश्लेषण - 2021-22..

शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये नारायणगाव शाळेने ठाणे जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच राज्य गुणवत्ता यादीत येण्याचा मान कु.संभव दिपक शिर्के या विद्यार्थ्याच्या रूपाने मिळविला.तसेच ठाणे जिल्ह्याच्या राष्ट्रीय ग्रामीण यादीत चौथ्या क्रमांकाचे यश कुमारी.मयुरी चौधरी आणि दहाव्या क्रमांकाचे यश कुमार.कुणाल विशे यांच्या रूपाने मिळाले .तसेच शाळेचे एकूण 5 विद्यार्थी 200 गुणांच्या पुढे आणि शाळेचे एकूण 8 विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक ठरून एक नवा इतिहास निर्माण केला.

तसेच या शैक्षणिक वर्षात 3 विद्यार्थ्यांचा नवोदय विद्यालयात प्रवेश झाला.



पुढचे शैक्षणिक वर्ष 2021-22 सुरू झाले.या वर्षात पुन्हा एकदा सुयोग्य नियोजन आयोजन विद्यार्थ्यांची जिद्द, चिकाटी, सातत्य, कठोर परिश्रम या गोष्टी अंगी असल्याने **आठ प्रविष्ट विद्यार्थ्यांपैकी आठही विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरून कु .संभव शिर्के या विद्यार्थ्याने 282 गुण मिळवून ठाणे जिल्ह्यात प्रथम येण्याचा भीम पराक्रम केला** आणि निश्चितच नारायणगाव शाळेची उंची जिल्ह्याच्या पटलावर अधोरेखित झाली. आणि या वर्षात शाळेच्या **3 विद्यार्थ्यांचा नवोदय विद्यालयात** प्रवेश झाल्याने गाव,समाज,शाळा यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता.

यावर्षी घेण्यात आलेल्या छत्रपती शाहू महाराज निबंध स्पर्धेत तालुका स्तरावर कु. वैष्णवी गणेश शिर्के हिने चमकदार कामगिरी केली. यासाठी शाळेतील शिक्षक सौ. ललिता पाटील, प्रतिक्षा विशे व श्याम घोडविंदे सरांनी खूप मेहनत घेतली. अशा प्रकारे आज नारायणगाव शाळेची शिष्यवृत्ती परीक्षेतील यशाची यशस्विता उंचावत आहे.

समारोप:- गुणवत्ता विकासाशिवाय पर्याय नाही हे ओळखून लॉकडाऊन कालावधीत शाळेतील मुलांना वाऱ्यावर न सोडता मुलांना ऑनलाईन मार्गदर्शन , सराव प्रश्नपत्रिका व भिंतींवरील लेखन यांचा वापर व शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या नियोजन व कार्यवाहीने अखेर यशस्विता मिळाली.



मराठी कट्टा





सराव परीक्षा

===== @ =====

55.अस्थिर सौंदर्य इथे स्थिरावले

शाळेचे नाव व पत्ता : ठाणे महानगरपालिका शाळा क्रं 3 इंग्लिश माध्यम , लोकमान्यनगर ठाणे

ई मेल : tmcenglishmedschool@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव : सौ .अनघा पालांडे

सादरीकरण : सौ.कल्याणी सचिन नलवडे, रिसोर्स टीचर , शहर समूह साधन केंद्र २, वर्तकनगर

प्रस्तावना:

लहान मुले फुलासारखी असतात. पण मला आज भेटलेली विद्यार्थिनी ही तर जणू गुलाबाच्या फुलांनी भरलेला पुष्पगुच्छ होती. मला भेटून गेल्यावर मी खूप वेळ तिचाच विचार करत राहिले. कोण होती ती ?.....



यशोगाथा :

...तनुजा त्रिपाठी, सावरकर नगर शाळेत भरणाऱ्या इंग्लिश माध्यामातील बालवाडीत आई व आत्या बरोबर भेटायला आलेली एक सुंदर, गोंडस मुलगी.

वय वर्षे ५, असलेली तनुजाला सर्वजण लाडाने किट्टु म्हणत. पहिल्या भेटीत ही तिने माझ्याशी आय कॉन्टॅक्ट दिलाच नाही. सुरळीत असा जन्म घेतलेली तनुजा काही कालांतराने जेव्हा घरी गेली तेव्हा तिला आकडी आली म्हणून शिवाजी हॉस्पिटल ठाणे येथे उपचारादरम्यान गेले असता तिला तेथे दाखल करण्यात आले. उपचार झाल्यावर औषधे सुरू ठेवून तिला डिस्चार्ज दिला गेला. पुढे काही दिवस गेल्यावर पुन्हा तिला आकडी आली म्हणून यावेळी मग के. ई. एम. हॉस्पिटल येथे दाखवण्याचा , शिवाजी हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी सल्ला दिला. के ई एम हॉस्पिटल मध्ये गेल्यावरही तिथे तिला ऍडमिट करून औषधोपचार घेण्यासाठी सांगण्यात आले. त्यानंतर औषधोपचार चालू राहिले औषधे चालू असल्याने जवळजवळ आता तीन वर्षे तिला आकडी आली नाही. ही चांगलीच गोष्ट झाली पण आता तिच्यामध्ये अतीचंचलता वयानुरूप वाढत गेली. एका जागेवर स्थिर न राहणे, इकडे- तिकडे धावणे, पळणे, सतत हे उचल- पाचल अशा तिच्या क्रिया चालू झाल्या. मग न सांगता बाहेर जाणे, मग शोधाशोध करणे हे रोजचेच काम होऊन जाई. मग अशा अवस्थेत कुठे गेली तर?

समाजात सर्वच माणसं चांगली नसतात. त्यामुळे मग या हायपर ऍक्टिव्हिटी वर उपचार म्हणून तिला औषधे सुरू करण्यात आली. त्या औषधाचा परिणाम असा झाला की 24 तासामधील निम्मे तास तरी कीट्टू झोपलेली असते व बाकीच्या वेळेत तिच्या डोळ्यावर झोप, ग्लानी दिसत असे .जशी ती मला भेटल्यावर दिसत होती सुंदर अशी लाल फ्रॉक मध्ये आलेली पण तिचे डोळे उघडले नव्हते ,जणू ती दृष्टी बाधित असावी असा समज व्हावा. पालकांची इच्छा होती की आमच्या मुलींनी खेळावे , बागडावे पण काय करणार ?.... लोकमान्यनगर सारख्या भागात राहायला आम्ही, मुलगी कुठे गेली, कुणी काही केलं तर ?.... समाज वाईट आहे , त्यामुळे झोपलेली बरी. अशी त्या केविलवाण्या आईची आर्जव होती . बालवाडी शिक्षिकेने व मी त्यांना थोडा धीर देत सांगितले की ,बघा, हा तिला मेडिकल इशू काही नाही. औषध आपण फक्त ती शांत राहण्यासाठी चालू केलेली आहेत. औषध आपण चालूच ठेवू या पण त्याबरोबर तिला थेरपीची गरज आहे. म्हणजे तिच्याबरोबर काही ऍक्टिव्हिटी होणे गरजेचे आहे की, तुम्ही तिच्याशी गप्पा गोष्टी करणे , तिला ते समजावण्याचा प्रयत्न करणे, त्याला तीने प्रतिसाद देणे, भावंडांशी खेळणे , टीव्ही पाहणे, एखादा खेळ खेळणे, एखाद्या वस्तूशी खेळणे . यामुळे तिची एकाग्रता वाढेल. एका जागी बसण्याचा अटेंशन स्पॅन वाढेल व आपण तिला ऍक्टिव्ह करू शकू . आईचे म्हणणे आले , " नक्की असं होईल? आम्हाला खूप बरं वाटेल." "ये ठीक हो सकती है?" असा त्यांचा प्रश्न होता. जाता जाता फक्त झोपून राहणे हा उपाय नाही . आज ना उद्या ती मोठी होणार आहे . म्हणून आईची काळजी होती की ती बरी व्हावी . मग यापुढे माझे कसब लागले . मी त्यांना सांगितले व एक कार्यक्रम आखून दिला . तिच्या झोपायच्या वेळा तसेच तिचा दिनक्रम याचा अभ्यास करून नियोजन केले गेले. झोपेच्या वेळा काहीतरी कमी होऊ द्या , जागी असतानाच्या वेळेत उपयुक्त अशा क्रिया तिच्याकडून करून घेऊया. त्यासाठी उपयुक्त अशी खेळणी कोणती वापरावी याबाबत माहिती पालकांना दिली. तनुजाची आवड लक्षात घेऊन, काही वेळ खेण्याबरोबर खेळणे, टी व्ही पाहणे, आई नी गाणी / गोष्टी म्हणणे /सांगणे, तिला रोज फिरायला घेऊन जाणे इत्यादी. या नियोजन बरोबरच कोणतीच कृती खूप वेळ घ्यायची नाही, कारण एक सवय सोडविण्यासाठी दुसरी सवय जडू द्याची नाही. कारण एखादी सवय अती झाल्याने वर्तणूक समस्या वाढू शकतात.

गृहकार्यक्रम आखणी करून दिली त्याचबरोबर ठाणे महानगरपालिका संसाधन कक्ष , कोपरी येथे तिला सेशन साठी घेऊन यावे लागेल असे पालकांना सांगितले . त्याच दरम्यान मला तिचं स्क्रीनिंग, असेसमेंट करता येईल.व काही गोल ठरवता येतील.

त्याप्रमाणे आई तनुजा ला घेऊन आठवड्यातून दोनदा घेऊन येत. प्रत्यक्ष मुलखात, आईशी चर्चा, भावंडांशी गप्पा, सहशिक्षिका याचा अनुभव, प्रत्यक्ष तनुजा बरोबर खेळ खेळून पुढील गोल ठरवले.

१) हात व डोळे यांचे समायोजन(eye- hand) को-ऑर्डिनेशन

२) तिने दुसऱ्याला कॉन्टॅक्ट देणे

३)इतरांशी संभाषण करणे

४)इतरांच्या मध्ये मिसळणे , इत्यादी

तिच्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या या गोष्टी आईने या लक्षपूर्वक ऐकल्या व आठवड्यातील दोन दिवस आम्ही किट्टू चे वन-टू-वन सेशन चे नियोजन केले. माझ्या सहशिक्षिका प्रमिला मॅडम याही तिला आठवड्यातील एक दिवस one to one teaching , occupational therapy या (IEP) कार्यक्रममध्ये सहकारी ठरल्या.

पहिल्या दिवशी आल्यावर तिच्या लक्षात आले की आपल्याला येथे बसवले जात आहे. म्हणून ती बाहेर पळून जायची . आई तिला हाताला धरून फरपटत वर्गात आणून बसवायची .पण हा काही त्याच्यावर उपाय नव्हता. म्हणून मग ती सेशनला येताच तिचा हात धरून मी तिला घेऊन शाळेच्या वरील गच्चीवर जाऊन दोन-तीन फेऱ्या मारत असे. आपण दोघी पकडापकडी खेळूया , पळूया अशा तऱ्हेने मी तिच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला व तो तिला रुचला. मग हळूहळू बसून दहा मिनिटांसाठी पंधरा-वीस मिनिटासाठी तिच्याकडून चिकन माती बरोबर खेळणे, ठोकळे लावणे अशा गोष्टी ,ऍक्टिव्हिटी घेण्यात आल्या. सोबतच प्रमिला मॅडम occupational therapy घेत असत, पण पंधरा मिनिटाच्या वर अटेंशन स्पॅन वाढण्यासाठी अडचणी येत होत्या. पंधरा मिनिटे झाली की ती पळून जायची . घरी चल असे आईच्या मागे लागायची . एकदा तर चिडून म्हणा किंवा मज्जा म्हणून clay माझ्या केसातच गुंतवला आई खूपच घाबरली आणि रागावली . पण आम्हा दोघींनाही माहित होते , ना मारून उपयोग , ना रागावून. खूप प्रयत्न करून तो clay आम्ही केसांपासून वेगळा केला. मला आणि तिच्या आई ला वाटले आता केस कापण्याशिवाय पर्याय नाही. तिच्या आई ला खूप अपराधीपणा सारखे वाटले. मला म्हटल्या त्या "देखो कैसी है , आपके बाल खराब कर दिये ! आपको बहुत तकलीफ होगी इस सब मै! मी त्यांना म्हंटले काही हरकत नाही.

नंतर एक दोन सेशनला त्या आल्याच नाही . फोन वरून माझ्या केसांची चौकशी मात्र करत होत्या . मी न येण्याचे कारण विचारले तर म्हणाल्या तुम्हाला त्रास नको. मी म्हटले ," तुम्ही जेवढा गॅप घेणार ,तेवढा आपल्या सर्वांना त्रास होणार". तुम्ही नियमित सेशनला या आपल्या तनुजामध्ये फरक जाणवेल.पुन्हा नियमित सेशन सुरू झाले.

पण आई ने काही खायला दिले, मोबाईल दिला तरच ती पाच, दहा मिनिटे सेशनसाठी थांबायची. पण मोबाईल देणे हा काही उपाय नव्हता. एक दिवस तिला सिपी चेअरमध्ये बसवण्याचा प्रयत्न केला. पण तिच्या लक्षात आले होते की, या मध्ये बसून मला बंद केले जाईल , मला इथून बाहेर पडता येणार नाही. म्हणून आधीच गोंधळ करायची.आता वेगळे काय करूया म्हणून थोडा बदल केला. तिच्या आवडत्या गोष्टीच सुरू करू तिला एकाग्र करायला. मग आम्ही अजून एक बदल केला. रोजच्या सेशनच्या आधी व नंतर असं दोन /तीन वेळा तिला मी दोन मिनिटांसाठी त्या चेअर मध्ये बसून चिकन माती, लाकडी फळीवर ठेऊन तिला खेळणी देऊ लागली, चिकन माती तिला आवडत असे. असे खूप वेळा करावे लागले या मध्ये दोन-तीन महिने गेले. अचानक एके दिवशी सेशन साठी आले असता, ती स्वतः जाऊन त्या सीपी चेअरमध्ये बसली व खुणेनेच आम्हाला फळी लावा अस सांगू

लागली.बोलताना फक्त उकारांत आवाज करणारी की आता आय कॉन्टॅक्ट देऊ लागली. एका जागी बसून खेळू लागली. आई कडून सांगण्यात आले की आम्ही आता औषधे अर्ध्यावर आणली आहेत. डॉक्टरांना विचारून कमी केली आहेत. आम्ही तिच्यावर लक्ष ठेवतो. पण ती सारखी झोपलेली नको आहे आम्हाला. धन्यवाद मॅडम तुम्ही आम्हाला मार्गदर्शन केले. व आमच्या मुलीचे औषध व तिचा activness यांचा संबंध व यामध्ये काय बदल करता येईल यासाठी मार्गदर्शन केले.वन-टू-वन सेशनचे पर्व चालू होते . किट्टूमध्ये स्वतः येऊन बसण्यचा आता स्पॅन वाढला होता. तिला माहीत झाले होते की, आपण फिरायला जायचं तर हातवारे करून सांगणे. मग कंटाळा आला की स्वतः मोबाईल कडे हात दाखवून गाणी ऐकायचे आहे याची खूण करणे. त्यात तिचे आवडते गाणे "मछली जल की रानी है" . कधीकधी खूपच चिडली ,जाण्याचा हट्ट करू लागली की, मी स्वतः हे गाणं म्हणत असे. मग ती थोड्यावेळासाठी स्थिर होत असे. त्यानंतर कोरोना संकट या जगावर पसरले. आणि लागले सेशन बंद झाले ऑनलाईनच्या माध्यमातून सामान्य मुले शिकण्यात किती अडचणीत येत होत्या, मग विशेष मुलांमध्ये तर काही बोलायलाच नको, तरीही तनुजा फोनवर संपर्क करून ती फक्त ऐकायची मी काय बोलते ते. एकदा झूम मीटिंग घेतली होती, पण तिने कॅमेऱ्याकडे लक्षच दिले नाही, पण कॉल करणे, व्हिडिओ कॉल करणे यामुळे तिच्या लक्षात आलं की आपल्याला कॅमेऱ्यात पाहणे अनिवार्य आहे. काही सेशन ऑनलाईन मध्येही रंग दाखवणे, घरातील वस्तूचे रंग विचारले असतात त्या वस्तू दाखवणे आईच्या मदतीने करू लागली. आता ती तिच्या भावंडांच्या शाळेत ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक 3 ,इंग्रजी माध्यम येथे पहिलीत दाखल झाली आहे.



तनुजाबरोबर विविध कृती

मुलांत मिसळून खेळावे म्हणून सावरकर नगर येथील अंगणवाडी तिला काही वेळ खेळवले जाई. प्रमाणपत्र पूर्ण होऊन तिला ते मिळाले आहे .आधार कार्ड काढण्यासाठी खूप अडचण येत होती. तिचा रेटिना स्कॅन होत नव्हता व ती स्थिर एका जागी बसतच नव्हती.एके दिवशी ठा.म.पा. ४६ शाळेत अहवालाचे काम करत असताना, खूप मोठमोठ्याने लहान मुलांच्या रडण्याचा आवाज आला. शेजारच्या वर्गात आधार बनवण्याचं काम चालू होतं वेगळा आवाज आला म्हणून माझ्या मनात शंका आली की माझ्या क्षेत्रात मला माहित नाही असं कुठलं विशेष मूल तर नाहीये ना ? कारण आवाज वेगळाच वाटला. मी तिथे बघितले पाहताक्षणी एखादा मुलगा असेल

डोक्यावर केस नव्हते पण तो आवाज ऐकून डोळ्याकडे लक्ष जाताच माझ्या लक्षात आले की ती दुसरं कोणी नाही, तनुजा आहे. मी धावत जाऊन तिच्या वडिलांना, त्या आधार कार्ड वाल्या माणसांना बाजूला केले. त्यांना सांगितलं तुम्ही तिला हात लावू नका, तिला आवडणार नाही. तर तो आधार कार्ड तयार करणारा ओरडू लागला,"किती वेळ झालाय? तुझ्यासाठी किती थांबणार? चार वेळा येऊन गेली.. सकाळपासून ती बोट ठेवत नाही या मशीनवर, बघतच नाही कॅमेऱ्याकडे, मला काही गरज नाहीये तिचा आधार कार्ड जबरदस्तीने करूच नका". पालक थोडे खजील झाले होते. तिला मारायला हात उगारला . मी म्हटलं काही गरज नाहीये. काही ठिकाणी आधार कार्ड ते आई-वडिलांच्या आधार व काढता येते पण त्या आधार कार्ड बनवणाऱ्या व्यक्तीला ते येत नव्हतं म्हणून तो त्यांना दुसरीकडे जाण्याचा सल्ला देत होता. त्यानंतर दोन-तीन महिने फिरून झाल्यावर पालकांना एका ठिकाणी दिलासा मिळाला .तनुजाचे आधार कार्ड तयार झाले. व त्याद्वारे तिचे प्रमाणपत्र ही तयार झाले. आता किट्टु नवीन वर्षात शाळेत जायला तयार झाली आणि शाळाही तिच्या स्वागतासाठी तत्पर होतीच. आठवड्यातील किमान 4 दिवस 1 तास शाळेत थांबणे , हळू हळू 2 तास करणे असा शाळा दिनक्रम ठरला. Dmart तर्फे या शाळेत शिक्षक रुजू होते. त्यांच्याशी सल्लामसलत करून तिच्याबाबत शिक्षकांना सर्व माहिती दिली. त्याच्या रुजू असलेल्या समुपदेशक सांगू लागल्या तिला अनेक सोयी , सुविधा ची गरज आहे. तिला उपयोगी असलेल्या इतर शाळा असतात , त्याचा तिला फायदा होईल. मी म्हंटले किती दिवस ती वेगळ्या शाळेत जाईल. नंतर तिला या सामान्य लोकांच्या समजातच मिसळायचं आहे. मुळात तिला समजून घेतले तर ही तिच्यासाठी मोठी सुविधा आहे. तिचा हक्क , अधिकार आहे, तीचीही भावंडं ज्या शाळेत शिकतात त्याच शाळेत शिकण्याचा.शाळेत जाऊन तिच्याबद्दल माहिती घेत होते. मध्यंतरी 10 /12 दिवस तनुजा शाळेत आली नाही. विचारणा केली असता आईने सांगितले "बडी हो गई है वह". म्हणजेच तिला आता मासिक पाळी येऊ लागली आहे. मग स्वच्छता व शारीरिक त्रास यामुळे मग त्या तिला घरी ठेवणे पसंत करत. तिला काहीच कळणार नाही सर्व काळजी आईलाच घ्यायला हवी.

म्हणून मग गृह मार्गदर्शन साठी जात. मी निपूण भारत अंतर्गत माता पालक संघ निर्मिती केल्याने पालकांमध्ये विशेषता मातांमध्ये बरीच जागृती निर्माण झाली आहे. तनुजाची आई ही त्यात हिरीरीने भाग घेते. एकदा निपुण भारत अंतर्गत गृहभेटी करत असताना तनुजाच्या भागातील माता पालक गटाचे नेतृत्व तनुजाच्या आईने केले. त्यांना एकत्र जमून त्यांना माहिती सांगता आली. त्यांनी त्यांच्या मुलीसाठी घेत असलेल्या कष्टाची इतरांना जाणीव करून दिली. जेणेकरून आपला मूल चांगले असून सुद्धा त्याच्या अभ्यासात आपण मदत किंवा भाग घेत नसू तर त्याला यश कसे मिळेल? गृह भेटीसाठी जात असताना आता तनुजा स्वतः हात धरून खाली बस असं खुणावते. आईला खाऊच्या डब्याकडे बोट दाखवून खाऊ देण्यासाठी सांगते. मी निघाले की बस असे खुणावते, हात धरून गाणे म्हणण्यास खुणावते. छान माझ्याकडे पाहते, हसते . जाताना हात हलवून टाटा करते. तिला असे हसताना पाहून कष्टाचे चीज झाले असे वाटते.

===== @ =====

56. लोकसहभाग व सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी विकास

शाळेचे नाव – जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा, हिरडामाली,जि.गोंदिया

मुख्याध्यापक – श्री. रविंद्र गोविंदराव शहार

ईमेल – shahare.ravindra1202@gmail.com

शाळेचे व्यवस्थापन – जिल्हा परिषद



प्रस्तावना:

समाजाच्या, गावकऱ्यांच्या, पालकांच्या, शिक्षकांच्या आणि पालकांच्या आणि बालकांच्या स्वप्नातील शाळा म्हणजे आमची जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा हिरडामाली ! महाराष्ट्र शासनाच्या अभिनव उपक्रमातील आदर्श शाळा (MODEL SCHOOL). अगदी नावाला साजेल अशी आणि तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात नावारूपास आलेली आदर्श शाळा. कोहमारा – गोंदिया दरम्यान जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 753 वर गोरेगाव तालुक्यापासून दोन किलोमीटर अंतरावर हिरडामाली गावात वसलेली शाळा. हायवेवरच असल्याने सहज दृष्टीक्षेपास पडते आणि येणाऱ्या जाणाऱ्यांच्या भुवया उंचावतात . कुणीही क्षणभर तरी थांबून शाळेकडे पाहिल्याशिवाय पुढे जाणार नाही अशी आकर्षक आणि स्वच्छ सुंदर शाळा ! भव्य प्रवेशद्वार, हिरव्या – पिवळ्या – पांढऱ्या रंगाने रंगवलेली इमारत, प्रवेशद्वारापासून मुख्य इमारतीपर्यन्त असणारी रंगीत कॅरी आणि त्यामध्ये फुललेली आणि बहरलेली हिरवीगार फुलझाडे कुणाचेही मन मोहीत करते.

जून 1946 मध्ये स्थापन झालेली ही शाळा. इमारतीने मात्र आता कात टाकलेली आहे. सर्व वर्ग पक्के आणि मजबूत बांधलेली आहेत. गावातील लोकांच्या सहकार्याने ह्या शाळेने बऱ्यापैकी अंग झटकून सुंदर पेहराव परिधान केलेला आहे. जशी शाळा दिसायला सुंदर आणि आकर्षक आहे अगदी तशीच शाळेने गुणवत्ता आणि दर्जेदार शिक्षणाचे व्रत कायम पाळलेले आहे. याच शाळेने खासदार, आमदार, तसेच जिल्हा परिषद सदस्य, शिक्षण सभापती असे मोठे मोठे राजकरणी दिग्गज जिल्ह्याला दिलेले आहेत. डॉक्टर्स, इंजिनीअर, प्राध्यापक, शिक्षक आणि अनेक शासकीय, खासगी कंपनीत मोठ्या पदावर काम करणारे अधिकारी आमच्या हिरडामाली शाळेची देण आहे.

समस्या/ आव्हान :

केवळ पाठ्यपुस्तकांच्या मदतीने जिज्ञासा, उत्सुकता ,सखोल अभ्यास इ. गरज भागू शकत नाही. तर त्यासाठी सुसज्ज संगणक आणि प्रोजेक्टरयुक्त वर्गाखोली हवी. जेणेकरून विद्यार्थ्यांना कणापासून तर ब्रम्हांडापर्यंत जीवंत

अध्ययन अनुभव देता येईल. पण समस्या हीच की एवढा निधी कुठून आणि कसा जमा करायचा ?

नियोजन व कार्यवाही :


तात्कालीन मुख्याध्यापक श्री. वाय. एस. भगत, श्री. विरेंद्रकुमार पटले आणि इतर शिक्षक यांच्या प्रयत्नाने आणि समाज व पालकांच्या सहकार्याने पाच वर्गांमध्ये संगणक आणि प्रोजेक्टर तर तीन वर्गांमध्ये संगणक व स्मार्ट टीव्ही यांची सोय करण्यात आली. आणि शाळेला डिजिटल शाळा म्हणून नावारूपास येण्याचा मान प्राप्त झाला. जिल्ह्यातील कोणत्याही शाळेमध्ये नसेल एवढे सुसज्ज वर्ग आज शिक्षक आणि समाजाच्या सहकार्यातून निर्माण झाले. केवळ विद्यार्थी हा केंद्र मानून केलेले कार्य आज अनेकांना प्रेरणादायी ठरलेले आहे.

त्यानंतर आलेले मुख्याध्यापक श्री. चन्ने यांच्या काळात जवळपास पाच लक्ष रुपये गोळा करून शाळेतील सर्व वर्गांच्या भिंती बोलक्या करण्यात आल्या. जणू त्या त्या वर्गाचा पाठ्यक्रमच त्या वर्गाच्या भिंतीवर उतरवला गेला. याचा फायदा विद्यार्थ्यांना झाला आणि आताही होत आहे. शाळेसाठी कुणी फ्रीज दिला, कुणी पंखा दिला तर कुणी प्रवेशद्वारावर बोर्ड दिला. कशा न कशा रूपात शाळेचा आपला वाटा अनेक जणांनी उचलला . याचे संपूर्ण श्रेय शाळेतील शिक्षकवृंद आणि पालकांना द्यावे लागेल. शाळेविषयीची आपुलकी अनेकजणांनी जपलेली आहे.

सध्या शाळेचे नेतृत्व उच्चश्रेणी मुख्याध्यापक श्री. रविंद्र शहारे करीत आहेत. शिक्षणाचा कळवळा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वां गीण विकासाची कास धरणारा असा मुख्याध्यापक मिळावा हेही शाळेची परंपरा कायम राहिली. चांगल्याला टिकवून ठेवणे, दर्जेदार आणि उत्कृष्टाला आणखी उत्कृष्ट करणे हेही तेवढेच जिकरीचे आणि जबाबदारीचे काम आहे. शाळेचे रंगरंगोटी आणि संगणक, प्रोजेक्टर इ. साहित्य सुस्थितीत आणि वापरात ठेवण्याचे शिवधनुष्य पेललेले आहे.



शालेय इमारत व सुंदर परिसर



बोलक्या भिंती

आज शैक्षणिक वर्ष 2022-2023 ला आमच्या शाळेची पटसंख्या 318 झालेली आहे . 2021-22 ला 261, 2020 -21 ला 217, 2019-20 ला 205, 2018-19 ला 200 अशी होती. एकंदरीत पाहता या वर्षी पटसंख्येत लक्षणीय वाढ झालेली आहे. आजूबाजूच्या गावातील अनेक विद्यार्थ्यांनी आमच्या शाळेवर दाखवलेला विश्वास याला कारणीभूत आहे. या वर्षी जवळपास 25 विद्यार्थ्यांनी खासगी कॉन्व्हेंट मधून आमच्या शाळेत प्रवेश घेतलेला आहे. ही आमच्या शाळेची जमेची बाजू आहे. आजच्या घडीला पंचक्रोशीतील पालक आणि विद्यार्थी आमच्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी अतिशय उत्सुक आहेत. आपल्या मुलांनी हिरडामालीच्या जिल्हा परिषद शाळेत शिकावे हे स्वप्न पालकांनी पहावे याचे पूर्ण श्रेय मुख्याध्यापक श्री. रविंद्र शहारे आणि सर्व शिक्षकवृंदांना जाते.

सहशालेय उपक्रम:

- सुसज्ज वाचनालय, क्रीडा साहित्य, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन
- शैक्षणिक सहल, वार्षिक स्नेहसंमेलन, चित्रकला स्पर्धा

- बालसभा, माझा वाढदिवस
- रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, वृक्षारोपण
- विविध जयंती, पुण्यतिथी साजरी करणे,राष्ट्रीय सण साजरे करणे
- क्षेत्रभेट, दिनांक तो पाढा, गृहपाठ तपासणी पथक, निवडणूकीतून मंत्रिमंडळ
- शंकापेटी, उपस्थिती ध्वज, मराठी, हिंदी इंग्रजी परिपाठ
- संगणक शिक्षण, गावातील व्यावसायिकांची भेट घेणे
- दप्तर विना शाळा, तंबाखूमुक्त शाळा
- काड्या मोजूया बेरीज शिकूया, शब्दांशी खेळूया, माझा आवाज ओळखा, अतिथी व्याख्यान
- हात धुवा , नंतर जेवा.





खेळाचा आनंद घेताना **आनंददायी शिक्षण** **स्नेहसंमेलन**





रे यांच्या नेतृत्वाखाली सर्व शिक्षकवृंदांनी घेतले आहे. शाळेची प्रगती आणि विद्यार्थी विकास हेच ध्येय , ध्यानी आणि मनी शिक्षक व पालकांनी मनात रुजवले आहे. शाळेच्या प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे. नवोदय परीक्षा, NMMS परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षांमधून पात्र विद्यार्थ्यांची निवड होत आहे ही शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी बाब आहे. शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये 5 विद्यार्थ्यांनी NMMS परीक्षेत, तर 8 विद्यार्थ्यांनी PUP शिष्यवृत्ती परीक्षेत बाजी मारलेली आहे. ही शाळेसाठी अभिमानास्पद गोष्ट आहे.

- **<u>समारोप</u>**

शाळेच्या विकासासाठी शाळा व्यवस्थापन समितीसुद्धा तनमनधनाने काम करीत आहे . लोकसहभागातून अनेक उपक्रम सुरु करता येऊ शकतात व या उपक्रमातून विद्यार्थी विकास शक्य आहे . त्यामुळे साहजिकच विद्यार्थी पालकांचा ओढा या शाळेकडे वाढल्याने पट सातत्याने वाढत आहे.

===== @ =====

57. बहुभाषिक विद्यार्थी विकासात शाळेचे योगदान



शाळेचे नाव - जि.प.प्राथ.शाळा सुंदरी,केंद्र-चिचगड,ता.देवरी,जि.गोंदिया

मुख्याध्यापकाचे नाव - श्री.गरीबा बिसलाल सहाळा

ई-मेल आयडी - sahalagariba@gmail.com

शाळेचे व्यवस्थापन - जिल्हा परिषद

https://youtu.be/v8l3WTDcqDA

प्रस्तावनाः

हे मंदिर आमुचे ज्ञानाचे, मानाचे अभिमानाचे !

इथेच घडते सुंदर जीवन,माझ्या तुमच्या भाग्याचे !

महाराष्ट्र राज्याच्या अतीपूर्वेकडील आदिवासीबहुल,दुर्गम ,जंगलव्याप्त नक्षलग्रस्त म्हणून ओळख असलेल्या देवरी तालूका ज्याच्या एका बाजूला गडचिरोली जिल्हा तर दुसऱ्या बाजूला छत्तीसगढ राज्य आहे.या तालुक्यात आमची शाळा ही इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत वर्ग असलेली शाळा आहे.सुंदरी हे गाव वांढरा पहाडीच्या राम मंदिर पायथ्याशी निसर्गरम्य वनराईने नटलेल्या परिसरात गोंदिया जिल्ह्याचे नंदनवन म्हणता येईल.सुंदरी हे गाव अवघ्या 682 एवढ्या लोकसंख्येचे छोटेसे खेडेगाव. महाराष्ट्रामध्ये एकूण 47 आदिवासी जमाती आहेत.गोंदिया,भंडारा ,गडचिरोली मध्ये **'झाडी बोली'** मराठी भाषेचा वापर केला जातो.देवरी तालुकाअंतर्गत **जि.प.प्राथ.शाळा सुंदरी** आदिवासी बहुल भागात विविध आदिवासी भाषेचा वापर केला जातो.गोंडी,छत्तीसगढी,गोवारी,हलबी या भाषेचा जास्त प्रमाणात उपयोग केला जातो.शाळेत येणाऱ्या विदयार्थाला आपलीच बोलीभाषा अवगत असते.त्यामुळे मराठी भाषा अवगत करण्यास विलंब लागतो.या आदिवासी बहुल क्षेत्रात माझे जन्म व बालपण गेलेले असल्यामुळे गावाच्या मातीची व माणसांची नाळ जोडलेली असणे सहज आणि स्वाभावीकच आहे.बालपणी ज्या मातीत खेळलो बागडलो सुखी व समृद्ध, तेथील विविध बोली भाषा अवगत असल्याने बहुभाषिक विदयार्थांना मराठी प्रमाण भाषेकडे नेण्यासाठी व बहुभाषिक भाषेचा उपयोग घेण्यासाठी मी 5 जून 2018 लासर्व प्रकारचे नकारात्मक विचार व भावनीक सल्ले झुगारुन शाळेवर रुजू झालो. यात सर्वप्रथम सहकार्य मिळाले ते माझे समव्यावसायिक,समविचारी तितकेच धैर्यशिल सहकारीव मित्र आदरणीय श्री.विनोद लिचडे सर तसेच श्री.युवराज कोल्हारे केंद्र प्रमुख तसेच गट साधन देवरी यांचे सहकार्य मिळाले.

बहुभाषिक समस्याः

1)क्षेत्रीय भाषांचा विदयार्थावर प्रभाव. 2)मुलांना सामाजिक आधार करण्याचे आव्हान.3)संवाद कौशल्य विकसित करण्याचे आव्हान.4)विदयार्थांमध्ये भाषीक कौशल्य विकसित करण्याचे आव्हान.5)विदयार्थांचा भाषेकडे आस्था आणि कल नसणे.6)शिक्षकांच्या विविध भाषांच्या ज्ञानाचे आव्हान.

आमच्या शाळेत 66 विदयार्थी शिक्षण घेत आहेत.त्यापैकी बहुतांश विद्यार्थ्यांच्या घरी गोंडी,छत्तीसगडी,गोवारी व हलबी भाषेचा वापर करण्यात येतो. म्हणून साहजिकच विद्यार्थीपण त्याच भाषेचा वापर करतात.पण शाळेमध्ये मराठी भाषेचा वापर होत असल्याने विदयार्थी बरेच वेळा गोंधळतात.सुरवातीला मराठी भाषा बोलतांना ते गोंधळून लिंग बदल करतात . जर स्त्री असेल त्याला पुल्लींग जोडतात व पुरुष असेल तर त्याला स्त्रिलींग जोडतात.उदा.तुझी बाबा आली, तुझा आई आला. मराठीचे वाचन करतांना त्यांना ते सहज कळून येत नाही.घरी आई बाबा कडे विदयार्थी विचारणा करतात तेंव्हा पालकांना सुद्धा याविषयी जास्त माहिती नसते.अशावेळी शिक्षकांना त्या विदयार्थांना शिकवताना तारेवरची कसरत करावी लागते.कधीकधी एखादा शब्द विदयार्थांना त्यांच्या भाषेत कसा समजावून सांगावा हा शिक्षकासमोर सुद्धा प्रश्नच आहे.

<u>बहुभाषिक विद्यार्थ्यांची परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल (उपक्रमाचे स्वरुप)-</u>

‘ परस्पर सुसंवाद,समन्वय व विश्वासाच्या पायावर

अज्ञानाचा तिमिर सारुया , बाल मनाला हळुवार फुलविण्या .’

या भावनेने प्रेरित होऊन आम्ही दोघांनी मिळून शाळेच्या विकासाकरिता एक त्रिसूत्री आखली.

1)शालेय शिस्तीचे कटाक्षाने पालन करणे. 2) विदयार्थांचे बहुभाषिक व मराठी भाषा सुसंवाद (दैनिक)

3) विदयार्थांची गुणवत्ता व व्यक्तीमत्व विकास.

या त्रिसुत्रीस अनुसरुन प्रत्येक विदयार्थी बहुभाषिक कडून प्रमाण मराठी भाषेकडे एक अलौकीक एकक म्हणून त्यांच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास हा आपल्या नियोजन व कार्याचा केंद्रबिंदू म्हणून अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचे नियोजन केले. यशपाल यांच्या अहवालात म्हटल्या प्रमाणे “ मूल ही ज्ञान ठेवण्याची थैली आहे आणि पुस्तके हाच शिक्षणाचा पाया आहे.” या पारंपारिक समजेच्या पलिकडे शिकणे हा आनंददायी अनुभव कसा होईल,मुलांमध्ये प्रश्न निर्मिती कौशल्य,बहुभाषिक व मराठी वादविवाद स्पर्धा ,स्वानुभव कथन, स्वलेखन व सर्जनशील विचार क्षमता निर्माण करुन रचना वादावर आधारित शिक्षणप्रक्रियेचा पाया रचण्याचा व त्यातून विविध विषयांच्या अध्ययन-अध्यापनातून मुलांचा शारीरिक ,सामाजिक , सांस्कृतिक,भावनिक व मानसिक विकास साधण्यासाठी आवश्यक शैक्षणिक प्रकल्प व उपक्रम शाळेत राबविण्यात आले.

https://youtu.be/IFZW2exXn3c

https://youtu.be/ZwoQ2si9BuU

<u>मुख्याध्यापकांनी बहुभाषिक समस्या निराकरणासाठी केलेले नियोजन (उपाय)-</u>

1) शिक्षकांनी विदयार्थांना नेहमी त्यांच्या भाषेत बोलण्याची संधी दिली पाहीजे.2)मुलांना प्राथमिक शिक्षण त्यांच्या मातृभाषेतून दिले पाहिजे.3)त्रिसूत्री भाषेचा वापर केला पाहिजे.4)शिक्षकांनी समृद्ध भाषेचे वातावरण निर्माण केले पाहिजे.5)बहुभाषिक वर्गाचा वापर संसाधन म्हणून केला पाहीजे.

विदयार्थांना वर्गात आणि तोंडी परीक्षेत आम्ही त्यांच्या भाषेत बोलण्याची मुभा देतो.तसेच आम्ही विदयार्थाला त्याची भाषा आणि मराठी या दोन्ही संयुक्त भाषेत बोलण्याचा सुद्धा पर्याय देतो.जिथे विदयार्थी चूका करतात तिथे लगेच विदयार्थांच्या लक्षात आणून देतो.शालेय शिस्तीचे पालन,बहुभाषिकव मराठी भाषा सुसंवाद आणि व्यक्तीमत्व विकास या त्रिसूत्रीचा वापर केला जातो .दैनिक सुसंवाद मध्ये संवाद तर होतोच पण त्याबरोबर काही शब्द दिले जातात आणि सर्व त्या शब्दाला आपापल्या भाषेत लिहितात.

अ.क्र.	मराठी	गोंडी	छत्तीसगडी	हिंदी	इंग्रजी
1	मिठ	हवर	नुन	नमक	salt
2	पाणी	येर	पाणी	पाणी	water
3	भात	गाटो	भात	चावल	rice
4	माकड	मुजाल	बेंदरा	बंदर	monkey
5	कुत्रा	नई	कुकुर	कुत्ता	dog

या सुसंवादाचे अनेक फायदे होतात. 1) जे शब्द शिक्षकांना माहित नाहीत ते शब्द शिक्षकांना माहीत होतात.2) भरपूर शब्द विदयार्थांना माहित होतात.3) या सुसंवादाचा एक संसाधन म्हणून उपयोग करु शकतो.4)विदयार्थांना लिंग ओळखण्यात ज्या समस्या येतात ते या सुसंवादाने सोडविल्या जातात.

बहु भाषिक सुसंवाद https://youtu.be/ix5XqXBcaH8

https://youtu.be/ZTFN7ZR3zJc

प्रत्यक्ष अंमलबजावणी-

आमच्या जि.प.प्राथमिक शाळा सुंदरी येथे इयत्ता 1 ते 5 वर्ग असून 66 पटसंख्या आहे.एक मुख्याध्यापक व एक शिक्षक आहे.कोणताही कार्यक्रम,उपक्रम शाळेत घ्यायचा म्हटला तर 2 शिक्षकांची दमछाक होते.अशा परिस्थितीमध्ये गावकरी व इतर व्यक्तीची मदत घेणे आवश्यक असते म्हणूनच आम्ही माता-पालक संघ,शालेय व्यवस्थापन समिती आणि महिला समूह सहाय्यता गट यांची संघबांधणी केली.प्रतिष्ठीत नागरिक व शाळातील माजी विद्यार्थी आणि शासकीय तसेच इतर सेवेत असलेली व्यक्ती यांची मदत घेऊन शाळा परिवर्तनासाठी कार्य केले.तसेच शिक्षक व विद्यार्थी मिळून महिला सबलीकरण,पाणी अडवा पाणी जिरवा,झाडे लावा झाडे जगवा हे उपक्रम त्यांच्या बोलीभाषेत या सारख्या व नवीन ज्वलंत विषयावर पथनाटय व मुकनाटय सादर करतात.

फलनिष्पती-

‘ या कोवळया कळयांमाजी,लपले रवींद्र शिवाजी||

उमलता प्रकटतील समाजी ,शेकडो महापुरुष||’

या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अभंगास अनुसरुन विद्यार्थीरुपी कळयांमधून कौशल्यांनी नटलेल्या सर्वांगीण विकासाचे पुष्प उमलण्यासाठी शाळेत खालीलप्रमाणे शाळा व विद्यार्थी विकास मालिकेस प्रारंभ केला.1)विद्यार्थी दत्तक योजना 2)बाल सभा 3)कला दालन 4)क्षेत्र भेट,परिसर भेट 5)Guest Lecture च्या माध्यमातून परिसरातील व्यवसायिकांची ओळख करुन देणे.6)बाल आनंद मेळावा 7)क्रीडा सत्र 8)माझा वाढदिवस उपक्रम 9)दिनांक निहाय पाढा 10) स्नेहसंमेलन 11)माझी परसबाग 12) माझा वर्ग माझी जवाबदारी 13)माता पालक मेळावा. यासारख्या अनेक उपक्रमांच्या माध्यमातून शालेय ज्ञान शाळेबाहेरील जगाशी जोडणे ,घोकंपट्टीतून शिक्षणाची सोडवणूक करणे,शिक्षण पाठ्यपुस्तक केंद्रित न करता मलांच्या सर्वांगीण वाढीसाठी त्याचा उपयोग करणे,ही उदिष्टे साध्य होऊन विघार्थी अनुभव कथन व आत्मविश्वासपूर्वक सादरीकरण करु लागले.त्यांच्यातील सर्जनात्मकता वाढीस लागून मुलभूत गणितीय क्रियांचा व्यावहारिक जीवनात आत्मविश्वास व कौशल्यपूर्वक वापर करु लागली. नृत्य,गायन,नाट्यीकरण यांच्यामाध्यमातून स्वसादरीकरण करु लागल्याने शाळेविषयी अनास्था असणारे,त-हेवाईकपणा उदासीन व नकारात्मकपणे बघणारे

ग्रामस्थ कुतुहलपुर्वक जिज्ञासेने शाळेकडे पाहू लागले व शाळेविषयी आटलेल्या आपुलकीच्या झ-यातून पुन्हा पाझर फुटण्यास प्रारंभ होवून गावची शाळा,शिक्षक व विघार्थी हा समाजाच्या चर्चेचा व जिव्हाळयाचा विषय होवून शाळेच्या किर्तीचा सुगंध हळूहळू दरवळू लागला.खाजगी आणि आश्रम शाळेकडे असलेला सर्व स्तरातील पालकांचा ओढा जि.प.शाळेकडे वाहण्यास प्रारंभ झाला.शाळेचा ज्ञानवृक्ष पुन्हा नव्या जोमाने व उमेदीने बहरुन प्रगतीच्या दिशेने वाटचाल करु लागला. विद्यार्थ्यांनाही त्यांच्या भाषेत बोललेलं गाणी गोष्टी सांगितलेले अभ्यास दिलेले आवडायचे. आता विद्यार्थी अगदी आनंदाने अभ्यास करु लागले. बरेच पालक पालक शाळेत भेटी देऊन विदयार्थांच्या अभ्यासात झालेल्या बदलाबद्दल आत्मविश्वासाने बोलू लागल्याने आमचाही उत्साह द्विगुणीत झाला.सुट्या, शालेय वेळ असा कसलाही विचार न करता विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ या एकाच ध्येयाने प्रेरित होऊन आम्ही शिक्षक काम करु लागले. याची फलश्रुती म्हणजे आमच्या शाळेतील 14 विद्यार्थ्यांची एकलव्य रेसिडेन्शियला निवड झाली.

https://youtu.be/GVxtfHx8LdA

https://youtu.be/UF_RSh2a15I

<u>समारोप-</u>

विदयार्थांना प्रमाण भाषेत जर प्रश्न कळत नसेल तर विदयार्थाला त्याच्या घरी बोलल्या जाणा-या भाषेत तोच प्रश्न विचारतो.विदयार्थाला जर त्या प्रश्नाचे उत्तर मराठीत देता येत नसेल तर त्याला जी भाषा येते त्या भाषेत उत्तर देण्याची मुभा आम्ही विदयार्थाला देतो.त्यासोबतच व विदयार्थाना वादविवाद स्पर्धा,गीत गायन स्पर्धामध्ये सुध्दा विदयार्थाला आपल्या भाषेत ते व्यक्त करण्याची मुभा आम्ही देतो.वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये नृत्य व एकांकीका सादर करण्याकरिता त्यांच्या भाषेत सादर करण्यात येतात .

शेवटी असे म्हणावेसे वाटते,

‘ लावियेला दीप प्रेम, तेवता ठेवू चला |

बालकांच्या उन्नतीचा , मार्ग हा चालू चला... मंदिर घडवूया ज्ञानाचे.’

https://youtu.be/4U-_U-2Er3Q

===== @ =====

58. शाळेच्या विकासात गावाचा सहभाग

एकमेका साह्य करू , अवघे धरू सुपंथ

शाळेचे नाव : जि.प.प्रा.शाळा ,आव्हई,ता.पूर्ण,जि. परभणी

मुख्याध्यापकांचे नाव : प्रल्हाद गणपतराव कराळे

ईमेल : pkarhale85@gmail.com

व्यवस्थापन : जिल्हा परिषद



https://youtube.com/@sirjaditkar2149

प्रस्तावना :

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आव्हई या शाळेचे आजचे वैभव पाहिले तर खूप आनंद वाटतो .चार वर्षापूर्वी काम सुरु केले.अगदी रखरख वाटणारी इमारत ,रोडावलेली विद्यार्थी संख्या, गावकऱ्यांची उदासीनता यातून पुढे काम सुरु झाले. आजची स्थिती पाहिली तर सुंदर इमारत, वनराई ,खेळाचे मैदान ,वर्ग रंगरंगोटी व पटसंख्या 237 वरून 311 असा चढता आलेख. प्रत्येक कृती, नवोपक्रम याविषयी आपणासमोर मांडण्याचा प्रयत्न करत आहोत.

समस्या / आव्हान :

आव्हई गाव परभणी जिल्ह्याचे शेवटचे टोक 2500 लोकसंख्येचे समृद्ध गाव, पण शिक्षणाविषयीच्या अनास्थेमुळे शालेय गुणवत्ता व विद्यार्थी पटसंख्या कमी होत गेलेली दिसून आली. 2018 या वर्षात आम्ही 09 शिक्षक बदलीने शाळेत रुजू झाल्यानंतर सर्व गावकऱ्यांना विश्वासात घेऊन शाळेची गुणवत्ता वाढीसाठी गावाच्या लोकसहभागातून भौतिक सुविधा व विद्यार्थी संख्या वाढ कशाप्रकारे होऊ शकतील याविषयी चर्चा करून पुढील पाऊल टाकण्यात आले.

नियोजन व अंमलबजावणी :

लोकसहभाग मिळविण्यासाठी गावस्तरावर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यामध्ये ग्रामसभा ,smc बैठक,पालक मेळावा ,महिला मेळावा यातून शाळेला आजपर्यंत वस्तू आणि नगदी रक्कम रु. 700000 एवढी मदत झाली. 600 फुटांचे जाळीदार तारेचे कुंपण, भव्य प्रवेशद्वार , रंगमंच , शालेय बाग , इमारत व वर्ग रंगरंगोटी , वृक्षारोपण , ग्रीनशेड , क्रीडांगण व खेळ साहित्य , वाचनालय , सौरऊर्जेचा वापर , RO water फिल्टर , 100% वर्ग digital (06 LCD TV तसेच 03 projector etc) इ. ग्रामस्थ व ग्रामपंचायत यांच्या मदतीने शाळेच्या 100% भौतिक गरजा पूर्ण करण्यात आलेल्या आहेत.

भौतिक गरजांबरोबर विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम राबविण्यात आले . यामध्ये 35 अभ्यासगट ,पाढे पाठांतर ,हस्ताक्षर सुधारणा ,गणिती मुलभूत क्रिया ,प्रकट वाचन ,श्रुत लेखन ,स्पर्धा परीक्षा आयोजन या सर्व उपक्रमाचा परिणाम विद्यार्थी गुणवत्ता वाढीवर दिसून आला. त्यामुळे गावकऱ्यांना शाळेविषयी आस्था निर्माण झाली.

विद्यार्थी विकासात शालेय व्यवस्थापन समितीचा सहभाग :

शालेय शिक्षण पद्धतीमध्ये काळानुसार बदल होतो या प्रणालीशी निगडित असलेले घटक म्हणजे विद्यार्थी शिक्षक व पालक हे घटक आहेत त्याचबरोबर आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे शालेय व्यवस्थापन समिती हा आहे. शालेय व्यवस्थापन समितीमध्ये देखील काळानुसार बदल होणे आवश्यक आहे. ज्या शालेय समित्या काळानुसार बदलल्या. काळानुसार कार्य केले त्या शाळेचा विकास होत असतो.

वैशिष्ट्य पूर्ण केलेली कामे :

1)आर्थिक वर्ष संपण्याच्या किमान तीन महिने अगोदर शालेय विकास आराखडा तयार करून त्याची शिफारस करतात.

2)शाळाबाह्य व दिव्यांग बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व शाळेत टिकवून ठेवण्यासाठी समिती प्रयत्न करते.

3) आपण बालकांच्या घरी जाऊन शिक्षक व समिती यांच्या सहकार्यातून दिव्यांग बालकांना शाळेत प्रवेश दिला जातो.

4) शालेय व्यवस्थापन समितीच्या सहकार्यातून कमी गती असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एक वर्ग तयार करून स्वयंसेविकेची नेमणूक केलेली आहे. त्यांचे मानधन शाळा व्यवस्थापन समिती सदस्य करतात.

5) शाळा व्यवस्थापन समिती शाळा सुटल्यानंतर शाळेत असलेल्या सुंदर बागेची व शाळेची राखण संरक्षण करते.

6)शाळेतील विद्यार्थ्यांची एकूण 35 अभ्यास गट तयार करण्यात आलेले आहेत . हे 35 अभ्यास गट शालेय व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्यांनी आपापसात विभागून घेतले आहेत. समितीचे सर्व सदस्य या अभ्यासक्रमावर नियंत्रण ठेवतात.

7)उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आमची शालेय व्यवस्थापन समिती दरवर्षी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा / मुख्याध्यापक यांचा सन्मान करते.

8)शालेय गुणवत्ता व विकासामध्ये येणाऱ्या अडचणीचे निरसन शालेय व्यवस्थापन समितीकडून करण्यात येते तसेच दर तीन महिन्यांनी प्रत्येक वर्गाची समिती सदस्याच्या उपस्थितीत चाचणी घेण्यात येते. गुणवत्ता वाढीसाठी समिती नेहमीच सहकार्य करते.



शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांशी चर्चा करताना



विद्यार्थी विकासात पालकांचा सहभाग

शाळेचे वेगळेपण :-

1)विद्यार्थी विकासात पालक सहभाग

विद्यार्थी विकास साध्य करण्यासाठी आम्ही मकर संक्रांतीनिमित्त हळदी-कुंकू या कार्यक्रमाचे आयोजन केले यात वान म्हणून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. आतापर्यंतच्या अनुभवानुसार पुरुष पालकापेक्षा महिला पालक या

विद्यार्थ्यांच्या अभ्यासात महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात . म्हणून महिला मेळावा हा आमच्या शाळेच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये मैलाचा दगड ठरला.

2) **अभ्यास मित्र** :-

यानंतर आम्ही अभ्यास मित्र ही संकल्पना राबवली . यात हुशार मुलाच्या घराजवळील चार-पाच मुले घेऊन त्याचा अभ्यास घ्यावा यासाठी दररोज एक एका पालकाने मदतनिसाची भूमिका पार पाडावी . याचा खूप चांगला परिणाम पाहावयास मिळाला. यामुळे आपला गट पुढे राहावा म्हणून मुलांनी अधिक गतीने अभ्यास केला . म्हणून एक स्पर्धा निर्माण झाली आणि त्याचे सकारात्मक परिणाम जाणवले.

3) **भोंगा शाळा** :-

तसेच कोरोना कालावधीत पालकांच्या मदतीने भोंगा शाळा चालवण्यात आली. यामध्ये पालक आणि मंदिरावरील भोंग्यावरून कविता ,पाढे ,इंग्लिश शब्द असे कार्यक्रम मुलांना ऐकविले . त्यामुळे विद्यार्थी अभ्यासाच्या प्रवाहात टिकून राहिले.

4)**गल्ली फलक** :-

यानंतर आम्ही पालकाच्या मदतीने कोरोना कालावधीत गावात 35 फलक तयार केले यात शिक्षकांनी पालकांना गृहपाठ पाठवायचे, पालकांनी त्या फलकावर तो अभ्यास देऊन त्या फलकाजवळील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मदत केली.

5)**वर्गनिहाय पालक सभा** :-

मोठ्या मेळाव्यापेक्षा लहान गटांनी केलेल्या कार्याची परिणाम मुक्ता जास्त असते. म्हणून आम्ही प्रत्येक गटाची स्वतंत्र पालक सभा यात वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना देखील सहभागी करून घेतले . यामध्ये विद्यार्थी व पालक समोरासमोर आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात आल्या. त्यानंतर आम्ही प्रत्येक विषय शिक्षकांना देखील या सहभागी करून घेतले . त्यामुळे विद्यार्थी कोणत्या विषयात किंवा कोणत्या भागात मागे का आहेत या कारणांचा शोध घेतला . त्यानुसार पालकांना अभ्यास कसा घ्यावा, विद्यार्थ्यांना कोणकोणत्या वातावरणाची आवश्यकता असते याची सविस्तर माहिती देण्यात आली.

6)**स्टडी टाईम** :-

या वर्गनिहाय पालक सभेत घरातील टीव्ही एकाच वेळी बंद केल्यास कसा फायदा होतो याचे महत्त्व सांगण्यात आले. पालक सभेत सर्व पालकांनी संकल्प केला की ,गावातील सर्व टी.व्ही. रात्री सात ते नऊ या वेळेत बंद ठेवण्यात यावेत . त्यामुळे गावातील सर्व विद्यार्थ्यांनी एकाच वेळी म्हणजे रात्री सात ते नऊ या वेळेत अर्थात स्टडी टाईममध्ये अभ्यासाला बसतील. या बाबीचा खूप मोठ्या प्रमाणात फायदा शाळेला झाला . शिवाय विद्यार्थ्यांचा स्क्रीन टाईम देखील कमी करण्यात आला. म्हणून डोळ्याच्या समस्या कमी झाल्या.

7)**अभ्यासगट निर्मिती** :-

विद्यार्थ्यांनी सामूहिक अभ्यास करावा याकरिता इयत्ता सातवी मधील विद्यार्थ्यांच्या घराजवळील सात ते दहा विद्यार्थ्यांचा एक अभ्यासगट तयार करण्यात आला. यामध्ये सर्व वर्गातील मुले सहभागी झाले . या गटाचे नेतृत्व इयत्ता सातवी मधील विद्यार्थ्याकडे देण्यात आले. असे एकूण 35 अभ्यासगट तयार केले. गटातील विद्यार्थ्यांनी दररोज ठरवलेल्या ठिकाणी जमावे व सर्वांनी अभ्यास करावा. यात ज्या विद्यार्थ्यांना अभ्यासात अडचणी, तसेच गटनायकाकडे दररोजची उपस्थिती पाहण्यासाठी उपस्थिती पट देण्यात आले. तसेच गटनायकाने आपल्या गटाची उपस्थिती अनुपस्थिती दररोज फोनवरून आपल्या गटाच्या नियंत्रक शिक्षकांना कळवावी.

गटातील विद्यार्थ्यांच्या पालकापैकी दररोज एका पालकांनी गटांमध्ये बसून नियंत्रण ठेवले तसेच आठवड्यातून एक वेळा दोन वेळा नियंत्रण करणारे मुख्याध्यापक व शिक्षक गटाला आवर्जून भेट देतात ,त्यामुळे अभ्यास गटातील विद्यार्थ्यांना येणाऱ्या अभ्यासातील अडचणी लगेच सोडवण्यात येतात . त्याचा फायदा शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी मोठ्या प्रमाणात झाला.





अभ्यास गटात विद्यार्थी अभ्यास करताना

8)बालमित्र पुस्तकालय :-

वाचनाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी म्हणून आमच्या शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री कराळे सर यांनी बालमित्र पुस्तकालय सुरू केले. या पुस्तकालयात विहित गोष्टीची प्राण्यांची थोर महापुरुष विज्ञान विषयावर आधारित पुस्तके आहेत. इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत आठवड्याचे दिवस ठरल्याप्रमाणे पुस्तक दिली जातात. या पुस्तकाला याची वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण वाचनालयाचे नियोजन इयत्ता सातवीची विद्यार्थिनी कुमारी श्रद्धा बुचाले ही करत असते . वाचनालय नोंदवही ठेवणे, वाचनालयाची निगा राखणे ,मुलांना पुस्तक देणे तसेच परत घेणे हे संपूर्ण कार्य ती विद्यार्थिनी करत असते. बालमित्र पुस्तकालय यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली तसेच पालक वर्गांना सुद्धा वाचनाची इच्छा जागृत झाली.

9)**इंग्रजीतून परिपाठ** :-

विद्यार्थ्यांना इंग्रजीत विषयात गोडी निर्माण व्हावी आठवड्यातून दोन दिवस इंग्रजीतून परिपाठ घेण्यात येतो. परिपाठाचे सर्व सूत्रसंचालन विद्यार्थीच करतात. त्यांना दमहे मॅडम व व श्री. पिसाळ सर मदत करतात. यातून विद्यार्थ्यांना इंग्रजीतून बोलण्याचं धाडस निर्माण झाले इंग्रजीची भीती नाहीशी झाली

10)**प्रत्येक विद्यार्थ्याची इंग्रजी डिक्शनरी** :-

प्रत्येक वर्गशिक्षक आपापल्या वर्गात, दररोज वेगवेगळ्या घटकावर किमान पाच शब्द देतात व ते विद्यार्थी वहीत लिहून घेतात. सरासरी महिन्यात 25 दिवस कार्यदिन येतात. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याजवळ महिन्याच्या शेवटी. जवळपास 125 नवीन शब्दाचा साठा निर्माण होतो. व प्रत्येक महिन्यात जवळपास 125 ते 130 शब्दाची त्यात भर पडते व अशाप्रकारे प्रत्येक विद्यार्थ्यांची एक इंग्रजी डिक्शनरी निर्माण झालेली आहे.

11)**विज्ञान जत्रा** :-

विद्यार्थ्यांना आनंद मिळावा, वैज्ञानिक दृष्टीकोन रुजावा यासाठी शाळेमध्ये विज्ञान जत्रा आयोजित केली जाते. या जत्रेमध्ये इयत्ता पहिली ते इयत्ता सातवीचे विद्यार्थी सहभागी घेतात. विविध प्रयोग सादर करतात . विद्यार्थ्यांचे नंबर काढून त्यांना प्रोत्साहन म्हणून बक्षीस दिले जातात.

12)स्वच्छ व सुंदर शाळा

उंच आणि शाळेचे नाव लिहिलेले कमान आज प्रवेश करताना मनाला मोहित करते. आतमध्ये सगळीकडे स्वच्छता दिसून येते. शाळेच्या सर्व बाजूंनी आकार दिलेली बाड, विविध प्रकारची झाडे, कुठेही कचरा नसलेले सुंदर मैदान, परिपाठासाठी तयार केलेले 40 बाय 50 चे ग्रीन शेड उभे आहे. प्रत्येक वर्गात कचराकुंड्या ठेवलेल्या असून आरसा ,कंगवा तसेच नखे कापण्यासाठी नेल कटर लावलेले दिसून येते. मुलांच्या वैयक्तिक स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जाते. दर बुधवारी वैयक्तिक स्वच्छता तपासणी होते.



RO Water Filter



शालेय बाग

एकंदरीत दोन ते अडीच लाख रुपये खर्चून शाळेची रंगरंगोटी केलेली जिल्ह्यातील एक सुंदर अशी आमची शाळा आहे. म्हणून सन 2020-21 च्या जिल्ह्यातील स्वच्छ आणि सुंदर शाळा हा पुरस्कार आमच्या शाळेस मिळाला आहे. आमच्या शाळेच्या शैक्षणिक कार्याची नोंद जिल्हास्तरावर घेण्यात आली.सन 2019-20 , 2020-21 , 2021-22 या सलग तीन वर्षात आदर्श शाळा व स्वच्छ सुंदर शाळा पुरस्कार देण्यात आला.


जिल्हा परिषद, परभणी

प्रशस्तीपत्र

दिनांक २६ ऑक्टोबर २०२१

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आव्हई तालुका पूर्णा या शाळेने सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात उत्कृष्ट कार्य केल्यामुळे जिल्हा परिषद परभणीचा वतीने जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार देवून गौरविण्यात येत आहे. शाळेस पुढील कार्यास शुभेच्छा ...!

श्री. निवानंद टाकसाळे (भा.प्र.से.)
मुख्य कार्य अधिकारी, जिल्हा परिषद परभणी

श्रीमती निर्मलाताई उत्तमराव गवळी (चिंदेकर)
अध्यक्षा, जिल्हा परिषद परभणी

सौ.अंजलीताई गंगाप्रसाद आलेराव
सभापती-शिक्षण,क्रीडा व आरोग्य समिती, जि.प.परभणी

श्री.पंकज सिंदराव पोले
शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.परभणी



प्रशस्तीपत्र

समारोप :-

मागील चार वर्षापासून गावकरी ,ग्रामपंचायत यांच्या सहकार्याने आव्हई शाळेची भौतिक सुविधा वाढ ,विद्यार्थी गुणवत्ता वाढ झाल्यामुळे केवळ गावस्तरावर आव्हई शाळा आदर्श न राहता केंद्रस्तर ,तालुकास्तर ,जिल्हास्तर या विविध स्तरावरील आदर्श शाळा कशी असावी याचे उदाहरण म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आव्हई.

या सर्व बदलाचा आम्हा सर्व शिक्षक ,ग्रामस्थ सर्वांना आनंद वाटतो .

===== @ =====

59. लोकसहभाग व विविध उपक्रमातून गुणवत्ता विकास

शाळेचे नाव : जि.प.प्राथमिक व माध्यमिक (स्वयं-अर्थसहाय्यीत) शाळा, इरळद ता.मानवत जि.परभणी
मुख्याध्यापक : श्री.दिगांबर एकनाथराव भिसे
ई मेल : zschoolirlad@gmail.com



प्रस्तावना :

मानवत तालुक्यातील दुधना नदीच्या काठावर वसलेल्या इरळद गावात गुणवत्ता, लोकसहभाग व सातत्यपूर्ण शिस्त या त्रिसूत्रीच्या आधारे आंतरराष्ट्रीय दर्जा लाभलेली शाळा उभारली आहे.

गुणवत्तेचा इरळद पॅटर्न:

शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून अखंडितपणे जवाहर नवोदय विद्यालय प्रवेशपात्र तथा शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी घडवणारी जिल्ह्यातील एकमेव शाळा ठरावी असे सातत्य राखण्याचा, स्पर्धा परीक्षा तयारीचा इरळद पॅटर्न संपूर्ण परभणी जिल्ह्यात आदर्श ठरला आहे. तेव्हापासून या शाळेने कोणत्याही खाजगी शिकवणीशिवाय अव्याहत ३६५ दिवसांच्या नियोजनबद्ध तयारीसह २७ विद्यार्थी नवोदय विद्यालयात प्रवेशपात्र झाले तर ७९ विद्यार्थी शासकीय शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. सोबतच शाळेचे मुख्याध्यापक श्री. दिगंबर भिसे सरांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण वर्गात गुणवत्तेची चळवळ वर्षभर अखंडित राहिल्यामुळे श्रेया, RTSE, MTS,MANTHAN HOMI BHABHA ,OLYMPIYAD परीक्षामध्येही इरळद शाळेच्या विद्यार्थ्यानी प्रथम, द्वितीय क्रमांकासह राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे.

आदर्श अव्याहत लोकसहभाग :

लोकसहभागाची पाळेमुळे विश्वासात दडलेली असतात. शाळेबद्दलचा लोक माणसातील विश्वास विद्यार्थाच्या गुणवत्तेत दडलेला असतो. म्हणूनच १४ वर्षापूर्वी सुरु झालेल्या नवोदय विद्यालय प्रवेश तयारीचा इरळद पॅटर्न सलग यशस्वी ठरला. त्यामुळे लोकांचा शाळेवरील विश्वास वृद्धींगत झाला. इरळद गावात तीन ठिकाणी विखुरलेल्या जीर्ण इमारतीतील शाळेत१ ते ७ वर्ग भरवले जायचे. गावातील प्रत्येक खाजगी सार्वजनिक कार्यक्रम शाळेच्या छोटेखानी मैदानातच पार पाडला जायचा. त्यामुळे वर्षातील अनेक दिवस शाळा सुरु असूनही विद्यार्थाचे शैक्षणिक नुकसान व्हायचे. शाळेच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास असण्याऱ्या शिक्षकांनी २०११ साली २६ जानेवारी ला लोकांसमोर शाळेसाठी १ एक्कर जमीन खरेदीचा प्रस्ताव मांडला. विश्वास व गुणवत्तेची शिदोरी फळाला आली आणि पाहता पाहता १० लक्ष रु. लोकवर्गणी जमा झाली.

लोक सहभागातून उभारलेल्या नव्या जागेत आज सर्वांग सुंदर शाळा उभी आहे. शाळेच्या भौतिक वैभवात वैशिष्ट्यपूर्ण रेखिवता व सौदर्य निर्मितीसाठी येथील ग्रामस्थांनी अव्याहतपणे दरवर्षी मोलाचा वाटा उचलला आहे तो आजही सुरुच आहे.

चालू वर्ष अखेर पर्यंत इरळदचा आदर्श लोकसहभाग सुमारे **45 लक्ष** रुपयांचा आहे.

लोकसहकार्यातूनच सुसज्ज डिजिटल वर्गखोल्या, संगणककक्ष, विज्ञान प्रयोगशाळा, वर्ग तेथे ग्रंथालय, सुंदर बाग बगीचे, सुसज्ज शौचालय तथा हॅण्डवॉशस्टेशन, शुद्धROफिल्टर, पाणी पुरवठा, भव्य सुसज्ज क्रीडांगण, जिजाऊ सांस्कृतिक सभागृह, वर्ग तेथे चप्पल स्टॅन्ड, सर्वांग सुंदर विद्यार्थी तथा शिक्षक गणवेश, अत्याधुनिक सुविधासह शाळा कार्यालय, डौलदार रस्ता उभारणी आणि दिमाखदार शाळा परिसर या सर्व स्वप्नवत बाबी आदर्श,अव्याहत लोकसहभागातून घडल्या व घडत आहेत.

इरळद शाळेची ऐतिहासिक मुलतत्वे :

१. **शालेय व्यवस्थापन समिती निवड बिनविरोध** :

शालेय व्यवस्थापन समिती निवड सलग आठ वर्षे एकाच अध्यक्षावर विश्वास, वर्ष २०११ ते २०१८ पर्यंत श्री भारतराव बारहाते यांना अध्यक्षपदी कार्यकरण्याची संधी दिल्याने ते विश्वासपात्र व राजकारण निरपेक्ष काम करू शकले.आजपावेतो तीच परंपरा कायम आहे.

२ **'जिथे प्रशासन कमी तिथे आम्ही ' सूत्राचा अवलंब** :

कालानुरून तत्कालीन गरजांची पूर्तता करण्यासाठी शासन अथवा प्रशासकीय मदत, अपुरी ठरण्याची शक्यता येथील सुजाण नागरिकांनी फेटाळत सदैव तन – मन– धन अर्पण करीत शाळा विकासाचा संकल्प जागता ठेवला आहे.

३. **स्वयं शिस्त व स्वयं अध्ययनाचा आदर्श पायंडा** :

शैक्षणिक संस्काराराठी स्वयं अध्ययनाचा अंगीकार करीत रात्र अभ्यासगट, शाळा व्यवस्थापन समितीच्या संनियंत्रणाखाली१२ डिसेंबर २०१७ पासून सुरु आहेत.

सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी मूल्यसंस्कार पद्धतीचा अवलंब शाळेने केला त्यामुळेच येथील विद्यार्थी गुणवत्तेसह आचरणश्रेष्ठ श्रेणीत गणले जातात.

४. **आंतरराष्ट्रीय शिक्षण विचार अभ्यास पद्धतीचा अवलंब** :

इरळद शाळेतील विद्यार्थी आंतरराष्ट्रीय शिक्षण विचार पद्धतीनुसार सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची समान संधी मिळवून देतात . गट पद्धतीचा अवलंब करीत विद्यार्थी विषयमित्र जबाबदार सहकार्य करतात . या पद्धतीमुळे निर्धारित पाठ्यक्रम १/३ वेळेत पूर्ण करून उर्वरित वेळेत स्पर्धा परीक्षा तयारी करतात तसेच इतर उपक्रम सक्रियतेने पार पाडतात.

५. **मुलींच्या शिक्षणाचे शिवधनुष्य** :

शाळेत आठवीनंतर पुढील शिक्षणाची सोय नसल्यामुळे ४०% मुली तर२५% मुले शाळा सोडून देत असत. यावर इरळद ग्रामस्थांनी जिल्हा परिषद, विभागीय शिक्षण उपसंचालक ते शिक्षण मंत्रालय असा संघर्षाचा दोन वर्ष खडतर प्रवास करून महाराष्ट्र शासनास स्वयंअर्थसहाय्यित इयता ९ वी व१० वी वर्ग मान्यतेचा शासन निर्णय केवळ इरळद शाळेसाठी घेण्यास तयार व्हावे लागले . आज नियोजनबद्ध पद्धतीने येथील पालक व शालेय व्यवस्थापन समिती इरळद यांच्या अर्थबळावर ९वी आणि १० वी चे वर्ग स्वबळावर मागील चार वर्षापासून चालत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये पटसंख्या ९५ अशी लक्षणीय वाढली आहे.

लॉकडाऊन काळात दहा लाखाची जमीन खरेदी :

कोरोना काळात शिक्षण प्रकिया अभ्यासगटाद्वारे प्रत्यक्ष चालू ठेवत शाळा व समाज यांच्या संयोजनासह इरळद येथे लॉकडाऊन कालखंडात दोन वर्षात पाच लाख प्रमाणे एकूण दहा लाख रुपयांचा लोकसहभाग जमा झाला त्यातून शाळेलगत आठ गुंठे जमीन . खरेदी करत शाळेच्या वैभवात भर घातली.

१) Every Satruday Noदप्तर Day :

जुलै २०१७ पासून दर शनिवारी Every Satruday No दप्तर Day चे आयोजन शाळेत नियमितपणे केले जाते.त्याअंतर्गत शालेय व सहशालेय विषय जसे English Fair , गणित जत्रा ,विज्ञान जत्रा, भाषा जत्रा ,कला स्पेशल, Sports day , विविध गुणदर्शन ,Bbusiness day , Market day , इ. त्यामध्ये अध्ययन निष्पत्तीनिहाय अनौपचारिक उपक्रमांचे सलग चार तास आयोजन असते.विद्यार्थी अगदी आनंदाने व उत्साहाने सहभागी होतात.





Every Satruday No दप्तर Day *रात्र अभ्यासगटास दिल्ली येथील पथकाची भेट.*

२) **रात्र-अभ्यासगट : शाळेनंतरच्या अभ्यासाची सोय**

१२ डिसेंबर २०१७ पासून शाळेतील प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या घराजवळ सोयीनुसार विद्यार्थी गटांमध्ये विभागण्यात आले आहे. विभिन्न इयत्तेचे ५ ते ८ विद्यार्थी दररोज सायंकाळी ६ ते ९ या वेळेत सलग तीन तास दररोज एका ठिकाणी अभ्यासास बसतात.या गटाचा एक प्रमुख मेन्टोर विद्यार्थी तर निरीक्षक /नियंत्रक म्हणून पालक अथवा मातापालक तथा शालेय व्यवस्थापन समितीवर जबाबदारी निश्चित केली आहे.दरम्यान गावातील सर्व TV यावेळी बंद असतात. या उपक्रमामुळे विद्यार्थांच्या व पालकांच्या अभ्यासासंबधी येणाऱ्या तक्रारी आपोआप कमी झाल्या .

३) **Activity Based Learning (ABL) उपक्रम राबवणारी जिल्ह्यातील पहिली शाळा:**

इयत्ता पहिली ते चौथी करिता कृतीयुक्त अध्ययन पद्धती (ABL) ज्यामध्ये स्वयं –अध्ययन काड्र्स तथा ' करके देखो ,गहरा सोचो ' या ज्ञान रचनावादी अध्ययन पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

४) **पंचक्रोशीतील गावांसाठी वरदान** : जि.प.प्राथमिक व माध्यमिक शाळा इरळद

शाळेतील गुणवत्ता व शिस्त तथा मुलभूत भौतिक सुविधा यांच्या समृद्धीमुळे इरळद गावातील २४१ विद्यार्थी व आजूबाजूच्या दहा गावातील २८३ विद्यार्थी यांच्यासाठी व पालकांसाठी इरळद शाळा जणू वरदानच ठरली असून इ.६ वी ते १० वी सेमी माध्यमासह शाळेची पटसंख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.

५) **मिशन इंग्लिश स्पिकिंग इरळद: इंग्रजी बोलण्याचा सोपा इरळद पॅटर्न**

इंग्लिश स्पिकिंगचा छत्तीसगढ ONLINE क्लास पॅटर्न इरळद शाळेतील अनुभवी शिक्षक उमाकांत हाडूळे यांनी तेथील अनुभवासह इरळद शाळेत राबवला . दीड वर्षात तयार झालेले आत्मविश्वासू ३० विद्यार्थी इरळद शाळेसह मानवत तालुक्याच्या सर्व ७१ शाळांमधील ४५० विद्यार्थांना online English speaking class द्वारे वर्षभर यशस्वी धडे दिले.

६) **पायलटिंग ऑफ इंग्लिश स्पिकिंग :**

मिशन इंग्लिश स्पिकिंग सलग दोन वर्ष यशस्वी झाल्यानंतर ज्यात १७५ विद्यार्थी सहजपणे इंग्रजी आकलन व संभाषण करू लागले आहेत.यावर्षी १५० विद्यार्थ्यांना यात समाविष्ट करून घेण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक दिगंबर भिसे सर ,अनुभवी आदर्श शिक्षक प्रकाश मोहकरे ,आदर्श शिक्षिका रोहिणी खोंडे यांच्या सहकार्याने भाषा विषय शिक्षक श्री.उमाकांत हाडूळे यांच्या संयोजनातून स्तरनिहाय पाच ग्रूपद्वारे (superstars ,stars ,champions , and learners 1 &2) दररोज सकाळी ६ ते ७.३० दरम्यान Online Google meeting द्वारे English Speaking Classes नियमित सुरु आहेत .

७).**समाजाला दिशादर्शक 'वार्षिक इरळद फेस्टिवल** ' :

दरवर्षी शाळेत होणाऱ्या वार्षिक 'इरळद फेस्टिवलमधून' व्यसनमुक्ती , अंधश्रद्धा निर्मुलन ,स्त्री-पुरुष समानता इ. सुधारणांसह दिशा देणारे काम सातत्याने होत आहे.


पुढारी

जि. प. शाळेचा इरळद फेस्टिव्हल उत्साहात

उत्स्फूर्त प्रतिसाद; दोन लाख रुपयांपेक्षा अधिक बक्षिसे मिळाली



***इरळद शाळेची आभूषणे व पुरस्कार** :

१) शाळेचे मुख्याध्यापक श्री.दिगांबर भिसे यांना सन.२०१८ मध्ये जि.प.परभणीचा आदर्श शिक्षक पुरस्कार.

२) शाळेचे आदर्श शिक्षक श्री.प्रकाश मोहकरे यांना सन.२०१४ मध्ये जि.प.परभणीचा आदर्श शिक्षक पुरस्कार.

३) २०१५-१६ चा जि.प. परभणीतर्फे शाळेला प्रथम क्रमांकाचा आदर्श शाळा पुरस्कार.

४) सर्वोच्चभूषण: ०८मार्च २०१९ रोजी जि. प. प्रा. इरळद शाळेलामहाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ अर्थात MIEB बोर्डाची संलग्नता प्राप्त झाली. शाळेला भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा इरळद असा बहुमान प्राप्त झाला .महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय (MIEB) शाळा संलग्नता प्रमाणपत्र मा.राज्यपाल महाराष्ट्र राज्य व मा.शालेय शिक्षणमंत्री यांच्या हस्ते मुख्याध्यापक श्री.प्रकाश मोहकरे यांना प्रदान करण्यात आले .

५) जि.प.परभणीचा उत्कृष्ट विद्यालय पुरस्कार विभागीय आयुक्त मा. सुनील केंद्रेकर साहेब यांच्या हस्ते २०२०मध्ये शाळेला प्राप्त.

६) मा.शिक्षण सचिव मा.नंदकुमार साहेब यांची २०२० मध्ये इरळद शाळेला ग्रेटभेट





संलग्नता प्रमाणपत्र मा. राज्यपाल महाराष्ट्र यांच्या हस्ते *मा.नंदकुमार साहेबांची इरळद शाळेला भेट .*

.



स्वच्छ विद्यालय पुरस्कार स्वीकारताना SMC अध्यक्ष व इतर

७) डाएट परभणीचा पदवीधर शिक्षक श्री.उमाकांत हाडूळे यांना नवोपक्रम विजेता { चतुर्थ } सन्मान

८) २०२१-२२ जि.प.परभणीचा २०२१-२२ स्वच्छ विद्यालय पुरस्कार शाळेला प्राप्त.

९) श्री.उमाकांत हाडुळे यांना डाएट परभणी मार्फत विद्या प्राधीकरण औरंगाबादचा उत्कृष्ट TAG-CO-ORDINATOR सन्मान .

१०) उत्कृष्ट इंग्लिश स्पिकिंग ऑनलाइन क्लास मेंटोर शिक्षक बेमेतरा (छत्तीसगड) सन्मानप्राथमिक पदवीधर शिक्षक श्री.उमाकांत हाडूळे यांना देण्यात आला २०२१.

११) शिक्षण विभाग मानवत यांच्या वतीने संपूर्ण मानवत तालुक्यात २०२१-२२ मध्ये राबवलेल्या MISSION ENGLISH SPEAKING च्या यशस्वी संचालनासाठी श्री.उमाकांत हाडूळे यांना BRC मानवत वतीने उत्कृष्ट शिक्षक सन्मान (मार्च २०२२)

इरळद शाळेची भूषणे /यशस्विता :

१) मागील १४ वर्षातील नवोदय विद्यालय प्रवेश पात्र २७ विद्यार्थी .
२) मागील दहा वर्षातील विविध शासकीय स्पर्धा परीक्षांमधील NMMS वी ८व वी ५)व शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी ७९ (. शिष्यवृत्तीधारक
३) विज्ञान इन्स्पायर अवार्ड उपक्रमात श्रीमती छाया पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मागील तीन वर्षापासून नियमित सहभाग व प्रात्यक्षिक सादरीकरण.
४) शाळेला भेट वस्तू स्वरूपात xerox, फ्रीज ,संगणक संच , टिव्ही संच LEDप्रिंटर पाण्याच्या , टाकी,पंखे ,ऑफिस टेबल , वाचनालयासाठी ग्रंथसंचस्वरूपातील वस्तू शाळेचे .इ stand चप्पल,कपाट , आजी माजी शिक्षक व पालक यांनी भेट दिल्या आहेत .

५) शाळेतील श्रीमती रोहिणी खोंडे या शिक्षिका दरवर्षी शाळेला त्यांच्या वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त शाळेला मागील सात वर्षापासून प्रतिवर्ष भेटवस्तू देतात.

६) मागील वर्षीच्या इरळद फेस्टिवलमधून मुलींच्या शिक्षणाला प्रेरणा देण्याच्या उद्देशाने वाडीवस्तीवरील शेतमजुरांच्या मुला - यासोबतच शाळेला .रिक्षा शाळेला भेट दिली-बबनराव देशमुख यांनी एक ई .जा करण्यासाठी ग्रामस्थ श्री-मुलींना शाळेत ये बक्षीसरुपात दोन लक्ष सतरा हजार रुपये मिळाले .



बाहेरगावातील शिक्षण घेणारे विद्यार्थी



जवाहर नवोदय व शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी

समारोप :

मागील १० ते१२ वर्षापासून अपरिमित संघार्षासह इरळद गावातील जनमानसाला शाळा विकासाच्या दिव्य स्वप्नाचे सारथी बनवून विखुरलेल्या शाळेला एक संघ बांधणीचा कार्यक्रम नियोजनपूर्वक राबवला गेला. ग्रामीण भागात'यथा शाळा तथा जन 'या उक्तीला साकारताना इरळद पॅटर्नची गुंफण जिद्द, चिकाटी व आत्मविश्वास सोबतच ध्यासपूर्ण कृतीची जोड देऊन करण्यात आली आहे.सर्वार्थाने शाळेतील गुणी शिक्षकवृंद,कार्यशील शालेय व्यवस्थापन समिती, ,जागरूक पालक,नेहमीच सहकार्यवृत्ती दाखवणारे युवक व सरपंच तसेच ग्राम पंचायत इरळद यांचे सदैव सहकार्य इरळद शाळेची यशोगाथा अद्वितीय, अतुलनीय साकारण्यास साध्य ठरला. "अस्सल गुणवत्ता, अव्याहत लोकसहभाग आणि काळानुरून कृतीकार्यक्रम अंमलबजावणी" या त्रिसूत्री आधारे इरळद शाळासर्वांग सुंदर तर आहेच पण जाहिरातीचा बागुलबुवा आणि सेमी / इंग्रजी माध्यमाचे आकर्षण दूर सारून इरळदच्या मराठी शाळेचे पाऊलसदैव पुढे असते हे दीर्घकाळापासून सातत्याने दाखवून दिले आहे. कारण या इरळद शाळेची यशोगाथाच सत्य सिद्धांतावर अन कर्म सिद्धांतावर विश्वास ठेवणारी आहे.

===== @ =====

60. लोकसहभागातून मुलींचे गुणवत्तापूर्ण शिक्षण

शाळेचे नाव : कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय,बिलोली ता.बिलोली,जि.नांदेड

ई मेल आयडी : kgbvbiloli123@gmail.com

मुख्याध्यापकांचे पूर्ण नाव: सौ.सावळे गजरा रतनराव

शाळेचे व्यवस्थापन : जिल्हा परिषद



प्रस्तावना :

सुरक्षित मुली, सशक्त मुली, सबल मुली ही काळाची न्यायोचित आणि कालोचित मागणी आहे हे त्रिवार सत्य आहे. परंतु आजही समाजात "मुलगी हे परक्याचे धन, मुलीला शिकवून काय करायचे." हा विचार प्रभावी आहे. नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावर मुलींच्या गळतीचे प्रमाण 45 % आहे. मुलींचे शिक्षणातील गळतीचे कारण प्रामुख्याने दारीद्र्य रेषेखालील पालक, स्थलांतरीत पालक, बालविवाह ,मुलींची शिक्षणातील अरुची ही आहेत. अशा आर्थिक दुर्बल घटकातील मुलींच्या शिक्षणाकरीता कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांची स्थापना केली आहे. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ,बिलोली येथे 150 मुली निवासी स्वरुपाचे शिक्षण घेत आहेत. विद्यार्थीनीना शिक्षणांच्या प्रवाहत टिकवून ठेवण्यासाठी शासन स्तरावर निधी उपलब्ध होतो. सामाजिक बांधिलकी म्हणून समाजातील प्रतिष्ठीत दानशूर व्यक्तीनी मुलींच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी लोकसहभाग उपलब्ध करुन देणे हे ही तितकेच महत्वाचे आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे अंतिम उद्दिष्ट भारताला जागतिक ज्ञान-महासत्ता बनविणे या अनुषंगाने 2030 पर्यत शालेय शिक्षणात 100% सकल नोंदणी गुणोत्तर (GER) सह माध्यमिक स्तरांपर्यत गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे गरजेचे आहे. माझी शाळा फक्त शाळा न राहता "उत्कृष्ट अध्ययन केंद्र " म्हणून विकसित झाली पाहिजे. हा संदेश SLDP या प्राशिक्षणातून मी प्राप्त केला आहे. त्याअनुषंगाने विद्यालयातील सर्व विद्यार्थीनीना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देणे, शिक्षणाच्या प्रवाहत टिकवून ठेवणे, विद्यार्थीनीच्या मनात शैक्षणिक गोडी वाढवून शाळेची गुणवत्ता वाढविणे यासाठी काही प्रयत्न केले.

आव्हाने :

1. सर्व विद्यार्थीनीची शैक्षणिक गोडी वाढवून शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवणे.
2. लोकसहभागातून विद्यार्थीनीना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देणे.
3. CSR, विद्यांजली 2.0 आणि इतर अनुषंगिक (मिशन अपुलकी) च्या माध्यमातून लोकसहभाग प्राप्त करणे.

नियोजन व उपाय योजना :

नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्याचा भौगोलिक परिसर पाहता येथे औद्योगिक वसाहती नाहीत. म्हणून CSR उपलब्ध होत नाही.पालकही आर्थिक ,दुर्बल घटकांतील असल्यामुळे पालकाकडूनही लोकसहभाग उपलब्ध होणार नाही. म्हणून समाजातील प्रतिष्ठीत दानशूर व्यक्तीशी संपर्क साधून खालील प्रमाणे लोकसहभाग प्राप्त केला.

"मिशन आपुलकी" या उपक्रमातर्गत प्रतिष्ठित व्यक्ती , लोकप्रतिनिधी, अधिकारी यांचेकडून शाळेच्या गरजा भागविण्यासाठी मदत प्राप्त करुन घेण्याबाबत मी मुख्याध्यापिका म्हणून त्यांच्याशी संपर्क साधून मुलींच्या शिक्षणासाठी मदत प्राप्त करुन घेतली.

बिलोली तालूक्यातील प्रतिष्ठीत व्यक्ती -ज्यांना शिक्षणाचा दर्जा सुधारला पाहिजे, शिक्षणामध्ये विद्यार्थीनीने प्रगती केली पाहिजे असे वाटते अशा प्रतिष्ठीत व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून पत्राव्दारे शाळेसाठी कोणत्या बाबींची आवश्यकता आहे, ती बाब गुणवत्ता वाढीसाठी कशी पूरक आहे हे पटवून सांगितले. प्रतिष्ठीत व्यक्तींनी विश्वास दाखवून सहाय्य केले. त्यातून खालील उपक्रम राबविले .

1. <u>लोकसहभागातून डिजिटल क्लासरूम :</u>



डिजिटल क्लासरूममुळे विद्यार्थीनीमध्ये तंत्रज्ञान विषयक रूची निर्माण होऊ लागली. गणित,विज्ञान,इंग्रजी यासारखे अवघड विषय सोप्या पध्दतीने समजू लागले. त्यामुळे विषय शिक्षकांची कमतरता भरुन निघाली. संगणक साक्षरतेचे ज्ञानही मुलींना मिळविता येऊ लागाले. BSNL Broadband Internet Connection विद्यालयात उपलब्ध असल्यामुळे Window of the Knowledge म्हणून निवासी विद्यालयात पाहिजे तेव्हा वापर करता येऊ लागला.

2 . लोकसहभागातून टेलिस्कोप :



मा.पोलिस निरिक्षक श्री.शिवाजी डोईफोडे विद्यार्थी सुरक्षा समिती बैठकसाठी आले असता Astronomy Club बाबतीत माहिती दिली.त्यांनी 15000/- रु किमंतीची दुर्बीणी मुलाच्या वाढदिवसानिमित्त शाळेस भेट दिली. त्यामुळे Astronomy Club ची स्थापना करता आली._टेलिस्कोपच्या माध्यमातून चंद्रग्रहणाचे विद्यार्थीनीनी निरिक्षण केले. इतर ग्रह ता-याचे निरिक्षण केले त्यांच्या मनातल्या ग्रहण विषयक अंधश्रद्धा दूर झाल्या व वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत झाला. खगोलिय अभ्यासात रुची वाढली व सत्यता पडताळून पाहू लागल्या.



3 .ग्रंथालयीन पुस्तके प्राप्त

मा.श्री.विजय चव्हाण, अप्पर तहसिलदार, तहसिल कार्यालय,औरंगाबाद यांच्याकडे लोकसहभागाबाबत विनंती केली असता त्यांनी 25000 रु. किमतीची 350 पुस्तके त्यांच्या आईच्या स्मृतिदिनामिनित्त विद्यालयास भेट दिली. त्यात अनेक लेखकांच्या पुस्तकांचा समावेश झाल्यामुळे शालेय वाचनालयाच्या संपतीमध्ये भर पडली. अनेक स्पर्धा परीक्षामध्ये या पुस्तकांचा वापर करुन खालील प्रमाणे पारितोषिके प्राप्त केली.

शैक्षणिक वर्ष 2022-23 मधील पारितोषिके :

स्पर्धेचे नाव	प्राप्त क्रमांक
तालुकास्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा	प्रथम क्रमांक
तालुकास्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा	सहभाग
तालुकास्तरीय मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन भाषण स्पर्धा	प्रथम क्रमांक
तालुकास्तरीय सारथी निबंध स्पर्धा	द्वितीय क्रमांक
तालुकास्तरीय लोकनृत्य स्पर्धा	प्रथम क्रमांक
तालुकास्तरीय लोक नाटीका स्पर्धा	द्वितीय क्रमांक
तालुकास्तरीय लोक नाटीका स्पर्धा	सहभाग
तालुकास्तरीय विरबाल दिवस निबंध स्पर्धा	द्वितीय क्रमांक
तालुकास्तरीय विरबाल दिवस भाषण स्पर्धा	प्रथम क्रमांक
तालुकास्तरीय विरबाल दिवस भाषण ,निबंध स्पर्धा	सहभाग
तालुकास्तरीय विज्ञान मेळावा	प्रथम क्रमांक
तालुकास्तरीय विज्ञान मेळावा	सहभाग
तालुकास्तरीय विज्ञान नाटीका	द्वितीय क्रमांक

तालुकास्तरीय विज्ञान प्रयोग प्रदर्शन	द्वितीय क्रमांक
तालुकास्तरीय गणपती महोत्सव सामान्यज्ञान स्पर्धा	प्रथम क्रमांक (रोख रक्कम 3100)
तालुकास्तरीय दुर्गा महोत्सव सामान्यज्ञान स्पर्धा	द्वितीय क्रमांक (रोख रक्कम 1500)
तालुकास्तरीय परीक्षा पे चर्चा चित्रकला स्पर्धा	द्वितीय क्रमांक (रोख रक्कम 3000)

शैक्षणिक वर्ष 2022-23 मधील 48 वा नांदेड भारत स्काऊट आणि गाईड मेळाव्यामध्ये तंबू सजावट,योगासने,चित्रकला, सामान्यज्ञान या स्पर्धेत प्रथम क्रमांक तसेच चित्र प्रदर्शन, संचलन,बॅन्ड स्पर्धेत व्दितीय क्रमांक अशी एकूण 7 पारितोषिके प्राप्त केली.




स्काउट गाईड मेळाव्यात पारितोषिके स्वीकारताना

4 .भरारी अंक प्रकाशनासाठी निधी प्राप्त

विद्यार्थीनी स्वरचित भरारी अंकामध्ये विद्यार्थीनीनी तयार केलेले साहित्य, त्यांना आलेले अनुभव, विद्यालयात शिक्षकानी राबविलेले उपक्रम यांचा समावेश आहे. यामुळे विद्यार्थीनीना प्रकाशन कौशल्य प्राप्त झाले.





5.<u>बोअरवेल लोकसहभागातून प्राप्त</u>

आमदार निधी मधून मा.आमदार श्री.सुभाष साबणे यांनी विद्यालयास 200000/- (दोन लाख रु) किमंतीची 5 HP 3 Phase ची बोअरवेल उपलब्ध करुन दिली.

6.<u>National Institute for Entrepreneur and small Business Development Dehradun</u>



पारितोषिक स्वीकारताना

त्यांच्या द्वारा Fashion Design या उपक्रमाची अमंलबजावणी करण्यात आली. BDO कार्यालयाकडून मोफत शिलाई मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले.



शिवणकाम शिकताना मुली

अशा पद्धतीने समाजातील सर्व घटक एकत्रित आल्यास मुलींना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देता आले. शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यात आले, बालविवाह रोखण्यासाठी पालकांचे समुपदेशन करण्यात आले. विविध स्पर्धेत विद्यार्थीनीनी पारितोषिके प्राप्त केल्यानंतर वरिष्ठ अधिकारी यांच्याकडून विद्यार्थी समवेत पालकांचा सत्कार करण्यात आला. पालकांना शाळेबाबत अभिमान वाटू लागला.

"मुलींचे शिक्षण प्रगतीचे लक्षण"

उठ जाग मुसाफिर भोर भाई, अब ऐन कहा जो सोवत है, जो सोवत है सो खोवत है,जो जागत है सो पावत है।





कु.संजीवनी शंकर इबितवार – लहानपणीच वडीलांचे छत्र हरवलेली संजीवनी नुतन प्रवेश सर्वेक्षण वेळी आईसोबत शेतात काम करताना मुख्याध्यापिकेस आढळली. तिला शाळेच्या प्रवाहात आणून शालेय शिक्षणासोबत शिस्तीचे ही धडे दिले. तिच्या अंगी असलेले क्रीडा कौशल्य ओळखून विद्यालयातील क्रीडा शिक्षक पद रिक्त असतानाही अध्यपकांचा अध्यापक या नेतृत्व कार्याने तिला You-Tube च्या माध्यमातून हाफ़किडो बाक्सिंगच्या ट्रिक्स शिकविल्या. शाळास्तर ते राष्ट्रीय स्तरापर्यत हाफ़किडो बाक्सिंग स्पर्धेत प्राविण्य मिळविले. तदनंतर जिल्हा परिषद नांदेड येथे पत्रव्यवहार केल्यामुळे मा. जिल्हाधिकारी यांच्याव्दारा 50000/- रु अर्थसहाय्य प्राप्त झाले. त्यामुळे नेपाळ येथे संपन्न झालेल्या Hokkaido Boxing South Asian Championship - 2021 मध्ये गोल्ड मेडल प्राप्त केले.

कु. गंगासागर हणमंत कोकणे – अनाथ गंगासागर विधवा मावशीच्या घरी मेंढीपालनकरत असताना नूतन प्रवेश सर्वेक्षणाच्या वेळेस आढळली. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या टिमने तिच्या जीवनाला आकार दिला,शिस्त लावली, आत्मविश्वास जागा केला. तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय चित्रकला,Inspire Award , वक्तृत्व स्पर्धा अशा विविध स्पर्धेमध्ये सहभागी होऊन पारितोषिके व रोख रक्कम प्राप्त केली.अनाथ गंगासागरला मी पुढील शिक्षणासाठी प्रवेश फिस, शैक्षणीक साहित्यासाठी आर्थिक मदत केली. ती सध्या NHM अंतर्गत स्टाफ नर्स आहे.

कु.सारिका सुरेश प्रंचड – लहानपणीच वडीलांचे छत्र हरविलेली सारिका आईसोबत रेतीकाम करत असताना नूतन प्रवेश सर्वेक्षणाच्या वेळी आढळली. 10 वी पर्यत तीचे शिक्षण विद्यालयात पूर्ण झाले.Aptitude Test & Interview ला कसे सामोरे जायाचे याबाबत करिअर निवडतानाच्या माध्यमातून मुख्याध्यापिका म्हणून मार्गदर्शन केले. जवळपास 2 लाख रु कोर्स फिस असलेले Symbiosis Skills & Professional University Pune येथे Manufacturing Excellency कोर्स मोफत पूर्ण करुन ती सध्या पुणे येथे चांगल्या पगाराची नोकरी करत आहे.

कु. सुषमा सुभाष गांवडे - सुषमा स्थलांतरित ऊसतोड कामगाराची मुलगी या गावातून त्या गावात फिरत असताना अंजनी येथे नूतन प्रवेश सर्वेक्षण वेळी आढळली. मुख्याध्यापिका म्हणून मी तिच्या आई -वडीलांना शिक्षणाचे महत्त्व सांगून केंद्र, राज्य शासनाच्या मुलींच्या शिक्षणाच्या विविध योजना बाबत माहिती सांगितली. वा सुषमाला विद्यालयात प्रवेश दिला. विद्यालयात आल्या नंतर सुषमाने भाषण स्पर्धेत,स्काऊड - गाईड स्पर्धेत सहभागी होऊन विविध पारितोषिके मिळविली. महाकरिअर पोर्टलच्या माध्यमातून पोलिस पदापर्यंत कसे जायचे याची माहिती दिली. आज ती महिला पोलिस म्हणून सोलापूर येथे कार्यरत आहे. शिक्षणामुळे तिच्यात असा बदल घडून आला. म्हणून आई - वडीलांना अश्रू अनावर झाले व त्यांनी मुलींच्या उत्कर्षासाठी शासकीय योजनांचे व विद्यालयाच्या टीमचे आभार मानले.

समारोप:

अशा प्रकारे SLDP प्रशिक्षणातील ऊर्जा घेऊन निरक्षरतेच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणून लोकसहभागाच्या माध्यमातून गुणवत्ता पूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्याचा यशस्वी प्रयत्न केला.त्यामुळे अनेक मुली स्वतः अर्थार्जन करून कुटुंबाच्या आधारस्तंभ बनल्या आहेत. भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविण्याचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे अंतिम उद्दिष्टच्या दिशेने पावले टाकण्यासाठी आम्हा मुख्याध्यापकासाठी SLDP प्रशिक्षण पूरक ठरत आहे.

===== @ =====

61 . वाडोस नं.१ केंद्रातील समाविष्ट जि. प. शाळांमधील २ री ते ५ वी वर्गातील मुलांना समजपूर्वक वाचन करता येणे.

केंद्राचे नाव : वाडोस नं. १, तालुका: कुडाळ, जिल्हा : सिंधुदुर्ग

केंद्रप्रमुख : श्री.दिनकर चंद्रकांत तळवणेकर

ईमेल आयडी : dinkartalavanekar772@gmail.com

व्यवस्थापन : जिल्हा परिषद

प्रस्तावना :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील मुद्दा क्रमांक २.२ नुसार १०० टक्के मुलांमध्ये पायाभूत साक्षरता क्षमता असणे अत्यंत आवश्यक आहे. भाषेत मौखिक भाषा विकास विसांकेतिकीकरण अस्खलित व ओघवते वाचन, समजपूर्वक वाचन लेखन हे पाच घटक महत्वाचे आहेत.

आतापर्यंत शासनामार्फत किंवा स्वयंसेवी संस्थांमार्फत झालेल्या विविध सर्वेक्षणातून समजपूर्वक वाचन मुलांना अपेक्षित प्रमाणात साध्य झालेले दिसून आलेले नाही. त्यामुळे वाडोस नं. ०१ केंद्रातील मुलांची पायाभूत साक्षरतेमधील समजपूर्वक वाचन क्षमता विकसित करणेसाठी सदर उपक्रमाची अंमलबजावणी केली.

समजपूर्वक वाचनासंदर्भात आलेल्या अडचणी

वाडोस नं. १ केंद्रातील इयत्ता २ री ते ५ वी मधील २४९ मुलांची १ ते ५ जुलै २०२२ मध्ये पूर्वचाचणी घेतली. त्यामध्ये खालीलप्रमाणे स्थिती आढळून आली.

१) वाचन करताना विरामचिन्हांचा वापर केला जात नाही.

२) शब्दांचे उच्चार स्पष्टपणे केले जात नाहीत.

३) वाचताना शब्द गाळून वाचणे किंवा नसलेले शब्द समाविष्ट करून वाचतात.

४) वाचताना एका दृष्टीक्षेपात शब्द न वाचता अक्षरांचे वाचन करतात.

५) जोडाक्षरी शब्दांचे वाचन करताना अडखळतात.

६) वाचनाची गती फारच कमी आहे.

७) पठीत भाग वाचतात परंतु अपठित भाग वाचताना योग्यप्रकारे वाचत नाहीत.

८) समजपूर्वक वाचन केले जात नाही.

समजपूर्वक वाचनासाठी केलेले काम व उपाययोजना:

राष्ट्रीय धोरण २०२० नुसार निपुण भारत अंतर्गत १०० टक्के मुलांमध्ये भाषा साक्षरता असणे आवश्यक असल्याचे मुद्दा क्रमांक २.२ मध्ये नमूद केलेले आहे. त्यामुळे वाडोस नं. १ केंद्रातील इयत्ता २ री ते ५ वी जिल्हा परिषद १३ शाळांची १ जुलै ते ५ जुलै

२०२२ या कालावधीत शाळांना भेटी देऊन मुलांची सद्यस्थिती काय आहे ही जाणून घेतली असता केवळ ३५.४३ टक्के मुलांनाच समजपूर्वक वाचन करता आले. २३.६२ टक्के मुले उतारा स्तर, १३.३९ टक्के मुले वाक्यस्तर, १८.११ टक्के मुले शब्दस्तर तर ३.५४ टक्के मुले प्रारंभिक स्तरावर असल्याचे दिसून आले.

नियोजन :

कोरोना काळात शाळा बंद असल्याने ऑनलाईन शिक्षण पद्धती वापरण्यात आली. परंतु प्रत्यक्ष मुले शिक्षकांसमोर नसल्याने मुलांच्या वाचन क्षमतेचा क्षय झाल्याचे किंवा क्षमता विकसित झाली नसल्याचे दिसून आले. इयत्ता ३ रीतील मुले ही थेट १ लीत दाखल झाली व तिसरी वर्गात प्रत्यक्ष आली. मुलांच्या वाचनाचा क्षय भरून काढला पाहिजे असा निश्चय करून समजपूर्वक वाचन क्षमता विकसित करणेसाठी खालील प्रयत्न केले.

१) मुख्याध्यापक व शिक्षक सभा

इयत्ता २ री ते ५ वी वर्गाना अध्यापन करणारे सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांची सभा घेऊन शाळानिहाय व इयत्तानिहाय प्रत्येक मुलाची समजपूर्वक वाचनाची सद्यस्थिती काय आहे याचे स्पष्टीकरण केले. शिक्षकांशी चर्चा केल्यानंतर सर्वांकडून कोरोना काळात शाळा असल्याने मुलांची वाचनक्षमता कमी झाल्याचे निदर्शनास आले. सर्व शिक्षकांना निपुण भारत अंतर्गत प्रत्येक मूल भाषेत साक्षर करणे ही आपली जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले. सर्वच शिक्षक व मुख्याध्यापक यांनी यावर उपाययोजना करण्याचे मान्य केले. १०० टक्के विद्यार्थी समजपूर्वक वाचन करतील यासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्न केले पाहिजे यावर सर्वाचे एकमत झाले. तसेच याकामी पालकांमध्ये जागृती करण्याचे निश्चित केले.

शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी वाचन करताना

_https://www.youtube.com/watch?v=al9-gEHotel

२) वाचू आनंदे

समग्र शिक्षा अंतर्गत प्राप्त पुस्तकांचा समजपूर्वक वाचनासाठी उपयोग करण्याचे निश्चित केले. प्रथमतः इयत्तानिहाय पुस्तकांचे वर्गीकरण केले. त्यातील दुसरीसाठी ३० पुस्तके, तिसरीसाठी २८, चौथी व पाचवीसाठी ३० पुस्तकांची विभागणी केली. सदरील इयत्तानिहाय नियोजित पुस्तकांचे 'वाचू आनंदे' या उपक्रमात प्रकटवाचन करण्याचे निश्चित केले. शालेय परिपाठात प्रत्येक दिवशी एका मुलाचे प्रकटवाचन घेतले मुलाने प्रकटवाचन केल्यानंतर परिपाठात उपस्थित मुलांनी लक्षपूर्वक ऐकावे यासाठी वाचकाने ३ वस्तुनिष्ठ प्रश्न मुलांना विचारले. सुरूवातीला मुलांचा प्रतिसाद मिळत नव्हता परंतु कालांतराने मुले लक्षपूर्वक ऐकू लागली व प्रश्नांची उत्तरे देऊ लागली. वाचक मुलाला प्रश्न विचारावयाचे असल्याने त्याचे समजपूर्वक वाचन होण्यात खूपच मदत झाली. मुलांमध्ये मी वाचू शकतो व प्रश्न विचारू शकतो हा आत्मविश्वास निर्माण झाला.

प्रत्येक वर्गशिक्षकांनी रोजचा पहिला तास मुलांच्या सदर पुस्तकांच्या प्रकटवाचनाने व प्रश्नोत्तरे याप्रकारे घेतल्याने सर्वच मुले वाचनाचा प्रयत्न करू लागली व त्यांना वाचनाची आवड निर्माण झाली. काही मुलांनी तर सर्वच पुस्तके वाचून काढली.

माझ्या शाळाभेटीच्या वेळी तर मी एका शाळेत सर्व पुस्तके व्हरांड्यात मांडली व तेथेच बसून त्याचे वाचन केले. मधल्या सुट्टीत मुले आली आणि म्हणाली सर आम्ही यायचे का तुमच्यासोबत पुस्तके वाचायला? सर्व मुले न सांगताही पुस्तके आवडीने वाचू लागली हाच प्रयोग मी शिक्षकांना करायला सांगितला. आता सर्वच शाळांमध्ये, मुलांमध्ये आपोआपच वाचनाची गोडी निर्माण झाल्याचे दिसून आले.

विद्यार्थी वाचनाचे व्हिडीओ

https://www.youtube.com/watch?v=DAFdOJCMMHk

https://www.youtube.com/watch?v=f175x6JFZrc

https://www.youtube.com/watch?v=cG2kSBE99HU

https://www.youtube.com/watch?v=P7HD3CVWugo

३) मातापालक जागृती व सहभाग :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षणामध्ये समाजाचा सहभाग घेणे अत्यावश्यक असल्याचे नमुद केलेले आहे. याचा विचार करून वाडोस नं. १ केंद्रातील ३२ स्मार्ट लिडर मातांची कार्यशाळा केंद्रस्तरावर आयोजित केली. त्यांना स्मार्ट लिडर माता ओळखपत्र प्रदान केली. शिक्षणातील समजपूर्वक वाचनाचे महत्त्व सर्व मातांना समजावून दिले. घरात जर वाचनची संस्कृती असेल तर मुले पालकांचे अनुकरण करतात हे मातांना सांगितले. मुलांचे वाचन कसे घ्यावे याबाबत मार्गदर्शन केले. या स्मार्ट लिडर मातांनी आपल्या वाडीतील मातांमध्ये वाचनाच्या उपक्रमाची जागृती केली. स्मार्ट माता लिडर यांचा केंद्राचा व्हाटसअप ग्रुप तयार केला. दुसऱ्या शाळेतील मुले कशी वाचतात याचे व्हीडीओ मातांना पाहावयास मिळाले. याचा इतका फायदा झाला की आज प्रत्येक माता शाळेच्या वाचनालयातील पुस्तके स्वतः वाचतात व आपल्या मुलांकडून वाचून घेतात. प्रत्येक साता व वर्गशिक्षकांना वाचन करत असताना मुलांचे व्हिडीओ निर्मिती करण्यास प्रवृत्त केले, त्यामुळे प्रत्येक मातेने आपल्या मुलामुलीचा चांगला व्हीडीओ तयार व्हावा म्हणून वाचनाचा खूपच सराव घेतला आणि माझा मूळ उद्देश यातून सफल झाला. माता पालक यांच्या भेटी घेऊन वाचनाचे महत्व पटविले.

मातांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी वाचन करताना

https://www.youtube.com/watch?v=cEOE8jHf43Q

पालकांशी चर्चा करताना

https://www.youtube.com/shorts/kyP5kKE3gk



स्मार्ट लीडर माता व शिक्षक यांना मार्गदर्शन करताना

४) वाचक पुरस्कार :

मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी म्हणून प्रत्येक इयत्तेतील उत्कृष्ट ०३ मुलांची निवड करून त्यांचा सन्मान परिपाठात केला. आपलाही सन्मान व्हायला पाहिजे या प्रेरणेने सर्वच मुले वाचनाकडे वळली. मुलांमध्ये वाचनाची निकोप स्पर्धा निर्माण झाली. तसेच शाळेच्या वाचनालयातील निश्चित केलेली सर्वात जास्त पुस्तके वाचणाऱ्या मुलांचा शाळास्तरावर १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिनी सन्मान केला. माहे मार्च २०२३ मध्ये केंद्रामध्ये उत्कष्ट वाचक स्पर्धा ठेवण्यात आलेली आहे. त्यामध्ये केंद्रातील प्रत्येक इयत्तेतील टॉप १२ मुले निवडून ४८ मुलांचा केंद्रस्तरावर सत्कार करण्यात येणार आहे.

५) स्वाध्यायसंच विकसन :

शिक्षक व मातांना मुलांचे वाचन विकसित करण्याची दृष्टी विकसित व्हावी म्हणून केंद्रातील ०५ तज्ज्ञ भाषा शिक्षक यांच्या मदतीने स्वाध्यायसंच विकसित केले. संचामध्ये उतारा व त्यावर प्रश्न, कविता व त्यावर प्रश्न, जाहिरात व त्यावर प्रश्न संवाद व त्यावर प्रश्न बातमी व त्यावर प्रश्न असे ०५ प्रकारचे स्वाध्याय निर्मिती केली. प्रत्येक स्वाध्याय शिक्षक व मातांना शैक्षणिक उठावातून उपलब्ध करून दिला. या स्वाध्यायामुळे मुलांचे समजपूर्वक वाचन विकसन होण्यास मदत झाली.




विद्यार्थी व मातांसाठी स्वाध्याय संच वितरण

फलनिष्पती :

पूर्व चाचणी व उत्तर चाचणी विश्लेषण :

पूर्व चाचणी दि.१ जुलै ते ५जुलै २०२२ समजपूर्वक वाचन

इयत्ता	पटसंख्या	उपस्थित	मराठी वाचन					
			प्राथमिक स्तर	अक्षर स्तर	शब्द स्तर	वाक्य स्तर	उतारा स्तर	समजपूर्वक वाचन
दुसरी	67	67	5	9	17	10	10	10
तिसरी	58	58	1	3	4	13	12	15
चौथी	49	49	2	2	8	4	10	23
पाचवी	80	80	1	1	7	7	22	42
एकूण	**254**	**254**	**9**	**15**	**46**	**34**	**60**	**90**

उत्तर चाचणी :दिनांक १४ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर २०२२ : समजपूर्वक वाचन

इयत्ता	पटसंख्या	उपस्थित	मराठी वाचन					
			प्राथमिक स्तर	अक्षर स्तर	शब्द स्तर	वाक्य स्तर	उतारा स्तर	समजपूर्वक वाचन
दुसरी	65	65	4	5	9	9	9	29
तिसरी	56	56	1	3	7	11	7	27
चौथी	49	49	2	2	3	7	5	30
पाचवी	79	79	0	2	2	5	12	58
एकूण	249	249	7	12	21	32	33	144
शेकडा प्रमाण			2.81	0.48	0.84	12.85	13.25	57.83

उत्तर चाचणीत समजपूर्वक वाचनात झालेली वाढ 22.40%

टीप-सदर चार महिन्यांच्या कालावधीत ०५ मुले पालकांच्या स्थलांतरामुळे अन्य शाळेत गेलेली आहेत .

उपक्रमाची फलनिष्पत्ती :

१) समजपूर्वक वाचन करणाऱ्या मुलांची संख्या ४ महिन्यात २२.४० टक्क्यांनी वाढली.

२) मातापालकांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली त्यामुळे मुले वाचनाकडे वळली.

३) शिक्षकांनी सहेतुक वाचन घेण्यास सुरूवात केली. शिक्षकही पुस्तकांचे वाचन करण्यास प्रवृत्त झाले.

४) शिक्षण प्रक्रिया सुरळीत होण्यासाठी मुलांचे समजपूर्वक वाचन आवश्यक आहे याचे महत्त्व मातापालक व शिक्षकांना पटले.

५) शाळेतील वाचन कोपरे व वाचनालये कार्यप्रवण बनली.

६) विद्यार्थी-विद्यार्थी, शिक्षक-विद्यार्थी, पालक-विद्यार्थी, शिक्षक-पालक यांतील संप्रेषण प्रक्रिया वाढीस लागली.

७) मुलांमध्ये वाचन संस्कृती विकसित होण्यास प्रेरणा मिळाली.

८) शाळामधील सभांमध्ये मुलांच्या वाचनाबाबत चर्चा सुरू झाल्याने सभेसाठी पालकांची उपस्थिती वाढली.

९) मुलांच्या शिक्षणात शिक्षकांइतकी पालकांची भूमिका महत्वाची आहे ही जाणीव पालकांत निर्माण झाली.

10) मुलांनी चित्र निरीक्षण आणि चित्र वाचन कौशल्य विकसित केले. मला सहकारी वाचनाची सवय लागली.

समारोप

वाडोस नं.१ केंद्रात गेली ०८ वर्षे केंद्रप्रमुख म्हणून कार्यरत आहे परंतु कोरोना कालावधीत मुलांचे वाचनाकडे झालेले दुर्लक्ष पुन्हा मूळस्थितीत आणण्यास बऱ्याच प्रमाणात मदत झाली. अवघ्या ०४ महिन्यात २२.४० टक्केने मुलांच्या समजपूर्वक वाचनात वाढ झाली. प्रारंभिक स्तरावरील २ मुले अक्षर स्तरावर, अक्षरस्तरावरील ३ मुले शब्दस्तरावर, शब्दस्तरावरील २५ मुले वाक्यस्तरावर, वाक्यस्तरावरील २ मुले उतारा स्तरावर तर उतारा स्तरावरील ५७ मुले समजपूर्वक वाचनाकडे वळली.

समजपूर्वक वाचन ही टप्प्याटप्प्याने विकसित होणारी प्रक्रिया आहे. शिक्षक पालक व विद्यार्थी यांनी नियमित वाचन करणे आवश्यक आहे. शिक्षक व पालक यांचे अनुकरण करून मुले आपोआपच वाचू लागली असे उपक्रमातून दिसून आलेले आहे. प्रत्येक शाळेत वाचन कोपरा व वाचनालय समृद्ध असणे आवश्यक आहे. सदर उपक्रम वर्षभर राबवल्यास निश्चितपणे १०० टक्के विद्यार्थी समजपूर्वक वाचनाकडे वळतील आणि शिक्षणाची गुणवत्ता वाढण्यास मदत होईल तसेच निपुण भारत अंतर्गतचे भाषा साक्षरतेचे उद्दिष्ट १०० टक्के यशस्वी होईल.

===== @ =====

62. सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास.

शाळेचे नाव व पूर्ण पत्ता - जे. सी. हायस्कूल, चवरे लाईन, कारंजा (लाड), जि. वाशीम.

ई मेल - jchighschool@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - श्री. उदय कमलाकर नांदगावकर

व्यवस्थापन - खाजगी अनुदानित

प्रस्तावना :

शाळा हे समाजाने समाजाला जागृत करून आदर्श नागरिक बनविण्याचे माध्यम होय. शाळा ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया भक्कम करणारे एक माध्यम आहे. शाळेत केवळ पुस्तकी ज्ञान देणे म्हणजे शिक्षण होत नाही. महात्मा गांधीजींच्या विचाराप्रमाणे शिक्षण म्हणजे बालकाच्या शरीर, मन व आत्मा यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे होय. अर्थात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधने म्हणजे शिक्षण होय आणि हा विकास केवळ पाठ्यपुस्तकात पूर्ण होण्यास काही मर्यादा प्राप्त होतात. या मर्यादा सहशालेय उपक्रमातून पूर्ण करणे शक्य होऊ शकते . म्हणून सहशालेय उपक्रमांचे महत्त्व अतुलनीय आहे. माझ्या विद्यालयामध्ये विविध सह शालेय उपक्रम आयोजित केले जातात. जेणेकरून विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक, सामाजिक, मानसिक व नैतिक विकासाला चालना मिळते. सहशालेय उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसोबतच विविध कलागुणांचाही विकास झाल्याचे माझ्या प्रत्ययास आले आहे. त्यामुळे या सहशालेय उपक्रमांबद्दलची अधिक माहिती आपणास करून देताना मला अत्यानंद होत आहे.

नियोजन व अंमलबजावणी -

विद्यालयात सहशालेय उपक्रमांची अंमलबजावणी व्यवस्थित होणे गरजेचे असते.माझ्या विद्यालयांमध्ये प्रत्येक उपक्रमाची जबाबदारी मुख्याध्यापक म्हणून आधी मी स्वीकारतो.त्यानंतर शिक्षक व विद्यार्थ्यांकडून कार्यवाही करून घेतो.

गृहभेट हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी फारच उपयोगी ठरत आहे. या उपक्रमात वर्गशिक्षक प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरी भेटी देतात. विद्यार्थी व पालकांकडून त्यांना येत असलेल्या अडचणी समजून घेतात. तसेच विद्यार्थ्याच्या अभ्यासाबाबत चर्चा केली जाते. त्याचप्रमाणे सर्व विषयांच्या वह्या तपासल्या जातात. विद्यार्थी ज्या विषयात मागे असेल त्याबाबत त्याला योग्य ते मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांची परिस्थिती बघून गरजू विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य तसेच आर्थिक मदत दिली जाते. आपले शिक्षक घरी आल्यानंतर विद्यार्थी मनमोकळेपणाने संवाद साधतात. यामुळे त्यांच्या प्रगतीमध्ये वाढ होताना दिसते.

' करिअरच्या वाटा ...माजी विद्यार्थी मार्गदर्शन ' या उपक्रमामध्ये विद्यालयातील विविध देशांमध्ये उच्चशिक्षणासोबत सेवा देत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव, ज्ञान व करिअरच्या संधी यांबद्दल मागदर्शन केले. यामध्ये सिमरन आसावा वरिष्ठ संशोधन तंत्रज्ञ , 'मेमोरियल स्लोन केटरिंग कर्करोग केंद्र, न्यूयॉर्क, अमेरिका' येथे कर्क रोगावर संशोधन करत आहे. तिने शाळेतील जुन्या अभ्यासविषयक आठवणी व अमेरिकेमध्ये कर्करोगांवर संशोधन करतानाचे अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले. अमेय चवरे (कनिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ) Roarke Horstmeyer Research Lab.Duke University, USA येथे संशोधन करत आहे. तसेच चेतन राळेकर MIT – मॅसेच्युसेट्स इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे पी.एच.डी संशोधन करीत आहे . यांचेही मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले व संशोधन केंद्रातील त्यांचे अनुभव देखील त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले व स्पर्धा परीक्षेबाबत माहिती सुद्धा दिली. यामुळे अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली व करिअरच्या नव्या वाटा शोधण्यासाठी मदत झाली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी मदत झाली आणि विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांना आत्मविश्वासाने सामोरे गेले.

विद्यालयामध्ये दिनविशेषपर मोठ्या प्रमाणात उपक्रमांचे आयोजन केले जातात. त्यांपैकी काही पुढील प्रमाणे आहेत.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त 'खेळामधील विज्ञान ' या विषयावर तसेच डॉ. रॉबीन सायमन लेक्चर इन फिजिकल एज्युकेशन, व्हीएनआयटी , नागपूर यांनी 'खेळाचे महत्त्व आणि त्यामागील विज्ञान ' याबाबत छान व सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. या नावीन्यपूर्ण विषयामुळे विद्यार्थ्यांचा खेळाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलण्यास मदत झाली.

'भारतीय सण आणि खगोलशास्त्र ' या विषयावर श्री. आनंद दिवाकर घैसास निवृत्त वैज्ञानिक अधिकारी , खगोलशास्त्र ऑलिंपियाड विभाग, होमी भाभा विज्ञान प्रशिक्षण केंद्र , टाटा मूलभूत संशोधन संस्था , मुंबई. यांनी खगोल शास्त्रीय माहिती अगदी सोप्या व गमतीदार पद्धतीने विद्यार्थ्यांना दिली. यामध्ये मकर संक्रांत , ग्रह, विविध सण - उत्सव साजरा करण्यामागची कारणे व ऐनवेळी विद्यार्थ्यांना पडलेले प्रश्न सोप्या भाषेत समजावून सांगितले.

कोरोना काळामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या मनावर निराशेचे मळभ दूर व्हावे, विद्यार्थी खेळाकडे आकर्षित करण्यासाठी, प्रवास क्रीडा यात्रींचा या सदराखाली **व्याख्यानाचे** आयोजित करण्यात आले होते. नीता नितीन चाफले - भोयर (माजी क्रिकेटपटू , पॉवर वेट लिफ्टर , क्रिकेट कोच व लेखिका , मुंबई) तसेच सीमा विनय बपोरीकर (मॅरेथॉन धावपटू व गणित आणि विज्ञान शिक्षिका) ,यांनी शरीर स्वास्थासाठी खेळाचे महत्त्व व आपला अनुभव यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जागतिक पर्यावरणाविषयी जाणीव जागृती निर्माण व्हावी यासाठी जलशक्ती अभियानांतर्गत डॉ.श्री. निलेश हेडा, संशोधक यांचे 'आओ नदी को जाने हम ' या विषयावर व्याख्यान आयोजित केले. विद्यार्थ्यांमध्ये कला गुणांचा विकास करण्यासाठीच्या उपक्रमात पाच तासात ५१ मातीचे पर्यावरणपूरक गणपती बनविण्याचा विक्रम करणाऱ्या आठ वर्षांच्या विद्यार्थीनीची ऑनलाईन गणेशमूर्ती कार्यशाळा, IIT गांधीनगर येथील विद्यार्थ्यांनी ऑनलाईन आकाशकंदील तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली. असे अनेक पर्यावरण पूरक व नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये **सामाजिक बांधिलकीची जाणीव जागृती** निर्माण होण्यासाठी वृद्धाश्रमाला भेट देऊन मदत दिली, कोरोना काळात गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य किट वाटप केले. तसेच कोरोना हॉस्पीटलला मदत निधी दिला. विद्यार्थ्यांना अवांतर वाचन-लेखनाची आवड निर्माण व्हावी, भाषा समृध्द व्हावी, शब्दसंग्रह वाढावा, कल्पकता वाढावी यासाठी ग्रंथालयामार्फत 'बहुश्रुत वाचन , निबंध , कविता वाचन' स्पर्धा तसेच विद्यार्थी लिखित लेख व कवितांचे हस्तलिखित प्रकाशित करण्यात येते.

फलनिष्पत्ती -

सहशालेय उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळते. विद्यालयातील वरील उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणीनंतर फलनिष्पत्ती पुढील प्रमाणे आहे.

१) कोरोना काळात शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला.विद्यालयाने राबविलेल्या विविध सहशालेय उपक्रमांमुळे महाराष्ट्र अध्यापक विद्यालयातर्फे आयोजित **'सन्मान कोरोना काळातील शिक्षण प्रयत्नांचा'** या स्पर्धेत विद्यालयाने अमरावती विभागातून द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

२) माजी विद्यार्थ्यांच्या मुलाखतीतून तसेच अनेक तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत वेगळ्या वाटा शोधण्याची उत्सुकता निर्माण झाली.

३) विद्यार्थी NMMS, पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती, डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा, गणित अध्यापक मंडळ द्वारा आयोजित परीक्षा, एलिमेंटरी , इंटरमिजिएट या परीक्षांमध्ये चांगल्या गुणांनी यशस्वी होत आहेत.

४) विद्यार्थी विविध खेळांच्या स्पर्धांमध्ये राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर नेतृत्व करत आहेत.

५) विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव जागृती निर्माण झाली.

६) गृहभेटीमुळे विद्यार्थ्यांच्या अडचणी शिक्षकांना समजल्या त्यामुळे योग्य उपाययोजना करून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यास मदत झाली. आज ते विद्यार्थी छान शिक्षण घेत आहेत.

७) विद्यार्थी वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष देतात. तसेच शाळा परिसर, वर्ग स्वच्छ ठेवतात.

८) निबंध लेखन , कविता वाचन या स्पर्धांमध्ये विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.

९) विद्यार्थी ग्रंथालयाचा जास्तीत जास्त उपयोग करतात. अवांतर पुस्तके वाचतात. हस्तलिखित तयार करतात.

एकंदरीत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होताना दिसून येत आहे.

===== @ =====

विभाग - 2

क्षेत्रनिहाय यशोगाथा

क्षेत्र :
स्वच्छ शाळा ,सुंदर शाळा

1. जि.प.शाळा नं २ चिंचणी, ता.तासगाव , जि.सांगली
2. जिल्हा परिषद शाळा तऱ्हावद , ता. तळोदा ,जि .नंदुरबार
3. सह्याद्रि शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कुल दमामे , ता. दापोली, जि. रत्नागिरी
4. जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा ,तळणी ,ता.मोर्शी ,जि. अमरावती
5. जिल्हा परिषद शाळा , डांभुर्णी , ता. यावल ,जि.जळगाव
6. जिल्हा परिषद शाळा बसरवाडी ,ता. जामखेड ,जि. अहमदनगर



प्रस्तावना :

शाळेला सुसज्ज इमारत ,स्वच्छ व सुंदर परिसर , मुला मुलींसाठी स्वतंत्र शौचालय , शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा , खेळासाठी मैदान ,भरपूर फुलझाडे ,हिरवागार परिसर इ . सुविधा असणे हे आनंददायी अध्ययनासाठी , विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी खूप आवश्यक आहे . परंतु जागेची , निधीची अनुपलब्धता यामुळे सर्वच शाळेत हे शक्य होत नाही. तरीही यातून शिक्षक - मुख्याध्यापक समाजाच्या सहकार्याने सर्व अडचणींतून मार्ग काढत शाळा स्वच्छ व सुंदर करण्याचा प्रयत्न करत आहेत.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करावयाचा असेल तर शालेय अभ्यासक्रमाबरोबरच सहशालेय उपक्रम राबविणे आवश्यक आहे. यासाठी पालकांचा , समाजाचा सहभागही महत्वाचा आहे . शाळा समाजापर्यंत व समाज शाळेपर्यंत आला तर त्याचा निश्चितच गुणवत्ता विकासात लाभ झाल्याचे दिसते . असेच प्रयत्न अनेक शाळांनी केल्याचे दिसून येते.

सध्याचे युग स्पर्धेचे आहे . खाजगी क्षेत्र असो किंवा शासकीय ,सर्व क्षेत्रात उमेदवारांना स्पर्धा परीक्षेला / स्पर्धेला सामोरे जावे लागते . याची पूर्वतयारी शाळेतूनच होणे काळाची गरज आहे. असे प्रयत्न महाराष्ट्रातील अनेक शाळा करत आहेत .

अभ्यासाबरोबरच उत्तम आरोग्य व शारीरिक क्षमता महत्वाच्या आहेत . क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांनी विविध खेळ खेळणे , क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेणे , त्यात नैपुण्य मिळविणे आवश्यक आहे . अशा अनेक शाळा आहेत की ज्या विद्यार्थ्यांना क्रीडाविषयक सर्व सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना योग्य प्रशिक्षण देत आहेत. याचा परिणाम म्हणजे विद्यार्थी जिल्हा ,राज्य ,राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवीत आहेत.

विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू असल्याने त्यांचे शिकणे आनंददायी होण्यासाठी शिक्षक अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवीत आहेत. त्यामुळे विद्यार्थी पटसंख्या व उपस्थितीमध्ये वाढ होत आहे .

शिक्षणातून एक सुसंस्कारित नागरिक निर्माण व्हावा म्हणून शाळेतून मूल्याधिष्ठित शिक्षण देऊन विद्यार्थी विकासाचा प्रयत्न होत आहे . तसेच इंग्रजी विषयातील नाविन्यपूर्ण उपक्रम घेतले जात आहेत . पायाभूत साक्षरता आणि अंकगणितीय क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न शाळांमधून होत आहेत.

महाराष्ट्रातील अशाच काही निवडक शाळांच्या क्षेत्रनिहाय यशोगाथा येथे देण्याचा हा छोटासा प्रयत्न .

स्वच्छ शाळा , सुंदर शाळा

1. **शाळेचे नाव** : जि.प.शाळा नं २ चिंचणी, ता.तासगाव , जि.सांगली

मुख्याध्यापकाचे नाव : श्री उज्वल गुणवंत माने

इमेल : ujwalmane01@gmail.com



जि.प.शाळा नं २ चिंचणी या शाळेत मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या प्रयत्नातून विद्यार्थ्यांना बसण्यासाठी सुसज्ज अशी इमारत , पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह , handwash station , प्रशस्त खेळाचे मैदान ,इ लर्निंगसाठी प्रत्येक वर्गात एलसीडी टीव्ही अशा सर्व भौतिक व अध्ययन सुविधा उपलब्ध आहेत

.



hand wash station चा वापर करताना मुली

शाळा स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सर्व वर्गांमध्ये कचरा टाकण्यासाठी कचरा कुंड्या ठेवलेल्या आहेत. हात स्वच्छ धुण्यासाठी hand wash स्टेशन असून तेथे साबण व रुमालाची व्यवस्था केलेली आहे.पाण्याची टाकी आठवड्यातून स्वच्छ धुवून घेतली जाते.मुलींच्या वैयक्तिक स्वच्छतेकडे दररोज लक्ष दिले जाते.

शाळा स्वच्छ सुंदर असल्याने शाळेचा पट दरवर्षी वाढत आहे. सर्व मुलींना स्वच्छतेचे महत्त्व समजले आहे . वैयक्तिक स्वच्छतेकडे नेहमी लक्ष दिल्यामुळे जेवणापूर्वी सर्व मुली साबणाने हात धुवून जेवण करतात. स्वच्छतेमुळे आरोग्य चांगले राहते. शाळा स्वच्छ व सुंदर असल्याने दिवसभर मुली आनंदी असतात. अभ्यास करण्यास मुलीना आनंद वाटतो. शिक्षकांना अध्यापन करताना काम करण्यास उत्साह येतो तसेच स्वच्छतेमुळे मुलींचे आरोग्य चांगले व निरोगी राहते. यामुळे अनुपस्थितीचे प्रमाण कमी आहे . १०० टक्के उपस्थिती ठेवण्यास मदत होते.

=====@=====

2. शाळेचे नाव : जिल्हा परिषद शाळा तऱ्हावद , ता. तळोदा ,जि .नंदुरबार

ईमेल आयडी : hmzpschooltaravhad@yahoo.in

शिक्षकाचे नाव : श्रीमती शितल किशोर शिंदे



नंदुरबार जिल्ह्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र प्रकाशा म्हणजेच दक्षिणकाशी पासून उत्तर दिशेला अवघे सात किलोमीटर अंतरावर असलेली ही शाळा . शाळेची स्थापना इसवी सन १९५६ मध्ये झाली .

सुरुवातीच्या काळात गावातील काही लोक शाळेच्या आवारात धूम्रपान करीत असत . तसेच शाळेतील फुले व झाडे तोडून टाकत असत. दररोज शाळेत आल्यावर असे दृश्य पाहून मन नाराज व्हायचे . कारण विद्यार्थ्यांच्या मदतीने झाडे लावली जायची . यात त्यांचीदेखील खूप मेहनत राहायची.खड्डा खोदणे , झाडे लावणे, पाणी देणे असा रोजचा दिनक्रम . परंतु हा दिनक्रम थोडेच दिवस चालायचा . नंतर परत झाडे मुळासकट तोडलेली पाहून शिक्षक व विद्यार्थी खूप नाराज व्हायचे . वरील परिस्थिती पाहिल्यानंतर शाळेचे वैभव व अस्तित्व टिकवून ठेवण्याचा ध्यास व प्रयत्न शाळेचे मुख्याध्यापक व सहशिक्षक यांनी घेतला .

शाळेचे मुख्याध्यापक व सहशिक्षक यांनी ग्रामसभेत शाळेच्या आवारातील अस्वच्छता , धूम्रपान तसेच वृक्षतोडीविषयी व दुष्परिणामाविषयी माहिती दिली.

शाळेबरोबरच शाळेच्या बाहेरील परिसराकडे स्वच्छतेविषयी लक्ष देण्यात आले . दररोज अर्धा तास याप्रमाणे सायंकाळची वेळ ठरवण्यात आली. तसेच प्रत्येक वर्गाचे वेगवेगळे गट तयार करण्यात आले .स्वच्छतेची ठिकाणे देखील ठरवली गेली. प्रत्येक गटाला एक गटप्रमुख म्हणून शाळेतीलच शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. गवत कापणे , मैदानाची स्वच्छता, क्रीडांगण स्वच्छता, स्वच्छतागृहांची सफाई, वर्गाची सफाई ,फुलांची फळांची काळजी घेणे , त्यांना वेळोवेळी पाणी देणे ,इत्यादी जबाबदारी सोपविण्यात आली. उपशिक्षिका श्रीमती शितल किशोर शिंदे यांनी पालकांच्या मदतीने वृक्ष दिंडी काढली . एक मूल एक झाड लावले गेले पाहिजे व लावलेल्या झाडांचे संगोपन केले पाहिजे असे समुपदेशन केले .परिवारातील एका सदस्याप्रमाणे स्वतः लावलेल्या झाडांची जबाबदारी पालकांनी घेतली पाहिजे. ' एकमेका साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ ' या मंत्राने सर्वांनी एकत्र येऊन वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन मोहीम राबवली व आज आमची शाळा सृष्टीचे नंदनवन दिसत आहे.स्वच्छता पंधरवाडा,वृक्षदिंडी,स्वच्छता अभियान,स्वच्छता मोहीम,स्वच्छता जनजागृती,स्वच्छता शपथ, हात धुण्याचा दिवस,वैयक्तिक स्वच्छता दिवस इत्यादी उपक्रम घेण्यात आले .

फलनिष्पत्ती :

आज शाळेच्या पटांगणात अशोकाची १३ झाडे आहेत, कडुलिंबाची सहा झाडे , सीताफळाची पाच , फुल झाडे दहा व औषधी वनस्पती लावण्यात आल्या आहेत व जपणूक देखील करण्यात येत आहे. यामुळे शाळेत जयंती पुण्यतिथी साजरा करावयाची असल्यास विद्यार्थी स्वतः फुलांची माळा बनवून प्रतिमेस अर्पण करतात . शाळेचे क्रीडांगण ,स्वच्छतागृह, वर्गखोली स्वच्छ व सुंदर राहते . मुलांमध्ये निसर्ग प्रेम दिसून आले .मुले आता स्वतःच्या वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष देतात . विद्यार्थ्यांच्या अंगी श्रमप्रतिष्ठा मूल्य रुजविण्यास मदत झाली . शाळेतील हिरवे गार वातावरण पाहून गावातील नागरिक संध्याकाळी झाडाखाली येऊन आनंद घेतात व काळजी देखील घेतात.

=====@=====

3) **शाळेचे नाव** - सह्याद्रि शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कुल दमामे , ता. दापोली, जि. रत्नागिरी

ई-मेल आय डी. - nesdamane@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव - श्री. अतुल पांडुरंग पिटले.

1957 साली ज्ञानदानाचा विडा उचलणारे शिक्षणाची गंगा सह्याद्रिच्या कड्याकपारीपासून अरबी समुद्राच्या किनाऱ्यालगत गावा - गावात शिक्षणाची दारे उघडणारे 'शिक्षणमहर्षी गोविंदरावजी निकम' यांच्या सह्याद्री शिक्षण संस्थेच्या माध्यमातून 1994 साली स्थापन झालेले दापोली तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल , दमामे हे विद्यालय . जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) रत्नागिरी यांच्या माध्यमातून दिनांक 30 ऑगस्ट 2021 रोजी शाळा स्वच्छता कृती आराखडा कोबो ऍप्लिकेशन प्रशिक्षण झाले. या प्रशिक्षणादरम्यानच आपण देखील अशा पद्धतीची शाळा निर्माण करू शकतो अशी भावना व आत्मविश्वास निर्माण झाला. भौतिक सुविधांचा अभाव विद्यालयात होता.

विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राखणेसाठी आजारपण टाळण्यासाठी स्वच्छ शाळेची आवश्यकता भासते . कोरोना नंतरच्या काळात विद्यार्थ्यांच्या मानसिकतेत बदल होणे अपेक्षित होते . शाळेविषयी गोडी निर्माण होणे आवश्यक होते, आनंददायी स्वच्छ पोषक वातावरणाची शाळेत आवश्यकता होती . शाळेच्या पाण्याच्या समस्या, बोलक्या भिंती, हॅन्ड वॉश स्टेशन, सांडपाणी व्यवस्थापन, मुलींच्या वैयक्तिक समस्यांसाठी (टाकाऊ सॅनीटरी पॅडचे डस्टबीन, भस्मिकरण यंत्र), वर्ग सजावट, कचऱ्याचे व्यवस्थापन, अपंग विद्यार्थ्यांसाठी कमोड इ. बाबींवर काम करणे आवश्यक होते.

विद्यालयाच्या बोलक्या भिंती-

स्वतः व माजी विद्यार्थी यांचे माध्यमातून शाळेच्या भिंतीवर विविध संदेशपर चित्रे काढली गेली जसे की ,बेटी बचाओ – बेटी पढाओ ,SAVE THE EARTH, SAVE WATER, SAVE LIFE, खेलो इंडिया ,जागतिक योग दिन ,माझी उंची ,स्वच्छ सुंदर भारत ,तंबाखू मुक्त शाळा ,कोरोना विषयक सूचना ,राष्ट्रीय हरित सेना. शाळेच्या व्हरांड्यात भिंतीवर फुलझाडांची चित्रे,काढली . सुविचार ,सूचना फलक तयार करण्यात आले व शाळेच्या भिंती चित्रांनी सजवण्यात आल्या.



शाळेच्या व्हरांड्यात भिंतीवरील फुलझाडांची चित्रे

पिण्याच्या पाण्याची व्यवस्था– मौजे दमामे – तामोंड – भडवळे – कात्रण यांच्या गावाच्या सर्व पालकांच्या मदतीने पाण्याच्या पूर्वीच्या व्यवस्थेत सुधारणा करून पिण्याच्या पाण्याची नवीन व्यवस्था तयार करण्यात आली .

शाळेचे प्रवेशद्वार : 26 ते 27 वर्ष कालावधीत शाळेला प्रवेशद्वार नव्हते .न्यू इंग्लिश स्कूल दमामे विद्यालयाच्या कार्यक्षेत्रातील महत्त्वपूर्ण गाव 'तामोंड 'या गावातील सर्व ग्रामस्थांनी स्वतः पैसे उभा करून ग्रामस्थ विकास मंडळ तामोंड यांच्या सौजन्याने शाळेला प्रवेशद्वार करण्यात आले .

फुलपाखरू उद्यान व शालेय बगिचा – विद्यार्थ्यांच्या मदतीने फुलपाखरू उद्यान औषधी वनस्पतीचे उद्यान पोषक बाग व शालेय बगिचाची निर्मिती केली. विद्यार्थी या उद्यानाचा पुरेपूर उपयोग करतात. एवढेच नव्हे तर परिसरामध्ये फिरणाऱ्या फुलपाखराचा त्यांच्या दैनंदिन जीवनाचा अभ्यास करतात.



हॅन्ड वॉश स्टेशन – विद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री सतीश पड्याळ यांच्या माध्यमातून नवीन हॅन्ड वॉश स्टेशन तयार करण्यात आले . शौचानंतर ,खेळल्यानंतर ,जेवणापूर्वी ,मधल्या सुट्टीत विद्यार्थी साबणाने स्वच्छ हात धुतात. यामुळे विद्यार्थ्यांच्या आजारपणाचे प्रमाण देखील कमी झाले .



हॅन्ड वॉश स्टेशन

दमामे – तोमोंड ग्रुप ग्रामपंचायतीचा वरदहस्त: ग्रामपंचायतच्या माध्यमातून शाळा सुशोभिकरणासाठी / स्वच्छतेसाठी दोन मोठे डस्टबीन, सॅनेटायझर, स्टॅन्ड, शरीराचे तापमान मोजण्याचे यंत्र, 5 मोठे नोटीस बोर्ड, सर्व वर्गामध्ये छोटे डस्टबीन, एवढेच नव्हे तर मुलींसाठी आवश्यक टाकाऊ सॅनेटरी पॅडचे भस्मिकरण यंत्रे हे देखील प्राप्त करून दिले.

सर्व सोईयुक्त मुला -मुलींचे स्वच्छतागृह – मुलींसाठी सॅनीटरी पॅडची व्यवस्था, टाकाऊ सॅनेटरी पॅड डस्टबीन, टाकाऊ सॅनेटरी पॅडची विल्हेवाट लावणेसाठी भस्मीकरण यंत्र, मुला मुलींना स्वतंत्र आरसा, वॉश बेसीन, हात धुण्यासाठी साबण, कपडे अडकवण्यासाठी खुंटी, स्वच्छ कंपार्टमेंट , लाईट व्यवस्था, अपंग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प, कमोड चेअर, पाणी इ. सोयीसुविधा स्वच्छतेसाठी निर्माण केल्या.

'मदतीचा एक हात शाळेला 'उपक्रमाचे आयोजन– सुंदर शाळा करण्यासाठी ग्रामस्थ ,पालक ,माजी विद्यार्थी ,समाजातील सर्व घटकांकडून **'मदतीचा एक हात शाळेला'** या उपक्रमांतर्गत बगीचासमोर जांभा दगडाचे बांधकाम , अपंग विद्यार्थ्यांसाठी कमोड चेअर, विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र चप्पल स्टॅन्ड , संपूर्ण मैदानाचे जी.सी.बी.च्या सहाय्याने सपाटीकरण इ. साठी मदत झाली .

कचरा व्यवस्थापनासाठी केलेल्या उपाययोजना -कचरा व्यवस्थापनासाठी शाळेने प्रत्येक वर्गामध्ये ,ऑफिस ,मुख्याध्यापक कक्ष, प्रयोगशाळा, संगणक कक्ष यामध्ये डस्टबीन ठेवले आहे. शाळेच्या व्हराड्यामध्ये दोन मोठे डस्टबीन.. त्यामध्ये ओला कचरा व सुका कचरा याची व्यवस्था केली आहे. स्वच्छतेचे धडे मिळण्यासाठी टाकाऊतून टिकाऊ वस्तूचा वापर देखील विद्यालयाने केला आहे. यामध्ये टाकाऊ टायरांमध्ये, डब्यांमध्ये झाडे लावणे, टाकाऊ कापडापासून संगणक कक्षात किबोर्ड, मॉनेटरसाठी कन्हर, टाकाऊ साड्यांपासून वर्गासमोर पायपुसणे याची सुंदर व्यवस्था केलेली आहे.

सांडपाणी व्यवस्थापन – विद्यार्थ्यानी हात धुतल्यानंतर किंवा बाहेर डबे धुतल्यानंतर जे सांडपाणी आहे त्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन केले आहे. वाया गेलेले पाणी तिथे लावलेल्या नारळ, केळी, लिंबू,आंबा,आळू, या झाडांमध्ये पाणी सोडले जाते.



–

स्वच्छ व सुंदर शाळेसाठी सर्व खोल्यांमध्ये मुबलक प्रकाश व्यवस्था ,फॅन ,वर्गखोल्यांमध्ये वेळापत्रक ,आरसा ,डस्टबीन ,लाईट व्यवस्था ,एवढेच नव्हे तर वर्ग खोल्यांमध्ये भिंती चित्रानी रंगविल्या आहेत .

प्रशस्त क्रीडांगण -विद्यार्थ्यांना खेळ खेळण्यासाठी बागडण्यासाठी विद्यालयामध्ये प्रशस्त क्रीडांगणाची व्यवस्था आहे .त्यामध्ये विद्यार्थी विविध खेळ खेळताना जसे की - व्हॉलीबॉल, कबड्डी , लांबउडी , उंचउडी , गोळाफेक, थाळीफेक, यांसारखे खेळ खेळले जातात.

फलनिष्पत्ती

1 . आसपासच्या गावातील ग्रामस्थांचा व विद्यार्थ्यांचा शाळेविषयीचे आकर्षण वाढले.
2 .आनंददायी , स्वच्छ व सुंदर शालेय वातावरणामुळे विद्यार्थ्यांना शाळेबद्दल आत्मीयता वाढली.
3. स्वच्छता विषयक विविध कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आरोग्याच्या समस्या कमी झाल्या.
4 .विद्यार्थ्यामध्ये स्वयंशिस्तीचे वातावरण निर्माण झाले.
5 .शालेय विद्यार्थ्याची 100 % उपस्थिती झाली.
6 .विद्यार्थी व पालक यांचा शाळेविषयीचा दृष्टीकोन बदलला .
7. शाळेला मदतीचा ओघ वाढला.

=====@=====

4) शाळेचे नाव : जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा ,तळणी ,ता.मोर्शी ,जि. अमरावती
मुख्याध्यापाकाचे नाव : घनशाम के. अरमळ
ई-मेल आयडी : amolarmal12031984@gmail.com



सातपुडा पर्वतांच्या पायथ्यांशी वसलेल्या अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील तळणी या छोटयाशा गावातील ही जिल्हा परिषदेची पूर्व माध्यमिक शाळा . शाळेत येणारे विद्यार्थी शेतकरी कुटुंबातील व आदीवासी समाजातील तसेच शेतमजूरी करणाऱ्या कुटुंबातील , दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील आहेत.

स्वच्छ व सुंदर शाळेसाठी राबविलेले उपक्रम पुढीलप्रमाणे ... **परीपाठात**

स्वच्छतेविषयी जागृती : वैयक्तिक स्वच्छतेचे धडे गिरवणे हा कार्यक्रम रोज परिपाठामध्ये सुरु असतो. त्या अंतर्गत वैयक्तिक शारीरिक स्वच्छता रोज तपासली जाते . त्यामुळे प्रत्येक विदयार्थ्यांमध्ये निटनेटकेपणा हे मूल्य अंगी रुजविले जाते .

वृक्ष दत्तक पालक योजना : झाडांचे संगोपन योग्यरीतीने व्हावे यासाठी प्रत्येक विदयार्थ्याला एक झाड दत्तक दिले जाते. त्यांनी आपल्या शेतात किंवा घराच्या परीसरात झाड लावून त्याची योग्य जोपासना करावयाची असते . शिक्षकांकडून त्याचे परिक्षण केले जाते. त्यामुळे विदयार्थी झाडाची खूप काळजी घेताना दिसतात. लहान वयातच त्यांना वृक्षप्रेम वाढीस लागते हा फार मोठा फायदा या उपक्रमातून दिसून आला.

हॅन्डवॉशची सुविधा : विदयार्थ्यांनी जेवणाआधी हात स्वच्छ धुवावेत व नंतर जेवण करावे यासाठी शाळेमध्ये हॅन्डवॉशची सोय केलेली आहे. विदयार्थी त्याचा नियमित वापर करतात आणि यामुळे विदयार्थ्यांचे अनेक रोगापासूनसंरक्षण करुन आपण त्याचे आरोग्य सुरक्षित ठेवू शकतो.

फलनिष्पत्ती :

गाडगेबाबा स्वच्छता अभियान अंतर्गत येणारा स्वच्छ विदयालय पुरस्कार सन 2021-22 मोर्शी तालुक्यामधून प्रथम क्रमांक पटकविण्याचा बहुमान या शाळेला प्राप्त झाला


SWACHH VIDYALAYA PURASKAR 2021-22
District Level Award - Sub Category
This is to certify that Z P PRE MID SCHOOL TALNI
School With UDISE+Code 27071107501 has received the
District Level Award in Swachh Vidyalaya Puraskar 2021-22 in the sub category
of TOILETS with a score of 76 %
with ★★★★ rating
District Collector
Sub Category Wise Self-evaluation Scores
Rating Norms

शाळेला मिळालेला पुरस्कार

=====@=====

5) **शाळेचे नाव** : जिल्हा परिषद शाळा , डांभुर्णी , ता. यावल ,जि.जळगाव

मुख्याध्यापकाचे नाव : श्री.भारत पुंडलिक पाटील

ई-मेल आयडी : bharatpatil9536@gmail.com



जिल्हा परिषद शाळा , डांभुर्णी या शाळेची सन 2018 मध्ये अतिशय वाईट अवस्था होती. पण शिक्षकांच्या अथक परिश्रमातून तसेच लोकसहभाग , ग्रामपंचायत व लोकप्रतिनिधींच्या सहभागातून शाळेला नवीन रूप प्राप्त झाले आहे. नक्कीच यामुळे विद्यार्थी , पालक व ग्रामस्थ यांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत . पूर्वी शाळा कौलारू होती. शाळा पावसाळ्यात गळायची, शाळेत बाग नव्हती ,जी झाडे होती त्यांची निगा ठेवण्यात येत नव्हती . विद्यार्थी गुणवत्ता विकास पाहिजे तसा नव्हता. पण शाळेत बदलीने आलेल्या शिक्षकांच्या अथक परिश्रमातून व नियोजनाने तसेच लोकप्रतिनिधी , ग्रामस्थ व पालकांच्या सहकार्यातून शाळेची प्रगतीकडे वाटचाल सुरू झाली.

काम करत असताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. शिक्षकांनी सर्वप्रथम विद्यार्थी पटनोंदणी शंभर टक्के केली. पालक सहभागातून विद्यार्थी उपस्थित वाढवली .पालकांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच सरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य लोकप्रतिनिधी यांची मदत घेऊन भौतिक सुविधांमध्ये दुरुस्ती करण्यात आली . शाळेत सर्व शिक्षकांच्या मदतीने भव्य दिव्य अशी बाग तयार करण्यात आली . बागेत विविध प्रकारच्या



गुलाबाची झाडे लावण्यात आली.











बोलक्या भिंती ,सजावट व स्वच्छ ,सुंदर शालेय परिसर

फलनिष्पत्ती :

शाळा एक आकर्षणाचे केंद्र बनले . प्रसन्न वातावरणामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली. शाळेत मुला-मुलींसाठी अद्यावत असे स्वच्छतागृह आहे ,त्याचा विद्यार्थी पूर्णपणे वापर करतात , स्वच्छतेचे नियम पाळतात . शालेय वातावरण स्वच्छ व सुंदर बनले आहे .

=====@=====

6) **शाळेचे नाव** : जिल्हा परिषद शाळा बसरवाडी ,ता. जामखेड ,जि. अहमदनगर
मुख्याध्यापकाचे नाव : श्री.एकनाथ पंढरीनाथ चव्हाण
ई-मेल आयडी : eknathchavhan782@gmail.com



बालाघाटातील डोंगररांगात भैरवनाथांच्या आशीर्वादाने पावन झालेल्या भूमीत बसरवाडी हे ठिकाण अहमदनगर जिल्ह्यातील जामखेडपासून १३ किलोमीटर अंतरावर अतिशय दुर्गम भागात आहे . कोणत्याही वाहनाची सोय नाही , दुष्काळ हा कायम या लोकांच्या पाचवीला पुजलेला असे म्हणायला हरकत नसावी. संपूर्ण डोंगराळ भाग असल्याने पाण्याची टंचाई तर आहेच पण उपजीविकेसाठी चांगल्या प्रकारची शेतजमीनही नाही . साधारणपणे 350 लोकसंख्या असणारी ही वाडी उपजीविकेसाठी ऊस तोडीसाठी स्थलांतरित होते. पूर्वी या शाळेत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नव्हती . हात पंपाला येणारे पाणी पिणे योग्य नसून गाळमिश्रित होते. वर्ग खोल्या , शाळेची इमारत भकास अवस्थेतील , गळके पत्रे, पडक्या भिंती, नादुरुस्त खिडक्या अशी अवस्था होती.



शाळेची पूर्वीची इमारत -गळके पत्रे,पडक्या भिंती, नादुरुस्त खिडक्या

मैदानाची उपलब्धता :

शाळेला खेळायचे मैदान नाही, त्याच्यावरच खडक असल्यामुळे मैदान तयार करण्यास अडचण होती.



अथक प्रयत्नातून तयार केलेले मैदान

शाळेचा परिसर शाळेचा परिसर स्वच्छ करून खडक फोडून त्यामध्ये दगड व माती भरून मैदानाचे सपाटीकरण करण्यात आले मैदानात लाल माती टाकून खोखो व कबड्डीचे खेळाचे मैदान तयार करण्यात आले

बेंचची सुविधा : वर्गात मुलांना बसण्यासाठी जास्त प्रमाणात जागा नव्हती . नादुरुस्त सामान म्हणजे थोडक्यात अडगळ होती . शाळेत वर्गात आनंददायी वातावरणाचा अभाव दिसून येत होता .बसायला बेंच नव्हते . सर्व वर्गात मुलांना बसण्यासाठी बेंच उपलब्ध करून देण्यात आले. तसेच आकर्षक बैठक व्यवस्था करण्यात आली.

संरक्षण भिंत : शाळेला संरक्षण भिंत नव्हती संरक्षक भिंत नसल्यामुळे रोपे लावली तरी वाडीतील गुरांमुळे रोपे येत नव्हती . संरक्षण भिंत लोकसहभागातून शाळेत संरक्षण भिंत तयार करून भिंतीवर शैक्षणिक अभ्यासक्रमाचे लेखन करण्यात आले त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत भर

पडली तसेच शाळेला गेट बसवण्यात आले त्यामुळे बाहेर उपद्रव कमी झाला शाळेच्या नावाचा सुंदर फलक तयार करून दर्शनी भागात बसवण्यात आला.

स्वतंत्र शौचालय सुविधा : मुला मुलींचे शौचालयांमध्ये पाणी नसल्याने त्याचा वापर होत नव्हता.मुख्याध्यापक व शिक्षक सर्वांनी एकत्रित प्रयत्न करून लोकसहभागातून या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. मुला-मुलींसाठी स्वतंत्र शौचालयाची सुविधा करण्यात आली. प्रत्येक टॉयलेट युनिटमध्ये पाण्याची व्यवस्था आणि हात धुण्यासाठी सर्वत्र व्यवस्था करण्यात आली . त्यामुळे शंभर टक्के विद्यार्थी त्याचा वापर करू लागले .






शौचालय सुविधा *हात धुण्यासाठी व्यवस्था*

पोषण उद्यान :

शालेय परिसरात पोषण उद्यान तयार करण्यात आले आहे . त्यातील भाजीपाला शालेय पोषण आहारात वापरला जातो.






पोषण उद्यान व त्यातील भाजीपाला

गांडूळ खत प्रकल्प :

ओला आणि सुका कचरा वेगळा केला जातो . शाळेमध्ये गांडूळ खत प्रकल्प सुरू केल्यामुळे विद्यार्थ्यांना नैसर्गिक खते व रासायनिक खते यामधील फरक माहिती झाला. गांडूळ खत प्रकल्पामुळे शालेय बाग ,झाडांना नैसर्गिक खत मिळाल्यामुळे पोषण चांगले होऊन टवटवीतपणा दिसून येतो. तसेच कचऱ्याचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन होते.



निसर्ग शाळा :

शाळेमध्ये झाडांना ओटे तयार करून विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययन करण्यासाठी निसर्ग शाळेची निर्मिती करण्यात आली. विद्यार्थी रिकाम्या वेळेत निसर्गाच्या सानिध्यात येऊन स्वतःचा अभ्यास करतात. त्यामुळे विद्यार्थी आनंदाने शिक्षण घेता येते. शाळेमध्ये शालेय पोषण आहारात शिल्लक राहिलेले ,खरकटे अन्न विद्यार्थी चिमण्यांना खाऊ घालतात. त्यामुळे विद्यार्थी शालेय पोषण आहार घेण्याच्या वेळेस भरपूर चिमण्या संरक्षक भिंतीवर येऊन बसतात .

समारोप : अशा प्रकारे शिक्षक आणि मुख्याध्यापकांनी ग्रामस्थ पालकांच्या एकत्रित प्रयत्नातून शाळेचे रूप संपूर्णपणे बदललेले असून स्वच्छ व सुंदर अशी शाळा तयार झालेली आहे . याचाच परिणाम म्हणून शाळेला सन 2021 - 22 या वर्षात स्वच्छ विद्यालय पुरस्कारात बसरवाडी शाळेला राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे .

=====@====

क्षेत्र :

लोकसहभाग व सहशालेय उपक्रमातून

विद्यार्थी गुणवत्ता विकास

1. जि. प. उच्च प्राथ. शाळा चिचाळ मुले पं. स. पवनी जि. भंडारा
2. जिल्हा परिषद शाळा ,शिंदे चव्हाण मळा (भा)ता.खानापूर ,जि.सांगली
3. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,फुटाना,ता.कळमनुरी,जि. हिंगोली
4. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ,निमगाव खैरी ,ता. श्रीरामपूर ,जि. अहमदनगर
5. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कान्हेगाव , ता. सोनपेठ , जि. परभणी
6. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा , जांभूळ, ता. कल्याण, जि. ठाणे.
7. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, आखाडा बाळापूर ,ता. कळमनुरी,जि.हिंगोली

लोकसहभाग व सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास

1) **शाळेचे नाव** - जि. प. उच्च प्राथ. शाळा चिचाळ मुले पं. स. पवनी जि. भंडारा

मुख्याध्यापकाचे नाव - सौ. वेणू अनेराव

इ मेल - mangalaganvir08@gmail.com



विदर्भातील भंडारा जिल्ह्यात असलेल्या पवनी तालुक्यात वैनगंगा नदीवर बांधलेल्या (इंदिरा सागर प्रकल्प) गोसेखुर्द धरणाच्या अगदी जवळ असलेले चिचाळ हे गाव. गावात धनगर, तेली, बौद्ध समाजाचे लोक अधिक राहतात.परिसरातील बरीच शेती गोसे प्रकल्पाच्या पाण्याखाली असल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे . साक्षरतेचे प्रमाण बऱ्यापैकी असूनही रोजगार नाही. त्यामुळे शेती आणि मेंढीपालन हा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अधिक आहे.जवळपास ९५० घरे असलेल्या चिचाळ या गावाची लोकसंख्या ३९०० च्या आसपास आहे.गावात एकाच परिसरात आमची जिल्हा परिषदेची मुलांची आणि मुलींची १ ते ७ पर्यंतची उच्च प्राथमिक शाळा आणि ८ ते १२ पर्यंत हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज आहे. आजूबाजूच्या गावांमध्ये खाजगी शाळांचे प्रमाण अधिक आहे. आणि गावात खाजगी इंग्रजी कॉन्व्हेंट शाळा आहे. इंग्रजी शाळेकडे पालकांचा ओढा जास्तच असल्याने गावातील बरीच मुलं कॉन्व्हेंट मध्ये तसेच खाजगी शाळेत शिकायला जाणारी .

आजूबाजूच्या गावांमधील खाजगी शाळा आणि गावातील खाजगी इंग्रजी कॉन्व्हेंटकडे पालकांचा ओढा जास्तच असल्याने गावातील बरीच मुलं कॉन्व्हेंट मध्ये तसेच खाजगी शाळेत शिकायला जात होती.खाजगी शाळांमध्ये विद्यार्थी मिळावे म्हणून पालकांना पैशाचे आमिष दाखवून शाळेतून शाळा सोडल्याचा दाखला काढायला भाग पाडले जात होते.



शाळेला जोडून कॉन्व्हेंट :

शाळेची पटसंख्या वाढावी या दृष्टीने शाळा व्यवस्थापन समिती व शाळेतील शिक्षकांच्या मदतीने शाळेच्या परिसरात नर्सरी ते केजी टू पर्यंत नवसंजीवनी कॉन्व्हेंट या नावाने कॉन्व्हेंट उघडण्यात आले. पालकांकडून एक हजार रुपये वर्षभराची फी आकारण्यात येते. प्रति शिक्षक तीन हजार रुपये गोळा करून हे वर्ग चालविले जातात . तसेच गावातीलच दोन उच्चशिक्षित शिक्षिकांची नियुक्ती या मुलांना शिकविण्याकरिता केली.

जवळपास चाळीस विद्यार्थी आज कॉन्व्हेंट मध्ये शिक्षण घेत आहेत त्यामुळे इ.१ ली च्या प्रवेशाचा प्रश्न सुटला. शाळेचा पट वाढण्यासाठी या कॉन्व्हेंटची मदत होत आहे.




के.जी. चे वर्ग

लोकसहभागातून शाळाविकास :

उत्कृष्ट शाळा व्यवस्थापन समिती शाळेला लाभल्याने शाळेच्या भौतिक विकासाकडे त्यांनी विशेष लक्ष घातले. शाळेला भौतिक सुविधा मिळवून देण्याकरिता ग्रामपंचायतीच्या मदतीने जिल्हापरिषदेकडे पाठपुरावा केला. शाळा डिजिटल करण्याच्या दृष्टीने शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. मनोजभाऊ वैरागडे, श्री.एस.एस साठवणे सर माजी मुख्या.तथा इतर सदस्यांकडून ३ एलईडी टीव्ही संच, शाळेतील शिक्षक श्री.भाकरे सर,श्री. चाचेरे सर,सौ. अनेराव मॅडम, शाळेतील सर्व शिक्षक यांचेकडून ४ टीव्ही संच तसेच श्री. हिरालालजी खंडाईत ग्रामसेवक चिचाळ यांचेकडून १ टीव्ही संच शाळेला भेट देण्यात आले. शाळेतील सातही वर्ग खोल्यांमध्ये स्मार्ट टी. व्ही.लावण्यात आले आहेत . वर्गांनुरूप अभ्यासक्रम त्यात अपलोड करण्यात आला आहे .शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. मनोजभाऊ वैरागडे यांचेकडून बोअरवेल, आशीषभाऊ मेश्राम ग्रामपंचायत सदस्य यांचेकडून कॉन्व्हेंटच्या मुलांना शूज,सॉक्स व नोटबुक्स,तसेच ग्रामपंचायतकडून लॅपटॉप, प्रिंटर, मुलांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळावे म्हणून RO, मध्यान्ह भोजनाच्या वेळी मुलांना बसण्या साठी चटया, फॅनशाळेला पुरविण्यात आले. लोकसहभागातून कराओके म्युझिक सिस्टम,सी.पी.यु.तथा प्रोजेक्टर

स्क्रीन घेण्यात आले. शाळेचे माजी विद्यार्थी श्री. निलेश काटेखाये यांचेकडून शाळेला लोखंडी कपाट, बुकशेल्फ अशा प्रकारचे

१७ हजार रुपयांचे साहित्य असे एकूण २ लक्ष रुपयांचे साहित्य शाळेला भेट देण्यात आले.शाळेचे माजी विद्यार्थी इंजिनिअर तथा सामाजिक कार्यकर्ते श्री. गणवीर साहेब नागपूर तसेच इतर माजी विद्यार्थी यांचे कडून इंटरऍक्टिव्ह बोर्ड देण्याची घोषणा करण्यात आली.

शाळा ही फक्त मुलांची असल्याकारणाने फक्त दारिद्र्यरेषेखालील मुलांनाच शासकीय योजनेतून गणवेश मिळतो. इतर मुले गणवेशापासून वंचित राहू नये म्हणून ग्रामपंचायतकडून उर्वरित सर्व मुलांना दोन गणवेश प्रत्येक वर्षी दिले जातात. सन २०२२-२३ मध्ये जि.

प.भंडारा कडून शाळेला डिजिटल वर्गखोली मंजूर झाली त्यात स्मार्ट टीव्ही, कराओके म्युझिक सिस्टम,बाके, डायस, चार्टस, तक्ते इ. साहित्य पुरविण्यात आले.



डिजिटल वर्गखोली

नाविन्यपूर्ण उपक्रमातून आनंददायी शिक्षण

सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देणे आणि विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुणांचा विकास करून आदर्श नागरिक निर्माण



करणे, बुद्धिमान पिढी घडविण्याबरोबरच कलागुणसंपन्न व मूल्य जपणारी पिढी तयार करणे, भविष्यात येणाऱ्या स्पर्धेला सक्षमपणे तोंड देऊ शकतील अशी मानसिकता विद्यार्थ्यांमध्ये तयार करणे अशी विविध उद्दिष्टे व ध्येये डोळयांपुढे ठेवून शाळेचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने शाळेमध्ये विविध प्रकारचे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात.

फलनिष्पत्ती :

शाळेत राबविण्यात येणारे विविध सहशालेय उपक्रम तसेच गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने घेतलेले उपक्रम यांचा पटसंख्या वाढीकरिता खूप उपयोग झाला. शाळेला लाभलेल्या सक्रिय अशा शाळा व्यवस्थापन समितीची मोलाची मदत शाळेला मिळाली त्याचबरोबर ग्रामपंचायत, शाळेचे माजी विद्यार्थी यांचीही मोलाची मदत शाळेला मिळाली आणि बघता बघता शाळेचा चेहरा मोहराच बदलला. शाळेची पटसंख्या वाढायला लागली. खाजगी इंग्रजी शाळेतून काढून पालक आपल्या पाल्यांचा प्रवेश आमच्या शाळेत करायला लागले.

=====@=====

2) **शाळेचे नाव – जिल्हा परिषद शाळा ,शिंदे चव्हाण मळा (भा)ता.खानापूर ,जि.सांगली**

मुख्याध्यापकाचे नाव – सौ.नूरजहान राजुद्दिन मुल्ला

इ मेल – zpshindechamala@gmail.com



जिल्हा परिषद शाळा शिंदे चव्हाण मळा (भा) ही खानापूर या तालुक्याच्या भाळवणी केंद्रांतर्गत येणारी इयता पहिली ते पाचवी द्विशिक्षकी शाळा आहे . जिल्हा परिषद शाळा ,शिंदे चव्हाण मळा ही वस्ती शाळा असून येथील पालकांमध्ये अशिक्षितपणाचे प्रमाण जास्त आहे. तसेच पाल्यांच्या शिक्षणाबाबत बाबत पालकांची उदासीनता होती. विद्यार्थ्यांना आकर्षण वाटेल अशी स्वच्छ सुंदर व आकर्षक शाळा बनवणे हे आमच्या समोरील एक मोठे आव्हान होते . शाळेला स्वच्छ व सुंदर बनवण्यासाठी आवश्यक असणारी आर्थिक तरतूदही लोक सहभागातूनच होणार होती, त्यामुळे शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने सर्व पालकांना एकत्रित करून पहिल्यांदा शाळेचे बाह्यांग बदलण्याचा निर्णय घेतला .





चौदावा वित्त आयोगाच्या निधीचा उपयोग करून शाळेचा कायापालट केला. संरक्षक भिंत व शालेय आवारामध्ये आकर्षक रंगरंगोटी ,चित्रमय प्रसन्न वातावरण तयार करणे , शाळेच्या आवारात पेविंग ब्लॉक बसवणे ही कामे करून घेतली व त्यानंतर विद्यार्थी आपोआप शाळेकडे आकर्षित होऊ लागले व गुणवत्ता सुधारण्यास मदत झाली. सर्वप्रथम ही परिस्थिती बदलण्यासाठी पालकांशी वारंवार संवाद साधण्याचा प्रयत्न केला. पालकांना पाल्यांच्या भविष्याविषयी समजावून सांगितले ज्या पालकांचे पाल्य इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये जात होते अशा पालकांच्या भेटी घेतल्या आणि त्यांना जिल्हा परिषद शाळांमध्ये असणारी गुणवत्ता व दर्जेदार शिक्षणाबद्दलची माहिती दिली आणि जास्तीत जास्त विद्यार्थी आपल्या शाळेमध्ये कसे दाखल होतील यासाठी गृहभेटी देऊन प्रयत्न केला. शाळेमध्ये विद्यार्थ्यांचा छान असा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला . त्याच्या माध्यमातून जवळजवळ चाळीस हजार रुपयांचा लोकसहभाग शाळेमध्ये जमा झाला आणि त्या रुपयांचा वापर करून शाळेमध्ये भौतिक सुविधा करण्यास , म्हणजे शाळेची रंगरंगोटी करण्यास सुरुवात केली .ग्रामपंचायत भाळवणीच्या सहकार्याने शाळेची संरक्षक भिंत बांधून घेतली, त्याच प्रमाणे आकर्षक किचन हँडवॉश स्टेशन इत्यादी सुविधा जलजीवन मिशन अंतर्गत करून घेतल्या. त्याच सोबत विद्यार्थ्यांसाठी शालेय वेळेपेक्षा इतर जास्त वेळ देऊन विद्यार्थी गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न केले. स्पर्धा परीक्षांचे आयोजन व स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन इत्यादीमुळे शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेमध्ये हे विद्यार्थी यशस्वी झाले .त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेमार्फत घेण्यात येणारे विविध बौद्धिक आणि क्रीडा स्पर्धांमध्ये ही शाळेतील विद्यार्थ्यांना सहभागी करून त्यांना मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये जिल्हास्तरापर्यंत मजल मारली.

फलनिष्पत्ती :

1. शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये वाढ झाली .

2. शाळेचा परिसर स्वच्छ सुंदर व आकर्षक झाला .

3. शाळेला I.S.O मानांकन मिळाले .

4.शाळेला जिल्हा परिषदेचा स्वच्छ सुंदर व आदर्श शाळा पुरस्कार प्राप्त झाला.

5.शिष्यवृत्ती परीक्षा व नवोदय परीक्षा मध्ये विद्यार्थी चांगल्या गुणांनी यशस्वी झाले.

6.शाळेचे आंतरबाह्य स्वरूप व गुणवत्तेत सुधारणा झाल्यामुळे शाळेचा पट 38 वरून 68 वर आला.

7 .विद्यार्थ्यांचा सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास झाला.



शाळेला मिळालेले पुरस्कार

समारोप :

उत्कृष्ट शालेय व्यवस्थापन, सहशालेय कार्यक्रमांचे आयोजन व लोकसहभागामुळे शाळेचे आंतरबाह्य स्वरूप बदलून शाळा स्वच्छ, सुंदर व गुणवत्ता पूर्ण होऊ शकते याचा अनुभव आला.

Video links

1. https://youtu.be/f5Cu4NWIMZY
2. https://youtu.be/_mvqHSijidw
3. https://youtu.be/Fn4x99m2RHQ
4. https://youtu.be/ln823m_Fam4
5. https://docs.google.com/presentation/d/1zVumwqNH8WmDyx2DEEPqWkGpMYttFHF/edit?usp=drivesdk&ouid=109029056808324933648&rtpof=true&sd=true
6. https://drive.google.com/file/d/10VyDVsYopQ9RpRboWWDqZTXJXUkPm7zx/view?usp=drisk

===== @ =====

3) शाळेचे नाव -- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,फुटाना,ता.कळमनुरी,जि. हिंगोली

मुख्याध्यापकांचे नाव -- श्री .विलास साटवा परघणे

इ मेल -- zppsfutana@gmail.com

जुनी शाळा *सध्याची शाळा*





हिंगोली शहरापासून साधारण 55 कि.मी. दूर असणारी कळमनुरी तालुक्यातील फुटाना ही आमची इयत्ता 1 ते 7 पर्यंतची शाळा. अतिशय दुरावस्थेतील शाळा इमारत. वर्गखोल्या,फरशी, दारे ,खिडक्या दुरुस्त करण्याचे व बोलक्या भिंती (रंगगोटी) करण्याचे शिवधनुष्य शिक्षकांनी 9 महिन्यापूर्वी उचलले पण ते पेलण्याची खरी ताकद दिली ती शाळा समितीने, पालकांनी, ग्रामस्थांनी आणि गावातील तरुण मंडळांनी !

'लोकसहभाग' हीच ग्रामीण शिक्षणाची खरी शक्ती असते ! आर्थिक व वस्तुरूपाने २ लाख पेक्षाही अधिक निधी लोकांनी आतापर्यत देवू केला आहे . ग्रामपंचायतनेही वित्त आयोगातील तब्बल 4 लाख निधी शैक्षणिक बाबीसाठी वळवला. जिल्हा परिषद शाळा दुरुस्ती निधी 5लाख रुपये प्राप्त झाले .या परिवर्तनाच्या कार्यात गावातील लहान थोर सर्व मंडळींची साथ लाभली .इतकेच काय गावातील स्थानिक शिक्षकांनीही शाळेच्या वेळेनंतर अनेक वेळा शालेय कामात हातभार लावला !



लोकसहभागातून परिसराचे सुशोभीकरण

लोकसहभागातून विविध उपक्रमाचे आयोजन :

वृक्षारोपण

शालेय परिसरात विविध फळझाडांची, फुलझाडांची लागवड करण्यात आली आहे. त्यांना पाणी देणे, पाण्यासाठी आळे घालणे, ट्रीगार्ड लावणे, झाडाचे संगोपन करणे, इ. कामे विद्यार्थी व समाजाच्या सहभागातून केली आहेत . प्रत्येक विद्यार्थ्याला झाड दत्तक देण्यात आलेले आहे. हे काम विद्यार्थी नियमितपणे करतात यातून श्रमप्रतिष्ठा या गुणाची रुजवणूक होते.

ई लर्निंग : विद्यार्थ्यांना काही बाबी आपण प्रत्यक्ष दाखवू शकत नाही. अशा वेळी शाळेतील LED चा वापर करून, संगणकाचा वापर करून तसेच काही मोबाईल ऍपचा वापर करत प्रत्यक्ष प्राणी शाळेत दाखवले. तसेच सूर्यमाला रचना कार्यपद्धती अगदी सूर्य तळ हातावर दाखवला. यातून सृजनशीलता , वैज्ञानिक दृष्टिकोन , चिकित्सक विचार आदी मूल्यांची रुजवणूक होताना दिसून येते . जि. प. शाळा फुटाणा येथे ई- लर्निंग साठी एक संगणक संच आहे, एक ५२ इंची एलईडी टीव्ही उपलध आहे. इतर ई साहित्यासाठी ग्रामपंचायततर्फे संगणकासह इतर साहित्य देण्याचे आश्वासन दिले आहे.

भोंग्यावरची शाळा : कोरोना काळात विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकून ठेवण्यासाठी अनेक प्रयोग करण्यात आले. त्यापैकी सर्वात यशस्वी झाला ते ' माझी भोंग्यावरची शाळा ' हा प्रयोग .

या भोंग्यावरून सकाळी नऊ वाजता सर्व विद्यार्थ्यांना आजचा अभ्यास भवानी मातेचे मंदिर किंवा बौद्ध विहारातील माईक,साऊंड सिस्टीम चा वापर करून वर्गवारी वाटप केला जाई. विद्यार्थी प्रत्यक्ष आपल्या अंगणात , अंगणातील ओट्यावर ,घराच्या गच्चीवर, बसून आजचा अभ्यास लेखन करत . केलेला अभ्यास 10 नंतर तपासणीचे कार्य केले जायचे .'मंदिरावर या आपली अडचण दूर करा' हा उपक्रम हाती घेतला. यासाठी आजी-माजी विद्यार्थी , काही शिक्षणप्रेमी यांची मदत मिळाली .

अडचणी व उपाययोजना :

१) शाळेचे सुशोभीकरण करण्यासाठी आर्थिक अडचण निर्माण झाली. पालक वर्ग व गावातील नागरिकांशी चर्चा करून लोकवर्गणीच्या माध्यमातून आर्थिक अडचण दूर करण्यात आली.

२) शाळेच्या परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष लावल्यामुळे त्याच्या संवर्धनाची, वाढविण्याची अडचण निर्माण झाली. ग्रामपंचायत कार्यालयाशी संपर्क करून सर्व वृक्षांना ठिबक सिंचन व्यवस्था करून झाडे जागविण्यात आले.

३) वर्ग - ५,६,७ च्या मुलांना डेस्कची आवड होती व डेस्कची गरज वाटू लागली. सरपंच, उपसरपंच सर्व सदस्यांशी चर्चा करून वित्त आयोगातून व्यवस्था करून डेस्कचा प्रश्न सोडविण्यात आला.

४) शाळेला स्वतः चा बोर किंवा विहीर नसल्यामुळे पिण्याच्या पाण्याची अडचण होती. गावकऱ्यांशी, ग्रामपंचायत कार्यालयाशी संवाद साधून सार्वजनिक विहिरीवरून पाण्याची व्यवस्था पाईप व नळाद्वारे सोडविण्यात आली.

फलनिष्पत्ती :

1) लोकसहभागातून व विविध उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनाची चालना मिळाली व विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास होण्यास मदत झाली.

2) पालकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला व पटसंख्या वाढ झाली.

व्हिडीओ लिंक:-

1) https://youtu.be/_zpW2itzrpY
2) https://youtu.be/46yhFyRCqog
3) https://youtu.be/HIamIu4LQ_E

=====@=====

4.शाळेचे नाव : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ,निमगाव खैरी ,ता. श्रीरामपूर ,जि. अहमदनगर



ही शाळा श्रीरामपूर तालुक्यातच नव्हे तर अहमदनगर जिल्ह्यातच गुणवत्ता आणि भौतिक सोयी याबाबत प्रसिद्ध आहे ती केवळ समाज सहभागामुळे. शाळा व्यवस्थापन समिती ही अत्यंत क्रियाशील असून शाळेच्या भौतिक आणि गुणवत्ता विकासात सक्रीय सहभागी आहे. सर्व समित्यांच्या सभेस पालकांचा सहभाग खूप असतो.

शाळेत लोकसहभागातून water फिल्टर (आरो सिस्टम), श्री वाघाई माता संगणक प्रयोगशाळा, handwash स्टेशन,शाळेची कमान, सर्व खेळाचे साहित्य, संगणक, sound सिस्टीम स्टेज, सर्व मुलांसाठी शूज , dustbin,व्हाईट बोर्ड ,LFD, प्रोजेक्टर यासारख्या अनेक सुविधा निर्माण करता आल्या.

विद्यार्थी आणि शिक्षक यांनी शाळेला कुंडी आणि झाडे भेट दिली आहेत . तसेच आपल्या घरी वृक्षारोपण केले आहे. आतापर्यंत अशी २२३ झाडे लावली आहेत .

गुणवत्ता वाढीसाठी राबवत असलेले सहशालेय उपक्रम :

1. तारखेनुसार पाढा : दररोज नियमितपणे जी तारीख असेल त्या तारखेचा पाढा विद्यार्थी मराठी आणि इंग्लिश मध्ये म्हणतात.
2. स्पेलिंग : परिपाठात दररोज 5 स्पेलिंग पाठांतरासाठी विद्यार्थी घेतात व दिवसभर त्यांचा सराव करतात.

3 . सामान्य ज्ञान : परिपाठात सामान्य ज्ञानावर आधारित रोज 5 प्रश्न परिपाठात विचारले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान वाढले आहे.

4,क्षेत्र भेट : श्री क्षेत्र वाघाई माता खेरी, श्री क्षेत्र चांगदेव महाराज पुणतांबा, श्री क्षेत्र सरला बैठ, तसेच परीसरातील रेशीम उद्योग, ऊस आणि द्वादश उद्योग यांना भेटी देऊन त्याबाबत माहिती संग्रहित केली .उद्योग प्रमुखांकडून त्या उद्योगाबाबतचे अनुभव घेतले.

5. चावडी वाचन : दर शनिवारी सर्व मुलांसाठी चावडी वाचन आयोजित केले जाते. चावडी वाचनामध्ये पालकांचाही सहभाग असतो. त्यामुळे मुलांच्या वाचनातील अडथळे दूर होण्यास मदत होते. तसेच पालकांनाही आपल्या पाल्याच्या वाचनातील दोष कळण्यास मदत होते.

6 . कविता गायन स्पर्धा : शाळेत कविता गायन स्पर्धा घेतल्या जातात. प्रथम क्रमांक मिळवलेल्या कु. राधिका दत्तात्रय वाघ हिने तालुकास्तरीय आणि जिल्हास्तरीय स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळवला.



शिक्षणाधिकारी यांचे हस्ते पारितोषिक स्वीकारताना

5. बचत बँक : या उपक्रमात विद्यार्थ्यांना बचतीची सवय लावावी म्हणून सर्व विद्यार्थ्यांचे बचत खाते उघडण्यात आले . विद्यार्थ्यांना बँकिंग व्यवहाराची सवय लाघावी म्हणून पासबुके देण्यात आली. विद्यार्थी स्वतः पैसे भरणा आणि पैसे काढायला शिकली तसेच त्यांना बचतीचे महत्व कळाले.

6.English Day : दर बुधवारी इंग्लिश डे साजरा केला जातो. या दिवशी इंग्लिश मध्ये विद्यार्थी परिपाठ घेतात. या दिवशी मुले एकमेकांशी इंग्लिश मध्ये संवाद करण्याचा प्रयत्न करतात. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची इंग्लिश विषयाची भीती कमी होऊन आवड निर्माण होण्यास मदत झाली आहे.

7. लेक शिकवा : या उपक्रमांतर्गत पालकांचे मुलींच्या शिक्षणाविषयी प्रबोधन केले जाते. मुला मुलींमध्ये कोणताही भेदभाव न करता मुले जसे वंशाचा दिवा आहे तशी मुलगीही पणती आहे ही भावना पालकांच्या मनावर बिंबवून मुलींच्या शिक्षणाविषयी पालकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे काम या उपक्रमातून पूर्ण झाले.

शाळेने मिळवलेले यश : 1.सन २०१६ मध्ये सार्थक योगेश शेजुळ यास स्कॉलरशिप मिळाली आहे.

2.काव्यतरंग जिल्हास्तरीय स्पर्धेत कु. राधिका दतात्रय वाघ दुसरा क्रमांक.

3. तालुकास्तरीय स्पर्धेत जानेश्वरी अरुण गाणार प्रथम.

4. विविध गुणदर्शन स्पर्धेत मुलांना प्रथम पारितोषिके प्राप्त.

=====@=====

5. **शाळेचे नाव** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कान्हेगाव , ता. सोनपेठ , जि. परभणी

मुख्याध्यापकाचे नाव : श्री. ठुले वैजनाथ कोंडिबा

ई-मेल आयडी : vaijnaththule123@gmail.com



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कान्हेगाव ता.सोनपेठ जि. परभणी ही एक निसर्गरम्य वातावरणात, गोदावरीच्या काठावर टुमदार अशी शाळा .

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कान्हेगावची स्थापना 1958 ची आहे. आज रोजी विद्यार्थी संख्या मुले 77 , मुली 93 अशी एकूण 170 असून वर्ग 1 ते 8 आहेत .

लोकसहभाग : कान्हेगाव येथील ग्रामसभांना 15 ऑगस्ट 2022 रोजी अमृत महोत्सवानिमित्त आवाहन करण्यात आले. त्या आवाहनानुसार गावातील नागरिकांनी, ग्रामपंचायत, मातापालक गट, बचत गट, युवक वर्ग, शालेय व्यवस्थापन समिती, पालक वर्ग, सर्व गावातील नागरिकांनी हिरीरीने सहभाग घेतला. पाच लाख रुपये लोकवर्गणी दिली. त्यामुळे शाळेची भौतिक सुविधा, ई-लर्निंग, शुद्ध पाण्याची व्यवस्था, विद्यार्थी गुणवत्ता वाढविण्यास मदत झाली.

नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारी शाळा :

जपानी भाषा : मातृभाषेबरोबच परकीय भाषा ज्ञान व्हावे या दृष्टीने विद्यार्थी यांना जपानी भाषेचे ज्ञान दिले जाते.

रात्र अभ्यासिका : विद्यार्थ्यांना गटागटाने अभ्यास करता यावा व बऱ्याच विद्यार्थ्यांकडे विजेची सुविधा नसते. त्यामुळे विजेची सुविधा असलेल्या पालकांच्या घरी मुलांना एकत्रित बसवून, रात्री 7 ते 9 या दरम्यान स्वयंअध्ययन करता यावे यासाठी रात्र अभ्यास गट करण्यात आले.

मुली दत्तक पालक योजना : गावातील ज्यांना मुली नाहीत त्यांच्या तर्फे गरजू मुलींना त्या शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य पुरविले जाते.

शालेय बँड व लेझीम पथक : बौद्धीक विकासाबरोबर विधार्थ्याचा शारीरिक व सांस्कृतिक विकास होण्याच्या दृष्टीने शाळेत उत्कृष्ट असे शालेय बँड व लेझीम पथक कार्यरत आहे.

क्रीडा क्षेत्र : शाळेच्या विद्यार्थ्यांनी केंद्र तालुका, जिल्हास्तर अशा विविध स्तरावर प्राविण्य मिळविले आहे.

स्पर्धा परीक्षा : शालेय स्तरावर असलेल्या नवोदय/ शिष्यवृत्ती **NMMS** अशा परीक्षेमध्ये शाळेचे 100% विद्यार्थी सहभागी होतात व 3 विद्यार्थी नवोदय प्रवेशासाठी व 2 विद्यार्थी **NMMS** साठी पात्र झाले आहेत.

आनंदाचे झाड उपक्रम : विद्यार्थी ,शिक्षक व मित्रांविषयी काही गोष्टी बोलण्यास लाजतात, टाळतात. दुसऱ्यातील गुण सांगण्याचे टाळतात. या उपक्रमाच्या माध्यमातून आनंदाचे झाड बनवून दुसऱ्याचे चांगले गुण लिहितात.

बाला उपक्रम : शाळेत व गावामध्ये इमारतीवर शैक्षणिक अभ्यासक्रम उतरवला आहे. विद्यार्थ्यांना ज्ञान ग्रहणाची संधी उपलब्ध केली आहे.

उपस्थिती ध्वज : दररोज सर्वात जास्त उपस्थिती असणाऱ्या वर्गासमोर ध्वज लावण्यात येतो.

शालेय ग्रंथालय : विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी यासाठी शाळेतील विद्यार्थी शालेय ग्रंथालय चालवतात.

बालसभा : विविध सांस्कृतिक कार्यक्रम, जयंती, पुण्यतिथी निमित्य विद्यार्थी बालसभेचे आयोजन करतात.

सहशालेय उपक्रम :

ज्ञानरचनावाद, आंतरराष्ट्रीय शिक्षण, ई-लर्निंग, संगणक ज्ञान, गणितीय जादू उपक्रम, भाषण स्पर्धा, **We Learn English** , प्रयोगातून विज्ञान , शास्त्रज्ञांची जयंती इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात. तसेच शालेय स्वराज्य मंत्रीमंडळ, महिला मेळावा, मराठी, गणित, इंग्रजी पेटीचा वापर, गायन स्पर्धा, योगासन, खोया और पाया, प्रश्न निर्मिती उपक्रम, विद्यार्थी वाढदिवस, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, तारखेनुसार पाढा उपक्रम, वर्ड बँक, प्रश्नमंजुषा उपक्रम ,हेल्थ क्लब, वनभोजन, स्मार्ट विद्यार्थी तयारी, दीक्षा ॲपचा वापर, मूल्य संवर्धन इ . उपक्रम घेण्यात येत आहेत.

वृक्ष संवर्धन : घनवन उपक्रमांतर्गत आंब्याची बाग तयार करण्यात आली आहे . त्यामुळे निसर्गरम्य शाळा दिसत आहे.

=====@=====

6 .शाळेचे नाव : जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा , जांभूळ, ता. कल्याण, जि. ठाणे.

मुख्याध्यापकाचे नाव : श्री. कोमलसिंग भावसिंग सोळुंके

ई-मेल आय डी : komalsingsolunke22@gmail.com



शाळेच्या भौतिक विकासाबरोबरच शाळेतील विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास होणे गरजेचे असते. केवळ बोलक्या भिंती हा गुणात्मक विकास घडवून आणू शकत नाहीत. त्यासाठी शाळाच बोलावी लागते म्हणजेच शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती, पालक यांना गुणवत्ता सिद्ध करावी लागते. मुख्याध्यापकांच्या बरोबरीने या इतर घटकांनाही यादृष्टीने अनन्य साधारण महत्त्व आहे. त्यामुळे हे सर्वच घटक शालेय नेतृत्वाचे अविभाज्य घटक आहेत.

नोकरीसाठी गावाबाहेर जाणारा कामगार-पालक नोकरी, व्यवसायानिमित्त जांभूळ गावातून शहरी भागात जाणारा कामगार-पालक हा आधुनिक विचारांनी भारलेला, समाज माध्यमांमुळे आकर्षित झालेला असल्याने, विचारांनी पुढारलेला असल्याने त्यांचे याकामी सहकार्य झाले.

ग्रामपंचायत जांभूळ यांनी दीड लाख रूपयाचे शाळा इमारतीवर लोखंडी पत्र्याचे छत टाकले. विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी स्टेज बनविले. लोकसहभागातून वीस ट्रॅक्टर लाल माती मैदानात टाकली व मैदानाचे सपाटीकरण केले. हॅण्डवॉश स्टेशन, खो-खो चे खांब, व्हॉलीबॉलसाठी नेट दिले. ग्रामपंचायतीने शालेय आवारात सी.सी.टी.व्ही. लावून दिले. ग्रामपंचायत जांभूळ मार्फत 'जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जांभूळ' च्या विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणा-या तज्ञांना मानधन दिले जाते. शाळेतील विद्यार्थ्यांसाठी क्रीडास्पर्धेसाठी स्पोर्ट कीट दिले जाते. समाजातील दानशूर व्यक्ती श्री. प्रमोद सावंत यांनी शाळेसाठी सभागृहाची उभारणी करून दिलेली आहे.

लोकसहभागातून शाळा विकास

1. **शिक्षक पालक संघ** :शिक्षक पालक संघाच्या प्रभावी बैठकांमुळे पालकांमध्ये आपल्या पाल्याविषयी व शाळेतील शिक्षकांविषयी आस्था निर्माण झाली. शाळेत क्रीडा व वाचन संस्कृती विकसित करण्यात त्यांनी हातभार लावलेला आहे.

2. **शाळा व्यवस्थापन समिती** : शाळा व्यवस्थापन समितीला शाळेच्या विविध योजना, उपक्रमांविषयी वेळोवेळी अवगत करून दिल्याने त्यांनी त्यादृष्टीने शालेय उपक्रमांत हिरीरीने सहभाग नोंदवून शालेय भौतिक विकास व विद्यार्थी गुणवत्ता विकास होण्यासाठी शैक्षणिक साहित्याचा पुरवठा विद्यार्थ्यांना होण्यासाठी सहकार्य केले. शाळेस बाहेरून इतर मदत मिळवून देण्यात शाळा व्यवस्थापन समितीचा सिंहाचा वाटा आहे. याची जाणीव विद्यार्थ्यांना असल्याने ते त्या साहित्याचा काळजीपूर्वक वापर करतात.

3. **पालक** : शाळेतील विद्यार्थी नियमित उपस्थित रहावेत यासाठी पालक जागृत आहेत. काही व्यावसायिक पालकांनी शालेय उपक्रमांत सहभागी होऊन आपल्या व्यवसायांविषयी माहिती विद्यार्थ्यांना करून देताना गणपतीच्या दिवसात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. येथील डेकोरेटर्स, पालक सदैव शाळेस सहकार्य करतात. मोठया कार्यक्रमांत विनामूल्य सेवा देतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्येही कलासक्त जीवनाविषयी आत्मियता निर्माण झालेली आहे.

नवोपक्रमांतर्गत शालेय गुणवत्ता विकास 1. **हसत खेळत पाढे पाठांतर** : हसत खेळत पाढे बोलण्याच्या सवयींमुळे पाठांतर न करता विद्यार्थ्यांचे पाढे पाठांतर झालेले आहेत.

2. **ज्ञानरचनावादी शैक्षणिक साहित्य निर्मिती** :शिक्षकांनी केलेल्या ज्ञानरचनावादी शैक्षणिक साहित्यनिर्मितीमुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता वाढीस लागलेली आहे. तसेच नवनिर्मितीसाठी ते नेहमी सज्ज असतात.

3. **विज्ञानगोष्टी व विज्ञानगीते** : याउपक्रमांमुळे गोष्टी व गीतांच्या माध्यमांतून विद्यार्थी विज्ञान विषय शिकण्यास प्रवृत्त झाल्याचे लक्षात येते.

4. **विविध संग्रह** : विद्यार्थ्यांनी शिक्षकांकडून प्रेरणा घेऊन केलेले विविध संग्रह इतर विद्यार्थ्यांना नवनिर्मिती व स्वयंअध्ययनासाठी प्रेरणा देतात. शाळेने क्रीडासंस्कृती विकसित केलेली असून त्याचा परिणाम शाळेतील विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तरावर सन 2018 - 2019 मध्ये प्राविण्य मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला आहे.



जेव्हा गाव शाळेत येतो

=====@=====

7.**शाळेचे नांव** : जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, आखाडा बाळापूर ,ता. कळमनुरी,जि.हिंगोली

इ मेल आय डी : zphsakbalapur604@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव : श्री. अशोक हनुमंतराव सुरवसे



आखाडा बाळापूर या गावाची लोकसंख्या 15000 पेक्षा जास्त आहे. येथे अनेक खाजगी शाळा, महाविद्यालये आहेत. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आखाडा बाळापूर ही इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतची शाळा असून या शाळेची पटसंख्या ही जवळपास 1000 पेक्षा जास्त कायम राहीलेली आहे, कारण येथे गुणवत्तापुर्ण शिक्षण नियोजनबद्ध दिले जाते. गावात सुरुवातीपासूनच शिक्षणाची आवड असणारे अनेक पालक, नागरीक, पदाधिकारी असल्याने येथे शैक्षणिक वातावरण आहे. यामध्ये गावातील विविध पक्षाचे लोकप्रतिनिधी, व्यापारी, सेवानिवृत्त कर्मचारी, नागरीक, तसेच युवा तरुण पिढी तसेच शालेय व्यवस्थापन समितीने अत्यंत भक्कम पाठिंबा दिला .

शाळेची दुमजली इमारत अपूर्ण बांधकाम स्थितीत होती, जिल्हा परिषद मार्फत पाठपुरावा करुन उपलब्ध निधीतून अर्धवट वर्गखोल्यांचे बांधकाम पूर्ण झाले. विद्यार्थी संख्या जास्त असल्याने वर्गखोल्या कमी पडू लागल्या तेंव्हा पाठपुरावा करुन राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत सात वर्ग खोल्याचे बांधकाम सन 2014 मध्ये पूर्ण झाले. श्री विजय देविदासराव बोंढारे यांनी त्यांच्या वडीलांच्या स्मरणार्थ भरीव निधीचे सहकार्य करुन व इतर नागरीकांच्या सहकार्याने शाळेचे सभागृह प्रोजेक्टरसह डिजीटल करुन घेतले. तसेच गांवातील नवशक्ती दुर्गा महोत्सव समितीने शाळेसाठी दोन हजार लिटरचे पाणीशुध्दीकरण यंत्र, वॉटर कुलरसह उपलब्ध करुन दिले. नवशक्ती दुर्गा महोत्सव समिती, शाळेतील शिक्षकवृंद कर्मचारी, सेवानिवृत्त शिक्षक, व्यापारी, पालक, ज्ञानेश्वरी वेल्डींग वर्क्स आखाडा बाळापूर यांच्या सहकार्याने शालेय परिसरात वृक्षलागवड करुन ट्रीगार्ड बसविण्यात आले. यातून शालेय परिसर हिरवळीने सुंदर झाला तसेच लोकसहभागातून शालेचे भव्य मैदान सपाटीकरण करुन विविध खेळाचे मैदाने तयार करण्यात आली गावातील नागरिकांच्या या संवेदनशिलतेमुळे शाळेची इमारत जणू भावनिकतेचे मंदीर बनली आहे.

मुख्य इमारतीबरोबरच विद्यार्थी संख्येनुसार पुरेशी व सर्व सोयींनी युक्त स्वच्छतागृहे, संरक्षक भिंत ,स्वतंत्र ग्रंथालय ,स्वतंत्र नाविन्यपूर्ण विज्ञान प्रयोगशाळा, डिजीटल सभागृह, संगणक कक्ष, हेल्थ केअर कार्यशाळा, मल्टीस्किल कार्यशाळा, " मियावाकी पद्धतीचे घनवन " अशा अनेक उल्लेखनीय बाबी सांगता येतील. लोकसहभागातून येथे 'हँड वॉश स्टेशन बसविण्यात आले आहे. ते हँड वॉश स्टेशन शाळेत दररोज वापरात आहे. सर्व विद्यार्थी अत्यंत शिस्तीत अवघ्या 5 मिनीटांत साबणाने हात स्वच्छ धुवून शालेय पोषण आहार रांगेत बसून घेतात. आहार वाटपाची ही पध्दत इतरही अनेक शाळांसाठी मार्गदर्शक ठरली आहे.



शाळेचे मियावाकी पद्धतीचे घनवन

शाळेमध्ये स्वतंत्र ग्रंथालय असून त्यात विद्यार्थ्यांसाठी 1000 व शिक्षकांसाठी 150 पुस्तके उपलब्ध आहेत. शिवाय शिक्षण संक्रमण, जीवन शिक्षण ,किशोर यासारखी मासिके वाचनासाठी उपलब्ध होतात. दररोज वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांचे गट पाडून वाचनाचा उपक्रम घेतला जातो.

इतर विषयांपेक्षा विज्ञान हा तर अनुभवण्याचा व जगण्याचा विषय आहे. या विचारांनी प्रेरित होऊन शाळेत "नाविण्यपूर्ण विज्ञान कक्षाची " उभारणी करण्यात आली आहे. येथे जवळपास 625 प्रयोगांच्या साहित्यांची मांडणी करुन अद्यावत केला आहे. विविध शास्त्रज्ञांच्या कार्याची माहिती सांगणारे तक्ते ही वाचनासाठी लावलेले आहेत . दररोज परिपाठात विद्यार्थी प्रयोगाचे सादरीकरण करतात.





नाविन्यपूर्ण प्रयोगशाळा व त्याचा लाभ घेतांना विद्यार्थी

उच्च प्राथमिक शिष्यवृती परीक्षा, पूर्व माध्यमिक शिष्यवृती परीक्षांमध्ये 10 ते 15 विद्यार्थी पात्र होतात. NMMS , NTS, MTS, परीक्षेमध्येही अनेक विद्यार्थी पात्र होतात. शाळेतील नवोदय प्रवेशपूर्व परीक्षेत प्रति वर्षी 4 ते 5 विद्यार्थी प्रवेश पात्र होतात. ही सर्व गुणवत्ता शाळेचे उत्कृष्ट नियोजन, जादा मार्गदर्शक वर्ग, जादा सराव परीक्षा, या बळावर साध्य होत आहे.

मागील पाच वर्षापासून शाळेने क्रीडा क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केले असून खो-खो मध्ये राज्यस्तरापर्यंत मजल मारली आहे. शाळेच्या 08 ते 10 विद्यार्थी, विद्यार्थीनींनी दरवर्षी खो-खो स्पर्धेमध्ये राज्यस्तरावर सहभाग नोंदविला आहे. तर शाळेतील शिक्षक श्री.चिरंजीवी कट्टा यांनी राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत उत्कृष्ट पंच म्हणून काम केले आहे.

तालुका,जिल्हास्तरावर झालेल्या निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा , चित्रकला स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, यामध्ये शाळेतील अनेक विद्यार्थ्यानी सहभाग नोंदवून उल्लेखनीय यश मिळविले आहे.

विद्यार्थ्यांना खेळाची आवड निर्माण व्हावी म्हणून विविध क्रीडा साहित्य उपलब्ध करुन ठेवले आहे . क्रिकेटचा सर्व संच , फुटबॉल , बास्केटबॉल, बॅडमिंटन, कॅरम, बुद्धीबळ अशा प्रकारचे साहित्य वापरले जाते. दरवर्षी शाळा, तालुका व जिल्हास्तरावर विविध क्रीडा स्पर्धाही घेतल्या जातात. त्यात शाळेतील विद्यार्थी सहभाग होतात.



लोकसहभागातून झाला जि.प.शाळेचा कायापालट



गुणवंत विद्यार्थ्यांवर लोकसहभागातून ३२ वर्षापासून पडत आहे कौतुकाची थाप

शाळेतील प्रत्येक कार्यक्रमात शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य स्वत: उपस्थित राहतात. विद्यार्थ्यांचे कौतुक करतात, प्रसंगी बक्षिसेही देतात. गावातील काही शिक्षण प्रेमी नागरिकांनी शाळेसाठी 100 आर जमीन शाळेला दान केली आहे. त्यावर भव्य शैक्षणिक संस्था निर्माण झाली आहे. गावातील दोन नागरिकांनी दोन कूपनलिका दिलेल्या आहेत. तसेच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वहयांचे वाटप केले . अशा अनेक आदर्श उदाहरणांचा वारसा लाभणे ही शाळेसाठी अभिमानास्पद बाब आहे.

फोटो व व्हिडीओ लिंक

1.https://drive.google.com/file/d/1CBifTNDwefrg61y7acFo_4shMFDoqGr/view?usp=drivesdk

2.https://drive.google.com/file/d/17NGgk8BAssor_v4VZ7V4NVLcYXdeAoo/view?usp=drivesdk

3.https://drive.google.com/file/d/1BsxJj1NB501YQ7XaNjvC4_TH2HSjni6H/view?usp=drivesdk

=====@=====

क्षेत्र :
सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास

1. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, माथा ,ता.कोरपना, जि.चंद्रपूर
2. जि.प.वरिष्ठ प्राथ. शाळा माहुरकुडा ,ता.अर्जुनी मोरगाव,जि.गोंदिया
3. मुंबई पब्लिक स्कूल ,चारकोपगाव मराठी ,कांदिवली (प,) ,मुंबई

सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास

1) **शाळेचे संपूर्ण नाव :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, माथा ,ता.कोरपना, जि.चंद्रपूर

ई-मेल आयडी : mathazpschool123@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव :विजय पत्रूजी बांदुरकरमोबा.9823282703

कोरोना महामारी (कोविड -19) काळात विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी शाळेने सहशालेय उपक्रमाचे नियोजन करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न केले .त्याची यशस्विता विद्यार्थी गुणवत्ता विकासातून दिसून आली. पुढीलप्रमाणे सहशालेय उपक्रम राबविण्यात आले .

निबंध स्पर्धा

विद्यार्थी लेखनात बोलीभाषेचा मोठ्याप्रमाणात वापर करत होते त्यांना प्रमाणभाषेत लिखाण करण्यासाठी मार्गदर्शन करून व जास्त सराव घेतला.

या उपक्रमांतर्गत **माझा आवडता क्रांतिकारक** या विषयावर आमच्या शाळेतील एकूण 32 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी सुंदर लिखाण केले त्यात कु.प्रज्ञा तेजराज बुचुंडे वर्ग 7 वा हिने **जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक** मिळविला .

जिल्हा परिषद चंद्रपुर, DIET चंद्रपूर व रोटरी क्लब चंद्रपूर यांच्या विद्यमाने आयोजित ओडिशी **नृत्य(एकल) स्पर्धा**

विद्यार्थ्यांना ओडिशी गीताचे बोल आणि नृत्य समजून घेण्यात अडचणी येत होत्या. विद्यार्थ्यांना ओडिशी गीताचे बोल आणि नृत्य समजण्यासाठी प्रत्यक्ष चित्रफीत दाखवून अधिक सराव आणि मार्गदर्शन करण्यात आले.

ओडिशी नृत्यप्रकार (एकल) यात शाळास्तरावर एकूण 6 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यात **कु.तनुश्री रवींद्र हस्ते** वर्ग 7 वा हिने **जिल्हास्तरावरप्रथम क्रमांक** मिळविला .

माझी गोष्ट माझ्या भाषेत

विद्यार्थ्यांना सादरीकरणात अडचणी येत होत्या . विद्यार्थ्यांना गोष्ट समजण्यासाठी प्रत्यक्ष चित्रफीत दाखवून अधिक सराव आणि मार्गदर्शन करण्यात आले.

माझी गोष्ट माझ्या भाषेत यात शाळास्तरावर एकूण 6 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यात **कु.रुचि संदीप मडावी**वर्ग 2 रा हिने **जिल्हास्तरावर द्वितिय क्रमांक** मिळविला .

चित्रकला स्पर्धा

माहे जुलै 2022 मध्ये घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत आमच्या शाळेतील प्राथमिकस्तर व उच्च प्राथमिकस्तर एकूण 30 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये प्राथमिक गटातील **गणेश विलास कुमरे ,कु.श्रद्धा मनीष बेरड** वर्ग 4 था व उच्च प्राथमिक गटातील **कु. अमृता प्रशांत बावणे,नमन विठ्ठल वाढई वर्ग 7 वा** यांच्या चित्रांची जिल्हा स्तरावररील प्रदर्शनासाठी निवड झाली.

राष्ट्रीय विज्ञान दिन

शाळास्तरावर राष्ट्रीय विज्ञान दिन अंतर्गत एक अपूर्व विज्ञान महोत्सव आयोजित करण्यात आला.यात इयत्ता 1ली ते 7 वी पर्यंतच्या एकूण 98 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला . वैशिष्ठ्यपूर्ण व नावीन्यपूर्ण अश्या एकूण 57 वैज्ञानिक प्रयोग प्रतिकृती यांचे दैनंदिन जीवनातील महत्व व उपयोग यावर मांडणी करून सादरीकरण करण्यात आले . पंचायत समिती कोरपना येथील शिक्षण विस्तार अधिकारी ,विषय साधनव्यक्ती आणि फिरते विषय शिक्षक यांच्या चमूने या महोत्सवाला भेट देवून प्रयोग प्रतिकृती निरीक्षण व मूल्यांकन केले .या उपक्रमातून विद्यार्थ्यांचे वैज्ञानिक संबोध संकल्पना स्पष्ट झाल्या .

गोष्टीचा शनिवार

वर्ग 1ली ते 5 वी करिता दर शनिवारी मोबाइल द्वारे गोष्ट वाचन .मिस कॉल द्या गोष्ट ऐका. गोष्टीचा शनिवार उपक्रमांतर्गत गोष्ट वाचन सराव देण्यात आला .मुलांची वाचनाची अभिरुची वाढविण्यासाठी याचा उपयोग झाला.मुले विविध गोष्टी सांगू लागली .मुलांना आत्मविष्कार करण्याची संधी या उपक्रमातून साधता आली.

शिकू आनंदे

वर्ग 1ली ते 5 वी करिता आणि वर्ग 6 वी ते 7 वी करिता शिकू आनंदे या उपक्रमांतर्गत कला , कार्यानुभव,शारीरिक शिक्षण या विषयाचे ज्ञान देण्यात आले .विषयात रुची वाढविण्यास आणि पारंगत करण्यास वेगवेगळ्या घटकाद्वारे प्रत्यक्ष कृतीतून आनंददायी शिक्षण देण्यात येत आहे.

100 दिवस वाचन उपक्रम

100 दिवस वाचन अभियान उपक्रम आम्ही राबविला .विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्याचा विकास करण्यास अर्थपूर्ण वाचन होण्यास ,अभिरुची वाढविण्यास दिलेल्या विषयावर आधारित थिमनुसार दर आठवड्याला सराव घेण्यात आला. यातून वाचन संवाद कौशल्य विकास झाला.

वक्तृत्व स्पर्धा

आमच्या शाळेतील प्राथमिकस्तर-माझी देशशेवा/ऐतिहासिक थोर नेता विषयाकरिता एकूण 18विद्यार्थ्यांचा सहभाग. यात अनुक्रमे**कु.विश्रुती संजय सोयाम** हिची तालुकास्तरास निवड झालीव उच्च प्राथमिकस्तर सर्वधर्म समभाव / वैविध्यपूर्ण भारत विषयाकरिता एकूण 30 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला . **कु.तनुश्री रवींद्र हस्ते** वर्ग 7 वा हिने प्रथम क्रमांक तर **आदर्श मंगेश शेंडे** वर्ग 7 वा याचा द्वितीय क्रमांक आला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यामध्ये सभाधिटपणा गुण विकसित करता आला.

राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत सहभाग

CBEE PAINTING COMPETITION 2022-23

सदर स्पर्धेचे शाळास्तरावर केले. ज्यात गट 'ए' करिता एकूण 25 विद्यार्थ्यांचा सहभाग

होता . पैकी कु. तनुश्री रवींद्र हस्ते आणि कु. अमृता प्रशांत बावणेवर्ग 7 वा ह्यांची दोन चित्रे NTP CBEE PAINTING COMPETITION 2022-23 करिता पाठविण्यात आली. त्यापैकी कु. तनुश्री रवींद्र हस्ते हिची राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेस निवड झाली आणि ती SNDT Mumbai इथे दि.14/111/2022 ला ती राज्यस्तरीयस्पर्धेत सहभागी झाली.

फलनिष्पत्ती

विद्यार्थ्यांची 100% उपस्थिती दिसू लागली. विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासाची सवय लागली. विद्यार्थी नियमित स्वाध्याय / गृहपाठ सोडवू लागली.

समारोप:-

विद्यार्थीचित्रकला,निबंध लेखन ,नृत्य,कथाकथन,विज्ञानाचे प्रयोग प्रतिकृती मांडणी वसादरीकरण,वक्तृत्व,वाचन ,

कला,कार्यानुभव,शारीरिक शिक्षण अशा विविध उपक्रमात सहभागी होवू लागल्यामुळे सकारात्मक बदल घडून आला. त्याचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी मोठ्या प्रमाणात फायदा झाला.या सर्व सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास साधता आला .

=====@=====

2) **शाळेचे नाव** : जि.प.वरिष्ठ प्राथ. शाळा माहुरकुडा ,ता.अर्जुनी मोरगाव,जि.गोंदिया

इ मेल : krhatzade.1968@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव : श्री.के. आर. हातझाडे



खेड्यापाड्यामध्ये बालकांच्या आणि पालकांच्याही मनामध्ये आदराचे स्थान निर्माण करणारी वास्तू म्हणजे शाळा. ही केवळ दगड, विटा, मातीची नाही तर शाळेसोबत अनेकांच्या मनातील आपुलकी आणि सोज्वळ भावना जुळलेल्या असतात. शाळा बालकांना शहाणे करून सोडते. बालकांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचे बळ देते . त्यांच्या पंखामध्ये शक्ती भरून उंच आकाशात भरारी घेण्याचे सामर्थ्य देते. अनेक जण आपल्या शाळेचे ऋण फेडण्यासाठी फुढे येतात. आणि देणगीच्या रुपात निधी एकत्र करून आपल्याला उज्वल भवितव्य देणाऱ्या शाळेचा जीर्णोद्धार करतात आणि घडवतात ती 'स्वच्छ शाळा सुंदर शाळा.'

सन 1954 मध्ये स्थापन झालेली ही शाळा. मधली इमारत कौलारू आहे , बाकी सर्व इमारती ह्या पक्क्या व मजबूत बांधलेल्या आहेत. गावातील लोकांच्या सहकार्याने ह्या शाळेने बऱ्यापैकी अंग झटकून सुंदर पेहराव परिधान केलेला आहे. जसी शाळा दिसायला सुंदर व आकर्षक आहे.







स्वच्छ व सुंदर परिसर

शाळेने गुणवत्ता व दर्जेदार शिक्षणाचे व्रत कायम पाळले आहे. याच शाळेने डॉक्टर, इंजिनियर , प्राध्यापक , शिक्षक आणि अनेक शासकीय , खाजगी कंपनीत मोठ्या पदावर काम करणारे अधिकारी , एवढेच नव्हे तर उपजिल्हाधिकारी सुद्धा माहुरकुडा शाळेची देन आहे. शाळेमध्ये इयत्ता पहिली ते सातवी वर्ग असून एकूण पट संख्या 187 आहे. यामध्ये मुले 87 असून मुली 100 आहेत.

ग्रामपंचायत माहुरकुडा मार्फत विद्यार्थ्यांकरिता संगणकाची सोय करून देण्यात आली आहे. संगणकाद्वारे व वर्गात उपलब्ध असणाऱ्या स्मार्ट टीव्ही द्वारे विद्यार्थी नवनवीन माहिती स्वतः करीता उपलब्ध करून घेत आहेत .

बालभारती पुणे मार्फत प्रसारित होणारे विविध कार्यक्रम विद्यार्थ्यांना वर्गवार वेळापत्रकानुसार ऑनलाईन दाखविले जातात.

विद्यार्थी वाचन कुटी मध्ये आनंदाने वाचन करू शकेल असी सुंदर वाचन कुटी तयार करण्यात आली आहे. विद्यार्थी वाचन कुटीचा योग्य वापर करतात.

शाळेमध्ये राबविलेले जानारे विविध उपक्रम खालील प्रमाणे.

१) रंगीत वाचन कुटी

२) शैक्षणिक सहल, स्नेह संमेलन

३) बालसभा माझा वाढदिवस ,

४) रांगोळी स्पर्धा , वृक्षारोपण, निबंध स्पर्धा ,,

५) विविध जयंती राष्ट्रीय सण , रणेपुण्यतिथी साजरी क ,

६) क्षेत्रभेट ,

७) गावातील व्यवसायिकांच्या भेटी घेणे

८) दप्तरविना शाळा ,

९) हात धुवा नंतर जेवा.

फलनिष्पत्ती : वर्ष 2022 – 23 मध्ये शाळेची पटसंख्या 187 झालेली आहे . सन - 2021-22 ला 181 व सन 2020-21 ला 152 , सन 2019-20 ला 142 अशी होती . एकंदरीत पाहता पटसंख्येत वाढ झालेली आहे. गावातील विद्यार्थ्यांनी शाळेवर दाखविलेला विश्वास ही शाळेची जमेची बाजू आहे.

=====@=====

3) शाळेचे नाव :मुंबई पब्लिक स्कूल ,चारकोपगाव मराठी ,कांदिवली (प,) ,मुंबई
इ मेल : charkopgaonmarathischool@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव : श्रीमती प्रतिभा भालचंद्र ढोले

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात अभ्यासपूरक व सहशालेय कार्यक्रमांना महत्त्व आहे. मात्र अनेकदा अभ्यासपूर्वक कार्यक्रम म्हणजेच सहशालेय कार्यक्रम असा गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असते. शाळेत प्रत्येक विषयात जे शिकविण्यात येते त्याची अभिवृद्धी ज्या कार्यक्रमातून होते व ज्या कार्यक्रमातून या अभिवृद्धीचे प्रकटीकरण होते असे कार्यक्रम म्हणजेच अभ्यासपूरक कार्यक्रम उदाहरणार्थ - मातृभाषेतील एखादी कविता शिकवणे हा झाला अभ्यास आणि ती कविता ज्या पुस्तकातून घेतली त्या कवींच्या काव्यसंग्रहाबाबत अधिक माहिती मिळविणे, त्याचा रसास्वाद, काव्यगायन स्पर्धा इत्यादी गोष्टी अभ्यासपूरक कार्यक्रमाचा भाग ठरतात.

सहशालेय कार्यक्रम म्हणजेच शालेय उद्दिष्टांना धरून परंतु ज्या कार्यक्रमांना अभ्यासक्रमात विशेष स्थान असते, विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासातील ज्या पैलूंचा विकास शालेय अभ्यासक्रमातून शाळेच्या तासात साधता येत नाही अशा पैलूंचे अध्ययन व विकास करण्याची संधी या कार्यक्रमातून देता येते. या दोन्ही कार्यक्रमातील हे अंतर विद्यार्थी , पालक व शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समितीला शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच जून महिन्यात समजाऊन सांगण्यात येते. सहशालेय कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शाळेकडून ही पहिली पायरी आखली जाते. दुसऱ्या टप्प्यात संपूर्ण वर्षभराचे एकूण कामाचे तास, प्रत्यक्ष अध्यापनाचे तास, वर्षभरातील सुट्ट्या या सर्वांचा विचार करून सहशालेय कार्यक्रमांचे वार्षिक सर्वसाधारण वेळापत्रक तयार करण्यात येते. तिसऱ्या टप्प्यात सहशालेय उपक्रमांची त्यांच्या प्रकारानुसार विभागणी करण्यात येते. यामध्ये सर्वसाधारणपणे पुढील प्रमाणे उपक्रमांचे प्रकार निवडले जातात.





अ) बौद्धिक उपक्रम :

वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, कथाकथन स्पर्धा या उपक्रमांद्वारे सभाधीटपणा, सुसंगत विचार मांडणे, लेखनकला इत्यादी गुणांची जोपासना विद्यार्थ्यांमध्ये होते किंवा नाही हे पाहिले जाते.

ब) कलात्मक उपक्रम :

कार्यानुभवातून हस्तकला कृतींची निर्मिती, चित्रकला स्पर्धा, बाहुली नाट्य, रांगोळी, मेहंदी स्पर्धा आयोजित केल्या जातात. विद्यार्थ्यांची कलाभिरुची व सौंदर्यदृष्टी यांची वाढ होण्यास हे उपक्रम फायदेशीर ठरतात.

क)सांस्कृतिक उपक्रम :

थोर पुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी, विविध सण व उत्सव (सर्वधर्म समभाव) उदाहरणार्थ टिळक पुण्यतिथी, नेहरू जयंती विविध दिनविशेष, जसे-- हिंदी दिवस, वाचन प्रेरणा दिन, आंतरराष्ट्रीय बालिका दिन शिक्षण दिन इत्यादी. बैलपोळा, रक्षाबंधन, तिळगुळ समारंभ, फटाक्या विना दिवाळी, ख्रिसमस इत्यादी सण यासारख्या उपक्रमातून थोर व्यक्तींची माहिती व उच्च आदर्शांविषयी प्रेरणा देण्यात येते. सामाजिक व सांस्कृतिक जाणीवांचा विकास होण्यास हे उपक्रम महत्त्वाचे ठरतात.

(ड) सामाजिक व आरोग्य संवर्धक उपक्रम :

तंबाखूमुक्त शाळा, साक्षरता प्रसार, शून्य गळतीसाठी प्रभात फेरी, स्वच्छता, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व वृक्ष दिंडी, पथनाट्य, बुलबुल, योगा वर्ग, विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी इत्यादी उपक्रमातून विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्त्व, सहकार्य भावना, शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले जाते.

इ) शासनाकडून आयोजित केले जाणारे विविध उपक्रम :

सामाजिक परिवर्तनाकरिता व उदबोधनाकरिता शासन विविध कार्यक्रमाची आखणी करते. उदा आजादी का अमृत महोत्सव, एक भारत श्रेष्ठ भारत, वीरगाथा इत्यादी. यातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना, राष्ट्रप्रेम, सांस्कृतिक सामंजस्य (महाराष्ट्र ओडिशा) यासारख्या मूल्यांचा परिपोष करण्यासाठी शाळा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत असते.

वरील प्रमाणे कार्यक्रम ठरवून घेतले जातात. उपक्रमाच्या नियोजनाचे माध्यम प्रत्येक पाच विषय समित्या त्यावर एक- एक शिक्षक व विद्यार्थी प्रतिनिधी, शाळा व्यवस्थापन समिती सभासद याप्रमाणे समिती गठीत करण्यात येते. प्रत्येक उपक्रम पार पडल्यानंतर त्याचा अहवाल लिहिला जातो. नोंदी ठेवल्या जातात. दोन्ही सत्राच्या शेवटी सभा घेऊन उपक्रमांच्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात येतो. द्वितीय सत्राच्या शेवटी वार्षिक स्नेहसंमेलन

व पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. कार्यक्रमाचे नियोजन विद्यार्थ्यांकरवी केले जाते. शिक्षकांच्या मार्गदर्शनाप्रमाणे विद्यार्थी जबाबदारीच्या भूमिकेतून कार्यक्रम पार पाडतात..

फलनिष्पत्ती : मुंबई जिल्ह्यातील पश्चिम उपनगरातील कांदिवली तालुक्यातील 'मुंबई पब्लिक स्कूल चारकोपगाव मराठी' ही एक आदर्श शाळा म्हणून तिचा नावलौकिक आहे. सलग तीन वर्षे आदर्श शाळा म्हणून शाळेला पुरस्कार मिळालेला आहे. स्वच्छ विद्यार्थी पुरस्कार, बुलबुल मास्टर सन्मान, क्रीडा पुरस्कार, संगीत कला अकादमी तर्फे भारतीय गंधर्व महाविद्यालय प्रमाणपत्र, महापौर चित्रकला स्पर्धा इत्यादी विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे शाळेतील शिक्षकांनाही आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार, राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार, CENTA TEACHING PROFESSIONAL OLYMPIAD आंतरराष्ट्रीय पुरस्कार असे पुरस्कार मिळालेले आहेत. नवोपक्रमामध्ये राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्त शिक्षक हे शाळेचे वैभव आहे.

‘ सहशिक्षणाचा वारा ते नवोपक्रमांचा झरा ,
जिथे सदैव वाहतो ती आमची आदर्श शाळा’.

समारोप :सहशालेय उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सृजनशीलता शाळा सतत जपत असते. दिवाळीत गडकिल्ले बनविणे, फूड स्टॉल, क्षेत्रभेट, पाककृती स्पर्धा इत्यादींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर व्यक्तिमत्व विकासाचे संस्कार केले जातात. बालस्नेही आणि सहज शिक्षणाचा आनंद आमचे विद्यार्थी घेतात आणि त्यातूनच त्यांची प्रयोगशीलता खुलते. नव्या उंबरठ्यावर शिक्षणाचे नवे दरवाजे खुले करताना चार भिंतींमध्ये आणि चार भिंतीपलीकडचे शिक्षण उलगडून दाखवण्यासाठी प्रेरणादायी धडे देण्याचे माध्यम म्हणजे सहशालेय उपक्रम. रुळलेल्या वाटांपेक्षा नव्या वाटेने जाणाऱ्या शिक्षक व विद्यार्थ्यांच्या पाठीवर प्रोत्साहनाची थाप देणारे शिक्षणातील सर्व घटक शाळेच्या यशात आपली महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळेच ही उमेद आमच्या विद्यार्थ्यांमध्ये आशेचे स्फुल्लिंग चेतवत असते.

=====@=====

क्षेत्र :
शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेतील यश

1. न्यू हायस्कूल देवाळे ता. करवीर, जि. कोल्हापूर
2. इचलकरंजी हायस्कूल अॅन्ड ज्युनि. कॉलेज, इचलकरंजी, जि.कोल्हापूर
3. जि.प.पू.प्रा.शाळा निवजे क्र.१, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग

शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेतील यश

1) **शाळेचे नाव** - न्यू हायस्कूल देवाळे ता. करवीर, जि. कोल्हापूर **ई**

मेल - nhsdewale@gmail.com

मुख्याध्यापकांचे नाव - सौ. पुष्पा सर्जेराव टिपुगडे

शाळेला गुणवत्तेची वैभवशाली परंपरा लाभली असून कोल्हापूर जिल्ह्यात करवीर तालुक्यामध्ये शाळेचा मोठा नावलौकिक आहे. इयत्ता १० वी पहिल्या बॅच चा सन १९९३ चा निकाल ७२ % लागला असून प्रत्येक वर्षी निकालाचा आलेख उंचावत गेला आहे. गेली १५ वर्षे एस.एस.सी. निकालाची गुणवत्तापूर्ण परंपरा टिकवली असून प्रथम येणारे विद्यार्थी ९८ टक्के पर्यंत गुण मिळवून सडोली केंद्रामध्ये पहिल्या क्रमांकावरती आपली गुणवत्ता सिद्ध करतात.

एस.एस.सी. परीक्षेबरोबरच शिष्यवृत्ती, केंद्र शासनाकडून घेण्यात येणारी राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा (एन.एम.एम.एस.) सन २००७-०८ पासून सुरु झाली असून आजपर्यंत ११२ विद्यार्थी पात्र ठरले असून त्यांना प्रतिवर्षी इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंत वार्षिक १२ हजार रुपये इतकी शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. तसेच सन २०२०-२१ पासून सारथी ही राज्य शासनाची शिष्यवृत्ती (लक्षित गट - मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी -मराठा यांना) गेल्या २ वर्षात ८७ विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंत वार्षिक ९ हजार ६०० रुपये इतकी शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे... अशा प्रकारे या एन.एम.एम.एस. शिष्यवृत्तीतून चालू वर्षी ५० विद्यार्थ्यांना २० लाख १६ हजार रुपये इतक्या एकूण शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला आहे. तसेच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी) मध्येही शाळेने उज्वल यश संपादन केले आहे. यामध्ये सन २०१५-१६ पासून आजपर्यंत २२ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक बनले असून सन २०१८-१९ मध्ये एकूण ८ विद्यार्थी पात्र ठरले असून कु. सानिका राजाराम धुमाळ राज्य गुणवत्ता यादीत पात्र ठरली. तर २०२१-२२ मध्ये ७ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक ठरले आहेत.

शाळा बाह्य परीक्षेमध्ये (गणित प्राविण्य, विज्ञान प्रज्ञाशोध, हिंदी सुबोध, सा. शास्त्रे प्रज्ञा, एलिमेंटरी व इंटरमिजिएट, विज्ञान प्रश्न मंजुषा) यामध्ये विद्यार्थी तालुका व जिल्हा स्तरावर उज्वल यश संपादन करतात. विज्ञान प्रदर्शन आणि इन्स्पायर अवार्ड मध्ये शाळा सहभागी होत असून सन २०१३-१४ साली बहुउद्देशीय संयंत्र या उपकरणाची राज्यस्तरासाठी निवड झाली होती.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत सहशालेय कार्यक्रम अंतर्गत वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या जातात. तसेच आमच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा व राज्य स्तरावर यश संपादन केले आहे.

=====@=====

2) **शाळेचे नाव** : इचलकरंजी हायस्कूल अॅन्ड ज्युनि. कॉलेज, इचलकरंजी, जि.कोल्हापूर

मुख्याध्यापकांचे नाव : वरदा हेमंत उपाध्ये.

ई मेल : dktesihi@gmail.com

आजच्या स्पर्धेच्या युगात स्पर्धा परीक्षांना अनन्यसाधारण महत्व आलेले आहे. कारण इ १० वी / १२ वी / पदवी नंतर जर आपल्याला प्रवेश घ्यावयाचा असेल किंवा नोकरी मिळवायची असेल तर पात्रता परीक्षा (Entrance) जसे JEE, NEET.CET, NDA किंवा प्रशासकीय सेवेत जायचे असल्यास UPSC किंवा MPSC तसेच अनेक सेवांसाठी स्पर्धा परीक्षांचे आयोजन केले जाते. Campus interview च्या वेळी सुद्धा aptitude घेतली जाते. अशा स्पर्धा परीक्षामध्ये अधिक चांगले यश मिळवायचे असल्यास शालेय जीवनात स्पर्धा परीक्षेची ओळख झाल्यास यशाचे प्रमाण वाढते. म्हणून शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षेसाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रविष्ठ करणेची गरज आहे.

नियोजन व कार्यवाही :

प्रथम इयत्ता ५ वी ते १० वी पर्यतच्या इयत्ता साठी असणाऱ्या सर्व स्पर्धा परीक्षेची माहिती गोळा करण्यात आली . त्यातून महत्वाच्या वाटणाऱ्या अशा परीक्षेच्या संदर्भात अभ्यासक्रम , परीक्षेचे स्वरूप, परीक्षेचा महिना याची माहिती घेऊन शाळेला महत्वाच्या वाटणाऱ्या परीक्षांची निवड केली. * स्कॉलरशिप गणित प्राविण्य, प्रज्ञा, N.M.M.S. , M.T.S.E. , N.T.S.E , होमी भाभा बालवैज्ञानिक, विज्ञान प्रज्ञा शोध परीक्षा, इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा यासारख्या परीक्षांची निवड केली.

परीक्षेसाठी मार्गदर्शन करण्यासाठीचे मनुष्यबळ

या स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक तज्ञ नव्हते. त्यामुळे या परीक्षेसाठी मार्गदर्शन करणाऱ्या तज्ञ शिक्षकांचा शोध घेतला. त्यांचे पत्ते, भ्रमणध्वनी क्रमांक ,त्यांचे विषय तसेच कोणत्या परीक्षेसाठी मार्गदर्शन करतात याबद्दल माहिती मिळविण्यात आली. प्रथमतः चांगले विद्यार्थी निवडले व त्यामधील ज्यांच्या मनात किंवा पालकांच्या मनात या परीक्षांबद्दल अनास्था होती त्यांच्याकरीता मिटींग घेऊन शाळेने केलेले सूक्ष्म नियोजन त्यांच्यासमोर वेळोवेळी मांडले . त्यामुळे विद्यार्थी संख्या वाढली व नकारात्मक दृष्टिकोन सकारात्मक झाला .

सर्व शिक्षकांना अभ्यासक्रम पुरविण्यात आला. त्यांनी विषय घटक, यांचा अभ्यास करून काही शिक्षकांना त्या-त्या विषयांची व घटकांची जबाबदारी दिली.

सरावासाठी अधिकाधिक वेळ मिळणे या साठी शक्य तितक्या लवकर अभ्यासक्रम संपवला व अचूक तयारी साठी प्रथम घटकानुसार सराव चाचण्यांचे आयोजन केले त्यामधील सर्व शंकांचे निरसन केले त्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमावर आयोजित चाचण्या घेण्यात आल्या व त्यामधील शंकांचे निरसन करण्यात आले. जास्तीत जास्त विद्यार्थी यशस्वी करण्यासाठी मागील दोन-तीन वर्षाचा या संबंधित परीक्षेचा निकाल पाहून त्यातील cut off लक्षात घेऊन सराव चाचण्यांमधील गुणांचा आधार घेऊन त्यांचे गट पाडण्यात आले. यामध्ये राज्य गुणवत्ता यादी, जिल्हा गुणवत्ता यादी साठी या गटातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यामुळे थोड्याफार गुणांच्या तफावतीमुळे होणारे नुकसान टाळले गेले व यशाचा आलेख वाढला.

मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

विद्यार्थ्यांची परीपूर्ण तयारी व्हावी व सर्व घटकांना समान न्याय देता यावा यासाठी NTS व NMMS व स्कॉलरशिप परीक्षेसाठी तज्ञ मार्गदर्शकांच्या मदतीने शिबिराचे आयोजन केले. यामध्ये शहर, तालुका, जिल्हा, विभाग व राज्यपातळीवरील तज्ञ मार्गदर्शकाचे १५ दिवसांचे शिबिर आयोजित केले जाते . यामध्ये प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, अभ्यासक्रमधील महत्वाचे घटक, क्लृप्त्या , काठिण्यपातळी अधिक असलेल्या प्रश्नाची

चर्चा, शॉर्ट टेस्ट व त्यामधील शंका समाधान केले जाते. यामुळे विद्यार्थ्याला या परीक्षेला सामोरे जाण्यासाठी आत्मविश्वास निर्माण होतो व यशाचे प्रमाण आपसूकच वाढते.

फलनिष्पत्ती :

१. सन २०२१-२२ या सालामध्ये इ ५वी स्कॉलरशिप परीक्षेमध्ये २१० च्या पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २१ असून सर्वाधिक गुण २७० आहेत. इ. ५वी जिल्हा प्राविण्य परीक्षेतून प्रज्ञा परीक्षेस २६ विद्यार्थी निवडले व ५ जणांची जिल्हा गुणवत्ता यादीत निवड झाली.

२ . इ. ५वी महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक महामंडळाच्या परीक्षेमध्ये २ जणांना प्रशस्तीपत्र मिळाले.

३ .इ. ६ वी साठी असणाऱ्या होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेमध्ये ५ जणांची प्रात्याक्षिक परीक्षेसाठी निवड झाली.

४. इ. ६ वी विज्ञान प्रज्ञा परीक्षेमध्ये ४ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल मिळाले तर ७ जण प्रमाणपत्र धारक झाले.

५ . इ ८ वी स्कॉलरशिप परीक्षेमध्ये २१० पेक्षा जास्त गुण मिळवणारे (१७) विद्यार्थी असून सर्वाधिक गुण (२५६) आहेत.

६ . इ. ८ वी च्या N.M.M.S. परीक्षेमध्ये १८ जणांना शासकीय शिष्यवृत्ती प्राप्त झाली व ६ जणांना सारथी शिष्यवृत्ती प्राप्त

७ .इ. ८ वी च्या जिल्हास्तरीय गणित प्रज्ञा परीक्षेसाठी २७ विद्यार्थी निवडले व ४ जणांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली व ५ जणांना प्रशस्तीपत्र मिळाले. तसेच जिल्हयात द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणारे विद्यार्थी आमच्या शाळेचे होते.

८ .इ. ८ वी महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक महामंडळामार्फत घेणेत आलेल्या गणित प्रज्ञा परीक्षेमध्ये ४ जणांना शिष्यवृत्ती व पदक प्राप्त झाले तर ६ जणांना प्रशस्तीपत्र मिळाले. राज्य गुणवत्ता यादीमध्ये तीन विद्यार्थी मेरीट लिस्ट मध्ये होते.

९ . इ. ९ वी च्या होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेमध्ये १ जणाची प्रात्याक्षिक परीक्षेसाठी निवड झाली .इ.९ वी च्या विज्ञान प्रज्ञा शोध परीक्षेमध्ये १ जणाला गोल्ड मेडल मिळाले तर दोन जणांना प्रशस्तीपत्र मिळाले .

१० . वर्ष २०२० - २१ (कोवीड काळ) इ. ५वी स्कॉलरशिप परीक्षा - एकूण शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी - २२ ,
राज्य गुणवत्ता यादीतील विद्यार्थी -०२ , इ.८वी स्कॉलरशिप परीक्षा-एकूण शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी – १६

११ . इ. ८वी N.M.M.S शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी -२३

१२ . सारथी शिष्यवृत्ती धारक – १६

=====@=====

3)शाळेचे नाव व पत्ता – जि.प.पू.प्रा.शाळा निवजे क्र.१, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग

मुख्याध्यापकाचे नाव – श्री. विजय बबन धामापूरकर

इ मेल - vijaydhamapurkar2013@gmail.com

प्रत्येक वर्गात तीन प्रकारची मुले असतात. अतिशय हुशार,मध्यम हुशार व अभ्यासात मागे असलेली अशी असतात. सामान्यपणे मध्यम गटातील मुलांना डोळ्यासमोर ठेऊन अध्यापनावर विशेष भर दिला जातो. मागे असलेल्या मुलांसाठी विशेष उपचारात्मक वर्ग घेतले जातात.तर हुशार मुलांना इतर मुलांच्या पेक्षा थोड्या कमी मार्गदर्शनाने सुद्धा चांगले समजते. त्यांना दिशा देण्याची आवश्यकता असते.त्यामुळे शिष्यवृत्ती सारख्या उच्च स्तर असलेल्या स्पर्धा परीक्षेसाठी हुशार मुलांना प्रविष्ट केले जाते. अशा परीक्षेतील यश मुलांना आणखी प्रेरणा देत असतात. सदर यश आव्हानात्मक असले तरी प्रयत्नसाध्य नक्कीच असते याची खात्री होते. अशा मुलांचे यश पाहून पुढील वर्षी परीक्षेला बसण्यासाठी मागील इयत्तेतील मुलांना प्रेरणा मिळते, सकारात्मक विचार येऊन उच्च झेप घेण्यासाठी मानसिकता तयार होते. अशा प्रकारे शाळेत स्पर्धात्मक चैतन्यमय वातावरण तयार होते. स्पर्धात्मक परीक्षा नसतील हुशार मुलांवर अन्याय होतो त्यांच्यातील अधिक शिकण्याच्या उपजत वृत्तीला मारक ठरेल. तसेच मध्यम गटातील मुलांना अधिक उच्च स्तर गाठण्यासाठी आव्हानात्मक स्थिती निर्माण होणार नाही. यासाठीच ५ वी शिष्यवृत्ती वर अधिक भर देण्याचे ठरवले.

मुख्याध्यापक/ शिक्षक यांना आलेल्या अडचणी किवा अधिक केलेले प्रभावी काम -

सन २०२१ - २२ मध्ये माझ्या शाळेतील इयत्ता ५ वी मध्ये एकूण ७ विद्यार्थी होते.त्यापैकी ३ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्रविष्ट झाले. खरेतर सन २०१६ - १७ पासून शिष्यवृत्ती परीक्षेतील स्थिती निश्चितच समाधानकारक नव्हती. नेमके सांगायचे तर यशाची पार्श्वभूमीच नव्हती. शिष्यवृत्ती धारक तसेच उत्तीर्ण प्रमाण शून्य. अशा परिस्थितीत सदर परीक्षेत यश मिळवण्यासाठी शून्यातून सुरुवात करावी लागणार होती. हे काम निश्चितच आव्हानात्मक होते.

सन २०१७ ते २०२१ या कालावधीतील शिष्यवृत्ती परीक्षेचा आढावा

सन	पट	प्रविष्ट	पात्र
२०१६ /१७	०६	०२	००
२०१७/१८	०८	०३	००
२०१८/१९	०६	०३	००
२०१९/२०	०७	०३	००
२०२०/२१	०६	०२	००
२०२१/२२	०७	०३	०२

मागील पाच वर्षाचा शिष्यवृत्ती चा आढावा पाहता सदर परीक्षेमध्ये मुलांना उत्तीर्ण करण्याचे आव्हान होतेच. त्यात आणखी भर म्हणजे covid कालावधीतील दीड ते दोन वर्षात मुलांची झालेली अध्ययन क्षती म्हणजेच Learning Loss. वाचन, लेखन स्तर वाढवणे,भाषेच्या बाबतीत समजपूर्वक आकलनाची क्षमता व गती वाढवणे, इंग्रजीची समज वाढवून सातत्य ठेवणे, बुद्धीमत्तेतील तर्क , आकलन, गणितातील मुलभूत क्रियांचा पुरेसा सराव घेणे या सर्व बाबी प्रचंड आव्हानात्मक होत्या.

अशा परिस्थितीत अध्ययनापासून दूर गेलेल्या मुलांना शिकण्याच्या मूळ प्रवाहाकडे आणणे व शिष्यवृत्ती परीक्षेच्या दृष्टीने तयारी करून घेणे, सूक्ष्म नियोजन व मार्गदर्शनातील नियमितता यावर भर दिला.इंग्रजी भाषेच्या बाबतीत मराठी माध्यमातील मुलांची शब्दसंपत्ती वाढवणे हे नितांत गरजेचे असते.तरच आशयाचे आकलन होऊ शकते.म्हणून नियमित शब्द पाठांतरावर भर दिला.व्याकरणातील काळ या प्रकाराबाबत

फलकावर एकच विधान सर्व काळात व प्रकारात कसे लिहावे याचा चार्ट तयार केला. तो सातत्याने मुलांच्या नजरेसमोर राहील याची पूर्ण दक्षता घेतली. त्याच चार्ट मध्ये वाक्य बदलून सर्व प्रकारात कसे करावे हे त्यांच्याकडूनच करून घेतले. हे करत असताना नियमावर भर दिला नाही तर रचना [structure/pattern] वर भर दिला व त्याचा विविध वाक्यांचा सराव करून घेतला. त्यामुळे इंग्रजी भाषेचा जो मूळ पाया म्हणजेच काळ व रचना मुलांना चांगली समजली.कोणत्याही स्पर्धा परीक्षेतील यश हे सरावातील सातत्यावर अवलंबून असते. त्यामुळे अधिकच्या सरावावर भर दिला.इंग्रजी भाषेच्या बाबतीत vocabulary म्हणजेच शब्दसंपत्ती हा पाया आहे. ती समृद्ध झाली तर भाषा समृद्धी होते व आशय आकलन चांगले होते.म्हणून नियमित शब्द पाठांतरावर भर दिला. Names of animal and birds, their females, their young ones , their living places and their sounds यासारख्या अवघड घटकासाठी वेगळ्या पद्धतीचा अवलंब केला. पुस्तकातील पानाच्या झेरॉक्स प्रत्येकाला देऊन ३ ते ४ वेळा पेन्सील ने सोडवून घेतले.त्यामुळे चांगला सराव होऊन घटक पक्का झाला. अन्यथा केवळ पाठांतराने हा घटक मुलांना चांगल्या प्रकारे अवगत होणे शक्य नव्हते. मराठीतील म्हणी,वाक्प्रचार,शब्द समूहाबद्दल एक शब्द,अलंकारिक शब्द इ. घटकांची रोज 15 ते 20 पाठांतर यावर भर दिला.गणितातील उदाहरणे मुलांना फळ्यावर सोडवण्यास सांगितले तर त्यांचा आत्मविश्वास वाढून अचूकतेचे प्रमाण वाढते.असा माझा अनुभव असल्याने तशा प्रकारे सराव घेतला.

फलनिष्पत्ती : मुलांचा नियोजनबद्ध नियमित मार्गदर्शन वर्ग व सराव घेतल्याने तसेच सराव परीक्षेतील यशाच्या प्रेरणेने मुख्य परीक्षेत ३ पैकी २ मुले पात्र झाली. केंद्रात प्रणव प्रसाद नामनाईक ६ व्या व आर्या पंढरीनाथ जाधव ही 16 व्या क्रमांकार आहेत. ही बाब पालक व शाळेच्या दृष्टीने गौरवास्पद आहे. हे यश थोडेथोडके नव्हते.

समारोप-

एखाद्या शाळेच्या बाबतीत, वर्ग,मुलांच्या बाबतीत सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन नियोजनबद्ध सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास यश निश्चितच मिळते हे दिसून आले. उत्तीर्ण मुलांचे शाळा व्यवस्थापन समितीने अभिनंदन केले व सर्व पालक खुश आहेत. आता पुढील लक्ष १०० टक्के उत्तीर्णतेचे व मुलांना मेरीट मध्ये आणण्याचे आहे . यंदाया वर्षीच्या ४ थी व ७ वी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम परीक्षेसाठी मुले अत्यंत आवडीने व उत्सुकतेने बसली आहेत. मुलांच्या यशाचा आनंद शाळेला सतत प्रेरणा देत आहे.

=====@=====

क्षेत्र :
क्रीडा क्षेत्रातील यश

1. न्यू हायस्कूल देवाळे ता. करवीर, जि. कोल्हापूर
2. जि.प. उच्च प्राथमिक केंद्र शाळा कुंडी , ता. कारंजा जि. वर्धा

क्रीडा क्षेत्रातील यश

1. **शाळेचे नाव** - न्यू हायस्कूल देवाळे ता. करवीर, जि. कोल्हापूर

ई मेल - nhsdewale@gmail.com

मुख्याध्यापकांचे नाव - सौ. पुष्पा सर्जेराव टिपुगडे

शालेय गुणवत्तेबरोबरच शाळेतील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. 'वर्तमान युग मे खेल-कूद, गति, शक्ति और दम-खम का प्रतिक है!' प्रमाणे शाळेच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रामध्ये जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावरती विशेष नैपुण्य प्राप्त केले आहे ते पुढीलप्रमाणे -

१. सन १९९८-९९ मध्ये किनवट येथे झालेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा १७ वर्षाखालील मुली- प्रथम क्रमांक

२. सन १९९८-९९ मध्ये जिल्हा स्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा १७ वर्षाखालील मुली - प्रथम क्रमांक

३. सन २०१३-१४ मध्ये अमरावती येथे झालेल्या राज्यस्तर वुशू स्पर्धा : अमोल शंकर साळोखे- रौप्य पद ,
ओंकार अशोक धुमाळ - - कास्य पदक

४. सन २०१४-१५ मध्ये यवतमाळ येथे झालेल्या राज्य स्तरीय वुशू स्पर्धेमध्ये अनिल वसंत पाटील रौप्य पदक ,
प्रेम सरदार पाटील ७५ कि. वजनी गट - सुवर्ण पदक राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड (मध्य प्रदेश येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग) वैभव अशोक पाटील ६५ कि. वजनी गट रौप्य पदक - ऋतुजा विष्णू साळोखे ५६ कि. वजनी गट - कास्य पदक

५. सन २०१५-१६ मध्ये प्रतिराज दत्तात्रय पाटील ७० कि. वजनी गट - सुवर्ण पदक अनिकेत ईश्वर पाटील ८० कि. वजनी गट - रौप्य पदक नागेश दत्तात्रय लकुटकी ५२ कि. वजनी गट - रौप्य पदक प्राजक्ता तुकाराम ढेरे पाटील - नागपूर येथे झालेल्या राज्य स्तरीय रग्बी स्पर्धेत सहभाग.
शामबाला कृष्णात पाटील लंगडी या खेळामध्ये दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग.
१७ वर्षाखालील मुली कबड्डी तालुका स्तर तृतीय क्रमांक

६. २०१६-१७ मध्ये रितेश विष्णू साळोखे - बॉक्सिंग स्पर्धेत विभागीय स्तर

७.२०१७-१८ मध्ये संकेत शहाजी पाटील - औरंगाबाद येथे झालेल्या राज्य स्तर वुशू स्पर्धेत सुवर्ण पदक (दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग अभिजीत शिवाजी पाटील औरंगाबाद येथे झालेल्या राज्य स्तर वुशू स्पर्धेत रौप्य पदक
साक्षी शिवाजी जाधव - नेमबाजी स्पर्धेत विभागीय स्तर सहभाग

८. सन २०१८-१९ मध्ये प्रियांका जयसिंग पाटील जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धा द्वितीय क्रमांक प्रतीक्षा विलास माळी - जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धा द्वितीय क्रमांक ज्ञानेश्वरी मारुती माने - विभागीय बुद्धीबळ स्पर्धेत कृष्णा जिल्हास्तर बुद्धीबळ स्पर्धेत सहभाग

९. सन २०१९-२० मध्ये संकेत अण्णा पाटील - नेमबाजी विभागीय स्तर तृतीय
धैर्यशील धनाजी पाटील- गोंदिया येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय वुशू स्पर्धेमध्ये रौप्य पदक
सानिका धनाजी पवार - कराड येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय मैदानी भालाफेक स्पर्धेत कास्य पदक

९. सन २०२१-२२
आदित्य दिलीप पाटील - राज्यस्तरीय वुशू स्पर्धेत सुवर्ण पदक
प्रतिक कुंडलिक पाटील - राज्यस्तरीय वुशू स्पर्धेत सहभाग शुभम तानाजी पाटील- जिल्हास्तरीय वुशू स्पर्धेत सुवर्ण पदक ,रोहन मारुती पाटील - जिल्हास्तरीय वुशू स्पर्धेत रौप्य पदक

१०. सन २०२२-२३ पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय स्टुडंट ऑलंपिक खो-खो स्पर्धेत रौप्य पदक शुभम तानाजी पाटील, रोहन मारुती पाटील, आयुष संजय पाटील, अथर्व विठ्ठल पाटील - पंजाब येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड सत्यजित अरविंद चौगले - तालुका स्तरीय बुद्धीबळ स्पर्धा द्वितीय क्रमांक (जिल्हास्तर स्पर्धेसाठी निवड) तेजस दिगंबर निळकंठ - जिल्हास्तर स्पर्धेसाठी निवड आदर्श दिपक शेळके - जिल्हास्तर स्पर्धेसाठी निवड
महाराष्ट्र छात्र सेना कवायत स्पर्धेमध्ये उल्लेखनीय यश -

https://www.youtube.com/watch?v= S-0E2qZxKY

सन २०१८-१९ मधील यश https://www.youtube.com/watch?v=MSVbm4QVpt

लेझीम ! https://www.youtube.com/watch?v=v4yrVJsBELY&t=102s

सांस्कृतिक कार्यक्रम https://www.youtube.com/watch?v=-y1T4yW2uk0



Preview YouTube video Daivat Chhatrapati Lezim - New Highschool Dewale Tal-Karvat



=====@=====

2. शाळेचे नाव – जि.प. उच्च प्राथमिक केंद्र शाळा कुंडी , ता. कारंजा जि. वर्धा

ईमेल आय डी – hmkundi1234@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव – श्री. प्रशांत विठोबाजी माहुरे

खेळ माणसाच्या गरजा पूर्ण करतात आणि त्यातून माणसाला सामाजिक कौशल्य विकसित करण्याची संधीही मिळते . तसेच खेळामुळे मुलांच्या मानसिक क्षमता, तर्कक्षमता आणि निर्णय क्षमता विकसित होतात . जस –जसे मुले नवीन गोष्टी शिकतात आणि त्यात प्रभुत्व मिळवितात तसतसा त्यांचा स्वत:बद्दल आत्मविश्वास वाढतो . हा आत्मविश्वास त्यांना आव्हाने स्वीकारण्यास तयार करतो. आणि आत्मविश्वासपूर्ण विद्यार्थी तयार करण्यासाठी त्यांचा शारीरिक विकास साधण्यासाठी उच्च प्राथमिक केंद्र शाळा , कुंडीच्या पटांगणावर खो–खो ,कबड्डी , व्हॉलीबॉल ,लंगडी व इतर खेळांचा नियमित सराव घेण्यात येतो व शालेय पावसाळी स्पर्धा ,जिल्हा परिषद शाळांचा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव ,पायका क्रीडा स्पर्धा ,सी एम चषक स्पर्धा अशा स्पर्धांमध्ये शाळेच्या चमूने उत्कृष्ट प्रदर्शन केलेले आहे.

Kundi school yashogatha photos link –

https://drive.google.com/drive/folders/1NZhP-dUwCn5vbPk4jzwEACrD8TVZF-6m?usp=share_link

मैदानाची उपलब्धता नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे खेळ कुठे घ्यायचे ,सराव कसा करायचा हा प्रश्न शिक्षकांना पडला .मैदान समतल नव्हते . जमीन समतल करणे आवश्यक होते. त्यासाठी श्रमदान किवा निधीची आवश्यकता होती . ग्राम पंचायत , स्थानिक गावकरी व गावातील जय शक्ती क्रीडा मंडल व जय दुर्गा क्रीडा मंडळ यांच्या मदतीने मैदान समतल करण्यात आले . ज्यासाठी 20 ट्रॅक्टर माती मैदानात टाकण्यात आली .व मैदानाला समतल करण्यात आले . खो-खो साठी लागणारे पोल गावातील पालकाकडून फाटे आणून त्याला सुताराकडून पोल बनविले . व्हॉलीबॉल करिता लोखंडी पोल श्री . केशवराव भक्ते यांचेकडे असलेल्या लोखंडी पाइप पासून तयार करण्यात आले .

व्हॉलीबॉल व नेटशाळा समाज सहभाग निधीतून खरेदी करण्यात आले अशाप्रकारे गावातील लोकांनी आपआपल्या परीने मैदानाची निर्मीतीसाठी व क्रीडसाहित्य खरेदीसाठी मदत केली आणि मैदाननिर्मीतीनंतर खेळांचा सराव नियमित सुरू करण्यात आला.

फलनिष्पत्ती :

1. विद्यार्थी शाळेकडे आकर्षित झाले .
2. ज्यांना अभ्यासात रस नव्हता पण खेळाची आवड होती असे विद्यार्थी ज्यांचे गैरहजर राहण्याचे प्रमाण जास्त होते ते एकदम कमी झाले.
3. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला.
4. खेळाचे फायदे व महत्व विद्यार्थ्यांना समजले.
5. खेळातूनही भविष्य घडविता येते हे त्यांना समजले.
6. आव्हानांना सामोरे जाण्याचे कौशल्य ते शिकले.
7. शारीरिक विकास होण्यास मदत झाली.
8. अभ्यासाचा ताण कमी झाला.
9. विद्यार्थ्यांना आनंद मिळाला.

शाळेचे मुख्याध्यापक यांच्या नेतृत्वात सर्व शिक्षकांच्या एकत्रित प्रयत्नातून विद्यार्थ्यानी क्रीडा क्षेत्रात विविध स्तरावर सहभागी होऊन यश संपादन केले.त्यापैकी काही खालीलप्रमाणे-

2015-16 – जिल्हा क्रीडा अधिकारी मार्फत झालेल्या स्पर्धेमध्ये कु.प्रांजली करणाहके , कु.भाग्यश्री डवरे यांची नागपूर विभागस्तरावर निवड.

2015-16 – मध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी मार्फत झालेल्या पायका क्रीडा स्पर्धेमध्ये मुलींचा खो-खो चा संघ जिल्हास्तरावर अजिंक्य. त्यातूनच कु.प्रांजली करणाहके हिची सोनाई ता.नेवासा जिल्हा अहमदनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड व सहभाग .

2016-17 मधेही सलग दुसऱ्या वर्षीही कु.प्रांजली करणाहके हिची सांगली येथे झालेल्या राज्यस्तरीय पायका खो-खो स्पर्धेसाठी निवड व सहभाग .

2017-18 मधेही कु.वृशाली गजाम,कु.खुशबू धोंगडे,कु.श्रुति उके यांची राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड व सहभाग

पंचायत समिति कारंजा मार्फत होणाऱ्या तालुकास्तरीय बाल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात कुंडी शाळा चॅम्पियन

जिल्हा परिषद वर्धा मार्फत आंजी येथे झालेल्या जिल्हास्तरीय बाल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात मुलींचा खो-खो संघाला अजिंक्यपद प्राप्त

2018-19 कु.वृशाली गजाम, सागर येडमे, कु.अश्विनी डोंगर , कु.निकिता उइके यांची मूर्तीजापूर जिल्हा अमरावती राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड व सहभाग

2018-19 जिल्हा क्रीडा अधिकारी मार्फत झालेल्या पावसाळी शालेय क्रीडा स्पर्धेत मुलांचा संघ जिल्हास्तरावर अजिंक्यपद पटकावित भंडारा येथे विभागस्तरावर सहभागी .मा.देवेंद्रजी फडणवीस यांचे कल्पनेतून झालेल्या सी एम चषक स्पर्धेत मुलींचा संघ आर्वी विधानसभा स्तरावर अजिंक्य . सी एम चषक स्पर्धेच्या विजेत्यांचा आमदार मा. दादारावजी केचे यांचे हस्ते सत्कार व प्राप्त बक्षीस निधी मधून क्रीडा गणवेशाची खरेदी

2019-20 - जिल्हा परिषद वर्धा मार्फत वर्धा येथे झालेल्या जिल्हास्तरीय बाल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात मुलांच्या खो-खो संघाला अजिंक्यपद इतरही केंद्र व बीट स्तरावर कुंडी शाळेला खो खो व कबड्डी स्पर्धेमध्ये विजेतेपद मिळाले आहे

अशाप्रकारे कुंडी शाळेने खो-खो, व्हॉलीबॉल या खेळामधे विद्यार्थ्यांना प्रावीण्य प्राप्त करण्याकरिता विशेष प्रयत्न केलेले आहेत.

या खेळव्यतिरिक्त कबड्डी खेळातही मुलांची कबड्डी जिल्हास्तरपर्यंत मजल गाठली आहे

तसेच 2018-19 200 मीटर व 400 मीटर दौड शर्यतीत सूरज येडमे निखिल करणहके ,श्रेयस वैद्य या विद्यार्थ्यांचा जिल्हास्तरावर उत्कृष्ट प्रदर्शन करीत सिल्वर मेडल प्राप्त केलेले आहे सोबतच कु.खुशबू धोंगडे ही बुद्धिबळ स्पर्धेत तर जिज्ञेश डवरे हा टेबल टेनिस मध्ये जिल्हास्तरावर निवड झालेली होती.



सकाळ

क्रीडाक्षेत्रात कुंडी जि. प. शाळा राज्यस्तरावर

ध्यास गुणवत्तेचा

=====@=====

क्षेत्र :
पटनोंदणी व नियमित उपस्थिती

1. जि. प. उच्च प्राथमिक शाळा, दाभा,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती.
2. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ,एकेरी मळा ,ता.खानापूर ,जि. सांगली

पटनोंदणी व नियमित उपस्थिती

1. **शाळेचे नाव :** जि. प. उच्च प्राथमिक शाळा, दाभा,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती.


मुख्याध्यापकांचे नाव : सौ सविता विजय देशमुख,



सन 2021- 22 हे वर्ष अतिशय आव्हानाचे वर्ष. 2019 पासून कोरोना विषाणूमुळे समाजात एक दहशत निर्माण झाली होती. 2020 च्या एप्रिल मे महिन्यात हजारो लोकांचा मृत्यूही झाला. त्यामुळे पालक आणखीच हळवा झालेला होता. काही पालक तर शाळेतील मुलांना सर्दी खोकला आहे म्हणून शाळेत मुलांना पाठवतच नव्हते. अशा परिस्थितीत 2019 च्या मार्च महिन्यापासून शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थी घरीच होते . त्याही काळात शिक्षकांनी सर्वच विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. पण जेंव्हा 2021-22 मध्ये शाळा सुरु झाल्या तेंव्हा विद्यार्थ्यांची उपस्थिती एकदमच रोडावली. पालकांच्या भेटी घेतल्या, त्यांच्याशी संवाद साधून त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. तरीही परिस्थिती फारशी बदलत नव्हती. तेंव्हा गुणवत्ता हा विषय नंतरचा होता, त्याआधी विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवणे जास्त गरजेचे होते. म्हणून प्रत्येक मुल शाळेत कसे येईल याचा वेध घेणे सुरु होते. त्यासाठी राबवलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांपैकी 'उपस्थिती ध्वज' हा उपक्रम यशस्वी झाला. उपस्थिती वाढल्यानंतर गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यास सुरुवात करण्यात आली. हे करत असतांनाच पालकांना इंग्रजी विषयाचे जास्तच आकर्षण असल्याने English language development activities विद्यार्थ्यांमध्ये विकसित करून त्यांचे सादरीकरण पालकसभेत केल्याने पालकांचे समाधान झाले.

शिक्षकांना विषयासंदर्भात आलेल्या अडचणी- शाळा उघडल्यानंतर जेम तेम 50-60% एवढेच विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण होते. 100% मुलांनी शाळेत यावे यासाठी रोजच पालकांशी संपर्क करणे सुरु होते. उपस्थिती वाढविण्यासाठी अनेक प्रयत्न केले. त्यापैकी 'उपस्थिती ध्वज' या प्रयत्नाला चांगलेच यश मिळाले. पाहता-पाहता आठवडा, दोन आठवड्यातच लक्षणीय उपस्थिती वाढली.

उपरोक्त अडचणींवर मात करण्यासाठी शिक्षकांनी केलेल्या उपाययोजना - पटनोंदणीसाठी एक वेगळाच उपक्रम राबविला. शाळेची पटसंख्या वाढावी म्हणून पत्रके सुद्धा छापली व पालकांना घरोघरी पोहोचवले. शाळेने वर्षभर राबवलेले उपक्रम आणि विज्ञान प्रदर्शनामधील विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश याचा उल्लेख त्या पत्रकावर केला आणि फोटोपण छापले . त्यामुळे शाळेतील उपक्रम पालकांना माहीत झाले. घरोघरी लॅपटॉप नेऊन त्यांना शाळेतील उपक्रमांचे व्हिडिओज आणि फोटो दाखवले.



पालकांना देण्यासाठी तयार केलेली पत्रके

उपस्थिती ध्वज उपक्रम :

प्रत्यक्ष शिक्षणापेक्षा ऑनलाइन शिक्षणाला मर्यादा होत्याच. आता सर्वच विद्यार्थी दररोज शाळेत येणे गरजेचे होते . एक 'उपस्थिती ध्वज' तयार केला. त्याचं महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितलं. ज्या वर्गातील विद्यार्थी परिपाठाला जास्त संख्येने हजर राहतील. त्या वर्गाचा सत्कार करायचा व त्या विद्यार्थ्यांना 'उपस्थिती ध्वज' द्यायचा. तो 'उपस्थिती ध्वज' त्या दिवशी ज्या वर्गाला मिळाला त्याच वर्गात दिवसभर राहणार. दुसऱ्या दिवशी पुन्हा ज्या वर्गाची परिपाठाला उपस्थिती जास्त त्या वर्गाला दिला जायचा. ज्या वर्गाला 'उपस्थिती ध्वज' मिळायचा त्यांचा फोटो काढून त्या वर्गाच्या ग्रुप वर पाठवला जायचा. त्यामुळे पालकांनाही या उपक्रमाबद्दल माहिती होत होती.

उपक्रमाची फलनिष्पत्ती :

हळूहळू विद्यार्थ्यांमध्ये चुरस निर्माण झाली. उद्याचा उपस्थिती ध्वज आपल्यालाच मिळायला पाहिजे. एवढेच नाही तर घरी खेळतानाही ते एकमेकांना सांगायचे. उद्या घरी राहू नको. परिपाठाला हजर राहशील. उद्याचा उपस्थिती ध्वज आपल्यालाच मिळायला पाहिजे. विद्यार्थी परिपाठापासूनच शाळेत हजर राहू लागले. सर्वच वर्गांची उपस्थिती ही अगदी 95-100 % पर्यंत वाढली. वाडी- वस्त्यांवरील विद्यार्थी दररोज

शाळेत हजर राहू लागलेत. विद्यार्थी दररोज शाळेत उपस्थित राहिल्यामुळे शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास मदत झाली. अशाप्रकारे सहज सुचलेल्या उपक्रमाने विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवायला हातभार लागला.

सदर उपक्रमांची काही क्षणचित्रे व व्हिडिओ links:

1) https://photos.app.goo.gl/HCbYY9XQQ2Me4tHT9 2)https://photos.app.goo.gl/YYGHdRnkSwAfNoMq7

3) https://photos.app.goo.gl/zhbUrEqZfTLGy5BG7

=====@=====

2. **शाळेचे नाव** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ,एकेरी मळा ,ता.खानापूर ,जि. सांगली

मुख्याध्यापकाचे नाव :सौ.स्वाती रामचंद्र कोरे.

ई.मेल : swatimali1721985@gmail.com



इंग्रजी माध्यमातून शिकणे म्हणजे खरे शिक्षण अशी बहुतांश लोकांची मानसिकता झाल्याची दिसत आहे.कोणतेही **माध्यम** हे शिक्षणाचे **साधन** असले पाहिजे ते **साध्य** होता कामा नये.खरी गफलत इथे आहे.पालकांना नेहमी असे वाटते की जे आपल्याला नाही मिळाले ते सर्व आपल्या मुलाला मिळाले पाहिजे. इथे तो गणवेश, बूट ,भली ,मोठी अलिशान गाडी, आकर्षक इमारत या बाह्य देखाव्याला भुलतो .पण तो हे विसरतो की ,

' जिल्हा परिषद शाळा नाही कशात कमी...
आम्ही देतो सर्वांगीण विकासाची हमी..'

परिसरातील ६ ते १४ वयोगटातील बालकांचे सर्वेक्षण करणे, दाखल पात्र मुलांच्या घरी भेटी देणे, त्यांच्या पालकांशी चर्चा करून पालकांचे समुपदेशन करणे यावर भर दिला ,जेणे करून शाळेच्या पहिल्याच दिवशी आपला पाल्य शाळेत दाखल होऊ शकेल.

प्रत्यक्ष शाळा सुरु होण्यापूर्वी किमान २ पालक मेळावे घेतले.आणि याचा फायदा असा झाला की मुलांची शाळेविषयी जी भीती मनात होती ती कमी झाली . त्यांना शाळेत येण्यास पूरक वातावरण तयार झाले.या मेळाव्यात विविध मनोरंजक खेळ घेतले. मुलाची शाळेविषयी गोडी वाढली.

शाळेच्या प्रथम दिनी दाखल पात्र विद्यार्थ्यांना फुगे व गोड खाऊ देवून तसेच त्यांच्या आवडीच्या वस्तू देवून त्यांचे स्वागत करण्यात आले .

' आई प्रथम गुरु...
मग बाकी जग सुरु. '

या उक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांच्या मातांचे मेळावे घेऊन त्यांचे गट तयार करण्यात आले . तसेच दरआठवड्याला त्यांना मुलांकडून काही कृती करून घेण्यास सांगितले . त्यासाठी आवश्यक साहित्य सुद्धा पुरविले.यामुळे फायदा असा झाला की घरी आणि शाळेत अभ्यासाची गोडी टिकून राहिली .



माता पालक गट मुलांचा अभ्यास घेताना

मोबाईल वापरामुळे जग हे खूप जवळ आले आहे . महामारीच्या काळात मोबाईल हे एक प्रमुख साधन किंवा माध्यम म्हणून पुढे आले होते तोच धागा पकडून शाळेतील whatsapp ग्रुप तयार करून विविध माहिती , लिंक,अभ्यासाची चित्रफित पाठवून मार्गदर्शन केले. शाळेतील विविध उपक्रम हे शालेय तसेच इतर ग्रुप मध्ये प्रसिद्ध केले.अनेकवेळा status ठेऊन परिसरात viral केले. परिणामी पालक आणि इतरांचा शाळेकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक झालेला आढळून आला.

गुणवत्ता विकासासाठी विविध उपक्रम –

मन,मेंदू,आणि मनगट यांचा विकास म्हणजेच शिक्षण या उक्तीप्रमाणे शाळेत सर्वांगीण विकास घडवून आणनेसाठी विविध उपक्रम राबिविले जातात.

१) क्रीडा स्पर्धा.
२) चित्रकला रांगोळी स्पर्धा.

३) महापुरुषाची जयंती साजरी करणे.
४) वाढदिवस साजरा करणे.
५) तरंगते वाचनलय.
६) क्षेत्र भेट किंवा सहल.

फलनिष्पती -

शाळेच्या सर्वांगीण विकासातील सर्वात महत्वाचा टप्पा म्हणजेच पट नोंदणी.एकंदरीत शाळेच्या पटामध्ये झालेली लक्षणीय वाढ पुढील आकडेवारीवरून स्पष्ट होते.

कालावधी	एकूण पट	दाखलपात्र मुले	उपस्थिती टक्केवारी
सन २०२०	८	४	९५ ते १००
सन २०२१	१३	०५	९५ ते १००
सन २०२२	२६	१०	९५ ते १००

शाळेच्या पटात वाढ तर झालीच त्याच बरोबर अनेक मुलांनी विविध परीक्षेत यश सुद्धा संपादन केले. अप्रगत मुलांचे प्रमाणही नाममात्र राहिले.

LINKS : https://youtube.com/channel/UCWpafuE-26tPFEibs2TcTUw

https://youtube.com/channel/UCHEjyu9k3BeoPRnrNzHhCdw

=====@=====

क्षेत्र :
आनंददायी शिक्षणासाठी नवोपक्रम

1. जि.प.शाळा पिंप्रीहाट ता. भडगाव जि. जळगाव
2. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक नगर परिषद मराठी प्राथमिक शाळा, खामगाव ,ता. जि.बुलढाणा
3. जिल्हा परिषद हायस्कूल वरठी, ता. मोहाडी, जिल्हा भंडारा.
4. विनोबा भावे मनपा मराठी शाळा ,विनोबा भावे नगर, कुर्ला (पश्चिम) , मुंबई

आनदंदायी शिक्षणासाठी नवोपक्रम

1.शाळेचे नाव : जि.प.शाळा पिंप्रीहाट ता. भडगाव जि. जळगाव
मुख्याध्यापकाचे नाव : श्री. बाळासाहेब भाऊराव पाटील



' Work hard in silence late success make the Noise.'

'यशस्वी होण्यासाठी तुमची यशस्वी होण्याची इच्छा अपयश होण्याच्या भीती पेक्षा प्रबळ असली पाहिजे.'

" शिक्षण म्हणजे फक्त वही पेन नव्हे, तर बुद्धीला सत्याकडे भावनेला माणुसकीकडे शरीराला श्रमाकडे नेण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण होय.'

2018- 19 साली शाळेचे आवार पाहूनच उत्साह कमी होत होता . परिणामी शाळेची पटसंख्या ही कमी व या गावातील चांगल्या पालकांची मुले शेजारील गावामध्ये इंग्लिश मीडियम ला 70 ते 80 टक्के मुले जात होती . त्यामुळे येथे पटसंख्येचा प्रश्न तर होताच पण भौतिक वातावरणामुळे उपस्थितीची समस्याही बिकट होती.
आनंददायी शिक्षणाचा अभाव होता व त्यातल्या त्यात गावाचा सहभागही दिसत नव्हता. शाळेबद्दल गावात वातावरण निरुत्साही होते. अशा एक ना अनेक समस्या समोर ठाण मांडून बसल्या होत्या. तेव्हा सर्व शिक्षकांनी एकमताने गुणवतेचा ध्यास धरला व ही गुणवत्ता वाढविण्यासाठी , आनंददायी शिक्षणासाठी नवोपक्रम करायचे ठरविले.
उपाययोजना :

१) **गणवेशाचा रंग बदलला** :

बदल ही नवनिर्मितीची जननी आहे म्हणून सगळ्यात आधी शाळेचा गणवेश बदलला.



२) **शाळेची रंगरंगोटी व आवार सुशोभीकरण** :

ग्रामपंचायतकडे पाठपुरावा करून ग्रामपंचायतच्या सहकार्याने शाळेची रंगरंगोटी केली बोलक्या भिंती तयार केल्या व शालेय आवारात वृक्ष लागवड, फुल झाडांची लागवड करून शाळेचे वातावरण प्रसन्न वाटेल असे तयार केले व याचा परिणाम बाग जसे फुलल्यावर पाखरे जमा होतात तसेच शाळेचे वातावरण बदललेले पाहून पालक विद्यार्थी शाळेकडे आकर्षिले जाऊ लागले व परिणामी बाहेरगावी जाणारी मुले पालकांनी काढून जि. प.प्रा.शाळा पिंप्रीहाट येथे दाखल करू लागली. त्यामुळे शाळेची पटसंख्या वाढू लागली..

३) **खेळाचे साहित्य** :

मुलांचे मन शाळेत रमावे व शाळेत शिकताना वातावरण व मन आनंदी राहावे यासाठी आम्ही विविध खेळाच्या साहित्यांची खरेदी केली. फुटबॉल, दोरी उड्या, रिंगा, लगोऱ्या, बॅट-बॉल, लेझीम, थाळीफेक , स्माईली बॉल या साहित्यांचा वापर करून विद्यार्थी आनंदाने शाळेत येऊन खेळण्याच्या आनंद घेऊ लागले. व विद्यार्थी खेळाबरोबर आनंददायी शिक्षणाचा आनंद घेऊ लागले.

४) **सण-उत्सव साजरे :**

शाळेने शुभारंभ केला तो सण उत्सव साजरे करण्याचा व त्यातून लोकसहभाग मिळवूण शाळेविषयी आपुलकी निर्माण करण्याचा. यामध्ये सुरुवातीलाच छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या धुमधडाक्यात साजरी केली.



चिमुकला शिवाजी घोड्यावर स्वार झाला व ढोल ताशे डीजेच्या गजरात गावभर मिरवणूक निघून भगवा फडकू लागला घोड्यावरच्या शिवाजीला पाहून गावकऱ्यांचे डोळयांचे पारणे फिटले. महिला तर शिवाजी ची आरती करू लागल्या व जय भवानी जय शिवाजीने गाव निनादला. त्यानंतर येणारे सण उत्सव याप्रमाणे दणक्यात साजरे होऊ लागले .यामध्ये ग्रंथदिंडी , आषाढी वारी , प्रभात फेरी , वृक्ष दिंडी यांचेही मोठ्या उत्साहाने आयोजन केले जाऊ लागले .त्याचबरोबर दहीहंडी ,ख्रिसमस असे सण ही साजरे केले जाऊ लागल्यामुळे मुलांमध्ये उत्साह वाढला. याचा परिणाम म्हणून शाळेस प्रोजेक्टर, कंप्यूटर, साऊंड सिस्टिम टीव्ही मिळाला . तसेच विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी पिण्यासाठी आरो मशीन देखील मिळाले.

अध्ययन-अध्यापनात टिव्ही, प्रोजेक्टर, संगणकाचा वापर यानंतर शिक्षण अधिक आनंददायी व प्रभावी होण्यासाठी अध्यापनात प्रोजेक्टरचा, संगणकाचा वापर तसेच टीव्हीचा वापर शिक्षक करू लागले . सुरुवातीला आठवड्यातून जास्तीत जास्त वापर करून अध्ययन अध्यापन अधिक आनंददायी केले जाऊ लागले. तसेच कृतीयुक्त अध्यापनावर अधिक भर दिला जाऊ लागला यामध्ये खडे, मणी , पाने, परिसरातील वस्तूंचा वापर केला जाऊ लागला व विद्यार्थ्यांना स्वतः कृती करून शिकायला मिळत असल्यामुळे आनंद होऊ लागला.

शालेय गणवेशाचा रंग बदलल्यावर इंग्लिश मीडियम सारखी मुले दिसायला लागली. सोबत टाय, बेल्ट, बूट व ओळखपत्र यामुळे मुले व पालकही उत्साही झाली व या गणवेशामध्ये स्पोर्टचा ड्रेस देखील समाविष्ट असल्यामुळे मुलांचे चेहरे आनंदी दिसू लागले व नियमित शाळेत येऊ लागले.

तसेच शाळेची रंगरंगोटी झाल्यामुळे भिंती बोलक्या झाल्या . तसेच परिसरात फुलझाडे व सुशोभनीय झाडे लावल्यामुळे शालेय वातावरण अतिशय प्रसन्न झाले. रस्त्याने येणारे जाणारे देखील शाळेचे कौतुक करू लागले व त्यामुळे मुलेही शाळेत येण्यास उत्सुक झाली व बाहेरगावी दाखल असलेले विद्यार्थी गावाच्या शाळेत दाखल होऊ लागली. व शाळेचा पट देखील वाढला.

=====@=====

2. शाळेचे नाव:लोकमान्य बाळ गंगाधर टिळक नगर परिषद मराठी प्राथमिक शाळा, खामगाव ,ता. जि.बुलढाणा

मुख्याध्यापकांचे नाव : श्री श्रीराम उत्तमराव घोपे

ई-मेल आयडी : shriram ghope6722@gmail.com

जगप्रसिद्ध लोणार सरोवर स्थित असलेला विदर्भातील अनेक निसर्गरम्य ठिकाण असलेला बुलढाणा जिल्हा . बुलढाणा जिल्हा म्हटला की संपूर्ण देशात 'रजतनगरी' म्हणून ख्याती असलेलं खामगाव शहर समोर येते .

खामगाव शहराच्या अगदी मध्यभागात स्थित असलेल्या ,भक्कम कुंपण, भक्कम प्रवेशद्वार असलेल्या या शाळेचं प्रसन्न आणि आनंददायी वातावरण प्रत्येकाचं मन मोहून टाकते.

शाळेत दाखल होताना दाखल होताना मुलांच्या मनावर कुठलाही ताण न येता त्यांच्या जीवनाला योग्य दिशा मिळावी ,ती बालके शाळेत रमावी ,शाळेत त्यांची उपस्थिती नियमित रहावी ,त्यांना शाळा रटाळ वाटू नये , त्यांच्यात मूल्यांची जोपासना व्हावी ,त्यांना स्वयंशिस्त लागावी ,उपस्थिती बरोबरच त्यांच्या वाचन ,लेखन ,गणन या मूलभूत क्रिया पक्क्या व्हाव्या ,त्यांना पर्यावरणाची आवड लागावी आणि ती बालके एक आदर्श व सुजाण नागरिक व्हावी म्हणून मुख्याध्यापक व सर्व उपक्रमशील तंत्रस्नेही शिक्षक विविध सहशालेय उपक्रमांचे आयोजन व नियोजन वेळोवेळी करत असतात .

कोविड काळात शारीरिक स्थिती सोबतच मानसिक स्थिती ढासळलेले पालक आणि बालक यांना शाळेची ओढ लावण्यासाठी हे उपक्रम निश्चित उपयुक्त ठरतील याचा विचार करून विविध उपक्रम राबविले . त्यापैकी काही नावीन्यपूर्ण उपक्रमांची नावे :

- प्रवेशोत्सव साजरा करूया
- एक वर्ग पूरक मार्गदर्शनाचा
- सहलीसाठी जाऊ ।ज्ञान आनंद मिळवू।।
- आजचा वार वाचन वार
- वाढदिनी पुस्तकांच्या भेटी ।ग्रंथालयाच्या समृद्धीसाठी।।
- दोन दिवस ई- लर्निंग कक्षासाठी
- एक दिवस विद्यार्थी समुपदेशनाचा
- साजरा करूया पालक-बालक शिक्षक त्रिवेणी संगम
- लेऊया पर्यावरणाचे पंख
- पंधरा मिनिटे योग ।मिटवूया सारे रोग।।
- चित्र काढू या ।रंग भरू या ।आनंदी होऊया।।
- थोरांचा विचार। देई जीवनात आधार।।
- सण आनंदाचा क्षण
- दिन साजरे करूया ।महत्त्व जाणून घेऊया।।
- वार्षिक स्नेहसंमेलनात रमावे वाटे ।मज शाळेत जावे वाटे।।
- जोडू क्रीडांगणाशी नाती सारी । होईल मग प्राप्ती भारी।।
- **संख्याज्ञानाशी नाते जोडू ।आयुष्याचे गणित सोडवू।।**

विविध उपक्रमातून आनंददायी शिक्षण





वर्ग स्तरावरील उपक्रमांमध्ये 'आजचा वार वाचन वार ',’सण आनंदाचा क्षण ' ,’वाक्य लिहूया खाऊ मिळवूया',’ संख्याज्ञानाशी नाते जोडू आयुष्याचे गणित सोडवू' इत्यादी उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक मूल्यांबरोबरच वाचन, लेखन गणन या मूलभूत क्रिया पक्क्या होण्यासाठी प्रयत्न केले जातात .'एक दिवस विद्यार्थी समुपदेशनाचा 'या उपक्रमांतर्गत शाळेच्या माजी विद्यार्थ्यांना वर्गात बोलावून त्यांचे शाळेविषयी अनुभव विद्यार्थ्यांना ऐकवले जातात. त्यातून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली जाते.

शाळा स्तरावर 'एक वर्ग पूरक मार्गदर्शनाचा' या अंतर्गत इयत्ता पहिली ते पाचवी वर्गाच्या प्रत्येक तुकडीतील मागे पडलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांचा वेगळा वर्ग भरवून पूरक मार्गदर्शनातून त्यांना इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्ती ,क्षमता प्राप्त व्हाव्यात यासाठी प्रयत्न केला जातो.

व्हिडिओ लिंक :

https://youtu.be/3IRD3KtTaAU

https://youtu.be/Mc9vaUUXrrc

https://youtube.com/shorts/ullwPcEpnjY?feature=share

https://youtube.com/shorts/16aKPxV6Yzc?feature=share

मुख्याध्यापकासह सर्व शिक्षक उत्तम नियोजक ,मार्गदर्शक ,प्रशासक ,प्रदाता ,सुलभक तसेच स्वतः अध्ययनार्थी बनून विद्यार्थ्यांच्या उणिवा जाणीवेत बदलवून त्यांच्यात सुधारणा घडवत त्यांना आयुष्य जगायला शिकवित आहेत . शाळेचे स्पर्धा परीक्षेतील वाढते यश आणि शाळेची वाढती पटसंख्या यातूनच उपक्रमांची फलनिष्पत्ती प्रतीत होताना दिसते आहे.

=====@=====

3. **शाळेचे नाव** : जिल्हा परिषद हायस्कूल वरठी, ता. मोहाडी, जिल्हा भंडारा.

ईमेल : warthiz.phighschool@gmail.com

मुख्याध्यापकाचे नाव : श्रीमती केशर एस. बोकडे

मागील 2 वर्षांपासून कोविड-19 मुळे शाळा बंद स्थितीत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण चालू होते. विद्यार्थ्यांना घरी राहून मोबाईलद्वारे, टि.व्ही.चॅनेलद्वारे शिक्षणाचे धडे देण्यात येत असत.परिणामी चालू शैक्षणिक सत्रात (सत्र 2022-2023) विद्यार्थी शाळेत अनियमित येऊ लागले व घरी राहून मोबाईल, टि.व्ही. यांच्यात गुरफटले असल्याचे पालकांच्या तक्रारी प्राप्त होऊ लागल्या. या उद्भवलेल्या परिस्थितीवर मात करण्याच्या हेतूने विविध आनंददायी उपक्रमांचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले व शाळेत सत्रारंभापासून विविध उपक्रम राबविले.

शाळेतील सहाय्यक शिक्षक श्री.बाळासाहेब मुंडे यांच्या कल्पनेने व शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक याचे सहकार्याने अत्यंत यशस्वीरीत्या राबविण्यात आलेल्या "आरोग्यसंपन्न सवयींद्वारे अध्ययन-समृद्धता " या नवोपक्रमातून अपेक्षित अनेक उदिष्टांची पूर्तता झाली. सत्रारंभी वर्गनिहाय पालकसभेचे आयोजन करून पालकांना उपक्रमाची माहिती दिली. विविध मनोरंजक उपक्रमांसमवेत शालेय शिस्त लावण्याच्या उद्देशाने सर्व विद्यार्थ्यांना ओळखपत्र अनिवार्य केले. शालेय गणवेश, टाय-बेल्ट, शुज, शॉक्स,इ. मध्येच विद्यार्थ्याने शाळेत उपस्थित राहण्याकरिता वेळोवेळी प्रेरीत केले. आठवड्यातील प्रत्येक शनिवारला परिपाठांतर्गत कवायत, योगासन यांद्वारे व्यायामाचे व आरोग्यदायक सवयी अंगिकारण्याचे महत्व समजावून दिले.आरोग्य तपासणी, हेल्थकेअर व्यवसाय शिक्षण प्रशिक्षकांची मुलाखत व मार्गदर्शन यांद्वारे विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक आनंदमय वातावरणात अध्ययन- अनुभव दिले. परिणामी शाळेतील विद्यार्थी नियमित शाळेत उपस्थित राहू लागले.

उपक्रमाची युट्युब लिंकः- https://youtu.be/e0MV1FNOp7k

स्थानिक सण-उत्सव मनोरंजकतेने साजरे करणेः- शाळेत स्थानिक सण-उत्सव आनंदमय साजरे करुन विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणीत करण्याचे प्रयत्न केले. जसे- गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, विविध महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमांचे आयोजन केले.

शाळेतील नवरात्रोत्सव गरबा युट्युब लिंकः- https://youtu.be/yqAkJ_2Ar_0

क्षेत्रभेटः- अदानी पावर प्लांट, तिरोडा येथे विद्यार्थ्यांना नेऊन विद्युत निर्मिती व अनुषंगिक उद्योग यांची माहिती प्रत्यक्ष अनुभवाद्वारे देण्यात आली. वित्तीय साक्षरता अभियानांतर्गत भारतीय रिजर्व बॅंक, नागपूर द्वारे विद्यार्थ्यांना वित्तीय साक्षरतेचे अध्ययन अनुभव देण्यात आले. ऑनलाईन व्यवहार करतांना घ्यावयाची काळजी, बॅंक खात्यांचे प्रकार या महत्वपूर्ण बाबींवर सदरील उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले.

फोटो लिंकः-

https://drive.google.com/file/d/17QA4-zglRsxoDQiLeIjMOtmtNNiiyycD/view?usp=drivesdk

व्यवसाय शिक्षणांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांना हेल्थकेअर व मल्टिस्किल यांचे व्यवसाय प्रशिक्षकांमार्फत प्रात्याक्षिकांतून प्रत्यक्ष अनुभव दिले जातात, त्यामुळे या कोर्सेस कडे विद्यार्थ्यांचा वाढता कल असल्याचे दिसून आले. लोकसहभागातून शाळा विकासात्मक प्रयत्न यशस्वीपणे चालू आहेत.

विद्यार्थ्यांना टॅब्लेट्सचे वितरणः- विद्यालयातील व्यवसाय शिक्षण घेत असलेल्या इ. 11 वी मधील विद्यार्थ्यांना Lahi या स्वयंसेवी संस्थेद्वारे मोफत टॅबचे वितरण करण्यात आले. यातून विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाची आवड निर्माण होवून कौशल्य विकसनास मदत झाली.

लिंकः-

https://drive.google.com/file/d/14HI0jPK3BHOe-4vgvazB7g8YDCjZ0tnQ/view?usp=drivesdk

फलनिष्पत्तीः-

1. शाळेतील विद्यार्थ्यांना लागलेली मोबाईल,टि.व्ही. यांची अतिरेकी सवय कमी झाली.
2. शाळेतील उपस्थितीचे प्रमाणात जवळजवळ 95% पर्यंत वाढ दिसून आली.
3. मुले शाळेत टिकून राहू लागली.
4. शाळेत मनोरंजक पद्धतीने आत्मसात केलेले अध्ययन- अनुभव, प्राप्त ज्ञानाचे दैनंदिन जीवनात उपयोजन करत असल्याचे दिसून आले.
5. शालेय शिस्तीचे काटेकोरपणे पालन होवू लागले.
6. शालेय विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागात वाढ दिसून आली.

7. प्राप्त ज्ञानाचे दैनंदिन जीवनात उपयोजनामुळे शिकलेले अनुभव दीर्घकाळ स्मरणात राहू लागले, परिणामी गुणवत्तेत वाढ झाली.

अशाप्रकारे शाळेत मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व शालेय समित्यांचे पदाधिकारी यांचे समन्वयाद्वारे व सहेतूक राबविण्यात आलेल्या उपक्रमांमुळे शाळेतील विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत झाली.

शाळेतील उपक्रमांची व्हिडीओ लिंकः-

1. https://youtu.be/mPwmcbEIXZA
2. https://drive.google.com/file/d/1YN_X9vgvPgUm9wa51SfnckjgThKt6d_i/view?usp=drivesdk
3. https://youtu.be/e0MV1FNOp7k

=====@=====

4.शाळेचे नाव - विनोबा भावे मनपा मराठी शाळा ,विनोबा भावे नगर, कुर्ला (पश्चिम) , मुंबई

मुख्याध्यापकाचे नाव - श्रीम. सुनिता चंदनशिवे.

मेल आयडी - sunitachandanshive8@gmail.com

प्राथमिक स्तरावरील बालकांना आनंदी राहणे, खेळणे, बागडणे अनेक प्रकारच्या गमती जमती फार आवडत असतात. विदयार्थ्यांना दिवसभर शाळेत वर्गात बसवावे लागते. त्यामुळे मूल टिकेल व शिकेल या गोष्टींकडे लक्ष देणे महत्वाचे असते. यासाठी शाळेतून विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन विशेष अध्ययन अनुभवांची निर्मिती व निवड केली.

आनंददायी अभ्यासक्रमाचा उद्देश :- 1. विदयार्थ्यांचे मानसिक स्वास्थ उत्तम राखणे. 2. विदयार्थ्यांमध्ये सामाजिक, भावनिक कौशल्ये विकसित करणे. 3. शालेय स्तरावर ताणतणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी विदयार्थ्यांना सक्षम बनविणे.

1. सजगता :- श्वासावरील क्रीया अनुलोम व विलोम ऐका व कृती करा.

2. गोष्ट सांगणे :- गोष्ट ही मूल्ये, गाभा घटक, जीवनकौशल्य भान यांची जाणीव करुन देणा-या कथांची निवड.

3. कृती :- गोलातील गप्पा, चेंडूचे खेळ, अंताक्षरी, जुगलबंदी, शारीरिक स्वच्छता, मला काय वाटते ? भूमिका अभिनय आवड, सापशिडी, चला शोधूया, आठवडी बाजार यांची माहिती.

4. अभिव्यक्ती व छंद :- या आनंददायी नवोपक्रमात विदयार्थ्यांना बोलण्याची संधी मिळते . प्रसंग नाटय, गीतामंच, बातम्यावाचन, निवेदन, संवाद, वेशभुषा, मुलाखत, बालसभा, अवांतर वाचन, कविता गायन, अभिनयगीत स्पर्धा, सूत्रसंचालन इ. उपक्रमांची कल्पना, सूचना आधीपासून आनंददायी शिक्षणाच्या माध्यमातून ओळख व कृती घेतल्या जात होत्या. नेतृत्व विकास प्रशिक्षणामुळे अधिकाधिक नवोपक्रम शाळा स्तरावर सुरु करण्यात आले.

शाळेत विविध नवोपक्रमांबरोबरच डिजीटल शिक्षणही दिले जाते. संगणकाची ओळख, संगणकावरुन ज्ञाननिर्मिती , विविध शैक्षणिक व्हिडीओ माहितीपर चित्रे, गाणी, गोष्टी, बडबडगीते, इत्यादी माध्यमातून विदयार्थ्यांना आनंददायी शिक्षण मिळते. विदयार्थ्यांसाठी शालेय प्रवेशोत्सव कार्यक्रम जूनमध्ये घेण्यात येतो. यात पालकांना, SMC सदस्यांना आमंत्रीत करुन विदयार्थ्यांसाठी शाळा पूर्व तयारी मेळाव्याचे आयोजन करुन प्रवेशाची प्रक्रीया पूर्ण केली जाते. शालेय परिसर स्वच्छताबाबत विविध उपक्रम घेतले जातात. वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला, हस्तकला स्पर्धा, घेऊन विदयार्थ्यांना प्रोत्साहित व आनंदीत केले जाते. वरील नवोपक्रम शाळेत राबवितांना नेतृत्व क्षमतेत वाढ झाली. शालेय नेतृत्व करतांना विदयार्थी केंद्रबिंदू मानून त्यांची निर्णय क्षमता वाढविली जाते. शालेय नेतृत्व करतांना प्रसंगी निर्णय कसे घ्यावेत. त्यानुसार शालेय व्यवस्थापन व अंमलबजावणी कशी करावी हे समजले.

पालक,SMC सदस्य, शिक्षक, इतर कर्मचारी वृंद यांना वरील उपक्रमातून सामावून घेण्याची क्षमता वाढीस लागून शाळा ही फक्त मुख्याध्यापकाची नसून शाळेतील विदयार्थी, शिक्षक, पालक, मातापालक संघ यांची एक साखळी व टीमवर्क आहे.

आनंददायी शिक्षणासाठी कमी उपस्थिती व विदयार्थी गळती या अडचणीवर मात करण्यात आली. विदयार्थी उपस्थिती वाढविण्यासाठी परिपाठात वेळेत येणा-या व स्वच्छ असणा-या विदयार्थ्यांना गुलाबाचे फुल देऊन स्वागत कले. पालकांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. वारंवार गृहभेटी घेऊन विदयार्थ्यांच्या, पालकांच्या समस्या जाणून त्यावर उपाय योजना केल्या. मातापालक यांची सभा घेऊन समुपदेशन करण्यात आले.

मागील वर्षापेक्षा ह्यावर्षी 25 विदयार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये वाढ झाली. तसेच विदयार्थ्यांची उपस्थिती वाढली.

=====@=====

क्षेत्र :
पायाभूत साक्षरता आणि अंकगणितीय क्षमता

1. जि.प. प्राथमिक मराठी शाळा, काटपूर (म), ता . मोर्शी, जि. अमरावती.
2. जि.प.वरिष्ठ प्राथमिक शाळा सराटी , ता .मारेगाव जि.यवतमाळ

पायाभूत साक्षरता आणि अंकगणितीय क्षमता

1.शाळेचे नाव - जि.प. प्राथमिक मराठी शाळा, काटपूर (म), ता . मोर्शी, जि. अमरावती.

मुख्याध्यापकाचे नाव – सौ.पपीता सच्चिदानंद पंचारिया

इमेल आयडी – papitapanchariya@gmail.com



गेल्या दोन वर्षामध्ये कोरोना काळात शाळा बंद असल्यामुळे शाळेतील सर्वच वर्गातील विद्यार्थी पायाभूत साक्षरता आणि अंकगणितीय क्षमतामध्ये मागे पडली आहेत. त्यांना कोरोना काळात शिक्षकांनी व गावातीलच उच्चशिक्षित विद्यार्थ्यांच्या मदतीने शिक्षक मित्र या उपक्रमाव्दारे शाळेतील विद्यार्थ्यांना शिकण्यास मदत केली. परंतु तरी देखील विद्यार्थी पाहिजे त्या प्रमाणात पायाभूत साक्षरता आणि अंकगणितीय क्षमता प्राप्त करू शकले नाही. त्यामुळेच शाळेच्या मुख्याध्यपिका व सर्व शिक्षकांच्या सर्वांगीण प्रयत्नाने शाळेला चांगले दिवस आणण्याचा प्रयत्न सुरु आहे.

परिपाठ

आदर्श व सुंदर परिपाठ हा शाळेचा आरसा आहे. प्रत्येक वर्गनायक हा आपआपल्या परिपाठाच्या तयारीची चूणूक दाखवतो. या परिपाठात नियमितपणे वेगवेगळया दिवशी वेगवेगळया विद्यार्थ्यांची निवड हा वर्गनायक करत असतो .त्यामुळे मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांला सुद्धा पुढे येण्यास संधी मिळते. परिपाठात दररोज एक नवीन सुविचार, म्हण व त्याचा अर्थ तसेच कथाकथन, सामान्यज्ञान, पाढे पाठांतर, प्रार्थना घेतली जाते. यामुळे विद्यार्थांना वाचनाची गोडी निर्माण होवून सभाधीटपणा अंगी येतो .

https://drive.google.com/drive/folders/1oRLV-0-f801DSkY_RQM3li8SPpCvP-mw?usp=share_link

ज्ञानरचनावादी अध्यापन

शाळेतील सर्व शिक्षक आपले अध्यापन आनंददायी आणि दर्जेदार व्हावे याकरिता ज्ञानरचनावादी अध्यापन पद्धतीचा अवलंब करतात. याकरिता शाळेत असलेल्या भाषा पेटी व गणित पेटीतील मिळालेल्या साहित्याचा पूरेपूर वापर करतात. यामुळे शिक्षण प्रक्रीया आनंददायी होऊन दर्जेदार, प्रभावी अध्ययन अध्यापन घडून आणले जाते. यामुळे अध्ययनात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रगती घडवून आणण्यास मदत होते.

https://drive.google.com/drive/folders/1z-kzeu2InZhjVIKoi5zt5vuShdtLLsM8?usp=share_link

मनोरंजक व नाविण्यपूर्ण खेळ

शाळेमध्ये विविध प्रकारचे भाषिक खेळ आणि गणितीय खेळ सर्वच शिक्षक भाषिक विकास आणि गणितीय विकास होण्याकरिता घेत असतात, या खेळांच्या आधारे विद्यार्थांचे मनोरंजनातून शिक्षण घडत असते व त्यांच्या पायाभूत क्षमता विकसित होण्यास मदत होते.

https://drive.google.com/drive/folders/1_6T_0XoDKGkLNk3PJGOscrHogNQt9xV?usp=share_link

कविता गायन

भाषिक विकास वाढविण्यात प्रभावी ठरलेले उपक्रम म्हणजे कविता गायन.या काळात मुलांना वर्गात बसवून प्रभावी अध्यापन उद्दीष्टपूर्तीनुसार होण्यास कविता गायन हा उपक्रम प्रभावी ठरला . मुलांचे साभिनय कविता गायन घेतले त्यामुळे मुलांना अध्ययनात गोडी निर्माण होऊ लागली.

https://drive.google.com/drive/folders/1Jm6N7a-kP-1mOpPWVg_o0K4Gltv2cO1h?usp=share_link

पाढे पाठांतर (जी तारीख तो पाढा)

https://drive.google.com/drive/folders/16POy5SqcTiCUbWYOAP4jKDryVOV4KRva?usp=share_link

भाषण स्पर्धा

भाषिक विकासाकरिता अतिशय दर्जेदार हा उपक्रम ठरला. कोणतेही ताण न ठेवता मुलांना विशिष्ट विषयावर बोलायला मिळते. त्यातून पाठांतर क्षमता, स्मरणशक्ती वाढविणे व कौशल्य प्राप्त होते.

https://drive.google.com/drive/folders/1odAwo7RsTXiXFztTLaOrM_0umnbmIJfx?usp=share_link

मणीमाळ मोजा

अंकज्ञान वाढविण्यासाठी हा उपक्रम अतिशय उपयोगी .मुले आनंदाने गटात शिकतात. आनंददायी पद्धतीने इतर आलेल्या पाहूण्यांना आपले कृतीयुक्त अध्ययन करण्यात सहभाग देतांना लक्षात आले.

https://drive.google.com/drive/folders/1lC-X4e8vZ1WCdDfdlRakl7a8QqbP2n3j?usp=share_link

शै. साहीत्याच्या आधारे इंग्रजी वाचन

मुलांना सहभागी करून घेणे व त्या आधारे अध्ययन - अध्यापन उददीष्टपूर्तीकडे नेण्याचे कार्य शिक्षकांनी या उपक्रमातून केले. मुले इंग्रजी वाचन करतात. परिपाठात याच उपक्रमाचा उपयोग, वर्गात वैयक्तिक स्तरावर गटपद्धतीने उपयोग केला जाऊ लागला.

https://drive.google.com/drive/folders/1OLjb-HPhlkcT1AuNfWVz7SXVoG6ql-vs?usp=share_link

असे अनेक उपक्रम राबविल्यामुळे मुले नियमित शाळेत आनंदाने येतात. अध्ययनात लक्ष देतान नक्कीच सर्व मुले पायाभूत साक्षरता व अंकगणितीय क्षमता प्राप्त करतील असा विश्वास आहे. शाळेतील अतिशय उत्साही वातावरणात मुले अध्ययन करित असून भाषा, इंग्रजी, गणित, सामाजिकशास्त्र, परिसर अभ्यास, कला, कार्यानुभव व शारिरीक शिक्षणातील सर्व अध्ययन निष्पती पूर्ण होत आहे. अनेक सहशालेय उपक्रम मधून मुलांचा सामाजिक, भावनिक, शारीरिक विकास होत आहे.

=====@=====

2.शाळेचे नाव : जि.प.वरिष्ठ प्राथमिक शाळा सराटी , ता .मारेगाव जि.यवतमाळ

मुख्याध्यापकाचे नाव : श्री.हरीश अरविंदराव दरबेश्वर

यवतमाळ जिल्ह्यात दुर्गम भागातला मारेगाव तालुका, त्यातील पेसा भागातील जि. प. प्राथमिक शाळा. सराटी तालुक्यापासून 15 किलोमीटर अंतरावर आहे . शाळेची स्थापना 1969 साली झाली. वर्ष 2018 मध्ये विद्यार्थी संख्या 50 होती , सन 2022-23 मध्ये शाळेत एकूण 76 विद्यार्थी आहेत . गावात आदिवासी बहुल समाज आहे. आजूबाजूचे आदिवासी विद्यार्थी शाळेत येतात . या बालकांमध्ये पायाभूत साक्षरता आणि अंकगणीतीय क्षमता प्राप्त नव्हत्या .

अडचणीवर मात करण्यासाठी केलेली उपाय योजना

https://photos.app.goo.gl/wJKas72c3Qt6gAvD8"://photos.app.goo.gl/wj
https://photos.app.goo.gl/wJKas72c3Qt6gAvD8"K https://photos.app.goo.gl/wJKas72c3Qt6gAvD8"as72c
https://photos.app.goo.gl/wJKas72c3Qt6gAvD8"3
https://photos.app.goo.gl/wJKas72c3Qt6gAvD8"Qt6gAvD8

विविध खेळाच्या माध्यमातून कृतियुक्त उपक्रम.

1. प्रत्येक वर्गासाठी विषयमित्र संकल्पना . बाल आनंद मेळावा.
2. गट पद्धतीचा सर्वात जास्त वापर. निवडणुकीद्वारे शालेय मंत्रिमंडळ निर्मिती.
3. विद्यार्थ्यांच्या मताचा आदर. विविध स्पर्धांचे आयोजन.
4. गणीतीय प्रश्नमंजुषा . गणित मराठी पेटीचा भरपूर वापर.

7)स्मार्ट टीव्हीचा वापर. संगीतमय परिपाठ. सांस्कृतिक कार्यक्रम

लिंक : https://photos.app.goo.gl/QbowpYpY7EWbYA2V
https://photos.app.goo.gl/QbowpYpY7EWbYA2V6"6

फलनिष्पत्ती :

1. विद्यार्थ्यांना भाषा विषयाची आवड निर्माण झाली.
2. चित्र व शब्दाची सांगड घालून विद्यार्थ्यांना शब्द वाचनाचा सराव दिल्याने शब्द वाचता येऊ लागले व त्यामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास वाढत गेला.
3. विद्यार्थ्यांचे संख्या ज्ञान दृढ झाले.
4. गणितीय खेळामधून विद्यार्थ्यांनी बेरीज वजाबाकीच्या संकल्पना आत्मसात केल्या. गावकऱ्यांची शाळेप्रति आत्मीयता वाढली.

=====@=====

क्षेत्र :
मूल्याधिष्ठित शिक्षण आणि विद्यार्थी विकास.

1. जि.प . प्राथमिक शाळा,केदार वस्ती (उ.खु.)ता. माढा , जि . सोलापूर

मूल्याधिष्ठित शिक्षण आणि विद्यार्थी विकास.


1.शाळेचे नाव : जि.प . प्राथमिक शाळा,केदार वस्ती (उ.खु.)ता. माढा , जि . सोलापूर

मुख्याध्यापकाचे नाव : श्री. अर्जुन महादेव गवळी

" लहान कुटुंब ,सुखी कुटुंब."याप्रमाणे भारतात बहुतांश ठिकाणी लहान कुटुंब पहावयास मिळतात. घरामध्ये सदस्य संख्या मर्यादित आणि भरपूर प्रमाणात भौतिक सुविधा असणारी कुटुंबे आपणाला पाहायला मिळत आहेत. त्यामुळे घरातील लहान मुले म्हणजे घरातील सर्वांची लाडकी. आपल्याला आपल्या लहानपणी ज्या सुविधा मिळाल्या नाहीत. त्या सर्व सुविधा मी माझ्या मुलाला देऊ शकेल यासाठी पालकांचे चाललेली चढाओढ यामुळे मुलांना स्वतः काही आपल्याला करावे लागत नाही . पण यातून काही विपरीत परिणाम आपणाला आताच्या घडीला जाणवत आहेत. मुलांना स्वतःची छोटी- छोटी कामे करताना सुद्धा त्यांना नको वाटते यातून मुले परावलंबी बनत आहेत.

मुलांना स्वावलंबी बनवण्यासाठी शाळेत "आपले काम आपण करू, स्वावलंबनाची कास धरू."हा उपक्रम सुरू केला आणि मुलांमध्ये सकारात्मक बदल आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

शालेय स्तरावर ,वर्ग पातळीवर तसेच घरीही "आपले काम आपण करू, स्वावलंबनाची कास धरू." हा उपक्रम इयत्ता पहिलीपासून आपण राबवू शकतो. शाळेतील, वर्गातील व घरातील छोटी- छोटी कामे नियमितपणे दररोज करून घेऊ शकतो.उदा.१) शाळा, वर्ग, घर व परिसर स्वच्छतेस मदत करणे.



२) शाळेतील परसबाग व घरासमोरील झाडे यांना पाणी घालणे.

३) शाळा परिसर व घर सुशोभीकरणात मदत करणे.

४) जेवणानंतर आपले ताट स्वच्छ धुऊन ठेवणे.

५) शाळेतून घरी गेल्यावर आपले दप्तर योग्य ठिकाणी ठेवणे व गणवेशाची घडी घालून जागेवर ठेवणे.

६) घरातील धुतलेल्या कपड्यांच्या घड्या घालणे.

७) जेवणाच्या वेळी लागणारे साहित्य आणण्यासाठी आईला मदत करणे.

८) जेवणानंतर झाडू मारणे.

९) अंथरूण टाकणे व अंथरुणाच्या घड्या घालणे.

१०)स्वतःच्या कपड्यांना सुई दोऱ्याच्या मदतीने टिपा घालणे ,बटन लावणे

११) स्वतःची नखे कापणे व केस विंचरणे.

याप्रमाणे विविध उपक्रम राबवून मुलांमध्ये स्वावलंबन प्रवृत्ती जागृत करताआली.

फलश्रुती :

१) मुले हसत खेळत आनंदाने काम करू लागली.

२) मुलांमध्ये कामाविषयी आवड निर्माण झाली.

३) घरातील शाळेतील वातावरण आनंददायी झाले.

४) मुलांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागला.

५) मुलांमध्ये स्वतःच्या जबाबदारीची जाणीव निर्माण झाली.

६) घर, शाळा स्वच्छता व सुशोभीकरणात मुलांची मदत झाली.

=====@=====

क्षेत्र :
इंग्रजी विषयातील नाविन्यपूर्ण उपक्रम

1. जि. प. प्रा. शाळा ,वाल्हा ,ता. बदनापूर 'जि. जालना

इंग्रजी विषयातील नाविन्यपूर्ण उपक्रम

शाळेचे नाव : जि. प. प्रा. शाळा ,वाल्हा ,ता. बदनापूर 'जि. जालना
शिक्षकाचे नाव : श्री. महादेव बाबुराव लिंभोरे

जि. प. प्रा. शाळा ,वाल्हा ही ग्रामीण भागातील शाळा . वाल्हा शाळेतील जवळजवळ 90% पालक हे शेती व्यवसाय करतात. फक्त दहा टक्के पालक हे नोकरी व व्यवसाय करतात. यामधीलही काही पालकांची मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जातात. अशा पालकांच्या मुला मुलींना इंग्रजी शिकणे म्हणजे तारेवरची कसरत वाटते आणि अशा परिस्थितीत मुलांना इंग्रजी येणे हे शिक्षकांना गरजेचे वाटते. आपल्यासमोर बसलेला विद्यार्थी हा सर्व गुणसंपन्न सर्व विषयात किमान अध्ययन क्षमता प्राप्त केलेला असावा अशी सर्व शिक्षकांची धारणा असते. अशावेळी अध्यापन करताना इंग्रजी विषयाबद्दलची अनास्था, भीती व जागरूकता नसल्यामुळे पारंपारिक पद्धतीने अध्यापन करून हवे तसे बदल न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाच्या या उपक्रमाच्या माध्यमातून अध्यापन करण्यास सुरुवात केली.

उद्दिष्टे-

(1) शाळेतील विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाबद्दलची भीती कमी करणे.

2) शाळेतील विद्यार्थ्यांना इंग्रजी बद्दल आवड निर्माण करणे.

3) विद्यार्थी आनंदाने इंग्रजी वाचन करतील व इंग्रजी बद्दल उत्सुकता निर्माण करणे.

4) इंग्रजी विषयाचे शब्द संग्रह वाढवणे.

5) अस्खलितपणे इंग्रजी वाचन करणे.

शाळेतील वर्ग शिक्षकांनी सर्वप्रथम स्वतः LFW (LEAP FOR WORD) या उपक्रमाबद्दल माहिती जाणून घेऊन तो उपक्रम शाळेत विद्यार्थ्यांना सहज सोप्या पद्धतीने समजेल अशी अध्यापन पद्धती अगोदर समजून घेतली. विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता कुठल्या पातळीवर आहे हे समजून घेऊन आता कुठून सुरुवात करायची हे अगोदर निश्चित करण्यात आले. त्यानंतर सर्व पुस्तक प्राप्त झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांच्या वर्गानुसार व त्यांच्या क्षमतेनुसार प्रत्यक्ष अध्यापनाला सुरुवात केली.

प्रत्यक्ष अध्यापन करत असताना विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार त्याला शब्द देण्यात आले त्या शब्दांची नाविन्यता व त्या शब्दांचा उच्चार कशा पद्धतीने करावयाचा याचे स्पष्टीकरण करण्यात आले. त्या विद्यार्थ्याला तो शब्द सहज वाचन करता येईल अशी सोपी पद्धत यामध्ये (LFW) होती . अशा अनेक शब्दांचे वाचन या पद्धतीत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना सुरुवात केल्यानंतर विद्यार्थी स्वतःहून आणि आवडीने पुस्तकामधील अनेक शब्दांचे वाचन करायला लागले . नवीन शब्द म्हटलं की विद्यार्थी स्वतःहून त्याचा उच्चार करण्याचा प्रयत्न करत असत त्यानंतर विद्यार्थ्याला त्या शब्दाचे स्पेलिंग कसे बनवायचे हेही सांगण्यात आले . विद्यार्थी स्वतः शब्दांचे स्पेलिंग तयार करू लागले . एकदा विद्यार्थ्याला या अध्यापन पद्धतीचा उपयोग कसा करून घ्यायचा हे समजले की, विद्यार्थी स्वयंप्रेरणेने स्वतः त्यात सहभागी होऊ लागले. या पद्धतीमध्ये मुलांच्या पूर्वज्ञानापासून सुरुवात करून मुलांना आणखी शब्द संग्रह वाढवा म्हणून काही माईंड गेम सुद्धा आहेत आणि त्याचा वापर शाळेत केला. विद्यार्थ्यांच्या गटानुसार आम्ही त्यांना प्रत्येक दिवशी काही ठराविक शब्द देऊ लागलो. त्यानंतर विद्यार्थ्यांना त्या शब्दांचं अध्ययन करण्यास सांगितले. अशा पद्धतीने रोज काही शब्द या प्रकारे पुढील काही महिने आम्ही हा उपक्रम सातत्याने राबवला. उपक्रम राबवत असताना विद्यार्थ्यांमधील उत्सुकता ही स्पष्टपणे जाणवायला लागली. विद्यार्थी त्याबद्दल उत्साही होते आणि रोज नवीन नवीन शब्द समजून घेण्यासाठी व त्यांचं आकलन करण्यासाठी तयार होते. आता फक्त विद्यार्थ्यांना तेच शब्द पुस्तक मध्ये आल्यानंतर वाचन करणे महत्त्वाचं होतं. आम्ही या अध्यापन पद्धतीचा वापर करून झाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाठ्यक्रमामधील पुस्तकांचे वाचन करण्यास सांगितले . आश्चर्याची गोष्ट म्हणजे विद्यार्थ्याला ज्या शब्दांचं आकलन यापूर्वी झालेला आहे ते शब्द तर विद्यार्थी स्पष्टपणे वाचत होते परंतु यापूर्वी न वाचनात आलेले शब्द सुद्धा विद्यार्थी स्वतः त्याचा उच्चार आकलन करून वाचन करू लागला आणि अशा पद्धतीने आमच्या शाळेत इंग्रजी बद्दलची भीती विद्यार्थ्यांची कमी झाली.

हा उपक्रम शाळेत सुरू असताना शाळेतील विद्यार्थी गावात किंवा शेजारच्या गावात किंवा तालुक्याच्या गावात जर गेला तर तेथील इंग्रजी पाट्या पाहून तो इंग्रजी वाचन करत असे आणि त्याचा प्रत्यक्ष अनुभव पालकांनी आम्हाला सांगितला की ,मुले चालत असताना इंग्रजी पाट्या शोधू लागले व त्या वाचण्याचा प्रयत्न करू लागले म्हणजेच यावरून मुलांना इंग्रजी बद्दलची आवड निर्माण झाली आहे हे चित्र स्पष्ट झाले या गोष्टीमुळे आमच्या शिक्षक बांधवांमध्ये ही एक उत्साह निर्माण झाला की आपण जो उपक्रम राबवतोय त्याची फलनिष्पत्ती आपल्याला मिळते म्हणून सदर उपक्रम आम्हाला फायद्याचा उपयोगाचा वाटला आणि त्याचा पुरेपूर वापर आम्ही शाळेत केला.आता विद्यार्थी स्वतः हे शब्द घेतात स्वतः त्यांचा उच्चार करतात त्याचे स्पेलिंग तयार करतात आणि त्याचे अर्थही पाठ करतात, आता विद्यार्थ्यांना हे पुन्हा पुन्हा सांगण्याची आवश्यकता आम्हाला भासत नाही.

फलनिष्पत्ती-

शाळेतील विद्यार्थी इंग्रजी वाचन करू लागले. इंग्रजी शब्दाचा स्पेलिंग तयार करू लागले. त्याच सोबत स्पेलिंग पाहून शब्दांचे उच्चार बनवू लागले त्यामुळे विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयी आवड निर्माण झाली व इंग्रजी विषयात नवीन शिकण्याचा उत्साह त्यांच्यामध्ये निर्माण झाला.

=====@=====

धन्यवाद



महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था , औरंगाबाद.